वर्षाची आगाऊ वर्गणी १ रु. ८३ आ. ट. ख. सह.

ह्या मासिक पुस्तकांतील लेख कोची येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध झाले.

# केरळकोकिळ.

पुस्तक ७ वें,

सन १८९३ इसवी.

जनार्दन महादेव गुर्जर,

रामवाडी—मुंबई,

ह्यांनीं

मुंबईत,

जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छा० छा० प्रसिद्ध केलें.

किंमत दीड रुपया. ट. ख. ८=

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

# केरळकोकिल वर्ष ७ वें:—अनुक्रमणिका.

## १ चित्रें.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| आकाशयान. ... ... ... | ४९ |
| खालीं डोकें, आणि वर पाय असें चालणारें ज़नावर ! स्लोथ.+ | २६५ |
| जुळे मुलगे. +... ... ... | १ |
| नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग. | २१७ |
| पूमा. ... ... ... ... | २४१ |
| फ्लयामिंगो अथवा बृहद्बक. ... | १२१ |
| महासागरांतील वृक्षवत्प्राणी.+ ... | १४५ |
| रेशमी किडे. ... ... ... | २५ |
| शहामृग. ... ... ... ... | ७३ |
| सत्पुरुष आणि सत्कवि विठोबा अण्णा दफ्तरदार. ... | १९३,२२० |
| सिंह. ... ... ... ... | ९७ |
| सेंट बर्नर्ड जातीचे कुत्रे... ... | १६९ |


## २ अनेक विषय.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| इमानी सेवक. ... ... ... | १८० |
| उल्कापात... ... ... ... | १८४ |
| खुषामतीचा बीमोड. ... ... | २८४ |
| डोळे. ... ... ... ... | २७९ |
| थोड्यांत मौज. ... ... ... | १९ |
| दगडी कोळसा. ... ... ... | १२ |
| मर्कटी न्याय—सचित्र.... ... | २७३ |
| रसायनशास्त्र—हैद्रोजन वायु कसा काढावा ? ... ... ... | १५१ |
| विद्युन्मानसशास्त्र. | |
| व्याख्यान दुसरें. ... ... | ८३ |
| व्याख्यान तिसरें. ... ... | १५५ |
| व्याख्यान चवथें. ... ... | २२८ |
| व्याख्यान पांचवें. ... ... | २४४ |
| शुद्ध तांब्याचे स्वयंभू पत्रे. ... | ११८ |
| श्वासोच्छ्वास. ... ... ... | ४० |
| सुसरीचें घरटें. ... ... ... | २४० |
| स्थलनिर्देश. | |
| कलकत्ता. ... ... ... | १०५ |
| लंका अथवा सिंहलद्वीप. ... | २६७ |


## ३ कविता.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| एका नाटक्याचा पश्चात्ताप. ... | ३७ |
| कालक्षेप. ... ... ... ... | १४९ |
| जोडगोळी. ... ... ... | १७३ |
| प्रमाण. ... ... ... ... | २४३ |
| वर्षाकाळ.... ... ... ... | ५७ |
| वृक्षोपदेश... ... ... ... | १२३ |
| सप्तसांवत्सरिक—परमेश्वरप्रार्थना... | ६ |
| सुधारणेची सोडचिठ्ठी. ... ... | १०१ |


## ४ मलबारवर्णन.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| त्रावणकोर संस्थानची संक्षिप्त माहिती. | ७६ |
| संस्थान कोची. ... ... ... | ६२ |


## ५ लोकोत्तर चमत्कार.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| अपूर्व कौशल्य. ... ... ... | १३१ |
| जळमाणसें. ... ... ... | ११२ |
| जंगली समुद्र. ... ... ... | ६४ |
| रक्ताची बदल. ... ... ... | ८० |
| हिशोब करण्याचें यंत्र. ... ... | ५९ |


+ अशी खूण ज्यापुढें आहे ते " लोकोत्तर चमत्कार. "

## ६ पुस्तकपरीक्षा.


कै० वा० बाळगंगाधर शास्त्री जांभेकर यांचें चरित्र—रा० बाळकृष्ण नारायण देव. ... ... ... ... ... ... ... ... ... १४३
त्राटिका नाटक—वासुदेव बाळकृष्ण केळकर बी. ए. ... ... ... ... १६७
दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास—भाग ३ प्रो० बा० प्र० मोडक. ७१
धौम महाबळेश्वरवर्णन—कै० यशवंतराव आनंदराव उदास बी. ए. ... १२०
नानाफडनविसांचें चरित्र—रा० वामन शास्त्री खरे. ... ... ... ... १३२
निबंधलेखन—रा० त्र्यंबक रामचंद्र लुकतुके. ... ... ... ... ... २६०
नीतिपाठमाला—भाग १ ला—चंद्रशेखर विनायक नवल्कर व मनोहर विठ्ठल तर्खडकर. ... ... ... ... ... ... ... ... १६६
भारतभाग्योदय.... ... ... ... ... ... ... ... ... ... ९४
मुंबईचा व्यापार—रा० भीमराव सीताराम शालिग्राम. ... ... ... १९१
रजपूतकन्या तारा—पां० बा० द० ... ... ... ... ... ... ... ९४
रंगलूट ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... १४४
रामचंद्रोत्सवचंद्रिका—रा० बापूजी लक्ष्मण कुलकर्णी. ... ... ... २८६
वृक्षवर्णन—कै० गो० ना० माडगांवकर. ... ... ... ... ... ... २८८
श्रीसयाजीमाहात्म्य—बडोदावत्सल. ... ... ... ... ... ... ... १४३
सिंधप्रांताचा भूगोल—रा० विष्णु लक्ष्मण प्रभुणे. ... ... ... ... १४४
सुलभ व्याकरण—रा० वामन अनंत भिडे. ... ... ... ... ... १४३
स्वशरीरसंरक्षण—रा० बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर.... ... ... १६८


## ७ स्फुट विषय.


कलमबहादरांस गोलापागोटें. ... ... ... ... ... २१, ४४, ६६,


## ८ सृष्टिवैचित्र्य.


पाण्याचीं रूपांतरें. ... ... ... ... ... ... ... ... ८
पर्जन्य. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... १२७
झरे. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... २८३


## ९ किरकोळ.


प्रश्नांचीं उत्तरें. ... ... ... ... ... ... ... २४, ४८, ९६, १२०,
बुद्धिबळांचा प्रश्न ... ... ... ... ... ... २४, ७२, ९६,
पत्रव्यवहार व त्यास उत्तर. ... ... ... ... ... ... ... ... २६२

## केरळकोकिळ मासिकपुस्तक, वर्ष सातवें.

# सिंहावलोकन

### अथवा

## सन १८९३ सालांत घडलेल्या ठळक ठळक गोष्टींचा गोषवारा.

ता० ४ जानुआरी १८९३.—बेकर्सव्हिली—क्यालिफोर्निआ—येथें वेश पालटलेल्या पांचशें मंडळीच्या टोळीनें कैद केलेल्या खुनाच्या अपराध्यांस सोडवून घेण्याकरितां तुरुंगावर हल्ला करून शेरीफ व सात कामगार जागच्या जागींच लोळविले. टोळीपैकीं पंचवीस असामी बळी पडून शेंकडों लोकांस जखमा झाल्या.

ता० १५ जानुआरी १८९३.—**श्रीमंत रामराव आबासाहेब** यांस कोल्हापुरचे पो. एजंट कर्नल उडहाऊस सी. आय. ई. यांनीं जत संस्थानच्या गादीवर बसविलें. दत्तकाची निवड सरकारानें आपल्या स्वाधीन ठेविली होती असें ह्मणतात. कुंकवाला आधार.

ता० १६ जानुआरी—१८९३.—**समारा रेलवे**वरून जाणाऱ्या एका गाडींतून रशिअन पलटणीचे २०० शिपायी प्रवास करीत असतां एकाएकीं गाडीस आग लागून त्यांपैकीं पन्नास असामी जळून खाक झाले. दुर्दैव बिचाऱ्यांचें.

ता० ४ फेब्रुआरी १८९३.—**रुप्याचें नाणें** टांकसाळींतून पाडण्याची बंदी करण्याच्या विचाराबद्दल आपली नाखुषी प्रदर्शित करण्याकरतां व्हाईसराय साहेबांजवळ **करनसी डेप्युटेशन** गेलें होतें.

ता० ४ फेब्रुआरी १८९३.—झ्यांटी बेटांत **धरणीकंपाचे** अनेक धक्के बसल्यानें तिकडील सर्व घरें अगदीं जमिनदोस्त झालीं, त्यामुळें दहा हजार लोक उघडे पडले.

ता० १३ फेब्रुआरी १८९३.—मि. ग्लाडस्टन् साहेबांनीं **ऐरिश होमरूलबिल** पार्लमेंटसभेंत दाखल केलें.

ता० १ मार्च १८९३.—ऑ. **दादाभाई नौरोजी** यांनीं विलायतेंत व हिंदुस्थानांत **सिव्हिल सर्व्हिस**ची परीक्षा एकसमयावच्छेदेंकरून व्हावी याबद्दलचें बिल पार्लमेंट सभेपुढें आणलें.

ता० २९ मार्च १८९३.—बंगालसरकारानें **ज्युरीनें न्याय** करण्याचें बंद केल्याबद्दलचा जाहीरनामा रद्द केला.

ता० ८ एप्रिल १८९३.—हंगारी, बलगेरिया आणि सर्व्हिया वगैरे प्रांतांत **भूकंपाचे** मोठमोठे धक्के बसले. सर्व्हियांत तर कित्येक गांवच्या गांव बसले. शेंकडों माणसांना अखेरचा प्रसाद मिळाला. ईश्वरी सत्ता.

ता० ८ एप्रिल १८९३.—**पतिआळच्या महाराजांनीं** आपल्या पदरच्या एका यूरोपिअन कामगाराच्या वहिणीवर फिदा होऊन तिच्या बरोबर हिंदुधर्माप्रमाणें लग्न लाविलें. परंतु तीस प्रथम शीख धर्माची दीक्षा देऊन पावन करून घेतलें. हिचें पहिलें नांव **मिस बायरन** असें आहे; परंतु ती आतां **हरनाम कुंवर** या नांवानें महाराणी या नात्यानें वापरणार. पट्टराणीच झाली ह्मणावयाचें ! !

ता० १ मे १८९३.—**श्री० सेनाखासखेल समशेरबहादर सयाजीराव गायकवाड** हे पुन: युरोपच्या महायात्रेला निघाले. परद्वीपगमन पुन: पुन: करण्याची महाराजांची हांव जास्तीच दुणावत चाललेली पाहून मनांत भीतीनें ठाव घेतलेला आहे. महाराज समंजसच आहेत, तेव्हां त्यांना इशाऱ्यादाखल लिहिण्याचें फारसें प्रयोजन नाहीं.

ता० ४ जून १८९३.—पार्लमेंटचे मेंबर **मि० पाल** यांनीं सभेच्या नियमांप्रमाणें **सिव्हिल सर्व्हिसच्या** परीक्षेसंबंधानें सूचना पार्लमेंट सभेपुढें आणिली; त्या संबंधानें बरीच भवति न भवति होऊन अखेरीस मताधिक्यानें ती सूचना पास पाडली. त्यावरून कान्सरव्हेटिव्ह पक्षानें आणि ऍंग्लो इंडियन पत्रांनीं बराच **टाहो** फोडला, ह्मणून विलायतेंतील कित्येक हट्टवादी मंडळीच्या दुराग्रहावरून विलायतसरकारनें सदरहू परीक्षा दोन्ही ठिकाणीं घेणें न घेणें हें हिंदुस्थानसरकारच्या मर्जीवर राखून ठेविलें.

ता० २५ जून १८९३.—हिंदूंच्या देवळांसमोर बकरी ईदच्या दिवशीं **रंगून** व **अझमगड** या ठिकाणीं मुसलमान लोकांस गाई मारण्याचा प्रतिबंध केल्यामुळें मुसलमानांनीं **मोठा दंगा केला**. सिव्हिल आणि मिलिटरी फौजेची मदत घ्यावी लागली.

ता० २६ जून १८९३.—**मक्का** येथें यात्रेकरतां गेलेल्या लोकांपैकीं सुमारें पटकीनें एक हजार लोक **स्वाहा** केले. यात्रेचा प्रभावच तसा आहे; आणखी क्षेत्रांच्या ठिकाणीं देह ठेवणें हें कांहीं वावगें नाहीं. स्वर्गप्राप्तीचा सुलभ उपाय.

ता० ६ जुलै १८९३.—इंग्लंडचे **प्रिन्स जॉर्ज** ड्यूक ऑफ **यार्क** आणि **प्रिन्सेस व्हिक्टोरिया मेरी ऑफ टेक** ह्यांचा **विवाह** झाला. ड्यूक ऑफ यार्कचे वडील बंधू **प्रिन्स व्हिक्टर** यांस प्रिन्सेस मेरी ही प्रथम वधू नेमस्त केली होती; परंतु तसा योग घडून यावयाचा नव्हता. ईश्वरी योजना ! !

ग्रं. मा. २०४।२।९



ता० २० जुलै १८९३.—**कलकत्त्यास अतिवृष्टि** होऊन कांहीं विद्युत्पातही झाले. शहर जलमय झालें होतें. मालाची पुष्कळ खराबी झाली.

ता० २० जुलै १८९३.—**रावळपिंडींत सोळा तास पर्जन्यवृष्टि** होऊन **ले** नदीला **पूर** आला. त्यामुळें किनाऱ्याकडील गांवांचें फार नुकसान झालें. कित्येक माणसें व ीज वस्त वाहून गेली.

ता० २५ जुलै १८९३.—काठेवाडांत जुनागड संस्थानांतील **प्रभासपट्टण** या शहरांत **मुसलमान लोकांनीं मोठा दंगा** करून, ११ हिंदूंस ठार मारिलें. त्यांपैकीं कित्येकांस **जिवंत जाळलें.** हिंदूंचीं देवळें जाळून टाकिलीं, व देवांच्या मूर्ति वगैरे छिन्नविछिन्न करून टाकिल्या; असा महाअनर्थ करून सोडला. हे लोक पार्शी वगैरे लोकांवर हात टाकतां टाकतां आजांशीं हिंदूंवरही हात टाकूं लागले आहेत. सरकारासही हे लोक कालांतरानें **'नाकापेक्षां मोती जड'** होण्यास चुकणार नाहींत, असें मुंबईस झालेल्या भयंकर दंग्याच्या वेळेस सरकाराची चोहोंकडून पलटणें गोळा करण्यांत जी त्रेधा उडाली त्यावरून अनुमान करतां येतें.

ता० २७ जुलै १८९३.—इंग्लंडांत कामन्स सभेंत **ऐरिश होमरूलबिल** पास होणार, असें वाटतांच कान्सर्व्हेटिव्ह पक्षाच्या एका पुढाऱ्यानें **ग्लाडस्टन** साहेबांचा मत्सरबुद्धीनें जरा **विनोद** केला. त्यावरून तेथें **मुष्टीप्रहारापर्यंत** मजल पोहोंचून कांहीं वेळ जगद्विख्यात **पार्लमेंट सभेंत लट्ठालट्ठी झाली.** गांव तेथें महारवाडा आहेच.

ता० ११ आगष्ट १८९३.—**मुंबईचा दंगा.**—हिंदुस्थानांत अनेक दंगे होतात, परंतु मुंबईत झालेल्या दंग्यानें तर अगदीं कमाल करून सोडली. मुंबईत अकरा तारखेस, ह्मणजे **दिवली अमावास्येच्या** दिवशीं मुसलमान लोक टोळीनें जुम्मामशिदींतून दीन, दीन, शब्द करीत **हल्ला** करण्यास बाहेर पडले. मशिदीसमोर आमचे पुरातन मारुतीचें लहानसें देऊळ आहे, त्यावर मुसलमान लोकांनीं रोख धरून मारामारीस सुरवात केली; हां हां ह्मणतां तो **दंगा** सर्व मुंबईभर पसरला. आमचे लोक काय, किंवा पोलीस काय, अगदीं गैरसावध होते; ह्मणून दंग्याच्या पहिल्या दिवशीं मुसलमान लोकांचें वरेंच फावलें; जेम तेम मुंबईतील दोन, तीन पलटणें आणविलीं, तथापि दंगा वाढल्या प्रमाणावरच होता. दुसऱ्या दिवशीं (ता०१२ आगष्ट) दंग्याचें स्वरूप फारच **भयंकर** झालें. परंतु सदरहू दिवशीं आमचे लोक अधिक सावध असल्यामुळें मुसलमान लोकांचा दंगा चालूं नये अशा रीतीनें राहिले. या दिवशीं मात्र गिरण्यांतले मराठे, कोळी, कुणबी आणि कामाठीपुऱ्यांतले मर्द कामाठी यांनीं तर मुसलमान लोकांस त्यांचा प्रतिकार करण्यांत बराच हात दाखविला; ह्मणून हिंदू लोकांचें जीवीत सर्वांशीं त्यांच्यावर अवलंबून होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं;

आणि त्यांनींच मुसलमान लोकांची रग जिरविली. तिसऱ्या व चवथ्या दिवसाएर्यंत सरकारचीं **पुणें, शिरूर, देवळाली** वगैरे ठिकाणांहून **पलटणें** येतच होतीं. तिसऱ्या दिवशीं दंगा जरा थंडावला. या दंग्यांत उभय पक्षांचे शेंकडों लोक मेले ह्मणतात. त्यांत मुसलमान लोक हिंदूंपेक्षां अधिक मेले. चार, पांच दिवस मुंबईस केवळ **प्रेतकळा** चढली होती. या दंग्यांत विशेष आश्चर्यकारक आणि विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही झाली कीं, ज्याप्रमाणें मुसलमानांनीं हिंदूंचीं देवळें वगैरे वाटविलीं, त्याचप्रमाणें हिंदूंनीं अनावर आवेशांत निरुपायास्तव मुसलमानांच्या मशिदी फोडतोडून व कित्येक **जाळून** देखील उध्वस्त करून टाकल्या. आणि मुसलमानांस वगैरे "जशास तसें भेटे, व मनींचा संशय फिटे" असें अनुभवास आणून दिलें. हिंदू लोकांच्या देवळांची नासधूस केल्याच्या गोष्टी इतिहासांतून अनेक सांपडतील; परंतु हिंदूंनीं मुसलमानांच्या मशिदींवर हल्ला करून त्या जाळून वगैरे टाकल्याचें धाडस केलें, ही निदान आमच्या स्मरणांतली पहिलीच गोष्ट होय. या दंग्यांत साहेब लोकांचीही बरीच **गाळण** उडून गेली होती. त्यांनीं ट्रेचर कंपनींत एकही हत्यार राहूं दिलें नाहीं! व्यापारास बराच खो बसला; कामधंद्यास मंदी आली, घरांतून बाहेर पाऊल टाकण्यास जिवावर येई. लोकांच्या दररोज नव्यां नव्या गप्पा ऐकून मनांत अतोनात दहशत बसे. याप्रमाणें सर्वांच्या तोंडचें अगदीं पाणी पळालें होतें. या दंग्याची उपशांती करण्याकरतां हिंदू व मुसलमानांनीं मिळून मागाहून अनेक **सभा, मेळे, जत्रा,** आणि **वरघोडे** देखील काढले; याप्रमाणें त्याचे सात सायास झाले.

या दंग्यांत दुसरी एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट घडली, तिचा उल्लेख येथें केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. ती गोष्ट हीच कीं, दंग्याच्या दुसरे दिवशीं ह्मणजे ज्या दिवशीं दंगा अगदीं **डोळे वटारून** पहात होता, त्या दिवशीं **मुंबई मुनिसिपालिटींतले** जे लोक कामावर न जातां दंग्याच्या तडाख्यांतून सुटले ते सारे **मुनिसिपल कमिशनर** मि. **ॲक्वर्थ साहेब** यांच्या **तावडींत** विचारे सांपडले. अर्थात साहेब मजकुरांनीं या दिवशीं गैरहजर राहिलेल्या **लोकांस** अधिकारमदाची धुंदी कशी असते हा अनुभव आठ आठ दिवसांचा पगार दंड करण्याचा हुकूम देऊन प्रगट केला.

ता० १ सप्टेंबर १८९३.—पार्लमेंट सभेंतील वादविवाद मारामारीपर्यंत येऊन अखेर **ग्लाडस्टन** साहेबांच्या परिश्रमांनीं **ऐरिश** लोकांस स्वातंत्र्य देणारें **होमरूलबील पास झालें.**

ता० १७ सप्टेंबर १८९३.—**धारावी—माहीम**—येथें मुसलमान लोकांनीं मिशनचर्चच्या अधिकाऱ्यांस चर्चमधली **घंटा** वाजविल्यास आह्मीं तुमच्यांवर **हल्ला** करूं अशी **तंबी** दिल्यामुळें ती वाजविणें **बंद** ठेवावें लागलें. पोलिसानें मदत करण्या-

चेंही नाकारिलें, त्यामुळें तर बापड्यांचा अगदींच **निरुपाय** झाला. जातच अडाणी, इतकें समजून गप बसावें.

ता० २० सप्तेंबर १८९३.—पेशावरास **भूकंपाचा** धक्का बसला.

ता० १, २ व ३ नोव्हेंबर १८९३.—**अमदाबादेस सहावी प्रांतिक सभा** भरली होती. मुंबईचे प्रसिद्ध ब्यारिस्टर मि. रहिमतुल्ला महमद सयानी सी. आय्. ई. हे अध्यक्षस्थानीं होते. या सभेंत खालीं लिहिलेल्या विषयांचा विचार झाला:—

( १ ) इलाख्याच्या कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त नान—ऑफिशिअल १२ जणांस जागा देणें. ( २ ) सिव्हिल सर्व्हिस परीक्षा. ( ३ ) अबकारी खातें. ( ४ ) मेडिकल कॉलेजांतील प्रोफेसरांच्या जागा. ( ५ ) वरिष्ठ शिक्षण. ( ६ ) मुलकी व फौजदारी कामें. (७) वाढलेला सारा. ( ८ ) शेतकीच्या कायद्यांत फेरफार. ( ९ ) स्थानिक स्व-राज्य. ( १० ) मागील प्रांतिक सभांत जंगल, पोलीस, मीठ व शेतकऱ्यांचा कायदा या केलेल्या ठरावांवर सरकारानें विचार करणें. ( ११ ) **सातवी प्रांतिक सभा मुंबईस** भरण्याचें ठरलें.

ता० ८ नोव्हेंबर १८९३.—मद्रास रेलवेच्या नीलगिरी ढ्यांचजवळ **कराईमडाई** येथें **अतिवृष्टीमुळें** रेल्स वाहून गेल्या, तेणेंकरून आगगाडीचे डबे उलथून पडले. ४२ उतारू चिरडून मेले, व अनेकांस भयंकर दुखापती झाल्या.

ता० १० नोव्हेंबर १८९३.—इंग्रजसरकारच्या वतीनें **मीर महमदखान** यांस **खिलातच्या** गादीवर बसविण्याचा समारंभ झाला. इंग्रजसरकारचे **जांवईच** हे.

ता० १४ नोव्हेंबर १८९३.—हिंदुस्थानसरकारच्या वतीनें सर **मार्टिमर ड्युरंड** यांचें **मिशन काबुलांत गेलें** होतें. ब्रिटिश सरकारचें व आमचें सख्य आहे, असें अमीरानें भर दरबारांत बोलून दाखविलें, आणि कमिशनची बोळवण केली. कमिशननें **फत्ते** केली ह्मणावयाची. दरसाल अधिक सहा लाखांस मात्र **चट्टा** बसला.

ता० २७ नोव्हेंबर १८९३.—खोरासान येथें **धरणीकंपानें** मोठा अनर्थ करून सोडला; बारा हजार रहिवाशांचा या भूकंपानें अगदीं **चक्काचूर** उडविला. पन्नास हजारांवर तर गुरेंढोरें चिरडलीं. महाप्रळयच !!

ता० ३ डिसेंबर १८९३.—सर्व जगतास थक्क करून सोडणारे व अविश्रांत परिश्रम करून आपल्या सार्वभौम राज्यकर्त्यांच्या जगत्प्रसिद्ध **पार्लमेंट राजसभेंत** मी मी ह्मणविणाऱ्या, किंवा आह्मांस नाकें मुरडून "**ब्ल्याकमेन**" ह्मणून आमची निर्भर्त्सना करणाऱ्या मोठमोठ्या इंग्रजबहादरांच्या मांडीशीं मांडी ठोकून बसण्यांत विजयी झालेले महाभाग **ऑ० दादाभाई नौरोजी एम्. पी.** यांनीं आपल्या जन्मभूमीस पुन्हा पाय लावले. ज्याच्या यशोदुंदुभीचा रव कानीं ऐकून ही त्यांची जन्मभूमी मोठी कृतकृत्य झाली असेल आणि त्यांची परमपूज्य अतिवृद्ध जन्मदात्री माता आपल्या

विजयी पुत्राची फारा दिवसांनीं पडणाऱ्या भेटीची मार्गप्रतीक्षा पुत्रवात्सल्यानें करीत बसली असेल यांत नवल तें कोणतें ! ! त्यावेळचा आनंद किंवा एकंदर प्रसंग हा फार अवर्णनीय होता, यांत शंका नाहीं. त्याचा स्वतंत्र ग्रंथच होईल. **ऑ० दादाभाईस** आल्या दिवसापासून सर्व मान पान मिळाले. मुंबईच्या बंदरांत पाय लागल्यापासून येतांयेतां मार्गांत पार्शी लोकांच्या अग्यारीसमोर त्यांच्या मुख्य आचार्यांनीं पार्शिअन भाषेंत मंत्र ह्मणून आणि त्याचप्रमाणें भुलेश्वरींही देवळाजवळ **ब्राह्मणांनीं मंत्रयुक्त आशिर्वाद** दिले; ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ईश्वर या अलौकिक पुरुषाला उदंड आयुष्य देवो. सदरहू दिवसाचा थाट पाहून आह्मास **लॉर्ड रिपन**च्या वेळेची आठवण झाली.

ता० २७, २८, २९, ३० डिसेंबर १८९३.—पंजाबांत **लाहोरास नववी राष्ट्रीयसभा** झाली. **ऑ० दादाभाई नौरोजी एम० पी०** हे अध्यक्षस्थानीं होते. या सभेंत खालीं लिहिलेल्या विषयांवर चर्चा झाली.

(१) सिव्हिल सर्व्हिस परीक्षा व इन्कमट्याक्स. (२) हिंदुस्थानच्या कायदेसभांबद्दल नियम. (३) व्हाइसराय साहेबांच्या कौन्सिलांत पंजाबतर्फे सभासद निवडणें. (४) ज्युरीपद्धत. (५) न्यायखातें. (६) लष्करी खर्च. (७) नाण्यासंबंधानें प्रश्न. (८) युरोपिअन व युरेजिअन यांच्या हुंडणावळीबद्दल प्रश्न. (९) वरिष्ठ प्रतीचें शिक्षण. (१०) पंजाब येथें कायदेकौन्सिलची संस्थापना. (११) पंजाबांत हायकोर्ट स्थापणें. (१२) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा. (१३) दुबळ्या गुन्हेगारांच्या कायद्यांचा खर्डा. (१४) हिंदुमुसलमानांतील दंगे. (१५) स्पर्शजन्य रोगाचा कायदा. (१६) राष्ट्रीय सभेच्या मजबुतीबद्दल विचार. इत्यादि पुढची राष्ट्रीय सभा **मद्रासेंत** भरण्याचा विचार ठरून **नवव्या राष्ट्रीय सभेचें** काम संपलें.

# इ० स० १८९३ सालांत हरपलेलीं नररत्नें !!!

ता० २ फेब्रुआरी १८९३.—**श्री० रा० रा० आप्पासाहेब पुरंदरे.**—हे पुण्यांत नामांकित सरदारघराण्यांतील होते. त्यांच्या मरणाच्या अडीच महिन्यांपूर्वी यांचे चिरंजीव **श्री० रा० रा० विनायकराव** हे कैलासवासी झाले. या अति दुःसह पुत्रशोकामुळें आप्पासाहेबांस अगदीं वृद्धापकाळीं धक्का बसून त्यांचा अंत झाला. निरुपायाची गोष्ट !

ता० २१ मार्च १८९३.—**रा० ब० आनंदराव सखाराम बर्वे.**—हे बडोद्यास वरिष्ठ कोर्टाचे जज्ज होते. प्रसिद्ध **ठगाची जबानी** ह्या पुस्तकाचे हेच कर्ते होत.

ता० २८ मार्च १८९३.—**ऑन० रा० ब० कृष्णाजी लक्ष्मण नुलकर सी० आय्० ई०**—८ व्या वर्षानंतर ह्यांचे वडील निवर्तले व त्यांजबरोबर मातुश्री सती गेल्या, ह्मणून यांस लहानपणीं विद्यादान देण्यास कोणी वडील माणूस नसतांही यांनीं विद्या संपादन केली, आणि पुढें मोठ्या नांवालौकिकास चढले. १८६३ त हे काठेवाडचे **असिस्टंट पोलिटिकल एजंट** झाले. पुढें २ वर्षेंपर्यंत कच्छसंस्थानची **दिवाणगिरी** केली. पेनशन घेतल्यावर यांनीं सार्वजनिक कामांत—संमतिवयाच्या कायद्यांत—फार मन घालून, राजादरास पात्र झाले. महाबळेश्वरीं काळजाच्या रोगानें यांस एकाएकीं देवाज्ञा झाली.

•ता० मार्च १८९३.—**वे० शा० सं० रा०रा० सदाशिवशास्त्री थत्ते.**—हे पेशवाईत प्रख्यात **निळकंठशास्त्री थत्ते** यांचे नातू होते. पेशव्यांकडून यांच्या घराण्यास इनाम आहे. शास्त्रीमंडळींत यांचें बरेंच वजन होतें. मधुमेहाच्या उपद्रवानें यांस श्रीक्षेत्र काशी येथें देवाज्ञा झाली.

ता० ३ एप्रिल १८९३.—**मि० सोराबजी शापूरजी बंगाली. सी० आय्० ई०**—यांचा मुंबईत लोखंडाचा कारखाना आहे. यांनीं व्यापारांत लाखों रुप्ये कमाविले. आणि त्यांचा विद्यावृद्धीकडे विनियोग केला. अशा दानशीलचे पुरुष फार विरळा.

ता० मे १८९३.—**सर जेम्स डॉरमर.**—हे मद्रासचे सेनापति होते. हे शिकारीस गेले असतां एका वाघोबाची व यांची जुळली. त्यानें सेनापतिसाहेबांस बारा चावे मारले. त्यामुळें त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. सेनापतीच्या जागेवर येऊन त्यांना अवघे दोन महिने देखील झाले नव्हते, तों त्यांस असा अपघातानें मृत्यु आला. दुर्दैव बिचाऱ्यांचें ! !

ता० १३ मे १८९३.—**रा० ब० यशवंत मोरेश्वर केळकर.**—हे मुंबई सरकारचे **ओरिएंटल ट्रान्सलेटर** होते. आपले तीर्थरूप धारवाडास अत्यावस्थ आहेत, हें ऐकून **यशवंतराव** त्यांच्या भेटीस महाबळेश्वराहून निघाले, परंतु त्या

वत्सल पितापुत्राची भेट अखेर नाहींच झाली. त्यांचे तीर्थरूप बारावीस वारले आणखी चोवीस तासांनीं फुप्फुसाच्या विकारानें **यशवंतराव**जींचें देहावसान झालें. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ४३ वर्षांचें होतें.

ता० १९ मे १८९३.—**रा० रा० वासुदेव बाळकृष्ण ऊर्फ बापूसाहेब टाकळकर.**—हे नाशकास ऑनररी म्याजिस्ट्रेट होते.

ता० ९ जून १८९३.—**सर जॉन हडसन.**—हे मुंबईचे नवीन आलेले सेनापति होते. हे पुणें मुक्कामीं सकाळीं घोड्यावरून रपेट करीत असतां त्यावरून खालीं आले. खालीं तोंडघशीं पडल्यामुळें माथ्यास जबरदस्त इजा होऊन तत्काळ त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. थोड्या दिवसांपूर्वीं मद्रासच्याही नवीन सेनापतीस अपघातानें मरण आलें, हें आह्मीं वर नमूद केलेंच आहे.

ता० १२ जून १८९३.—**वे० शा० सं० रा० रा० अनंताचार्य गजेंद्रगडकर.**—हे सातारा मुक्कामीं असत. हे पिढीजाद शास्त्री होते. अर्थात यांचे पूर्वज उत्तम शास्त्र्यांत मोडत असत.

ता० ३१ जुलई १८९३.—**रा० रा० जनार्दन रघुनाथ निंबकर.**—हे नाशकांतील प्रसिद्ध वकील होते. सार्वजनिक चळवळींत यांचें पाऊल पुढें असे. **राष्ट्रीयसभा** यांची जीव कीं प्राण असे; हे लोकप्रिय असत.

ता० १ सप्टेंबर १८९३.—**ऑ० ज० मि० काशिनाथ त्रिंबक तेलंग एम्० ए०, एल्० एल्०, बी०, सी० आय्० ई०**—१८५० त यांचा जन्म. ह्यांची लहानपणापासूनच बुद्धि अगदीं तीव्र. मराठी अभ्यास पुरा करून म्याट्रिक्युलेशनपासून ब्यारिस्टरच्या परीक्षेपर्यंतचा अभ्यास यांनीं अगदीं थोड्या अवधींत आटपला. अभ्यासक्रमांत उत्तम गति ठेवून अनेक बक्षिसें मिळविलीं. पुढें सार्वजनिक कामांत मन घालून फार लोकप्रिय झाले. त्यांच्यांत राजप्रिय गुणविशिष्टत्व असल्यामुळें सरकारचीही त्यांच्यावर मर्जी प्यार असे. सरकारची उत्तम कामगिरी बजावल्याबद्दल यांस **सी० आय्० ई०** हा बहुमानाचा किताब मिळाला. तसेंच सरकारानें त्यांची ऐपत जाणून **कै० जस्टिस नानाभाई हरिदास** यांच्या पश्चात मुंबईत हायकोर्टांत **जज्जा**च्या जागेवर यांची संस्थापना केली. नंतर मुंबई युनिव्हर्सिटींत यांस **व्हाईस चान्सेलर** नेमलें. हा एवढा मोठा मान यापूर्वीं नेटिव्हास मिळाला नव्हता, परंतु ह्या जागेचा उपभोग घेण्यास **काशिनाथपंत** फार दिवस राहिले नाहींत ! प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें हक्काच्या रजेवर असतां त्यांस मूळव्याधीचा उपद्रव होऊन वरील तारखेस आपल्या वयाच्या ४३ साव्या वर्षीं ह्मणजे ऐन उमेदींत त्या निर्दय काळानें त्यांस आमच्यांतून ओढून नेलें. मुंबई इलाख्यांतला किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांतला एक अति तेजःपुंज तारा मावळला. समाजाची, सरकारची आणि राष्ट्राची ही मोठी हानि झाली. आमचें दुर्दैव. मराठी, गुजराथी, संस्कृत, इंग्रेजी वगैरे भाषा यांनीं

आपल्या करतलमलवत् करून ठेवल्या होत्या. इंग्रजींत व मराठींत संभाषण करण्यास उभे राहिले ह्मणजे ते बृहस्पतितुल्य वाटत. बोलण्यांत तडजोडपणाची सफाई फार होती. वक्तृत्वांत इंग्रज लोकांनीं देखील त्यांस **बर्क, डिमॉस्थनीस** यांच्या बरोबरीचे ह्मटलें आहे.

ता० १३ सप्टेंबर १८९३.—**रा० सा० नारायण महादेव परमानंद.**—हे मुंबईत विद्वान् लोकांत केवळ झांकलेलें माणिक होते. हे प्रथम **इंदुप्रकाशा**चे व नंतर **नेटिव्ह ओपीनिअन**चे एडिटर होते. हे लेखणीचे मोठे बांके होते. ह्यांचे लेख चरचरीत व निस्पृहतेनें लिहिलेले असत. ह्यांची केवळ साधुवृत्ति होती; तथापि समाजसुधारणेकडे यांचा फार ओढा असे. सरकारची १४ दा वर्षेपर्यंत उत्तम प्रकारें सेवा केली, आणि नंतर १८८४ त पेनशन घेतलें. अंतसमयीं हे अगदीं स्वस्थचित्तानें मरण पावले.

ता० सप्टेंबर १८९३.—**रा० रा० वामन रामचंद्र ओक.**—हे ठाण्यास डिस्ट्रिक्ट कोर्टचे वकील होते. यांनीं आपल्या जिंदगींतून ३०००० रुपये विद्यावृद्धीकरितां खर्च करण्याबद्दल आपल्या मृत्युपत्रांत लिहिलें आहे. फार स्तुत्य गोष्ट होय.

ता० ७ आक्टोबर १८९३.—**डॉ० आरदेसर दादाभाई नौरोजी.**—हे **ऑ० दादाभाई नौरोजी** यांचे एकुलते एक चिरंजीव. हे कच्छ संस्थानांत **चीफ मेडिकल ऑफिसर** होते. छातीच्या आजारानें यांचा अंत झाला. पाठीमागें एक पत्नी, व सात मुलें हीं आहेत. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ३४ वर्षांचें होतें.

ता० १६ आक्टोबर १८९३.—**डॉ० विठ्ठल विष्णु गोखले एम्० डी०**—प्रस्तुत गोखल्यांचें सर्वच घराणें विद्वान्. परंतु मोठमोठ्या परीक्षा वगैरे देऊन कोठें नांवालौकिकास येतात, तोंच काळ त्यांवर अगदीं अवेळीं झडप घालितो, हा कुयोग. यांचें वय मृत्युसमयीं ४० वर्षांचें होतें.

ता० २१ आक्टोबर. १८९३.—**शेट दामोदर ठाकरसी मूळजी.**—हे मुंबईत भाटे जातींतील मोठे श्रीमंत व्यापारी होते. मुंबईत यांच्या कांहीं गिरण्याही आहेत. हे मुंबईत म्युनिसिपल कारपोरेशनचे मेंबर होते. हे मोठे दिलदार असत.

ता० २३ आक्टोबर १८९३.—**रा० रा० शामराव भास्करजी कोठारे.**—हे मुंबईत हायकोर्टात चीफ ट्रान्सलेटर व इंन्टरप्रिटर होते. सरकारची ३० वर्षे नोकरी करून पेनशन घेणार तोंच मृत्यूनें यांच्यावर झडप घातली.

ता० आक्टोबर १८९३.—**महाराज धुलीपसिंग.**—हे पंजाबचे सिंह प्रसिद्ध **महाराज रणजितसिंग.**—यांचे चिरंजीव होते. हे लहानपणींच इंग्रज सरकारच्या कवजांत सांपडल्यामुळें यांस विलायत पहावी लागली. पुढें हिंदुस्थानांत येण्याची परवानगी मिळून एडनपर्यंत आल्यावर पुन्हा सीकधर्म स्वीकारला एवढ्याच सबबीवरून त्यांस परत फिरविलें. बापड्यास मग वैतागही आला, त्यामुळें त्यांची

कांहीं दिवस वृत्तीही फिरली; अखेर हालअपेष्टांत प्यारीस शहरीं एका हॉटेलांत यांला देवाज्ञा झाली. दुर्दैवी !!

ता० १ डिसेंबर १८९३.—**दे० शा० सं० रा० रा० व्यंकटेश शास्त्री निपाणीकर.**—यांस सांगलीस सन्निपात ज्वरानें देवाज्ञा झाली. पाठीमागें साठ वर्षांचा वृद्ध पिता व तरुण पत्नि हीं आहेत. या सालांत चांगल्या नामांकित दोनतीन शास्त्र्यांवर काळाची करडी नजर झाली.

ता० १२ डिसेंबर १८९३.—**सर जसवंतसिंग बहादूर.**—हे भरतपूरचे महाराज होते. हातास कांहीं विकार होऊन तो वाढत गेल्यामुळें असा अनिष्ट परिणाम झाला. दोन वर्षांचे असतांच यांस गादीवर बसण्याचा योग आला होता. चाळीस वर्षें राज्याचा उपभोग घेऊन बेचाळिसावे वर्षी हे मरण पावले.

ता० २९ डिसेंबर १८९३.—**रा० ब० गणपतराव भास्करजी.**—हे गर्भश्रीमंत होते. हे प्रसिद्ध रा० ब० भास्करराव केशवजी यांचे चिरंजीव. अभ्यासक्रमांतून मुक्त झाल्यावर प्रथम यांनीं नोकरी धरली. परंतु त्यांतल्यात्यांत वकिलीची परीक्षा देऊन कै० रा० सा० मंडलिक यांच्या बरोबर हायकोर्टांत वकिली करूं लागले. हे मंडलिकांच्या कृपेंतील होते. पुढें १८७४ सालीं स्मालकाज कोर्टाचे जज्ज झाले. पेनशन घेण्याच्या इराद्यानें हक्काची रजा घेतली; परंतु इतक्यांत त्याचा अंत झाला.

 गा.भा. २०।५।४९

# संवत्सरमाहात्म्य, १८९३.

तिगस्त सालचें **संवत्सरमाहात्म्य केरळकोकिळ**च्या, उदार व गुणग्राही सहस्रावधि आश्रयदात्यांस तर सादर केलेंच आहे; व हें गुदस्त सालचें आतां त्यांजपुढें आहे. त्यावरून या पृथ्वीतलावर बऱ्यावाईट घडलेल्या गोष्टी ताडून पाहण्यास **कोकिळ**च्या आश्रयदात्यांस व अनेकविध वाचकांस बरीच सवड झाली आहे. ह्मणून सदरहू गोष्टींचा बरावाईट परिणाम पाहणें आह्मी आमच्या प्रिय आश्रयदात्यांवर व वाचकांवरच सोंपवितों. दर वर्षाप्रमाणें लोकांनीं **कोकिळाची** सेवा याही वेळेस गोड करून घेतली, याबद्दल **कोकिळ** आपल्या गोड लकेऱ्यांत त्या अति दयाळू जगन्नियंत्यापाशीं त्यांच्याविषयीं अखंड शुभचिंतन गात बसेल. याचप्रमाणें त्यांनीं निरंतर आपली कृपादृष्टि ठेवावी, अशी सविनय प्रार्थना करून **संवत्सरमाहात्म्यास** आरंभ करितों:—

( १ ) आयर्लंडाच्या दक्षिण भागांत कुइन्सटाऊन येथें **महापूर** येऊन घरेंदारें व पूल वाहून गेले, हजारों लोक निराश्रित झाले, व शेंकडोंशें बुडून प्राणांस मुकले. ( २ ) खानदेशांत **अतिवृष्टी**मुळें शेतांची नासाडी होऊन **ओला दुष्काळ** पडण्याची लोकांस मोठी दहशत बसली. ( ३ ) मणिपुरामध्यें **अतिवृष्टी**मुळें नद्यांस पूर येऊन त्यांत पुष्कळ मणिपुरी लोकांस **जलसमाधि** मिळाली. ( ४ ) बंगाल्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं **अतिवृष्टि** झाल्यामुळें तिकडील नद्यांस **महापूर** आले. फरिदपूर जिल्ह्यांत एका गावीं **पटकीनें** अडीच हजार लोक बळी घेतले. ( ५ ) तिगस्त सालच्या **अनावृष्टीनें** गेल्या सालांत उटें काढून व्याजामुद्दलासहित अगदीं भरपाई करून सोडली. ह्या सालीं पुष्कळ ठिकाणीं **अतिवृष्टि** होऊन कित्येक नद्यांस **महापूर** आले. त्यामुळें कित्येक गांव वाहून गेले; शेतें वाहून गेलीं; गुरेंढोरें व मनुष्यहानी फार झाली. पूल कोसळले; सडका वाहून गेल्या, त्यामुळें फार नुकसानी झाली. ह्मणजे तिगस्तां **सुका दुष्काळ** व गुदस्तां **ओला दुष्काळ** पडला. (६) अमेरिकेंत मिसिसिपी व्हालींत मोठें **वादळ** झाल्यामुळें पुष्कळ लोकांच्या प्राणाहुती पडल्या. (७) मद्रास इलाख्यांत रामनाद जिल्ह्यांत **अनावृष्टीमुळें** लोकांचे मनस्वी हाल झाले. सुमारें ३० हजार माणसांना आपलीं बायकापोरें व गुरेंढोरें घेऊन देशांतरास जाण्याचें निरुपायास्तव भाग पडलें. ( ८ ) म्याडागास्करच्या किनाऱ्याजवळ एक फ्रेंच लढाऊ जहाज बुडालें. बिचारीं ५२२ माणसें **समुद्रास्तृप्यंतु** झालीं. ( ९ ) भूमध्य समुद्रांत ट्रिपोलीजवळ अति वेगवान व किंमतवान अशी प्रख्यात **व्हिक्टोरिया** नांवाची आगबोट **क्यांपरडाऊन** नांवाच्या आगबोटीबरोबर टक्कर मारून अखेर ४३० उतारूंसह पांच मिनिटांच्या अवधींत समुद्रतळीं जाऊन बसली. थोड्या दिवसांमागें मुंबईबंदरांत जी फार प्रेक्षणीय, व

केवळ इंद्रभुवनतुल्य "**हिमालया**" नांवाची आगबोट आली होती, तिच्याच जोडीची **व्हिक्टोरिया** आगबोट होती. (१०) पुणें, नगर व सोलापूर जिल्ह्यांतील शेतांस **उंदीर** लागून त्यांनीं पिकाची बरीच नासाडी केली. दुष्काळांत तेरावा महिना!! (११) म्यानिला (व्हांगकांग) येथें अग्निनारायणानें मोठा प्रळय केला. चार हजार घरांची त्यानें अगदीं **राखरांगोळी** केली. (१२) थॉर्नहिल येथें कोळशाच्या खाणींत आगीचा **भडका** होऊन १४५ मनुष्यांस जिवंतपणींच **अग्निसंस्कार** मिळाला. गरीब बिचारे!! (१३) गतवर्षी **अनावृष्टीनें** आपली करडी नजर पश्चिमेच्या बाजूकडे वळविली. इंग्लंडांत मेघराजाची अवकृपा झाल्यामुळें गवताची टंचाई पडली; त्यामुळें गुरेंढोरें असंख्यात मेलीं. कसायांचें अशामुळें बरेंच फावलें; तथापि दुधाचें मोठें **दुर्भिक्ष** आलें. सूर्याच्या प्रखर तेजानें पुष्कळ लोक साफ वाळून गेले. (१४) इंग्लंडांत व फ्रान्सांत प्यारिस वगैरे ठिकाणीं ॲनर्किस्ट बंडवाल्यांनीं नाटकगृहांत व सभास्थानीं डायनामाइट दारूचे स्फोट होणारे गोळे टाकून अनेक स्त्रीपुरुषांचे बळी घेतले. पश्चिमेकडली बरीवाईट सुधारणा कोणत्या थरास जाऊन पोहोंचेल, याचा अंदाजच लागत नाहीं. (१५) डोव्हर येथें भयंकर **दंगा** झाला. यूरोपांत चोहोंकडे **दंगे** झाले. आफ्रिका खंडांतही तोच प्रकार. आशियांत तर गेल्या सालीं **दंग्यांचें बीजच** पेरिलें होतें. इकडे काबुलांत **हजारा** लोकांनीं उच्छेद मांडला; तर तिकडे ब्रह्मदेशांत **ब्रह्मी**लोक अनावर झाले. तार्तरी व उत्तर चिनांत चिनी लोक तर बिचाऱ्या ख्रिस्ती धर्मप्रसारक **पाद्रीबावांच्या** हात धुवून पाठीस लागले, व त्यांचा खरपूस समाचार घेतला. एकट्या हिंदुस्थानांत **प्रभासपट्टण, मुंबई, येवलें, अझमगड, गोरखपूर, कलकत्ता** इत्यादि ठिकाणचे **दंगे** आठवण ठेवण्यासारखे झाले. मुंबईतील दंग्यानें तर सर्व दंग्यांस खालीं पाहाण्यास लाविलें. (१६) अमीराच्या सैन्यानें **हजारा** वंडखोरांच्या टोळीपैकीं आजपर्यंत-सुमारें शेंकडों लोक मारले, तरी वंडखोरांची अजून **रग** जिरली नाहीं. ते लोक आमच्यासारखे भातखाऊ नाहींत. (१७) इंग्लंडांत **मि० ग्ल्याडस्टन** साहेबांवर कोणी **टाऊन्सेन्ड** नांवाच्या मनुष्यानें गोळी घालण्याचा प्रयत्न केला, परंतु तो वेडा ठरून त्यास वेड्यांचें हास्पिटल पहावें लागलें. पुऱ्या नशिबाचा खरा. (१८) रशियानें **यहुदी** लोकांस आपल्या राज्यांतून **हद्दपार** केलें. **संक्रांत** बसली बापड्यांवर!! (१९) फ्रान्स व संयाम यांच्यांत बरीच जुंपली. फ्रान्सानें सयामावर आपलें **वर्चस्व** स्थापीत केलें. सयाम लयास जाणार ह्मणतात! मग आह्मांस वरून रशिया व खालून फ्रान्स! **भीतीच!!** (२०) बंगाल सरकारानें आज कैक वर्षे चालत आलेल्या **ज्यूरी पद्धतीवर गदा** घातली. त्यामुळें आमच्या लोकांनीं सभा भरभरून **टाहो** फोडला; तेणेंकरून सारा हिंदुस्थानदेश दणाणून गेला. या प्रकरणाची विलायतेपर्यंत दाद लाविली. (२१) आस्ट्रेलियन

वगैरे तेरा व्यांकांनीं आपलीं **दिवाळीं** काढिलीं. लोकांचा पैसा ह्मणजे केवळ झाडाचा पाला. दिवाळें काढणें हें अलीकडे फार सोपें झालें आहे. ( २२ ) गेली **हरिद्वार**ची यात्रा निर्विघ्नपणें व बिनबोभाट पार पडली. ह्या वेळेस तद्देशीय पोलिसास **पटकी**ची सबब मिळाली नाहीं, हें बिचाऱ्या यात्रेकरूंचें महत् भाग्य समजावयाचें ! तिगेस्त सालचा त्यांचा करुणारव **हरिहरानें** ऐकला ह्मणावयाचा ! ! (२३) निजाम सरकारच्या जामदारखान्यांतून सुमारें अकरा हजारांचें **जवाहीर** कोणीं लांबविलें. तूर्त निजामाच्या राजधानींत जवाहिराला आणि पैशाला बराच **नाट** लागत चालला आहे ! ( २४ ) **इम्पीरियल इन्स्टिट्यूट**च्या समारंभांत बसलेल्या जागेच्या भाड्याबद्दल एतद्देशीय राजेरजवाड्यांवर **बिलें** करण्यांत आलीं ह्मणतात. ह्या **इन्स्टिट्यूट**करितां आमच्या राजेलोकांनीं **लाखो रुपये** दिले; त्यांच्याशीं असें अमित्रत्वाचें वर्तन ठेवावें हा सरकाराचा कमीपणा होय. ( २५ ) तासगांवास एका वृद्ध बाईनें औषधाकरितां ओढ्याचें पाणी आणून तें आटविलें, ह्या गुन्हा ठरवून तिकडील से० क्ला० म्याजिस्ट्रेट **रा० सा० प्रल्हाद कृष्ण शहाणे** यांनीं ह्मातारीला १५ रुपये **शिक्षा** सांगितली. पुढें एकच रुपया **दंड** करून बाईची मुक्तता केली. कांहीं लोक अधिकारापन्न झाले ह्मणजे त्यांस पुढें मागें कांहीं दिसत नाहीं. यापैकींच हे. शहाणे खरेच ! ! ( २६ ) पुण्यांतील गाजावलेल्या **ग्रामण्यामधल्या शुक्ल व कृष्ण पक्षां**चा बराच **डंका** वाजला. आतां त्यांचा बराच **चिवडा** झाला. **हें** प्रकरण बंद होईल तर बरें ! ( २७ ) माजी **प्रिन्सिपॉल रा० सा० मोडक हे** पुण्यांत प्रार्थनासमाजांत **राजा मोहनराय** यांच्या चरित्रावर व्याख्यान देत असतां त्यांस एकाएकीं **पक्षघाताचा झटका** बसला. बोलावयाचें एक व करावयाचें दुसरें, अशांपैकीं हे नसून खरे सुधारक आहेत. ( २८ ) हुसंगाबाद जिल्ह्यांत हत्यारबंद दरोडखोरांनीं बरीच धुमाकूळ मांडली. पैशावरही त्यांनीं **हात** मारण्यास कमी केलें नाहीं. ( २९ ) सिद्धपूर क्षेत्रांत गणपतराम विश्वनाथ अग्निहोत्री यांनीं **सोमयाग महारुद्राभिषेक** केला. काशी, प्रयाग, नाशिक, वांई वगैरे ठिकाणांहून विद्वान् ब्राह्मण मंडळी आली होती. ( ३० ) **सर उइलियम वेडरबर्न** यांचा पार्लमेंट सभेंत शिरकाव झाला. हिंदुस्थानच्या लोकांविषयीं यांच्या मनांत बरीच **आस्था** आहे. ( ३१ ) **रा० ब० यशवंत मोरेश्वर केळकर** यांच्या मृत्यूमुळें **ओरिएंटल ट्रान्स्लेटरची** रिकामी पडलेली जागा सरकारानें **मि० मिरझा अबास अलीबेग** यांस नेमून ती भरून काढली. (३२) हैदराबादेंत **मेहदी हसन**वरील बड्या **बेअब्रूचा** खटला पुष्कळ मोठमोठ्या लोकांस **भोंवला.** यांत पुष्कळ **काळेंबेरें** बाहेर पडलें. पैशाची बरीच **राखरांगोळी** झाली. ( ३३ ) कलकत्त्यांत पोलिसच्या जुलमानें त्रासून गाडीवाल्यांनीं **संप** करून कामावर जाण्याचें बंद केलें. ( ३४ ) **डा० ब्लेनी** यांनीं १८ वर्षें काम करून आपल्या **कारोनरच्या**


जागेचा **राजीनामा** दिला. नेटिव्हांचा ते वराच कळवळा वाळगतात. त्यांत पारशी काकांचे तर ते केवळ नाकांतले **बाल** होऊन राहिले आहेत. यांचें स्मारक करण्याविषयीं मागेंच विचार झालेला आहे. (३५) **डा० भांडारकर** पेन्शन घेऊन मोकळे झाले. त्यांच्या जागीं **प्रोफेसर आबाजी विष्णु काथवटे** यांची नेमणूक झाली. योग्य निवड. (३६) **राजा सर टी० माधवराव** यांचा **त्रिवेंड्रम** येथें **पुतळा** उभारण्यांत आला. योग्यच! (३७) **कै० जस्टिस तेलंग** यांच्या पाठीमागून **ऑ० रावबहादूर महादेव गोविंद रानडे सी० आय०ई०** यांसच अखेर मुंबईहायकोर्टांत **जज्जाची** जागा मिळाली. यांच्यासारखे विद्वत्तेंत व बुद्धिमत्तेंत हेच. मुंबईसरकारानें फारच योग्य निवड केली, यांत शंका नाहीं. (३८) म्हैसुरांत **बालविवाह**प्रतिबंधक **कायदा** करण्याचें तिकडील दिवाणजीनें मनांत आणिलें. उद्देश स्तुत्य व अनुकरणीय आहे. तथापि अशा प्रकारचा कायदा करणें झाल्यास त्यांत लोकांचीं मनें न दुखावतील असें धोरण ठेविलें पाहिजे. (३९) नवीन कौंसिल आक्टाप्रमाणें आपल्या इकडे **ऑ० मि० फेरोजशहा मेथा** व बंगाल्यांत **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, बाबू उमेशचंद्र बानर्जी व बाबू लालमोहन घोस** ह्या लोकमान्य व विद्वान् माणसांच्या कौंसिलांत निवडणुकी झाल्या. (४०) कुचविहारच्या महाराजांनीं आपल्या राज्यांत खुनाच्या अपराध्यांस **फांशीची** शिक्षा देणें **बंद** केलें. (४१) **ऑन०·ज० तेलंग** यांनीं आपल्या दहा व आठ वर्षांच्या मुलींचीं अल्पवयांत **लग्नें** केलीं, ह्मणून चारचौघांत त्यांची वरीच **नाचक्की** झाली. सुधारकांचे खाण्याचे दांत निराळे व दाखविण्याचे दांत निराळे, अशी कृति झाली. **संमतिवयाचा** कायदा मागण्याकरितां **जव्हेरबागेंत** भरलेल्या सुधारकांच्या सभेचे **अध्यक्ष नामदार तेलंगच** होते. (४२) अमेरिकेंत **शिकागो**शहरीं अमेरिकन लोकांनीं सर्व जगतास थक्क करून सोडणारें कलाकौशल्याचें वडें **प्रदर्शन भरलें**. हे लोक अगदीं मायावी आहेत. यांच्या अचाट कल्पना व नवीन शोध वगैरे पाहून मन अगदीं गुंग होऊन जातें. तूर्त सर्व जगतांत अमेरिकाखंड हें कलाकौशल्याचें **माहेरघर** होऊन बसलें आहे. (४३) **शारदासदनाच्या** अध्वर्यु **पंडिता रमाबाई** यांनीं सदनांतील एका मुलीस **बाप्तिस्मा** दिला; त्यामुळें चोहोंकडे याचा फारच **बोभाटा** झाला. व **पंडिताबाई**वरून लोकांचा वराच **विश्वास** उडाला; आणि **शारदासदन** ही खिस्ती **संस्था** आहे, असा लोकांचा ग्रह दृढ झाला. **डा० भांडारकर, रा० ब० रानडे** व **भट** या व्यक्तींनीं **शारदासदनाशीं** आपला संबंध तोडून ते दूर झाले. अति तेथें माती!!

# केरळकोकिळ.

पु० ७] [अं० १.


## लोकोत्तर चमत्कार.

### जुळे मुलगे.



आह्मीं, गेल्या वर्षाच्या १०व्या अंकांत **ओरिसा** प्रांतांत जन्मलेल्या जुळ्या मुलींचें सचित्र वर्णन आमच्या वाचकांस सादर केलें आहे; त्यांत **दोन व्यक्ति** किंवा **मूर्ति** आणि **एक प्रकृति** असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ह्मणजे दिसण्यांत दोन स्वतंत्र मूर्ति, परंतु दोघींचे व्यवसाय एकच ह्मणजे स्पर्श, क्षुधा, स्वाद, निद्रा, भय, रोदन, शरीरप्रकृति वगैरे मनोवृत्ति

दोघींच्या एकसारख्याच. आजच्या अंकांत, इटाली देशांत उत्पन्न झालेल्या जुळ्या मुलांचें सचित्र वर्णन देत आहों. तें फार चित्तवेधक व आश्चर्योत्पादक आहे. त्यांत **एक मूर्ति** आणि **दोन प्रकृति** असें दाखविलें आहे. अर्थात हें जुळें दिसण्यांत एकच असून त्यांच्या प्रकृति अगदीं भिन्न आहेत. त्यांचा वृत्तांत येणेंप्रमाणें:—

हें अश्रुतपूर्व व लोकविलक्षण जुळें, **इटाली** देशांत **त्युरीन**जवळ **लोकाना** गांवीं सन १८७९ त जुलै महिन्याच्या चवथ्या तारखेस जन्मास आलें. त्या वेळेस त्याची आई फक्त १९ वर्षांची होती. तिचें लहानपणचें नांव **अँटोनिआ मेझानो** असें होतें. तिला नऊ मुलें आहेत; तीं सर्व सदृढ व निरोगी आहेत. ह्या जुळ्याचा आकार वर चित्रांत दिल्याप्रमाणें सकृद्दर्शनीं, दोन शिरें, एक धड, चार हात, व दोन पाय असा आहे. ह्या जुळ्यापैकीं पाहाणाराच्या डाव्या हाताकडील एका डोक्याचें नांव **गायोव्हन्नी** आणि दुसऱ्याचें नांव **गायाकोमो**. जन्मसमयीं ह्याच्या आईस सतत आठ तास प्रसववेदना सोसाव्या लागल्या. मग प्रथम **गायोव्हन्नी**चें शिर मातेच्या उदरांतून बाहेर पडलें. त्याच्या पाठीमागून त्यालाच लागून असलेलें **गायाकोमो**चें शिरकमळ बाहेर आलें. त्यानंतर धड व शेवटीं पाय. दोघांचेंही नाळ एकच होतें. हें त्यांच्या बाह्य व दृश्य स्वरूपाचें वर्णन झालें.

आतां **ओरिसा** प्रांतांतील जुळ्या मुलींसंबंधानें पाहूं गेलें तर फक्त त्यांच्या पोटाचा जोडलेला भाग खेरीजकरून बाकी ज्याअर्थीं व्यंगरहित पूर्ण अवयवांसह दोन देह—मूर्ति—स्वतंत्र आहेत त्याअर्थीं पहाणारास त्या दोघींचेही व्यवसाय व प्रकृति निरनिराळ्या असाव्यात असें स्वाभाविक वाटतें परंतु तशी गोष्ट नाहीं. त्याच्या अगदीं उलट ह्मणजे दोघींच्या कृति अगदीं सारख्याच. आणि याहीपेक्षां अति विलक्षण गोष्ट प्रस्तुतच्या जुळ्या मुलांसंबंधानें आहे. ती ही कीं, हीं मुलें बाह्यदृष्ट्या दोन शिरें व एकाच देहाचीं, किंवा एका धडास दोन शिरें फुटलेलीं, चार हात, दोन पाय, एक पोट, व एकच नाभीचीं, अशीं असून त्या दोघांचेही आचारविचार परस्पर अ-

[1] धड एकत्र असल्यामुळें फक्त दोन शिरें ह्याच दोन स्वतंत्र व्यक्ति मानून चालल्याशिवाय निभाव लागत नाहीं.

गदीं निरनिराळे आहेत. त्या संबंधाची–मानवी प्राण्याच्या कल्पनातरंगांस थक्क करून सोडणारी अपूर्व–माहिती आमच्या वाचकांस सादर करतों.

हें जुळें सहाव्या फांसळीपासून खालच्या बाजूस जुळलेलें आहे. त्यास फक्त दोन पाय असून एकच उदर आहेसें दिसतें. पाठीचे कणे कमरेच्या भागापर्यंत अगदीं निरनिराळे आहेत, त्यास दोन निरनिराळीं अंतरजठरें किंवा अन्नाशय, दोन काळिजें, आणि दोन फुप्फुसें आहेत. नाडीचक्र आणि श्वासोच्छ्वास यांचे व्यापार अगदीं भिन्न चालतात; काळीज उडत असून श्वासोच्छ्वासव्यापारांत पुष्कळदां फेरफार झालेला ह्या जुळ्यांत दृष्टीस पडतो. उपजल्यापासून तीस दिवसांत त्याचें वजन आठ पौंड भरलें, आणि दुसऱ्या तीस दिवसांत सुमारें तीन पौंड वाढलें. आणि हल्लीं ह्मणजे त्याच्या १७ वे वर्षी त्याचें वजन ९९ पौंड ह्मणजे ३ मण ११ पौंड आहे. त्यांचीं काळिजें अगदीं निरनिराळीं आहेत. एक नेहमीं निजतें त्या वेळेस दुसरें अगदीं खडखडीत जागें. परस्परांच्या क्षुधावेगाबद्दल कांहीं मेळ नाहीं; दोघांचींही अंतरजठरें अगदीं निराळीं असल्यामुळें; एकास क्षुधा लागते, आणि त्या वेळेस दुसरें पूर्ण निद्रासुखानुभव घेतें.

त्यांच्या एकंदर आकृतींत कांहीं ह्मणण्यासारखें व्यंग नाहीं. त्यांचे चेहरे पाणीदार व हुशार दिसतात; ते चांगले शिकलेले आहेत. आणि प्रेक्षकांस किंवा पाहुण्यांस समजण्याकरितां आपापलें नांव ते स्वतः लिहितात. दोघांचेही तोंडवळे दिसण्यांत एकसारखे नाहींत. **गायाकोमो**पेक्षां **गायोव्हन्नी**चा चेहेरा अधिक तरतरीत दिसतो; व तो दुसऱ्यापेक्षां जास्ती बुद्धिमान् असून त्याच्यामध्यें धारणाशक्ति अधिक चांगली आहे. त्यास परभाषा शिकण्याची आवड असून गानवादनचित्रकलेंकडे त्याचा विशेष ओढा आहे.

त्यांच्यानें उभें राहवतें. परंतु प्रत्येकाच्या मज्जातंतूची किंवा ज्ञानवाहिन्यांची क्रिया सारखी चालत नसल्यामुळें अर्थात चालणें प्रत्येकाच्या इच्छेवर अवलंबून असल्याकारणानें त्यांस चालतां येत नाहीं. ह्मणजे एकास चालावेंसें वाटतें, दुसऱ्यास वाटत नाहीं; आणि जर एकाच्या मर्जीविरुद्ध दुसऱ्यानें चालण्याचा प्रयत्न केलाच, तर त्या उभयतांसही प-

यींयेंकरून पृथ्वीस आलिंगन करण्याचे बहुधा प्रसंग येतात. त्यांस स्वतः आपल्या अंगांत कपडे घालतां येतात, व काढतां येतात.

वाचकांच्या डाव्या हाताकडील व्यक्ति ह्मणजे **गायोव्हन्नी** हा बीर नांवाची दारू फार पितो. परंतु **गायाकोमो** ह्यास बीर कांहीं आवडत नाहीं. पण त्या ठिकाणच्या झऱ्याचें निर्मळ पाणी मात्र पितो. **गायोव्हन्नी** ह्यास चित्रें वगैरे काढण्याची फार हौस आहे. तो आपल्या गुडघ्यावर पुस्तक किंवा कागद ठेवून चित्रें मोठ्या उत्साहानें काढतो. परंतु त्याचा भाऊ **गायाकोमो**, ही स्वारी जरा विनोदी व जास्ती बोलकी आणि चंचलवृत्तीची असल्यामुळें त्या चित्रांत कांहींतरी खोड काढून त्याच्या गुडघ्यावरून तो कागद फेंकून देतो. इतकें जरी आहे तरी ते एकमेकांबरोबर मोठ्या प्रेमानें वागतात, आणखी आपल्या स्थितींत कांहीं बिघाड होईल ह्याबद्दल त्यांच्या मनांत कांहीं कल्पनासुद्धां येत नाहीं, असें भासतें.

दुखण्याबाण्याच्या संबंधानें दोघांच्याही प्रकृति अगदीं भिन्न आहेत, नुक्तीच एकास शैत्यबाधा झाली होती, आणि त्याच्या अगदीं उलट दुसरा पित्तप्रकोपानें अस्वस्थ होता. त्यांच्या परस्परांच्या अंतरजठरांचा इतका कांहीं भिन्नभाव आहे कीं, ते हल्लींच कोठेंसा आगगाडींतून प्रवास करीत असता त्यांपैकीं एकाचा चेहेरा एकाएकीं अगदीं फिक्का पडला, व लागलीच त्यास वांती होऊन पोटांत होतें नव्हतें तितकें सारें बाहेर पडलें. परंतु दुसऱ्या भावास उदरसंबंधी कोणत्याही प्रकारचा त्या वेळेस विकार न होतां उलटी ही स्वारी, आपल्या भावाची अशी अवस्था झालेली पाहून त्यास विनोदानें हंसत होती. एक जण निद्राभरांत उठून क्षुधेनें अगदीं व्याकूळ होतो, आणि मग काफी पितो किंवा कांहीं तरी खातो. परंतु त्या वेळेस दुसरा खुशाल घोरत पडलेला असतो. यावरून दोघांच्याही पोटांत स्वतंत्र आंतडें असावें असें वाटतें. कारण त्यांच्यापैकीं एकास मलमूत्रविसर्जन करण्याची इच्छा होते, त्या वेळेस दुसऱ्यास होत नाहीं. आणि एकास जर संग्रहणीची भावना झाली तर दुसरा अगदीं स्वस्थ असतो. तथापि हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, संवयीमुळें आणि एकमेकांच्या सोईकरितां हें जुळें मलविसर्जनविधि एकेच वेळेस करितें. त्याचप्रमाणें

दोघांचेही मूत्राशय निरनिराळे आहेत; परंतु मूत्रमार्ग दोघांस एकच आहे. आणखी अमेरिकेंत फिलाडेल्फिया येथील डाक्टर **रॉबर्ट पी० हॅरिस**, एम्. डी. यांनीं त्यांच्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, त्या दोघांस एकच पुरुषेंद्रिय असून त्यास चेतना उत्पन्न होते आणि नंतर त्यास काठिण्य प्राप्त होतें; परंतु त्यांस कांहीं रतिविलाससुखाची इच्छा होत नाहीं.

ह्या जुळ्यास पाय अवघे दोनच, ज्याचा पाय त्याच्या ताब्यांत. एकाचा पाय दुसऱ्यास उचलवत नाहीं, किंबहुना एकाच्या पायास स्पर्श केला तर तो दुसऱ्यास कळत नाहीं. त्यांच्या वयाच्या मानानें बाहूंपेक्षां त्यांचे पाय पूर्णतेस येण्याला जरा अवकाश आहे. **गायाकोमो**चा पाय जरा आंखूड असून नेबळा आहे.

ते दोघेही निजतांना पाठीवर किंवा कुशीस निजतात. केव्हां केव्हां उपडेही निजतात; परंतु ह्या स्थितींत ते फार वेळ रहात नाहींत. आणखी दररोज आठ तासांपेक्षां अधिक वेळ झोंपून रहात नाहींत.

सयामांत **एंग** आणि **च्यांग** या नांवाचें एक जुळें जें आपल्या साठावे वर्षी–इसवी सन १८७४ सालीं एकमेकांच्या थोडक्याच अंतरानें–मरण पावलें तें फारच प्रसिद्ध होतें. तें एकमेकांशीं कांहीं पूर्णरीतीनें जोडलेलें नव्हतें; हृदयाच्या हाडांचीं खालचीं टोंकें काय तीं एका जाड मांसपिंडानें एकमेकांशीं संयुक्त झालीं होतीं. **एंग** व **च्यांग** हे दोघेही चांगले बुद्धिमान् होते. ते प्रेक्षक लोकांबरोबर संभाषण करीत; आणि दैवानें आपल्यास जी संयुक्त स्थिति प्राप्त झाली तींतच ते संतुष्ट आहेत असें दिसे. त्यांचा जोडणारा मांसपिंड जर फक्त स्नायुमय असता तर ते दोघेही जिवंत राहून त्यांस एकमेकांपासून निःसंशय विलग करतां येईल याबद्दल ते हयात असतां नेहमीं भवति न भवति होत असे. परंतु ते मेल्यानंतर शरीराची त्यांच्या तपासणी केली, तेव्हां असें आढळून आलें कीं, दोघांच्याही अंतरजठराची नलिका एकच होती. यावरून जिवंतपणीं दोघांच्या संयुक्त भागाचा छेद करून त्यांस विभक्त करतां आलें नसतें हें निर्विवाद आहे. परंतु अशांपैकीं एक दोन जुळ्यांस जन्मतःच जोडणाऱ्या मांसपिंडाकडे कापून वेगळें केल्यानंतर त्या प्रत्येकांतील निदान एक तरी मूल जिवंत राहिल्याचें जुन्या लेखांवरून आढळून येतें.

ह्या सयामी जुळ्यापूर्वी सन १७०१ सालीं हंगारी–आस्ट्रिया–प्रांतांत दोन मुलींचें एक जुळें उपजलें. त्यांचीं नांवें **हेलिना** आणि **ज्युडिथ.** त्या पाठीकडच्या बाजूस एकमेकींशीं जोडलेल्या होत्या. त्यांनीं आपल्या संयुक्त स्थितींत २३ वर्षे काढून १७२३ त त्या मरण पावल्या.

वर लिहिलेल्या **हंगेरियन** जुळ्या मुलींप्रमाणें "**साऊथ क्यारोलिना**" नामक सिद्दी जातींच्या मुलींचें चमत्कारिक जुळें १८९१ च्या सुमारास उपजलें. त्यांचाही पाठीकडल्या बाजूस आकड हाडाच्या खालीं चमत्कारिक रीतीनें संयोग झाला होता. अर्थात दोघी परस्पर पूर्वपश्चिमाभिमुख होत्या. त्या दोघींस चार पाय होते. त्या चालतांना पाठीमागच्या दोन पायांनीं किंवा चारी पायांनीं एकमेकींच्या बाजूस ह्मणजे तिर्कस होऊन चालत. त्यांची शरीरप्रकृति निकोप असे. दोघीही सारख्याच तालसुरावर गाऊन नाचत. दोघींचें स्पर्शेंद्रिय एकच होतें; ह्मणजे एकीस स्पर्श केला तर तो दुसरीस लागलाच कळे. परंतु त्यांची चलनवलनशक्ति इतकी कांहीं एकमेकींपासून भिन्न होती कीं, एकीचा अवयव दुसरीस उचलतां येत नसे.

वरील वर्णन जर आमच्या वाचकांस आवडलें तर पुढील एखाद्या योग्य प्रसंगीं अशा प्रकारची लोकविलक्षण सृष्टि उत्पन्न होण्याचीं कारणें, त्या दोघांच्या प्रकृतींत भेदाभेद वगैरेबद्दल मनोरंजक व ध्यानांत ठेवण्यासारखी माहिती वाचकांस देऊं ह्मणतों.

---

# सप्तसांवत्सरिक–

## परमेश्वरप्रार्थना.

### श्लोक.

(कामदा व भेद.)

स्मरण हें तुझें गोड ईश्वरा। चरण पामरा आसरा खरा॥
भजन रम्य तें आवडो मना। शरण हा करीं पूर्ण कामना॥ १॥
मधुर वाटतें नामही किती। सुखद अंतरीं संत घोकिती॥
सुलभही जिवां तेंहि नाघडे। विषयवासना ही गळां पडे॥ २॥

फुकट कष्टती पामरें भवीं । बिकट सोसुनी संकटें नवीं ॥
शकट मोडका घोर काननीं । निकट जातसे काळ-आननीं ॥ ३ ॥
तरिमधें शिळा बांधुनी गळां । उपटितो खिळा यावया जळा ॥
नवस का तिला जावया तळा । निजकरें अशा जोडितो फळा ॥ ४ ॥
तीच आमुची खास हो गती । साधुसंतही हेंचि सांगती ॥
लोक हे असे अज्ञ जन्मती । देउनी सख्या तार सन्मती ॥ ५ ॥
पापराशि म्यां जोडिल्या अती । ताप जाहला भ्रंशली मती ॥
सापषड्रिपू डंशिती मना । काप तूं तया कंसमर्दना ॥ ६ ॥
कालिया तुह्मीं मर्दिला महा । त्याहुनी पहा प्रखर हे सहा ॥
यांसि नाशितां विश्वही सुखी । कीर्ति होय कीं सर्वतोमुखी ॥ ७ ॥
इष्ट आप्त ते मिष्ट खावया । शिष्ट शिष्ट ते स्तोत्र गावया ॥
स्पष्ट बोलका एक ना दिसे । कष्ट हे किती सांगुं मी असे ॥ ८ ॥
क्षणिक सर्व हें मानसा कळे । विसरतों परी या भवामुळें ॥
उदरदास मी काम-किंकर । करुनियां क्षमा देइं तूं वर ॥ ९ ॥
भवजलामधें तूंचि नाव कीं । सजलमेघ तूं दुःखपावकीं ॥
झडकरी प्रभो धांव धांवकीं । करुनियां कृपा आजि पाव कीं ॥ १० ॥
सौख्य आमुच्या वाचकां सदा । देउनी सख्या नेइं सत्पदा ॥
शक्ति देउनी साह्यकारका । कार्य चालवीं विश्वचालका ॥ ११ ॥
एक भूपती सर्वदा टिको । मेघ वर्षुनी भू बरी पिको ॥
देशबंधुंचें प्रेम वाढवीं । यत्नसिद्धिला बुद्धि दे नवी ॥ १२ ॥
शत्रुची विभो पालटो मती । कीर्तिमान हो भावि संतती ॥
शिल्पशास्त्र हें आमुच्या जना । साध्य होउनी आवडो मना ॥ १३ ॥
जनमना सदा शांतता असो । सतत मंदिरीं इंदिरा वसो ॥
चहुंकडे तुझी भक्ति विस्तरो । सुजन-कामना आवडी पुरो ॥ १४ ॥
प्रेम ठेवुनी कोकिळावरी । क्षेम चालवीं साह्यता करीं ॥
भार सर्वही तुजवरी दिला । फार काय बा सांगुं मी तुला ॥ १५ ॥"

# सृष्टिवैचित्र्य.

## ८ पाण्याचीं रूपांतरें.

### पाणी.

हजारों वर्षांपूर्वीचे लोक पाणी हें एकच तत्व आहे, असें मानीत असत. अनेक पदार्थ मिळून पाणी झालें असेल किंवा होईल ही कल्पना सुद्धां त्याच्या मनांत आलेली नसावी. परंतु सुमारें २०० वर्षांपूर्वीं सर ऐझाक **न्यूटन** ह्मणून एक विद्वान् होऊन गेला, त्यानें अशी कल्पना काढली कीं, पाणी हें अनेक परस्पर भिन्न पदार्थांच्या संयोगानें झालेलें असून त्यांपैकीं एक किंवा अनेक पदार्थ दाह्य असावेत. गेल्या शतकांत हें **न्यूटन**चें अनुमान अगदीं खरें ठरलें. आणि पाणी हें दोन वायुतत्वांच्या संयोगानें उत्पन्न झाल्याचें सिद्ध झालें. ह्या दोन वायूंपैकीं एकाचें नांव **हैड्रोजन** किंवा **जलोत्पादक.** कारण पाणी उत्पन्न करतांना ह्याच्याशीं संमिश्र होणारा जो **आक्सिजन** किंवा **प्राणवायु** त्याच्या हा दुप्पट प्रमाणानें असतो. **हैड्रोजन** वायु हा अत्यंत हलका असून तो दाह्य आहे. **आक्सिजन** हा स्वतः दाह्य नाहीं, तथापि तो दहनक्रियेस साह्यकर्ता आहे. तापवून लाल केलेली लोखंडाची तार **आक्सिजन** वायूमध्यें धरली, तर तेजोमय प्रकाश पडून ती जळून खाक होते !

परंतु ह्या वर सांगितलेल्या दोन वायूंपासून पाणी उत्पन्न होतें हें कळण्यास साधन काय ? असा प्रश्न उद्भवतो. पण पाण्याचें पृथक्करण करण्यास विद्युत्प्रयोग हें मोठें साधन आहे. पाण्यावर विद्युत्प्रयोग केला ह्मणजे पाण्याचें पृथक्करण होऊन **हैड्रोजन,** व **आक्सिजन** हे दोन्ही वायु वेगवेगळे निघतात. त्यांत **हैड्रोजन** वायु दोन भाग, आणि **आक्सिजन** वायु एक भाग भरतो. तसेच २ भाग **हैड्रोजन** व एक भाग **आक्सिजन** घेऊन त्यावर विद्युत्प्रयोग केला, तर त्यापासून पाणी उत्पन्न होतें.

### वातावरणांतील पाणी.

आपण ओलें वस्त्र सुकत घातलें, तर लौकरच वाळतें. हें ओल्या

वस्त्रांतील पाणी जातें कोठें? तर तें रजःकण रूपानें वातावरणांत मिश्र होतें. परंतु हें रूपांतर इतक्या सूक्ष्मरूपानें होतें, कीं, ती क्रिया आपल्या डोळ्यांस दिसत सुद्धां नाहीं. अशाच रीतीनें वातावरणांत पाण्याचा पुष्कळ सांठा जमलेला असतो. जेवढ्या जेवढ्या ह्मणून ओल्या वस्तु दिसतात, त्या प्रत्येकींतून वातावरणांत पाणी जातें. पावसाची सर पडली ह्मणजे जमीन, दगड, झाडेंझुडें भिजून चिंब झालेलीं दृष्टीस पडतात. परंतु थोडा वेळ गेला नाहीं तोंच तीं सर्व कोरडीं ठणठणीत पडतात. ह्यांपैकीं पाण्याचा पुष्कळ अंश वातावरणांत मिश्र होतो. भर उन्हाळ्यांतील निरभ्र दिवसांतही वातावरणामध्यें पाण्याचा पुष्कळ अंश असतो. आपल्या शरीरांतून बाहेर पडणारें पाणी; आपल्या श्वासोच्छ्वासांतून बाहेर पडणारें पाणी; झाडांच्या पानांतून बाहेर पडणारें पाणी; हें सर्व वातावरणांतच जाऊन मिसळतें. ह्याशिवाय, समुद्र, नद्या, तलाव, सरोवरें इत्यादिकांतून मनस्वी पाणी रजःकणरूपानें सतत बाहेर पडत असून तेंही वातावरणाशीं संमीलन होत असतें. पाण्याचें नेहमीं रूपांतर चाललेलेंच असतें. तें रजःकणरूपानें वातावरणांत शिरतें, आणि पर्जन्याच्या रूपानें पुन्हा पृथ्वीवर पडतें.

## दंव.

आकाश निरभ्र असेल तर सायंकाळीं किंवा रात्रौ झाडांच्या पानांवर किंवा गवतावर मोत्यांसारखे तेजःपुंज असे पाण्याचे गोल असलेले दृष्टीस पडतात; त्यांस दंव अशी संज्ञा आहे. सकाळच्या वेळीं तर हे दंव-बिंदु हिऱ्यासारखे चमकतांना दृष्टीस पडतात. हे दंव-बिंदु कांहीं झाडांच्या पानांपासून उत्पन्न होत नाहींत; तर वातावरणापासून उत्पन्न होतात. पण वातावरणापासून हें दंव कसें उत्पन्न होतें?

आपण एक गारठलेली स्लेट घेऊन तिच्यावर श्वासोच्छ्वास सोडला, तर ती ओली होते. आपल्या श्वासोच्छ्वासांतील पाणी त्या स्लेटीस भिजवतें, हेंच त्याचें कारण. ह्याच रीतीनें दंव तयार होतें. थंड पानें उष्ण हवेंतील आर्द्रपणा शोषण करून घेतात. भूमिही, दिवसा, उष्णता बाहेर सोडण्यापेक्षां पुष्कळ पटीनें अधिक आंत ओढून घेते. पण रात्रौ ह्याच्या उलट क्रिया घडून पृथ्वी थंड होते. आणि थंड झालेली जमीन, वातावरणांतील पाणी दंवाच्या रूपानें शोषण करून घेते.

दंव तरी नेहमींच पडतें असें नाहीं. कांहीं रात्रींत दंव मनस्वी पडतें, आणि कांहीं रात्रींत मुळीं पडतच नाहीं. ह्याचें तरी कारण काय? आकाश निरभ्र असलें ह्मणजे दंव फार पडतें. नंतर उष्णता निघून जाते; ती फिरून येत नाहीं. आभ्राच्छादित रात्रीमध्यें पृथ्वीकडे उष्णता असते; त्यामुळें झाडेंझुडें गारठत नाहींत आणि दंव पडत नाहीं. निरभ्र आकाश असून वारा फार असला तरी दंव पडत नाहीं. कारण दंव पडतें न पडतें तोंच वारा त्यास सुकवून टाकतो.

कांहीं झाडांस पाणी अधिक लागतें; आणि कांहींस कमी लागतें. ह्याचें कारण असें कीं, पहिलीं झाडें उष्णता फार लौकर बाहेर टाकतात आणि त्यामुळें त्यांस दंवाचा पुष्कळ पुरवठा होतो.

थंडीच्या कडाक्यानें दंव गोठलें ह्मणजे त्यास बर्फ असें ह्मणतात. दंवापासून पुष्कळ फायदे आहेत. पृथ्वीवरील कित्येक देशांमध्यें महिनेचे महिने पर्जन्य पडत नाहीं. परंतु तेथें दंव विपुल पडून वनस्पतींचें रक्षण होतें.

## मेघ आणि धुकें.

वातावरणांत असलेलें पाणी, मेघाच्या रूपानें आपणास दृष्टीस पडतें. सार्द्र झालेला उष्ण हवेचा ओघ, जेव्हां, पृथ्वीच्या पृष्ठभागापासून वर जातो, आणि तो थंड व उच्च भागावर पोंचतो, तेव्हां त्याचा सर्वांत वरचा भाग आपली आर्द्रता मेघाच्या रूपानें प्रगट करतो, त्यास खालच्या उष्ण हवेचा टेंका असतो. त्यानें आपली उष्णता सोडली कीं ढग खालीं उतरतो, आणि पुन्हा उष्ण हवेंत मिळून त्यास अदृश्य स्थिति प्राप्त होते. हवा जितकी अधिक रुक्ष आणि उष्ण असते तितकी ती लौकर ओलावा शोषून घेते.

ढगांत पाणी कसें राहतें, ह्याचा अद्यापि बरोबर शोध लागलेला नाहीं. कांहीं लोकांची अशी कल्पना आहे कीं, त्याचे रजःकण उत्तम धूलीच्या रजःकणांप्रमाणें त्यांत मिश्र असतात. ह्यांस जलतुषार अशी संज्ञा आहे.

मेघांचे आकार निरनिराळे असतात. ह्यांच्या मुख्यत्वेंकरून तीन जाति ठरविलेल्या आहेत. पांढरे, लोंकरीच्या ढिगांप्रमाणें, लहान लहान पिसाच्या गुठाळ्यासारखे ढग केव्हां केव्हां आकाशांत तरंगतांना आ-

पण पहातों, ही एक जात. दुसरे कित्येक असतात त्यांचे ढिगले ढिगले असून ते एकमेकांवर चढलेले दिसतात. पर्जन्य पडण्याचा वेळ अगदीं नजीक येऊन ठेपला ह्मणजे त्यां ढगांचा रंग अगदीं काळसर होतो. तिसऱ्या जातीचे ढग आहेत ते पट्ट्याप्रमाणें लांबचलांब आकाराचे असतात. हे तिन्ही जातींचे ढग एकमेकांत मिश्र होतात.

कित्येक ढग दुसऱ्या ढगांपेक्षां फार उंच असतात. जमिनीच्या अंगाशीं भिडून ढग असला ह्मणजे त्यास धुकें ह्मणतात. हिंदुस्थानांतील कित्येक प्रदेशांवर धुकें नेहमीं पहाण्यांत येतें. बहुतकरून नद्यांवर धुकें फार दृष्टीस पडतें. नदीच्या प्रवाहाचें वळण बहुतकरून धुक्यानें प्रदर्शित होतें. मोठमोठाल्या पर्वतांच्या बाजूंवर धुकें वारंवार दृष्टीस पडतें व त्यांच्या माथ्यांवर सूर्याचा प्रकाश असतो. पर्वतांच्या माथ्यांवर जे कोणी असतात, त्यांस खालीं ढग दिसतात, आणि मस्तकावर स्वच्छ आकाश दिसतें. त्यांत विजा चमकत असल्या ह्मणजे तर वर उभें राहणाऱ्यांस विशेषच चमत्कार वाटतो. कारण पायांखालीं विजा चमकतात, आणि आकाशांत कांहीं नाहीं ! ! !

कधीं कधीं ढग निरनिराळ्या दिशांनीं आकाशांत गेलेले आणि पुन्हा जमिनीपर्यंत उतरलेलेही दृष्टीस पडतात. ह्याचें कारण असें आहे कीं, उंच आकाशामध्यें कांहीं वायूंचे प्रवाह पृथ्वीच्या आसपास असणाऱ्या वायूंच्या प्रवाहांपासून फार भिन्न असतात. ते ह्या ढगांस आपल्या प्रवाहांतून नेतात. तुफानाच्या दिवसांत मेघांची गति दर तासास ९० पासून ६० मैल असते. जमिनीवर त्याच्या पडलेल्या धांवत्या छायेवरून ही गोष्ट ध्यानांत येते.

बहुतेक मेघ पृथ्वीच्या पृष्ठभागापासून एक मैल उंचीच्या आंतच असतात. पांच सहा मैल उंचीच्या वर बहुतकरून मेघ असत नाहींत. सकाळच्या वेळीं आणि सायंकाळच्या वेळीं मेघ फार सुंदर दिसतात. कधीं कधीं ते सोन्याच्या व रुप्याच्या पर्वताप्रमाणें दिसतात. त्यांत जे पाण्याचे रजःकण भरलेले असतात, त्यांवर सूर्याचे चकचकीत किरण पडून त्यांच्या परावर्तनानें त्यांस सुंदर रंग येतो. मेघांकडे पाहून मनुष्याच्या मनांत अनेक प्रकारचे विचार उद्भवतात. कालिदासानें **मेघदूत** नामक एक उत्तम काव्य रचलें आहे. त्यांत मेघांच्या शोभेचें व त्यापा-

सून उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांचें अप्रतिमवर्णन केलें आहे. आपलें आयुष्य हेंही मेघांप्रमाणेंच नश्वर आहे. सुंदर दिसणारे मेघ जसे क्षणांत वितळून जातात, अथवा नाहींसे होऊन जातात तसें आपलें आयुष्यही केव्हां संपेल याचा नियम नाहीं. हा विचार निरंतर मनांत जागृत ठेवून सत्कर्मांविषयीं निरंतर मनाची प्रवृत्ति ठेवावी. मेघदर्शनापासून मुख्यत्वें-करून शिकावयाची गोष्ट हीच.

## दगडी कोळसा.

इंग्लिश लोक सांप्रत जे एवढ्या वैभवास आले, ते केवळ आपल्या दीर्घोद्योगानें आणि अत्यंत परिश्रमानें होत ही तर गोष्ट खरीच; तथापि त्यांस परमेश्वरानें एक अपार वैभवाचा ठेवा दिला, हाही त्यास एक मुख्य कारण आहे. तो जर त्यांस प्राप्त झाला नसता, तर त्यांच्या यंत्रांची आणि तंत्रांची पुंगी बहुतकरून बंदच पडली असती. तो ठेवा ह्मणजे दगडी कोळशांच्या धनत्तर खाणी हा होय. ही ही गोष्ट आह्मांस कबूल केली पाहिजे, कीं त्याच खाणी आमच्या देशांत असत्या, तर आह्मीं त्यांचा उपयोग कितपत केला असता ह्याचा वानवाच आहे. आमच्या देशांतही दगडी कोळशांच्या खाणी मुळींच नाहींत असें नाहीं. पण त्यांचा प्रस्तुत कालीं आह्मी कितपत उपयोग करीत आहों? त्यावरून अनुमान केलें तर बहुधा शून्याकारावरच पाळी बसेल. दगडी कोळसा काढण्याचें काम किती कष्टाचें, किती जोखमाचें आणि किती फायदेशीर आहे? त्यांस त्याचें जें फळ मिळतें तें किती योग्य आणि निढळीच्या घामाचें आहे? आपल्या लोकांत हलगर्जीपणा आणि उपेक्षा केवढी दांडगी आहे? कागदी घोड्यांचा फेरफटका करण्यांत आणि बोलघेवड्यांचा मंडप उभारण्यांतच गर्क होऊन आमचे लोक किती मुरडताहेत? आपणांस किती ईर्ष्या आली पाहिजे? आणि आपण किती अंग मोडून काम केलें पाहिजे? ह्याची थोडीशी तरी आह्मांस कल्पना व्हावी ह्मणून आज ही दगडी कोळशांची माहिती खालीं देत आहों.[1]

प्राचीन कालीं दगडी कोळशाची माहिती कोणांसच नव्हती. सुमारें १००० वर्षांपूर्वी ह्या कोळशाचा उपयोग प्रथमतः इंग्लंदांत करूं ला-

१ आपल्या देशांतील दगडी कोळशांची माहिती स्वतंत्र देण्यांत येणार आहेच.

गले असें ह्मणतात. तेराव्या शतकाच्या अखेरीस लंदन शहरांत दगडी कोळशांचा उपयोग प्रसिद्धपणें करूं लागले. ० हा खनिजपदार्थ स्वयंपाक करण्यास, घरांत ऊब देण्यास, आणि दिवाबत्ती करण्यास उपयोगीं पडतो. वाफेच्या यंत्रांशीं याचा संयोग झाला, ह्मणजे तर काय? एक मनुष्य हजारों मनुष्यांचें काम करतो.

प्राचीन कालीं पृथ्वीवर महान् महान् वृक्षांचीं आणि झाडांचीं घोरतर आणि निबिड अरण्यें होतीं. कालांतरानें फेरफार होऊन अनेक जलप्रलय झाले. त्यांत कित्येक अरण्यें उभींच्याउभींच जलमय झालीं. आणि त्यांतील वृक्षांवर आणि झाडझाडोऱ्यांवर गाळाचा आणि वाळूचा थर बसून तीं जशींच्यातशीं जमिनींत पुरलीं गेलीं. सेंद्रिय पदार्थांचीं कलेवरें जमिनीवर उघडीं पडलीं तर तीं कुजतात. परंतु तींच क्षार लागून जमिनींत पुरलीं गेलीं, तर कांहीं कालानें पाषाणरूप होतात. लोणच्याचा आंबा क्षारांत घातलेला असल्यामुळें कांहीं वर्षांनीं तो क्षारमय बनतो; तरी त्याचा आकार आणि आंबटपणा कायम असतो. तसाच प्रकार दगडी कोळशांचा आहे. वर सांगितल्या प्रमाणें फार प्राचीन कालीं क्षारोदकांत न्हाऊन जमिनींत पुरले जाऊन पाषाणमय झालेले जे वृक्ष तेच दगडी कोळसे. लोणच्यांतील आंब्यांत जसा आंबटपणा कायम असतो तसा पाषाणमय वृक्षांत दाह्यगुण कायम आहे. कोळशांच्या खाणींतील कोळसे काढून झालेले रिकामे थर पाहिले ह्मणजे वृक्षांचा आणि झाडांचा आकार स्पष्ट दिसतो. तसेंच दगडी कोळशांच्या थराची जाडी नेहमीं फार थोडी असते. सहा किंवा आठ फुटींहून अधिक कधींही आढळण्यांत येत नाहीं.

**इंग्लंदांत** तरी सर्व देशभर दगडी कोळसा सांपडतो असें नाहीं. उत्तरप्रांत, मध्यप्रांत, आणि पश्चिमप्रांत ह्या तीन प्रांतांतच मुख्यत्वेंकरून दगडी कोळशांच्या खाणी आहेत. "**कज्जलप्रदेश**" ह्या नांवाचा एक प्रांत मध्यदेशांत आहे तो दगडी कोळशांच्या खाणींविषयीं फार प्रसिद्ध आहे. ह्या प्रांतास असें नांव पडण्याचें कारण ह्या प्रदेशीं हिरवीं

१ कोणत्याही प्राण्यांचीं शरीरें क्षार लागून जमिनींत पुरलीं गेलीं, तरी कांहीं कालानें तीं जशाच्या तशीं पाषाणरूप होतात. ह्यास इंग्रजींत **फासील** असें म्हणतात. भूगर्भपदार्थांची पेटी विकत मिळते, तींत विंचू, पाली, बेडूक, खेकडा इत्यादि प्राणी पाषाणमय झालेले एक दोन तरी दिलेले असतात. ते पाहून मनाला फार चमत्कार वाटतो.

चार शेतें वगैरे लागवड बहुतकरून क्वचितच आढळते. तेथें दगडी कोळशांच्या खाणी आणि लोखंडी कारखान्यांच्या भट्टया इतक्या विपुल आहेत, कीं त्यांच्या धुराच्या अजस्र लोटानें तेथील झाडें झुडें, घरें इमारती इतक्याच काळ्या होऊन व धुरकटून राहिल्या नाहींत, तर सर्व प्रांतावर कज्जलाचा थर बसला आहे! त्यामुळें ह्यास (Black country ह्मणजे) '**कज्जलप्रदेश**' असें सार्थ नांव पडलेलें आहे.

त्या प्रांतांतील वरच्या जमिनीच्या उत्पन्नापेक्षां पोटांतील उत्पन्न दांडगें आहे. येथें दगडी कोळशांचे आणि लोखंडाचे थर एकत्र सांपडतात. भट्टी लावून लोखंड काढण्यास दगडी कोळशांचा फार उपयोग होतो. दगडी कोळशांच्या आणि लोखंडाच्या कारखान्यांनीं तो प्रदेश भरून गेल्यामुळें त्यांच्या अखंड धुरांच्या लोटांनीं घरेंदारें, भिंती, इमारती, व झाडेंझुडपें काळीं होऊन राहतात असें नाहीं, तर तेथील हवा सुद्धां काजळानें भरलेली असते. हा **कृष्णप्रदेश** रात्रीच्या वेळीं तर फारच भयाण दिसतो. कारण हजारों कारखाने आणि भट्ट्या रात्रीं धाड धाड पेटत असतात. आणि ९० पासून ७० फुटी उंचीच्या त्यांच्या बंबांतून 'भक् भक्' 'भक् भक्' असे सारखे हजारों आगीचे लोट निघतात. ते जणोकाय हजारों ज्वालामुखीच फुटले आहेत असें वाटतें! कारखान्यांतून फिरणारीं माणसें जिकडे तिकडे काळ्या आकृतींप्रमाणें फिरत असतात, तीं भुतें नाचल्याप्रमाणें दिसतात! भोंवतालच्या दरी आणि गुहा एकाद्या विक्राळ राक्षसिणीप्रमाणें खावयास येतात असें वाटतें. घणांच्या ठोक्यांची दणदणाट, गिरण्यांच्या चाकांची घरघर येणेंकरून कानटळ्या अगदीं गप्प होऊन जातात! बोललेला बोल ऐकेन ह्मटलें तर उपाय नाहीं.

कोळशांच्या खाणींत उतरण्यासाठीं एका भुयाराच्या किंवा पेवाच्या तोंडासारखें जमिनीस एक भोंक तयार करावें लागतें. हें भोंक, चार पांच मनुष्यांचा पाळणा, घोडीं, गाड्या वगैरे आंत उतरण्याइतकें मोठें असावें लागतें. नंतर त्या भोंकाच्या तळापासून मुख्य खाणीपर्यंत एक बराच मोठा रस्ता, ह्मणजे विवर तयार करतात: तें घोडा, लहान गाडी व कांहीं मनुष्यें जाण्याएवढें मोठें असतें. नंतर त्यास निरनिराळे फांटे फोडून लहान लहान-शाखा ह्मणजे गल्ल्या तयार करतात. हीं विवरें

कधीं कधीं मुख्य द्वारापासून फारच दूर गेलेलीं असतात. दगडी कोळशांच्या खाणीची रचना कांहींशी शहराप्रमाणें असते. शहरांत जसा एक मुख्य रस्ता असून त्यास अनेक गल्लया फुटलेल्या असतात. त्याचप्रमाणें ह्या खाणींतून कांहीं रुंद व कांहीं अरुंद अशा गल्लया पोखरलेल्या असतात. व त्यांस ठिकठिकाणीं दगडी कोळशांच्या स्तंभांचा आधार असतो. ह्या गल्लया कोठें कोठें एक एक मैलसुद्धां लांब असतात.

कोळसे काढणारे मनुष्य ह्या खाणींत, ह्मणजे अंधार नगरींत वर सांगितलेल्या भोंकावाटे पाळण्यांत बसून यंत्राच्या आधारानें उतरतात. ते जातांना आपल्या टोपींतून एक लहानसा कंदील नेतात, तेवढा काय तो त्यांस उजेड !

कोळसे काढणारे लोक ज्या जागचे कोळसे काढतात, ती जागा इतकी संकुचित असते, कीं त्यांस तेथें नीट उभें राहतां येत नाहीं येवढेंच नव्हे, पण बसतां सुद्धां येत नाहीं. ते पाठीवर उताणे पडतात; किंवा कुशीस निजतात; आणि मग आपल्या टिकावांनीं कोळसे फोडतात. कोळसे खटल्यापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत किंवा खाणीच्या तोंडापर्यंत एका लहानशा गाडींत भरून नेतात. ही गाडी चालण्यास तेथें रूळ मारलेले असतात. परंतु रस्त्याची उंची फारच कमी असल्यामुळें ती गाडी नेण्यास फार प्रयास पडतात. गाडीच्या पुढच्या बाजूस साखळदंड बांधून तो एका मनुष्याच्या कमरेस, चामड्याचा पट्टा बांधून त्यास अडकवितात. आणि तो मनुष्य माकडाप्रमाणें हातापायांनीं चालून गाडी रूळावरून ओढतो. गाडीच्या मागें एक मनुष्य असून तोही त्यांचप्रमाणें चालून गाडीस ढकलीत असतो.

खाणींतून कोळसा काढणें, हें केवळ कष्टाचेंच काम आहे असें नाहीं. तर तें अत्यंत जिवावरचेंही आहे. कित्येक खाणींमध्यें एक प्रकारचा ग्यास उत्पन्न होऊन तो जमून राहतो. आणि त्याच्याजवळ दिवा वगैरे गेला असतां, तो एकदम पेट घेतो. व बंदुकीच्या दारूप्रमाणें भडाका होऊन सुरुंग लावल्याप्रमाणें खडपच्या खडप उडवून देतो. त्याच्याजवळ कधींच दिवा न गेला तर हा अनर्थ टळेल, ही गोष्ट खरी आहे. परंतु खाणींतील लोक कांहींसे अडाणी आणि हलगर्जी असतात, त्यामुळें असें घडून येतें. अशा अपघातानें शेंकडों लोकांची प्राणहानि

झालेली आहे. कधीं कधीं खाणीचा कांहीं भाग ढासळून पडतो, आणि त्याखालीं कैक मनुष्यें दडपूनही जातात. सन १८४३ मध्यें एका खाणीचा कांहीं भाग कोसळला, त्यांत एकवीस मनुष्यें सांपडलीं. बाकीच्या लोकांस वाटलें, कीं आंत सांपडलेलीं मनुष्यें दडपून प्राणास मुकलीं असावींत. परंतु खरा प्रकार तसा नव्हता. आंतील मनुष्यांच्या पुढें प्रचंड ढीग पडून आंतील मनुष्यें कोंडलीं गेलीं होतीं! तशा त्या अंधारकोठडींत आणि कोंडमाऱ्यांत त्यांनीं एक सबंध आठवडा काढला! हें सर्व प्राणी जिवंतपणींच पुरले गेले, तेव्हां त्यांस काय बरें वाटलें असेल? परंतु सर्वसाक्षी परमेश्वर कोणास केव्हां व कोठें धांवून जाऊन संकटांतून मुक्त करील, त्याचा नियम लागावयाचा नाहीं! त्या बिचाऱ्यांनीं जेव्हां आपण मृत्यूच्या मुखांत पडलों, व पुढें पडलेला विशाळ पर्वत दूर होण्यास कोणत्याही प्रकारें मार्ग दिसत नाहीं असें पाहिलें, तेव्हां ईश्वराची मनोभावें करुणा भाकून त्यांनीं जिवापाड खटपटीस प्रारंभ केला. होईल तें होवो, एवीतेवी मरणार खरे; मग हातपाय थकेपर्यंत प्रयत्न कां सोडावा? असा निश्चय करून त्यांच्याजवळ असलेले टिकाव, खोरीं घेऊन त्यांनीं रात्रंदिवस सारखा दगड फोडण्याचा सपाटा चालविला. एक दोघांजवळ शिळ्या भाकरीचे तुकडे होते. ते थोडथोडे वांटून घेऊन सर्वांनीं कसेतरी दिवस काढले. आणि कंबर बांधून त्या आड पडलेल्या पर्वतास द्वार पाडण्याचा झपाटा चालविला. हे लोक शनिवारीं कैदखान्यांत सांपडले. तों दुसरा शनिवार आला, तरी कांहीं नाहीं! भोंक पडण्याचा किंवा ताज्या हवेचा कोठें मागमोस नाहीं. तेव्हां त्यांची अवस्था काय झाली असेल, ते किती थकले असतील, याची कल्पना वाचकांनींच करावी. इतकें झालें, तथापि त्यांनीं हातांतील टिकाव कांहीं खालीं ठेवला नाहीं. परमेश्वरावर दृढ विश्वास, आणि उद्योगाचा निश्चय, हीं ज्यांच्यापाशीं आहेत, त्यांस जर परमेश्वरानें पावावयाचें नाहीं, तर पावयाचें तरी कोणाला?

शनिवारीं बाहेरच्या मंडळींनींही तो ढीग फोडावयास प्रारंभ केला. सुमारें दुपारीं अकरा वाजतां त्यांस पलीकडून 'खण्, खण्, खण्,' अशा टिकावांच्या शब्दाप्रमाणें सूक्ष्म आवाज ऐकूं येऊं लागला. तेव्हां त्यांस तो चमत्कार वाटून त्यांनीं त्या भोंकापाशीं कान लावला. तों

पुन्हा तसाच आवाज ! तेव्हा सर्वांची खात्री झाली कीं, आंतील मनुष्यें जिवंत असावींत. लागलींच सर्वांनीं एकच जयजयकाराची आरोळी ठोकली. आणि शेंकडों टिकाव एकदम सुरू करून एका दोन तासांत बराच ढीग बाजूस केला. व आपण काढलेला तर्क खरा किंवा खोटा हें ताडून पाहण्यासाठीं व आंतील मनुष्यास धीराची सूचना देण्यासाठीं त्यांनीं त्या भोंकापाशीं टिकावानें तीन वेळ 'खण्, खण्, खण्,' असा आवाज केला. तो खुणेचा आवाज ऐकतांच आंतील मनुष्यांस किती बरें आनंद झाला असेल ? 'अमृत परमरुग्णा वांचवायास आलें'! आंतून सूचनेसाठीं त्यांनींही त्रिवार 'खण्, खण्, खण्' असा शब्द केला. तेव्हां बाहेरील मनुष्यांस अधिक उमेद येऊन लवकरच त्यांनीं द्वार पाडलें; आणि त्या बिचाऱ्यांची सुटका करून त्यांस पुनर्जन्म दिला. आंतील मनुष्यें निराशेनें, उपोषणानें, आणि अतितर श्रमानें इतकीं व्याकुळ झालीं होतीं, कीं, उघड्या हवेंत येतांच त्यांपैकीं बहुतेक बेशुद्ध होऊन निचेष्टित पडलीं. सर्वांस शुद्धीवर यावयास तास दीडतास लागला ! ह्याप्रमाणें वारंवार कांहीं ना कांहीं तरी अपघात होतातच. शिवाय, मैल मैल जमीन आंतून पोखरली असल्यामुळें वरून जाणाऱ्या आगगाड्यांच्या आगगाड्या खचून पडतात त्या वेगळ्याच ! असे जीवावरचे कष्ट सोसून दृढनिश्चयानें जे सतत उद्योग करतात, त्यांच्या घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरतात, ह्यांत आश्चर्य तें कोणतें ?

**इंग्लंदां**तील एका दगडी कोळशाच्या खाणींत १००० मनुष्यें, तीनशें पोरें आंत, आणि ३०० लोक वर तोंडाशीं कामावर असतात. दुसरी एक खाण आहे, तिची खोली २५०० फूट, ह्मणजे सुमारें अर्ध मैल आहे ! सन १८८१ मध्यें इंग्लंदांत १५४०००००० टन कोळसा पैदा झाला होता. ह्याची ठोक विकरीनें किंमत ९० कोटि रुपये झाली! किरकोळीनें धरली, तर ह्यापेक्षां पुष्कळ पटीनें अधिक होईल.

दगडी कोळशाच्या खाणी **हिंदुस्थानां**तही पुष्कळ प्रांतीं आहेत. **कलकत्त्याच्या** पश्चिमेस एक खाण आहे. हीच प्रथम सुरू झालेली खाण. **कलकत्त्यांत इंग्लंदाहून** आलेल्या कोळशाचा भाव १५ रुपये टन प्रमाणें आहे. **ईस्ट इंडिया** रेलवे कंपनीच्या कांहीं स्वतःच्या खाणी

आहेत. त्यास ३ रुपये टन कोळसा पडतो!! हा प्रत्यक्ष फायदा दिसत असून आमचे व्यापारी ह्याकडे दुर्लक्ष करतात, तेव्हां काय ह्मणावें?

**अमेरिकें**तील **युनैटेड स्टेटम**धील दगडी कोळशांच्या ज्या अफाट खाणी आहेत, त्यांची कल्पना फारच थोड्यांस असेल! **अमेरिकें**तील दगडी कोळशांच्या खाणीच्या व्याप्तीपुढें **इंग्लंद**च्या खाणींची व्याप्ति कांहींच नव्हे! **ग्रेटब्रिटन**च्या सर्व खाणींची व्याप्ति ११९०० चौरस मैल आहे. **नोवास्कादिया** येथील खाणींची व्याप्ति १८००० चौरस मैल आहे. **स्पेन, फ्रान्स, प्रुशिआ, आस्त्रिया,** आणि **बेलजम;** ह्या सर्व ठिकाणच्या मिळून खाणींची व्याप्ति ९२०० चौरस मैल आहे. तसेच **क्रिली, अस्त्रेलिया, हिंदुस्थान, चीन** इत्यादि मिळून २८००० चौरस मैल व्याप्तींच्या खाणी आहेत. आतां **अमेरिकें**तील अजस्र कारखाना पाहाः—

| खाणीचें नांव. | व्याप्ति चौरसमैल. | खाणीचें नांव. | व्याप्ति चौरसमैल. |
|---|---|---|---|
| १ **इलिनाइस.** | ३६८०० | १० **ओहिओ.** | १०००० |
| २ **मिसोराई.** | २६८८७ | ११ **मिचिगान** | ६७०० |
| ३ **कानसास.** | २२२५६ | १२ **इंडिआना.** | ६४५० |
| ४ **टेक्सस.** | २०००० | १३ **आलाबामा.** | ५३३० |
| ५ **अयोवा.** | १८००० | १४ **टेन्नेसी.** | ५११० |
| ६ **पश्चिमव्हर्जिनिया.** | १६००० | १५ **नेब्रास्का.** | ३००० |
| ७ **केंटर्की.** | १२८७१ | १६ **मेरील्यान्ड.** | ५५० |
| ८ **पेनसिल्व्हेनिया.** | १२३०२ | १७ **ऱ्होडबेट.** | ५०० |
| ९ **अरकन्सास.** | १२००० | १८ **व्हर्जिनिया.** | १८५ |

ह्मणजे एकंदर सर्व **अमेरिकें**त २१४९४१ चौरसमैल दगडी कोळशांच्या खाणींनीं व्यापलें आहे! तथापि **आन्थ्रसाइट** नांवाचा उत्तम दगडी कोळसा फक्त **पेन्सिल्व्हेनिया** येथेंच सांपडतो.

दगडी कोळशांत ६ जाती आहेत. १ **काळा** कोळसाः—ह्यांत शिलाजित, साधा कोळसा, आणि मृत्तिकेचा अंश असतो. २ **बोव्हेचा** कोळसाः—ह्यांत थोडासा राळेचा भाग असतो. ३ **स्लेटीचा** कोळसाः—ह्यांत पांढऱ्या मातीचा भाग मिश्र झालेला असतो. ४ **ग्ल्यान्स** को-

ळसाः—ह्यांत फक्त साधा कोळसा आणि मातीच असते. ५ क्यानल कोळसाः—हा सेंद्रिय पदार्थाचें पाषाणरूप आहे. ह्यास पाहिजे तो आकार देतां येतो. आणि त्यावर पालीस फार उत्तम होतें. ह्याचे मणी, गोळ्या, बुदाम वगैरे अनेक पदार्थ करतात. ६ आन्थ्रसाइट कोळसाः—ह्यांत कार्बन फार असून हा सावकाश जळतो.

---

# थोड्यांत मौज!

**डोळां घालितां आंगोळी। एकाचीं तीं दोन झालीं.**

तुकाराम.

परमेश्वरानें आपणांस डोळ्यांची जोडी दिली आहे, आणि तिच्यांतून निघालेले किरण, पसरून जावेत असा त्यांत धर्म आहे. ह्मणून आपणांस नानाप्रकारचे चमत्कार पहावयास मिळतात. दर्शनानुशासनाच्या नियमानुसार सूर्यकिरणाचे दिसणारे चमत्कार अद्भुत असतात खरे; पण ते क्वचित् प्रसंगीं दृष्टीस पडतात. कारण, मृगजळ ह्मटलें तरी त्यास उन्हाळ्याचे दिवस पाहिजेत, व शिवाय विवक्षित जागा पाहिजे. इंद्रधनुष्य ह्मटलें, तर त्यास वर्षाकालाचे दिवस पाहिजेत, व शिवाय सूर्याच्या उलट दिशेकडे ढग पाहिजेत.

पण हे चमत्कार जरी एका बाजूस ठेवले, तरी घरीं बसल्या बसल्या सुद्धां थोड्याशा कृतीनें अनेक चमत्कार दृष्टीस पडतात. रात्रीच्या वेळीं आपल्यापासून बऱ्याच अंतरावर एक चिमणी लावून ठेवावी. आणि एका डोळ्याच्या खालील पोठरींत पापणीच्या वरून एका बोटाच्या टोंकानें बरेंच दाबावें, ह्मणजे पुढें ठेवलेली चिमणी व त्यांतील ज्योति दोन दोन दिसूं लागतात. वरच्या पापणीच्या बेचकांत दाबलें, तरीही असाच प्रकार होतो. फरक इतकाच कीं, पहिल्या कृतीनें ज्योति वर गेलीशी दिसते, आणि दुसऱ्यानें खालीं खालीं गेलीशी दिसते. असें केल्यानें ज्योतीच दोन दिसतात असें नव्हे, तर दृष्टीसमोर असणारे सर्व पदार्थ दोन दोनच दिसतात! दोन्ही डोळ्यांच्या पापण्याच्या बेचकांत एकाच वेळेस दोन बोटें घालून दाबलें, तर मात्र दिसण्यांत कांहींएक फरक दिसत नाहीं. सर्व पदार्थ असतात तसेच दिसतात.

सुमारें दोन हातांवर एक चिमणीचा दिवा लावून ठेवावा, आणि डोळ्यांपुढें सुमारें वितीच्या अंतरावर मधोमध एक बोट उभें धरावें. आणि दोन्ही डोळ्यांची सारखी नजर लावून त्या ज्योतीकडे पहावें, ह्मणजे तें बोट पारदर्शक आहे असें वाटतें, आणि त्यांतून पलीकडचा दिवा, ज्योति, वगैरे सर्व पदार्थ दिसतात. जसें काय मध्यें बोट वगैरे कांहींच नाहीं! तसेंच उजवा डोळा मिटावा, आणि डाव्या डोळ्यानें दिव्याकडे पाहून दिव्याच्या व डोळ्याच्या मधोमध एका हाताचें बोट उभें धरावें, असें कीं, दिव्याची ज्योति त्याच्या आड व्हाईल. नंतर बोट तेथेंच कायम ठेवून डावा डोळा मिटावा, आणि उजवा उघडावा. ह्मणजे तेंच बोट ज्योतीपासून किती तरी डाव्याबाजूस लांब गेलेलें दिसेल. हे सर्व चमत्कार दिवसासुद्धां होतात, परंतु रात्रीचे अंमळ अधिक स्पष्ट समजतात. ह्या सर्व चमत्कारांत खालीं लिहिलेला प्रयोग फारच मजेचा आहे.

खळ लावलेल्या कागदाचा सुमारें पांच इंच औरसचौरस आकाराचा एक तुकडा घ्यावा. आणि त्याची सुरळी करावी; अशी कीं, तिचें एक तोंड डोळ्यावर बरोबर बसावें, आणि दुसरें तोंड किंचित् लहान असावें. ही सुरळी उजव्या हाताचा आंगठा व त्याच्या जवळचें बोट ह्यांत धरून दुसरा हात न लावतां तिचें मोठें तोंड उजव्या डोळ्याबरोबर बसवावें. नंतर डाव्या हातांत एक बुक घेऊन तें त्या नळीच्या पुढें सुमारें कांहीं अंतरावर धरावें. नंतर सारखें स्थीर राहून तशाच स्थितींत दोन्ही डोळे उघडून त्या बुकाकडे पहावें, ह्मणजे त्या बुकाला मध्येंच एक भोंक दिसूं लागेल. आणि सभोंवारचे पदार्थ त्या सुरळींतून न दिसतां, त्या भोंकांतूनच दिसतात असें वाटेल. मात्र नळीची दृष्टि बुकाच्या अगदीं मध्यावर न धरतां अंमळ बाजूस ठेवली पाहिजे. ह्याचें कारण, उजवा डोळा सुरळींतून पहात असतो, आणि डावा डोळा बुक पहात असतो. त्यामुळें त्या दोहोंच्या दृष्टि एकमेकांत इतक्या मिश्र होऊन जातात, कीं, त्यांतील भेद मुळीं कळतच नाहीं. बुकाच्या ऐवजीं डावा हातच सुरळीपुढें धरला, तर त्या हातासच भोंक पडलेलें दिसतें! असले अनुभव सुद्धां तुकारामांनीं घेऊन शिरोभागीं दिलेलें वाक्य लिहून ठेवलें आहे. तेव्हां त्याची धन्य कशी न ह्मणावी.

# कलमबहाद्दरांस शेलापागोटें.

(पु. ६ अं. ११ वरून चालू.)

काव्यसंग्रहांतील मोरोपंतांच्या महाभारताचें वनपर्व ह्या अंकीं संपलें. सर्व कवींचा गर्व हरण करणारें कर्णपर्व कधीं येईल ह्याकडे डोळे लागून राहिले आहेत. सर्व भारताची समाप्ति होण्याला, निदान सहा वर्षें तरी लागतील. हें मनांत आलें ह्मणजे मात्र महा संकट वाटतें. अशा उशिरानें पैलतीर येईपर्यंत धीर कसा धरवेल, येवढीच काय ती फिकीर आहे. पण विनाकारण ज़िकीर करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं. आनंदतनय, अनंतकवि, व अमृतवाणीचे अमृतराय ह्या कवींचीं समग्र काव्यें व चरित्रें हातीं आलींच ह्मटलें तरी चालेल. कवीचें चरित्र लिहिण्याच्या हातोटीबद्दल रा० वामन दाजी ओकांची पुन्हा एकवार तारिफ केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्यांत प्रौढपणा, शोधकपणा, आणि शब्दसौष्ठव हे गुण विशेष असतात.

*
* *

वामनाच्या यमकमय मधुर काव्याचीं ५०० वर पृष्ठें होऊन गेलीं. आतां एखादा भाग संपेल तर फार बरें. सर्वांचीं अंतःकरणें दंग करून सोडणाऱ्या 'राधाभुजंग' काव्यांतील प्रसादाचा रंग कांहीं अपूर्व आहे. पण तें काव्य अद्याप बाहेर पडलें नाहीं. तरी लौकरच सर्व वामनीग्रंथ पहावयास मिळतील. मुक्तेश्वराची वाणी रसाळ. पण आज तीन वर्षांत अवघें आदिपर्वच झालें. तेंही अद्यापि पुरें नाहीं. अशाच प्रकारचीं अठरा पर्वें असतील तर तहाहयात वाचनाची आशा नको. बाकीचे सटरफटर कवि केवळ नांवाचेच दिसतात. असल्या कवींस तूर्त जागा न द्यावी, हेंच बरें. ज्यांत ऱ्हस्वदीर्घाविषयीं आर्षत्व, छंदाची बेपर्वा, शब्दांचें असाह्य, अशा कवितांस, अगोदर श्रेष्ठ कवींचीं काव्यें संपवून, मग आमंत्रण दिलें असतें तर बरें होतें.

*
* *

असो. पण हें सर्व कर्त्यांच्या मर्जीवर आहे. त्याबद्दल त्यांस आह्मी दोष लावतों असें नाहीं. वाटली ती गोष्ट सुचविली, इतकेंच. भागाभागांचा विचार करण्यास आज जागा नाहीं. ह्यास्तव त्याचा विचार मागाहून करण्याचा मनःपूर्वक हेतु आहे येवढेंच येथें दर्शवावयाचें. हें उपयुक्त कार्य निर्णयसागरानें उत्तम

रीतीनें चालविल्याबद्दल व रा० वामनरावजी ओकांनीं त्याविषयीं जी मन:पूर्वक मेहेनत चालविली आहे, तिचें पुनरपि एकवार अभिनंदन करून व त्यांचें व त्यांच्या साह्यकर्त्यांचें परमेश्वरापाशीं क्षेम चिंतून आमचें प्रेम व्यक्त करतों आणि दुसरीकडे वळतों.

*
* *

**'विविधज्ञानविस्तारा'**विषयीं आमच्या लेखांतून अनेक वेळां उल्लेख येऊन गेलाच आहे. तथापि मासिकपुस्तकांची नांवनिशी निघाली, कीं त्यास सन्मान देणें भाग, असाच त्याचा नांवलौकिक आहे. त्याचें शास्त्रीय ज्ञान, विचारशैली, मार्मिकता हीं सर्व श्रेष्ठप्रतीचीं आहेत. त्याच्या अंगांत अनियमितपणा खिळला आहे तरी, नीटनेटकेपणानें त्यानें आज जवळ जवळ दोन तपें काढलीं आहेत. तेव्हां वडीलपणा आणि गुरुत्वही त्याच्याकडेसच आहे. त्यानें बड्या धेंडांची जशी पाट थोपटली आहे, तशी मी मी ह्मणविणारांची कानउघाडणी करून त्यांचा नकशाही उतरला आहे. व तो अगदीं यथार्थ आहे. मग त्यास अग्रेसर ह्मणण्यास हरकत कोणती ?

*
* *

परंतु अलीकडे त्याचा मनु अगदीं बदलून गेलेला पाहून फार दिलगिरी वाटते. मोगऱ्यांच्या पुष्पमाला आतां लुप्त होऊन गेल्या. सुंदर नाटकें व शास्त्रीय विषय अस्तास गेले. स्त्रीशिक्षणाच्या विजयध्वजापासून पुस्तकपरीक्षेस तर फांटाच बसला. रा० गुंजीकरांच्या व पंडितांच्या शोधक, मार्मिक, व चटकदार लेखांचा पत्ता तर नाहींसा होऊन बहुतेक भगवद्भक्तांचीच सत्ता दिसते. ह्यामुळेंच असंबद्ध पत्रव्यवहारास स्थळें मिळूं लागलीं. पूर्वजनकांनीं देशसेवेचा पाया घातल्यामुळें प्रथमापत्याची माया तरी कमी झाली नाहींना ? अशी शंका येते. हल्लीं ' यमुना ' नाटक प्रसिद्ध होतें, त्यांतहीं कांहीं सौरस्य दिसत नाहीं. ह्यास्तव सर्व गोष्टींकडे चालक व पालक या उभयतांनींही लक्ष पुरवावें, येवढी सूचना, मनांतील प्रेमभावास्तव करणें भाग आहे, तिचा राग नसावा.

*
* *

मानसिक श्रमानें श्रांत झालेल्या मनास प्रफुल्लित करणारा **' नाट्यकथार्णव'** तो केवळ आपल्या सत्तेनेंच लोकादरास पात्र झाला आहे. त्यांतील मथुरेचें

आत्मवृत्त तर आमच्या मनास चटकाच लावून गेलें आहे. आमचे मतें अद्यापि तें पुरें झालें नसावें. व तसें असल्यास आमची अत्याग्रहपूर्वक तें पुरें करण्याविषयीं कर्त्यांस विनंती आहे. पुरें झालें असल्यास त्याचें स्वतंत्र पुस्तक बांधून जाहिर करावें. हल्लीं 'त्राटिका नाटक'[1]–शेक्सपिअरच्या Taming of the Shrew या नाटकाचें भाषांतर चालू आहे. ह्या नाटकास 'त्राटिका' ह्मणण्यापेक्षां 'कजाग बायको ताळ्यावर आणणें' अशा अर्थाचें नांव असतें तर अधिक खुललें असतें. अर्णवाचे कर्ते रा० रा० शंकरराव रानडे हे स्वाभाविकच रसिक असल्यामुळें हेंही नाटक फार चित्तवेधक उतरलें आहे.

*
* *

नवा अंक येतो केव्हां आणि पुढील भाग वाचतों केव्हां असें होऊन जातें. समाजरूपी रुक्षप्रदेशांतून प्रवास करणाऱ्यांनीं आरामाच्या वेळीं आपलें चित्तरूपी तारूं ह्या नाट्यकथारत्नाकरांतही ढकलावें. ह्मणजे नानाप्रकारचीं रत्नें अवलोकनांत येऊन जीवास समाधान वाटेल. नाहीं तर ती अनुकरणाची हांव धरणारी अजागलस्तनवत् पेणची '**नाट्यकथामाला**' दिसते न दिसते अशी छपाई; आणि कळतो न कळतो असा मजकूर; जशी काय जोडी; धोंडा आणि कोंडा. रसच जर मुळीं नाहीं, तर कस लावावा कसा? लेखनवाचनाची क्रिया ज्याची पार पडली आहे, त्यानें 'पेन' बगलेस मारून खुशाल मालेंत शिरावें.

*
* *

नांवाप्रमाणें आपलें कर्तव्यकर्म उत्तम बजावणारें '**मनोरंजन** आणि **निबंधचंद्रिका**' ह्यांतील निबंधांनीं प्रौढभाषा, खोल विचार आणि गंभीर प्रतिपादन यांचें शिक्षण मिळतें. कादंबऱ्यांत व्यवहार, साधेपणा आणि नीति पहायास मिळते. ह्यांतील लेखक खरे कादंबरीकार होत. त्यांत सौ० काशीबाई ह्या विदुषी स्त्रियेचा लेख येत असल्यामुळें तें विशेष भूषणभूत झालें आहे. पूर्वीप्रमाणें रजा घेण्याचा प्रसंग त्यास पुनरपि प्राप्त न होवो. येवढेंच परमेश्वरापाशीं मागणें आहे.

*
* *

---

१ हें स्वतंत्र पुस्तक निघाल्याचें ऐकितों.

उमरावतींत प्रसिद्ध होणारा ' **ज्ञानसंग्रह** ' ह्याचें स्वरूप चांगलें असून विषयही बरे असतात. 'सुबोधानंद सरस्वती' यांजकडून प्रसिद्ध होत असलेला 'वेदकालांतील स्त्रियांची स्थिति' हा फार भारदस्त व वाचण्यासारखा आहे. रा० लोंढे ह्यांनीं ' महाराष्ट्र काव्यसंग्रह ' वर दिलेला अभिप्रायही फार योग्य व समर्पक आहे. कोलंबसावरील कविताही बऱ्या आहेत. व इतर विषयही बरेच माहितीचे असतात. ह्या मासिक पुस्तकावर आणखी चांगले परिश्रम होत गेल्यास वरच्या वर्गांत गणण्यासारख्या योग्यतेचें होईल.

(पुढें चालू.)

## मागच्या अंकांतील प्रश्नांचीं उत्तरें.

३ **शेवट**=सर्वांस आहे. शेवट—ट=शेव (खाण्याचा पदार्थ). शेवट—व=शेठ (सावकार). शेवट—शें (१००)=वट (वडाचें झाड).

४ **शेकडा**=१००. शेकडा (१००)—शे (१००)=कडा (कांठ.)

## बुद्धिबळांचा प्रश्न.

### बारिक हिकडून.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उं | | रा | | | | | |
| प्या | | | | व | | | |
| | | | | | | | |
| रा | | प्या | | | | | |
| | | | | | | | |
| | | घो | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |


**जाडा हिकडून.** जाडा प्रथम खेळा; आणि चार डावांत प्यादी करा.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, BOMBAY.

# केरळकोकिळ.

पु० ७ ] [ अं० २.

## रेशमी किडे.



स्वस्थ चित्तानें क्षणभर विचार केला तर, ह्या मनुष्यप्राण्यास किती पदार्थांकडून व किती जीवांकडून सुखसाधनें मिळतात, त्याचा अंत

नाहीं. सूर्य, चंद्र, मेघ इत्यादि खस्थ पदार्थ; हत्ती, उंट, घोडे, गायी, ह्मशी, मेंढरें इत्यादि जनावरें; नारळ, साग, बांबू, बाभळ इत्यादि वृक्ष व वनस्पति; सोनें, रुपें, लोखंड, दगड, माती इत्यादि मृन्मय पदार्थ; हे व ह्यांशिवाय अनंत प्राणी व पदार्थ अनादिकालापासून मनुष्याच्या सुखवृद्धीकरितां तत्पर आहेत. किंवा त्यांजकडून मनुष्य आत्मसुखाची वृद्धि करून घेत आहे. कसेंही ह्मटलें, तरी परमेश्वराची ही कल्याण-कारक योजना पाहून कोणाचें मन थक्क होत नाहीं ?

आपल्या निर्वाहास सुग्रास अन्न; पौष्टिकतेला मिष्ट दूध; प्रवासास गाडी; बसायला वाहन; स्वच्छतेला शेण; शेताला खत; पायांला जोडा; विंचरायला फणी; हातांत धरायला हस्तीदंती किंवा शिंगाची काठी; हीं सर्व जनावरांपासून प्राप्त होतात. खुर्ची, मेज, पलंग, कपाट, दारें, खिडक्या, तुळया, पाट, पाळणा, पोळपाट इत्यादि वस्तु वृक्षांपासून मिळतात. हिंवतापावर 'किनाइन,' हगवणीवर अफू व कापूर, वांतीवर डाळिंबाची साल, पोटदुखीवर ओवा, कपाळदुखीवर सुंठ इत्यादि राम-बाण व दिव्य औषधें वनस्पतीपासून प्राप्त होतात. फार काय सांगावें ? आमच्या राजेरजवाड्यांस श्रीमंतीचीं भूषणेंसुद्धां हलक्या प्राण्यां-पासूनच मिळतात. चवरी वनगायीपासून; मोरचल मोरांपासून; मोत्यें कालवांपासून; आमच्या अलिजा बहाद्दर शिंदे सरकारचा लाखो रुपये किंमतीचा जांभळा एवढ्या मोत्यांचा नांवाजलेला जो मौक्तिकहार तो यःकश्चित् क्षुल्लक कीटकांनीं तयार केलेला आहे ! हें मनांत आलें ह्मणजे मनास किती बरें चमत्कार वाटतो? तसेंच, लग्नकार्यांत सोवळ्यांत झळक-णारे लाल व हिरवे पीतांबर; जांभळे हिरवे कद व पैठण्या; मखमाल, तापता, इत्यादि कापडें हीं सर्व बोटभर किड्यांच्या श्रमानें आपणांस मिळतात, ही गोष्टही कांहीं कमी आश्चर्याची नाहीं. कितीही विण-णारा कोष्टी वाकबगार असो; तो रेशमासारखे बळकट, बारीक व एक-सारखे तंतु विणील काय ? कितीही कुशल शिल्पी असो, रेशमासारखे सतेज व सफाईदार करील काय ? तेव्हां असा जो अप्रतिम विण, व मनमोहक तेजस्विता करणारा ईश्वरनिर्मित कोष्टी, ह्मणजे **रेशमाचा किडा**, त्याविषयीं आणि त्याच्या कृतीविषयीं आपणांस माहिती असणें अत्यंत अगत्याचें काम आहे, असें जाणून संक्षेपतः त्याचें वर्णन करतों.

चिनीलोकांनीं रेशमी कापड प्रचारांत आणलेल्यास २७०० वर्षें होऊन गेलीं. प्रथमतः तेथील एका शहाजादीनें; तुतीच्या झाडांवर रेशमी किड्यानें केलेले कोसले आणून, त्यांचे तंतु काढून, त्यांचें, आपणाकरितां वस्त्र तयार केलें. आणि तेथपासून तेथील बादशाही घराण्यांत तीं च वस्त्रें परिधान करूं लागले. तीं वस्त्रें दिवसेंदिवस सतेज, सफाईदार, व बळकट अशीं निघूं लागल्यामुळें रेशमी वस्त्रें विणण्याचा सर्व चीनदेशभर प्रघात पडला. व हळू हळू ते लोक तीं वस्त्रें परदेशींही रवाना करूं लागले. त्या कालीं रेशमी कापड खरेदी करणें तर त्याच्या भारोंभार सोनें द्यावें लागे. व अन्य देशांतील लोक अजबचीज ह्मणून मोठ्या प्रयासानें एखाद दुसरें रेशमी वस्त्र आणून आपल्या संग्रहीं ठेवीत. ज्या राजापाशीं अशीं एक दोन वस्त्रें असत, त्याची मोठ्या भाग्यशाली पुरुषांत गणना होई. त्या कालीं चिनीलोक रेशीम कसें उत्पन्न करतात, ह्याविषयीं सर्वांसच कोडें पडलें होतें. व ती जिन्नस मिळविण्याविषयीं, किंवा ती कल्पना जाणण्याविषयीं त्या कालच्या मोठमोठ्या राष्ट्रांस अत्युत्कट जिज्ञासा लागून राहिली होती. रोमच्या बादशाहानें तर चीनच्या बादशहास एक मोठें गौरवाचें पत्र लिहून, आपण पाठविलेल्या मनुष्यांस रेशमी कापडाचे कारखाने दाखविण्याविषयीं शिफारस केली होती. पण चिनीलोक प्रथमपासूनच मोठे वस्ताद! होतां होईल तों कोणास अंत लागूं द्यावयाचे नाहींत. चीनच्या बादशहानें रोमच्या ह्या विनंतीस मान दिला खरा. परंतु आलेल्या लोकांचे वेशींतच जे डोळे बांधले, ते कारखान्यांत आल्यावर सोडले! कारखाना तर सर्व दाखविला; पण रेशीम कसें उत्पन्न होतें, ही गोष्ट गुप्त ठेवावयाची ती ठेवलीच. गेलेल्या गृहस्थांनीं तोही प्रश्न काढला होता, पण 'तें रानांत उत्पन्न होतें.' येवढ्यावरच बादशहानें त्यांची बोळवण केली. तेव्हां अर्थातच रोमच्या बादशहानें केलेली येवढी खटपट, जाणाऱ्या गृहस्थांचे इतक्या लांबीच्या पल्ल्यावर प्रवासांत झालेले श्रम, आणि मार्गांतलीं संकटें हीं सर्व व्यर्थ झालीं. आणि त्या योगें चिनीलोकांची हिकमत चांगलीच नजरेस आली.

त्यानंतर पर्शिआच्या बादशहानें प्रयत्न चालविले. त्यानें कांहीं लोकांस मोठमोठा पगार देऊन रेशीम कसें उत्पन्न करतात, ह्याचा शोध आणण्यासाठीं त्यांस चीनदेशांत रवाना केलें. त्यांनीं कैक वर्षें शोध करून

व बैरागी वेषानें सर्व चीनभर फिरून रेशीम हें किड्यांपासून उत्पन्न होतें, येवढा शोध आणला. व तें वर्तमान परत जाऊन बादशहास कळविलें. आणखी असेंही सांगितलें कीं, तेथील बादशहाचा कायदा फार सक्तीचा आहे. परदेशी लोकांस ते सहसा आपल्या देशांत फिरकूं देत नाहींत. व कोणी गेलेंच तर झाडा घेऊन बाहेर सोडतात. रेशमाचा किडा, कीं त्याचा कोसला, किंवा कच्चें रेशीम, ह्यांपैकीं कोणताही पदार्थ ते आपल्या देशाबाहेर जाऊं देत नाहींत. शिवाय, ते किडे येथपर्यंत जीवंत येण्याचीही आशा नकोच." ह्याप्रमाणें ह्या बादशहाचीही ह्या प्रसंगीं निराशा झाली. तरी बादशहाचा तो नाद सुटला नाहीं. त्यानें पुन्हा मोठमोठीं बक्षिसें देण्याचें कबूल करून कांहीं मिशनरी लोक, चीन-देशांत आणखी एकवेळ पाठविण्यास तयार केले. त्यांनीं बैराग्याचे वेषानें तेथें जाऊन रेशमाच्या उत्पन्नाची सर्व कृति ध्यानांत घेतली. तेव्हां त्यांस आढळून आलें कीं, रेशमाचे किडे तर परदेशांत जाणार नाहींतच, पण त्यांचीं अंडीं तेथें नेतां येतील. असा विचार करून इ० स० ५५२ मध्यें त्यांनीं तीं अंडीं फार गुप्तपणें, पोकळ काठ्या करून त्यांत घातलीं, आणि विजयी होत्साते ते स्वदेशास परत आले. बाद-शहानेंही त्यांचा मोठा सन्मान केला. नंतर तुतीच्या बागा तयार क-रून हंगाम येतांच, तीं अंडीं फोडलीं. व त्यांतील किड्यांची यथातथ्य संजगणा करून रेशीम पैदा केलें. पुढें थोड्याच दिवसांत कान्स्टांटि-नोपल मध्येंही राजकीय नात्यानें बरेच रेशमाचे कारखाने उभारले गेले; त्यांत मुबलक पैसा मिळाला. कारण त्या वेळीं एक औंस कच्च्या रेशमाला १६ मोहोरा किंमत येत असे! नंतर सहाशें वर्षांनीं ग्रीस दे-शभर व बहुतेक यूरोपखंडांतही रेशमाचे कारखाने पसरले.

पर्जन्यकाळांत कण्हेरीच्या वगैरे झाडांवर पोपटी रंगाचा, मणक्या मणक्याचा, मागच्या शेवटास एक अणकुचीदार कांटा असलेला, दुल-दुलीत किडा पानें खातांना कधीं कधीं आपल्या पहाण्यांत येतो. हीच रेशमी किड्याची जात होय. वर दिलेल्या चित्रामध्यें जो मोठा लांब किडा काढलेला आहे, त्यावरून त्याच्या आकाराची चांगली कल्पना होईल. रेशमी किडे अंड्यापासून उत्पन्न होतात. ह्या किड्याचीं दोन तीन निरनिराळीं रूपांतरें होऊन शेवटीं त्याचें एक फुलपांखरू होतें. व

तें पांखरूं उन्हाळ्यामध्यें पुढील वर्षाकरितां अंडीं घालून ठेवून मग मरण पावतें. वरील चित्रांत वरच्या बाजूस लहान फुलपांखरूं आहे तें हेंच. अंडीं मोहरीपेक्षांही लहान असून थोडीं चपटीं, व मध्यावर एक लहानशी खळगी असते. अंडीं प्रथमतः पिंवळ्या रंगाचीं असतात. पण थोड्याच दिवसांनीं त्यांवर निळ्या रंगाची झांक मारते. तुतीचीं पानें हा ह्या किड्यांचा भक्ष्य आहे. ह्यास्तव त्यांस पालवी फुटेपर्यंत तीं अंडीं न फोडतां उबेंत जतन करून ठेवावीं लागतात.

रेशमी किड्यांचा मुख्य भक्ष्य जरी तुतीचीं पानें आहे तरी, एरंड वगैरे दुसऱ्याही कित्येक झाडांच्या पाल्यांवर ते जगतात, परंतु त्यापासून निघालेलें रेशीम चांगलें नसतें. तुतीचीं पानें ह्या किड्यांशिवाय दुसरा कोणताही प्राणी खात नाहीं. हा मोठा चमत्कार होय. चीनदेशांतील जंगलामध्यें आपोआप उगवलेलीं जीं तुतीचीं झाडें असतात, त्यांवर रेशमाचे किडे आपोआपच उत्पन्न होतात. त्यांचें कात टाकणें, रूपांतर होणें वगैरे गोष्टी आपोआपच घडतात. त्यावर मनुष्याची देखरेख मुळींच असत नाहीं. रेशमाचे कोसले तयार झाले ह्मणजे कोणीही गोळा करून घेऊन येतात. अन्य देशांत तसें होत नाहीं. मनुष्याची उत्तम देखरेख असल्याशिवाय तेथील जोपासना होत नाहीं. शिवाय पांखरांनीं त्यांस खाऊं नये ह्मणून डोळ्यांत तेल घालून त्यांस जपावें लागतें. तुतीचीं झाडें लहानसर असून तीं एशिया व यूरोप ह्या दोन्ही खंडांत होतात. तुतीच्या झाडांस जीं फळें येतात, त्यांस 'तुतें' असें ह्मणतात, व तीं खाण्यास रुचिकर लागतात. पानें गुळगुळीत आणि तेजस्वी असून त्यांची रुंदी सहा इंचांपासून नऊ इंचांपर्यंत असते. बुडाशीं त्यांचा आकार कांहींसा पिंपळाच्या पानांसारखा असून सभोंवार बारिक बारिक कातऱ्या असतात. वरील चित्रांत पानाचा आकार स्पष्ट दाखविलाच आहे. यांपैकीं ज्या झाडांस पांढरीं फळें येतात, त्यांस पांढरी तुती ह्मणतात. रेशमी किड्यांस पांढरे तुतीचें झाड फारच हितावह आहे. हें झाड लौकर वाढतें, आणि त्यास पानेंही विपुल येतात. शिवाय ह्याच्यावरील कोसल्याचें रेशीम फारच सफ़ाईदार व तेजस्वी असतें. तुतीचें झाड बीं पेरून, खांदा कापून किंवा कलम करूनही तयार होतें. हें झाड चांगलें पोसलें, तर साधारणपणें एका झाडाचीं एका पावसाळ्यांत सुमारें

३० पौंड पानें निघतात. झाड चांगलें थोर असलें, तर ह्याच्यां चार चार पांच पांच पटही निघतात. हीं पानें वाळवून त्यांची पूड करून ठेवली, व तीं पाण्यांत कालवून नूतन जन्मलेल्या किड्यांस घातली, तर ते खातात.

पावसाळा लागण्याच्या सुमारास रेशमी किड्यांचीं अंडीं फुटतात; किंवा फोडावीं लागतात. अंडें फोडलें ह्मणजे त्यांतून काळ्या रंगाचा सुमारें पाव इंच लांबीचा आळीसारखा किडा बाहेर पडतो, व लागलाच भक्ष्याच्या शोधार्थ चालूं लागतो. हीं अंडीं एखाद्या उथळ भांड्यांत फोडलीं, तर फार मौज दृष्टीस पडते. ह्मणजे ते किडे उपजतांच खाण्यासाठीं इतके हापापलेले असतात, कीं ते सर्व पात्रभर हिकडून तिकडे आणि तिकडून इकडे पळत सुटतात. मग एक तुतीच्या पानाचा तुकडा आणून मध्यभागीं ठेवावा, ह्मणजे झटकन् त्याच्या वासानें सारे किडे त्या पानापाशीं जमतात. ह्यांपैकीं एखादा किडा नाहींसा झाला, तर पुष्कळ नुकसान होतें हें सांगणें नकोच. जन्मल्यापासून आठ दिवस हा आपलें खाणें खातो. नंतर त्यास पहिली कात टाकण्याची व्याधि उत्पन्न होते. त्याचा प्रकार खालच्या लेखावरून चांगला लक्षांत येईल.

रेशमी किडा इतका जलद वाढतो, व पहिल्या आठ दिवसांतच त्याचें मांस इतकें वाढतें कीं तें राहण्यास त्याच्यावरची चामडी लहान होते! ह्या चामडीच्या संकोचानें त्यास विशेष दुःख होत नाहीं तरी, फार अडचण होऊं लागते. असें झालें ह्मणजे तो तीन दिवसपर्यंत कांहींएक न खातां पुढील अंग किंचित् उभारून स्वस्थ राहतो. त्या योगानें त्याचें शरीर बरेंच झडतें, आणि कातडी टाकण्यास सोपें जातें. ह्याशिवाय ह्या किड्याच्या अंगावर एक प्रकारचा चिकट मळ असतो, तोही त्या कामास उपयोगी पडतो. हा मळ जुनी कातडी आणि नवी येणारी कातडी ह्यांच्यामध्यें असतो. ही कातडी—कात—टाकण्याला, त्या प्राण्यास पुष्कळच खटपट पडते. प्रथमतः तो आपल्या मस्तकावरचें चामडें पानांच्या शिरांस आपलें मस्तक घांसून घांसून काढून टाकतो. नंतर मस्तकाच्या अगदीं जवळची मानेवरची कातडी घांसून फाडतो. ती फाडण्यास त्यास पुष्कळ श्रम पडतात. अशा रीतीनें मस्तक व

पुढील दोन पाय मोकळे करतो. मग तोंडांतून रेशमाचे कांहीं धागे काढून मान हालवून हालवून ते मागील शरीराच्या सभोंवतीं पानांबरोबर किंवा डहाळीबरोबर गच्च आवळून टाकतो. आणि मग आपलें शरीर युक्तीनेंच हळू हळू बाहेर काढून घेतो. ह्मणजे पहिलें कातडें तसेंच चिकटून खालीं राहतें. व सापानें कात टाकल्याप्रमाणें किडा पुन्हा नव्या कातडीचा होतो. इतकें कृत्य आटपेपर्यंत तो किडा अगदीं बेजार होऊन निखालस थकून जातो. पुन्हा कामाला लागण्याइतका अंगांत दम येईपर्यंत स्वस्थ पडून राहतो. ह्या अवस्थेंत किड्याच्या सर्व अंगावरचें पहिलें कवच निघून जातें. ह्मणजे पायांवरचें आच्छादन, जाभाडावरचें आच्छादन, दांतांवरचें आच्छादन, इत्यादि सर्व निघून जातात. पण कधीं कधीं जुन्या चामडीचा कांहीं भाग त्याच्या शरीरास तसाच चिकटलेला राहतो, सुटतच नाहीं. त्याचा परिणाम असा होतो कीं, किडा भक्ष्य खाऊं लागला ह्मणजे तो जोरानें वाढूं लागतो. आणि जुनी राहिलेली चामडी त्याच्या वाढीस प्रतिबंध करूं लागते. असें झालें ह्मणजे त्यास मनस्वी दुःख होऊन तो मरतो!

कात टाकलेले किडे त्यांच्या फिक्या रंगावरून आणि चामडीच्या नाजूकपणावरून ओळखतां येतात. त्वचा टाकल्यानंतर लौकरच ते माजतात, व त्यांस कुंवत येते. फार दिवस उपास पडले असल्यामुळें ते अधाशासारखें खात सुटतात. पांच दिवसांमध्यें तो इतका लठ्ठ होतो कीं, त्याच्या त्या मणक्याच्या खोबणी वगैरे बुजून जाऊन सुमारें अर्धा इंच लांबीचा एकच सळनळीत गोळा बनतो. असें झालें ह्मणजे पुन्हा त्याची त्वचा लहान होऊं लागून तो आजारी होतो. आणि पूर्वींप्रमाणेंच दुसऱ्या खेपेस कात टाकून पुन्हा पांच दिवस खातो. इतक्यांत त्याची लांबी पाउण इंच होते. तों तिसऱ्या खेपेचा कात टाकण्याचा आजार सुरू होतो, आणि पहिल्याप्रमाणें पुन्हा कात टाकून तो मोकळा होतो. पुन्हा पांच दिवस खाणें खातो आणि चवथ्या वेळ कात टाकून मग तो पूर्णदशेचा घुला होतो. ह्या वेळीं त्याची लांबी दीडपासून दोन इंच असते. मग तो पुन्हा खूप खाणें खातो आणि दहा दिवसांत भला लठ्ठ होतो, त्यास बारा कंगोरे किंवा मणके पडतात. हे मणके चालतांना त्यास आखूड किंवा लांब करतां येतात.

त्यास पायांच्या आठ जोड्या असतात. पुढच्या बाजूस पहिल्या तीन मणक्यांखालीं तीन जोड्या असतात, व त्यांवर एक कवचासारखें आच्छादन असतें. मागच्या बाजूस पांच जोड्या असतात, त्यांस 'पकडी' ह्मणतात. ह्या पायांच्या जोड्या फार भक्कम आणि लवचीक अशा असून त्यांस एक बारीक नखी असते. ती चढतांना त्यास उपयोगी पडते. पुढील पायांवर असल्याप्रमाणेंच मस्तकावरही एक खवल्याचें आच्छादन असतें. दाढा फार मजबूत असून त्यांस कर्वतीप्रमाणें दातऱ्या असतात. जबड्याच्या खालच्या बाजूस दोन लहान लहान द्वारें असतात; त्यांतून हा प्राणी रेशमाचे धागे बाहेर काढतो. सुंदर पिंवळ्या रंगाचा पारदर्शक चीक असतो, त्यापासून रेशीम होतें. ह्या प्राण्याच्या पक्वाशयांत दोन गुप्त चिंचोळीं पुडें असतात, त्यांत हा चीक भरलेला असतो. व तेथेंच एक चाती असते, तिजवर त्याचा धागा निघून गुंडाळत असतो. ह्या चातीचा धागा सोडून पाहील तर दहा इंच लांब भरेल. रेशमी किडा अठरा द्वारांनीं श्वासोच्छ्वास करतो. हीं द्वारें प्रत्येक बाजूस नऊ नऊ ह्याप्रमाणें सर्व शरीरभर असतात! मस्तकावर बाजूबाजूनें सात डोळे असतात! मस्तकाच्या वरच्या बाजूस दोन टिपके असतात, व पाहणारास ते डोळेच असावेत असें वाटतें. पण ती चूक आहे. ते फक्त मस्तकाच्या कवटीचे भाग आहेत.

रेशमी किडा पानें न खातां पानावर बसूं लागला, कांहीं हुंगल्याप्रमाणें करून वारंवार डोकें हलवूं लागला, इकडे तिकडे हिंडून आपल्याच सभोंवतीं फिरूं लागला, त्याचे मणके संकुचित होऊं लागले, त्याचा हिरवट रंग जाऊन सोनेरी रंग दिसूं लागला, त्याच्या मानेवरच्या चामडीस सुरकत्या पडूं लागल्या, सर्व शरीर भिजलेल्या कणकीप्रमाणें मऊ लागूं लागलें, आणि तो हातांत घेऊन पाहिला तर, बेदाण्याप्रमाणें पारदर्शक दिसूं लागला, ह्मणजे त्यास तारुण्यावस्था प्राप्त झाली ह्मणून समजावें.

तारुण्यावस्था प्राप्त झाली ह्मणजे जिच्या भोंवतीं आपणास रेशमाचे धागे गुंडाळून कोसला तयार करतां येईल अशी एखादी पोकळ जागा किंवा कोपरा हुडकून काढतो. आणि मग वर सांगितलेल्या तोंडापुढील

द्वारांतून रेशमाचा धागा काढून घरटें—किंवा कोसला—विणण्यास प्रारंभ करतो. हा विणूं लागला ह्मणजे प्रथमतः त्याचा आकार कांहींसा लांबट होतो. वर दिलेल्या चित्रांतील दोन मोठ्या किड्यांपैकीं खालच्या अंगच्या किड्याकडे पाहिलें ह्मणजे ही गोष्ट लक्षांत येईल. पहिल्या दिवशीं त्याच्या भोंवतीं भरड रेशमाचें ढिलेंसें घरटें तयार होतें. दुसऱ्या दिवसापासून धागे गुंडाळून गुंडाळून व नवे धागे त्यास जोडून तो तें घट्ट करतो. ह्याप्रमाणें कठीण पिंवळ्या रंगाचा कोसला होऊन त्यांत तो किडा राहतो.. ह्या कृत्यांत त्याच्या पुढील अंगाचा फारसा बदल होत नाहीं. पण पुढें पुढें तो दररोज रेशमाचे नवे तंतू काढून आणि ते पहिल्यास जोडून तें इतकें दाट विणतो कीं, त्याचें सर्व शरीर त्यांत अगदीं गुरफटून जातें. इतकें झालें तरी त्याचें धागे काढून गुरफटण्याचें काम चालूच असतें. तो एखाद्या भिंगरीप्रमाणें आपलें मस्तक गुर गुर गुर फिरवितो, आणि भराभर कोसला विणीत सुटतो. ही त्याची विणण्याची चपलता फारच पाहण्यासारखी असते. कोसला जसजसा घट्ट होत जातो, तसतसा किड्याचा आकार संकुचित होऊन तो त्यांत दबला जातो. तरी त्याचें गुरफटून घेण्याचें काम सपाट्यानें चाललेंच असतें. ह्यामुळें शेवटीं शेवटीं तर त्याच्या सर्व देहाचा केवळ लहानसा आंकडा बनून त्या कोसल्यांत गुरफटून राहतो. वरच्या चित्रांत खालीं डाव्या बाजूस लहानशा शंखासारखी आकृति दिसते ती ह्याच स्थितीची दर्शक होय. असें झालें ह्मणजे रेशमी किड्यास कोशस्थिति प्राप्त झाली असें ह्मणतात.

त्या प्राण्यास कोसल्याचा उपयोग ह्मटला तर, ऊब राहावी, थंडी वाऱ्याची बाधा न व्हावी, शत्रूपासून संरक्षण व्हावें, आणि शेवटच्या रूपांतरास सुरक्षित स्थळ व्हावें हा होय. ह्या कोसल्यांत पाणी वगैरे शिरूं नये ह्मणून आंतील बाजूस पातळ रसाचा चिकटा लावलेला असतो. आणि ज्या तंतूंचा कोसला केलेला असतो, ते तंतूही त्याच चिकानें माखलेले असतात. पण थोडे दिवस गेल्यावर हवेनें तो चिकटा सुकून जातो.

किडा, कोसला विणीत असतांना कांहीं खात नाहीं. आणि रेशीम गुंडाळून गुंडाळून त्याचें शरीर इतकें आकुंचित होतें कीं, त्याची लांबी

पहिल्याच्या अर्ध्यानेंही राहत नाहीं. विणण्याचें काम संपलें, ह्मणजे तो स्वस्थ बसून विश्रांति घेतो. आणि पुन्हा एकवेळ कात टाकतो. परंतु मग तो त्या किड्याच्या—घुल्याच्या—स्थितींत फार दिवस राहत नाहीं. तर त्यास आकुंचित अशी कोशस्थिति प्राप्त होते. त्याची चामडी गुळगुळीत व पिंगट रंगाची होऊन त्यास एक टोंक दिसूं लागतें. वरील चित्रांत खालच्या बाजूस लहान शंखासारखी जी आकृति दिसत आहे, तीच त्याची कोशस्थिति होय. हें वर सांगितलेंच आहे.

हवेच्या मानाप्रमाणें तो १९ पासून २० दिवसपर्यंत कोशस्थितींत राहतो. नंतर त्याचें रूपांतर होऊन फुलपांखरूं होतें. हीं दोन पांखरें वरील चित्रांत दाखविलींच आहेत. पंख फुटून फुलपांखरूं बनलें, ह्मणजे तें कोसला सोडून बाहेर येण्यास योग्य होतें. प्रथमतः तें, एक प्रकारचा रुचिहीन रस तोंडांतून काढून कोसल्याच्या आंतील अंगास माखून टाकतें. येणेंकरून आंतील सुकलेला चिकटा ओला होतो, आणि चिकटलेलें रेशीम सुटें होतें. इतकें झाल्यावर तें पांखरूं आपल्या मस्तकाच्या आणि पायांच्या नखीच्या हिसक्यानें आपल्या भोंवतालचा कोसला ढिला करतें. आणि मग तंतू बाजूस सारून बाहेर येतें. पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, हें पांखरूं बाहेर येतें तें कोसला कुरतडून बाहेर येतें, आणि रेशमाचे धागे तुटून त्याचा नाश होतो. ह्या भयानेंच तें पांखरूं बाहेर येण्याच्या पूर्वींच कोसले गोळा करून, ते आधण आलेल्या पाण्यांत टाकतात. ह्या अशा निरर्थक चालीनें निष्कारण असंख्य जीवांचा नाश होतो! ह्या जातीच्या पांखरांना अगोदर दांत नसतात. ह्यामुळें वरची भीति बाळगण्याचें कारण नसतें. कोसला जर काळजीपूर्वक सोडला, तर पांखरूं बाहेर आल्यावर सुद्धां सर्व रेशीम अखंड सांपडेल. पांखरूं कोसल्यांतून बाहेर आल्यानंतर फार दिवस जगत नाहीं. दोन तीन दिवसांच्या आंतच तें मरतें. मादी तर अंडीं घालतांच प्राण सोडते; नर मागें असतो, पण तोही थोड्याच दिवसांनीं नाश पावतो.

रेशमी किड्यांच्या वाढीची गति कांहीं आठवड्यांत तर फारच विलक्षण असते. तिच्याविषयीं एका शोधक गृहस्थानें प्रमाण काढलें आहे. त्यावरून बरीच कल्पना होईल. तो ह्मणतोः—रेशमी कि-

ड्यांच्या ६८ अंड्यांचें वजन एक ग्रेन असतें. ह्यावरून एका औंसांत ३२१६८ अंडीं भरतील. कारण ५७६ ग्रेन ह्मणजे एक औंस. त्यांत अंडीं फोडण्यापूर्वीं वजनाची तूट ह्मणून ४८ ग्रेन वजा घातले. व ११५ ग्रेन वरचें कवच धरलें. ह्मणजे फोडतांना ३९१६८ किड्यांचें वजन ४१३ ग्रेन झालें. आणि ह्या हिशेबावरून जन्मतःच रेशमी किडे एका औंसांत ५४५२६ भरतात असें झालें. पहिली कात टाकल्यानंतर ३८४० किड्यांचें वजन एक औंस भरतें; आणि थोड्याच दिवसांत त्यांचें वजन १४ पटी पेक्षांही अधिक होतें. दुसरी कात टाकल्यानंतर एका औंसांत ६१० किडे भरतात. ह्मणजे पहिल्या आणि दुसऱ्या रूपांतराच्या दरम्यान तें सहा पट वाढतें. दुसऱ्या आणि तिसऱ्या रूपांतराच्या मधील आठवड्यांत तें चाडुपल पेक्षांही अधिक भरतें. ह्मणजे एका औंसांत फक्त १४४ च किडे भरतात. चवथ्या स्थितींतही तो याच मानानें वाढतो. आणि त्या वेळीं एका औंसांत ३५ चें मान असतें. पांचव्या रूपांतरांत किड्याचें शरीर आकुंचित होऊन मूळ स्वरूपाच्या सुमारें एकतृतीयांश राहतें. त्यामध्येंही झट्कन आकार वाढतो. त्याच्या पोटांत रेशमाच्या चिकाचा गुप्त सांठा असतो. व तो तें लागलेंच आपल्या भोंवतीं गुंडाळूं लागतो. पूर्ण वाढ झाली ह्मणजे ते पुन्हा सहापट वजनांत अधिक होतात; ह्मणजे ते एका औंसांत सहाच भरतात. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, थोड्या आठवड्यांत रेशमाचा किडा मूळ वजनाच्या ९००० पटी पेक्षांही अधिकच वाढतो!

हिंदुस्थानांतही रेशमी किडे पुष्कळ आहेत. जंगली किड्यांपासून झालेले कच्या रेशमाचे कोसले, बंगलोरच्या बाजारांतही पुष्कळ विकावयास आलेले दृष्टीस पडतात. पण तें रेशीम इतकें उत्तम नसतें. बंगाल्यामध्यें रेशमी किडे पुष्कळ होतात. त्यांत मुख्य दोन जाती आहेत. १ टुशी आणि २ अरिंदी. हे किडे बोर, अंजिर व एरंड ह्यांच्या पानांवरही पोसतात. परंतु त्यापासून निघणारें रेशीम खरबरीत आणि काळसर असें असतें. ह्या रेशमाचें वस्त्र स्वस्तें असून मजबूत असतें. ह्या किड्यांना दिवसा पक्षी, आणि रात्रौ पाकोळ्या खाण्यासाठीं टपलेल्या असतात. ह्यास्तव त्यांजवर सक्त पाहरा ठेवावा लागतो.

सरासरीच्या मानानें १०० अंड्यांपासून ७० कोसले तयार होतात. किड्यांतही दोन जाति आहेत. पांढरे किडे असतात, ते तांबडें रेशीम विणतात. आणि दुसरे किडे पांढरें रेशीम विणतात. कोसल्याचा धागा नीट सोडवितां आला नाहीं, तर त्याचा पिंजून कापूस करतात, आणि पुन्हा दोरा काढतात. पण हे दोरे फार जाड होतात. बंगाल्यांतील किडे नोवेंबरमध्यें आपले कोसले बांधतात. 'निस्ट्री' ह्मणून एक जात आहे; ह्या जातीचे किडे बाराही महिने कोसले बांधतात. परंतु त्यांत उन्हाळ्यांत तयार केलेले कोसले चांगले असतात.

एक पौंड रेशीम निघावयास आपल्या देशांतील कोसले १०५०० लागतात. 'निस्ट्री' जातीचे कोसले १०००० लागतात. व फ्रेंच लोकांनीं शास्त्रीय रीतीनें जोपासना करून रेशमी किड्यांची एक जात वाढविलेली आहे, तिचे कोसले २५०० लागतात. एक औंस अंड्यांपासून सुमारें १४·० पौंड रेशीम पैदा होतें. नराच्या कोसल्यांत आणि मादीच्या कोसल्यांत बराच फरक असतो. नराचा कोसला आकारानें लहान, एक किंवा दोन बाजूंस अधिक अणकुचीदार आणि मध्यें किंचित् दाबलेला असतो. मादीचा कोसला वाटोळा गरगरीत, भरगच्च, असून त्यास बांक वगैरे कांहींएक नसतो. नरापेक्षां मादीचा कोसला वजनांत दुप्पट भरतो.

एक पौंडांत २०० किंवा २५० कोसले भरतात; आणि ११ किंवा १२ पौंड कोसल्यांचें वळीव रेशीम एक पौंड होतें. ह्मणजे एक पौंड रेशमाला सरासरी २८१७ कोसले पडतात. हे सर्व प्राणी पूर्वापार चालत आलेल्या वेड्या समजुतीनें मारतात, ह्मणून वर सांगितलेंच आहे. ह्मणजे आपण लग्नकार्यांत जो पवित्र ह्मणून झांकीदार पितांबर नेसतों, तो २००० प्राण्यांचा संहार होऊन सोवळा बनलेला असतो ! !

एका कोसल्याच्या रेशमी धाग्याची लांबी सुमारें ३०० यार्ड लांब असते. परंतु कांहीं कोसल्यांचा धागा याच्या दुप्पटही लांब भरतो. चीनदेशांत चांगल्या पोसलेल्या किड्याच्या कोसल्याचा धागा १.१५४ यार्ड भरतो ! ह्मणजे जवळ जवळ एक मैल झाला ! ! असो. रेशमी किड्याचा आकार, त्याच्या आंतील रचना, त्याचा अप्रतिम धागा, त्याचीं विलक्षण रूपांतरें, आणि त्याचा मनुष्यमात्रास उपयोग हीं मनांत आणलीं ह्मणजे

त्या विश्व निर्माणकर्त्या परमेश्वराची केवढी धन्यता मनांत येते बरें? ह्यास्तव त्याशीं निरंतर कृतज्ञ असणें हाच आपला धर्म होय.

# एका नाटक्याचा पश्चात्ताप.

## श्लोक.

खोटा खोटा सकल जनहो छंद हा नाटकाचा
नाहीं ऐसा प्रखर जगतीं हातही खाटकाचा ॥
सर्वस्वाला मनुज मुकतो-होतसे तोंड काळें
जन्मांतूनी उठुनि पडती दुःखशोकांत बाळें ॥ १ ॥
आला आला अनुभव मला मित्रहो पूर्ण आला
झाला झाला हर हर पहा थोरहो घात झाला ॥
देवा देवा निवळ फसलों ऐकुनी गोड थापा
कैसा आलों पळुनि हिकडे सोडुनी मायबापा ॥ २ ॥
हातीं आल्या फुकट तिकिटा जाहलें तेंचि मूळ
मच्चित्ताला भुरळ पडली लागलें शुद्ध खूळ ॥
शृंगाराचीं अठवुनि पदें गुंगलों गायनांत
त्यावांचूनी इतर न सुचे कामधंदा मनांत ॥ ३ ॥
माती मोलें अहह विकिलीं पुस्तकें चट्ट सारीं
म्यां मूर्खानें परि चुकविली नाटकाची न वारी ॥
खुंटोनीयां मजल दुसऱ्या लागलों मी उपाया
अन्याचेही हळु हळु खिसे लागलों चांचपाया ॥ ४ ॥
केव्हां येते प्रियकर निशा ती शनीची बुधाची
वाटे धन्य त्रिभुवन मला मृत्युलोकीं सुधाची ॥
शृंगाराचे अभिनय नवे पाहुनी हास्यमंद
चेष्टांना त्या भुलुनि पडलों लागला तोचि छंद ॥ ५ ॥
रात्रीं जागें निजुनि दिवसा गाय बीभत्स गाणीं
विद्याभ्यासीं सहज पडलें दुष्कृतीनेंच पाणी ॥
पाहोनीयां भडक लुगडीं दागिने मोठमोठे
घ्यावें ऐसें दृढतर मना एकदां सोंग वाटे ॥ ६ ॥

होता जेथें वसत सगळा नाटक्यांचा समाज
गेलों तेथें समय बघुनी सोडिली सर्व लाज ॥
वर्णे गोरा तनुहि बरवी देखणा बुद्धिमान
ऐशा मातें बघुनि भुलले देति ते थोर मान ॥ ७ ॥
येथें जेवा ह्मणति सगळे आग्रहें फार आजी
मोठें झालें कुतुहल मना जाहलों त्यास राजी ॥
भाजी ताजी उनउन भजीं जेविलों मिष्ट–अन्न
खेळालाही फुकट बसलों जाहलों सुप्रसन्न ॥ ८ ॥
पोरांमाजीं हृदय रमलें जाहला तेथ वास
धाकें धाकें गपुनि लपुनि काढिले मासमास ॥
मार्यापाशें जनकजननी धुंडितां श्रांत झालीं
तत्प्रेमाची अहह करुणा लेश मातें न आली ॥ ९ ॥
हौसेनें मी प्रथम नटलों वेष जेव्हां नटीचा
शालू मोठा पदर जरिचा भाजपट्टा कटीचा ॥
कंठीं मोत्यें खचुनि भरलीं भूषणें सर्व खोटीं
जातां रंगीं ठुमकत मला वाटली धन्य मोठी ॥ १० ॥
तोंडाला मी बघुनि अरशी लावला रंग गोरा
मृत्केशांचा शिरिं बसविला टोप बांधून दोरा ॥
गाली लाली सुबक टिकली भोंवया नीट काळ्या
हर्षे नाकीं नथ डसविली घातल्या काप बाळ्या ॥ ११ ॥
नाचायाला झटुनि शिकलों बांधले चाळ पायीं
कौशल्यानें बहु रमविले लोक नाना उपायीं ॥
झोंकामध्यें नथ उडविली मोडिले काय डोळे
प्रौढीसाठीं उर सजविला घालुनी वट्ट बोळे ॥ १२ ॥
आधीं होतें उपजत मला कंठमाधुर्य फार
पाहोनीयां सकल नखरा मंडळी होय गार ॥
मोठा झालों प्रतिदिनिं मिशा काढण्याचा प्रसंग
सांगूं ऐसे किति तरि तुह्मां एक ना दोन ढंग ॥ १३ ॥
आधीं लागे सवय विडिची मागुनी गुर्गुडीची
केव्हां केव्हां चिमटहि मिळे तीव्र नासापुडीची ॥

तंबाकूतें फुकुनि फुकुनि भाजलें सर्व टाळें
धूम्राची त्या धरुनि मळभी जाहले ओंठ काळे ॥ १४ ॥
गातांना जैं लहर चढवीं प्रेक्षकांच्या समोर
हर्षें टाळ्या पिट्टुनि अवघे गर्जती "वन्समोर" ॥
दुष्कीर्तीनें फुकट फुगलों मांडलें कर्म खोटें
चित्तभ्रंशें मजशि उरला स्वर्गही तीन बोटें ॥ १५ ॥
कोणी देती वसन करिंचें अत्तरें पुष्पगुच्छ
तेणें झालें मजशि जनहो स्वर्गीचें सौख्य तुच्छ ॥
पेला पेला उनउन चहा जेवणाला चपाती
जन्माची, त्या हरहर मिषें जाहली सर्व माती ॥ १६ ॥
झालों ऐसा हळु हळु पुढें मी सुरापानभक्त
छाती गेली जळुन सगळी आटलें सर्व रक्त ॥
गात्रें झालीं शिथिल अवघीं रोडले हातपाय
अंगें झालों जरठ फुटला कंठ खुंटे उपाय ॥ १७ ॥
निस्तेजानें मुख कलशसें दोन गालास खांडे
येतां रंगीं ह्मणति 'हिजडा' काय हीं शुद्ध हाडें ॥
गाऊं जातां कटुरव निघे दुंदुभी शब्दशोक
टाळ्या देती हुरुरु करुनी हांसती सर्व लोक ॥ १८ ॥
खेळाला तैं शपत अमुच्या पांखरूं ये न एक
पैसा नाहीं जवळ कवडी थोर झाला विवेक ॥
दुःसंगानें व्यसनिं पडलों नेत्र जैसा गुलाल
पैशासाठीं घडिघडि अह्मां नेट लावी कलाल ॥ १९ ॥
छीथू झाली वदन सुकलें तेधवां मालकाचें
कुत्राही तैं सहन करिना हाल हो बालकांचे ॥
पोटा नाहीं सुकट तुकडा कोठची तूपपोळी
कांहीं पोरें नगर फिरलीं घेउनी शुद्ध झोळी ॥ २० ॥
माजे मोठा कलह फुटुनी एकमेकांत फांटे
गेले रात्रीं हळुच पळुनी एक एकेक वाटे ॥
मीही झालों विमल हृदयीं खाउनी शेणगोळे
आतां सारा भ्रम उतरला वांसले स्वच्छ डोळे ॥ २१ ॥

खोटीं मोत्यें विटुनि फुटलीं टोप तारामतीचा
केला गांठीं मुगुट नकली माल हा दौलतीचा ॥
इष्की चैनी हलकट पदें आणिलीं म्यां घराशीं
दारू गांजा व्यसनपटुता जोडिली पापराशी ॥ २२ ॥
गेला विद्यासमय निघुनी थोर दुष्कीर्ति आली
जन्माची ह्या व्यसन जडुनी केवढी घाण झाली ॥
दुष्कृत्यानें जननिजनका केवढा वीट आला
पश्चात्तापें रडुनि रडुनी अंतरीं बोध झाला ॥ २३ ॥
मेल्या मागें अमृत मिळुनी कोणता लाभ मोठा
झालें गेलें घडुन चुकलें रेखिलें जें ललाटा ॥
मी तों वेडा तळमळ करीं नाहिंहो देहभान
मन्मित्रांनो तुह्मि तरि असा ऐकुनी सावधान ॥ २४ ॥

---

## श्वासोच्छ्वास.

नाकावाटे किंवा तोंडावाटे जी हवा आपण आंत घेतों, तीस श्वास असें ह्मणतात. व जी हवा बाहेर सोडतों, तीस उच्छ्वास असें ह्मणतात. मिळून ह्या दोन्ही क्रियांस श्वासोच्छ्वास हें नांव आहे. जी हवा आपण आंत घेतों, ती एक प्रकारची असते; व बाहेर टाकतों ती दुसऱ्या प्रकारची ह्मणजे भिन्न असते. दोहोंचेही घटकावयव अगदीं निरनिराळ्या प्रकारचे असतात, आणि त्यांचे परिणामही अगदीं भिन्न असतात. जी हवा आपण बाहेर टाकतों, तीच हवा आंत घेतां कामा नये.

आंत घेतों त्या हवेपेक्षां, बाहेर टाकतों ती हवा, अगदीं भिन्न असते, हें अनेक प्रकारांनीं सिद्ध होतें. उदाहरणार्थ—मूल निजलें असतां त्याच्या तोंडावरून जाड पांघरूण लपेटण्याची वहिवाट ठेवली, तर त्याच्या उच्छ्वासानें बाहेर पडलेली हवा पुन्हा पुन्हा श्वासांत शिरून, खचीत तें मूल फिकट, अशक्त आणि रोगग्रस्त असें होईल. जीं मुलें चांगलीं सशक्त असत, तींच तोंडावरून पांघरूण घालण्याच्या वहिवाटीनें रोगी झालेलीं, व ती चाल बंद केल्यावर बरीं झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें डाक्टर लोकांस आढळून आलीं आहेत.

दुसरी गोष्ट तर अगदीं प्रचारांतली आहे. आपण जर एखाद्या गर्दीच्या जागेंत असलों, तेथें मोठी शेगडी व पुष्कळ दिवे असले, आणि त्या जाग्यांतील सर्व खिडक्या, दारें, गच्च बंद करून टाकलेलीं असलीं, तर आपणांस किती बरें गुदमरल्या सारखें होतें ? कधीं कधीं तर अशा स्थितींत जीव इतका गुदमरून जातो, कीं अमोनियासारखें एखादें तीव्र औषध हुंगणें भाग पडतें. ह्याचें कारण असें आहे कीं, त्या जाग्यांत असणारे आपण, आपले सोबती, विस्तव, दिवे हे सर्व नव्या हवेच्या अभावामुळें, उच्छ्वासानें सोडलेला परस्परांचा वायु, पुन्हा परस्पर श्वासांत घेतात. आणि तेणेंकरून तेथील हवा इतकी बिघडते कीं, ती प्राणधारणासमुद्धां असमर्थ होते.

**स्काटलंड**मध्यें एका **ख्रिस्तमस**च्या सणांत एका सभेमध्यें अशाच कारणानें एक मोठा अनर्थ घडला. एका लहानशा खोलीमध्यें ३६ असामींनीं सारी रात्र गाणेंबजावणें केलें. ती खोली फारच ठेंगणी असून तिचीं सर्व दारें व खिडक्या अगदीं बंद केलेल्या होत्या, त्या योगानें त्या खोलींतील हवा इतकी अपायकारक झाली, कीं सांगतां सोय नाहीं. त्याचा परिणाम असा झाला, कीं त्यांपैकीं सात असामींस घातुक ज्वर भरला, आणि दोन असामी तर ताबडतोब प्राणास मुकले.

**सुजाउद्दवल्या**नें, पुष्कळ इंग्रजलोक निर्दयपणानें एका लहानशा कोठडींत कोंडल्यामुळें किती जिवांची हानि झाली, तें इतिहासप्रसिद्धच आहे. तेथेंही ताज्या हवेचा अभाव, हेंच कारण होय. आणि खरोखरच एखाद्या संकुचित जाग्यांत एखादा मनुष्य बऱ्याच मेणबत्या जळत ठेवून हवा येण्याचीं सर्व दारें बंद करील, तर लौकर त्या मेणबत्यांच्या ज्योति अंधक व निळसर होऊन जातील ! कारण दिवा जाऊं लागला म्हणजे ज्योत निळ्या रंगाची होते. तात्पर्य काय, कीं ताजी हवा ही जशी प्राणिजीवनाला तशीच दीपजीवनालाही कारण आहे. ह्या गोष्टीची साक्षात् प्रचीत पहाणें असेल, तरीसुद्धां लांब जावयास नको. एका सपाट लांकडी-फळीवर एक मेणबत्तीचा तुकडा जळत ठेवावा, आणि त्यावर एक ग्लास उपडें घालावें. म्हणजे थोड्याच वेळांत मेणबत्तीची ज्योत कमी कमी होऊन अखेर आपोआप विझेल. किंवा तशीच पेटलेली मेणबत्ति बंद केलेल्या पेटींत ठेवली, व एक कांचेची नळी घेऊन त्या नळीच्या

द्वारानें हळूहळू, आंत फुंकर घालून, आपला उच्छ्वास सोडला, तरीही तीच दशा होईल !

तर आतां श्वासामध्यें आणि उच्छ्वासामध्यें भेद काय ? भेद ह्मणून इतकाच कीं, आपण श्वास घेतों ती हवा स्वच्छ असते. आणि तींत "आक्सीजन," "नैत्रोजन" हे दोन वायु असून शिवाय थोडासा "कार्बानिक आसिड ग्यास" असतो. ही गोष्ट खरीच असल्यामुळें साधारण प्रयोगानेंसुद्धां सहज सिद्ध करतां येते. एका ग्लासांत थोडीशी चुन्याची निवळी घ्यावी, आणि एका कांचेच्या नळींतून त्यांत फुंकर घालावी, ह्मणजे तत्काल ती निवळी दुधासारखी होईल. आणि आपल्या उच्छ्वासांतील कार्बानिक आसिड ग्यास चुन्याला तळाशीं बसवील. व सफेत कार्बोनेट ऑफ लाईम ह्मणजे चाक–किंवा चुनखडू–तळाशीं दिसूं लागेल.

ह्यांत आक्सीजन ग्यास, आणि कार्बानिक आसिड ग्यास, हे दोन मुख्य पदार्थ ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. आक्सीजन ग्यास हा दिवा पेटविण्यास कारण होतो; आणि कार्बानिक आसिड ग्यास त्याला विझविण्यास कारण होतो. जीव हा एक अग्निच आहे. नाहीं तर श्वासोच्छ्वासाचा परिणाम प्राणावर व दिव्यावर एकसारखा कसा होतो ? प्रत्येकाच्या हृदयांत एक अग्निच पेटलेला आहे. आमच्या हृदयांत जर अग्नि नसता, तर बाहेरील हवेपेक्षां आमचा देह अधिक उष्ण कसा असता ? आमच्या प्रत्येकाच्या हृदयांत, अग्नींत कोळसे जळल्याप्रमाणें सदासार्वकाल दहनक्रिया चाललेलीच असते. दिवा सतत जळण्यास जसें तेल पाहिजे; शेगडींतील विस्तव राहण्याला जसा कोळसा पाहिजे; तसा हा जीवनाग्नि राहण्यास आक्सीजन पाहिजे. अग्नीची दहनक्रिया चालू असतांना ज्याप्रमाणें राख व धूर बाहेर पडतात, तसें जीवनाग्नीची क्रिया चालत असतांना कार्बानिक आसिड ग्यास बाहेर पडतो.

वरच्या प्रतिपादनावरून ही गोष्ट लक्षांत येईलच कीं, खोलीमध्यें आपण जसे श्वासोच्छ्वास करतों, तसेच दिवेही श्वासोच्छ्वास करीत असतात. आणि साधारण एक शेगडी जळत ठेवण्याला, देखील कितीएक मनुष्यांच्या श्वासास लागणारा आक्सीजन लागतो. प्रत्येक दि-

व्यालाही आपल्याप्रमाणेंच कांहीं तरी आक्सिजनाचा वांटा लागतो. आपल्या उच्छ्वासांतून जसा कार्बानिक आसिड ग्यास बाहेर पडतो, तसा दिव्यांतूनही बाहेर पडतो.

मग असा प्रश्न उद्भवतो कीं, आपल्या तोंडांतून बाहेर पडलेल्या उच्छ्वासाचें, किंवा कार्बानिक आसिडाचें काय होतें? तो सर्वांसच अपायकारक आहे कीं काय? व तो अगदींच निरुपयोगी आहे किंवा कसें? तर तसें कांहीं नाहीं. जगामध्यें निखालस निरुपयोगी अशी एकही वस्तु नाहीं. आपणांस जे पदार्थ अत्यंत घाणेरे व दुःसह वाटतात, त्यांवर कितीएक जीवजंतूंचें उपजीवन असतें. थुंका, शेंबूड इत्यादि पदार्थ मासे भक्षण करतात; मलमूत्रावर डुकरादिकांचा निर्वाह होतो; खतही त्याचेंच होतें; आणि नवसागर हें उत्तम औषधही त्याच्याच पासून होतें. ह्मणजे कोणताही पदार्थ—मग तो घाणेरा असो कीं चांगला असो—वायां ह्मणून जात नाहीं. मग आपल्या सर्व शरीरांतील खळमळ धुऊन काढून उच्छ्वासांतून निघणारा वायु तरी निरर्थक कसा होईल? आह्मास प्रत्यहीं लागणाऱ्या ज्या हजारों वनस्पति त्यांचें, आपल्या उच्छ्वासांतून बाहेर येणारा कार्बानिक आसिड ग्यास मूल्यवान् उपजीवन आहे. तो जर त्यांस मिळाला नाहीं, तर त्या जगावयाच्या नाहींत!

उच्छ्वासांतून निघालेला हा वायु, आपण प्रत्यक्ष रीतीनें जरी पुन्हा श्वासांत घेत नाहीं, तरी गुलाब, मोगरा ह्यांचा रंग व सुवास ह्या प्रकारांतरानें तो घेऊन आपणांस आनंद होतो. कारण हीं सर्व फुलझाडें कार्बानिक आसिडाच्या मिश्रणानेंच बनलेलीं असतात. दिवसा एखाद्या बागेंतून हिंडतांना आपण बोलत असतों, व उच्छ्वास सोडीत असतों. व आपल्या पोटांतून निघणारा कार्बानिक आसिड ग्यास आपल्या भोंवतालचीं फुलझाडें भक्षण करीत असतात. कोवळीं लुसलुशीत पानें असतात तीं आपआपल्या सूक्ष्म छिद्रांवाटे हा वायु भरारा शोषून घेऊन आपल्या अंगांतील रसांत मिश्र करितात. वनस्पतीमध्यें दाह्य भाग—अर्थात् लांकूड—उत्पन्न होतो तो ह्याच वायूपासून. ह्याप्रमाणें वनस्पति आपला अपायकारक वायु भक्षण करतात, आणि आह्मांस अवश्य लागणारा

आक्सीजन वायु बाहेर टाकतात. तो आपणाला श्वास घेण्यास उपयोगी पडतो.

ह्या रीतीनें आह्मी झाडांस पोसतों, आणि झाडें आह्मांस पोसतात. आणि सर्वांस जीवनदाता जो सूर्यनारायण तो आह्मां दोघांस पोसतो. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत आणल्या तर मनास केवढा आनंद वाटतो ?

# कलमबहाद्दरांस शेलापागोटें.

'**सद्धर्मदीपानें**' आपलें काम उत्तम आणि नेटानें चालविलें आहे अतएव तो स्तुतीस पात्र आहे. ह्यांतील पौराणिक, विषय समयोचित मार्मिक, चित्तवेधक व बोधपर असतात.

*
* *

कृषिकर्माचें मासिकपुस्तक '**शेतकरी**' हें एकच. त्यांतील भाग बराच उपयुक्त असतो. परंतु त्यास अमेरिकेंतील 'Farm, Field & stockman' चें स्वरूप आलें पाहिजे. तरच त्याचें महत्व वाढेल. एरवी मृत्तिकेचे नुसते घटकावयव देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

*
* *

वैद्यकसंबधीं मासिक पुस्तकें चार. छोटासा '**पथ्यबोध**' जेमतेम बराच आहे. कवितेंतील अश्लीलपणा कमी झाल्यास हातीं घेण्यास कांहीं नड नाहीं. '**धन्वंतरी**' साधारण बऱ्यांतलाच ह्मणावयाला हरकत दिसत नाहीं. कित्येक विषय चांगले आहेत. '**आर्यभिषक्**' चा नीटनेटकेपणा, नियमितपणा—**राजवैद्य** साह्य—तारिफ करण्यासारखा आहे. पण नुसत्या वनस्पतीपेक्षां कांहीं शारीरिक वगैरे माहिती येत जाईल तर उत्तम. '**भिषग्विलासां**'त शारीरिक माहिती वगैरे भाग ठीक असतात. झटून मेहनत केल्यास ह्या पुस्तकाची मोठी चीज होण्याचा संभव आहे.

*
* *

'**ज्ञानदीप**' हें मुंबईत प्रसिद्ध होतें. ह्यांत एकेश्वरी पंथाचें व ब्रह्मो धर्माचें प्रतिपादन असल्यामुळें, व त्या मताचा प्रसार फारच कमी असल्यामुळें तें लोकप्रीतीस पात्र होणें कठीण आहे. '**काव्यरत्नावली**' हें चांगल्यांपैकीं मासिक पुस्तक असून तें जळगांव येथें प्रसिद्ध होतें. ह्यांत अर्वाचीन कवींच्या कविता

प्रसिद्ध होत असतात. पण लोकाश्रयाच्या अभावामुळें विचाऱ्यास अगदीं दीन-दशा प्राप्त झाली आहे. असें कां व्हावें समजत नाहीं. तथापि मोगऱ्यांसारख्या कवींनीं त्यांत लक्ष घातल्यास अद्यापही त्यास पालवी फुटेल. रसिक लोकांनीं लक्ष देण्यासारखी गोष्ट आहे.

*
* *

'**जैनबोधक**' '**जैनधर्मप्रकाश**' हीं जैनधर्मी आहेत. हीं आपल्या धर्मप्रसारार्थ बरीच झटून मेहनत करतात. एक तर बरेच दिवस फुकट वांटलें जात होतें. त्यांतील लेख लिहिणारे तरतरीत असल्यावांचून त्यांस चढती कळा लागण्याचें चिन्ह दिसत नाहीं. हें न घडेल तर हीं रटुघुटु अशींच चालावयाचीं. '**सार्वजनिक**' हें नांव मात्र मोठें आहे. पण पुस्तकांत तिळभर सुद्धां राम नाहीं. ठळक ठळकशीं दोन चार वाक्यें, गोरक्षणाविषयीं दोन शब्द, वृत्तसाराच्या कशाबशा चुटपुटल्या दहा पांच ओळी एकत्र केल्या, कीं सुटला बिचारा आपल्या कर्तव्यांतून! हें मासिक पुस्तक कोणत्या हेतूनें निघतें? हें एक कोडेंच आहे.

*
* *

स्त्रीशिक्षणास उत्तेजन व आश्रय देणारें '**आर्यभगिनी**' ह्याचें कर्तृत्व माणकाबाई लाड यांजकडे असून त्या ह्या महदुद्योगाबद्दल खरोखर प्रशंसेस पात्र आहेत. ह्यांतील विषय सोपे व बोधपर असतात. स्त्रीशिक्षणास हें मासिक पुस्तक मोठें साह्यभूत आहे, ह्यांत शंका नाहीं. "The Teacher" हें बालबोधाच्या धर्तीवर इंग्रजी भाषेंत निघणारें मासिक पुस्तक आहे. ह्यांत लहान लहान चरित्रें, शास्त्रीय विषयांचीं तत्त्वें, भाषापद्धति वगैरे विषय फार सुरेख असतात. इंग्रजी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीं ह्यास अवश्य आश्रय द्यावा.

*
* *

कोल्हापूरच्या 'विद्याविलासां'त निर्माण झालेला '**तत्वप्रकाश**' ह्याचे कर्ते वे. शां. रा. **शंकर रघुनाथ गोखले** होत. ह्यांत 'आर्यविद्या' हा पहिला विषय आहे. ह्यांमध्यें वेद, वेदांगें व उपांगें ह्यांतील मंत्र, ऋचा, मंत्र द्रष्टे, व त्यांतील थोडक्यांत सारांश देण्याचा कर्त्यांचा विचार आहे. जो विषय लिहावयाचा तो लेखकाच्या मनांत आधीं चांगला बिंबलेला असला पाहिजे, व त्यावर बऱ्याच दिवसांचें परिशीलन असलें पाहिजे. तरच तो उत्तम वठतो. रा. शंकर शास्त्री

हे जात्या चांगले संस्कृतज्ञ असून फारा दिवसांपासून त्यांस वेदादिविषयांची आवड आहे. व त्या विषयांवर त्यांनीं बरेच परिश्रम केलेले आहेत. त्यावरून हें काम त्यांजकडून चांगलें पार पडेल असा भरंवसा वाटतो.

*
* *

वेदांचा गोषवारा आजपर्यंत महाराष्ट्र भाषेंत नसावा, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. 'वेदार्थ यत्नही' शेवटास गेला नाहीं, हेंही चांगलें झालें नाहीं. आतां प्रस्तुत प्रयत्नासही थोड्याबहुत श्रीमंत लोकांनीं आश्रय देण्याचें मनावर घेतल्यासारखें दिसतें, आणि तसें झाल्यास वरील उणीव थोड्या अंशानें तरी भरून येण्याचा संभव आहे. ह्या संबंधानें थोड्याशा सूचना करणेंही इष्ट वाटतात, त्यांचा चालकांनीं विचार करावा. त्या सूचना अशा:—

*
* *

कांहीं मुद्यांचे शब्द जाड्या टाइपानें घालावेत. उदाहणार्थ अं० २ पृ० ४ "अध्वर्यूनंतरचा दुसरा ऋत्विज, होता." ह्यांत 'होता' हा शब्द मोठ्या टाइपाचा असता तर, सामान्य वाचकांस विशेष सोईचें झालें असतें. तसेंच सोमरसाविषयीं, सोमरसांत काय काय गुण असल्याविषयीं वेदांत सांगितलें आहे, तें दर्शविलें आहे, परंतु सांप्रत यज्ञामध्यें जी सोमवल्ली ह्मणून आणतात, तिच्यांत प्रस्तुत कालीं, काय काय गुण आहेत, तें सांगणें अवश्य होतें. 'सोमवल्ली'—रानशेर—अथवा दुसरी कोणती वनस्पति हल्लीं कामीं लावतात, तिचें चित्र देणें अगदीं जरूरीचें काम होतें. शिक्षा, ज्योतिष व छंद हीं अंगें लहानच आहेत. ह्यास्तव त्यांचीं ह्या पुस्तकांत समग्र भाषांतरें दिलीं, तर फार उपयोग होणार आहे. 'अर्थ न जाणतां ह्मणणें,' हे वेदपाठकाचे अधमगुण मानिले आहेत. त्याचें मूळवाक्य टीपेंत अवश्य पाहिजे होतें.

*
* *

ह्याच पुस्तकांतील दुसरा विषय 'अर्वाचीनग्रंथपरिज्ञान.' ह्यांत अर्वाचीन ग्रंथांपैकीं कितीएक ग्रंथांची परीक्षा चांगली मार्मिक तऱ्हेनें केली असते. शब्दव्युत्पत्ती संबंधाचे लेख फार महत्वाचे असतात. स्फुट विषयांतही कितीएक शास्त्रीय विषयांची मनोरंजक व उपयुक्त माहिती असते, तीही वाचण्यासारखी असते. मात्र त्यांत वर्तमानपत्रांतून वगैरे शेंकडों वेळ येऊन गेलेले विषय न या-

वेत अशाबद्दल खबरदारी घेणें जरूर आहे. ह्याशिवाय 'शंका करणें,' 'गोडवें गाणें,' अशी शब्दयोजना न करण्याविषयीं व छपाईकडे विशेष लक्ष पुरविण्याविषयीं प्रकाशकारांस सूचना करून, व सदरहू पुस्तकास सर्वांनीं यथाशक्त्या हातभार लावावा अशी प्रेमाची विनंती करून दुसऱ्या बंधूकडे वळतों.

*
* *

आमचें सख्खें कनिष्ठ भावंड **'महाराष्ट्र कोकिल'** प्रथम प्रथम ह्याची आशा अगदींच सुटली होती. परंतु "फिनिक्स पक्ष्याप्रमाणें" त्याची स्थिति होऊन आज तें बरेंच वाढीला लागलें आहे. ही अत्यंत सुदैवाची गोष्ट होय. तसेंच **"हा रम्य दिसो देवा केरळकोकिळ जसाच सुंदर तो."** ह्या आर्यार्धावरून त्याची भ्रातृभक्तिही बरीच दिसून येते: ह्यानें प्रथम पासूनच बांधवानुकरण केलें आहे. हेंही आमच्या वाचकांस सांगावयास पाहिजे आहे, असें नाहीं. लोकोत्तर चमत्कार, स्थलनिर्देश कोणीही—इत्यादि सर्व थाट आपल्या वडील भावंडाचा उचलला आहे. त्याची मालकी बदलली, कीं याची बदलली. त्याच्यांत 'संधान' येऊं लागलें, कीं ह्याच्यांत 'कलरव' सुरू झालाच.

*
* *

येवढ्यावरून आमच्या मनांत दुसरें जरी कांहीं येत नाहीं, तरी येवढें येतें, कीं, आलीकडील मंडळीमध्यें, अनुकरण केल्याशिवाय, दुसरा एखादा चटकदार विषय नवाच शोधून काढण्याचें अवसान दिसत नाहीं! लोकांना नेहमीं नवी टूम पाहिजे असते, आणि ती नवीन मंडळीस सुचल्याचें दिसत नाहीं, मग लोकांवर छाप ती बसावी कशी? केरळकोकिळ लोकांस अंमळ आवडता झाला न झाला, तों त्यांतीलच विषयांची नांवनिशी देऊन नवीं मासिक पुस्तकें काढण्यास लोकांनीं कंबरा बांधल्याच! केरळकोकिळास ५।६ महिने झाले न झाले, तों 'महाराष्ट्र कोकिळाची' जाहिरात फडकली!

*
* *

आतां काय ह्मणे 'भारतकोकिल' निघतो आहे. ह्मणजे नांव सुद्धां 'कोकिळा' शिवाय दुसरें सुचत नाहीं! आणि दुसऱ्याचें उष्टें नांव घेतांना अशा लोकांच्या मनाला दिक्कतही पण वाटत नाहीं! हें किती आश्चर्य! ठीक आहे बाबांनो!

तुह्मांला दुसऱ्या विषयांकडे कां वळतां येत नाहीं. दोहोंपैकीं कोणी तरी एकानें लाजलें पाहिजे. ह्मणून आलीकडे आह्मीं ही आपल्या कोकिळांतील विषयांचा रोंख फिरविल्याचें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच.

*
* *

तथापि महाराष्ट्र कोकिलानें आपला रोंख आलीकडे मात्र बराच बदलला आहे; 'झांशीचा इतिहास' 'थोरपुरुषांचीं चरित्रें' 'राष्ट्रीय सभेचा वृत्तांत' वगैरे विषय सामील करून त्यानें एक नवाच भाग आटोपला आहे. हेंही त्याचें प्रशंसनीय कृत्य होय. बंधूंनीं आपआपल्या स्वपराक्रमावर मस्तकें उचललीं, ह्मणजे त्यांचें प्रेम अकृत्रिम होऊन तें शाश्वतीस पोंचतें. वडिलोपार्जित जिनगीचे तुकडे करण्याचा प्रसंग आला, ह्मणजे मात्र कलीचें माहात्म्य वाढलें ह्मणून समजावें. हा नियम सृष्टींतच जर दृष्टीस पडतो, तर तो पुस्तकासही कां न लागू पडावा ?

*
* *

एकंदरींत, महाराष्ट्र कोकिलाचे कितीही धनी आणि मालक बदलले तरी, आलीकडे त्याचें काम बरेंच जोमानें चाललें आहे, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं, लेखनशैलीही बरी आहे. परंतु संस्कृत शब्दांचा भरणा अंमळ कमी होईल तर बरा. कितीएक विषय बरेच माहितीचे असतात. आमचें धाकटें भावंड या नात्यानें त्याचें परमेश्वरापाशीं अभीष्ट चिंतून 'चिल्हर' पुस्तकांकडे वळतों.

*
* *

---

## जानेवारीच्या अंकांत दिलेल्या प्रश्नाचें उत्तर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ जाडा | —घोडा—व. घो. ४ | बारिक | —उं.—पाहिजे तेथें द्यावा. |
| २ ,, | प्या—व. ह. ८ | ,, | —उं.×प्या किंवा हत्ती. |
| ३ ,, | व—रा. ८ | ,, | —रा—रा. घो. २ |
| ४ ,, | प्या—व. उं. ६ | ,, | —मात. |


Printed at Javaji Dadaji's "Nirnaya-sagara" Press, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० ७] [अं० ३.

प्राचीनकालचें

## आकाशयान.



सांप्रतकालीं कलाकौशल्याच्या अत्युच्च शिखरास पोंचलेले पाश्चात्यलोक 'बलून' नामक हैड्रोजन वायु भरलेला जो फुगा करतात, जो मनुष्यास आकाशांत घेऊन जातो, व ज्यास 'विमान' असें ह्मणण्याचा परिपाठ पडला आहे, त्याची युक्ति किती कच्ची आहे, हें त्यापासून वारंवार होणाऱ्या अपघातापासूनच व्यक्त होतें. ह्मणजे त्यांत इतक्या चुका भरलेल्या आहेत, कीं ती कला अद्यापि त्यांस मुळीच साध्य झाली नाहीं ह्मटलें तरी चालेल. त्याची गति, त्याचा रोख, त्याचा पल्ला, त्याचें ठाणें, ह्यांपैकीं एकावरही त्यांची निष्प्रतिबंधसत्ता चालत नाहीं. परंतु प्राचीनकालीं आमच्या देशांत उत्तम प्रतीचीं आकाशयानें—विमानें—असून, हल्लींच्या आगगाडीप्रमाणेंच त्याचीं सर्व कळसूत्रें त्या कालच्या लोकांच्या अगदीं हातांत होतीं. **राम व रावण 'पुष्पक'** विमानांत बसून **सिंहलद्वीपांतून** उत्तर हिंदुस्थानांत सुखासमाधानानें आल्यागेल्याबद्दल पु-

राणांतरीं वर्णन आहे. कोरींव लेण्यांसारखीं अजस्र कामें; ताजमहालासारख्या अप्रतिम इमारती; श्रीबाहुबलीसारख्या प्रचंड मूर्ति; दिल्लीच्या लोहस्तंभासारखीं ओतींव स्मारकें; विजापुरच्या तोफेसारख्या भयंकर तोफा; मलाबळीपुरासारखीं एकसंध पाषाणांचीं देवालयें; लघुआर्यसिद्धांत, बृहदार्यसिद्धांत असले ग्रंथ; असलीं पाश्चात्यबुद्धिमत्तेलाही थक्क करणारीं कलाकौशल्यें, आज प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांना पहावयास सांपडत आहेत, तर विमानाबद्दलच केलेलें प्राचीन ग्रंथांतील वर्णन केवळ कल्पित ह्मणणें ह्मणजे आपल्या मनाचा संकोचितपणा व्यक्त करणें होय.

**पांपी**सारखीं युरोपांतील कितीएक नामांकित शहरें हजारों वर्षांपूर्वीं भूकंपानें उडालेल्या राखाडींत जशींच्या तशींच गडप्प होऊन गेलीं होतीं. तीं हल्लीं उकरून काढण्याचा प्रयत्न चालला आहे. त्यांतील भिंतींवरील चित्रें व लेख जशाच्या तसे असलेले अद्यापि दृष्टीस पडतात. अशाच शहरांपैकीं, **ग्रीस** देशांतील एका शहरांत प्राचीनकालच्या विमानाचा नमुना—चित्र—व त्याच्या वर्णनाचा थोडासा हस्तगत झालेला लेख एका इंग्रजी पुस्तकांत दिला आहे. त्याच चित्राची यथातथ्य प्रतिमा करून शिरोभागीं दाखल केली आहे. अशाच प्रकारचें विमान प्राचीनकालीं आपल्या देशांत होतें, अशाविषयीं अनेक प्रमाणें आढळतात. एवढेंच नव्हे, तर आमच्या देशांतील हा नमुना व क्रियालेख ग्रीस देशांतील लोकांनीं पूर्वकालीं नेला असावा—ती कृति त्यांस चालू करतां आली नाहीं ह्मणून ह्मणा—किंवा सतत चालविण्यास त्यांस अडचणी आल्या ह्मणा, किंवा अल्पकाल चालून तो क्रम बंद पडला ह्मणा पण—असें अनुमान करण्यास पुष्कळ जागा आहे खरी. शिवाय हा नमुना आणि त्याची चालविण्याची गति अपुरीच कां होईना—उपलब्ध असलेली कृति, ह्याबद्दल विचार केला ह्मणजे अशा तऱ्हेचीं विमानें पूर्वकालीं खचीत चालू असलीं पाहिजेत, असें दृढतर अनुमान होतें. आणि चालू असतील तर तीं आमच्याच देशांत असलीं पाहिजेत हेंही प्राचीन इतिहासावरून उघड होतें. ह्यास्तव प्रथमतः युरोपांतील जीर्ण लेखांत हें चालविण्याची कृति काय काय सांगितली आहे, ती कळवून, नंतर ह्या विषयाचें पुनरुद्धाटन करूं.

वरील विमानाचें चित्र जेथें मिळालें, तेथेंच त्याच्या चालविण्याच्या कृतीचा लेख होता असें नाहीं. तर युरोपांतील राजापुढें ज्यांनीं ज्यांनीं

आकाशांत उड्डाण करण्याचा प्रयत्न केला होता, व त्यांनीं त्यासाठीं जीं जीं यंत्रें योजिलीं होतीं, त्यांचे जुन्या वर्तमानपत्रांतून लेख आले होते. त्यांत एका कल्पक धर्माध्यक्षानें एका राजापुढें विमान आणलें होतें, व तें तो अमुक रीतीनें उडवीत असे, असा दाखला मिळतो. त्या लेखांत विमान चालविण्याची जी पद्धत सांगितली आहे, त्या विमानाचें चित्र वगैरे दिलेलें नाहीं. परंतु वर दिलेलें जें ग्रीस देशांत उपलब्ध झालें आहे, त्याचे अवयव, त्यांतील यंत्रें, त्याची बांधणावळ, आणि इतिहासांत दाखल केलेली धर्माध्यक्षाच्या विमानाची चालविण्याची पद्धत, ह्याचा विचार केला ह्मणजे ह्याच मासल्याचें विमान तो घेऊन आला होता, असा निश्चय होतो. ह्यास्तव पाश्चात्य देशांतील आकाशोड्डाणप्रयत्नाच्या इतिहासाचेंही थोडेसें दिग्दर्शन करतों.

प्रथमतः युरोपांतील कल्पक लोकांनीं आपणास कृत्रिम पंख लावून आकाशांत उडण्याचा प्रयत्न केला होता! सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं **इंग्लंद**मध्यें **इताली** देशांतून आकाशांत उडणारा एक कारागीर आला होता. व **स्काटलंड**चा राजा चवथा **जेम्स** यानें त्याचा मोठा आदरसत्कार केला. राजानें मोठा दरबार भरवून उड्डाणपटूची फार तारीफ केली, व हा आतां आपल्या ह्या किल्ल्याच्या तटावरून भरारी मारणार ह्मणून सांगितलें. हे कारागीर, संध्येच्या पळींत लेन्साचीं भिंगें तयार करणाऱ्या पुण्यवान् शास्त्रीबुवांच्याच कोटींतले होते. त्यानें तेथें शास्त्रोक्त बाडा मारण्यास आळस केला नाहीं. तो ह्मणाला “मी ही कल्पना अलपस्वल्प विचारानें रचलेली नाहीं; तर, गहन विचारानें आणि फार दूरदृष्टीनें रचिली आहे. पृथ्वीची आकर्षणशक्ति, आणि वायूची ऊर्ध्वगति, ह्यांचा मीं पक्का विचार केला आहे. वायूचा समावेश होणाऱ्या थैल्या आणि हातांत धरण्याचीं सूत्रें करण्यांत तर मीं बुद्धिसर्वस्व खर्चिलें आहे. तें पाहून आपणही थक्क व्हाल! माझ्या पंखांत एकाच पक्ष्याचे पंख मीं सामील केले नाहींत, तर गरुड, ससाणे, गिधाड अशा नानाप्रकारच्या वेगवान् पक्ष्यांचे पंख कामीं लावले आहेत.” असें एक आणि दोन? नानाप्रकारचें त्यानें पांडित्य केलें. त्यावरून बहुतेक दरबारी मंडळीचा असा ग्रह झाला कीं, हे ‘राजेश्री’ खचित आकाशांत संचार करतात. ह्यास्तव सर्वांचे डोळे तो समारंभ पाहण्याकडे लागले.

नेमलेला दिवस येऊन ठेपला. उड्डाणपंडितांची स्वारी, आपले विशाळ कृत्रिमपंख, पसरून गरुडाच्या चित्राप्रमाणें, किल्ल्याच्या तटावर सज्ज होऊन उभी राहिली. सांकेतिक बाहुटा होतांच सर्वांनीं जयघोष केला, व कारागिरानेंही उडी टाकली. परंतु आकाशांत जाण्याचें एका बाजूस राहून रॅासेलॅास मधील उड्डाण करणाऱ्या शिल्पशास्त्र्याची फलश्रुति प्राप्त झाली. अंतर ह्मणून येवढेंच कीं, रॅासेलॅास मधील शिल्पशास्त्री पाण्यांत गटकळ्या खाऊं लागले होते, आणि ह्या शास्त्र्यांनीं किल्ल्याखालीं एक घाणीचा उकिरडा होता, त्यांत लोळण घेतली! तेव्हां सर्व मंडळींत किती हशा पिकला असेल, हें सांगणें नकोच. तथापि हे कल्पक कसले डगमगतात! त्यांनीं आपलें अंग झाडून झुडून साफ केलें, आणि पुन्हा दरबारांत जाऊन इसापनितींतील लांड्या कोल्ह्याप्रमाणें साखसुरत कोटिक्रम रचला. ते ह्मणाले "सभ्य लोक हो! तुह्मी माझ्या फसलेल्या प्रयत्नाबद्दल हासूं नका. जगाचीच रीत कीं, दहा दगड मारावेत तेव्हां एक लागतो. तथापि आजचा अपघात कशानें झाला, हें मीं पूर्णपणें ताडलें आहे. माझ्या पंखांत जशीं गरुडाचीं पिसें आहेत, तशींच कोंबडीं बदकें वगैरे उकिरड्यावर चरणाऱ्या पक्ष्यांचींही आहेत. त्यामुळें किल्ल्याखालील उकिरड्याचा त्यावर कांहीं आकर्षणप्रयोग घडून माझें पतन झालें." हें वाक्पांडित्य तेथील लोकांस कितपत मानवलें असेल, सांगितलेलें कारण कितपत खरें वाटलें असेल, व त्याची संभावना कशी काय झाली असेल, हें निराळें सांगण्याची तादृश गरज नाहीं. रॅासेलॅास मधील वर्णन ह्याच गोष्टीचें प्रतिबिंब असावें असें वाटतें.

ह्याप्रमाणें पंखानें आकाशांत उडण्याचे भलेबुरे प्रयत्न बरेच झाल्यानंतर, लोक, आकाशयानाची खटपट करूं लागले. शिरोभागीं ज्या आकाशयानाचें अथवा विमानाचें चित्र दिलें आहे, त्याची त्रोटक माहिती सन १७०९ सालच्या डिसेंबर महिन्याच्या ता० २० व २२ च्या 'ईव्हिनिंग पोष्ट' नांवाच्या वर्तमानपत्रांत येणेंप्रमाणें दिलेली आढळते. ह्या आकाशयानास त्यानें 'आकाशांत उडणारें तारूं' असें नांव दिलें होतें, आणि तें त्यास यथायोग्य शोभतें. कारण, त्याची बहुतेक रचना तारवासारखीच आहे. ह्या तारवाचा कल्पक ब्राझिलचा धर्माध्यक्ष होता. हें तारूं दोन्ही टोंकांस किंचित् चढतें असून त्यास अवजारें होतीं.

आणि तीं पाहिजे त्या दिशेकडे वळवितां येत. त्यास समतोल राखण्यासाठीं मध्यावर दोहों बाजूंस दोन पंख केले होते, व ते वळविण्यास मागें सुकाणूं असे, तारवाच्या आंतल्या बाजूस प्रत्येक टोंकास एक एक भात्यांची जोडी असे. वाऱ्याची कमताई असली ह्मणजे हे भाते सुरू करीत. दोन बाजूंस दोन लोहचुंबकाचे गोळे असून त्यांस आच्छादण्यासाठीं धातूचीं दोन टोपणें असत. तारवास अधिक वेग पाहिजे असला ह्मणजे धातुचीं टोपणें काढून घेत. व गति बंद करावयाची असेल तर तीं टोंपणें वर घालीत! (लोहचुंबकानें कमजास्त गति कशी व्हावी हें ध्यानांत येत नाहीं.) सर्व तारू लोखंडी पातळ पत्र्याचें असून त्यावर चटया मढविलेल्या असत. ह्या उडत्या तारवांत दहा किंवा बारा माणसें आणि एक चालविणारा, इतकी मंडळी बसत असे. वरच्या बाजूस पालखीच्या आच्छादनासारखें लोखंडी जाळीचें छत असून त्यास अंबरच्या मोठमोठ्या गोळ्या टांगलेल्या असत. तारू अंतरिक्षांत तरंगत राहण्याची जी मुख्य कला, तिची बहुतेक गुप्तक्रिया या अंबरच्या गोळ्यांत होती! (ही विशेष आश्चर्याची गोष्ट दिसते.) त्यांत आणखी एक विशेष चमत्कार हा होता कीं, जसजसा सूर्याचा ताप अधिक लागे, तसतसें तारवाचें पात्र अंबरच्या गोळ्यांकडे विशेष ओढलें जाई. व त्यास मढविलेल्या चटया तिकडे जाण्यास त्याच्याहीपेक्षां जोर करतांना दिसत! (असें त्या अंबरच्या गोळ्यांत काय होतें! किंवा त्या अंबरच्या गोळ्यांतच असा कांहीं विशेष धर्म आहे ह्मणावा!) ह्या उडत्या तारवावर अधिकारें चढविण्यास व उतरण्यास दोरखंडें व कप्प्या होत्या. ह्याशिवाय, त्याचा कल्पक आपल्या बरोबर सूर्याची उंची मोजण्यासाठीं आकाशगोल, एक समुद्राचा नकाशा, आपण कोणत्या भूभागावर आहों तें समजण्यासाठीं एक होकायंत्र, इतकें सामान घेऊन आपलें तारू उडवीत असे! --

वरील आकाशयानाच्या सुयंत्र रचनेवरून पूर्वींचीं विमानें, हल्लींच्या फुग्यापेक्षां पुष्कळ प्रकारें उत्तम होतीं, हें सहज ध्यानांत येईल. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, तीं जर इतकीं सुयंत्र होतीं, तर बंद कां पडलीं? व सध्या त्यांचा नमुना, थोडी बहुत कृति, जर उपलब्ध आहे, तर तीं एकाद्या बुद्धिवान् पुरुषास चालू कां करतां येऊं नयेत? शिवाय प्राचीन कालीं आमच्या देशांत जीं विमानें होतीं, तीं अशाच प्रकारचीं

कशावरून ? व पाश्चात्य लोकांनीं ती कला आमच्या देशांतूनच नेली, हें तरी कोणत्या आधाराकर ह्मणावयाचें ?

ह्या प्रश्नांवर अनेक प्रकारचें समाधान आहे. कोणतीही कला ह्मणा, किंवा राष्ट्र ह्मणा—कारण, राष्ट्र खालावलें कीं बहुतकरून कलाही खालावतात. तेव्हां त्यांचा—कशा प्रकारानें लय होतो, हें सांगणें फार कठीण आहे. कठीण आहे ह्मणजे इतकेंच, कीं 'त्यास परंपरेनें अनेक कारणें घडतात. कालचक्राचा इंगा एकदा फिरला कीं, 'विपरितः सुकृतो भवेत्' ह्या न्यायानें 'गाजराचें केळ, आणि केळाचें गाजर होतें.' **ग्रीस** व **रोम**चीं राज्यें ह्मणजे लोखंडाची खुंटी होती. तीं रसातळास कशीं गेलीं ? मी मी ह्मणविणारे बादशहा आमच्या एका पाटलाच्या चोरानें घायकुतीस कसे आणले ? एका सतरा वर्षांच्या खेडवळ मुलीनें इंग्लिश सेनापतीची कशी भंबेरी उडविली ? एका यःकश्चित् **जार्ज़वाशिंग्टन**नें कर्तुमकर्तुं ह्मणविणाऱ्या इंग्रजबाहद्दरांस देशोधडीस कसें लावलें ? पानपतच्या लढाईमध्यें भीमबहाद्दर **शिंद्यां**ची तरवार कोठें गेली होती ? पाश्चात्य लोकांकडून बूट काढून हात जोडविण्याची **पेशव्यां**ची सत्ता व दरारा कसा अस्तास गेला ? ह्या सर्व गोष्टी मनांत आणल्या ह्मणजे राष्ट्राचा खेळ आणि बुद्धिबळांचा खेळ अगदीं सारखा आहे, असें दिसून येईल.

जोपर्यंत सद्दी असते, तोंपर्यंत सर्व कांहीं चालतें. परंतु एकदां कां चुकून वजरचूक झाली, आणि फळी फुटून डाव अंगावर आला, कीं 'दे माय धरणी ठाय' होऊन जातें. जो डाव द्यावा, तो अंगाशीं, अशी दशा उडून जाते. फार तर काय, पण आपलीं मोहरींच आपल्या डावास घातक होतात. कालगतीनें मन्वंतर फिरलें, आणि चीनच्या बादशहासारखा एखादा हट्टी बादशहा असला, तर लगेच रेल विसकटून तार तोडून त्यांचें नांव नाट करील ! आणि समजा कीं, इंग्रज लोकच जर ते ह्मणतात तसें आमच्या स्वाधीन हें राज्य करून गेले, तर मागें हीं तारायंत्रें, आगगाड्या चालविणार तरी कोण ? आपोआपच सारें सामसुम होऊन भाड्याचीं तट्टें आणि वाण्याचे बैल घाटाखालीं जाऊं लागतील. समजा; अशाच स्थितींत कितीएक शतकें लोटल्यानंतर एका बुद्धिवान् मनुष्यास खंडाळ्याच्या घाटांत तांबरून पडलेला

एखादा आगगाडीच्या एंजिनाचा सांगाडा मिळाला, आणि तो मोठा जिज्ञासूपणानें तें यंत्र चालू करण्याविषयीं खटपट करूं लागला, तर त्यांत कितपतसें यश येण्याचा संभव आहे ? प्राचीन काळीं येथें एक, घोड्याशिवाय, बैलाशिवाय आपोआप चालणारी गाडी असे. तिचें नांव 'आगगाडी' येवढी दंतकथा मात्र त्यास ऐकावयाला मिळेल. पण तेवढ्यापासून फलोत्पत्ति काय ? कांहीं नाहीं. ज्या वाफेच्या शक्तीवर ती चाले, त्या वाफेचें नांव सुद्धां 'आगगाडी' ह्या संज्ञेंत सांपडणार नाहीं ! मग तीस चालावयास लोखंडाचे रूळ होते, तीस शेंकडों डबे जोडीत असत, दगडी कोळशांचें त्यास जळण असे. सूचना देण्याकरितां तीस शीट केलेली असे. पाणी सांठवावयास बायलर असे. इत्यादि हजारों गोष्टी त्या बिचाऱ्याच्या ध्यानांत याव्यात कशा ? कितीही बुद्धीचा तीव्र असला, तरी त्यास हातच टेकावे लागतील.

दुसरें उदाहरण, आगपेटीचें कां घ्याना ? आगपेट्या मिळेनाशा झाल्या आणि वडिलोपार्जित चकमकीचीही आह्मांस ओळख राहिली नाहीं, ह्मणजे शेवटीं मंथा आणि अरणी यांनीं आह्मांस अग्निसिद्ध करण्याचा प्रसंग येणार ! पुढें कधीं कालानें आमच्या एखाद्या नातवंडा पणतवंडास आगपेटीची घरांत पडलेली रिकामी पेटी सांपडली, आणि तीवर "ह्यांतील एक काडी घेऊन ह्या पेटीच्या एका अंगास घांसली ह्मणजे ती पेटते" असें वाक्य लिहिलेलें आढळलें, तर त्यावरून नवी आगपेटी तयार करावयाची तर एका बाजूसच राही, पण आपल्या पूर्वजांनीं कांहीं तरी थोतांड लिहिलें आहे, ह्मणून तो उपहास मात्र करील ! फास्फरस, गंधक, गिरण्या, यंत्रें ह्यांची कल्पना त्या बिचाऱ्यास कशानें व्हावी ? हीच गो[ष्ट] विमानाच्या सांगाड्यासही लागू आहे. त्याच्या उपलब्ध झालेल्या चित्रावरून व त्रोटक आणि अपुऱ्या माहितीवरून तें कोणास चालवि[तां] आलें नाहीं, तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

आतां, हाच नमुना [...] आमच्या देशांत होता कशावरून ? व तो हि[...] कडूनच तिकडे गेला हो[ता], ह्यास आधार काय ? येवढ्याचाच विचार करावयाचा राहिला. [...]तो करूंया. दक्षिण हिंदुस्थानांतील चिदंबर, जनार्दन, इत्यादि जीं [प्र]सिद्ध देवालयें आहेत, त्यांत विमानाचीं चित्रें काढलीं आहेत, तीं हुबेहु[ब ...]स वर दिलेल्या नमुन्यासारखींच आहेत. दे-

वालयांतील चित्रांत घंटा मात्र अधिक आहेत. त्या वरील नमुन्यांत नाहींत. गंधर्व, देव, किंन्नर विमानांत बसून आकाशांतून संचार करीत. व त्यांतील घंटानादावरून, त्यांच्या आगमनाची सूचना होई, असें पुराणांतरींही वर्णन आहेच. शिवाय दक्षिण हिंदुस्थानांतील मोठमोठ्या देवस्थानांतून गरुड, हनुमान, ऐरावत, उच्चैःश्रवा, इत्यादि उत्तमोत्तम वाहनें केलेलीं असतात, त्यांत 'विमान' हेंही एक वाहन केलेलें असतें. त्याचाही आकार ह्या आकाराच्या जवळजवळच असतो. ह्याशिवाय आणखीही एक कल्पना ध्यानांत येते. ती अशी कीं, आपल्यामध्यें पालखीचा जो आकार झाला आहे, तोही विमानाच्याच आकारावरून झाला असावा. ह्मणजे आगगाडीच्या डब्याला घोडे जुंपून निर्वाह करण्याचाच प्रसंग ह्मणावयाचा. विमानें घरांत पडून तीं चालविणें लोकांस अशक्य झालें असेल, तेव्हां शिडांचें छत, सुकाणूं व नाळ यांच्या दांड्या, त्या भोयांच्या खांद्यावर देऊन काम चालविलें! आटोपला कारभार. विमान हें देवाचें वाहन, ह्मणून तें दिव्य. आणि त्याचेंच रूपांतर पालखी. ह्मणून पालखीपदस्थही बहुमानांत मोडूं लागले. ह्याशिवाय पालखीच्या वाहनाची एवढी प्रतिष्ठा मानण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

हाच आमचा नमुना युरोपियन लोकांनीं नेला असावा, असें मानण्यासही बहुत कारणें दिसतात. एक तर हजारों वर्षांपूर्वी ग्रीसदेशांतील पंडितांचें हिंदुस्थानाशीं पुष्कळ दळणवळण होतें, अशाबद्दल इतिहास साक्ष देतात. आर्यभट्टानें ज्योतिषशास्त्राचे सिद्धांत रचले, त्या समयीं ग्रीस देशांतल्या पंडितांची व त्याची ओळख होती. व ह्यांच्यापासून त्यांनीं बरीच विद्या संपादन केली. 'नीति' मीं केली ह्मणून इसापास शेखी मिरवूं द्या, परंतु त्याच्या जुनाटपणाविषयीं आमचें पंचतंत्रच साक्ष देतें. हीं सर्व उदाहरणें क्षणभर एकाबाजूस ठेवलीं, तरी पाश्चात्य लोकांनीं पूर्वविद्या आह्मांपासून नेल्या अशाबद्दल ताजा पुरावा आपणापुढें आला आहे. ज्या भूमितीशास्त्राबद्दल आजपर्यंत 'युक्लिड'चें नांव गाजत होतें, व ज्याचीं सहांच्या पुढील पुस्तकें कोणाच्यानें रचवणारच नाहींत, असा पाश्चात्य लोकांस अभिमान वाटत होता, त्याच्याच पुढील सात, आठ, व नऊ पुस्तकांच्या संस्कृत भाषेंत लिहिलेल्या

हस्तलिखितप्रति कलकत्त्यास उपलब्ध झाल्याबद्दल 'प्रोग्रेस' नामक इंग्रजी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे ! इतक्या पूर्वकालीन विद्या जर त्यांच्या तिकडे रममाण झालेल्या होत्या, तर विमानाची—अत्यंत उपयुक्त विद्या—तिकडे गेली नव्हती हें कसें संभवेल? शिवाय वरील चित्राचा आकारच इतका सुंदर व सोयीकर आहे, कीं तो सर्व प्रकारें पुराणांतील आकाशयानाशीं जुळतो. आणि ह्याच आकाराच्या विमानाला गति मिळेल, तरच आकाशांत दळणवळण सुरू होईल. सांप्रत चालू असलेल्या फुग्यांचा आकार आकाशसंचारास कोणत्याही प्रकारें सोईकर दिसत नाहीं. त्यास जेथपर्यंत पालखीच्या आकाराचें वळण येणार नाहीं, तेथपर्यंत त्यापासून काडीचाही उपयोग न होतां, अशीच प्राणहानि होत राहवयाची असा आमचा सूर वाहतो.

---

# वर्षाकाल.

## श्लोक.

जीवां दे नव जीवना बहु घनां राना वना यौवना
हर्षे मोर समोर नृत्य करिती घेवोनिया अंगना ॥
गारीगार करी सरीं जल भरीं वारी जगत्ताप हा
वर्षाकाल अहा सुखप्रद महा आला पहा हो पहा ॥ १ ॥
चंद्राला रविला अनेक पडती आल्हादकारी खळीं
मेघाची जवळी फळी विखुरली काळी निळी सांवळी ॥
विद्युत्तेज विकासुनी दिपविते दिव्यप्रभेनें जनां
हुंकारें प्रतिशब्दयुक्त गगनीं चाले कशी गर्जना ॥ २ ॥
वेगानें फिरती किती घनतती झांकूनि घेती नभा
जैशी मंद गुणत्रयें दिसतसे सद्ब्रह्म ज्योतिःप्रभा ॥
वाटे भ्रांत 'कृतांतकांति ह्मणुनी त्या घोर कृष्णांबरीं
विद्युल्लेख विकासते 'घडिघडी हेमप्रभेच्या परी ॥ ३ ॥
वृक्षांतें सुकवी रवी अजवरी वापी नद्या आटवी
भूमी शोषुनि जो हरी जलधना भूपापरी सांठवी ॥

द्यावें तें परतोनि योग्य समयीं जाणोनि तत्तज्जला
ओपायास समस्त वासरमणी दात्यापरी सज्जला ॥ ४ ॥
विद्युद्युक्त महा प्रचंड जैलदा वायु स्वयें चाळवी
वाटे भूचरताप सज्जनपणें सांगे टिपें गाळवी ॥
झाला मेघहि आर्द्र रुक्ष धरणी पाहोनि राना वना
दाता थोर उदार मेघ अपुल्या अर्पीतसे जीवना ॥ ५ ॥
देहातें झिजवूनि जो तप करी सोसूनि दुःखें महा
पुष्टांगें फळ लाभता बनतसे सर्वत्र कीं नेम हा ॥
वाटे भूजन जीवनार्थ तपली संपूर्णता पातली
वृष्टी होउन पुष्टि सृष्टिस मिळे रानें वनें मातलीं ॥ ६ ॥
जैसे वेद समस्त ह्या कलियुगीं पापांत मंदावले
पाखांडी पगडा शिरासि चढला धर्मच्युतां फावलें ॥
झाले लुप्त तसे प्रदोष समयीं तारागणांचे थवे
अंधारांत विशंक हे चमकती कैसे पहा काजवे ॥ ७ ॥
विद्यार्थीगण मूक होउनि बसे जेव्हां नसे तद्गुरू
'कारे' गर्जुनि बोलतां झटदिशीं होतात तोंडें सुरू ॥
तैसे दर्दुर थांबले अजवरी शास्ताच कोणी नसे
ऐकोनी घनगर्जना करिति ते ट्रूँ ट्रूँव ट्रूँ ट्रूँ असे ॥ ८ ॥
झाल्या कैशा नद्या ह्या विपुल जलभरें थोर स्वच्छंदगामी
धो धो धो धो वहाती फुगुनि पसरती राहतीना लगामी ॥
देहीं आरोग्य येतां बहुधन मिळतां पूर्ण स्वातंत्र्यशर्म
मर्यादाभंग होणें क्षणभरि फुगणें हा असे जीवधर्म ॥ ९ ॥
पाचूऐसें गवत हिरवें गारशी आंबराई
ठायीं ठायीं मणि जडविले लालशा कृष्णगाई ॥
कांहीं वल्ली शिरसिं धरिती भूमिच्या देह-छत्री
वाटे थाटें धरुनि सजली राजचिन्हें धरित्री ॥ १० ॥
योग्याच्या तप-साधनांत पडतां कामांत रामा गळां
होतो चंचळ मानसीं खवळतो भांबावतो आगळा ॥

तैसा सागरराज आज उसळे हा अंगनासंगती
उन्मादें सरितापतीस वरितां सोत्कंठ आलिंगती ॥ ११ ॥

हरिपदकमलीं ज्या साधुचें चित्त रंगे
व्यसनजलधिमाजी तो सुखानें तरंगे ॥
अमित मुसळ धारा झोंबला दुष्ट वारा
तिळभरि तरि हाले पर्वताचा न थारा ॥ १२ ॥

द्विजवर जर टाकी रोजचा वेदपाठ
तरि मग सहजीं तें होय सारें सपाट ॥
तृणमय पथ तैसे चालण्याच्या अभावें
पुसट पुसट झाले लोपले कीं स्वभावें ॥ १३ ॥

राहो अंगांत पाणी किति तरि पतिच्या कीं असो घोर वाणी
सौख्याची पूर्ण खाणी बहुत गुणि असो शूर वा चापपाणी ॥
वाहे जारार्थ पाणी घरिं घरिं फिरण्या जारिणीला शिराणी
मेघाची पट्टराणी हरघडि चपला पालटी चार ठाणीं ॥ १४ ॥

---

# लोकोत्तर चमत्कार.

## हिशोब करण्याचें यंत्र.

कालाची गति कांहीं अंशीं चंद्रकलेसारखी आहे. चंद्राच्या कला शुक्लपक्षामध्यें वृद्धिंगत होत होत पौर्णिमेस त्यांचा पूर्ण विकास होतो. कृष्णपक्षामध्यें त्यांचा ऱ्हास होत होत आमावास्येच्या दिवशीं त्यांचा अगदींच लोप होऊन जातो. कालचक्राची अवस्था अशीच आहे. जगांतील कौशल्यें कांहींएक कालमर्यादेपर्यंत वाढत वाढत जातात; आणि नंतर त्यांस उतरता पाया लागतो. आणि मग सर्व प्रयत्न निष्फल होऊन त्यांचें अस्त होतें. व पूर्वी जेथें केवळ लग्नोत्सवासारखी घाई असावसाची, तेथें अगदीं सामसुम होऊन जातें. फार प्राचीनकालीं आपल्या देशांत ज्योतिष होतें; वैद्यक होतें; शस्त्रक्रिया होती; सर्व शास्त्रें व कलाकौशल्य होतें, फार तर काय-? पण विमानांतून जाण्यायेण्याचें दळणवळण असल्याबद्दल सुद्धां दाखले मिळतात. परंतु मध्यंतरीं असा

कांहीं काल येऊन गुदरला, कीं ह्या गोष्टी पूर्वीं होत्या हें सिद्ध करून दाखववावयासच कष्ट पडूं लागले. सांप्रत इंग्रजसरकारच्या धर्मानें लुप्त झालेल्या कलाकौशल्यांस पुनरपि शुक्लपक्ष प्राप्त होऊन पूर्णकलेची पौर्णिमा अगदीं सान्निध्यास येऊन पोंचली, असें वाटायास लागलें आहे.

**बात**साहेबानें आगगाडीची युक्ति काढून मनुष्यमात्रास एका दिवसामध्यें शेंकडों कोस सुखासमाधानानें जातां येईल असें केलें; **ग्यालिलियोनें** दुर्बिणीचा शोध लावून अनंत योजनें दूर असणाऱ्या गोलांचे चमत्कार दृष्टिगोचर करून दिले. **डागरीनें** फोटोग्राफाची कला उघडकीस आणून प्रियकर मनुष्यांच्या व सुंदर देखाव्यांच्या तसबिरा सर्वांच्या घरींदारीं सवंग सुकाळ करून टाकल्या. सांप्रत **अमेरिकें**त वास करणारे **एडीसन** साहेब ह्यांनीं तर विद्युल्लतेशीं लग्नच लावलें आहे; नव्हे, तीस त्यांनीं दासी बनवून सोडली आहे ह्मटलें तरी चालेल. आपण एका पेटींत बोलावयाचें, व ती पेटी पोष्टांतून आपल्या इष्टमित्रांकडे पाठवावयाची, आणि तितक्या दूर पल्ल्यावर ही आपणच बोलत आहों, असे हुबेहुब शब्द उठावयाचे, हा किती बरें चमत्कार! ह्याप्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं अद्भुत कल्पना काढून जनास आश्चर्यभरित करित आहेत.

वरील सर्व यंत्रें आमच्या वाचकांनीं पाहिलीं असतील, निदान ऐकिलीं तरी असतीलच. पण 'हिशोब करण्याचें यंत्र' कधीं पाहिलें किंवा ऐकलें आहे काय? ज्यांनीं ऐकलें नसेल, त्यांस केवढें बरें आश्चर्य वाटेल? परंतु हिशोब करण्याचें–ह्मणजे–बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार करण्याचें–यंत्र निघालें आहे, इतकेंच नाहीं, तर तीं यंत्रें हिंदुस्थानांतील वेधशाळांत येऊन दाखल सुद्धां झालीं आहेत! तेव्हां अशा उपयुक्त व आश्चर्यजनक यंत्रांचा थोडासा तरी इतिहास आमच्या वाचकांच्या आह्मी कानावर घालित आहों, व तेणेंकरून त्यांस थोडेंसें ज्ञान आणि कर्मणूक होईल अशी आहे.

**युरोपा**मध्यें बरेच दिवसांपासून बेरीज व गुणाकार करण्याचें यंत्र तयार करण्याकडे कितीएक विद्वानांचें लक्ष्य वेधून राहिलें होतें. व त्याप्रमाणें पुष्कळांनीं यथासामर्थ्य त्याच्या सिद्ध्यर्थ प्रयत्न केल्याचे दाखले मिळतात. परंतु इ० स० १६९० पर्यंत ह्मणण्यासारखें कोणासच यश

आलें नव्हतें. ह्या वर्षी **पास्कल** नांवाच्या गृहस्थानें बेरीज करण्याचें पहिलें यंत्र तयार केलें. व त्यांत त्यास चांगली सिद्धि मिळाली. हें यंत्र मोठ्या घड्याळाप्रमाणें असून त्यांत एक चक्रांची मालिका असे. व तिच्यावर शून्यापासून नवांपर्यंत आंकडे मांडलेले असत. त्याच्या वरच्या बाजूस तबकडी असून तीस वर्तुळ भोकें पडलेल्या चार रांगा असत, व खालच्या बाजूस एक ओळ असे. ह्या प्रत्येक छिद्रांतून एक एक आंकडा दृष्टीस पडे. वरच्या चार रांगांतील प्रत्येक छिद्राजवळ एकेक मळसूत्री गुंडी असे. ती फिरविली ह्मणजे आपणास पाहिजे तो इच्छित अंक त्या छिद्राखालीं येई. आपणास ज्या रकमांची बेरीज करणें असेल त्या रकमा मळसूत्रांच्या गुंड्या फिरवून मांडाव्यात, आणि खालीं जी मोठी पांचवी ओळ असे, तिच्या प्रत्येक छिद्राचे मळसूत्राची गुंडी फिरवून सर्व छिद्रांखालीं शून्यें आणून ठेवावींत. आणि उजव्या हातास घड्याळाच्या चावीप्रमाणें चावी असे, ती फिरवून सोडावी; ह्मणजे प्रत्येक छिद्राच्या रांगेखालीं असणारा रूळ व त्याचीं चक्रें बाजाच्या पेटींतील रुळाप्रमाणें फिरूं लागत, व दहा पांच सेकंदांच्या आंत सर्व चक्रें फिरावयाचीं बंद होत. नंतर पांचवी ओळ जिच्या खालीं आपण प्रथम निवळ शून्येंच केलेलीं होतीं, तिच्यांतील प्रत्येक छिद्रांत यथायोग्य आंकडे येऊन वरील चार रकमांच्या बेरजेची संख्या बरोबर उतरल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येई. परंतु **पास्कलच्या** ह्या यंत्रांत फक्त बेरीज मात्र होई. आणि तीही चारच रकमांची होई. नंतर त्यानेंच दुसरें एक यंत्र तयार केलें. त्यांत पौंड, शिलिंग, व पेन्स ह्या रकमांची बेरीज, हातचे वगैरे धरून बरोबर होत असे !

नंतर इ० स० १८२१ मध्यें ह्या यंत्रांत सुधारणा करावी, असें इंग्रजसरकारच्या मनांत आलें. ह्यास्तव त्यांनीं मिस्तर **बॉबेज** ह्या नांवाचा एक कुशल गृहस्थ होता, त्यास तें काम फर्माविलें. व बेरजेप्रमाणेंच त्यांत वजाबाकी होण्याची तजवीज करावी ह्मणून सूचना केली. ह्या कामीं होणारा सर्व खर्च सरकारानें देण्याचें कबूल केलें. मिस्तर **बॉबेज** हाही मोठा कल्पक मनुष्य होता. त्यानें जें यंत्र तयार केलें तें **पास्कल**च्याच पायावर केलें खरें, तरी त्यांत पुष्कळच सुधारणा केली. ह्याच्या यंत्रांत दशलक्षांपर्यंत रकमांच्या आठ संख्यांची बेरीज व तित-

क्याच रकमांची वजाबाकीही पण होऊं लागली. ह्मणून त्यानें आपल्या यंत्रास 'वजाबाकी करण्याचें यंत्र' असें नांव दिलें. हें यंत्र सरकारासही पसंत पडून त्याच्या खर्चाबद्दल वगैरे मिळून यंत्रकर्त्त्यास १७००० पौंड मिळाले.

इ० स० १८४७ पर्यंत ह्या यंत्राची स्थिति येथपर्यंतच होती. त्यानंतर इंग्रजसरकारानें पुन्हा त्यांत सुधारणा करण्याचें योजून त्यांत गुणाकाराची व भागाकाराचीही सोय करण्याचें मनांत आणिलें. आणि कितीएक यंत्रशास्त्रवेत्त्यांकडून पुन्हां नवें व पहिल्याहून उत्कृष्ट असें यंत्र तयार करविलें. ह्या यंत्रांत अनेक रकमांची बेरीज होऊं लागली; दशकोटि रकमेपर्यंत वजाबाकी निघूं लागली; दशकोटिपर्यंत रकमेला एक लक्षानें गुणाकार व भागाकार होऊं लागला. एवढेंच नव्हे, तर उत्तर बरोबर आहे किंवा नाहीं, याचा उजव्या हातच्या चतुर्दळ छिद्रामध्यें त्याचा ताळा सुद्धां येऊं लागला! ह्मणजे चूकभूल सुद्धां त्यांत राहूं नये. अशा प्रकारचें मोठें यंत्र तयार झाल्यावर प्रथमतः तें **किंग्‌ज कॉलेज**मध्यें ठेवण्यांत आलें. व सांप्रत हीं यंत्रें हिंदुस्थानांतील वेधशाळेंत गणितशास्त्राच्या उपयोगार्थ पाठविण्यांत आलीं आहेत. ह्यांच्या योगानें पाहिजे तितक्या रकमांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार हीं एका क्षणांत करतां येतात, व उत्तर बरोबर आहे किंवा नाहीं, ह्याचीही त्यांतच तपासणी होते. काय हा मानवबुद्धीचा प्रभाव!

---

# मलबारवर्णन.

## संस्थान कोची.

क्षेत्रफळ १३६१ चौरस मैल. सन १८९१ सालांतील खानेसुमारी ७१५८७०० वसूल १६१८००० रुपये.

**कोची** हें बंदर त्रावणकोर आणि मलबार ह्यांच्या दरम्यान हिंदुस्थानच्या नैर्ऋत्य किनाऱ्यावर आहे. **'कोची'** ह्याचा मलबारी भाषेंत लहान असा अर्थ आहे. ह्या शहरच्या पूर्वस्थितीवरून हें नांव पडलें असावें. हल्लीं ह्यापैकीं अर्धे बंदर इंग्लिशांच्या ताब्यांत आहे. व तेथील वस्तीही पूर्वीपेक्षां पुष्कळ वाढली आहे.

ह्या संस्थानांत उथळ पाण्याच्या खाड्या, नद्या, व सरोवरें विपुल आहेत. आणि त्यामुळें असंख्य कालवे, व बेटें आयतींच झालेलीं आहेत. ह्यांच्या आसपास दलदली असतात, त्यावर पर्जन्य कालांत पूर येतो, आणि भात उत्तम पिकतें. येथें नारळीच्या झाडांचीं लागवड समुद्र किनाऱ्याकडे अगदीं ठेंचून गेलेली आहे. उथळ पाण्यास बांध घातला ह्मणजे भाताच्या लागवडीची सोय होते. ईशान्येच्या बाजूस सागवान लांकडांचीं मोठमोठालीं जंगलें आहेत. डोंगराच्या पायथ्यास वेलदोडे, काफी वगैरे जिन्नस उत्तम पिकतात.

**प्राचीन इतिहास**—नवव्या शतकांत त्रावणकोर व मलबारासह वर्तमान सर्व केरळ देश **चेरमन पेरमाल** ह्याच्या सत्तेखालीं होता. प्रथमतः तो कारभारी या नात्यानें होता, परंतु पुढें तो स्वतंत्र झाला. कोचीचे राजे आपण त्याचे वंशज आहोंत असें ह्मणतात. युरोपियन लोकांनीं ( पोर्तुगीज ) हिंदुस्थानामध्यें पहिला किल्ला १५०३ मध्यें बांधला, तो कोचीस. इ० स० १७७६ मध्यें **हैदरनें** ह्या संस्थानावर खंडणी बसविली. ती त्याच्या घराण्याकडे १७९९ पर्यंत चालत होती. पुढें इंग्रजांनीं **ह्मैसूर** आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हां कोचीच्या राजानें ती खंडणी पुढच्या वर्षापासून ईस्ट इंडिअन कंपनीस देण्याचें स्वतःच कबूल केलें.

**लोकवस्ती**—ह्यांत मलबारी आणि तामिळी अशा दोन भाषेचेच लोक काय ते प्रमुख आहेत. परंतु धर्माप्रमाणें त्यांच्या जाती अनेक होतात. इ० स० १८८१ च्या खानेसुमारींत ४३०००० हिंदु; ३३००० मुसलमान; १३६००० ख्रिस्तियन; आणि १२८० यहुदी लोक होते. यहुदी लोक आणि सीरियांतील ख्रिश्चन लोक कोचींत प्रथम केव्हां आले, ह्याचा निश्चय करणें फार कठीण आहे. तथापि ते आठव्या शतकाच्या सुमारें येथें आले, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. रोमन क्याथोलिक धर्माचा प्रख्यात मिशनरी **फ्रान्सीस झवीर,** प्रथम येथें येऊन त्यानें उपदेशाचा अड्डा घातला. आणि पुष्कळ लोक आपले अनुयायी बनविले. कोचींतील हजारों बोटवाले, व हजारों मच्छिमार लोक सांप्रत ख्रिस्तियन झालेलेच पाहण्यांत येतात.

कोचींतील राज्य चालविण्याची पद्धत फार चांगली आहे. न्याय-

मनसुब्याचें काम बहुतकरून इंग्रजी कायद्यांप्रमाणेंच चालतें. ह्यांत एक स्वतंत्र विद्याखातें असून राजधानीचें शहर **अन्र्याकोलम्** ( अंजिकमळ ) येथें एक हायस्कूल आहे. सर्व संस्थानांत १३३ मैल रस्ता उत्तम प्रतीचा केलेला आहे.

प्रस्तुतचे महाराज सर **वीर केरळवर्मा** के० सी० एस्० आय्० ह्यांचें वय ४३ वर्षांचें असून ते क्षत्रिय आहेत.

---

# लोकोत्तर चमत्कार.

## जंगली समुद्र !

अफाट महासागरामध्यें एक समुद्र आहे; आणि तो जंगलाचा ! हें ऐकून आमच्या वाचकांसही मोठें आश्चर्य वाटेल यांत शंका नाहीं. पण अशा प्रकारचा समुद्र आहे, ही गोष्ट कांहीं मिथ्या नव्हे.

कोलंबसाचा वृत्तांत वाचतांना त्याच्या पहिल्या सफरीमध्यें **कानेरी** बेटांच्या थोडेसें पश्चिमेस गेल्यावर एके दिवशीं सकाळींच त्याचीं जहाजें अफाट महासागराच्या मध्यभागींच वनस्पतींच्या जाळ्यांत गुरफटून खुंटल्यासारखीं झाल्याचें आमच्या बहुतेक वाचकांनीं वाचलें असेलच. ह्या आकस्मिक अरिष्टाच्या योगानें **कोलंबसाच्या** जहाजावरील सारे लोक अगदीं घाबरून गेले. **कोलंबसानें** डोलकाठीवर चढून चोहोंकडे नजर फेंकली, तों सभोंवार असणारा सर्व समुद्र, एखादा तलाव शेवाळीनें आणि कमळांच्या जाळ्यांनीं जसा गजबजलेला दिसतो, तसा त्या वेलींच्या जाळ्यांनीं गजबजलेला दिसला. वारा हलका असून एकाच रोखानें वहात होता. पक्ष्यांचें येणेंजाणें, किंवा दुसरें कोणतेंही जमीन जवळ असण्याचें चिन्ह दिसत नव्हतें. जमीन जर जवळ नाहीं, तर हीं वनस्पतींची जाळीं उत्पन्न झालीं कशीं ? हा मोठाच प्रश्न होता, कारण नुसत्या पाण्यावर वनस्पती उगवलेल्या कधींच कोणाच्या पहाण्यांत नव्हत्या. त्या ठिकाणीं अद्यापि हजारों कोसपर्यंत केवळ पाण्यावरच वनस्पती उगवून त्यांच्या जाळ्या झालेल्या आहेत ! पण त्या कालीं त्या खलाशांस ती गोष्ट कशी कळावी ? ते ह्मणाले, पश्चिमेस

कांहीं तरी परमेश्वराचा गुप्त ठेवा असावा. तो आह्मी दाटून पहाण्यास निघालों, यामुळें त्याचा हा आह्मांवर क्षोभ आहे. पृथ्वीचा येथेंच अंत झाला; ह्यापुढें कांहीं आतां पृथ्वी नाहीं. आणि आतां जर आह्मी परत **स्पेन** देशाकडे गलबतें फिरविलीं नाहींत, तर आमचा खचित नाश होईल. **कोलंबस** येवढा बुद्धिवान् व धीराचा पुरुष होता, तरी त्यासही त्याचें कारण सांगतां येईना. शेवटीं त्या सर्वांनीं असें ठरविलें कीं, येथें तळाशीं अगदीं नजीकच मोठा खडक असावा, व त्याजवर उगवलेल्या ह्या वनस्पती असाव्यात. ह्मणून त्यांनीं मोठे थोरले बुडीद टाकून ठाव पाहिला, परंतु कोठेंच ठाव लागला नाहीं! तरी त्यांनीं तीं गलबतें तशींच मोठ्या प्रयासानें, पश्चिमेच्या रोखानें चालविलीं. थोडे दिवस गेल्यावर त्या जाळ्या नाहींशा झाल्या, आणि स्वच्छ असा अफाट महासागर पुन्हा लागला.

ती समुद्रांतील जागा **कोलंबसानें** पाहिल्या दिवसापासून त्या समुद्रास **'जंगली समुद्र'** असेंच नांव पडलें आहे. त्या तेवढ्या भागांत वनस्पतींच्या जाळ्या नेहेमी तशाच असतात. हा जंगली समुद्र त्रिकोणाकृति आहे. **अझोरबेटें, कानडीबेटें,** आणि **केप डी व्हर्डे** हींच त्याचीं तीन टोंकें होत. ह्या हद्दींतील समुद्राच्या पाण्याचा अंत लागत नाहीं, तरी तेथील पाण्याच्या सपाटीवर वनस्पतींच्या जाळ्यांचा नेहेमी इतका दाट थर होऊन राहिलेला असतो, कीं त्यांतून गलबत जाण्याची मोठी मारामार पडते. आगबोटी तर त्यांतून मुळींच जात नाहींत. कारण, तेथें गेल्यास तिचे "स्क्रू" सारे ढिले पडतात; वल्ह्यांची गति बंद होते, आणि तिची गति खुंटून जाते. परंतु **वेस्टइंदीज** बेटाकडे, दक्षिण **अमेरिकेकडे** व **केपकडे** जाणाऱ्या गलबतांस मात्र ह्यांतूनच जाणें भाग पडतें. केव्हां केव्हां ह्या त्रिकोणाच्या समोंवार मोठें तुफान वगैरे होऊन मध्यभागीं वनस्पतींच्या जाळ्यांची अतिशयितच गर्दी होते. अशा वेळीं गलबतांस कित्येक दिवस एकाच जाग्यावर मुक्काम करणें भाग पडतें. तथापि, ह्या ठिकाणीं नेहेमी वारा शांत, गतीचा रोंख सारखा, समुद्राची शांतता, लाटांचा अभाव, ह्यामुळें दुसरें कोणतेंही जोखम लागण्याची भीति नसते.

---

# कलमबहादरांस शेलापागोटें.

पण हो; आमच्या महाराष्ट्रकोकिळ बंधूबरोबर एक नवेंच गोजिरवाणें अपत्य असून, त्याच्याकडे लक्ष्य गेलें नाहीं. ही गोजिरवाणी मुलगी **'मासिकवृत्त माला अथवा विविध विषय सुधा'** ही होय. आमचे बंधु पुरते एक वर्षाचे होतात, न होतात, तोंच त्यांस परमेश्वरानें कन्यारत्नाची जोड दिली. परंतु अल्पवयांत झालेली संतति निरोगी व दीर्घायु होणें कठीण, असें वैद्य शास्त्रवेत्त्यांचें मत असल्यामुळें किंचित् भय वाटतें. बाकीं मुलीचें स्वरूप मनोहर आहे. सर्व स्त्रियांतील उत्तमोत्तम भाग घेऊन ब्रह्मदेवानें जशी तिलोत्तमा निर्माण केली, तशी सुधाजनकानें सर्व वृत्त पत्रांतील सार काढून ही सुधा तयार केली आहे. आतां सर्वांतील वेंचक वेंचक उतारे जर घ्यावयाचे तर सर्वांस तशा अर्थाची सूचना केली नसेल तर करावी. हें बरें दिसतें.

*
* *

**'डेक्कन कॉलेज त्रैमासिक पुस्तक'**—The deccan college quarterly. हें पुस्तक दक्षिण पाठशाळेंतील विद्यार्थीजनांकडून इंग्रजींत व मराठींत चालविलें जातें. तेव्हां ह्यांतील लेखक चांगले सुशिक्षित आहेत, हें सांगण्याची पुनरपि गरज राहिली नाहीं. ह्या पुस्तकांतील अर्धा भाग इंग्रजी भाषेकडे दिला आहे, व अर्धा भाग मराठीकडे ठेवला आहे. इंग्रजींत, त्या कॉलेजाची हकीगत, त्यावर उपकार करणाऱ्या कांहीं सत्पुरुषांची हकीगत, तेथील स्थिति, विद्यार्थी-क्रीडाविजय, इत्यादि विषय आहेत. मराठी मध्यें दोनच विषय आहेत. पहिला, 'आत्मा अमर आहे काय ?' हा; व दुसरा 'अहल्या जार' ह्या विषयावर कविता. पहिल्या विषयांतील भाषा प्रौढ, शुद्ध असून प्रतिपादनही चांगलें आहे.

*
* *

'अहल्या जार' कविताही बऱ्या आहेत, तथापि त्या सुशिक्षितांकडून केल्या गेल्या आहेत, हें मनांत आणलें ह्मणजे मात्र त्या तितक्या साधल्या नाहींत असें ह्मणावें लागतें. कवितेंत मुख्य गुण प्रसाद आणि साधेपणा. तो ह्यांत फारच थोड्या प्रमाणानें आढळतो. बऱ्याच ठिकाणीं शब्दांच्या रूपांविषयीं अत्यंत हलगर्जीपणा झाला आहे. पाठशाळेंतील विद्यार्थ्यांकडून 'रोलंब' 'पूरवाया'

'शीळ' 'आणी' इत्यादि शब्द कवितेंत वापरले जावेत, ही फार शोचनीय गोष्ट आहे.

* *

सुरेश तेव्हां वसुधा तलाला ॥ वेगें मनाच्या उतरोनि आला ॥:॥ होई शिला काय मृदु किं (!) वर्षे ॥ तीच्या वरी मेघ अनंत वर्षे ॥:॥ तों हे अहल्ये उघडी ग (!) दार ॥:॥ येवढ्याच मासल्यावरून कवीच्या प्रसादगुणाची परीक्षा होईल. तथापि नीट लक्ष देऊन नेटानें काम चालविल्यास हें पुस्तक बरें चालेल असा अदमास दिसतो. पण हें आहे दहांचें काम आणि तें परंपरेनें चालावयाचें आहे. तेव्हां पहावें काय होतें तें ? चिरायु होवो.

*
* *

आमच्याकडे जेवढीं मासिकपुस्तकें ह्मणून येतात, त्यांपैकीं प्रमुखांचें आगतस्वागत झालें. आतां बाकींच्यांविषयीं थोडक्यांत दिग्दर्शन करून त्या वर्गांतील एक दोन मासिकपुस्तकांचा मासला पुढें ठेवूं. ह्मणजे मासिकपुस्तककार बंधूंच्या भेटीचा समारंभ साजरा झाला ह्मणावयाचें.

*
* *

'नीरजोल्हास' हें बऱ्यापैकीं मासिकपुस्तक असून तें नागपुरास निघतें. ह्यांत एका ऐतिहासिक पुरुषाचें चरित्र दिलें असून शिळाप्रेसावर काढलेलें एक चित्रही दिलेलें असतें. विषययोजना नवी नाहीं खरी, तरी नीटनेटकी असते. ह्यांत स्वधर्माभिमानही बराच जागरूक असतो. 'भारतमित्र' हें बेळगांवास निघतें. ह्यांतील विषययोजना अनुकरणाचीच आहे, तथापि बरीच सुव्यवस्थित आहे. शंभर वेळां वर्तमानपत्रांतून येऊन शिळ्या होऊन आंबलेल्या आख्यायिका, विनोद, वर्तमानें, आपल्या मासिकपुस्तकांत देत गेल्यानें—विशेष प्रसंग शिवाय करून—हलकेपणा पदरीं येतो, हें आमच्या कित्येक बंधूंना कधीं बरें कळेल ? जुन्या वर्त्तमानपत्रांतील उतारा असला तरी मनाला आठवणार नाहीं, इतके कांहीं सारे वाचक अद्यापि मठ्ठ झाले नाहींत ! असो. इमानेंइतबारें, व कायावाचामनेंकरून उद्योग केला तर परमेश्वर यश दिल्याशिवाय राहणार नाहीं. दीर्घोद्योग केल्यास कोळशाचाही हिरा होतो, ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

*
* *

मुंबई येथें निघणारा **'मनोरंजकमित्र'** दोन हातांनीं दोनशें टाळ्या एकदम कधीं वाजावयाच्या नाहींत. धर्मशास्त्रसंबंधी विचार त्यांतच; नाटक त्यांतच; कादंबरी त्यांतच; मजेदार चुटके त्यांतच; पुस्तकपरीक्षण त्यांतच; आणि नवलविशेष सुद्धां त्यांतच. सर्वज्ञतेचा डौल आणणें, निखालस पोरखेळ आहे. मुळीं आकार टीचभरसुद्धां नाहीं त्यांत हीं सर्व यावींत कशीं ? एका कादंबरीचे दोन शब्द या महिन्याला, आणि पुढचे दोन शब्द दुसऱ्या महिन्याला ! ते ध्यानांत रहावेत कसे ? आणि लोकांचें मन रमावें कसें ? ह्या साधारण विचाराची हेळसांड करणारांनीं तशा कामास हात तरी घालावा कशाला ? दुसऱ्याच्या शब्दांचा राग मानण्यापेक्षां आपल्या पुस्तकांत योग्य सुधारणा करावी हाच मार्ग प्रशस्त होय.

*
* *

**'हुन्नरकलादर्श'** हें चिमुकलें मासिकपुस्तक रत्नागिरी येथें निघतें. जसें **जी. बी. नायक** यांचें **'हुन्नरोत्तेजक'** तसें त्याच नमुन्यावर हें निघत असतें. अशा विषयांस लेखकाची तयारी फार उत्तम असावी लागते. केवळ परभाषेंतील उतारे, किंवा "अमण धबक्या"ची माहिती दिल्यांत विशेष महत्त्व नाहीं. शिवाय हुन्नरामध्यें 'जादू''सारखा फटवणीचा विषय कशाला ?

*
* *

खानापूर येथें निघणारें **'लोकमित्र'** 'नांव मोठें आणि दर्शन'–लोकांच्या वस्तु उचलाउचली करून आपल्या नांवाखालीं कशा दडपून द्याव्यात, ही विद्या शिकावयास हें मासिकपुस्तक केवळ गुरूच्या ठायीं आहे. विद्यादेवीच्या साम्राज्यांत असा उचलेपणाचा धंदा राजरोस चालावा, हें किती लांछन आहे ? पहिल्या पुस्तकांतील बारावा व दुसऱ्या पुस्तकांतील पहिला, असे दोनच अंक आह्मी पहावयास घेतले आहेत. एवढ्यांत आमच्या स्वतःच्याच किती वस्तु आहेत त्या पाहिल्या ह्मणजे मग इतर सर्व अंकांत आमच्या व इतर लोकांच्या किती किती असतील त्या परमेश्वर जाणे !

*
* *

ह्या मासिकपुस्तकांत चट सारे दुसऱ्याचे उतारे भरलेले आहेत. टायटल पेजावरची रामदासाची ओवी, कित्येक पुस्तककारांनीं अनेक वेळ घेतलीच आहे. तें असो. परंतु अथपासून इतिपर्यंत काय ? तोच प्रकार. बारावा अंकच प्रथम

घेऊं. प्रथमपृष्ठ व द्वितीयपृष्ठ केकावलि व एकनाथाष्टक ह्यानें भरलेलें आहे. तिसऱ्या पानांत थोडासा हितोपदेश आहे, तो मात्र कोणाचा हें आमच्यानें सांगवत नाहीं. पुढील पानावर पुन्हा रामदास, त्याच्यापुढें स्फुट वेंचे आहेत, तेही अशाच कोणा कवीचे असावेत काय? ह्यापुढें सार्थसुभाषित ह्मणून घातलें आहे. त्यांतील चवथा, पांचवा व सहावा हे तिन्ही श्लोक आमच्याच एका पुस्तकावरून अक्षरशः उतरले आहेत! दुसऱ्याची कृति बेलाशक व बिनदिकत आपल्या नांवाखालीं दडपणें, ह्यांत अशा लोकांस काय भूषण वाटत असेल तें असो? असा बिनभांडवली व्यापार कसा काय चालणार तें दिसतेंच आहे.

*
* *

दुसऱ्या अंकांतही तोच प्रकार. 'स्थलनिर्देश' असें भव्य सदर घालून त्या खालीं केरळकोकिळांत येऊन गेलेलें 'श्रीक्षेत्र शृंगेरी' चें वर्णन थोडीशी छाटाछाट करून दडपून दिलें आहे. एवढेंच नव्हे, तर बहुतेक वाक्यें तशींच्या तशींच आहेत. मुद्याचा शब्द तर सोडलाच नाहीं. आतां ह्या संभावितपणास काय ह्मणावें! ह्या लोकांना कीर्ति मात्र हवी, आणि श्रम करावयाला मात्र नकोत. अशा लोकांस कोंपरापासून नमस्कार करावा, दुसरें काय! लोकांचें शत्रुत्व संपादून 'लोकमित्र' ह्मणून पुढें यावयाचें? कोण हें धाडस!

*
* *

वेंगुर्लें पत्तनांत शीलातलावर अवतीर्ण झालेलें नूतन मासिक पुस्तक 'सुशील' कित्येक पत्रकारांस पुस्तकपरीक्षेची मोठी युक्ति साधलेली असावीसें दिसतें कीं, परीक्षेचीं पुस्तकें बरींचशीं सांठलीं, ह्मणजे त्यांचें तीन भाग करावयाचे. एक ठेवावयाचा डाव्या हातास; दुसरा ठेवावयाचा समोर; आणि तिसरा ठेवावयाचा उजव्या बाजूस आणि त्या ढिगल्यांच्या क्रमानेंच चांगलीं, बरीं, व भिकार असे शेरे मारावयाचे!

*
* *

किंवा ह्याहीपेक्षां सत्य स्मरावयाचें असल्यास, वरचे पुठ्ठे पाहून निवडानिवड केली तरी चालते. आणि खरी कँसोटीस लावावयाची असेल तर सर्व पुस्तककर्त्यांची नांवनिशी काढावी, ज्यांच्या नांवापुढें बी. ए. वगैरे अक्षरें असतील तीं, व ज्यांनीं आपल्या कृतीस मान डोलविली असेल, त्यांचीं पुस्तकें उत्तम. ज्यांनीं आपल्या पत्रास कधीं बरें वाईट ह्मटलेलें नाहीं, जे आपल्या ओळखीचे

नाहींत, त्यांचीं पुस्तकें बरीं. आणि ज्यांनीं आपल्या पत्रांतील दोष दाखविले असतील, त्यांच्या कपाळावर 'भिकार' नाहीं तर 'कांहीं तरी' हा शिक्का !

*
* *

आह्मांस वाटतें, कोचींतील व्हालकार्टच्या हाफीसांत एक वजन करण्याचा कांटा आहे, त्याजवर कोणताही मनुष्य—मग तो वजनांत भारी कीं हलका असो—जाऊन उभा राहिला ह्मणजे त्याचें तंतोतंत वजन पटकन् कागदावर आपोआप टिपलें जातें, तसें एखादें पुस्तकपरीक्षेचें यंत्र निघालें, तर वरची सर्व खटपट चुकेल. पुस्तक नेऊन न्यायतराजूवर ठेवलें, कीं त्यावर काळा ह्मणा किंवा पांढरा ह्मणा शिक्का बसलाच ! असो. अशाच वर्गापैकीं आमचे बालबोधकार बंधु दिसतात. 'चांगलें' 'बरें' आणि 'कांहीं तरी' ही त्यांची त्रयी नेहेमीं हजर असावयाची. मग ज्याच्या नशिबानें जी गळ्यांत माळ घालील ती खरी.

*
* *

**'सुशीला'**चें नशीब सवाई शिकंदर. त्या बिचाऱ्यास कोणी बरें म्हणो कीं न म्हणो. बालबोधाच्या मधल्या कन्येनें—'विषयाची योजना बरी असते'—माळ तर घातलीच. ज्यास मासिकपुस्तककार बनावयास काय काय तयारी लागते त्याची कल्पना नाहीं; ज्ञानसमुद्राचा किनाराही ज्यानें अवलोकन केला नाहीं; पुस्तकरत्नांपैकीं एखादा हिराही संग्रहीं असण्याची मारामार; व्याकरण कशाबरोबर खातात हेंही ज्यानें ऐकिलेलें नाहीं, शुद्धलेखनाचे नियम स्वप्नांतही ज्याच्यापुढें दिसले नाहींत, दुसऱ्या इयत्तेतील मुलास येणारे 'आणि' 'तूं' असले शब्द सुद्धां ज्यास लिहितां येत नाहींत, पांचचार अशुद्धांशिवाय ज्याची एक ओळ तडीस जात नाहीं, अशा वाचस्पतींनीं मासिकपुस्तककार बनणें ह्मणजे 'घटानां निर्मातु स्त्रिभुवनविधातुश्चकलहः'—गाडगीं घडणाऱ्या कुंभाराची आणि सृष्टि घडणाऱ्या ब्रह्मदेवाची शर्यत लावणें होय.

*
* *

मग अशी वेडी हौस पुरवून घेणारास 'गाजर' ह्मटलें, आणि त्यास 'बरें' ह्मणून "सर्टिफिकटें" 'देणारास' गाजरपारखी ह्मटलें तर काय वरें वाईट? 'कोणतेंही काम विचारपूर्वक करावें. आपलें सामर्थ्य, अवसान मनांत आणावें, प्रथम लहान लहान कामें शेवटास न्यावींत, थोडथोडें यश संपादन करावें,

आणि मग विद्वत्समाजांत उभें राहण्याचें धैर्य करावें; नाहीं तर 'हुरळली मेंढी, आणि लागली लांडग्याच्या पाठीला' अशी अवस्था होते. असा वडिलार्जित उपदेश आहे.

*
* *

आतां शेवटचा 'नंबर' राहिला. तें नागपूरचें 'रसिकोद्यान' पुस्तकाचें बाकी कसेंही असो; पण जीं अक्षरें कागदावर नमुद केलीं, तीं वाचावयास तर मिळालीं पाहिजेत ना ?. त्याचा सुद्धां या पुस्तकांत अभाव ! पण हो; दुसऱ्यांस दोष वगैरे काढतां न यावेत. ह्मणून ही क्रिति तर नसेल ना ? 'येनकेन' प्रकार करून लोकप्रसिद्धीचें कार्य होईल, असें लोकांस वाटतें तरी कसें ? ह्याचेंच मनाला आश्चर्य वाटतें. अशीं मासिकपुस्तकें ह्मणजे आमच्या करामतीचे झेंडेच होत ! आणि त्यांचा जर कोणीं उपहास केला, तर ते त्यास कोंपरापासून जोडणार. बाबांनो ? कोंपरापासूनच कां ? गुडघ्यांपासून पाहिजे तर जोडा बरें. आमची मुभा आहे.

---

*
* *

झालें. आमच्या मासिकपुस्तककार बंधूंच्या भेटीचें काम उरकलें. आतां वर्तमानपत्रबंधूंकडे वळावयाचें. तें थोड्या सवडीनें वळूं. ह्या भेटींत कोणी योग्य असून त्यांचा योग्य सत्कार झाला नसेल, किंवा नजरचुकीनें कोणाचें विशेष आगत स्वागत झालें नसेल, अथवा गैरसमजानें कदाचित् अवमानही झाला असेल, तथापि ही सांवत्सरिक भेटीच्या मुलाकतींची गर्दी आहे. अशा गर्दींत थोडी तरी धांदलपट्टी उडणें हें कांहीं जगद्विरुद्ध नाहीं. यास्तव त्याबद्दल आमचे मासिकपुस्तककार बंधु सप्रेम क्षमा करतील अशी आशा करतों.

*
* *

---

# पुस्तकपरीक्षा.

**दक्षणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास**—भाग ३—हें पुस्तक पार्शी ग्रंथांच्या आधारें प्रोफेसर बा. प्र. मोडक ह्यांनीं तयार केलें आहे. व अशा प्रकारचे

ऐतिहासिक ग्रंथ त्या भाषेंत पुष्कळ आहेत, असेंही त्यांनीं सुचविलें आहे. सदरहू पुस्तकांत अहमदनगर, गोवळकोंडें, बेदर आणि वऱ्हाड येथील निजामशाही, कुतुबशाही, बेरीदशाही आणि इमादशाही इतक्या मुसलमानी राज्यांचा इतिहास विस्तारेंकरून सांगितला आहे. भाषा शुद्ध, वर्णन रसाळ, आणि माहिती विपुल आहे. प्रोफेसर **मोडक** ह्यांचीं सर्वच पुस्तकें महत्त्वाचीं, ज्ञानसमृद्धीचीं, आणि लोकोपयोगीं अशीं असतात. ह्यास्तव महाराष्ट्रवाचकांनीं त्यांचे जितके आभार मानावेत तितके थोडेच होणार. प्रस्तुत पुस्तक आश्रयास पात्र आहे, ह्मणून वेगळें सांगणें नको.

---

## २ बुद्धिबळांचा प्रश्न.

### बारिक हिकडून.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ह. | | | | |
| प्या. | | व. | | | ह. | | |
| | प्या. | | | | उं. | उं. | |
| | | ह. | | | | रा. | प्या. |
| प्या. | | | | प्या. | | | |
| | प्या. | | | | प्या. | | प्या. |
| | | | | | | | |
| | रा. | उं. | | | | | ह. |

**जाडा हिकडून.** जाडा प्रथम खेळा; व ४ डावांत प्यादेमात करा.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, BOMBAY.

## शहामृग.



आकारांत, शक्तींत आणि धांव मारण्यांत शहामृगा येवढा दुसरा जबरदस्त पक्षी नाहीं. पायांपासून मस्तकापर्यंत शहामृगाची उंची दहा फूट असते. ह्मणजे मनुष्याच्या दुपटी इतकी झाली ! हे पक्षी आफ्रिकेच्या आणि आरबस्थानाच्या वालुकामय प्रदेशांत राहतात. आरब लोक शहामृगाला, त्याच्या मानेच्या आकारावरून ‘ उष्ट्र पक्षी ’ अशा अर्थाचें नांव देतात. त्याची मान कांहींशी उंटासारखी दिसते, हेंच केवळ त्याचें कारण आहे असें नाहीं, तर उंटाप्रमाणें हे पक्षी वालुकामय प्रदेशांत राहतात, व त्यांतून उंटाप्रमाणेंच कित्येक दिवस पाण्यावांचून प्रवास करतात. शहामृगाला जरी पंख आहेत, तरी त्यास उडतां येत नाहीं ! पण धांवतांना त्यांचा तो वल्ह्यांप्रमाणें उपयोग करतो. पंख पसरून व ते हालवून तो मनस्वी जलद धांवतो. तें त्याचें धांवणें इतकें जलद असतें कीं, शर्यतींतला उत्तम घोडा सुद्धां त्याच्यापुढें टिकावयाचा नाहीं !

इतर पक्ष्यांप्रमाणें शहामृगास कौशल्ययुक्त घरटें बांधतां येत नाहीं. वाळूमध्यें एक विवर पाडलें ह्मणजे त्याचें घरटें झालें. ह्या विवरांत ह्या पक्ष्याची मादी प्रत्येक खेपेस दहा किंवा बारा अंडीं घालते, आणि रात्रंदिवस त्यांजवर बसून राहते. कडक उन्हाळा असला, तर मात्र ती त्यास सोडून जाते, एरवीं जात नाहीं. **आरब** लोक व **आफ्रिकन** लोक त्यांच्या अंड्यांचीं नाना प्रकारचीं पक्कान्नें करतात. आणि कितीएक लोकांस तर तीं फारच आवडतात. शहामृगाच्या अंड्याचा आकार मोठ्या नारळाहूनही मोठाच असतो. मुसलमान लोकांच्या मशीदींतून आणि हिंदु लोकांच्या मोठमोठ्या देवालयांतून शहामृगांचीं अंडीं मंगलतोरणांप्रमाणें देवावर टांगलेलीं असतात. ह्या अंड्यांवरची कवची फार जाड आणि चांगली मजबूत असते. ती इतकी कीं, सतारी, तंबुरे, इत्यादि वाद्यांस श्रीमंत लोक भोपळ्याच्या ऐवजीं तिचा उपयोग करतात.[1] ह्याशिवाय तिचे पेले वगैरे अनेक पदार्थ फार सुरेख होतात.

शहामृगाची पारध करणें तर घोड्यावर स्वार होऊन करतात. परंतु त्याची धांव इतकी जलद असते कीं, तो हातीं सांपडतांना नाकीं नळ येतात. तो धांवतांना सरळ धांवत नाहीं, तर नागमोडी आकारानें सशासारखा, एकदां ह्या बाजूस व एकदां त्या बाजूस असा धांवतो. त्याची जर पारध्यास माहिती नसली, तर तो कधींच सांपडावयाचा नाहीं. ह्या कारणास्तव, माहितगार पारध करणारे असतात ते शहामृग कसाही वांकडा तिकडा पळाला, तरी आपला रोंख फिरवित नाहींत. घोडा सारखा सरळ रेषेंत भरधांव सोडतात, ह्मणजे थोड्याच वेळांत थकून तो त्यांच्या हातीं लागतो.

पारधी लोकांस कधीं कधीं शहामृगाचा, दोन दोन दिवस तीन तीन दिवस सुद्धां सारखा पाठलाग करावा लागतो. असें झालें ह्मणजे तो पक्षी अगदीं थकून जातो. कारण, तो जरी फार चपळ आहे, तरी घोड्याइतका सशक्त नाहीं. तो हातीं सांपडला तरी त्यास धरणें फार कठीण पडतें. तो पारध्याभोंवतीं गरगर फिरतो, आणि त्यावर तुटून

---

१ श्री० बाळासाहेब बावडेकर ह्यांच्या संग्रहीं शहामृगाच्या एक दोन सतारी असून त्या फार पाहण्यासारख्या आहेत.

पडून पुरा पाडाव होईपर्यंत त्याला अगदीं जेर करून सोडतो. त्याच्या चोंचीचा आणि पायाचा मारा फार भयंकर आहे.

**आफ्रिकें**तील कांहीं जंगली लोक शहामृगाची पारध कांहीं निराळ्याच प्रकारानें करतात. त्यांच्यापैकीं कोणी तरी एक मनुष्य आपल्या भोंवतीं शहामृगाचें चामडें व पिसें गुंडाळून घेऊन बेताबातानें हळू हळू चालत त्यांच्या कळपाच्या जवळ जवळ जातो. त्याच्या चालण्याच्या ढबीवरून, पंखें हालविण्यावरून, शहामृगांस, तो एक आपल्यापैकींच पक्षी आहे असें वाटतें. त्यामुळें ते निष्काळजी असतात.

शहामृगाचा कळप बाणाच्या माराच्या टप्प्यांत आला असें वाटलें, कीं तो मनुष्य एक विषारी बाण त्या कळपावर सोडून देतो, ह्मणजे त्यांतील कितीएक पक्षी पडतात.

एक प्रवाशी, **आफ्रिकें**तील **नायजर** नदीच्या कांठीं असलेला **फ्रेंच** लोकांचा कारखाना पहावयास गेला होता. तेथें त्यानें एक माणसाळलेलें शहामृगाचें पिलूं पाहिलें. तें इतकें माणसाळलेलें होतें कीं, तेथील शिद्याचा एक दहा पंधरा वर्षांचा मुलगा त्यावर बसून खुशाल त्यास पिटाळित असे. प्रथम प्रथम तो हळू हळू चाले. पण शेवटीं त्याची गति इतकी वाढे कीं, शर्यतीचा घोडासुद्धां त्यापुढें कांहीं नाहीं ! अशा गतीनें तो मुलगा शहराभोंवतीं किती तरी प्रदक्षिणा करी.

शहामृगाच्या पंखांचीं आणि शेपटांचीं, पिसें अत्यंत मृदु, सुंदर, व सफेत असल्यामुळें त्यांस मोल फार पडतें. **प्रिन्स आफ वेल्स**च्या मुकुटाच्या कळसाला शहामृगाचीं तीन पिसें लावलेलीं असतात, हें आमच्या बहुतेक वाचकांस माहित असेलच. ही चाल पडण्याचें कारण, इ. सन १३४६ मध्यें **क्रेसी**च्या लढाईंत **बोहीमिया**चा राजा पतन पावला. ह्यानें आपल्या मस्तकावर शहामृगाचीं पिसें धारण केलीं होतीं. व आपणांस 'सेवक' ह्या अर्थाचा किताब घेतला होता. ह्यास्तव विजय पावणारा **एड्वर्ड–प्रिन्स आफ वेल्स,** ज्याला **'ब्ल्याक प्रिन्स'** असें ह्मणत, त्यानेंही तेंच भूषण व तीच किताबत स्वीकारली. आणि त्यापुढें जे जे इंग्लिश राजे झाले, त्यांनीं तीच चाल प्रचारांत आणली.

---

# मलबारवर्णन.

## त्रावणकोर संस्थानची संक्षिप्त माहिती.

**त्रावणकोर** संस्थानचें क्षेत्रफळ ६७३० चौरसमैल आहे. आणि वसूल ६६६६००० रुपये आहे. **केपकोमोरिन**पासून **कोची**पर्यंत **हिंदुस्थान** देशाचा जो नैर्ऋत्य किनारा, तेंच त्रावणकोरचें राज्य होय. प्राचीनकालीं मानलेल्या **केरळ** देशाचाच हा एक दक्षिणेकडचा विभाग आहे सर्व दक्षिण हिंदुस्थानांत **त्रावणकोर**च्या राज्याइतका दुसरा सुंदर प्रदेश नाहीं. पश्चिम घाटापैकीं कितीएक प्रदेश, समुद्रसपाटीपेक्षां ८००० फुटींहूनही अधिक उंच आहेत, आणि त्यांवर घोर जंगल आहे.

**उत्पन्न**—ह्या संस्थानांत उत्पन्नाच्या बाबी दोन आहेत. पूर्वभागांत जंगली मालाचें व घाटमाथ्याचें उत्पन्न. आणि पश्चिमभागांत समुद्रकिनाऱ्याचें उत्पन्न मिळून दोन्हीं उत्पन्नें ह्या राज्यांत पैदा होतात. घाटमाथ्याच्या उत्पन्नांत जंगली हत्ती, हस्तिदंत, व्याघ्रांबर, सागवान, शिसू, आगील ( पीपें करण्याचें लांकूड ) मध, मेण, धूप, वेलेची ( वेलदोडे ) काफी, मिरीं, चहा, आलें, हळद, नाकेशर, पतंग, बजरबट्टू, अरारोट ( तवकील ) वगैरे माल पैदा होतो. समुद्रकिनाऱ्याच्या उत्पन्नांत नारळाची पैदास दांडगी; शिवाय भातही बरेंच पिकतें. पूर्वेच्या बाजूस पडित जमीन पुष्कळ आहे. तेथपासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत तुरळक तुरळक खेडीं वसलेलीं आहेत. समुद्रकिनारा नारळीच्या वृक्षांनीं अगदीं भरून गेलेला आहे. निरनिराळ्या नद्या वाहत येऊन त्या समुद्रास अशा चमत्कारिक रीतीनें मिळाल्या आहेत कीं, त्या योगानें ठिकठिकाणीं मोठमोठीं गोड पाण्याचीं सुंदर सरोवरें बनलीं आहेत. तसेंच खाड्याही मोठमोठाल्या असल्यामुळें व्यापारास व स्थलांतरास मोठी सोय झालेली आहे. ह्मणजे समुद्रकिनाऱ्याच्या आंतील बाजूस संथ पाण्याचा एक

१ सागवान, हत्ती, हस्तिदंत, वेलदोडे वगैरे मालावर सरकारचा पाहरा असतो. व प्रत्येक वर्षीं त्याचा लिलांव करतात. २ ह्या प्रांतीं वेलदोड्यांची लागवड करण्याची मुळींच गरज पडत नाहीं. ते आपोआप जंगलांत उगवतात. त्याचप्रमाणें रताळीं, नारिंगें वगैरे कितीएक कंदमुळें, फळें हिकडे आपोआपच उत्पन्न होतात.

मोठाच संचय झाला आहे. व त्यास लहान मोठे कालवे जोडून सोयी-वार रस्ते केलेले आहेत. घाटमाथ्यावर चहा, काफी, इमारतीचें लांकूड आणि वेलदोडा ह्यांचें उत्पन्न अतिशय मोठें आहे. भात, नारळ, ताड, मिरीं आणि सुपारी ह्यांचीं उत्पन्नें हीं वरिष्ठ प्रतीचीं आहेत. फणस खाण्यास उपयोगीं पडतात, आणि त्यांचें लांकूड इमारतीच्या कामास येतें. **टेपोका**चीही विपुल लागवड होते.

**लोकवस्ती**—सन १८८१ च्या खानेसुमारींत ह्या संस्थानांत हिंदूंची संख्या १७९१००० ; युरोपियन लोकांची ४९८००० ; आणि मुसलमान लोकांची १४७००० भरली. सन १८९१ मध्यें एकंदर २५५७८४० झाली.

**कोची** संस्थानाप्रमाणेंच **त्रावणकोर** संस्थानांतही ख्रिश्चियन लोकांची वस्ती फार आहे. येथील अति प्राचीनकालचे ख्रिश्चियन ह्मटले ह्मणजे सीरियन लोक. त्यांची संख्या २८७००० आहे. रोमन क्याथालिक धर्माचे लोक १९४००० आहेत. युरोपीयन लोकांच्या तीनशें वर्षांतील हा प्रताप! प्राटेस्टंट धर्माची लोकसंख्या ६७००० आहे. ह्यांचा प्रसार ह्या शतकाच्या प्रारंभापासून झाला. मुसलमान लोक आहेत ते बहुतकरून आरबस्थानांतून आलेल्या प्राचीनकालच्या मुल्लांनीं बाटविलेले आहेत.

ह्या संस्थानांतील सुमारें $\frac{4}{5}$ लोक मलबारी भाषा बोलतात. व $\frac{1}{5}$ लोक तामिळी भाषा बोलतात. मलबारी लोकांच्या कांहीं चाली फार चमत्कारिक आहेत. नंबूरी ब्राह्मणांमध्यें सर्वांत वडील मुलाचें मात्र लग्न होतें, व त्याचा वंश मात्र वारसदार होतो. त्यांच्या स्त्रिया कितीही वर्षें अविवाहित राहतात. केव्हां केव्हां चाळीस किंवा पंनास वर्षांच्या स्त्रीचें ही लग्न होतें! कांहीं स्त्रिया अविवाहित स्थितींतच वृद्ध होऊन मरण पावतात. अशा स्त्रिया मरण पावल्या असतां, त्यांच्याबरोबर एक कणकीचा किंवा तांदळांच्या पिठाचा पति करून दहन करितात! हे लोक आपलीं प्रेतें आपल्या आवारांतच दहन करितात. नांयर[1] (शूद्र) जातीच्या मुलीचें मंगळसूत्रबंधन मात्र ब्राह्मणाकडून होतें. नंतर त्या

१ इंग्रजी ग्रंथकारांनीं ह्या जातीचें वर्णन करतांना त्यांस (Nair) असें नांव दिलें आहे. ह्या शब्दाचा उच्चार हिंदुस्थान कथासारांत 'नेर' असा केला होता, ती चूक होय.

आपल्याच जातीचा अथवा, ब्राह्मण जातीचा पुरुष पसंत करून त्याज-बरोबर जन्म घालवितात. हा नवरा फक्त नांवाचाच असतो. त्याचा स्त्रीवर कोणत्याही प्रकारचा हक्क असत नाहीं. बहीण आणि बहिणीचीं मुलें घराण्याचीं वारसदार होतात. ज्या मनुष्यास बहीण नाहीं तो निर्वंशी समजावयाचा. ह्यास्तव तशा प्रसंगीं बहीण दत्तक घेऊन तिचा वंश पुढें चालविण्याची चाल आहे. त्रावणकोरचे महाराज जातीनें क्षत्रिय आहेत, तरी त्यांचा भगिनीवंशच वारसदार होतो. सिंहासनस्थ महाराजास बहिणी नसल्यास तेही वर सांगितल्याप्रमाणेंच बहिणी दत्तक घेतात. त्रावणकोरच्या महाराजांसही थोड्या दिवसांपूर्वीं बहिणी दत्तक घेण्याचा प्रसंग आला होता. हिंदुस्थानांतील बहुतेक लोक आपली शेंडी पाठीमागें ठेवतात, परंतु मलबारी लोक आपली शेंडी टाळूवर ठेवतात, आणि ती पुढें मस्तकावर लोंबत असते.

येथील महाराजांनीं तुलादान करावें, व सुवर्णधेनु किंवा सुवर्णपद्मदान करावें अशी चाल आहे. ही तुला झाली ह्मणजे पुनर्जन्मसंस्कार झाला असें समजतात. हा संस्कार झाल्यानंतर महाराज बहुतकरून आपल्या कुटुंबांतील माणसांच्या पंक्तीस बसून भोजन करीत नाहींत. तर ते मग ब्राह्मणांच्या पंक्तींत बसण्यास पात्र होतात. तुला करतांना आपल्या भारोभार सुवर्णाची धेनु करून मग ती विभागाविभागानें ब्राह्मणांस दान देतात. ह्या राज्यांत अन्नसत्रांचा तडाका फार मोठा आहे. एका त्रावणकोरांतच ब्राह्मणांसाठीं बांधलेलीं ४९ अन्नसत्रें आहेत.

ह्या देशांतून परठिकाणीं जाणारे जिन्नस ह्मटले ह्मणजे नारळ, मिरीं, सुपारी, लकडा, वेलदोडे, काफी, सुंठ इत्यादि होत. परदेशांतून ह्या संस्थानांत येणारे जिन्नस ह्मटले ह्मणजे कापड, तांदूळ, कापूस, व तांबें इत्यादि होत. पूर्वींपासून मोठें दळणवळण जलमार्गाचें; पण आतां बरेच रस्ते झाले आहेत.

**प्राचीन इतिहास**—त्रावणकोरचा प्राचीन इतिहास विश्वास ठेवण्यासारखा मिळत नाहीं. येवढें खरें आहे कीं, ब्रह्मवीर **श्रीपरशुराम** ह्यानें हा प्रांत समुद्रापासून संपादन केला, आणि त्यांत नंबूरी ब्राह्मणांची स्थापना केली. इसवी सनापूर्वीं ६८ वर्षेंपर्यंत येथें त्यांचीच सत्ता चालत

होती. नंतर ब्राह्मण लोक एक क्षत्रिय आणून त्यास बारा वर्षेपर्यंत आपल्या राज्यावर कारभारी नेमीत. ही रीति सुमारें ४०० वर्षेपर्यंत चालली. ह्या नेमलेल्या क्षत्रिय कारभाऱ्यास **'पेरमाल'** असें ह्मणत. शेवटचा **पेरमाल चेर** देशांतला होता. ह्मणून त्यास **चेरमन पेरमाल** असें ह्मणत. पेशव्यांनीं कारभार करतां करतांच मराठ्यांच्या राज्याचा जसा स्वाहा केला, तसाच ह्या चेरमन पेरमालानें ह्या नंबूरी ब्राह्मणांच्या राज्याचा स्वाहा करून तें घशांत उतरविलें. आणि तें आपल्या सरदारांस वांटून दिलें. सर्वांत मोठा होता त्यास दक्षिणेकडचा विभाग आला. त्यापैकीं **'तिरुवान् कोडु'** ही त्याची राजधानी होय. तेथपासून ह्या संस्थानावर राजवंश सुरू झाला. **टिपू** सुलतानानें त्रावणकोरावर स्वारी केली होती, परंतु त्रावणकोरच्या महाराजांनीं इंग्रजांशीं तह करून त्यास हाकून लावलें. इ. स. १८०९ मध्यें ३०००० नायर लोकांनीं इंग्रज लोकांविरुद्ध बंड केलें होतें. परंतु तें लौकरच रसातळास गेलें. आणि त्रावणकोरचें एकछत्री राज्य आजपर्यंत कायम राहिलें.

सन १८८३ मध्यें ह्या संस्थानाचा वसूल सुमारें ६० लक्षांचा होता. जमिनीचा सारा १७॥ लक्ष; मिठाचें उत्पन्न १३ लक्ष; तंबाकू ७॥। लक्ष; जकात ४ लक्ष; वेलदोडे व लकडा ३$\frac{1}{2}$ लक्ष; सुपारी व अफूची जकात २$\frac{3}{4}$ लक्ष. ह्या वर्षीं पब्लिकवर्क्स खात्याकडे ८॥ लक्ष रुपयांची रकम खर्चीं पडली.

विद्याप्रसाराचें काम झपाट्यानें चालू आहे. त्रावणकोरच्या हायस्कुलांत व कॉलेजांत मिळून १७०० विद्यार्थी आहेत. तेथें मुलींचीही एक शाळा असून तिच्या देखरेखीवर एक मडम आहे. ह्या शाळेंत ७० मुली शिकत असतात. एकंदर संस्थानांत २४ जिल्हा शाळा, २४४ सरकारी देशभाषेच्या शाळा, आणि ४४० लहान लहान विद्यालयें आहेत. ह्या सर्वांत मिळून ३६००० मुलें विद्याभ्यास करीत असतात. ह्याशिवाय रोमन क्याथालिक मिशनरींच्या अनेक शाळा आहेत. त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या १६००० आहे. तंबुरान लोकांकरितां ( राजकुमार ) एक निराळेंच विद्यालय आहे.

राजे **सर टी माधवराव** दिवाण असतांना ह्या संस्थानांत त्यांनीं पुष्कळच सुधारणा केल्या. अद्यापि त्यांत आणखीही कांहीं सुधारणा होणें

जरूर आहे तरी, हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही देशी संस्थानाची हें संस्थान अगदीं बरोबरी करील.

**शहरें**—ह्या संस्थानचें राजधानीचें शहर **त्रावणकोर** हें समुद्रकिनाऱ्यापासून सुमारें दोन मैल आंत आहे. ह्याची वस्ती इ. स. १८८१ सालीं ४१००० होती. ह्या शहरच्या भोंवतालचा देखावा अत्यंत रमणीय आहे. महाराजांचे, राजकुमारांचे, व राजकन्यांचे वाडे किल्ल्यामध्यें आहेत. पद्मनाभाचें प्रसिद्ध देवालय ज्यास अनंतशयन असें ह्मणतात, तें देवालयही किल्ल्यांतच आहे. पद्मनाभाची मूर्ति फार मोठी असून ती शेषावर निद्रिस्थ झालेली आहे. ह्मणून त्यास **अनंतशयन** असें नांव पडलें आहे. ह्या मूर्तीच्या नाभिकमलांतून कमल निघून त्यावर ब्रह्मदेवाची मूर्ति आहे, ह्मणून त्यास 'पद्मनाभ' असें दुसरेंही एक नांव आहे. त्रावणकोरांत एक वैद्यकीय शाळा, ९ हास्पितळें, व ४ दवाखाने आहेत. सार्वजनिक उद्यानांत **'नेपियर'** नांवाचें पदार्थसंग्रहालय आहे.

ह्याशिवाय मुख्य शहरांत **अलफै** हें समुद्रकांठचें व्यापाराचें मोठें बंदर आहे. ह्या बंदरांतील लोकवस्ती २६००० आहे. **नागरकाइल** येथें १७००० आहे. **कायलन्** येथें मोठें लष्कर असून वस्ती १४००० आहे. आणि **कोट्यामची** वस्ती ११००० आहे.

पूर्वीचे महाराज **वंची बालरामवर्मा** हे इ. स. १८८० मध्यें कैलासवासी झाले. हल्लींचे महाराज **सर बालरामवर्मा** के. सी. एस्. आय. हे आहेत.

---

# लोकोत्तर चमत्कार.

## रक्ताची बदल.

**चरक, सुश्रुत, वाग्भट्ट** इत्यादि आपले वैद्यशास्त्रावरील ग्रंथ पाहिले ह्मणजे प्राचीनकाळीं आपल्या देशांत शस्त्रक्रियेचा अभ्यास उत्तम प्रकारचा होता, असें दिसून येतें; परंतु मध्यंतरीं ती विद्या लोपून जाऊन फक्त चिकित्सा मात्र कायम राहिली. सांप्रत इंग्लिश लोकांनीं शस्त्रक्रियेचें माहात्म्य इतकें वाढविलें आहे कीं, त्यांचे एक एक प्रयोग व ह-

स्तकौशल्य पाहून मन अगदीं थक होऊन जातें. एका मनुष्याच्या अंगांतील रक्त, दुसऱ्या मनुष्याच्या अंगांत भरून त्यास ताजातवाना करणें, ह्यासारखी अद्भुत क्रिया फार क्वचितच आढळून येईल. परंतु असेही अघटित प्रयोग अनेक डाक्टरांनीं अनेक वेळ केले आहेत, आणि त्यांत त्यांस यशही आलेलें आहे. कधीं कधीं एकाद्या मनुष्याच्या अंगांतील रक्त कमी होऊन, त्याच्या अभावामुळें, तो अगदीं मरणाच्या द्वारीं बसलेला असतो, अशा मनुष्याच्या अंगांत दुसऱ्या एकाद्या सशक्त मनुष्याचें रक्त, रक्तवाहिन्यांच्या द्वारें भरतात. ह्मणजे मरणोन्मुख झालेला मनुष्य चांगला ताजातवाना होतो. व ज्या मनुष्याचें रक्त काढतात त्यासही कोणत्या प्रकारची इजा होत नाहीं.

अशा प्रकारचा एक प्रयोग, **पालरमो** येथील **कन्सेझिनोच्या** हॉस्पिटलमध्यें करण्यांत आला होता. तेथें इ० स० १८६८ च्या सप्तेंबर महिन्यांत **गिसेपी गिनिओ** ह्या नांवाचा एक १७ वर्षांचा तरुण मुलगा आला. ह्याच्या एका पायास एक प्रकारचा चमत्कारिक रोग झाला होता. त्यामुळें त्यास बरेच दिवस तापही येत होता. व त्यायोगें त्याच्या अंगांत अशक्तताही बरीच आलेली होती. तो हॉस्पिटलमध्यें आल्यावर डाक्टर यांस असें आढळून आलें कीं, ह्याचा पाय कापून काढल्यावांचून हा कांहीं बरा होणार नाहीं. ह्मणून त्यानें त्याचा पाय कापून काढला. तेव्हां त्याच्या धमन्या तुटल्या, आणि त्यांतून मनस्वी रक्त वाहून गेलें. आधींच अशक्त, आणि रक्तही फार गेलें, त्यामुळें तो मुलगा अगदींच व्याकूळ झाला. त्याची नाडी मंदावली, डोळे निस्तेज झाले, हातपाय गार पडले, आणि तो लौकरच मरणार असें वाटूं लागलें. तेव्हां तेथें **एन्‌रीको अल्बनी** नांवाचा डाक्टर होता, तो ह्मणाला ह्यास जगण्याला एकच उपाय आहे. तो हा कीं, कोणा सशक्त मनुष्याच्या अंगांतील रक्त ह्याच्या अंगांत घातलें पाहिजे. असें केलें तरच हा वांचेल, नाहीं तर वांचणार नाहीं.

तेथें जवळच दोघे हॉस्पिटल असिष्टंट उभे होते. ते ह्मणाले आह्मी आपलें रक्त देण्यास खुषी आहोंत. परंतु ह्यास बरें करावें. डाक्टरानें ठिक आहे ह्मणून लागलीच शस्त्रांची पेटी काढली आणि दोघांच्याही मनगटाजवळील रक्तवाहिन्या बेतानें कापून रक्ताचा प्रवाह बाहेर का-

ढला, आणि रोग्याच्या दोन्ही दंडांस वेध करून रक्त शिरण्यास जागा केली. नंतर असिष्टंटच्या मनगटापासून रोग्याच्या दंडापर्यंत एक रबराची नळी लावून कुशलतेनें त्यांच्या देहांतील रक्त रोग्याच्या देहांत जाईल असें केलें. तेव्हां रोग्यास पुन्हा टवटवी आली व तो बोलूं लागला. तो ह्मणाला मला ऐकूं येत नव्हतें, व बोलण्याचीही शक्ति नव्हती. मी आकाशामध्यें केवळ अधांतरीं उडत आहें, असें मला वाटत होतें. रोग्याच्या अंगांत नीटपणें रक्त खेळूं लागल्यानंतर डाक्टरानें नळ्या काढून घेतल्या, व सर्व रक्तवाहिन्यांचीं तोंडें कुशलतेनें बंद करून टाकलीं. दोघेही असिष्टंट सशक्त असल्यामुळें त्यांचें रक्त भरून येण्यास कांहीं उशीर लागला नाहीं, व त्यापासून त्यांस फारशी इजाही सोसावी लागली नाहीं.

असेंच, पण ह्याहून विशेष चमत्काराचें दुसरें एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. **साफोर्ड शायर** येथील **कानाकच्या** हॉस्पिटलांत एका स्त्रीवर हाच प्रयोग करण्यांत आला होता. ही स्त्री क्षयरोगानें फार दिवस झिजून झिजून तिच्यांत अगदींच त्राण राहिलें नव्हतें. तिचे अंगांतील सर्व रक्त नाहींसें होऊन ती पांढरी फटफटीत झाली होती. तीस पाहून तेथील डाक्टर **जे० व्हीटक्राफ्ट** ह्मणाले, हिच्या अंगांत दुसऱ्या मनुष्याचें रक्त भरणें येवढाच काय तो हिला वांचण्यास उपाय राहिला आहे. तेव्हां तिचा नवरा बरोबरच होता, तो आपलें रक्त देण्यास तयार झाला. व वर सांगितल्या रीतीप्रमाणें त्यानें आपल्या रक्तवाहिन्या तोडून घेऊन सुमारें दोन पौंड रक्त आपल्या बायकोच्या अंगांत घालविलें. थोडीं मिनिटें गेल्यानंतर ती चांगली हुषार झाली, आणि तिच्या रक्ताचा प्रवाह चांगल्या रीतीनें सुरू झाला. व जो तिचा मृत्यु एक दोन दिवसांतच आला असें वाटत होतें, तो दूर पळाला, आणि ती पुष्कळ वर्षें वांचली.

आपल्या देशांत महामारीचा भयंकर रोग वारंवार उद्भवून हजारों मनुष्यें प्राणास मुकतात. ह्या रोगांत पोटामध्यें एका प्रकारचे सूक्ष्म जंतू उत्पन्न होऊन ते रोग्याच्या अंगांतील सर्व रक्त शोषण करतात, आणि तेणेंकरून रोगी मृत होतो. अशा समयीं जर दुसऱ्या सशक्त मनुष्याचें रक्त त्याच्या अंगांत भरलें, तर पुष्कळ रोगी त्यांतून बचाव-

तील, असें अनेक डाक्टर लोकांचें ह्मणणें आहे. परंतु तो प्रकार अद्यापि हिकडे सुरू झालेला नाहीं. हा अद्भुत प्रयोग कोणी कुशल व विद्वान् डाक्टरानें अवश्य करून पाहणें हें अत्यंत अगत्याचें काम आहे.

ह्या रक्ताच्या बदलींत आणखी एक विलक्षण चमत्कार सांगण्यासारखा आहे, तो सांगतों. रक्ताभावानें मरणोन्मुख झालेल्या मनुष्याच्या अंगांत ताजें रक्त भरलें असतां, तो नीट होईल. ही कल्पना प्रथमतः जेव्हां निघाली, तेव्हां डाक्टर लोकांच्या मनांत असें आलें कीं, दुसऱ्या मनुष्यास दुखवून त्याचें रक्त काढावें, त्यापेक्षां दुसऱ्या एखाद्या प्राण्याचें रक्त त्यांत भरावें हें बरें, असा विचार करून त्यांनीं पहिल्या रोग्याच्या अंगांत बकऱ्याचें रक्त भरलें. त्यानें तो बरा झाला खरा; परंतु पुढें वेड्यासारखा होऊन 'ब्यां, ब्यां' असें ओरडूं लागला ! असें झाल्यामुळें मनुष्याचेंच रक्त भरणें भाग पडलें. यावरून आह्मास वाटतें, ज्या मनुष्याचें रक्त भरावयाचें, त्या मनुष्याचे गुण व स्वभाव सुद्धां रोग्याच्या अंगांत येतील !

---

# विद्युन्मानस शास्त्र.

## व्याख्यान दुसरें.*

**स्त्रीपुरुषहो,**

**'विद्युन्मानस शास्त्र'** ह्या विषयाचा आतां चांगला खुलासा झाला, त्याचें अद्भुत सामर्थ्य कळून चुकलें, आणि मनुष्यजातीस त्याची केवढी आवश्यकता आहे,

---

* हें शास्त्र नवीन व अश्रुतपूर्व असल्यामुळें प्रथम त्यास बरेच हितशत्रु उत्पन्न झाले होते. ह्यास्तव व्याख्यात्यानें ह्या व्याख्यानांत त्यांच्या बद्दलच विशेष विवेचन केलें आहे. व त्याबद्दल श्रोत्यांची क्षमाही त्यानें मागितली आहे. ह्यास्तव आमचे वाचकही त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा करतों. ह्या व्याख्यानांत विश्वरचनेशीं परमात्म्याचा, आत्म्याचा, व विद्युल्लतेचा कसा संबंध आहे, व प्रस्तुत शास्त्राशीं त्याचा किती निकट संबंध आहे, येवढेंच दर्शविलें आहे. पुढील व्याख्यानापासून मुख्य विषयास प्रारंभ होईल. व्याख्यात्याची भाषाशैली फार मनोरम, अलंकृत आणि फार खोल विचाराची आहे. साधेल तितकें साधून मराठींत होतां होईल तितकें हें सोपें व स्पष्ट केलें आहे तरी, सामान्यतः एकाएकीं अर्थ समजणें बरेंच जड जाईल. ह्यास्तव अशा प्रकारचीं वाक्यें पुनःपुनः वाचावींत, येवढी आमच्या वाचकांस विनंती करणें इष्ट दिसतें.

हेंही स्पष्टपणें समजलें. आतां आपण सृष्टिक्रमाच्या अज्ञात प्रदेशांत पाऊल टाकण्यास, स्थूल आणि सूक्ष्म तत्वांची घडामोड पाहण्यास, व ज्या शास्त्राच्या आधारावर तीं उभारलीं आहेत, त्या शास्त्रांचा, आणि ज्या शक्तीच्या योगानें त्यांच्या अंगीं हा अद्भुत धर्म आला आहे, त्या शक्तीचा विचार करण्यास, सिद्ध झालों आहों. परंतु हें पक्कें समजावें कीं, मीं सांगितल्याप्रमाणें विलक्षण गोष्टी मनुष्याच्या विश्वासास पात्र होणें कठीण—हेंही माहित आहे कीं, कित्येक विद्वत्तेची घमंडी वाळगणाऱ्या लोकांस ह्यांचा अत्यंत तिरस्कार येईल, व ते नाकें मुरडण्यासही चुकणार नाहींत—ह्यास्तव, प्रथमतःच, ह्या शास्त्राच्या प्रघाताविषयीं व आमच्या स्वतंत्र विचारसौंदर्याविषयीं मला अंमळ खडखडीत बोललें पाहिजे. आणि जगत्कालाच्या युगायुगांतील शास्त्रद्वेष्ट्यांची दुर्दशाही मला सांगितली पाहिजे.

कोणत्याही एखाद्या नव्याच विषयांत प्रवेश करतांना, कसकशा अडचणी येतात, त्या मला कळत नाहींत असें मुळींच नाहीं. विद्युन्मानस शास्त्र खेरीज करून अन्य कोणत्याही विषयावर प्रतिपादन करण्यास आपण मला बोलावलें असतें, तर प्रस्तुतकालीं माझ्या अंतःकरणांत जे विचार उद्भवले आहेत, त्यांहून भिन्न विचारांनीं युक्त मी आपणापुढें उभा राहिलों असतों. मळलेला प्रशस्त शास्त्रमार्ग सोडून अज्ञात, निर्जन, अशा ओसाड प्रदेशांत पाऊल टाकणें हें कोणासही बरें वाटत नाहीं आणि तसें साहस अंगीकारल्यास मी लोकादरास मुळींच पात्र होणार नाहीं, अशीही माझी खात्री आहे. स्वतंत्र विचार आणि ठाम—मत ह्मटलें कीं त्यावर, दुसऱ्यांचीं शास्त्रीय मतें, कोणतीही चौकशी केल्याशिवाय जे लोक ग्रहण करतात, त्यांचा तिरस्कार आणि नाकमुरडणीं हीं असावयाचींच. हें माझें बोलणें, ज्यांस वारसदारीच्या हक्कानें एक प्रकारचे ग्रह प्राप्त झाले असतात त्यांस, व ज्यांचे खरोखरच ते वतनदार होऊन बसलेले असतात त्यांसच लागू आहे. कारण, एकानें त्यावर परिश्रम केलेले नसतात, व दुसऱ्यानें त्यावर विचार केलेला नसतो.

असे लोक विद्वत्तेनें आपणांस जरी श्रेष्ठ ह्मणवीत असले, व कदाचित् आह्मी शास्त्रांचे संरक्षक असें जरी ते ह्मणत असले, तरी ते त्यांचे कट्टे दुस्मान होत. जुनीं मतें कितीही असंबद्ध असलीं, तरी त्यांचें मंडन करण्यांत ते आपली सगळी पुण्याई खर्च करितात; व नवीं मतें जरी सत्य, उपयुक्त व थोर असून मनास खरीं भासलीं, तरी ते त्यांचे प्रतिपक्षी बनतात. असे लोक केवळ लोढणे होत. हे शिशापेक्षांही जड असून आमच्या भूगोलावर संचार करणाऱ्या शास्त्ररथाच्या चक्रावर लोंबकळलेले असतात. शास्त्ररथाची दौड पृथ्वीच्या आद्यकालापासून सुरू झालेली आहे. ह्यांतील उतारू थोडेच असतात, तथापि त्याचा वेग आणि कांति हा कालपर्यंत सारखी वाढतेच आहे. सांप्रतकालीं तर तो विद्युत्तेजानें आणि विद्युच्चांचल्यानें धांवत आहे; येवढेंच नव्हे,

तर तो खऱ्या विजेला, मनुष्याबरोबर, परिचित शब्दांनीं बोलण्यास भाग पाडतो![1] आणि हो; ती आपली वांकडी तिकडी रेषा केवळ काळ्या ढगांच्या हृत्पटलावरच लिहून राहत नाहीं, तर मनुष्यनिर्मित वर्णाक्षरांनीं त्याचे विचार कागदावर नमूद करून एका निमेषमात्रांत ह्या स्थलींचे त्या स्थलीं, व ह्या द्वीपाचे त्या द्वीपास ती नेऊन पोंचविते.

शास्त्ररथानें आमच्या ह्या भूगोलाच्या अगदीं बरोबर धांव मारावी अशीच योजना केलेली आहे. किंबहुना थोडी पुढेंच ह्मटलें तरी चालेल! जगत्प्रलयाच्या आणि महातमाच्याही पाठीमागें त्यानें वांचावें, असाच नियमानियम आहे. शास्त्ररथानें आपल्या सतत वाढणाऱ्या शक्तीनें, वैभवानें, व सौंदर्यानें प्रलयकालपर्यंत वुरसणाऱ्या थडग्यांत कुजत न पडतां ह्मणजे[2] मृत्यूच्या लोहपाशांतून अमरत्व संपादून, बुद्धिसौंदर्य व अमर्याद आनंदनिधि यांला वृद्धिंगत करीत शाश्वत जगांतून सदोदित चमकत जावें असें ब्रह्मलिखित आहे. मृत्युलोकचें मरणाधीन मनुष्य हेच त्याचे येथील उतारू. त्यास परलोकीं देव, गंधर्व, यक्ष, किन्नर, आणि आमच्या जातीपैकीं परमपदास पोंचलेले असे लक्षावधि लोक असतील! मनुष्याचें मन,—आत्मा—स्वभावसिद्ध श्रेष्ठपणाची दिव्य मुद्रा धारण करितें आणि ईश्वरीतत्वांचा उपभोग घेतें. त्यानें सनातन कालचक्राच्या गतीप्रमाणें आत्मशक्तीच्या द्वारें पक्वदशेस यावें असाच ईश्वरीसंकल्प आहे. ह्यावरून आमच्या मनास वळण देणारीं हींच तत्वें होत. व तीं परमेश्वराच्या हातांतून आलेलीं आहेत. तीं आह्मांस उगाच उभें राहूं देत नाहींत. त्यांची आज्ञा आह्मांस पुढें जाण्यास प्रवृत्त करते, आणि ती शिरसा वंद्य केली पाहिजे.

आपल्या खऱ्या विचाराचे सिद्धांत बाहेर काढण्याचें जोखम मनुष्यमात्रानें जर पत्करलें नसतें, तर शास्त्रसंभार, भाषणानें कधींच उदयास आले नसते, व पुस्तकांतही लिहिले गेले नसते; आणि विचारज्ञानाऐवजीं जिकडे तिकडे अज्ञानांधःकार आणि शून्याकार माजून राहिला असता. परंतु ह्या भयंकर शून्याकारा-

---

१ व्याख्यात्याचें हें रूपक जसें खोल तसेंच रम्य आहे. विजेनें तारायंत्र चालतें, हें सुप्रसिद्धच आहे. खरोखर विजेचा मूळचा शब्द 'कडकडणें' हा होय. परंतु शास्त्ररथानें, तीस, ए, बी, सी, डी वर्णात्मक शब्दांनीं मनुष्याशीं बोलावयास लावलें! ह्या वाक्यांत शास्त्राची थोरवी, आणि भाषणाची मनोरंजकता किती साधली आहे हें सांगणें नकोच. २ ख्रिस्तिधर्मात असा समज आहे कीं, प्रलयांतीं सर्व थडग्यांतील आत्मे ईश्वरापुढें (जिवंत होऊन) उभे राहतात. तेव्हां अर्थातच त्या प्राण्यांचे आत्मे तावत्कालपर्यंत कुजत पडलेले असतात व थडगींही वुरसतात. तो नियम ह्यास लागू नाहीं म्हणजे तो अमर आहे असा बोलण्याचा भावार्थ.

ऐवजीं आह्मी मानसिक आणि नैतिक सौंदर्याचीं, फलद्रुप झालेलीं क्षेत्रें, व विचाराच्या देखाव्याची अप्रतिम शोभा पहात आहों. त्यांतील भिन्न भिन्न प्रकारच्या मनोरम स्वरूपावर नजर फेंकली ह्मणजे आपल्या अंतःकरणांत गुप्त आनंदाच्या लहरी उसळतात. व त्याजवर मनुष्याच्या शोधक बुद्धीची प्रभा पडून सांप्रत त्याचें तेज मध्याह्नकालच्या सूर्याहूनही प्रखर झालें आहे.

कित्येक ज्ञानसंपन्न गृहस्थांनीं आपले विचार मोकळेपणानें बोलण्याची व लिहिण्याची छाती केली नसती तर, आजमितीस जें जें कांहीं नवें व विलक्षण दिसेल, त्याच्याविरुद्ध असणाऱ्या शास्त्रांच्या कृत्रिम, मित्रांस आज पुस्तकांतून जें ज्ञान मिळत आहे, तें मुळींच मिळालें नसतें. ज्यांच्या अंगीं स्वतः विचार करण्याचें सामर्थ्य ह्मणून नसतेंच. असे लोक मानसिक रात्रींतच ठेंचा खात बसणार. मळलेल्या ग्रंथमार्गातून आपलें पाऊल अंमळ बाजूस टाकण्याचें धाडस करून व सृष्टींतील अंतस्थ गोष्टींचें सत्यस्वरूप उदयास आणून पूर्वसंचित भरून राहिलेला जो ज्ञानसंग्रह, त्यांत आह्मी अणुरेणु इतकी तरी भर टाकित आहों. ह्या सृष्टिक्रमाच्या वेगवान् सहाटीचा अनादर करून जो आमचा धिःकार करील, तो पढिताग्रही समजला पाहिजे. आणि शाळा व पाठशाळा ह्या, मनांत शोधकबुद्धि उत्पन्न व्हावी ह्मणून स्थापिल्या असतात. व त्या शाळांत विद्यार्थ्याला पुस्तक व शिक्षक ह्यांच्या साह्यानें दुसऱ्यांनीं विचार करण्याचें, बोलण्याचें, व लिहिण्याचें कसें साहस केलें असतें, हें दिसून येऊन त्याच्या मनाची स्वाभाविक स्वछंदता, विचारशैली, व थोरपणा हीं भासूं लागून तोही त्याप्रमाणें करण्यास प्रवृत्त होतो. हें तत्व त्यांस मुळींच माहीत नाहीं, असें आह्मी समजूं. हेंच मनुष्यास मनुष्य बनवितें; व मनुष्यजन्माचा शेवट गोड करण्यास व त्यास उच्च शिखरास पोंचविण्यास उपयोगीं पडतें. आपण स्वतः कोणताही विचार न करितां जो केवळ दुसऱ्याच्या मनावर व पुस्तकावर अवलंबून राहतो, तो पुढील संततीच्या फायद्याकरितां आपले विचार कागदावरसुद्धां नमूद न करितां कोराच्याकोरा मातीस मिळतो !

ह्या जगतांत परमेश्वरानें सृष्टिक्रमानुसार सत्य गोष्टी स्थापन केल्या आहेत. त्या अनंत व भिन्नभिन्न आहेत, येवढेंच नव्हे, तर त्यांच्याबरोबरच त्यांस सनातनत्व व निर्विकारत्वही दिलें आहे. त्यांची संख्या वाढविणें ही गोष्ट केवळ अशक्य होय. सृष्टीच्या सामराज्यांत एकही सत्य गोष्ट नवी करण्याचें, किंवा त्यांतील एकही नाहींशी करण्याचें मनुष्याच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. त्या, मनुष्याच्या विश्वासावर किंवा अविश्वासावर अवलंबून राहात नाहींत. त्यांस अंधारांतून काढून सूर्यप्रकाशांत आणणें येवढेंच काय तें मनुष्याच्या हातीं आहे. आणि ज्यास हें करण्याचें सामर्थ्य आहे, त्याला त्रास देणें, त्याच्या क्रमास अडथळा करणें हें अनुचित आहे ये-

वढेंच नव्हे, तर उलट आपल्या मानवजातीचा तो हितकर्ता असें समजून त्याला उत्तेजन व पाठबळ देणें, हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

जगदुत्पत्ति करणारा सर्वात्मा हाच 'सृष्टि आणि सृष्टिधर्मप्रसिद्धि' ह्या प्रचंड ग्रंथाचा कर्ता व मालक होय. धर्मशास्त्रवेत्त्यांना निदान विद्वानांना तरी असल्या चमत्कारिक शास्त्रीय शोधांचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, किंवा कोणी तशा कामास पुढारी झाला तर "हें जर सत्य झालें तर हीं बायबलाचीं पुस्तकें पाण्यांत नेऊन बुडविलीं पाहिजेत," अशी हाकाटीहि करावयास नको. शास्त्रज्ञ मनुष्यास, अपारसत्यसागरांतील नवे भाग उघडकीस आले ह्मणून मुळींच भय वाटत नाहीं. सृष्टिक्रम आणि प्रसिद्धि ह्या दोन्ही भागांचा पूर्णपणें स्वामी, सर्वांतर्यामी परमात्मा असल्यामुळें त्याला प्रत्येक गोष्ट उघडी व शुद्धच आहे. जग, जगाच्या राहाटीची स्थापना व नियमन हीं करतांना त्यानें आपलें अगाध चातुर्य खर्च केलें आहे.

सहा हजार वर्षांपूर्वी हा भूगोल, व कदाचित् आमची सर्व ग्रहमालाही, पूर्णत्वास आलेली नव्हती; तरी, तो निर्माणकर्त्याचा पहिलाच प्रयत्न होता, अशी कल्पना करण्यास आह्मापाशीं कोणताही पुरावा नाहीं. अमर्याद आणि अनंत स्थलांमध्यें सूर्यकिरणांतील अणुरेणूप्रमाणें आह्मी तरंगत आहों. हे असे मनुष्यांनीं गजवरलेले भ्रमण करणारे गोल, मनुष्यांच्या तर काय, पण देवदूतांच्या ही गणती बाहेर आहेत. ह्याशिवाय जन्म, नियमन, तेज व सौंदर्य यांहीं युक्त होऊन ज्यांस अद्यापि अस्तित्वच प्राप्त झालें नाहीं, ज्यांचें जडस्वरूप अद्यापि व्यक्तच झालें नाहीं, अशा अनिर्मित स्थितीमध्यें हे गोल किती असतील त्याचा तर पत्ताच नाहीं. ह्यावरून हें जगदुत्पत्तीचें कार्य अनादि कालापासून चालत आलें आहे, आणि पुढेंही सर्वेश्वराच्या कारकिर्दीपर्यंत असेंच चालणार. हे ब्रह्मांडांतील अनंत गोल, विधात्याच्या हातांतून निघाले कीं, भिंगरीप्रमाणें असेच फिरत रहावयाचे. ह्या निर्माणक्रियेस प्रतिबंध ह्मणून नाहींच.

ज्या सर्व सृष्टहातापासून ह्या जगन्मालिका आणि त्यांचा क्रम आज अनंत युगें सारखा चालू आहे, व पुढें ही असाच चालणार. त्या अनेक सुखदुःखांस कारणभूत होणाऱ्या, सर्वेश्वराच्या—परमात्म्याच्या कल्पनांचा विचार करूं लागलें ह्मणजे, त्या अतर्क्य विषयांत आपलें मन भकून गोंधळून जातें, येवढेंच नव्हे, तर, त्याचा व्यापार अगदीं कुंठित होतो. आपल्या सभोंवतीं कोणत्याही दिशेला पहा; भिन्न भिन्न क्रम, निरनिराळ्या तऱ्हा; आणि चित्रविचित्र सौंदर्य ह्यांचीच परंपरा दृष्टीस पडते.

सर्व कल्पनेचा समुद्र जो परमात्मा, त्यानें हें सर्व, विद्युल्लतेच्या द्वारें तयार करून आपलें विशालत्व, सर्वव्यापकत्व, आणि उत्कृष्टपणा प्रगट केला आहे. ही त्या अजरामर मनाची,—आत्म्याची,—त्याच्या गुप्त क्रियेची, त्याच्या निर्विकारत्वाची आणि

उत्साहशक्तीची विद्या आहे. भ्रमण करणाऱ्या गोलांच्या गतीला, गळून पडणाऱ्या पानाला, आणि अखिल विश्वाच्या प्रचंड नियामक शक्तीला व्यापून राहणारी ही एक विद्या आहे. येवढेंच काय, पण सर्व ब्रह्मांड खुद्द तिचेंच ह्मटलें तरी चालेल. तिचा विस्तृतपणा, तिच्यांतील विषयांचें श्रेष्ठमहत्त्व, यांवरून स्पष्ट खात्री होते कीं, प्रत्येक स्वतंत्र, उदार, व शोधक अशा मनानें–आत्म्यानें–तिचा स्वीकार करणें, अत्यंत आवश्य आहे. स्त्रीपुरुषहो! माझ्या प्रस्तुत विषयाची संगति लावण्यासाठीं प्रथमच मी विश्वरचना व तिचा अवाढव्यपणा ह्यांच्या कल्पनेविषयीं दोन शब्द बोललों, ह्याचें क्षणभर आपणांस विषयांतर वाटेल तरी, त्याबद्दल आपण क्षमा करा. ह्या ब्रह्मांडरचनेशीं, भ्रमण करणाऱ्या गोलांशीं–आणि खचीत गळून पडलेल्या पानांशीं सुद्धां– प्रस्तुत शास्त्राचा अगदीं निकट संबंध आहे, असें पुढील व्याख्यानांत मी आपल्या प्रत्यंतरास आणून देईन. आमचा हा भूगोल, नाश पावला असतां, आह्मांस जेवढा अनर्थापात आहे, तेवढाच पान गळून पडल्यापासून, त्यावर रहाणाऱ्या जीवांस आहे. तसेंच, सर्व ब्रह्मांडांतील गजबरलेल्या अनंत गोलांतून, आमचा एक हा भूगोल नाहींसा केल्यास, पृथ्वीवरील असंख्यात अरण्यांतून एक पान गळून पडलें असतां, त्यांतील शोभेंत व रचनेंत जसा तिलप्राय कमतरपणा भासणार नाहीं, तसा त्यानेंही भासणार नाहीं. असो. आतां हें विषयांतर सोडून मी आपल्या पूर्व विषयाकडे वळतों.

कांहीं एककल्ली व तऱ्हेवाईक मनाचे लोक, व कित्येक शास्त्रपरिज्ञानांत एखाद-दुसरी पदवी मिळविलेले लोक, 'विद्युन्मानस शास्त्रा'च्या विरुद्ध आढळतात, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. किंवा थोडेसे बुद्धिवंतांत गणलेले लोक, ह्याचा उपहास करतात आणि ढोंग व आपमतलबीपणा ह्मणतात, ह्याचेंही फारसें नवल वाटायास नको. पण–ज्याअर्थी बुद्धीहून सद्बुद्धि ही अत्यंत श्रेष्ठ, व उच्चप्रतीची मानली आहे, त्या-अर्थी मी बिनधोक आणि धीटपणें प्रतिज्ञा करतों कीं,–सद्बुद्धिमान् मनुष्य, विद्युन्मानस शास्त्राच्या कधींही विरुद्ध जाणार नाहीं. येवढेंच नव्हे, तर, जग निर्माण झाल्यापासून आज तागायत जीं जीं ह्मणून नवीं शास्त्रें किंवा नवे सिद्धांत पृथ्वीवर उदयास आले आहेत, त्यांच्याविरुद्ध सद्बुद्धिमान् मनुष्य गेल्याचा दाखलाच मिळणार नाहीं. परंतु पूर्वी निर्दिष्ट केलेल्या कारणानें जिकडे लोकसमुदायरूपी वायु जास्त जोरानें वाहील ती दिशा पत्करण्यास डोळ्यांत तेल घालून बसणारे आणि वर सांगितलेल्या उपायांनीं आपल्या प्रसिद्धीची इच्छा करणारे, व जमलेल्या लोकांकडून क्षणभर वाहवा ह्मणून घेणारे अशा शास्त्रीय लोकांनीं ह्या शास्त्राला अडथळा करावा ह्यांत नवल तें कोणतें? ह्या गोष्टींवरून येवढें मात्र सिद्ध होतें कीं, विद्युन्मानस शास्त्र हें बाल्यस्थितींत असून पूर्वी उदयास आलेल्या मोठमोठ्या लोकोपयोगी शास्त्रांनीं

जी जी प्रारब्धदशा भोगल्याचें कागदोपत्रीं वज्राक्षरांनीं नमूद आहे, तिचाच तें वांटा घेत आहे. सर्व नूतन शास्त्राच्या बाल्यदशेंत, असले लोक विरुद्ध असतात, आणि त्यांच्या शोधकाचा उपहास, हेटाळणी व तिरस्कार करून ते हवें तसें तोंडसुख घेतात.

**हार्वे** ह्यानें रुधिराभिसरणाचा शोध लावून तो जगांत प्रसिद्ध केला. त्याच्या विरुद्ध आह्मीं वर्णनें केल्या प्रमाणें पुष्कळ बुद्धिमान्, शिकलेले व धूर्त असे लोक असून त्यांनीं त्याचा नाना प्रकारें छळ केला. त्यानें उभारलेला बुद्धीचा पंख हाणून पाडावा; त्याच्या लौकिकास हरताळ लावावा; त्याच्या अंतस्थ प्रीतीचें, आशेचें, आणि सुखाचें धवलपुष्प चिरडून टाकावें; आणि त्याचा दैदीप्यमान उजेडांत आलेला शोध, रात्रीच्या गर्द अंधारांत फेंकून द्यावा; ह्मणून त्यांनीं जंगजंग पछाडले. पण **हार्वेचें** नाम सत्कीर्तीच्या पटांत चिरंजीव होऊन राहिलें आहे; धमन्यांतून रक्ताचे प्रवाह वाहावयाचे ते वाहत आहेत; आणि त्याची गांजणूक करणाऱ्या विद्वानांचें मात्र नायनाट झालें. आपला हा भूगोल, आपल्या आंसावर राहाटगाडग्याप्रमाणें फिरतो, हा शोध **ग्यालिलियोनें** लावला. त्याविरुद्ध विद्वान् ह्मणविणाऱ्या लोकांनीं काहूर उठविलें; त्यास आणि त्याच्या सिद्धांतास नाहीं नाहीं ते शाप दिले; व अखेर हें ढोंग आहे, हा अप्पलपोट्या आहे, ह्यापासून मोठा अनर्थ होईल ह्मणून सरकारांत सुद्धां कळविलें. राजापुढें जाऊन त्याचा उपहास, तिरस्कार, व हेटाळणी करून हाकाटी करण्यासही ते चुकले नाहींत. त्यांनीं त्यास कोर्टापुढें उभें केलें, व कोर्टानें ही मोठ्या गंभीरपणानें न्याय केला कीं, ह्याचें मत पाखांडी आहे, ह्यास्तव ह्यानें, ही आपली पृथ्वी, स्थीर आहे ह्मणून उघडपणें कबूल केलें पाहिजे! ही राजाज्ञा त्यानें मान्य केली, आणि आपलें मत पाखांड ह्मणून कबूल केलें. पण शेवटीं ह्मणाला 'मीं येथें कांहीं जरी ह्मटलें, तरी पृथ्वी फिरावयाची ती फिरतेच आहे.' **ग्यालिलियोचें** नांव इतिहासांतील पृष्ठावर चमकत राहिलें आहे. त्या राजकीय ठरावानें पृथ्वीच्या अखंड गतीस कांहींच प्रतिबंध झाला नाहीं. त्यानें शोध लावून प्रसिद्ध केल्याप्रमाणें आजतागायत पृथ्वी फिरावयाची ती फिरतेच आहे. आणि त्याच्या मताविरुद्ध असणारे विद्वान्, जरी त्यांनीं आपला मान खर्च करून लोकप्रियता वाढविली होती, तरी ते स्मृतिसागरांत कोठें गडप्प होऊन गेले त्यांचा पत्ता नाहीं.

**न्यूटन**च्या बुद्धीनें, बाल्यदशेंतच त्याच्याकडून वाळूचे लहान लहान ढीग करवून, व पतन पावणाऱ्या फळांतही ती शक्ति उत्तम रीतीनें दर्शवून त्यास गुरुत्वाकर्षणाच्या अभ्यासाकडे वळविलें, तो आपल्या एका आवडत्या नदीच्या कांठीं पाण्याच्या तुषाराकडे पहात असतांच, तिनें त्यास स्नेहाकर्षणाच्या अभ्यासास लावलें. आणि तें शास्त्र

परिपूर्ण होण्यासाठीं त्यास पृथ्वीच्या मध्याकडे नेलें. लहानपणचे खेळ खेळण्यासाठीं तो समुद्रकिनाऱ्यावर गोटे जमा करीत असतां ताऱ्यांत घुसला, आणि अखेरीस त्यानें ज्योतिषशास्त्राचें ज्ञान जगांत प्रसिद्ध केलें. त्याची, खुळचट मस्तकांच्या मूर्खांनीं थट्टा आणि निंदा केली, त्याच्या दिव्य पद्धतीची, धिःकारानें आणि अपमानानें टर उडवून सोडली. जुन्या पद्धतीच्या शाळा, व ज्योतिषशास्त्रवेत्ते तर त्यास ढोंगी ह्मणूं लागले. परंतु गुरुत्वाकर्षणाच्या नियमांप्रमाणें जे जे परिणाम व्हावयाचे ते होतातच आहेत. आणि भ्रमण करणारे गोल, आकर्षणाची आणि प्रतिसारणाची आज्ञा शिरसा वंद्य करतातच आहेत. न्यूटन, सत्कीर्तीच्या उज्ज्वल प्रभेंत विराजमान झाला आहे. गर्द निशापटलावर नक्षत्रमालिकेंत त्याचें नांव खोदलें गेलें आहे. आकाशांतील गोलापासून पृथ्वीच्या मध्यबिंदूपर्यंत त्याचें परावर्तन पडलें आहे. आणि त्याच्या दिव्य शोधाचे शत्रु, विस्मृतिशून्याकाराच्या छायेंत अदृश्य झाले, व त्यांच्या भोंवतीं जमलेल्या क्षणैक कीर्तिरूप ढगांची आणि धुक्याची वाताहात होऊन गेली.

**फलटन**ची तर छीथूच उडाली. मूर्खांचा पुतळा कोणता? ह्मणून त्या वेळच्या शास्त्रज्ञांस विचारलें, तर, हा ह्मणून धिःकारयुक्त मुद्रेनें ते त्याच्याकडे बेलाशक बोट दावीत. येवढा गहजब कां? तर तो सांगूं लागला कीं, वाफ ही—केवळ हलकें आणि सौम्य द्रव्य, मनुष्याच्या फुंकराबरोबर उडून जाणारें—अद्भुत शक्तीचें एंजिन वाहून नेईल, आणि हजारों खंडी माल भरलेलें गलबत, वाऱ्यांतून, लाटांतून, भरतींतून खुशाल हाकारून नेईल. आजपर्यंतच्या वेडसर मेंदूंतील अतिशय वेडी समजूत ही असावी एक अथवा निखालस आपलपोटेपणाची युक्ति तरी एक किंवा मनुष्यांनीं आपल्या नादाला लागून सर्वस्वास मुकावें अशी कांहीं ठकबाजी तरी असावी एक. त्याच्या मित्रमंडळीस त्याच्या जयाची जरी फारशी आस्था नसते, तरी ते त्याचें एखाद्या अन्नदार मनुष्याप्रमाणें संरक्षण करतात. परंतु **फलटन**, जसा एखादा पर्वत, जमिनीपासून दूर अंतरावरील समुद्रांत कितीही लाटा उसळल्या, केवढेंही तुफान माजलें, तरी तिळमात्रही न डगमगतां, जसें आपलें मस्तक उंच करून निर्धास्त उभा राहतो, तद्वत् उभा राहिला आहे. ह्याच्या विरुद्धपक्ष फारच पिसाळला होता. ह्या पक्षांतील कांहीं नाक मुरडणारे लोक प्रथमतः अनुभव पहाण्यासाठीं **न्यूयार्क**हून **अलबनी**स जी आगबोट निघाली, तींत बसले होते. ते अगदीं छातीला हात लावून सांगत कीं, केवळ वाफेच्या शक्तीवर दीडशें मैल अंतर तुटणें, निखालस अशक्य आहे. वाफेशिवाय दुसरी कोणती तरी शक्ति हींत असली पाहिजे. त्याशिवाय ही **अलबनी**स पोंचणारच नाहीं! सांप्रतकालीं ह्या सूक्ष्म शक्तीच्या द्रव्याच्या (वाफेच्या)

योगानें आमच्या ह्या सुखी देशांतील एकून एक यंत्रें चालून तीं **फलटन**चा बुद्धिप्रभाव निदर्शनास आणित आहेत. रेल्वेच्या व आगबोटींच्या दळणवळणांनीं हीं आपलीं संस्थानें जोडलीं आहेत, त्यावरूनही तिचें स्वरूप चांगलें व्यक्त होतें. **अटलांटिक** महासागराच्या पैल तीरास असणारें **इंग्लंड**सुद्धां, ज्यांनीं आह्मांस परसांतील भाजी करून सोडलें आहे, ज्यांची शक्ति तुफानासारख्या भयंकर शत्रूंवरही आपला बाहुटा चढविते, त्या, **इंग्लंडां**तील अवाढव्य आगबोटी पाहूनही तिची चांगली कल्पना करतां येते.

**फलटन** हा फार बुद्धिवान पुरुष होता. ह्मणून जगांतील थोर पुरुषांचीं नांवें निघालीं, कीं त्यांत त्याचें स्मरण होतें. त्याच्या विरुद्धपक्षाचीं नांवेंही कोणास माहीत नाहींत, व त्याची दादही कोणी घेत नाहींत.

इतका वेळ मी पदार्थविज्ञानशास्त्रासंबंधें व यंत्रशास्त्रसंबंधेंच बोललों. व त्यांत, रसायनशास्त्रांतील पंचतत्त्वांचा आणि सृष्टींतील सर्वसाधारण व्यापाराचा मात्र समावेश केला. आतां आपण मानसशास्त्र प्रदेशांत शिरलों. आतां मी ह्याहीपेक्षां जास्त खुलासा करतों. प्रथमतः सामुद्रिकशास्त्रच कां घ्याना? अहाहा! काय त्याचें सौंदर्य, केवढी त्याची थोरवी, आणि किती त्याची उपयुक्तता! ज्याच्या योगानें मनुष्याची ललाटरेषा, आणि भवितव्यतेची दोरी समजली जाते. बुद्धि, समागम, वर्तन, सुखदुःख आणि इष्टानिष्ट ह्याचें ज्ञान होतें. आणि इतकें असून, आह्मा मनुष्यांना मनोरंजक तरी किती? पण अशा शास्त्रालाही कांहीं लोकांनीं निर्लज्जपणें शिव्या दिल्या; व कांहीं अद्यापि देत आहेत. ह्या शास्त्राचा पुरस्कर्ता **गॉल**, त्याचा छळ झाला. आणि **स्पर्जहेम, कोंब,** आणि **फाउलर,** ह्यांस अपशब्दवृष्टीचा स्वीकार करावा लागला. **न्यूयार्क** येथील दोघे गृहस्थ तर आज कितीएक वर्षें विरुद्धवाताच्या भयंकर तुफानांत सांपडले आहेत. अशा समयांतही त्यांनीं नेटानें सामना केला आणि त्या मनुष्यांचा हल्ला त्यांनीं मागें हटविला—शौर्य गाजविलें—भरभक्कम व मजबूत पुरावे मिळविले. आणि अद्यापपर्यंत ते समरभूमीवर ठासून उभे आहेत. ते दीर्घोद्योगी खरे. सदासर्वकाल आपल्या कर्तव्याविषयीं डोळ्यांत तेल घालून ते जागत असतात; डुलकी ह्मणून कशी ती घ्यावयाचे नाहींत. नव्या नव्या सुधारणा आणि नवे नवे शोध करण्यास रात्रंदिवस ते झटत आहेत. त्यांनीं हजारों मनुष्यांचे सांपळे, आणि हजारों मनुष्यांचीं नरकपाळें जमा केलीं. प्राचीनकालच्या शेंकडों प्रेतांच्या पेट्या मिळविल्या. खुळ्यापासून तों बुद्धिवंतापर्यंत, व खून करणाऱ्या पाषाणहृदयापासून तों तहत **हावर्डं**सारख्या महंताच्या अस्थीपर्यंत तपासणी केली. अनेक साधुसंत व धर्मशील पुरुषांचीं मस्तकें, सामुद्रिक शास्त्राच्या नियमांप्रमाणें ताडून पाहिलीं. व ज्या मा-

तापितरांनीं आपल्या लेंकरांस उत्तम व ममतेचें शिक्षण कसें द्यावें ह्मणून इच्छा दर्शविली, त्यांस त्यांनीं उत्तम सल्ला दिली. उदारमनाचे, सद्वर्तनाचे, व खरा स्नेह राखणारे मित्र कसे निवडावेत, हें त्यांनीं दाखवून दिलें. मनोमय भव्यराष्ट्राच्या निर्मल नदीप्रवाहांत मानसिक आणि नैतिक सुधारणा कशी करावी हें व्यक्त केलें.

अशा प्रकारचें जें शास्त्र, तें सुद्धां लोकांच्या मतानें खोटें! आणि अशा शास्त्राच्या शोधक मनुष्यावरही ह्या लोकांचा हल्ला! सामुद्रिकशास्त्रद्वेष्ट्यांचीं नांवें मानवस्मृतिसागरांत मज्जन झालीं तरीं, शास्त्रशोधकांच्या अस्थीसुद्धां जगांतील थोर मनुष्यांबरोबर गणण्यास पात्र होतील, आणि त्यांचीं नांवें कालाच्या शेवटच्या लंबकाच्या झोंक्यापर्यंत सत्कीर्तिपट्टावर चमकत राहतील.

कोणतेंही शास्त्र घ्या; त्याच्या बाल्यदशेचें कपाळ हेंच. तें जन्मास आलें पुरे; कीं त्याच्यावर युद्धपरशु उभारून धाव घालण्यास लोक तयार झालेच. आणि तें प्रौढ होईपर्यंत ते असेच आपआपल्या परी एकमेकांशीं झुजत राहावयाचे. ह्या दंग्यांत लक्षावधी तोंडपुजे धुळीस मिळतात. असल्या सोज्ज्वळ मन्वंतरांतही कित्येक लोक क्षणैक कीर्तीच्या नादास लागून लोकप्रीतीसाठीं हजारों थडग्यांतून पूर्वजांनीं कान झांकेपर्यंत व डोळे मिटेपर्यंत काढलेले शब्द झुगारून देतात, व त्यांच्या तत्त्वांची राखरांगोळी करून सोडतात, ही किती दुःखाची गोष्ट आहे? परंतु हे लोक इतिहासांत आपलें नांव चिरस्थायी करणाऱ्यांपैकीं नव्हत, व पुढील संततीला फायदा देणारेही नव्हत. असे लोक मनुष्य स्मृतींतून नाहींसे होतील, व पृथ्वीवर त्यांचा मागमोससुद्धां राहाणार नाहीं.

अशी सत्कीर्ति संपादन करण्याला मी कांहीं आडकाठी करीत नाहीं. तिच्या सोज्ज्वळ प्रतापाचा मी धिःकार करीत नाहीं, येवढेंच नव्हे, तर मी पक्कें जाणतों कीं, जे कोणी सदासर्वकाल सदाचरणानें आणि साधुत्वानें वागतील त्यांची कीर्ति दिगंतीं जाऊन ते इतिहासांतील पृष्ठावर श्रेष्ठत्व मिरवतील.

खरें पाहतां मनुष्य हा मरणाधीन प्राणी; त्याचें विद्यमान अस्तित्व क्षणभंगुर; तरी साठसत्तर वर्षांच्या टीचभर आयुष्यामध्येंच तो स्वशक्तीच्या बळावर किती उच्च प्रतीस चढतो वरें! वस्तुतः त्याचा दर्जा अत्यंत गरीबीचा; तरी तो आपल्या निर्मल हातानें सत्कीर्तीचें फळ धरतो. आपल्या शक्तीनेंच तो आपलें अन्न व आच्छादन मिळवितो, आपल्या मस्तकाभोंवतीं वैजयंती माला लपेटून घेतो, आणि परमेश्वराच्या खऱ्या शक्तींत एकरूप होतो. कीर्ति ही, प्रसंगविशेषीं शूरांस, श्रीमंतांस, ज्योतिषशास्त्रज्ञांस, व वेदांत्यांसही माळ घालते. तथापि प्रत्येक मनुष्यामागून अथवा प्रत्येक पदवीमागून तिनें आलेंच पाहिजे, अशी कांहीं ती बांधलेली नाहीं. ती फक्त

खऱ्याच्या मागें धांवत असते. तत्त्ववेत्ते व ज्योतिषी जरी गुरुत्वाकर्षणाच्या नियमांप्रमाणें पृथ्वीला खिळून राहिले आहेत व यःकश्चित् कीटकांमध्यें जरी त्यांची गणना आहे, तरी, ज्या योगें त्यांना पुढील जगांतील बातमी कळते व ज्याचा ते मोठा अभिमान वाहतात, तेंही त्यांस एक भूषणच आहे. परंतु ते क्षणैक लौकिकाच्या कितीही उच्चस्थानाप्रत पोंचले, स्वर्गलोकांत जाऊन जरी त्यांनीं आपलें बिऱ्हाड दिलें, आपलें उंच मस्तक तारामंडळास जरी त्यांनीं भिडविलें, आपल्या बुद्धिप्रभावानें शेंकडों अनुयायांसह सर्व सृष्टपदार्थांचा जरी विचार केला, किंबहुना सर्वेश्वराची विश्वरचना, किंवा अखिल ब्रह्मांड हातास यावें ह्मणून हातपाय झाडले,–धडपड केली–गटकळ्या खाल्ल्या;– कांहीं केलें तरी, सत्कीर्ति ह्मणून जी आहे, ती तेथें वास करीत नाहीं. तत्त्ववेत्त्यांस किंवा ज्योतिष्यांस जन्मतः सत्कीर्ति मिळावी असा कांहीं निर्बंध नाहीं, तर त्यांनीं बुद्धिसामर्थ्याहून थोडें तरी कांहीं विशेष केलें, तरच ती त्यांस प्राप्त होते.

जन्मतःच सत्कीर्ति प्राप्त व्हावी अशी शूरासही कांहीं सनद दिलेली नाहीं. त्याच्या शौर्यप्रभेनें बराच काल त्याच्या मस्तकाभोंवतीं मंडळ धरल्यानंतर, आणि बराच काल त्याच्या तेजानें जग दिपून गेल्यानंतर, थोडथोडा सत्कीर्तीचा अंकूर दिसूं लागतो. त्यानें विजयदर्शनार्थ धारण केलेल्या 'वैजयंती' हारांतील पत्रें, बार भरलेल्या तोफेच्या तोंडांतून गोळा करून आणावीं लागतात; त्यांचीं झाडें मनुष्यरक्तानें भिजलेल्या जमिनींत वाढलेलीं असतात, व दीन दुबळ्यांच्या अश्रुजलाचें त्यांस सिंचन असतें. ज्या काल्पनिक प्रतापाच्या उच्च शिखरावर तो मोठ्या डामडौलानें उभा राहिलेला असतो, तें शिखर हजारों मनुष्यांची कत्तल करून सर केलेलें असतें. त्याजवर जातांना मार्गांत मरणोन्मुख होऊन कण्हत पडलेल्या हजारों देशबांधवांस तुडवून जावें लागतें. आणि त्याच्या स्वारीमागें, अनाथ विधवांचे विलाप, व पोरक्या पोरांची रड हीं वाद्यें दुमदुमत असतात! अशा ठिकाणीं सत्कीर्ति राहत नाहीं. तोफेच्या गडगडाटांत, तरवारीच्या खणाखणींत, रणदुंदुभीच्या दणदणाटांत, किंवा घोर झुंजाच्या प्रतिध्वनींत, ती घुमत नाहीं. वीरांच्या सिंहनादांतही ती ऐकूं येत नाहीं. खेड्यापाड्याच्या आगीच्या उजेडानें, किंवा **मास्कोच्या** प्रचंड ज्वालांनीं ती दिसत नाहीं. प्रीतिभंगाच्या दुःखमय खोल सुसकाऱ्यांतून ती निघत

---

१ यूरोपांतील ग्रीक व रोमन या लोकांत प्राचीनकालीं युद्धांत विजय पावून आलेल्या वीराच्या मस्तकावर 'लारेल' नांवाच्या वनस्पतीचा हार घालीत असत. ही वनस्पती कधीं ही सुकत नसे अशी आख्यायिका आहे. आमच्या श्रीकृष्णाच्या कंठांत जी वैजयंती माला असे ती अखंड ताजी असे. ह्यास्तव 'लारेल' च्या मालेस 'वैजयंती' असें नांव दिलें आहे. 'वैजयंती' ह्या वनस्पतीचें नांव विग्रहकोशांत 'टाकळी' असें सांपडतें.

नाहीं, किंवा तिचें अमरत्व रणभूमीवर मरणोन्मुख होऊन पडलेल्या योद्ध्यांच्या विलापांतून ओढून काढलेलें नाहीं. तिचें मूळ फार उंच आहे; तिचा जन्म थोर आहे; आणि तिचा रोंख अत्यंत श्रेष्ठ आहे. बुद्धिमत्ता आणि सौजन्य, ह्या दोहोंच्या मागें मात्र ती धांवत असते. हीं दोन जेथें आढळून येतात, व जेथें त्यांचें संगोपन होतें, तेथेंच खऱ्या कर्तव्याची बजावणी आणि खरा सन्मान असतो. तिला लोकप्रियतेची आवश्यकता नाहीं, संपत्तीची किंवा वैभवाची चाड नाहीं, लोकापवादाची भीति नाहीं, लोकांत फजिती होऊन यातना भोगण्याची पर्वा नाहीं, किंवा जन्माचें मातेरें होण्याचाही धाक नाहीं. ह्यास अनुसरून जे कोणी वर्तन ठेवतील, तेच सत्कीर्तीस आणि सन्मानास पात्र होतील.

आतां नूतन शास्त्रोदयाचा उपहास करणारे लोक—माझे प्रतिपक्षी—मला ह्मणतील कीं, असें सत्कीर्ति संपादन केल्याचें एखादें उदाहरण पृथ्वीवर घडून आलें असल्यास दाखवा वरें. तर मी त्यांस, वरील कसास तंतोतंत उतरणाऱ्या दिव्य विभूतीचाच नमुना दाखवून देईन. असा मनुष्यपुत्रच मी त्यांस दाखवून देईन, कीं ज्याच्या सद्गुणाच्या, थोरपणाच्या आणि सत्यप्रियतेच्या प्रतापाचें वर्णन करतांना भाषा कुंठित होईल, मनुष्याचे शब्द रद्द पडतील, व मानवी वक्तृत्वाचें तेज काळें ठिक्कर पडेल.

# पुस्तकपरीक्षा.

**भारतभाग्योदय** अथवा नागपूर येथील ७ व्या राष्ट्रीय सभेचें साद्यंत वर्णन—**रा. रा. व्ही. रेळे आणि मंडळी** ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलें आहे. वर्णन फार चांगलें, व माहितीही विपूल आहे. भाषाही चांगल्या प्रकारची आहे. राष्ट्रीय सभा हा आपल्या देशाच्या हिताचा मार्ग आहे. त्याचीं तत्त्वें प्रत्येक हिंदूच्या मनांत बिंबलीं पाहिजेत. व तो प्रयत्न प्रस्तुत कर्त्यांनीं उत्साहपूर्वक आणि अंतःकरणाच्या कळवळ्यानें केला आहे. तेव्हां हें पुस्तक प्रत्येकाच्या संग्रहीं असावें.

**रजपूत कन्या तारा**—हें सुमारें १९ पानांचें श्लोकबद्ध 'वीररसप्रधानकाव्य' ह्मणून सेंटझेविअर्स कॉलेजांतील एक विद्यार्थी **पां० बा० द०** हें ज्यांचें संक्षिप्त नांव—ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. व त्यास एक बरीच लांब इंग्रेजी भाषेंत प्रस्तावना जोडली आहे. तींत ते ह्मणतात:—'The noble language' of Marathas, much as an Indian widow, is scorned everywhere. (हिंदू विधवेचा जसा जेथें तेथें तिरस्कार होतो, तसाच महाराष्ट्रभाषे-

चाही होतो.) यापुढें ग्रंथकार (!) स्वानुभव कळवितातः—The author himself has seen, not only children, but many a graduate, unable to express themselves in tolerable Marathi. (ग्रंथकर्त्यांनें स्वतः पाहिलें आहे कीं, केवळ मुलालांचाच नव्हे, तर युनिव्हर्सिटींत पास झालेल्या पुष्कळ लोकांस साधारण मराठीभाषासुद्धां बोलतां येत नाहीं.) 'फार लांब कशाला ? मी स्वतःही एक त्यांपैकींच आहें !' असें एक ग्रंथकारांनीं वाक्य घातलें असतें, तर असत्यविषाचें पवित्र पात्र न येतां, 'सत्यामृताची कनकवाटी'च हातांत आली असती ! ह्मणून मातृभाषेचा कळवळा येऊन ग्रंथकारः—

**"मला थोर जी मातृभाषा मदीया ॥ तिला योजितों सोवळें गीत गाया॥**

याप्रमाणें 'सोवळें गीत' गातात ! यांतील कथानक ह्मटलें तर **अंबरपुरा**मध्यें (जयपूर) **महाविक्रम** नांवाचा राणा राज्य करीत होता. त्यास एकुलतीएक लाडकी कन्या होती. तिचें नांव **तारा.** हिची आई लहानपणींच स्वर्गवासी झाली होती. हिजवर बापाचें फार प्रेम असे. ही मुलगी एके दिवशीं बागेंत बसली असतां, बापानें युद्धास जाण्याकरितां तिजपाशीं निरोप मागितला व तिनें तो दिला. नंतर ती निजली. तिला स्वप्न पडलें. दचकून उठली. पुढें दिसली तरवार. ती परजून महिषासुरमथनी प्रमाणें बनली. व पुढें कायशी बडबडूं लागली. (काय तें कोण जाणे !) झाला. संपला पहिला सर्ग ! कवींनीं उगाच ओढून ताणून चंद्रबळ आणलें आहे. नैसर्गिक गुण असा कांहींच नाहीं. कांहीं तरी खोगिरभरती आहे झालें. नीरसत्व, दूरान्वय व छंदोभंग ओतप्रोत भरलेला आहे. कवितांमध्यें ह्मणण्यासारखें सरस असें शपथेस एकसुद्धां नाहीं ! दोषस्थळें दाखवीत बसून विशेष जागा अडविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बागेच्या शोभेला 'वीररसप्रधान' ह्मणणें, हेंगाड्या दहावीस श्लोकांना 'काव्य' ही संज्ञा देणें, तुटपुंजा कवितांना 'सर्ग' मानणें, दहाबारा पानांच्या चोपडीला 'ग्रंथ' ह्मणणें, आणि अशा कृतीचा खेद न करतां 'ग्रंथकर्ता' ह्मणून आढ्यता मिरविणें ह्यापेक्षां सरस्वतीदेवतेची विटंबना ती कोणती ? "कवित्व हें नव्हे टांकसाळीं नाणें." ही तुकारामाची उक्ति ग्रंथकारांनीं ध्यानांत ठेवावी.

## बुद्धिबळांच्या २ ऱ्या प्रश्नाचें उत्तर.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जाडा | प्या. रा. ह. ४ | बारीक | रा. व. ह. ३ |
| २ | ,, | व.×व. | ,, | ह. व. घो. ४ किंवा (अ) |
| ३ | ,, | व.×ह. | ,, | उं. व. घो. ४ |
| ४ | ,, | प्या.×उं. | ,, | मात |
| (अ) २ | | | ,, | उं.–व. घो. ४ |
| ३ | जाडा | व.×उं. | ,, | ह ×व. |
| ४ | ,, | प्या.×ह. | ,, | मात. |

## ३ बुद्धिबळांचा प्रश्न.

### बारीक हिकडून.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | रा. |
| | | | प्या. | प्या. | रा. | प्या. | |
| | व. | | | | | | |
| | | | | प्या. | | | |
| | | | | प्या. | | | |
| | | | | | | | |

जाडा प्रथम खेळा; व ३ डावांत मात करा.


### जाडा हिकडून.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, BOMBAY.

# केरळकोकिळ.

पु० ७] [अं० ५


## सिंह.



मार्जारजातीपैकीं, कांहीं प्राण्यांचा जबडा विशाळ आणि पंजे मोठे व भरभक्कम असतात. तसेंच त्यांच्या अंगीं शोभा व चपळताही विशेष असते. त्यांच्या पावलांस तीव्र नख्या असून त्या, त्यांस आंत झांकून घेतां येतात, व कारण पडेल तेव्हां बाहेर काढतां येतात. अशा जातीचे प्राणी पृथ्वीच्या पृष्ठभागावर अनेक ठिकाणीं असून ते प्रसिद्ध आहेत. सिंह, वाघ, चित्ते हे सर्व ह्याच वर्गांतील प्राणी होत. आणि ते बहुतकरून पृथ्वीवर सर्वत्र आढळतात.

त्या सर्वांत सिंहाचा आकार भव्य; शक्ति प्रचंड; आणि रूप क्रौर्यशाली असल्यामुळें त्याच्याकडे या मृगजातींचें प्रमुखत्व येतें. आणि ह्मणूनच त्यास मृगेंद्र 'वनराज' असें ह्मणतात. सिंहांमध्येंही अनेक जाती आहेत. परंतु त्यांत दक्षिण आफ्रिकेंत आढळणारे सिंह श्रेष्ठ प्रतींत गणले जातात. पहिल्यापासून शत्रूस कधीं नामोहरम व्हावयाचें

नाहीं, अशाविषयीं सिंहाची मोठी प्रसिद्धि आहे. तोच त्याचा स्वभाव आजपर्यंतही चालत आला होता. परंतु सांप्रत मनुष्यांच्या बंदुक बारदानापुढें मात्र त्यास 'पीछे हट' करणें भाग पडतें. लोक नानाप्रकारच्या हिकमती करून लहान लहान श्वापदें कशीं पटकावतात, हें वारंवार त्यांच्या दृष्टीसमोर येऊं लागल्यामुळें सांप्रतकाळीं सिंह मनुष्याच्या थाऱ्यामोऱ्यासही उभे राहीनासे झाले. मनुष्याची चाहूल लागली, कीं ते पाय हळूहळू मागें काढतात. 'केप कालनी' जवळ पूर्वी हे उमदे प्राणी फार विपुल होते. परंतु सांप्रत ते इतके तुरळक झाले आहेत कीं, जिवंत सिंह पाहण्याचा प्रसंग ह्मटला ह्मणजे बहुतकरून पिंजऱ्यांतलाच; तो मोकळ्या मैदानांत आढळणें दुरापस्त !

सिंहाचा रंग पिंगट, ह्मणजे तपकिरी असून पोटाकडे पांढुरका, व पाठीकडे उदी होत गेलेला असतो. कान काळसर असून शेपटाच्या शेवटास काळ्या केसांचा झुबका असतो, मार्जारवर्गांतील प्राण्यांत व सिंहांत शेपटाच्या झुबक्याचाच काय तो मुख्य भेद. सिंह, ज्वानींत आला ह्मणजे त्यास लांब, केसाळ, व सडक अशी अयाळ येते. व ती वयपरत्वें मानेवर, खांद्यावर, हनवटीवर, आणि गळ्याच्या भागावर पसरते. वसतिस्थानाच्या हवामानाप्रमाणें हिच्यांत थोडाबहुत फरक असतो. सिंहाच्या मादीस ह्मणजे सिंहिणीस मुळींच अयाळ नसते. व नरालाही तीन वर्षें पुरीं होतपर्यंत ती फुटत नाहीं.

सिंहाची वाढ पुरी झाली ह्मणजे त्याची खांद्यापाशीं उंची चार फूट असते. आणि लांबी अकरा फूट असते. परंतु हा आकार स्वेच्छाचारी सिंहांचा समजावा. पिंजऱ्यांत जखडून, मेलेलें मांस खाण्यानें ज्यांच्या आंगचा जोम जिरून गेला असतो, अशा मदाड सिंहांचा नव्हे; त्यांची वाढ खुंटून ते बरेच खुरटे होतात.

सिंहापेक्षां सिंहीण लहान असते. व तिच्या मानानें सिंह, दिसण्यांत फार मोठा दिसतो. याचें कारण, त्याचा भव्यपणा आणि शोभा कायती अयाळांत, आणि सिंहिणीला ती असत नाहीं. परंतु खरें पाहिलें तर ती कांहीं सिंहापेक्षां इतकी लहान नसते. दिसण्यांत जरी ती लहान वाटते, तरी पराक्रमांत कांहीं कमी नाहीं. सिंहाइतकीच ती भयंकर आहे, येवढेंच नव्हे पण ती कांकणभर ज्यास्तच जाज्वल्य असतें.

आणि तिच्या जवळ जर पिलें असतील, तर मग तिच्या शत्रूंनीं जिवाची आशा सोडलीच पाहिजे. तशा स्थितींत ती आपल्या शत्रूवर बेफाम होऊन तुटून पडते. मग तो भारी असो किंवा हलका असो त्याची ती पर्वा करीत नाहीं.

सिंह हा मोठा शूर आणि अभिमानी प्राणी आहे. त्याची एक वेळ झडप चुकली, तर बहुतकरून तो पुनः त्या जनावराचा पाठलाग करीत नाहीं. दुसऱ्यानें मारलेल्या जनावरास तर कधीं शिवावयाचें नाहीं, असा त्याचा स्वाभाविक बाणा आहे. तो लपत लपत जनावराजवळ जातो, आणि तें आपल्या उडीच्या आटोक्यांत आलें ह्मणजे एकदम भयंकर गर्जना करून त्यावर झडप घालतो, आणि त्यास चीत करतो. त्याची गर्जना मेघगर्जनेसारखी गंभीर असते. ती ऐकतांच प्राणिमात्रांचीं काळिजें दुभंग होऊन जातात. सकाळपासून सायंकाळपर्यंत शोधून शोधून सिंहास भक्ष्य मिळाला नाहीं, तर तो आपुलें तोंड जमिनी सरसें धरून भयंकर गर्जना करतो. तेणेंकरून सर्व अरण्य दणाणून त्याच्या प्रतिध्वनीनें दाही दिशा गजबजून जातात. त्या योगें सर्व श्वापदें गर्भगलित होऊन जातात. कारण, केसरीराजांची स्वारी नजिक येऊन थडकली, असें त्यांस वाटतें. परंतु तो ध्वनि कोणीकडून येत आहे, त्याचें अनुमान त्यांस बरोबर होत नाहीं. सारे पशु घाबरून त्यांची दाणादाण होते. ते एकदम खडबडून कावरेबावरे होऊन पळत सुटतात. आणि त्यांपैकीं बहुतकरून एखाददुसरें जनावर, ह्या टपून बसलेल्या स्वारीच्या मुखीं पडतें.

प्रसंगोपात्त, सिंह, मनुष्यप्राण्यांवरही ताव मारण्यास चुकत नाहीं. आपल्या देशांत गुजराथ प्रांतांत बरेच सिंह आहेत. त्यांस अयाळ फार थोडी असते. हे सिंह कधीं कधीं खेड्यापाड्यांत शिरून मोठा अनर्थ करून सोडतात. एक वेळ माणसाच्या रक्ताची त्यास गोडी लागली, कीं मग तो मनुष्याच्याच पाठीस लागतो. आणि एकदां मनुष्यभक्ष्यावर तो सोकावला, कीं मग दिवसा सुद्धां गांवाभोंवतीं घिरट्या घालीत बसतो. याचें कारण असें आहे कीं, त्यास मनुष्य सहज सांपडतें. टपून बसलेला असला ह्मणजे बायका, पोरें, कोणी ना कोणी तरी त्याच्या मुखीं पडतेंच, त्यासाठीं त्यास पळावें लागत नाहीं,

किंवा शक्तिही खर्च करावी लागत नाहीं. ही त्यास संवय पडली ह्मणजे चपळ जनावरांच्या मागें लागणें त्यास कंटाळवाणें होतें. व त्याच्या अंगची चपलता व धैर्य हळुहळु नष्ट होऊन जातें. तेव्हां अर्थातच तो चपळ काळविटचा किंवा शक्तिमान् गव्याचा पाठलाग करण्याचें सोडून देऊन खेड्यापाड्याभोंवतीं घिरट्या घालीत बसतो. मनुष्याचे अवयव अशक्त, चाल हळु, आणि जंगली जनावरांपेक्षां त्याचें घ्राणेंद्रियहि मंद; असें असल्यामुळें ही मनुष्यशिकार त्यास श्रमावांचून सांपडते.

सिंहाच्या दांतांत एक विलक्षण धर्म आहे, तोही येथें सांगितला पाहिजे. कितीएक अशा गोष्टी घडून आल्या आहेत कीं, एखादा मनुष्य सिंहाच्या तडाक्यांतून वांचावा, आणि त्याचे दांत मात्र लागलेले असावेत ह्मणजे ती जखम असाध्य नंसतां, व बरी होण्याचें चिन्ह दिसत असतांही तो मनुष्य अकस्मात् मरतो. एके प्रसंगीं दोघां मनुष्यांस सिंहानें आपल्या दांतांनीं जखमी केलें. त्यांपैकीं एकास उघड्या अंगावर दांत लागले होते, व दुसऱ्यास कपड्यावरून दांत लागले होते. याचा परिणाम असा झाला कीं, पंहिल्या मनुष्याची जखम अगदीं क्षुल्लक होती तरी तो थोड्याच दिवसांनीं मरण पावला. आणि दुसऱ्याची जखम बरी झाली. यावरून येवढें अनुमान होतें कीं, सिंहाच्या दांतांत एक प्रकारचें विष असावें.

सिंहिणीस प्रत्येक खेपेस अनेक पिलें होतात. कधीं कधीं तीन तीन व चार चारही असतात. मात्र ही गोष्ट इसापनीतींतील "सिंहीण आणि खोकड" ह्या गोष्टीशीं अगदीं विरुद्ध आहे. कांहीं दिवस सिंहाचीं पिलें फार गोजिरवाणीं दिसतात. त्यांच्या अंगावर वाघासारखे सुरेख पट्टे असतात. त्यामुळें त्यांची आकृति वाघाप्रमाणें किंवा बाळ्या मांजराप्रमाणें हुबेहुब असते, ह्मटलें तरी चालेल; परंतु ते त्याचे पट्टे, पिलूं जसजसें वाढतें, तसतसे मावळत जातात. सिंहाचीं पिलें, लहानपणीं मांजरांच्या पिलांप्रमाणेंच फार खेळकर असतात. आणि जो कोणी त्यांच्या बरोबर धैर्य धरून खेळेल त्यांजबरोबर तीं खेळतात. पण कोठपर्यंत? लहानशा मांजरायेवढीं आहेत तावत्कालपर्यंत. पुढें तीं आपल्या जातिस्वभावावर येतात. तीं मोठीं झाल्यावर त्यांच्याशीं खेळणें फार भयंकर आहे. कारण, त्यांनीं सहज व लीलेंत तडाका मारला, तर दुसऱ्या प्राण्याचीं हाडें चूर

होऊन जातात ! सिंहाच्या पिलांचें वजन त्यांच्या आकारमानानें फारच विलक्षण असतें. त्यांचीं हाडें फार मोठीं असतात, आणि स्नायु अतिशय भक्कम असतात. ह्मणजे आकृतीनें मांजरायेवढें पिलूं वजन करून पाहिलें, तर मांजराच्या कितीतरी पट अधिक भरतें. त्यांची वाढ मात्र फार संथ असते.

मांजर जसें उंदीर तोंडांत धरून नेतें, त्याप्रमाणें माजलेला रेडा सिंह आपल्या तोंडांत धरून सहज नेतो ! आपल्या संस्कृत कवींनीं प्राचीन ग्रंथांत सिंहास मोठा मान दिलेला आहे. शौर्य व पराक्रम ह्यांची पराकाष्ठा बहुधा सिंहाच्या उपमेनेंच दाखविण्यांत येते. शूर मनुष्यास 'सिंह' असें उपपद देण्याची रीति सर्वत्र प्रसिद्ध आहे. सिंह माणसाळला ह्मणजे त्याच्यासारखा विश्वासु आणि ममताळू प्राणी नाहीं. ह्या त्याच्या अद्भुत गुणांविषयीं "अंद्रोक्लीज आणि सिंह" ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

---

# सुधारणेची सोडचिठ्ठी.

(श्लोक.)

पुरे रे बाबांनो घडिघडिस मातें छळुं नका
फुका होतां वेडे भरिभरुनि सारें कळुन का ।
मला जाऊंद्या रे हळुहळुच थांबा दम धरा
नका ओढूं हट्टें फरफर अशी झोंबुन करा ॥ १ ॥

तुह्मी सकल मत्पती ह्मणवितां मला लाडकी
विभूषित करावया झटतसां जिवापाड कीं ।
"धनीन अमुची खरी हृदयवल्लभा प्राण ही
भजूं बसवुनी शिरीं" ह्मणुनि वाहतां आणही ॥ २ ॥

मातें यौवन शीघ्र यो तनुतशी मातो गजाच्या परी
ऐसा काम वसे अखंड तुमच्या मोहामुळें अंतरीं ।
यत्नानें कटु औषधें मम मुखीं कोंबीतसां चोरटीं
प्याल्यानें हळदीस काय निमिषें होईन मी गोरटी ॥ ३ ॥

वरी द्रौपदी सुंदरी पांच भर्ते
मला पांचपन्नास कीं साह्यकर्त्ते ।
जनाला गमे मी महाभाग्यवंत
परी वाटतें शीघ्र होईल अंत ॥ ४ ॥

इंदूच्या किरणांतुनी प्रथम हो मज्जन्म झाला खरा
केला उत्सव तैं तुह्मीं सकळिकीं वांटोनियां साखरा ।
झाले सिद्ध समस्त नामकरणा घालोनि औडंबर
सप्तर्षी सजले मला मिरविण्या बांधोनियां कंबर ॥ ५ ॥
विष्णू एक खरा हिरा मम पती धैर्यास दावी कसा
जो अग्रेसर होउनी सुसमयीं सर्वांसि लावी कसा ।
केला शुद्धमनें प्रसिद्ध जगतीं सत्यार्थ जो भासला
धैर्यानें विधवाविवाह करुनी दावी जना मासला ॥ ६ ॥
बाकी सारे फुकाचे धरिति तुणतुणें बोलण्यामाजि कीर
त्यांच्यापाशीं कशाला फळ न तिळभरी व्यर्थ लावूं जिकीर ।
भीती घेवोनि पोटीं अवघड समयीं कांपती जे थरारा
ऐशी शेंदाडशाई करुनि मजवरी केवि चाले दरारा ॥ ७ ॥
हूं हूं हूं हूं ह्मणाया भरभर जमती छाति ठोकूनि मी मी
अंतीं जाती पळोनी प्रबळतर अशा शूर वीरां नमीं मी ।
आरंभा सर्व होते सरसरुनि पुढें वाग्रथा हांकण्याला
हा हा! अर्धेहि देवा समयिं न उरले अक्षता टाकण्याला ॥ ८ ॥
लग्नाच्या सोहळ्याची लटपट उडते फार मोठ्या मजेची
कैशी श्रद्धा बसावी हितकर ह्मणुनी धर्मभोळ्या प्रजेची ।
ज्याला संध्या न ठावी जपतप न कळे बूट पाटलोन पायीं
ऐसा बाका उपाध्या बघुनि हसति कीं लोक ते ठाइंठायीं ॥ ९ ॥
नाहीं वेळ मुहूर्त देवकविधी नाहीं ऋषीपूजन
नाहीं होम न सोंवळें बसविती एकत्र सारे जन ।
नाहीं जात न गोत उक्त बहुलें ना बाप ना माउली
पोरांचा जणु खेळ हा वधुवरें तीं बाहुला बाहुली ॥ १० ॥

आला जेव्हां दुपारीं कठिण समय तो पंक्तिच्या भोजनाचा
चिंतेनें ग्रस्त झाला मुखशशि सुकला साह्यकर्त्या जनांचा।
झाली साशंक मुद्रा टकमक बघती फोडिती कैक फांटे
गेले सोडोनि तेव्हां हळुहळु निघुनी चार ते चार वाटे ॥११॥
कोणी पथ्य ह्मणे मला कडक हो कांहीं नये खावया
कोणी जोडुनि हात मागत असे आज्ञा घरीं जावया।
कोणी श्राद्ध ह्मणे घरीं जननिचें सांगूनि आलों भट
कोणी माफ करा ह्मणे दिलगिरी भार्या महा तापट ॥ १२ ॥
कोणी काम ह्मणे मला निकडिचें नाहीं रजा तासही
कोणी सार न भोजनांत ह्मणती केलीच आहे सही।
कोणी सभ्यपणें उठोनि निघती झोंकांत गाडीकडे
कोणी पंक्तिस मी असेंच समजा सांगून जाती पुढें ॥ १३ ॥
कोणी अग्निरथीं बसून जलदी गांठी पुरी नौसरी
आलें धैर्य कळून सर्व तुमचें लोकांस त्या औसरीं।
धैर्याचे नग ते हळूच ह्मणती 'दारांसि लावा कड्या'
झाल्या ह्या तुमच्याच भेकडपणें माझ्या अशा चिंधड्या ॥ १४ ॥
केला वाद पुढें मठाधिपतिशीं मद्भक्त निस्सीम ते
पोटीं घाबरती किती खरडुनी देती दुटप्पी मतें।
प्रायश्चित्तविधी खुशाल करिती दाढ्यामिशा मुंडिती
स्वामींना चुकलों ह्मणून शतदां देहासही दंडिती ॥ १५ ॥
पुनरपि पति माझे अंतरीं भीत भीत
'तुजवरि बहु माया' सांगती इंग्रजींत।
ह्मणति 'फसविलें तें शुद्ध भोळ्या भटांना'
नच कळत ह्मणावें काय ह्या वाजटांना ॥ १६ ॥
ठकवुनि मजला हे दाविती थोर माया
पदर धरुनि माझा बोलती 'ये रमाया'।
फुकट करिति ऐसा कासया नामघोष
उलट नशिब माझें त्यांकडे काय दोष ॥ १७ ॥

कोणी "बालविवाह घातक" असें सौधांगणीं ओरडे
आंगें वर्तन पाहतां परि दिसे पाषाणसें कोरडें ।
वर्षें आठ पुरीं न तों स्वदुहिता लग्नासि काढी सुखें
ब्रह्मज्ञान असे महा सुलभ हो बोलावयाला मुखें ॥ १८ ॥
मूर्तीपूजन पाप सिद्ध करि जो बोलून नानापरी
त्याच्या लग्नविधीस रूप धरुनी विघ्नेश येतो घरीं ।
होतो एक सदा फिदा मजवरी तोडोनियां जानवें
पत्नीनें दरडावितां ह्मणतसे गे आण जा जा नवें ॥ १९ ॥
भर्ते होऊं पहाती व्रत उचलुनियां भेकडांचें दळ्यांचें
ह्यांच्यापेक्षां कृतीनें छलक बहु बरे पोर ते आंधळ्याचे ।
संग्रामीं झुंजले ते तिळहि न डगले स्वाभिमानार्थ मेले
ह्यांच्या पायांत माझी तनुहि सुकुनियां नांव आंबून गेलें ॥२०॥
होता द्रौपदिचा जसा भरंवसा त्या भीमसेनावरी
जातां दूर वनांत तो जशि दिसे ती कावरी बावरी ।
माझ्या एक तसा मनांत भरला विद्वद्गुणें आगळा
त्यानें लाथडुनी मला तुडविलें दाबून माझा गळा ॥ २१ ॥
ज्याला स्वप्राण माझा अजवरि गणिलें ठेवुनी जीवभाव
तोही बेमान झाला समजुनि चुकला स्पष्ट देहस्वभाव ।
कन्येचा ह्या पित्यानें निवळशिशुपणीं लग्नसंबंध केला
सिंहानें काय खावें गवत निजमुखें अलपशाही भुकेला !! ॥२२॥
कोठें विद्या तुझी ती अडकुनि पडली ज्ञान कोठें बुडालें
गेलें सौजन्य कोठें अमित सुगुण ते सांग कोठें दडाले ।
रे त्वद्देशाभिमानें, नयन मिटुनियां घेतली काय माळ
स्वार्थें जो अंगिकारी नर परवशता हेंच त्याचें कपाळ ॥ २३ ॥
नाहीं शब्दास ताळा वरवर तुमचें शुष्क वक्तृत्व जाळा,
रौप्याचा थोर वाळा अडकवुनि पदीं लावितां डाग काळा ।
हातीं देऊनि माळा नवरि सजवितां आपुली अज्ञबाळा
कर्तव्या जों न आळा जनहित बुडवे हाच शिक्का कपाळा ॥ २४ ॥

लोकीं सौभाग्य सांगा मळमळित असें काय येईल कामीं
स्वच्छंदें वागतांना घडिघडि छळणा मात्र होते रिकामी ।
काढोनी नांव माझें पुनरपि शिवतां जीव देईन खास
नाहीं नाहींच तुह्मी खचितचि समजा योग्य माझ्या नखास ॥ २५ ॥

नादानें तुमच्या उगीच फसल्यें मीही खुळी जाहल्यें
लोकांचे अपवाद सर्व तुमच्या पायांत मीं साहिले ।
मारोनी मिटक्या मदर्थ फिरुनी रे लाळ घोटूं नका
माझी संगत सोडुनी मग तुह्मी वाटेल तें तें भका ॥ २६ ॥

बाबांनो या लवकर उठा कांकणें ध्या भरा हीं !
स्त्रैणत्वाची मनिं धरुं नका लाज आतां जराही ।
वक्तृत्वाचें दळण दळुनी चांगलें पीठ काढा
पाहोनीयां नविन नवरे त्यांजला नीट वाढा ! ॥ २७ ॥

सभेसि अणुनी मला अशि विटंबना मांडिली
पुढें सरुनि हौशिनें सुजनभीति ही सांडिली ।
हिरोनि वसनें कशी करितसां मला मोकळी
अनर्थ करितां असा! खचित जाल भूमी तळीं ॥ २८ ॥

तुह्माहुनिहि ते भले मम रिपू मला वाटती
दिसे सुलभ चांगली हळुच दाविती वाट ती ।
किती मधुर बोलती हळुच एक देती नग
अशांवरि न कां बसे सकल चित्त माझें मग ॥ २९ ॥

सोडा हो नांव माझें फुकट बसुं नका गुंतुनी मोहपाशा
मीही सोडून देतें अजवर धरिली व्यर्थ जी थोर आशा ।
जा जा जा जा निघा हो फिर फिरुनि नका बाटवूं व्यर्थ मातें
देतें ही नीट ठेवा चुरचुरित अशी सोडचिठ्ठी तुह्मांतें ॥ ३० ॥

---

## स्थलनिर्देश.

### कलकत्ता.

आपण एका गलबतांत बसून बंगालच्या उपसागरांतून कलकत्त्यास

जात आहों अशी कल्पना केली, तर प्रथमतः आपणांस **हुगळी** नदीचें मुख लागेल. तसेंच गलबताच्या आजूबाजूस पाहिलें, तर प्रथमतः निळ्या रंगाचें पाणी दिसेल, आणि हळूहळू पालटतां पालटतां तें हिरवट रंगाचें दिसूं लागेल. आंत सुरळीत मार्गानें प्रवेश व्हावा ह्मणून जमिनीपासून कांहीं अंतरावर नांगर टाकून गलबत उभें केलें पाहिजे. येथून कलकत्ता १२० मैल राहतो. नदीच्या आंत गलबत नेणें फार जोखमाचें काम आहे. कारण, एक तर रस्ता माहीत नसतो. कोठें खडक आहे; कोठें पाणी खोल आहे; कोठें पाणी उथळ आहे, ह्याचें ज्ञान नसलें तर गलबतास केव्हां धोका बसेल ह्याचा नियम नाहीं. शिवाय तेथें चाचे लोक टोळ्यांच्याटोळ्या घेऊन हिंडत असतात. आणि एखादें नवखें गलबत त्यांच्या तावडींत सांपडलें तर तें लुटून फस्त करून सोडतात. ह्याकरितां तेथून प्रत्येक गलबतामध्यें, किनाऱ्यावर राहणारे वाटाडे लोक घ्यावे लागतात. पुढें, जों जों आपण जमिनीच्या जवळ जवळ जाऊं लागावें, तों तों पाणी अधिकाधिक गढूळ लागूं लागतें. हा गढूळपणा, भागीरथी नदीच्या उगमापासून मुखापर्यंत जो चिखल वाहत येतो त्याचा असतो. असा अदमास केला आहे कीं, भागीरथी नदी, उगमापासून समुद्रापर्यंत एका दिवसांत जितका चिखल व जितकी रेती वाहून नेते, तितकी रेती व तितका चिखल वाहून नेण्यास मोठमोठालीं १९०० गलबतें लागतील! इतकी भर प्रत्येक दिवशीं गंगेच्या मुखाकडे पडत असल्यामुळें दक्षिणेकडचें पात्र उथळ होऊन तेथें मोठमोठालीं बेटें व प्रदेश बनत चालले आहेत. गंगेच्या मुखांतील **"सुंदरवन"** नांवाचें जें मोठें बेट आहे, तें गंगेच्या प्रवाहांतून वहात आलेल्या गाळापासूनच झालें आहे. पूर्वीं कलकत्त्यापासूनही वर ४० मैलपर्यंत गंगानदींत गलबतें जात असत. परंतु सांप्रत पाणी इतकें उथळ झालें आहे कीं, तेथें आतां एकही गलबत जाऊं शकत नाहीं.

प्रथमतः सुंदरवनाचाच एक भाग **सगर**बेट ह्मणून आहे, त्याच्या दक्षिण हद्दीवरील सपाट जमिनीची पट्टी दिसूं लागते. समुद्राजवळच्या भागावर दाट जंगल आणि दलदल आहे.. त्यांतून मधून मधून पाणी खेळत असल्यामुळें, एक प्रकारचें चमत्कारिक जाळें पसरल्याप्रमाणें दिसतें. तेथें व्याघ्र मनस्वीच आहेत. ह्या बेटांत कायमची वस्ती मुळींच

नाहीं. फक्त मोळीवाले लोक लांकडें तोडावयास मात्र येतात. **गंगासागर** नांवाच्या पर्वणीस, स्नानासाठीं, येथें फार मोठी यात्रा भरत असते. येथें **सगर** राजाच्या ६०००० पुत्रांस गंगेनें पुनर्जन्म दिला अशी कथा असल्यावरून त्या उत्सवाप्रीत्यर्थ ही यात्रा भरते. पूर्वीं ह्याच ठिकाणीं कांहीं वेडगळ बायका, गंगेस मूल अर्पण करण्याचा नवस करून, कैक जिवंत मुलें गंगेंत टाकून, सुसरीकडून खाववीत, आणि त्याच्या देहाचें सार्थक झालें ह्मणून आनंद मानीत! इंग्रज सरकारचा अंमल झाल्यापासून ही निर्दय चाल त्यांनीं बंद केली.

**हुगळी** नदीचें मुख इतकें विस्तीर्ण आहे कीं, प्रथमतः दोन्ही किनाऱ्यांवरील जमीन मुळींच दिसत नाहीं. बरेंच आंत गेल्यावर ती हळू हळू दिसूं लागते. हिंदुस्थानामध्यें दीपस्तंभ उभारण्याचें काम प्रथमतः **सगर** बेटावर झालें. कलकत्त्याहून **हिरा** बंदरास जावयाचें तर नदींतून ४० मैल जावें लागतें. परंतु आगगाडीनें गेल्यास अवघें ३१ मैलच आहे. **ईस्टइंडिया कंपनी**चीं गलबतें ह्याच बंदरीं नांगर टाकीत असत. ह्याच बंदराच्या अंमळ वरच्या बाजूला **जेम्स** आणि **मेरी** या नांवांच्या भयंकर भाटी पडलेल्या आहेत. **दामोदर** आणि **रूपनारायण** ह्या दोन नद्यांतून वाहून आलेल्या वाळूनें ह्या भाटी झाल्या. ह्या भाटी, वरून तर दिसत नाहींत. आणि चुकून एखाद्या गलबताचा कणा त्यांस लागला कीं पुरे, आंतील भोंवरा त्यास एका क्षणांत आकाशांत भिरकावून त्याचे अगदीं तुकडे तुकडे करून सोडतो, मग तें गलबत केवढें कां मोठें असेना! ह्याप्रमाणें असंख्य गलबतांचा ह्या भाटींवर नाश झाला आहे.

ह्या नदींतून पुढें जाऊं लागलें ह्मणजे अनेक प्रकारचीं गलबतें व बोटी जातांयेतांना आपल्या दृष्टीस पडतात. कांहीं आगबोटी असतात; कांहीं तिर्कटी तारवें असतात. कांहीं गलबतांस **तग** नांवाच्या लहान लहान आगबोटी असतात त्या ओढीत असतात. उंच दुमाल्याच्या आणि मोठमोठ्या सुकाणूच्या देशी बोटीही हजारों पाहण्यांत येतात. कित्येकांवर गवत भरलेलें असतें; व कलकत्त्याच्या जसजसें जवळ जवळ जावें तसतसा बहुतेक बोटींत भाजलेल्या विटांचा माल दृष्टीस पडतो. जों जों आंत जावें तों तों हळूहळू सुपीक प्रदेश दृष्टीस पडूं लागतो. झाडें, भात, ताड, माड आणि कळकांचीं बेटें, व त्यांमधून खेडीं दृष्टीस पडूं लाग-

तात. **कलकत्ता** बंदर दृष्टिकटाक्षमर्यादेंत आलें, म्हणजे नेत्रांस कांहीं अपूर्व शोभा दिसूं लागते. अनेक सुशोभित तारवें व आगबोटी; किनाऱ्यास अत्यंत शोभिवंत चित्रविचित्र रंगाचे गुलजार बाग; मधून मधून नदीतटाकावर उभारलेले किल्ले; मोठमोठाल्या इमारतींचे घुमट आणि कळस; पलीकडे कलकत्त्यांतील भव्य आणि मनोहर मंदिरें; इत्यादि अद्भुत देखावा पाहून पहाणाराच्या मनास कांहीं अप्रतिम आल्हाद वाटतो. आणि आपण एखाद्या मोठ्या सुंदर राजधानीच्या अगदीं नजीक येऊन पोंचलों, असें मनास वाटतें.

**कलकत्ता** हें हिंदुस्थानच्या राजधानीचें शहर. हें **हुगळी** नदीच्या पूर्व किनाऱ्यास समुद्रापासून सुमारें ८० मैलांवर वसलेलें आहे. ह्याचें मूळचें नांव **कालीघाट.** त्याचा अपभ्रंश **कलकत्ता** असा झाला आहे. ह्या शहरच्या दक्षिणेकडील वाडींत **काली**चें पूर्वापार स्थान आहे. आणि त्यावरूनच त्या शहरास हें नांव पडलें आहे. इ० स० १६८६ मध्यें इंग्रज व्यापारी कलकत्त्यापासून उत्तरेस सुमारें २३ मैलांवर हुगळीवर वसाहत करून राहिले. हा भाग हल्लीं कलकत्त्याच्या उत्तरेस आहे. नंतर ही नवी वसाहत लौकरच वाढत वाढत **कालिकत्ता** आणि **गोविंदपूर** येथपर्यंत येऊन पोंचली. इ०स०१६९६ मध्यें इंग्लिशसत्ता झाल्यानंतर त्यांनीं एक किल्ला उभारला. त्याचें नांव **'फोर्ट विल्यम.'** नंतर **अवरंगजेब** बादशाहाचा मुलगा **अजिम** ह्याजपासून त्यांनीं प्रथमतः तीन खेडीं खरेदी घेतलीं.

इ० स० १७०७ पर्यंत **कलकत्ता** मद्रासेखालीं असे. त्यानंतर तो वेगळा इलाखा करण्यांत आला. इ० स० १७४२ मध्यें तेथील राहाणाऱ्या लोकांनीं, मऱ्हाठ्यांच्या घोड्यांस भिऊन आपल्या स्वसंरक्षणासाठीं गांवभोंवतीं खदक खोदण्याची परवानगी मिळविली. इ० स० १७५६ मध्यें **बंगाल**चा नबाब **सुराजउद्दवला** ह्यानें **कलकत्ता** घेतला व तेथें लूट केली. आणि १४६ इंग्लिश लोकांस कैद करून एका अति लहान अंधारकोठडींत त्यांस कोंबून घातलें. त्यांपैकीं दुसऱ्या दिवशीं २३ असामी मात्र जिवंत निघाले! त्याच्या दुसऱ्याच वर्षी **क्लैव साहेबानें** तें शहर पुनः हस्तगत केलें, आणि **प्लासी**च्या लढाईत जय मिळवून सर्व बंगाल्याची सत्ता मिळविली. हल्लींचा **फोर्ट विल्यम** किल्ला

बांधण्याची सुरवात **क्लैव** साहेबानेंच केली. परंतु १७७३ पर्यंत तें काम पुरें झालें नाहीं. त्याच वर्षी **कलकत्ता** ही हिंदुस्थानची राजधानी केली, आणि **वारनहेस्तिंग्स** गव्हरनर जनरल होऊन आला. तेव्हांपासून हें शहर फार मोठ्या भरभराटीस आलें. पहा ! सुमारें दोन शतकांच्या आंतच जीं केवळ केमळ्याच्या खोपटांचीं यःकश्चित् खेडीं होतीं त्यांचें हिंदुस्थानांतील एक अत्यंत मोठें, आणि संपत्तिमान् शहर बनलें !

**वसाहात**—कलकत्ता शहरची लोकवस्ती सुमारें ४३०००० आहे. त्यांत उत्तरेकडची वाडी व दक्षिणेकडची वाडी सामिल केली तर सर्व मिळून ७६६००० लोकवस्ती होईल. **हुगळी** हें शहर नदीच्या पलीकडे असून एका तरत्या पुलानें ह्मणजे एकास एक नांव बांधून त्या पुलानें कलकत्त्यास सांधलें आहे. येथील लोकवस्ती १०५००० आहे.

**कलकत्त्यांत** रात्रीपेक्षां दिवसाची वस्ती अधिक असते. कारण, सकाळीं परगांवांहून कामावर येऊन सायंकाळीं आपआपल्या गांवीं परत जाणारे लोक तेथें पुष्कळ.

**दर्शनीय स्थळें**—कलकत्ता शहरीं पाहाण्यासारख्या वस्तु पुष्कळच आहेत. त्यांपैकीं कांहींचें संक्षेपतः वर्णन देतों:—दक्षिण वाडीमध्यें **गार्डन रीच** नामक बागेंत **ओढ्याच्या** माजी राजाचा राजवाडा आहे. ह्याची बांधणावळ अगदीं पूर्वीच्या रीतीची आहे. उत्तरेच्या बाजूस **मोठी कुमारी** नांवाचें एक मोठें पटांगण रस्त्यांनीं दुभागलेलें आहे. आणि त्यांतून नदीकिनाऱ्यापर्यंत एकसारख्या सार्वजनिक बागा लागून राहिल्या आहेत. **मोठ्या कुमारी**च्या पश्चिम भागाच्या मध्यभागीं किल्ला आहे. पूर्व बाजूच्या सभोंवार दुतर्फी सुशोभित इमारती असलेला **चौरंगी** नामक रस्ता आहे. दक्षिणेच्या बाजूस **बिशप वुइलसन** ह्यानें बांधलेलें भजनालय आहे. मध्यभागीं पदार्थसंग्रहालय असून त्यांत नानाप्रकारच्या मनोरम पशुपक्ष्यादिकांचा भरणा आहे. **कुमारीच्या** उत्तरेला **लार्ड वेलस्लीनें** बांधलेलें विशाल 'गव्हर्मेंट हाऊस' आहे. त्याच्याच जवळ **टाउनहाल** आणि **हायकोर्ट** यांच्या प्रेक्षणीय इमारती आहेत. **कुमारीच्या** उत्तरेस नदीकिनाऱ्यापर्यंत एक भव्य रस्ता असून त्याच्या पश्चिम बाजूला माल चढविण्याचे धक्के

आणि व्यापारी लोकांच्या वखारी आहेत. पूर्व बाजूस युरोपियन व्यापाऱ्यांचीं आफिसें वगैरे० आहेत. उत्तरेस **चितपुरचा** रस्ता ह्मणून एक अरुंदशीच आळी आहे, ० पण येथें यात्रेमध्यें फारच मोठा मेळा भरतो. ही आळी हिंदूवस्तीच्या मधून जाते. इमारतींच्या खालच्या मजल्यांत बहुतकरून दुकानें आहेत. त्याच्या पूर्व बाजूस समांतरच एक मोठाथोरला रुंद रस्ता आहे. दक्षिणेकडच्या बाजूस **कॉलेज स्ट्रीट** आणि उत्तरेच्या बाजूस **कॉर्न वालिस स्ट्रीट** ह्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्याच नांवाचे दोन चौक त्यांस जोडलेले असून. व त्यांत **एज्युकेशनल इन्स्टीट्यूशन** आणि भव्य **हास्पितळ** बांधलेलें आहे. ह्यांच्या पूर्वेस अंमळ पुढें गेलें ह्मणजे वर्तुळमार्ग नांवाचा आणखी विस्तीर्ण रस्ता लागतो.

**चौरंगी,** दक्षिण भागांत असून तेथें युरोपियन लोक राहतात. येथील रस्ते सरळ असून फार प्रशस्त आहेत. उत्तर भागांत 'नेटिव' लोकांची वस्ती असून तेथील गल्ह्या वेड्यावांकड्या आणि आकुंचित आहेत. **कलकत्त्या**ची मनस्वी सुधारणा झाली, ती बहुतकरून गेल्या थोड्या वर्षांपासूनच झाली. **वेलिंगटन**च्या चौकामध्यें तर पूर्वी सारा खातेरा भरला होता. **कुमारिका** येथें वर्षांतील तीन महिने दलदल असे. शहराला पाण्याचा पुरवठा उत्तम प्रकारचा केलेला आहे. घाण, पाणी हीं जाण्यासाठीं गटाराची तजवीज चालू आहे. कित्येक सार्वजनिक सुंदर इमारतींचीं कामें ताजीं झालेलीं आहेत.

**रस्ते**—रस्तेदुरुस्तीला दगड आणूं ह्मटलें, तर **कलकत्त्या**पासून १०० मैलांच्या आंत कांहीं कोठें दगड सांपडणार नाहीं. ह्यास्तव तेथें विशेषेंकरून भाजलेल्या आणि फुटलेल्या विटांचाच त्या कामीं उपयोग करतात. बंगाळच्या कितीएक भागांत हीच चाल आहे. मुख्य मुख्य कांहीं गल्ह्यांमध्यें मात्र विटांऐवजीं दगड आहेत.

**वाहनें**—कलकत्त्यांतील बहुतेक रस्त्यांवर **ट्रामवे** झालेली आहे. ह्याशिवाय तिसऱ्या वर्गाच्या **टिका** गाड्या तर असंख्य आहेत. त्यांस दोन तट्टु जोडलेले असतात. ते अगदीं भरधांव जातात. दुसऱ्या उत्तम गाड्या व जनरथही अनेक आहेत. सायंकाळच्या वेळीं **कुमारीवर** उमदे घोडे जोडलेल्या सुंदर गाड्यांचा तांडाच्यातांडा दृष्टीस पडतो.

**व्यापार**—हिंदुस्थानच्या व्यापारापैकीं $\frac{1}{3}$ व्यापार फक्त कलकत्त्यास होतो. तेथें मुख्य आयात माल ह्मटला ह्मणजे, कापसाचें सूत व कापड; धातु; यंत्रें; मीठ; आणि मद्य. निर्गत मालांपैकीं मुख्य जिन्नस अफू; तांदूळ; जूट; तेलाचीं धान्यें; नीळ; चामडें; चहा; रेशीम आणि सोरा हे होत.

**छापखाने**—कलकत्त्याइतके छापखाने व वर्तमानपत्रें सर्व हिंदुस्थानांत दुसरीं कोठें नाहींत. ह्या वर्तमानपत्राचे लेखक बहुतेक विद्वान् बंगाली बाबू आहेत. त्यांतील कितीएक पत्रें फारच वजनदार आहेत. त्यांच्या लेखांत स्वदेशाभिमानाची कळकळ आणि आवेश फार असतो. **"धि हिंदु पेट्रिएट"** हें पत्र माजी आनरेबल **क्रिस्तोदासपाल** काढीत असत. हें पत्र जसें हिंदूंत तसेंच युरोपियन लोकांतही सन्माननीय होतें. **"इन्डियन मिरर"** आणि दुसऱ्याही कितीएक पत्रांत गंभीर, नेमस्त, बुद्धिमत्तेचे आणि भारदस्त असे लेख असतात. कितीएक ह्याच्या उलटही आहेत. परंतु अशीं फारच थोडीं निवतील.

**सुधारक**—बंगाल्यांत सुधारकांचें पीक फार मोठें आहे. **राम मोहनराय, बाबू केशव चंद्रसेन,** वगैरे मंडळी ह्यांतील अग्रगण्य होत. ह्यांनीं मूर्तिपूजेचा वगैरे निषेध केला; आणि ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज स्थापन करून निराकार परमेश्वराची भक्ति सुरू केली. बाबू केशव चंद्रसेनाची, त्यांचे अनुयायी, अवर्णनीय कीर्ति गातात. ते मोठे निस्पृह होते; मानापमानाची त्यांस अपेक्षा नव्हती; ते बोलत त्याप्रमाणें त्यांची कृति होती; ह्मणजे ते केवळ रामदास व तुकाराम ह्यांप्रमाणें महाभगवद्भक्त होते ह्मणून त्यांचें ह्मणणें! परंतु ह्या बाबूंनीं विलायतेस जाऊन महाराणी साहेबांच्या पंक्तीस भोजनाचा लाभ घेतला; मूर्तिपूजेचे कट्टे दुस्मान असतां स्वतःच्या मुलीच्या लग्नांत गणपतीपूजन केलें; बालविवाहनिषेधावरच्या व्याख्यानांनीं घसा तोडून तोडून शेवटीं आपली सुकुमार बाला एका राजाच्या गळ्यांत अडकविली. ह्यावरून 'बोले तैसा चाले' हा गुण त्यांच्यांत कितपत वसत होता त्याचा वाचकांनींच विचार करावा.

# लोकोत्तरचमत्कार.

## जळमाणसें.

घोर जंगलांत, खोल पाण्यांत, व अफाट दलदलींत वस्ती करणारे, कंद मुळें, अपक्व अन्न यांवर निर्वाह करणारे—आणि पशुतुल्य नग्नस्थितींत राहणारे जे मनुष्यप्राणी आढळतात, त्यांस "रानमाणसें"–किंवा–"जळमाणसें" असें ह्मणतात. ह्या प्राण्यांची ठेवण, अवयव सर्व मनुष्यजातीप्रमाणें असून ते इतके अज्ञानी असतात, कीं त्यांस मनुष्यांची भाषासुद्धां समजत नाहीं, एवढेंच नव्हे, पण भाषा ह्मणजे काय ह्याची सुद्धां त्यांस कल्पना नाहीं. अशीं मनुष्यें पृथ्वीच्या पाठीवर फार क्वचित् आढळतात. ह्मणून त्यांचा लोकांस विशेष चमत्कार वाटतो. जळमाणूस सांपडलें, कीं त्याचें बहुतकरून लोक प्रदर्शन करतात. अशीं माणसें कोणास, कधीं, व कोठें सापडलीं होतीं, त्यांपैकी कित्येकांचा थोडासा वृत्तांत खालीं दाखल केला आहे.

हंगेरिया प्रांतांत प्रांस मागे आणि मिचल मोरनर या नांवांचे दोन मच्छिमार राहत होते. त्यांच्या वस्तीपासून जवळच 'हानसांग' या नांवाची एक मोठी–कच्छच्या रणाप्रमाणें–पानथळ किंवा दलदल आहे. तींतून इ० स० १७४९मध्यें ता० १९ मार्च रोजीं एक चमत्कारिक प्राणी त्यांनीं धरून आणला. प्रथमतः त्यांस वाटलें कीं, हें कोणीतरी चमत्कारिक जंगली जनावर असावें. परंतु नीट पहातात तों मनुष्य. तो साधारण दहा वर्षांच्या मुलायेवढा दिसत असे. त्याचे हातपाय भले लांब लांब आणि मजबूत असे होते. त्याच्या पायांचीं व हातांचीं बोटें मनुष्याच्या दुप्पट लांब होतीं. परंतु फार मऊ आणि मजबूत असत. चामडी कठीण, खवलेदार, आणि तिच्यावर चामखिळासारख्या चमत्कारिक गांठी. मस्तक वाटोळें, डोळे लहान, तेजस्वी, आणि खोल; नाक राघूच्या चोंचीसारखें पुढें आलेलें; आणि तोंड भारी पसरट अशा प्रकारचें त्याचें रूप होतें. त्यास तेथील सरकारानें विकत घेऊन, त्यास सरकती किल्ल्यांत पिंजऱ्यामध्यें घालून ठेवलें होतें. व तेथें त्यास सुधारण्याविषयीं व सुशिक्षित करण्याविषयीं पुष्कळ खटपट केली. पण त्यांत ह्मणण्यासारखें यश

आलें नाहीं. कारण, त्यास भाषाज्ञान होईना; व अक्षरउच्चारही साधेना. त्याला अंगावर वस्त्र घेण्यास प्रत्यहीं शिकवीत. पण बारा महिने गेल्यानंतर तो हळूहळू तें घेऊं लागला. प्रथम तो गवत, भूस, लव्हाळा खात असे; पण तो पुढें अन्न खाऊं लागला. त्या किल्ल्याभोंवतीं पाण्यानें भरलेला मोठा खंदक होता. त्या खंदकांत त्याच्या कंबरेस दोरी बांधून त्यास पोंहावयास सोडीत. तेव्हां त्यास मोठा आनंद वाटे. त्यांत तो एखाद्या जलचराप्रमाणें पोंहे, बुडे, आणि मजा मारी. त्याला त्यांतून बाहेर काढण्यास फार प्रयास पडत. तो आतां चांगला माणसाळला, असें समजून त्यास तेथून मोकळें केलें. पण तो एकेदिवशीं नजर चुकवून पार निघून गेला. ह्मणजे पहा, जी स्थिति आह्मा मानवांस सुखकारक वाटते, ती त्यास दुःसह होऊन अरण्यवास गोड वाटला!

त्यानंतर पुन्हा त्याच मच्छिमारांस, तो पूर्वी सांपडला होता, त्याच दलदलींत आढळला. तो रॉबनदींतून पोंहत पोंहत तेथें आला असावा असें अनुमान केलें होतें. कारण, तो ज्या किल्ल्यांत ठेवला होता, त्या 'कापूवाड' किल्ल्याच्या जवळूनच रॉबनदी गेलीं होती. ह्यावेळीं त्या मच्छिमारांस पाहतांच झुकांडी देऊन 'कोनिंगसी' नांवाचें सरोवर होतें, त्यांत तो जाऊन लपला, तो पाठलाग करणारे लोक निघून जातपर्यंत वर निघालाच नाहीं. त्यास धरण्यासाठीं सरकारचे लोकही टपले होते. पण कित्येक वर्षंपर्यंत तो दिसला नाहीं. इ० स० १७९३ च्या आगष्टच्या २१ व्या तारखेस तो पुन्हा दिसला, परंतु हातीं लागला नाहीं. आणि पुढें त्या दिवसापासून विश्वसनीय अशी त्याची कोणतीच बातमी ऐकण्यांत आली नाहीं.

ट्रान्झिल्व्हानियांतील क्रोन्स्टाड जवळच्या अरण्यांत इ० सन १७८१ मध्यें एक जळमाणूस सांपडला होता. तो जर्मनी व हंगारी ह्या देशांत ठिकठिकाणीं प्रदर्शन करून दाखविण्यांत आला. त्यास शिक्षण देण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु त्यास बोलतां आलें नाहीं. त्याला पुष्कळ वर्षेपर्यंत दाखवून लोकांनीं पैसे मिळविले. आणि सरतेशेवटीं तो ह्मातारा झाल्यावर एका खेडेगांवांत मरण पावला. तेथील नागरिकांस विहिरींतून पाणी काढून देऊन वृद्धापकाळीं तो आपला निर्वाह करीत असे.

सन १७३१ मध्यें सांगी नांवाच्या खेडेगांवांत एकेदिवशीं एका

जंगली स्त्रीनें अगदीं दंगा उसळून दिला. हिचा आकार नऊ दहा वर्षांच्या मुलीयेवढा होता, आणि मुद्रा थेट जंगली माणसासारखी दिसे. तिचें तोंड व हात काळे असून त्यांवर कांहीं विचित्र ठिपके होते. तिनें फाटक्या चिंध्या व चामडें पांघरावयास घेतलें होतें. तिच्या हातांत भली लांब, खिळा मारलेली काठी होती. जे जे तीस पाहत ते ते ही ' पिशाच्च ' असें समजून तिच्या पाठीस लागत. एकानें तर तिच्यावर ' बुलडॉग ' नांवाचा भयंकर कुत्रा सोडला. पण तिनें त्यास आपल्या काठीच्या एका रट्ट्यानेंच यमसदनास पाठविलें. आणि आपण मोठ्या सपाट्यानें उड्या मारीत जंगलांत निघून जाऊन; एक उंच वृक्ष पाहून त्यावर निजली.

त्याच गांवांत ' व्हिसकाउंट' या नांवाचा एक गृहस्थ होता. त्यास ही गोष्ट कळतांच, तो आपल्या बरोबर पुष्कळ गांवढेलोक घेऊन त्या जंगली स्त्रियेस शोधण्यांस गेला. त्यास ती झाडावर बसलेली दिसली. तिच्या चर्येवरून सर्वांनीं अनुमान केलें कीं, ताहनेनें व्याकूळ झाली असून पाणी पिण्यासाठींच ती गावांत आली असावी. त्याची प्रतीति पाहण्यासाठीं त्यांनीं एक पाण्याचें भांडें भरून आणून झाडाखालीं ठेविलें. आणि आपण लांब जाऊन उभे राहिले. तेव्हां ती हळूच सभोंवार पहात पहात साशंकित मुद्रेनें खालीं उतरली, आणि भांड्यांतील पाणी पिऊन तृप्त झाल्याचें चिन्ह दाखवून खारीप्रमाणें चटकर झाडावर निघून गेली. तिनें पुन्हा खालीं यावें ह्मणून ' व्हिसकाउंट ' यानें एका मुलाकरवीं कांहीं अन्न व फळफळावळ त्याच झाडाखालीं पुन्हा नेऊन ठेवविली. व ती खालीं येतांच तिला पकडतां यावें अशी गुप्त तयारी केली. तेव्हां सर्व मनुष्यें लांब जाऊन उभीं राहिलीं. कोणी गुप्तपणें दडून बसलीं. थोड्या वेळानें भीत भीत खालीं येऊन तिनें तें अन्न घेतलें. तोंच तीस पकडून धरून ठेविलें. सुटण्याविषयीं तिनें पुष्कळ झटपट केली, पण ती सर्व फुकट गेली.

नंतर 'व्हिसकाउंट' यानें तीस आपल्या घरीं आणून तिला स्वयंपाकघरांत नेलें. तेथें शिजविण्याकरितां कांहीं बदकें ठेविलेलीं होतीं. त्यांपैकीं एक बदक तिनें पटकन् उचलून घेतलें, व फाडून खाऊन टाकलें. तेव्हां तिच्यापुढें एक मुद्दाम जिवंत ससा आणून ठेविला. तो तिनें जि-

वंतच फाडला, आणि कातड्यासुद्धां अधाशासारखा गट्ट केला. पुढें तीस परक्या भाषेंतील एक दोन शब्द येतात असें आढळून आलें. तिच्या अंगास कोणीं हात लावला, तर ती फार चमत्कारिक ओरडे व थरथर कांपूं लागे. तिच्या अंगाची कातडी गोरी असून सुंदर होती. तोंडाचा व हातांचा रंग मात्र काळा होता. हाताचे आंगठे फारच मोठे असून लांब होते, ते तिला झाडावर चढण्यास उपयोगी पडत.

'व्हिसकाउंट' यानें तिचें पालनपोषण करण्यासाठीं तिला एका धनगराच्या स्वाधीन केलें. पण तिनें त्या धनगरास पुरे पुरे करून सोडलें. ज्या खोलींत तो तिला ठेवीत असे, त्या खोलींत उकरून उकरून ती डबरे पाडी, आणि अंमळ डोळा चुकला, कीं लगेच पळून जाऊन एखाद्या उंच झाडावर नाहीं, तर, घराच्या आढ्यावर बसे. ह्यामुळें तीस परत आणतांना पुरेवाट होई. प्रथम ती कच्चें मांस, मासे, मुळें, फळें, पानें आणि डाहळ्या सुद्धां खात असे. मांस न चावतां तसेंच गिळी. तिला केव्हां केव्हां तळावांत सोडीत, तेव्हां ती बदकाप्रमाणें पोंहत असे. ती पळते मासे सहज पकडी, आणि बाहेर आणून खाई. बेडूक तर तिला फारच आवडत.

एकेदिवशीं 'व्हिसकाउंट' ह्याच्या घरीं भोजनाचा समारंभ झाला होता. ह्मणून बरीच इष्ट मित्रमंडळी जमा झाली होती. आनंदानें भोजन चालू झालें. तों मध्येंच ह्या बाईनें आपल्या बोथरांत बांधून आणलेली बेडकांची रासचीरास पुढें ओतली ! आणि आपण त्यांतील बेडूक भराभर फाडून खाऊं लागली ! तेव्हां भोजनास आलेल्या पाहुण्यांस परम आश्चर्य वाटलें ! ते बेडूक जेव्हां टणाटण उडूं लागले, तेव्हां कितीएक मंडळी रागावली, आणि कितीएक हसूं लागली, आणि कितीएक पानांवरून उठली, असा जो गोंधळ उडाला, तो काय सांगावा ? ती भित्री होती तरी फार चपळ असे. भोजनोत्तर ससे वगैरे धरून तिनें पाहुण्यांस पुष्कळच मजा दाखविली. ती कोल्ह्यांचा व लांडग्यांचा, हातांत काठी घेऊन अगदीं पराभव करून टाकीत असे.

कांहीं वर्षें गेल्यानंतर ती सुधरली. व तीस आपली हकीगत सांगण्याइतकें बोलावयास येऊं लागलें. "मी आणि माझ्यापेक्षां एक मोठी मुलगी, अशा आह्मीं एकत्र होतों. आह्मांस एका जहाजावर बंदींत ठे-

वलें होतें. तेथून आह्मी निसटलों, आणि पोंहत पोंहत किनाऱ्यास लागलों. नंतर पुष्कळ लांबीचा प्रवास केला. एक नदी ओलांडली. मार्गांत झाडपाल्यावर व जनावरांवर आह्मी निर्वाह करीत होतों. एकवेळ एक खार आह्मी पाठलाग करून मारली." इत्यादि गोष्टी ती तोंडानें सांगत असे.

तिनें सांगितलेल्या दुसऱ्या मुलीविषयींही पुष्कळ शोध केला. परंतु तपास लागला नाहीं. ह्या बाईचें नांव 'ली ब्ल्यांक' असें ठेवलें होतें. ती चालनच्या हास्पितळमध्यें ठेवली होती. तेथें मोठमोठाले श्रीमान् व जहागिरदार लोक तीस पहावयास येत, आणि पाहिल्यावर फार आश्चर्य करीत. अरलीन्सच्या ड्यूकचा तर तिजवर फारच लोभ होता. इ० स० १७६९ त ती पारीसमध्यें होती, व ती तेथेंच मरण पावली.

इ० स० १७२५ तील नोवेंबर महिन्यांत हामेन शेजारीं एक नागवा उघडा जंगली मुलगा सांपडला होता. हा तेरा वर्षांच्या वयाचा दिसे; व चालतांना दोन्ही पायांवर व दोन्ही हातांवर तो चालत असे. तो खारीसारखा वेगानें झाडावर चढे. तो शेवाळ आणि गवत खाऊन राही! हा एक अद्भुत प्राणी आहे असें मनांत आणून टेलच्या करेक्शन हाउसच्या सुप्रिन्टेंडेंटानें त्यास, ह्यानोव्हर येथें आणून, पहिल्या जार्ज राजास नजर केलें. हा मुलगा भोजनास नेहेमी राजपंक्तीस असे. त्या राजानें त्यास प्रत्येक पक्वान्न खावयास शिकविलें. त्याला माणसाळण्याविषयीं व सुधारण्याविषयींही बहुत खटपट केली. परंतु लौकरच तो तेथून निसटून एका जंगलांत जाऊन उंच वृक्षावर चढून बसला. तो वृक्ष तोडून त्यास परत आणावें लागलें. इ० स० १७२६ मध्यें त्यास सर्व इंग्लंद देशभर फिरविलें. त्यास 'पिटर' नांवाचा जंगली मुलगा असें सर्व ह्मणत असत. पहिल्यानें पिटर ह्यास वर्णोच्चार करतां येत नव्हता येवढेंच नव्हे, तर भाषणाची त्यास कल्पना सुद्धां नव्हती. वस्त्र नेसे, तें देखील मोठ्या त्रासानें नेसे. हांथरुणावर तर तो कधींच निजला नाहीं. तो नित्य झाडावर निजल्याप्रमाणें हात पाय पोटाशीं घेऊन निजत असे. त्याचें पालनपोषण करण्याचें काम डाक्टर आरबुथनॉट यांजकडे होतें. त्यास बोलायास शिकविण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केला. नंतर त्या मुलास बर्कह्यामस्टेड नांवाच्या शेतकऱ्याच्या स्वाधीन केलें त्याच्या खर्चाबद्दल राजाकडून त्या शेतकऱ्यास प्रतिवर्षी पेनशन मिळे.

सन १७८२ मध्यें हा मुलगा म्हातारा झाला. तेव्हां त्यास लार्ड मोनबोडो हा गृहस्थ पहावयास गेला होता. तो ह्मणतोः—" ह्याची उपजत बुद्धि अशी विलक्षण आहे कीं, हवा बिघडणार असल्यास त्यास पूर्वीच कळतें. तो गुरगुरूं लागला; हेल काढून केंकटूं लागला ह्मणजे पुढें थोड्याच दिवसांनीं वाईट हवा पडणार ह्मणून समजावें. कोणी गातांना त्यानें ऐकिलें, तर तो आनंदानें टाळ्या वाजवितो. आणि आडाणी रीतीनें मान वगैरे हालवून खूष झाल्याचें दर्शवितो. गायनामध्यें तो मोठा मर्मज्ञ आहे. ऐकलेलें गाणें तो पुन्हा ह्मणून दाखवितो. कठीणशी एखादी चाल त्यानें ऐकल्यास तो ती पुन्हा पुन्हा ह्मणून पुष्कळ वेळ गुंगत असतो."

वसंतऋतु लागला कीं, तो हुषार होई आणि मजेंत असे. उन्हांत बसणें त्याला फार आवडे. रात्रीं तो नेहेमीं ताऱ्यांकडे आणि चंद्राकडे पहात बसे. हिंवाळ्यांत मात्र तो किरकिऱ्या आणि चिडखोर होई. फार रागावला तरी फारकरून कधीं बेताल होत नसे. पण कधीं कधीं चवताळलाच तर अगदीं अनर्थ करून सोडी. आपलीं मनगटें आपणच चावीत असे. तो धन्याशीं ममतेनें वागे; व कामकाजांतही उपयोगीं पडत असे. पण त्यावर चांगली नजर ठेवावी लागे. एकदां एक खाताचा गाडा भरावयाचा होता, तो त्यानें हां हां ह्मणतां भरून टाकला. पण तेथून त्यावर देखरेख करणारा मनुष्य जरा हालला मात्र, तों या स्वारीनें तितक्याच जलदीनें तो उसपून रिकामा केला! पिटर हा इ० स० १७८५ मध्यें हर्टफोर्टशायरच्या एका शेतांत मरण पावला.

अशा प्रकारचीं उदाहरणें आपल्या देशांत विश्वसनीय अशीं मिळणें दुर्लभ आहेत तरी, परदेशांतील उदाहरणें अनेक आहेत. आमच्या एका मित्राच्या सांगण्यांत सुमारें वीस वर्षांपूर्वी श्रीमंत पंतप्रतिनिधि ह्यांच्या कऱ्हाडच्या किल्ल्यांत अशा प्रकारचें एक जळमाणूस होतें. ह्याच्या कंबरेस दोरी बांधून त्यास कृष्णा कोयनेच्या संगमांत सोडीत. परंतु त्या गोष्टींतील तथ्यांश आज मिळणें फार कठीण आहे.

अशीं नानाविध लोकोत्तर चमत्काराचीं उदाहरणें विश्वसनीय, मुद्देसूद व तारिखवार टांचून ठेवून तीं प्रसिद्ध करण्याची सवय आमच्या

इकडे लागावी हा आमचा फार दिवस हेतु आहे. तो सिद्धीस नेण्याकरितां कोणी झटतील—ह्मणजे आमच्याकडे तसलीं टांचणें कोणी पाठवितील—तर त्यांचे अभार होतील. तो मजकूर प्रसिद्ध करण्यास योग्य ठरला तर विचारपूर्वक नामनिर्देशानें आह्मी प्रसिद्ध करूं. असो.

'बालबोध'कर्त्यांनीं डार्विनचें चरित्र देतांना असें ह्मटलें आहे कीं, डार्विनची कल्पना माकडापर्यंत ठीक जुळते; माकड व माणूस ह्यांच्या मधील—सांध्याचा—प्राणी आढळत नाहीं. आमच्या मतें त्या—सांध्या—ला वर दिलेलीं उदाहरणें बस्स आहेत.

# शुद्ध तांब्याचे स्वयंभू पत्रे.

धातु ह्या, जमिनींतील खाणींत सांपडतात, हें प्रसिद्धच आहे. पण त्या अशुद्धस्थितींत सांपडतात. ह्मणजे त्यांत केर, कचरा, दगड माती इत्यादि पदार्थ मिश्र झालेले असतात. ह्यास्तव त्यांची भट्टी लावून त्यांचा रस करून तो गाळून घ्यावा लागतो, हा सामान्य नियम आहे. परंतु कधीं कधीं शुद्ध धातूंच्या सबंध विटांच्या विटा, किंवा पत्रेच्या पत्रे जमिनींत सांपडलेले ऐकण्यांत येतात. बहुतकरून शुद्ध तांब्याचे पत्रे जमिनींत फार सांपडतात. विशेषेंकरून पर्वताच्या किंवा खडकाच्या ज्या मोठमोठ्या भेगा असतात, त्यांत मोठमोठाले अस्सल तांब्याचे पत्रे आयतेच तयार झालेले असतात. ह्याचें कारण असें आहे कीं, हल्लीं पर्वत व खडक ह्मणून पहाण्यांत येतात. ते सर्व ज्वालामुखीनें बनलेले आहेत. विद्वान् लोकांनीं असें अनुमान केलें आहे कीं, प्रथमारंभीं भूगर्भांत मनस्वी उष्णता होती. आणि ती वारंवार भूपृष्ठभागास फोडून बाहेर येई; आणि त्या द्वारांतून वर उचंबळून आलेले जे तप्तरस, ते थिजून—कालांतरानें थंड होऊन—सांप्रतचे खडक किंवा पर्वत झालेले आहेत. ह्या स्फोटाच्या उष्णतेनें भूगर्भांतील तांब्याचा रस होऊन त्यांत मिश्रित असलेले पदार्थ ज्वलत्स्फोटाच्या प्रखर उष्णतेनें जळून जाऊन कोठें कोठें शुद्ध तांबें शिल्लक राहिलेलें आहे. तेच हे आपोआप सांपडणारे पत्रे होत.

नेहमीं प्रचारांत असणाऱ्या तांब्याच्या पैशाचें वजन आणि किंमत

प्रत्येक मनुष्यास माहीत आहेच. आणि असलाच ४२० टनांचा-१४७० खंडींचा-तांब्याचा सबंध तुकडा जर एखाद्या मनुष्यास आयताच जमिनींत सांपडला, तर तो केवढा भाग्यवान् होईल बरें? परंतु ईश्वराची करणी अचिंत्य आहे. येवढाही तांब्याचा तुकडा इ० स० १८९७ सालीं मिनेसोटाच्या खाणीमध्यें एका गृहस्थास सांपडला. हा तुकडा ४९ फूट लांब, २२ फूट रुंद, आणि ८ फूट जाड होता! तसाच पेरु देशांत सांपडलेला असाच एक शुद्ध तांब्याचा तुकडा लिस्बोनच्या पदार्थसंग्रहालयांत आणलेला आहे. ह्याचें वजन २६१६ पौंड. आहे! तसेंच न्यूजरशीमध्यें ब्रास्विकजवळ एका खडकांत स्वच्छ तांब्याचा तुकडा सांपडला. हा किती तरी यार्ड लांब पसरे.

कानडा आणि युनाइटस्टेटच्या दरम्यान सुपेरिअरलेक जवळ तांब्याच्या मोठ्या धनत्तर खाणी आहेत. त्यांतून प्रतिवर्षीं १८००० टन शुद्ध तांबें निघतें. आणि इ० स० १८९३ मध्यें तर एक मोठा थोरला स्वच्छ तांब्याचा तुकडाच सांपडला होता! त्याचें वजन १०० टन असून लांबी ४० फूट होती. त्यांत रुपें मिश्र होतें. त्यामुळें 'पालिस' केल्यावर तो पत्रा फारच सुंदर आणि तेजस्वी दिसूं लागला. ह्या प्रकारें पृथ्वीवरील पुष्कळ देशांत कठीण खडकांच्या भेगांतून स्वच्छ तांब्याचे तुकडे सांपडतात. आणि ह्याच कारणानें पृथ्वीवर तांब्याचा प्रसार लौकर झाला. लोखंडाचा शोध लागण्यापूर्वीं लोक तांब्याचींच हत्यारें करीत असत. त्याच्याही पूर्वीं हत्यारांच्या ऐवजीं कठीण धारेच्या दगडांचा उपयोग करीत. नंतर हे शुद्ध तांब्याचे पत्रे सांपडूं लागले. मग जस्ताशीं मिश्र झालेलें तांबें सांपडूं लागलें. तेव्हां लोक जमिनी उकरून तांब्याच्या खाणी शोधूं लागले. ह्याचें अनुमान हल्लींच्या तांब्याच्या खाणींतील खोल जाग्यांत पुष्कळ वर्षांपूर्वीं पुरून गेलेल्या झाडांझुडांवरून व वनस्पतींच्या खुणांवरून करतां येतें.

तांब्याच्या खाणींत जे लोक काम करीत असतात, त्यांस महामारीचा उपद्रव होत नाहीं, ही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आणि ह्यावरूनच गांवांत महामारीचा उपद्रव सुरू झाला तर कांहीं विशेष कृतीचा तांब्याचा पट्टा तयार करून तो धारण केला तर, धारण करणारास त्या उपद्रवाची बाधा होणार नाहीं असें वैद्यशास्त्राचें मत आहे.

# पुस्तकपरीक्षा.

**धौममहाबळेश्वरवर्णन—कै० यशवंतराव आनंदराव उदास बी. ए.** यांनीं लिहिलेलें. विविधज्ञानविस्ताराच्या मालकांकडून आलेलें. रम्य स्थळ पाहिलें ह्मणजे मनास आनंद होणें हा मनुष्यमात्राचा धर्मच आहे. परंतु शोधक बुद्धीनें सर्व वस्तूंचें सूक्ष्म अवलोकन करून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या नाना कल्पनांचा दुसऱ्यांच्या मनावर यथातथ्य ठसा उठवून त्यांच्या चित्तवृत्ति उल्लसित करणें हा गुण फार दुर्मिळ होय. हें पुस्तक वाचलें ह्मणजे तो गुण प्रस्तुत पुस्तककर्त्यांच्या अंगीं पूर्णत्वेंकरून वास करीत होता असें दिसून येतें. स्थलाच्या दर्शनाचें जसें शोधकपूर्वक वर्णन केलें आहे, तसेंच तेथील स्थलाचें इतिहासदृष्ट्याही वर्णन केलें आहे. प्रथम भागांत 'स्थलवर्णन' आहे. द्वितीय भागांत क्षेत्रमाहात्म्य सांगितलें आहे. तृतीयांत ऐतिहासिक भाग—अर्थात् श्रीशिवछत्रपतीच्या कारकीर्दींतील—सांगितला आहे. अफजुलखानाच्या वधाचा भाग साधकबाधक प्रमाणें देऊन त्याचें कपटपाटव चांगलें व्यक्त केलें आहे. शिवाय एक शिवाजीवरचा साद्यंत व सटीप पोवाडा देऊन, त्यांतील शब्दांवरून व रचनेवरून खऱ्या इतिहासास पुष्कळ आधार काढले आहेत. चौथ्या भागांत महाबळेश्वरीं जाण्यापासून कोणकोणते फायदे घेण्यासारखे आहेत, त्यांचें विवेचन केलें आहे. आरंभीं महाबळेश्वरचा एक नकाशा, व शेवटीं पोवाड्याचें इंग्रजी भाषांतर दिलें आहे. एकंदरींत पुस्तक फार चांगलें व संग्रहणीय आहे. मात्र येवढें ह्मणतां येईल, कीं ह्यांत स्थलवर्णनापेक्षां इतिहासाच्या वादविवादाचाच भाग विशेष आहे.

---

## बुद्धिबळांच्या ३ ऱ्या प्रश्नाचें उत्तर.

१ **जाडा व.–व. ह. ४** बारीक रा.–व.उं. ३ किंवा प्या.–व. ५ [किंवा (अ)
२ „ **व.–व. ७** „ कांहीं खेळा.
३ „ **व.–रा. ६** „ मात.

(अ) १ **जाडा व.–व. ह. ४** बारीक –प्या.–व. घो. ५
२ „ **व.–व. ह. ६** „ रा. व. ५ [ किंवा. (क)
३ „ **व.–व. ३** „ मात.

(क २) **जाडा व.–व. ह. ६** बारीक –प्या.–व. ५
३ „ **व.–रा. ६** मात.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, BOMBAY.


# केरळकोकिळ.

पु० ७ ] [ अं० ६

## फ्लयामिंगो.

अथवा

## बृहद्बक.



मराठी ग्रंथ संग्रहालय

'फ्लयामिंगो,' हा बक ह्मणजे बगळ्याच्याच जातीपैकीं एक चमत्कारिक पक्षी आहे. व साधारणतः ह्याची राहाण्याची वगैरे व्यवस्था बकाप्रमाणेंच आहे ह्मणून ह्यासही बक असेंच नांव आह्मी देतों. ह्याचा आकार पाहिला ह्मणजे विलक्षण आश्चर्य वाटतें. त्याचे ते लांबच लांब पाय, त्यांच्यावर तें इवलेंसें डुबुरगें शरीर, पायांसही मागें सारणारी त्याची ती लांबच लांब मान, त्याची ती तीक्ष्ण चमच्यासारखी खोलगट व अणकुचीदार चोंच, त्याचे ते छोटेसे पंख, आणि

लांडें शेंपूट; इत्यादि ठेवण पाहिली ह्मणजे मोठें नवल वाटतें. ह्याच्या पंखांचा रंग गुलाबी असून तो पाठीकडे व पोटाकडे अगदीं लालभडक होत गेलेला असतो. आणि त्यामुळें हें पांखरूं फार सुंदर दिसतें.

**फ्ल्यामिंगो** हा शब्द फ्रेंच भाषेंतील आहे. ह्याचा अर्थ 'अग्नीची ज्वाळा' असा आहे. प्राचीन फ्रेंच कवींस ह्याच्या रंगाचें तेज अग्नी सारखें भासलें. ह्मणून त्यांनीं ह्या पक्ष्यास तेंच नांव दिलें. हे पक्षी तलावाच्या आणि नदीच्या कांठीं राहतात. समुद्रकांठींही असतात, परंतु कमी. ते किडे, कालवें, लहान मासे, माशांचीं अंडीं इत्यादि-कांवर आपलें उपजीवन करतात. भक्ष्य धरतांना ते आपली लांब मान पायांपर्यंत अशा रीतीनें वांकवितात, कीं चोंचीचा वरचा भाग खालीं हो-ऊन तो चमच्याप्रमाणें होतो. मग त्यानें किनाऱ्या जवळील दाट चिखलाचें पाणी खूप ढवळतात. ह्मणजे मासे वगैरे आयतेच त्यांच्या चोंचीच्या चमच्यांत येतात. पायानेंही हेंच काम चाललेलें असतें.

**बृहद्बक** कळप करून राहतात. हे, मासे धरण्यांत गुंतलेले असले ह्मणजे, कळपाचा अधिपति उंच मान करून उभा राहिलेला अ-संतो. आणि कांहीं शत्रूची किंवा भयाची चाहूल लागली, कीं तो एकप्रकारची चमत्कारिक किंकाळी फोडतो. मग सारे उडून कोठें तरी आश्रयास निघून जातात.

**बृहद्बक** जात्या फार भित्रा आहे. तो मनुष्याच्या वाऱ्यामोऱ्यास सुद्धां उभा राहत नाहीं: परंतु जनावरांस तो भीत नाहीं. ह्यास्तव शिकारी लोक बैलाचें किंवा घोड्याचें चामडें पांघरून त्यांच्या नजीक जातात आणि ह्या सुंदर पक्ष्यांची पारध करितात. कितीही कळपां-तील पक्षी मरून पडले, तरी ते उडून जात नाहींत. फक्त बंदुकीचा आवाज झालेला मात्र त्यांस ऐकूं येतो, परंतु त्यास ते भीत नाहींत. व उडूनही जात नाहींत. आपली हजारों मंडळी गतप्राण होत आहेत, तेव्हां येथें कोणी तरी शत्रु असला पाहिजे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनीं-ही वागत नाहीं!

**बृहद्बक** आपल्यासाठीं लहानसा उंचवटा पाहून त्यावर घरटें करतो. हें घरटें सुकलेल्या चिखलाचें असून, त्याच्या वरचा भाग पोकळ असतो. त्यांत मादी प्रत्येक खेपेस दोन अंडीं घालते. अंडीं उबवितांना मादी त्यावर

दोहींकडे आपले उंच दोन पाय ठेवून घोड्यावर स्वार झाल्याप्रमाणें किंवा जणोकाय सिंहासनावर एखादी राणीच आरूढ झाली आहे अशी बसते. पोरें अंड्यांतून बाहेर पडलीं नपडलीं, तों मळत सुटतात! परंतु बरेच दिवस त्यांस उडतां येत नाहीं. पंख फुटले ह्मणजे तीं उडूं लागतात. सुमारें दोन वर्षांनीं त्यांस रंग वगैरे सुरेख येतो. हे पक्षी उष्ण प्रदेशांतील बहुतेक ठिकाणीं आढळतात. **अमेरिके**जवळच्या कांहीं बेटांत हे पक्षी इतके विपुल आहेत, कीं त्या बेटांस दर्यावर्दी लोकांनीं '**फ्ल्यामिंगो**' असेंच नांव दिलें आहे. तसेंच **इजिप्त** देशांत **नील** नदीच्या कांठींही हे पक्षी पुष्कळ आहेत. उन्हाळा आला ह्मणजे ते आपणांस थंड जागा शोधूं लागतात. कित्येक **फ्रान्स** देशांच्या दक्षिण किनाऱ्यास जातात. ह्या पक्ष्यांची उंची सुमारें पांच फूट असते. ते जेव्हां आपले पाय मागें व माना पुढें करून आकाशांत त्रिकोणाकृतीनें उडत असतात, तेव्हां त्यांच्या रंगामुळें आकाशांत एक झगझगीत विजेप्रमाणें तेजोमय रेषा आहे असें वाटतें.

पूर्वीं ह्या पक्ष्याचें मांस उत्तम ह्मणून लेखीत असत; परंतु सांप्रत फारसें कोणी खात नाहीं. ह्याच्या मांसास एकप्रकारची घाण मारते. आणि ती लोकांस दुःसह होते. **हिओगोबालस** नांवाचा एक बादशहा होता. त्यास **फ्ल्यामिंगोचें** मांस फार आवडत असे. आणि त्यानें त्यासाठीं एक स्वतंत्रच रिसाला ठेवला होता. **इजिप्सियन** लोक ह्याच्या तेलापासून अनेक अमूल्य औषधें तयार करतात. ह्याच्या खांद्यांच्या हाडांची मुरली फार उत्तम होते.

---

# वृक्षोपदेश.

## आर्या.

सत्त्वस्थ विप्र कोणी संसारातें करोनियां दमला
द्यावी ह्मणे समस्तां सद्धुगुणांची करोनि याद मला ॥ १ ॥
यांचा करीत ऐशी तीर्थक्षेत्रें समस्तही फिरला
सद्गुरु मिळेल ह्मणुनी धैर्यें गिरिगव्हरांतही शिरला ॥ २ ॥

बैरागी संन्यासी आश्रम मठ देव धुंडिले सगळे
सर्वत्र दंभ आशा अंतूं येऊन शुद्ध फेस गळे ॥ ३ ॥
कोणी न पात्र देण्या मोक्षप्रद मज गुरूपदेशास
ऐसें चिंतुनि चित्तीं शीघ्र निघे जावया स्वदेशास ॥ ४ ॥
मार्गीं चालत जातां उष्णाचा ताप लागला कडक
पायहि थकून गेले नेटें उल्लंघितां महा खडक ॥ ५ ॥
क्षुद्बोध होय पोटीं उदकाविण फार घोपला प्राण
मार्गक्रमण कराया स्वल्पहि अंगीं न राहिलें त्राण ॥ ६ ॥
देवा दे स्नानाला पानाला उदक फार गार मला
प्रार्थी तों तो पुढती निर्झर तरु पाहुनी मनिं रमला ॥ ७ ॥
बहु रम्य आम्रतरुवर ज्याच्यावरि दाटला भला पाला
तापाला दूर करी कोकिल वरि काढिती अलापाला ॥ ८ ॥
तरुतळिं जाउनि एका टेंकुन बैसे खुशाल पाळाला
चित्तीं ह्मणे अहाहा येइल हें सौख्य का नृपाळाला ॥ ९ ॥
काढुनि वस्त्रें सारीं लावुनि पडशी बरी निवाऱ्यातें
क्षणभरि विश्रांतीस्तव आनंदें घेइ गोड वाऱ्यातें ॥ १० ॥
मग हायसा पडे तो छायेला घोंगडीस पसरोनी
बहु जीव तृप्त झाला गेला तो पथिक कष्ट विसरोनी ॥ ११ ॥
जवळचि ओढा होता निर्मळ जळ ज्यांत खळखळा वाहे
लाहे बहु सुख चित्तीं उत्सुकतेनें तयाकडे पाहे ॥ १२ ॥
स्वच्छंदें स्नान करी भावें अर्घ्यप्रदान दे रविला
संध्यावंदन करुनी स्तोत्रांनीं वासुदेवही स्तविला ॥ १३ ॥
षट्कर्मे संपवुनी सत्वर पूर्वस्थळीं पुन्हा परते
क्षुत्पीडाशमनार्थें विप्राचें लक्ष्य वेधलें वरतें ॥ १४ ॥
तों वाऱ्यानें पडले पक्वफळांचें धडाधडा घड ते
सुखदुःख लाभहानी दैवानें जीवजंतुला घडते ॥ १५ ॥
आंबे यथेच्छ भक्षी पाडाचे बहु रसाळ मधुरतम
समयीं कदान्न लागे क्षुद्विकलातें सुधारसासि सम ॥ १६ ॥

घट घट पाणी प्याला फिरवी उदरावरोनि तो करही
तृप्तीची खूण महा देउनि दावी असंख्य ढेकर ही ॥ १७ ॥
आली मना हुषारी पुनरपि तद्देह जाहला ताजा
पहुडे विशंक तेथें पसरुनियां पाय तो जसा राजा ॥ १८ ॥
क्षणमात्र बापुड्याला झालीं सुखसाधनें पहा गोळा
छायेमध्यें झुळझुळ वारा येतांच लागला डोळा ॥ १९ ॥
तों विद्युत्पातासम कड कड कडं कड करोनि तरु फुटला
सुटला तुफान वारा दाहि दिशेला प्रतिध्वनी उठला ॥ २० ॥
तरु मूलांतूनि निघे सिंहध्वनि मनुजशब्द गंभीर
रे रे द्विजा उठें तूं ऐकाया शब्द हे करीं धीर ॥ २१ ॥
खडबडला गडबडला आश्चर्यें चकित जाहला विप्र
उठला बसला वेगें जागा झाला भयामुळें क्षिप्र ॥ २२ ॥
झाला तटस्थ पाहे नयनाची पापणीहि नच हाले
तों अतनु ध्वनि पुनरपि गर्जोनी शांतवृत्तिनें चाले ॥ २३ ॥
देहांत अमृत भरलें ह्मणुनि मला ह्मणति आम्रतरु लोकीं
तो तुज उपदेशाया आलों मी मूर्तिमंत अवलोकीं ॥ २४ ॥
बापा भिऊं नको तूं मजकडुनी तुज घडेल बाधा न
सत्योपदेश कथितों श्रवणें होईल बा समाधान ॥ २५ ॥
रे ब्राह्मणा कशाला जगभरि तूं कष्ट खात फिरतोस
वेड्या मनीं वृथा कां सद्गुरु नाहीं ह्मणूनि झुरतोस ॥ २६ ॥
उपदेशाया एकचि ब्रह्मांडीं मनुज काय रे उचित
भरल्या अनंत वस्तु देतिल उपदेश त्या तुला खचित ॥ २७
अभिमानी पुरुषाहुनि निर्जिव आह्मी पदार्थ फार बरे
लोहहि टिके न जेथें होइल तेथें कसा नफा 'रबरें' ॥ २८ ॥
सत्यविचारें बघतां आहे जरि बुद्धिमंत नर कुलिन
नाना विकार पावुनि पुढती तद्बुद्धि होतसे मलिन ॥ २९ ॥
कामक्रोधविकारें मानवहस्तें घडे महापाप
आह्मी उद्भिज साधू शून्यविकारी असों अपोआप ॥ ३० ॥

शत्रू मित्र महात्मा आह्मा ना राव रंक हा भेद
सौख्याचा गर्व नसे दुःखाचा लेश ही नसे खेद ॥ ३१ ॥
माझ्या समान तूंही ठेवीं समबुद्धि सर्व भूतांत
येणेंच चित्तशुद्धि होइल कीं सुप्रसन्न भूतांत ॥ ३२ ॥
झंझावात मला रें धक्के मारी कितीक ताठ्यानें
देवोनि पाठ त्याला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें ॥ ३३ ॥
तैसा तूंहि जगीं या राहें लोकापवाद सोसून.
सासूचे बोल जसे खडतरही सोशिते बरी सून ॥ ३४ ॥
पर्जन्याच्या धारा झोंबे आंगास तीव्रतर वारा
गारांचा-वर मारा उष्णाचा प्रखर तापही सारा ॥ ३५ ॥
पंचमहाभूतांच्या सांपडतों मी सदा सपाट्यास
शिरसा वंद्य करीं मी जे जे येतील भोग वांट्यास ॥ ३६ ॥
केला कधीं न त्यांचा कंटाळा मुरडिलें न मीं नाक
तूं हि तसा वाग मिळे इहलोकीं सौख्य शेवटीं नाक ॥ ३७ ॥
विद्युत्पात शिरावरि अदळे कीं दुःसह प्रभा फांके
धाकें भीति धरोनी तरिहि कधीं संकटीं न मी वांकें ॥ ३८ ॥
तूंहि तसें धैर्य धरीं संकटसमयीं भिऊं नको लेश
धैर्याच्या शांतीच्या मागें आहे सदा हृषीकेश ॥ ३९ ॥
लोकीं परोपकारा ऐसें नाहींच पुण्य बा अन्य
जोडूनि धन्य होतों तरुवर आह्मी जरी असों वन्य ॥ ४० ॥
लावुनि मजला रक्षी पशुपासुनि शिशुसमान जो रानें
तोडुनि काढी हस्तें कीं जो मारी कुठार जोरानें ॥ ४१ ॥
दोघांवरीहि माझी आहे बा समसमान कीं माया
फळ पुष्प पर्ण देतों दोघांनाही करीं बरी छाया ॥ ४२ ॥
हा माझा शत्रु असे येइल हा मित्र भाउ कामातें
ऐसा भाव दुजा हा नाहीं स्वप्नांत ठाउका मातें ॥ ४३ ॥
शोषुनि दुर्गंधीतें वायूंतुनि सोडितों बरा वास
रंकांस फार कामीं येतों मी तेंवि थोर रावास ॥ ४४ ॥

क्षुधिताला फल देतों तप्ताला देतसें बरी छाया
गेला प्राण तरीही सर्पण होवोनि जाळितों काया ॥ ४५ ॥
ऐसें परोपकारीं मजसम तूं झिजविशील जरि आंग
तरि तुज मोक्ष मिळेलचि विश्वंभर दूर कां द्विजा सांग ॥ ४६ ॥
सद्गुरु नाहीं ऐसा झालासे व्यर्थ बा तुला भ्रम हा
स्थिरचर पदार्थ असती ध्याया उपदेश कीं समर्थ महा ॥ ४७ ॥
हा स्थीर मंदबुद्धी ह्मणुनी मानूं नको तरूस मज
हृदयीं भरून ठेवीं उपदेशामृत मला गुरू समज ॥ ४८ ॥
मत्सम जगांत वागें स्थीर करीं आत्मसंयमें मतिला
तेणें साधुत्वाला पावुनि होशील पात्र सद्गतिला ॥ ४९ ॥
उत्तम बोल तुला हे कथिले याचा विचार करिं नीट
सद्बोधामृतपानें सुज्ञजनाला कधीं न ये वीट ॥ ५० ॥
आश्वासुनि भूदेवा ती अंतर्धान पावली मूर्ती
सत्यज्ञानें विप्रा वैराग्याची घडे महा स्फूर्ती ॥ ५१ ॥
सद्गदित कंठ झाला अंगीं वैराग्य दाटलें फार
साष्टांग विप्र तरुतें पूज्यत्वानें करी नमस्कार ॥ ५२ ॥
उल्हासवृत्ति झाली मनिंचें औदास्य सर्वही सरलें
पुरली सर्व मनीषा ज्ञानाचें तत्त्व अंतरीं भरलें ॥ ५३ ॥
झाला थोर महात्मा साधुगुणांचीच लागली भक्ति
इहलोकीं सुखि झाला अंतींही पावला पहा मुक्ति ॥ ५४ ॥
तात्पर्य जे कथेचें समजुनि वर्तन जगांत करतील
साधुत्व पावुनी ते सहजीं भवसिंधुलाहि तरतील ॥ ५५ ॥

# सृष्टिवैचित्र्य.

## १ पर्जन्य.

मनुष्याच्या ऐहिक सुखसाधनांत पर्जन्य हें एक मुख्य साधन आहे. तो जर नसेल तर पृथ्वी ही एक ओसाड आणि भणभणीत अरण्य होऊन जाईल. दक्षिण आफ्रिकेमध्यें पर्जन्याचा नेहमीं अभावच असतो.

तेथें पूर्वी मोठें जंगल होतें, तें काफर लोकांनीं बेपर्वाईनें तोडून त्याचा फडशा पाडला. त्यामुळें आतां तेथें अनावृष्टि झाली आहे.

पाण्याचे अत्यंत सूक्ष्म परमाणु एकत्र जमून मेघ बनलेले असतात. ते एकत्र जमून वातावरणांतून धांवूं लागले ह्मणजे त्यांच्या अंगीं जडत्व येतें. आणि मग ते पर्जन्याच्या रूपानें पृथ्वीवर कोसळूं लागतात. प्रथमतः ते फार लहान असतात. पर्जन्याचे मेघ स्थिरावले ह्मणजे पर्वतावर ते लहान लहान भागांनीं दृष्टीस पडतात. ते हवेंतून जाऊं लागले ह्मणजे त्यांचा आकार वाढत जातो. आणि शेवटीं शेवटीं जमिनीवर पर्जन्याचे थेंब होऊन पडेपर्यंत ओथंबतात. पण पाण्याचे परमाणु एकत्र जमण्याचें कारण काय? ह्याचें उत्तर पूर्वी गेलेंच आहे. आपल्या श्वासोच्छ्वासांतील पाणी स्लेटीवर धरण्याचें कारण काय? तर स्लेटीचा थंडपणा. तसेंच थंड हवेचा प्रवाह येऊन मेघावर आदळला कीं, त्यांतील पाणी बाहेर पडणारच. हें एक कारण झालें. परंतु ह्याशिवाय त्यास दुसरींही अनेक कारणें आहेत. उष्ण हवेचा प्रवाह समोरासमोर येऊन मेघावर आदळला, तरीही मेघ वितुळण्यास कारण होतें.

हिंदुस्थानांत कितीएक ठिकाणीं मनस्वी पर्जन्य पडतो. **चेरापुंजी, खाशीहिल्स,** बंगालची ईशान्य, येथें प्रतिवर्षी इतका पाऊस पडतो, कीं तितका पाऊस पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही स्थळीं पडत नाहीं. ह्या स्थळीं प्रतिवर्षी ५२४ इंच पर्जन्य पडल्याचें सरासरी मान निघालें आहे. हा इतका पाऊस लागून पडलेलें पाणी वाहून किंवा सुकून न जातें, तर प्रतिवर्षी ४४ फूट खोल पाण्याचा एक मोठा तलाव झाला असता! सिंधप्रांतांत ह्याच्या उलट स्थिति आहे. ह्मणजे तेथें प्रतिवर्षी अवघा दोनच इंच पाऊस पडतो! कधींकधीं तर बारा आणि बारा चोवीस महिने पर्जन्याच्या थेंबावांचूनच जातात! ह्या दोन टोंकांच्या मधल्या प्रदेशांत क्रमाप्रमाणेंच स्थिति लागून राहिली आहे.

अतिशय पर्जन्य पडण्याच्या दोन पट्ट्या आहेत. इरावती नदीच्या मुखापासून बंगालच्या उपसागराच्या पूर्वकिनाऱ्यापर्यंत आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यापासून हिमालयाच्या टोंकापर्यंत एक; व भूशिराच्या पश्चिमकिनाऱ्यावर ह्मणजे समुद्रकिनाऱ्यापासून घांटाच्या शिखरापर्यंत दुसरी. ह्या दोन्ही प्रदेशांत समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यामध्यें वाफेचें मिश्रण

अधिक असतें. आणि ते वारे येऊन पर्वताच्या शिखरावर आदळतात. तेणेंकरून डोंगराळ प्रदेशाच्या सभोंवार पाऊस चांगला पडतो. हवा वर चढूं लागली ह्मणजे विस्तार पावून थंड होते. आणि वाफेचा पुष्कळ भाग तळाशीं बसविते. वाऱ्याच्या वाहात्या दिशेच्या मार्गावर पर्वत आडवा आलेला असेल तर तोही पर्जन्यातिशयास कारण होतो. ह्मणजे पर्वातच्या सान्निध्यास असणाऱ्या प्रदेशावर पर्जन्याची विपुलता असते, व उलटपक्षीं त्याचा अभाव असतो. **लाहोर** शहर पर्वतप्रदेशापासून सुमारें १०० मैल दूर आहे. तेथें वर्षास १५ इंच पाऊस पडतो. **रावळपिंडी** घांटाच्या पायथ्याशीं नजिकच आहे, तेथें वर्षास २९ इंच पाऊस पडतो. **हाजारा** अगदीं पर्वतावर आहे, तेथें ४४ इंच पाऊस पडतो. वाहता वारा पर्वताच्या ज्या उतरणीवर येऊन थडकतो,त्याच्या पलीकडे ह्मणजे दुसऱ्या उतरणीवर पर्जन्याचा बहुतेक अभावच असतो. दक्षिणवारा येऊन हिमालयावर थडकतो, यामुळें बंगाल प्रांत व पंजाब प्रांत यांच्या उत्तरबाजूस पर्जन्य विपुल पडतो. परंतु दुसऱ्या उतरणीवर ह्मणजे **तिबेट** देशांत बहुतकरून नेहमीं पावसाची टंचाईच असते. ह्याचें कारण वाय्वावरणांतील संमिश्र असलेली सर्व वाफ पर्वत प्रथमतः शोषून पर्जन्यरूपानें खालीं पाडतो; आणि अर्थातच पलीकडे हवा जातांना हवेंत वाफेचा लेशही उरत नाहीं. मुंबईस सरासरी प्रतिवर्षी ७१ इंच पाऊस पडतो. आणि पश्चिमघांटांपैकीं अत्युच्च शिखर जें महाबळेश्वर तेथें २६० इंच पडतो; तसेंच पुण्यांत अवघा २७ इंचच प्रतिवर्षी पाऊस पडतो.

**अरवली** डोंगराच्या पश्चिमबाजूस प्रतिवर्षी १० इंचांहूनही पाऊस कमीच असतो. **दिल्ली, आग्रा,** आणि हिंदुस्थानचा मध्यप्रदेश ह्यांत ३० इंचांपेक्षांही पाऊस कमीच असतो. **मद्रासें**त प्रतिवार्षिक पावसाची सरासरी ५० इंचांची पडते; आणि **कलकत्त्या**ची ६६ इंचांची पडते. पश्चिम किनाऱ्यावरचा भरपावसाळा मे पासून आगष्ट पर्यंत असतो; आणि कर्नाटकांत अक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर हे अगदीं झडीचे दिवस.

**इंग्लंड**ची गोष्ट हिंदुस्थानाप्रमाणेंच आहे. ह्मणजे पूर्व किनाऱ्यापेक्षां पश्चिम किनाऱ्यावर पाऊस अधिक असतो. पश्चिम किनाऱ्यावरील प्रति-

शत्रू मित्र महात्मा आह्मा ना राव रंक हा भेद
सौख्याचा गर्व नसे दुःखाचा लेश ही नसे खेद ॥ ३१ ॥
माझ्या समान तूंही ठेवीं समबुद्धि सर्व भूतांत
येणेंच चित्तशुद्धि होइल कीं सुप्रसन्न भूतांत ॥ ३२ ॥
झंझावात मला रे धक्के मारी कितीक ताठ्यानें
देवोनि पाठ त्याला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें ॥ ३३ ॥
तैसा तूंहि जगीं या राहें लोकापवाद सोसून.
सासूचे बोल जसे खडतरही सोशिते बरी सूनें ॥ ३४ ॥
पर्जन्याच्या धारा झोंबे आंगास तीव्रतर वारा
गारांचा वर मारा उष्णाचा प्रखर तापही सारा ॥ ३५ ॥
पंचमहाभूतांच्या सांपडतों मी सदा सपाट्यास
शिरसा वंद्य करीं मी जे जे येतील भोग वांट्यास ॥ ३६ ॥
केला कधीं न त्यांचा कंटाळा मुरडिलें न मीं नाक
तूं हि तसा वाग मिळे इहलोकीं सौख्य शेवटीं नाक ॥ ३७ ॥
विद्युत्पात शिरावरि अदळे कीं दुःसह प्रभा फांके
धाकें भीति धरोनी तरिहि कधीं संकटीं न मी वांकें ॥ ३८ ॥
तूंहि तसें धैर्य धरीं संकटसमयीं भिऊं नको लेश
धैर्याच्या शांतीच्या मागें आहे सदा हृषीकेश ॥ ३९ ॥
लोकीं परोपकारा ऐसें नाहींच पुण्य बा अन्य
जोडूनि धन्य होतों तरुवर आह्मी जरी असों वन्य ॥ ४० ॥
लावुनि मजला रक्षी पशुपासुनि शिशुसमान जो रानें
तोडुनि काढी हस्तें कीं जो मारी कुठार जोरानें ॥ ४१ ॥
दोघांवरीहि माझी आहे बा समसमान कीं माया
फळ पुष्प पर्ण देतों दोघांनाही करीं बरी छाया ॥ ४२ ॥
हा माझा शत्रु असे येइल हा मित्र भाउ कामातें
ऐसा भाव दुजा हा नाहीं स्वप्नांत ठाउका मातें ॥ ४३ ॥
शोषुनि दुर्गंधीतें वायूंतुनि सोडितों बरा वास
रंकांस फार कामीं येतों मी तेंवि थोर रावास ॥ ४४ ॥

क्षुधिताला फल देतों तप्ताला देतसें बरी छाया
गेला प्राण तरीही सर्पण होवोनि जाळितों काया ॥ ४५ ॥
ऐसें परोपकारीं मजसम तूं झिजविशील जरि आंग
तरि तुज मोक्ष मिळेलचि विश्वंभर दूर कां द्विजा सांग ॥ ४६ ॥
सद्गुरु नाहीं ऐसा झालासे व्यर्थ बा तुला भ्रम हा
स्थिरचर पदार्थ असती ध्याया उपदेश कीं समर्थ महा ॥ ४७ ॥
हा स्थीर मंदबुद्धी ह्मणुनी मानूं नको तरूस मज
हृदयीं भरून ठेवीं उपदेशामृत मला गुरू समज ॥ ४८ ॥
मत्सम जगांत वागें स्थीर करीं आत्मसंयमें मतिला
तेणें साधुत्वाला पावुनि होशील पात्र सद्गतिला ॥ ४९ ॥
उत्तम बोल तुला हे कथिले याचा विचार करिं नीट
सद्बोधामृतपानें सुज्ञजनाला कधीं न ये वीट ॥ ५० ॥
आश्वासुनि भूदेवा ती अंतर्धान पावली मूर्ती
सत्यज्ञानें विप्रा वैराग्याची घडे महा स्फूर्ती ॥ ५१ ॥
सद्गदित कंठ झाला अंगीं वैराग्य दाटलें फार
साष्टांग विप्र तरुतें पूज्यत्वानें करी नमस्कार ॥ ५२ ॥
उल्हासवृत्ति झाली मनिंचें औदास्य सर्वही सरलें
पुरली सर्व मनीषा ज्ञानाचें तत्त्व अंतरीं भरलें ॥ ५३ ॥
झाला थोर महात्मा साधुगुणांचीच लागली भक्ति
इहलोकीं सुखि झाला अंतींही पावला पहा मुक्ति ॥ ५४ ॥
तात्पर्य जे कथेचें समजुनि वर्तन जगांत करतील
साधुत्व पावुनी ते सहजीं भवसिंधुलाहि तरतील ॥ ५५ ॥

# सृष्टिवैचित्र्य.

## १ पर्जन्य.

मनुष्याच्या ऐहिक सुखसाधनांत पर्जन्य हें एक मुख्य साधन आहे. तो जर नसेल तर पृथ्वी ही एक ओसाड आणि भणभणीत अरण्य होऊन जाईल. दक्षिण आफ्रिकेमध्यें पर्जन्याचा नेहमीं अभावच असतो.

तेथें पूर्वीं मोठें जंगल होतें, तें काफर लोकांनीं बेपर्वाईनें तोडून त्याचा फडशा पाडला. त्यामुळें आतां तेथें अनावृष्टि झाली आहे.

पाण्याचे अत्यंत सूक्ष्म परमाणु एकत्र जमून मेघ बनलेले असतात. ते एकत्र जमून वातावरणांतून धांवूं लागले ह्मणजे त्यांच्या अंगीं जडत्व येतें. आणि मग ते पर्जन्याच्या रूपानें पृथ्वीवर कोसळूं लागतात. प्रथमतः ते फार लहान असतात. पर्जन्याचे मेघ स्थिरावले ह्मणजे पर्वतावर ते लहान लहान भागांनीं दृष्टीस पडतात. ते हवेंतून जाऊं लागले ह्मणजे त्यांचा आकार वाढत जातो. आणि शेवटीं शेवटीं जमिनीवर पर्जन्याचे थेंब होऊन पडेपर्यंत ओथंबतात. पण पाण्याचे परमाणु एकत्र जमण्याचें कारण काय? ह्याचें उत्तर पूर्वीं गेलेंच आहे. आपल्या श्वासोच्छ्वासांतील पाणी स्लेटीवर धरण्याचें कारण काय? तर स्लेटीचा थंडपणा. तसेंच थंड हवेचा प्रवाह येऊन मेघावर आदळला कीं, त्यांतील पाणी बाहेर पडणारच. हें एक कारण झालें. परंतु ह्याशिवाय त्यास दुसरींही अनेक कारणें आहेत. उष्ण हवेचा प्रवाह समोरासमोर येऊन मेघावर आदळला, तरीही मेघ वितुळण्यास कारण होतें.

हिंदुस्थानांत कितीएक ठिकाणीं मनस्वी पर्जन्य पडतो. **चेरापुंजी, खाशीहिल्स**, बंगालची ईशान्य, येथें प्रतिवर्षीं इतका पाऊस पडतो, कीं तितका पाऊस पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही स्थळीं पडत नाहीं. ह्या स्थळीं प्रतिवर्षीं ५२४ इंच पर्जन्य पडल्याचें सरासरी मान निघालें आहे. हा इतका पाऊस लागून पडलेलें पाणी वाहून किंवा सुकून न जातें, तर प्रतिवर्षीं ४४ फूट खोल पाण्याचा एक मोठा तलाव झाला असता! सिंधप्रांतांत ह्याच्या उलट स्थिति आहे. ह्मणजे तेथें प्रतिवर्षीं अवघा दोनच इंच पाऊस पडतो! कधींकधीं तर बारा आणि बारा चोवीस महिने पर्जन्याच्या थेंबावांचूनच जातात! ह्या दोन टोंकांच्या मधल्या प्रदेशांत क्रमाप्रमाणेंच स्थिति लागून राहिली आहे.

अतिशय पर्जन्य पडण्याच्या दोन पट्ट्या आहेत. इरावती नदीच्या मुखापासून बंगालच्या उपसागराच्या पूर्वकिनाऱ्यापर्यंत आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यापासून हिमालयाच्या टोंकापर्यंत एक; व भूशिराच्या पश्चिमकिनाऱ्यावर ह्मणजे समुद्रकिनाऱ्यापासून घांटाच्या शिखरापर्यंत दुसरी. ह्या दोन्ही प्रदेशांत समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यामध्यें वाफेचें मिश्रण

अधिक असतें. आणि ते वारे येऊन पर्वताच्या शिखरावर आदळतात. तेणेंकरून डोंगराळ प्रदेशाच्या सभोंवार पाऊस चांगला पडतो. हवा वर चढूं लागली ह्मणजे विस्तार पावून थंड होते. आणि वाफेचा पुष्कळ भाग तळाशीं बसविते. वाऱ्याच्या वाहात्या दिशेच्या मार्गावर पर्वत आडवा आलेला असेल तर तोही पर्जन्यातिशयास कारण होतो. ह्मणजे पर्वातच्या सान्निध्यास असणाऱ्या प्रदेशावर पर्जन्याची विपुलता असते, व उलटपक्षीं त्याचा अभाव असतो. **लाहोर** शहर पर्वतप्रदेशापासून सुमारें १०० मैल दूर आहे, तेथें वर्षास १९ इंच पाऊस पडतो. **रावळपिंडी** घांटाच्या पायथ्याशीं नजिकच आहे, तेथें वर्षास २९ इंच पाऊस पडतो. **हाजारा** अगदीं पर्वतांवर आहे, तेथें ४४ इंच पाऊस पडतो. वाहता वारा पर्वताच्या ज्या उतरणीवर येऊन थडकतो त्याच्या पलीकडे ह्मणजे दुसऱ्या उतरणीवर पर्जन्याचा बहुतेक अभावच असतो. दक्षिणवारा येऊन हिमालयावर थडकतो, यामुळें बंगाल प्रांत व पंजाब प्रांत यांच्या उत्तरबाजूस पर्जन्य विपुल पडतो. परंतु दुसऱ्या उतरणीवर ह्मणजे **तिबेट** देशांत बहुतकरून नेहमीं पावसाची टंचाईच असते. ह्याचें कारण वाय्वावरणांतील संमिश्र असलेली सर्व वाफ पर्वत प्रथमतः शोषून पर्जन्यरूपानें खालीं पाडतो; आणि अर्थातच पलीकडे हवा जातांना हवेंत वाफेचा लेशही उरत नाहीं. मुंबईस सरासरी प्रतिवर्षी ७१ इंच पाऊस पडतो. आणि पश्चिमघांटांपैकीं अत्युच्च शिखर जें महाबळेश्वर तेथें २६० इंच पडतो; तसेंच पुण्यांत अवघा २७ इंचच प्रतिवर्षी पाऊस पडतो.

**अरवली** डोंगराच्या पश्चिमबाजूस प्रतिवर्षी १० इंचांहूनही पाऊस कमीच असतो. **दिल्ली, आग्रा,** आणि हिंदुस्थानचा मध्यप्रदेश ह्यांत ३० इंचांपेक्षांही पाऊस कमीच असतो. **मद्रासें**त प्रतिवार्षिक पावसाची सरासरी ५० इंचांची पडते; आणि **कलकत्त्या**ची ६६ इंचांची पडते. पश्चिम किनाऱ्यावरचा भरपावसाळा मे पासून आगष्ट पर्यंत असतो; आणि कर्नाटकांत अक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर हे अगदीं झडीचे दिवस.

**इंग्लंड**ची गोष्ट हिंदुस्थानाप्रमाणेंच आहे. ह्मणजे पूर्व किनाऱ्यापेक्षां पश्चिम किनाऱ्यावर पाऊस अधिक असतो. पश्चिम किनाऱ्यावरील प्रति-

वार्षिक पावसाची सरासरी ३० पासून ४९ इंच असते; आणि पूर्व किनाऱ्यावरील सरासरी २०.पासून २८ इंच असते.

पृथ्वीवर कित्येक प्रदेश असे आहेत कीं, तेथें पाऊस मुळींच पडत नाहीं. ह्या प्रदेशास निर्जल प्रदेश ह्मणतात. दक्षिण **अमेरिकें**तील **पेरू** देशाचा किनारा; **आफ्रिकें**तील **साहरा** नांवाचें भयाण आणि निर्जन रेतीचें मैदान; आणि **एशिया** खंडांतील **गोबी**चें अरण्य; ह्या ठिकाणीं बारा आणि बारा चोवीस महिन्यांत पावसाचा एक थेंबही पडत नाहीं. ह्याच्या उलट दक्षिण **अमेरिकें**तील **पाटागोनिया** येथें बाराही महिने सारखा पाऊस असतो; येवढेंच नव्हे पण पावसाशिवाय एक दिवस सुनका असा क्वचितच आढळेल!

यथाकाळीं पर्जन्य पडण्याला मुख्य परमेश्वराचीच कृपा पाहिजे. यथोचित पर्जन्य पडून सुबत्ता झाली ह्मणजे आपण परमेश्वराचे उपकार मानावेत; आणि पर्जन्याची फार गरज असली ह्मणजे आपण त्यास मनोभावें शरण जाऊन त्याचा धांवा करावा हेंच आपलें मनुष्यजातीचें कर्तव्यकर्म होय. तें करण्याविषयीं कधीं चुकूं नये. आणि तेंच फलद्रूप होईल हा दृढ विश्वास धरावा.

हल्लीं कृतीचा पाऊस पाडण्याची युक्ति **अमेरिकें**त निघाली आहे. विमानांत बसून मेघमंडळापर्यंत जातात, आणि तेथें **'डायनामेट'**चे बार काढून उष्णता उत्पन्न करतात ह्मणजे तेणेंकरून पर्जन्य पडतो. अशा प्रयोगास त्या जाग्यांतील वाय्वावरणांत ढगांची अवश्यकता असेल असें दिसतें. **अमेरिकें**त ह्या प्रयोगास उत्तम यश आल्याचें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. ह्याच अनुमानावरून विजापूर येथें थोड्या दिवसांपूर्वी सुमारें २००० रुपये खर्च करून हा प्रयोग करून पाहण्यांत आला. परंतु पाऊस पडला नाहीं. तथापि हा प्रयोग पुष्कळ अंशानें साध्य होईल अशी आशा वाटते. कारण जेथें तोफांची किंवा बंदुकांची सरबत्ती होते, तेथें अकालींही पर्जन्य पडल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. लढाई मारून आलेले सर्व लोक सांगतात कीं प्रत्येक लढाईत पाऊस असतो. मग ती लढाई कोठेंही व कोणत्याही ऋतूंत होवो. श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर ह्यांनीं तोफांची सरबत्ती करवून एक वेळ पाऊस पाडला, व एक

वेळ घालविला अशी प्रसिद्ध दंतकथा आहे. शिवाय वेदामध्येंही पर्जन्याविषयीं यज्ञाचें माहात्म्य वर्णन केलें आहे.

"यज्ञाद्भवतिपर्जन्यो पर्जन्यादन्नसंभवः"

अशीं वाक्यें आहेत. व त्याप्रमाणें प्राचीनकालचे राजे मोठमोठे यज्ञ करून वातावरणांत उष्णता उत्पन्न करीत. आणि तेणेंकरून पर्जन्य पडे असें वाटतें. इत्यादि गोष्टींचा विचार मनांत आणला ह्मणजे पर्जन्य पाडण्याची कृति प्रयत्नाअंतीं साध्य होण्यास कांहीं नड येईल असें दिसत नाहीं.

---

# लोकोत्तर चमत्कार.

## अपूर्व कौशल्य.

चौदावा लुइस राजा लहान असतांना, त्यास खेळण्यासाठीं ह्मणून, एका कामस नांवाच्या फ्रेंच कारागिरानें कांहीं चित्रें तयार करून आणलीं होतीं. त्यांत एक गाडी होती. ह्या गाडीमध्यें, त्या चतुर पुरुषानें आपली अशी कांहीं करामत खर्च केली होती, कीं ती पाहिली ह्मणजे त्याच्या बुद्धीचें सर्वांस मोठें आश्चर्य वाटे. ही गाडी लहानसरच असून तीस दोन घोडे जुंपलेले होते. गाडीमध्यें एक स्त्री बसविलेली असून, तिच्या पुढच्या बाजूस एक हुजऱ्या, व पाठीमागच्या बाजूस एक पट्टेवाला असे. ही गाडी एखाद्या चांगल्या सपाट टेबलाच्या एका कोंपऱ्यावर नेऊन ठेविली कीं, 'कोचमन' चाबुक उगारी. 'कोचमना'नें चाबुक उगारला, कीं घोडे गाडी घेऊन पळत सुटत. आणि त्यांत चतुराई ही कीं, घोड्याचे चारही पाय खऱ्या घोड्याप्रमाणें हालत असत. अशा वेगानें ती गाडी, टेबलाच्या दुसऱ्या कोंपऱ्यापर्यंत गेली, कीं ती चटकर आडवी व सरळरेषेंत फिरून टेबलाच्या आडव्या कडेबरोबर चालूं लागे. पुन्हा तिसरा टेबलाचा कोंपरा आला कीं, पहिल्याप्रमाणेंच आपोआप रोंख फिरवून चालूं लागे. असें होतां होतां शेवटीं ज्या टोंकावर राजदरबार करून बसविलेला असेल तेथपर्यंत ती गाडी येऊन पोंचली, कीं ती लागलीच तेथें थांबे. गाडी थांबली, कीं पट्टेवाला खालीं उतरून गाडीचें दार उघडी. दार उघडलें कीं, ती बाई खालीं उतरावयास लागे. इतक्यांत पुढें बसलेला हुजऱ्या खालीं उतरून बाईस हात

देत असे. मग ती बाई मोठ्या सभ्यपणानें व नम्रत्वानें राजदरबारांत जाऊन, हातांत असलेला अर्ज, राजापुढें ठेवून, व थोडा वेळ तेथें थांबून, पहिल्याप्रमाणेंच मोठ्या इभ्रतीनें ती पुन्हा गाडीपर्यंत येत असे. तीस गाडींत चढतांना हुजऱ्या हात देऊन आपण पुढच्या बाजूस जाऊन बसे. पट्टेवाल्यानें दार बंद केलें कीं, 'कोचमन' चाबूक उगारी, व लगेच घोडे चालूं लागत. पट्टेवाला पाठीमागच्या बाजूस हात देऊन क्षणभर गाडी-बरोबर पळे, आणि मग चटकर उडीमारून तो गाडीच्या टपाच्या वाद्यांस धरून पाठीमागच्या पायरीवर जाऊन उभा राहत असे. अशा रीतीनें ती स्वारी पुन्हा पूर्व ठिकाणावर येत असे. केवढें कौशल्य हें?

---

# पुस्तकपरीक्षा.

**नानाफडनविसांचें चरित्र**—हें रा० रा० **वामनशास्त्री खरे**—मिरज हायस्कुलांतील संस्कृत भाषेचे शिक्षक—ह्यांनीं जुन्या लेखांच्या आधारानें तयार केलें आहे. ह्याचीं पत्रें सुमारें २५० असून त्यांत २५ प्रकरणें आहेत. हें चरित्र लिहिण्यांत ग्रंथकारांनीं पुष्कळ परिश्रम घेतले असून, नानांचा आयुःक्रमही व्यवस्थितपणें उतरला आहे. ह्यांत दुसऱ्याच्या ग्रंथांतील उतारे जरी बऱ्याच अंशानें घेतले आहेत तरी, एकंदरींत भाषापद्धति चांगली व सुगम आहे. किती एक लेखांवर ग्रंथकारास जे विचार सुचले, ते त्यांनीं साधक बाधक प्रमाणें देऊन—आपल्या मताप्रमाणें कां होईना—सिद्ध केले आहेत. ग्रंथाचें बाह्यस्वरूप चांगलें आहे. ह्याशिवाय नानाफडणविसाच्या खऱ्या तसबिरीवरून काढलेला एक सुंदर 'फोटोग्राफ' ह्या ग्रंथाच्या आरंभीं दिला आहे. नानांच्या हस्ताक्षराचा एक, व हरिपंत फडक्यांच्या हस्ताक्षराचा एक, असे दोन 'फोटो'वरून काढलेले नमुने दिले आहेत. ह्या सर्व कारणांमुळें ह्या ग्रंथाची योग्यता विषेश वाढली आहे. एकंदरींत ह्या कामीं जितकी मेहनत घ्यावयास पाहिजे होती, तितकी रा० खरे ह्यांनीं घेण्यास कांहीं आळस केला नाहीं. ह्यास्तव ह्या त्यांच्या परिश्रमांबद्दल, व जगभर कीर्ति दुमदुमलेल्या एका नामांकित सजातीय मुत्सद्दी पुरुषाच्या चरित्राची संगतवार ओळख करून दिल्याबद्दल, व महाराष्ट्रभाषेंतील पुस्तकांत एका सुंदर पुस्तकाची भर टाकल्याबद्दल आह्मी सर्वांनीं त्यांचे उपकार मानले पाहिजेत.

शिवाय, विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, ह्यांतील 'फोटो'चें काम **श्री० बाळासाहेब मिरजकर** ह्यांनीं केलेलें आहे. ह्यावरून श्रीमंतांची कुश-

लता, परोपकारबुद्धि, सत्कार्याविषयीं तत्परता, व उद्योगशीलता इत्यादि गुण व्यक्त होतात. व त्याबद्दल श्रीमंतांचेही आभार मानणें जरूर आहे. ह्याप्रमाणें सामन्यतः ग्रंथाच्या चांगुलपणाविषयीं जें काय सांगावयाचें, तें थोडक्यांत सांगितलें. आतां रीतीप्रमाणें दुसऱ्याबाजूकडे वळावयाचें.

दुसरीबाजू ह्मणजे अर्थात् दोषस्थळें. तीं दाखविलेलीं ग्रंथकारास फारशीं आवडत नाहींत. कसेंही असलें, तरी त्याची उडवाउडव करणें कोणासही इष्ट नाहीं. हें मनांत आणून ह्या ग्रंथांतील कोणकोणत्या मुद्यांवर आमचे विचार भिन्न आहेत ते सादर करतों.

प्रस्तुतकालांतील शिक्षण, कांहीं अंशीं दुर्बिणीसारखें, किंवा 'फोटोग्राफी'तील 'लेन्स क्यामेऱ्या'सारखें आहे. दुर्बिणींतून सर्व पदार्थ जसे उलटे दिसतात, तसें प्रस्तुतशिक्षणानेंही आमच्या वाडवडिलांचे गुण उलटे भासूं लागतात. मुलगा "मातृक्लेशनांतू"न मुक्त झाला कीं, त्याच्या विकसित मेंदूंतील पहिला सिद्धांत हा कीं "आपलीं आईबापें व वाडवडील महामूर्खांचीं शिरोमणी आहेत." हा समज किती भ्रांतिमूलक, व केवढा अनर्थोत्पादक आहे, ह्याचा विस्तार करण्याची कांहीं गरजच नाहीं. नूतन ग्रंथकारांपैकीं बऱ्याच ग्रंथकारांनीं ह्याच सिद्धांताचें वळण घेतलें आहे. आपल्या ग्रंथाची प्रस्तावना लिहावयाची ह्मटलें, कीं त्यांत प्रथम वाडवडिलांची निंदापुष्पांनीं षोडशोपचार पूजा केलीच पाहिजे. जणों काय त्यांत अंतर पडल्यास पुढील कामास वडिलांचा आशीर्वादच मिळावयाचा नाहीं ! परंतु तोच प्रमाद रा० खरे यांसारख्या संस्कृत शिक्षकांच्या हातून व्हावा, ही केवढी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे ? रा० खरे यांनीं 'जुन्या' लोकांच्या अज्ञानांधकाराचें गांठोडें उजेडांत आणून कसें सोडलें आहे तें पहाः—ते ह्मणतातः—

"नानांस मरून पुरतीं शंभर वर्षेंही लोटलीं नाहींत तोंच त्यांच्या खऱ्या इतिहासाची **लोक** ओळख विसरले आहेत, आणि त्या इतिहासाच्या जागीं आतां नानांच्या कांहीं क्षुल्लक व खासगी संबंधाच्या खोट्यानाट्या गोष्टी मात्र सांगण्यांत येत असतात !" (प्रस्तावना १)

ग्रंथकारांचे प्रतिपक्षी सात्विकवृत्तीचे असल्यामुळें, व वाग्युद्धार्थ समरांगणीं ठाकण्याचें त्यांस सामर्थ्य नसल्यामुळें, हे असंबद्ध प्रलाप ते शांतपणानें सहन करतील ही गोष्ट खरी आहे. परंतु निरपराधी प्राण्यावर विनाकारण दूषण आल्यास तिऱ्हाइतानें तरी तें कां सहन करावें ? सहन केल्यास तो कांहीं न्याय नव्हे. ह्यास्तव ग्रंथकारांच्या वरील उद्गारांत कितपत तथ्यांश आहे हें पाहूं.

हा विचार करूं लागलें ह्मणजे 'जुने लोक ते कोणते ?' हा प्रश्न प्रथम उद्भवतो.

पण त्याचा उलगडा ग्रंथकारांनींच केला आहे. 'लोक' आणि 'जुने माहितगार लोक' असे दोन विभाग त्यांच्याच लेखावरून ठरतात. लोक ह्मणजे—ज्यांस इतिहासाची वगैरे माहिती नाहीं—असे सामान्य लोक—ह्मणजे अज्ञ. आणि दुसरे 'माहितगार'—अर्थात्—इतिहासज्ञ. आतां ह्या दोहोंविषयीं क्रमशः विचार करूं. पहिले लोक सामान्य; ह्मणजे त्यांस इतिहासाचें मुळींच ज्ञान नाहीं, असे लोक शंभर वर्षांतच नानांच्या खऱ्या इतिहासाची ओळख विसरले, ह्यांत विशेष तें काय ? अशा लोकांस इतिहासाची मुळीं ओळखच जर नाहीं, तर ती ते विसरणार कसे ? त्यांनीं नानांच्या 'क्षुल्लक' ह्मणा, 'खासगी' ह्मणा, गोष्टी सांगून त्यांचें नांव सर्वतोमुखीं करून ठेवलें, हेच त्यांचे मोठे उपकार समजले पाहिजेत. ह्याच वर्गावर ग्रंथकारांचा आरोप असा आहे कीं:—

"कोणी एखादी कुचकी नासकी कोटी बिचाऱ्या नानांच्या बळेंच पदरीं बांधून स्वस्थ बसेल, आणि मनांत समजेल कीं, झालें, नानाफडनवीस हा कोणी अलौकिक बुद्धिमान पुरुष होता असें निर्विवाद सिद्ध केलें !" (प्रस्तावना १).

अगोदर "कुचकी नासकी कोटी" पदरीं बांधल्यानें "अलौकिक" पुरुष कसा काय होतो ? ही अपूर्वविद्या कोणत्या शास्त्रांत सांगितलेली आहे ? बरें; घटकाभर कल्पना करूं कीं त्या अज्ञवर्गास इतकेंही ज्ञान नसेल ! मग इतकेंच जेथें अज्ञान आहे, तेथें 'वाद' 'निर्विवाद' 'सिद्धता' ह्या तरी कोठून याव्यात ? ह्या वर्गाचें ज्ञान ह्मणजे इतकेंच, कीं परंपरा ऐकत आलेली गोष्ट, आपल्यासारख्याच—किंवा आपल्याहून कमी अशा—अनभिज्ञास गोड करून सांगावयाची. आणि दुसऱ्यानें त्यांत शंका, प्रतिशंका न काढतां, व सत्यासत्याचा विचार न करतां मान डोलवावयाची. संपलें. अशा लोकांस तुह्मी जुने आहांत, तुह्मांस खऱ्या इतिहासाची माहिती नाहीं, अशीं नांवें ठेवण्यांत पुरुषार्थ तो कोणता ? असे लोक कोणत्याही कालांत तसेच असावयाचे. सांप्रतच्या दिव्ययुगांत तर चहूंकडे ज्ञानसूर्याचा प्रकाश पडला आहेना ? आतां जर कोणी एखाद्यानें जाऊन शेतांतील माळ्यावर गोफणी मारणाऱ्या हुरडेफुक्यास विचारलें कीं 'लार्ड ल्यान्सडाऊन हे कोण आहेत ?' 'दादाभाई नवरोजींनीं कोणतें शतकृत्य केलें ?' तर तो बिचारा काय सांगेल ? किंवा मिरजेच्या उभ्या बाजारांत तेली, तांबोळी, वाणी ह्यांच्यापाशीं ह्याच गोष्टीचा शोध केला, तर कितपत यश येण्याचा संभव आहे ? तात्पर्य, अज्ञ लोकांमध्यें खरा इतिहास मिळत नाहीं ह्मणून सांगत बसणें हें साहरा वाळवंटांत हिमालय नाहीं ह्मणून हाकाटी करण्यासारखें निरर्थक होय ! हें जुन्यांतील अज्ञ लोकांविषयीं मात्र झालें. आतां त्यांतील 'माहितगारां'वर ग्रंथकर्त्यांचा कसा कडाका आहे पहा:—

"आपल्या लोकांत जे जुने माहितगार गृहस्थ आहेत, त्यांस जर 'बारभाईच्या कारस्थाना' बद्दल किंवा 'महाडच्या कारस्थाना' बद्दल त्रोटक त्रोटक माहिती विचारली, तर ती त्यांस सांगतां येईल कीं नाहीं, याची शंकाच आहे !" (प्र० ९)

प्रस्तुत चरित्रकार उच्चप्रतीच्या विद्यालयांतील संस्कृताध्यापक आहेत. तेव्हां त्यांस तर्कशास्त्राची माहिती थोडी तरी असलीच पाहिजे. त्यांस आमचें एवढेंच विचारणें आहे कीं, जे गृहस्थ 'माहितगार' आहेत, ते माहिती सांगतील किंवा नाहीं ह्यांत शंका असते काय? व ज्यांच्याविषयीं शंका असते, त्या गृहस्थांस माहितगार ह्मणतात काय? ह्या परस्पर विरोधी वाक्यांची एकवाक्यता कशी व्हावी हें आह्मांस तरी निदान कळत नाहीं.[१] असो. पण ह्या शुष्क बाबतींत पाल्हाळ न लावतां मुख्य विषयाचा विचार करूं.

असे 'जुने' मठ्ठ-बुद्धीचे 'माहितगार गृहस्थ' कोण आहेत, कीं ज्यांस नानाफडनविसाची त्रोटक माहितीही सांगतां येणार नाहीं? त्यांच्या माहितींत 'बारभाई' व 'महाड' हीं कारस्थानें आलीं नाहींत ह्मणजे ते ज्ञानशून्य झाले काय? बरें; राजश्री खऱ्यांनीं हा जो खरा इतिहास जगापुढें आणल्याचा, व ताज्या घमघमीत कोऱ्या नानांच्या पदरीं बांधल्याचा डौल आणला आहे, तो इतिहास त्यांनीं कोठून आणला, ह्याचा तरी क्षणभर विचार केला आहे काय?

रा० खऱ्यांच्या मनांत पोकळ अभिमानानें जोर केला, त्यास उपाय नाहीं, नाहीं तर त्यांस सुद्धां कळून आलें असतें कीं, जुन्या लोकांनीं सुद्धां माहिती मिळविण्यास कमी केलें नव्हतें. कांहीं वर्षांपूर्वीं श्रीक्षेत्र कऱ्हाड येथें श्री० पंतप्रतिनिधींच्या कोटांत राहत असलेला आह्मी एक ह्मातारा ब्राह्मण पाहिला होता. हा ब्राह्मण भोजनाच्या पंक्तींत किंवा रस्त्यावर उभा राहून पेशव्यांच्या सर्व कारकीर्दींचें—लहानसहान गोष्टी शक मिती सुद्धां—तोंडानें वर्णन करून दोन पैसे चार पैसे मिळून आपला निर्वाह चालवी. हा अद्भुतगुण त्याच्या अंगांत कसा आला असेल बरें? ही ऐकींव गोष्ट सोडून दिली, तरी सुद्धां नानाफडनविसाची कारकीर्द व चातुर्य जाणणारे लोक कांहीं थोडे नव्हते.

---

१ हल्लींच्या काळांत नानाफडनविसाच्याच तोडीचे राजे सर टी. माधराव होऊन गेले. त्यांची कीर्ति देशभर गाजत आहे. व मद्रपुरीमध्यें तर त्यांचा पुतळा स्थापन करण्याचा विचार चालला आहे. एखाद्या जिज्ञासु मुलानें शास्त्रीबुवांस वर्गांतच जर प्रश्न केला कीं राजे सर टीनीं कोणकोणतीं शहाणपणाचीं राजकारस्थानें केलीं? तर तीं शास्त्रीबुवांस स्वतः तरी बिनचूक सांगतां येतील काय? मग हल्लींच्या शाळेंतील गुरुजींनीच जर ही गोष्ट तर सामान्य जनांस कां बरें हंसावें?

गोंधळी हे तर कांहीं मोठे सुशिक्षित नव्हेतना? विचाऱ्यांना स्वभाषा सुद्धां शुद्ध रीतीनें बोलतां येण्याची पंचाईत. त्यांनीं तरी नानांविषयीं काय थोडी माहिति मिळविली होती? आक्वर्थ साहेबांनीं नवीन प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतील बाळा बहिरूचाच पवाडा (पृ० २०५) पहाना? त्यांत ह्या राजकार्यधुरंधर पुरुषाविषयीं काय थोडी माहिती आहे? "खुप युक्तीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना" हें तर त्यानें 'ध्रुवपद'च ठोकून दिलें आहे. तें काय नानांची योग्यता जाणल्यावांचून? त्या काळांत प्रवास करण्यास आगगाड्या तर काय पण सडका सुद्धां नव्हत्या; ताज्या बातम्या कळण्यास तारायंत्रें नव्हतीं; किंवा चव्हाट्यावर बातम्या येण्यास वर्तमानपत्रेंही नव्हतीं. अशा समयीं खरी बातमी मिळण्यास केवढी अडचण पडत असेल, हें सांगणें नकोच. 'अनंतफंदी' केवढा लोकप्रिय! व त्या वेळच्या ब्राह्मणी दरबारांत वागणारा. त्यास सुद्धां नबाबाच्या तहाचीं कलमें कळलीं नाहींत. तो ह्मणतो:—

**"किसे खबर भयी मेहर मुलुख नबाबनें क्या दिया लिया।**
**फंदी अनंतकु तैं क्या मालुम सुनते है कुच कबुल किया। सच होयगा।"**

ऐ० पो० पृ० २०८.

असो. इतक्या अडचणी होत्या तरी, त्या वेळच्या सामान्य मनुष्यांनीं सुद्धां त्या बातम्या मिळवून ठेवल्या येवढेंच नव्हे, तर पुढील संततीस त्यांचे पवाडे करून ठेवले. अशा उद्योगी पुरुषांस रा० खरे यांजकडून खोटें 'सर्टिफिकिट' मिळावें, ही किती शोचनीय गोष्ट आहे बरें?

हें फक्त बिनमाहितगारांविषयीं झालें. खऱ्या माहितगारांविषयीं सांगावयाचें तें अझून पुढेंच आहे. खरे माहितगार ह्मणजे राज्यसूत्रांशीं ज्यांचा निकटसंबंध होता ते. त्यांस 'बारभाई'च्या कारस्थानांविषयीं माहिती नाहीं ह्मणणें, ह्याच्या इतका दुसरा अंधारच नाहीं. रा० खऱ्यांनीं 'नासका कुचका' भाग छाटून, छाटून 'खऱ्या खऱ्या इतिहासाची' इमारत उभारली, ती कोणत्या पायावर बरें? 'काव्येतिहाससंग्रह' 'पंतप्रधानांची शकावलि' 'पेशव्यांची बखर' 'डफ साहेबांचा इतिहास' व 'पेंडशांचें टिप्पण' हेच कायते तिचे आधारस्तंभ.

'काव्येतिहाससंग्रहांत' ज्या यादी, व बखरी प्रसिद्ध होतात त्या कोणी तयार केलेल्या? बिनमाहितगार नव्या मंडळींनीं होय? नाहींना? शकावलीचें टिप्पण तयार करणारे पेंडसे हे कोण? जुने माहितगार नव्हेत काय? येवढा धडधडीत 'जुन्या माहितगार' गृहस्थांचा ज्ञानसंग्रह रा० खऱ्यांनीं लुटून आणून त्यांसच दारांत उभें राहूं देत नाहींत, तेव्हां त्यांची ही एक मोठी धन्य समजली पाहिजे. हो; पण

चुकलें. सारेंच मुसळ केरांत. रा० खरे यांचा खऱ्या इतिहाराचा आधार ह्मटला ह्मणजे मुख्य काय तो डफच्या इतिहासाचा. तो डफ स्वतः काय ह्मणतो तें पहा:–

"मराठ्यांच्या इतिहासाच्या पुष्कळ बखरी व ग्रंथादी मीं मिळविल्या. त्यांपैकीं कांहीं बखरी इतक्या मोठ्या होत्या कीं, त्यांतील एक एक खुद्द माझ्या ग्रंथायेवढी होईल. व इतिहासांत लिहिलेल्या गोष्टी ज्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या, अशा **वृद्ध पुरुषांपासूनही मला बरीच माहिती मिळे.**

ग्रांड० म० इ०–प्रस्तावना—

वरील लेखावरून 'जुन्या' 'माहितगार' गृहस्थास त्रोटक तर काय, पण विस्तारपूर्वक खरा इतिहास माहीत होता ह्याबद्दल खऱ्यांची न झाली तरी, वाचकांची खात्री झाल्यावांचून खचित राहणार नाहीं. व ही गोरी साक्ष खऱ्यांसही खोटी ह्मणतां येणार नाहीं. काव्येतिहासकारांनीं पेशव्यांच्या बखरींत प्रस्तावनेच्या १ ल्या पृष्ठांत टीपेमध्यें अशा ग्रांड डफ साहेबाच्या इतिहासासंबंधानें अशी शिफारस केली आहे कीं "प्रत्येक 'महाराष्ट्रीय जन' ह्मणविणारानें किंबहुना प्रत्येक हिंदु ह्मणविणाऱ्यानें ही ह्या इतिहासाची प्रत आपले संग्रहीं ठेवावी. निदान एकवार ती कोठें मिळवून वाचण्याची तरी तसदी घ्यावी. असें केल्यानें आमचे लोक ह्मणजे गचाळ, वेडे, पौरुषहीन, अकल्पक असे जे आह्मांपैकीं पुष्कळांचें ग्रह झालेले आहेत, ते जाऊन **आपल्या लोकांच्या पराक्रमाविषयीं, बुद्धीविषयीं, चातुर्याविषयीं वगैरे तथ्य कळून योग्य अभिमान जागृत होईल"**

प्रस्तुत चरित्रास आधारभूत घेतलेली जी 'पेशव्यांची बखर' ही किती मनोरम व विपुल माहितीनें भरलेली आहे, हें तर सुप्रसिद्धच आहे. ही येवढी अथपासून इतिपर्यंत सर्व बखर वैजनाथ गांवीं "रा० **कृष्णाजी विनायक सोहनी** यांनीं **तोंडी सांगितली,** व कित्येकांनीं ती आदरपूर्वक लिहून घेऊन तिचा संग्रह केला." (पेशव्यांच्या बखरीची प्रस्तावना. पृ० ७)

'अशी विलक्षण माहिती ज्या पुरुषास होती, व ज्यानें इतकें संगतवार तिचें स्वमुखानें निवेदन केलें, त्या बृहस्पतीसारख्या चतुरस्र' 'जुन्या' 'माहितगार' गृहस्थाचे आमच्या ह्या नव्या शास्त्रीबुवांनीं वरच्यासारख्या लेखानें खासे उपकार फेडले ह्मणावयाचे! अशा जुन्या समुद्रासारख्या माहितीनें भरलेल्या गृहस्थांस 'बारभाई'चे कारस्थानची त्रोटक माहिती सांगतां येईल कीं नाहीं, ह्मणून शंका घेणें, ह्मणजे ती शंका लघु नव्हे दीर्घच समजली पाहिजे! इत्यर्थ मिळून येवढाच कीं, शास्त्रीबुवांसारख्या नूतन विद्वानांनीं जुन्या माहितगार गृहस्थांच्याच सामानानें इमला उठवून, त्यांवरच वाकुठारप्रयोग करतांना थोडी तरी मेहरनजर करावयाची होती. चरित्र-

कारांनीं जातां जातां नवीन इंग्रजी शिकलेल्या लोकांवरही दोन तडाके लगावले आहेत, तथापि त्याविषयीं येथें विस्तार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

पांचव्या पानांत बाळाजी महादेव फडनविसांनीं दिल्लीच्या दरबारांत पेशव्यांसाठीं आपला प्राण खर्ची घातला, तो १२ ओळींच्याच मजकुराचा उतारा घेऊन त्याच्या खालीं ग्रंथकारांनीं येणेंप्रमाणें शेरा मारला आहे:—

"ही गोष्ट खरी ठरेल तर आह्मांस फार आनंद होईल. पण या गोष्टीस इतिहासांत कोठें आधार मिळत नाहीं"—ही "ऐकींव गोष्ट" असें वर ह्मटलें आहे. व खालीं—त्यास, फडनविसांच्या सनदेंत उल्लेख नाहीं हें एक; आणि "सय्यद अनुकूल असल्यावर असल्या सनदा एकदां सोडून दहादां देखील मिळत्या; मग त्या रक्षण करण्याच्या कामीं फडनविसासारख्या मातबर मनुष्याचा जीव धोक्यांत घालण्याचें प्रयोजन काय?" हें एक, अशीं—दोन लेचींपेचीं कारणें पुढें करून वरील गोष्ट आपण निर्विवादपणें खोटी पाडली ह्मणून ग्रंथकारांनीं मोठी धन्यता मानिली आहे! परंतु तसें करण्यांत सत्याचा केवढा अपलाप झालेला आहे, याबद्दल मुळींच विचार केलेला नाहीं.

पेशव्यांच्या बखरींत चौदाव्या पानाखालीं, वर निर्दिष्ट केलेला मजकूर काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनीं टिपेंत दाखल केलेला आहे. काव्येतिहाससंग्रहकर्ते किती विद्वान् व शोधक ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे, त्यांनीं ही येवढी टीप 'ऐकींव गोष्टीची' दिली हें ह्मणणें कोत्या बुद्धिचें लक्षण होय. शिवाय चरित्रकारांस तर तसें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. कारण टीप देतांना ती जरी कदाचित् ऐकींव गोष्ट असली, तरी टिपेंत आल्यानंतर तो विद्वानाचा लेख झाला. आणि तो टिपेंतील मजकूर ऐकींव गोष्टीचाच असता तर काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनीं तसा त्यांत खचित उल्लेख केला असता. तसें केलें नाहीं यावरून तो मजकूर सांगावयाचा नाहीं हें उघड आहे. ह्याशिवाय तो इतिहासांतीलच मजकूर आहे अशाविषयीं त्यांतच मोठा पुरावा आहे. तो असा कीं, त्यांतील कितीएक वाक्यें 'अवतरणचिन्हां'मध्यें घेतलीं आहेत, व त्यांच्या रचनेवरून तीं जुन्या बखरींतील आहेत, असें स्पष्ट सिद्ध होतें. पेशव्यांनीं भानूंस विचारलें "याची **मसलत** कशी?" भानूंनीं उत्तर दिलें "ठीक आहे. मी **तुमचे** पालखींत बसून जातों. तुह्मी सनदा खाकेस घेऊन दुसऱ्या वाटेनें **गोटांत जाणें.**" ह्यांतील जाड शब्दांचा विचार केला ह्मणजे ही गोष्ट सहज ध्यानांत येते. मग ही गोष्ट ऐकींव कशी? व हिला इतिहासाचा आधार नाहीं तो कसा? बखर ह्मणजे इतिहास नव्हे वाटतें? 'बखर' व 'इतिहास' ह्यांच्या व्याख्या तरी काय? त्याचा रा. खऱ्यांनीं स्पष्ट उल्लेख केला असता तर, हें त्यांचें समीकरणरूप कुलूप उघडण्यास ती एक किल्ली तरी झाली

असती. त्यावर 'सय्यदा'चा आक्षेप काढला आहे, तोही निर्जीवच आहे. 'सय्यद अनुकूल असता, तर तसल्या सनदा शेंकडों मिळाल्या असत्या;' गोष्ट खरी आहे. सनदा कदाचित् मिळत्या, परंतु पेशव्यांचे जीव पांच तर काय पण एकही परत मिळाला नसता, ही गोष्ट चरित्रकार विसरले! असो. यापुढें तरी त्यांनीं ती गोष्ट खरी ठरल्याबद्दल आनंद मानावा.

आतां वादाचा एक महत्वाचा मुद्दा राहिला. तो नानांवर आलेल्या कामांधत्वाच्या नीच आरोपाविषयींचा. नानासारख्या सत्कीर्तिमान् पुरुषावर असा भलता आरोप यावा ही अत्यंत खेदास्पद गोष्ट आहे यांत तर शंका नाहींच. व त्याकरितां ग्रंथकारांनीं नानांच्या तर्फेनें बरीच खटपट केली आहे हीही गोष्ट खरी. पण दिलगिरीची गोष्ट येवढीच वाटते कीं, चरित्रकारांनीं आणलेला पुरावा, नानांवरचा आरोप खोडून काढण्यासच निरुपयोगी येवढें नव्हे, तर उलट विरुद्धपक्षासच पुष्टि देणारा आहे. नानांच्या हातून असलें नीचकर्म घडलेंच असेल, वा नसेल असें ह्मणण्याचें साहस आमच्या हातून होत नाहीं, ह्मणून या प्रकरणांतील दोन्हीं पक्षांचीं साधकबाधक प्रमाणें देतों, ह्मणजे वाचकांस त्यांतील खरा तथ्यांश काढण्यास सोय होईल.

त्या कालचे मुंबईचे गव्हरनर ह्यांनीं नानाफडनविसाचें, व श्री० गंगाबाई इचें कांहीं अंतस्थ सूत असावें असा संशय घेतला होता. व ग्रांट डफ साहेबांनीं तो खराच होता असें ह्मटलें आहे.

ह्याच्या विरुद्ध चरित्रकारांनीं जे मुद्दे पुढें आणले आहेत ते येणेंप्रमाणें:—नाना हा धनणीशीं जारकर्म करण्याइतका नीच कृतघ्न नव्हता. व गंगाबाई हीही कांहीं वेसवा नव्हती. (ह्या पुराव्यांत विशेषसा जोर नाहीं हें उघड आहे.) ही अफवा कट्टी दुस्मानगिरी करणाऱ्या दादासाहेबांच्या पक्षाकडून उठविली गेली, व इंग्रज लोकांनीं तीस महत्व आणलें. (पृ० १०७) (ही गोष्ट मात्र बऱ्याच अंशीं संभवनीय आहे खरी.)

ह्यापुढें ग्रंथकारांनीं "गंगाबाईसंबंधानें आपणावर आलेला हा अमंगळ अपवाद **नानांस ठाऊक असलाच पाहिजे,** व त्याचें निराकरणही त्यांनीं एका ठिकाणीं अप्रत्यक्ष रीतीनें केलें आहे." (पृ० १०८) असें सांगून त्याच्या पुष्टीकरणार्थ नानांच्या खदस्तूरचा लेख दाखल केला आहे. तो असा:—

"श्राद्धाचे ब्राह्मण यांचीं भोजनें जाहलियावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्रीमंत माधवराव (व) एकीकडे मला बसविलें, आणि दुसरे स्त्रीकडून वाढविलें. तिला वाढावयाची शिक्षा दाखविली. अर्थात् मातोश्रीकडून लेंकरास वाढविलें." (पृ० १०९)

आपल्या तर्फेनें पुराव्यांत जो कागद दाखल करावयाचा त्याला कांहीं तरी संबंध

लागतो. कोणता तरी, केव्हांचा तरी, कसला तरी, कागद दाखल करून खोगीरभरती करावयाची नाहीं! ह्या लेखांत केवढा असंबद्धपणा आहे तो पहा. नानांवर गंगाबाईच्या संबंधानें अपवाद आला सवाईमाधवरावाच्या जन्माच्या सुमारास, किंवा त्यानंतर. अर्थात् शके १६९६।९७ त. वर दाखल केलेला नानांचा लेख नानासाहेबांच्या कारकीर्दींतला, पानपतची लढाई झाल्याबरोबरचा. (पृ० २१) हें रा. खरे ह्यांस कबूल आहेच. अर्थात् शके १६८२ मधील. ह्मणजे १४।१५ वर्षें पूर्वींचा.

तेव्हां आपणांवर पुढें कधींकाळीं असा भयंकर अपवाद येणार आहे हें पक्कें जाणून त्याचा पुरावा नानांनीं पंधरा वर्षें पूर्वींच तयार करून ठेवला अं? शावास! नाना दूरदर्शी आणि चतुर ह्मणतात तो काय उगाच? अस्तु. पुढें:—

मेजर म्याकडोनल्ड यांनीं हाच अपवाद खरा असावा ह्मणून एक पुरावा आणला. तो हा कीं, नानांच्या व सवाईमाधवरावांच्या तसविरींत साम्यता आहे. ह्या 'हडेलप्प'ची चरित्रकार यथास्थित टर उडवून ते ह्मणतात:—

नानाफडनवीस व सवाईमाधवराव ह्यांच्या अस्सल तसविरा पुण्यांतील कौनसिलहॉलांत आहेत त्या पहाव्यात. (पृ० १०९) आणखी रा० खरे ह्यांचा त्यावर येणेंप्रमाणें सणसणीत अभिप्राय आहे:—

"माणसामाणसाच्या चेहऱ्यांत जें साम्य असावयाचें, त्यापेक्षां अधिक साम्य या दोन तसविरींत आह्मास तर कोठें दिसलें नाहीं." (पृ० १०९)

ठीकच आहे. नांवानें रूपावलि असली तरी तिच्या अध्ययनांत 'परस्पेक्टिव्ह' समजण्याचें साधन नाहीं, कारण, ती शब्दांची रूपावलि पडली. तेव्हां साम्यानें दिसावें कसें? चित्रांतील मर्म समजावयाला नुसत्या चर्मचक्षूंपेक्षां ज्ञानचक्षूंची गरज अधिक असते.

नानांची व सवाईमाधवरावांची तसवीर अगदीं लहानपणीं जेव्हां प्रथमच आमच्या पाहण्यांत आली, तेव्हां तत्काळ आमच्या मनाचा ग्रह झाला कीं, हे दोघे तर एकसारखे आहेत. त्यासमयीं ह्या नानांवरच्या नीच अपवादाची गुणगुण सुद्धां आमच्या कानावर आलेली नव्हती. पुढें सर्व पेशव्यांच्या तसविरी पाहिल्यावर वाटलें कीं, त्यांचा सवाईमाधवरावाच्या स्वरूपाशीं व आंगलटीशीं कांहींच मेळ नाहीं. नाना आणि सवाईमाधवराव याचें स्वरूप व आंगलट मात्र एकसारखी आहे असें ठाम मत झालें. व तें, मुंबापुरस्थ 'स्कूल आफ आर्ट' मध्यें कांहीं वर्षें गेल्यानंतर, व हातानें तसलें बरेंच काम झाल्यानंतर अद्यापि तें मत कायम तें कायमच आहे. हेंचसें काय, पण सवाईमाधवराव नानांच्या वयापर्यंत वांचले असते, तर ते हुबेहुब नानाफडनविसांची

दुसरी प्रतिमा बनले असते. असा आमचा पूर्ण ग्रह आहे. व जे कोणी चित्रकलाभिज्ञ व सुजाण असतील त्यांचाही अभिप्राय आमच्यासारखाच पडेल अशी आमची खात्री—नव्हे पक्की खात्री—आहे. नानांवर तो अमंगळ अपवाद लागू व्हावा अशी दुर्वासना आह्मास नाहीं येवढेंच नव्हे, तर त्यांतून मुक्तता व्हावी अशीच इच्छा आहे. पण त्याकरितां सत्याचा अपलाप मात्र आह्मी करूं इच्छित नाहीं. रा० खरे ह्यांनीं चित्रकलेंतील मार्मिकतेविषयीं दुर्लक्ष केलें असावें एक, किंवा त्यांस आपल्या पक्षाचा अभिमान अधिक असावा तरी एक, नाहीं तर ते ह्या येवढ्याशा साधारण गोष्टींत इतके घसरतेना. अशा साम्याच्या कारणाचें विवरण, शास्त्रीय विचारसरणीनें, प्रचारांतील व अनुभवांतील गोष्टींस धरून होतें ह्मणजे इष्ट कार्य साधून एकपरी समाधानास जागा झाली असती.

असो. आतां प्रस्तुत चरित्रांतील साधारण रचनेसंबंधानें दोन शब्द सांगून हा लांबलेला अभिप्राय पुरा करूं. प्रस्तुतच्या चरित्रांतील चांगुलपणाच्या संबंधानें सुद्धां आणखी बऱ्याच गोष्टी लिहिण्यासारख्या होत्या. परंतु पहिल्या मुद्यावर बराच विस्तार झाल्यामुळें आतां हात आंखडणें भाग आहे.

'राज्यकारभार' इत्यादि प्रकरणांत जी माहिती दिली आहे, ती फार चांगली व समर्पक आहे परंतु 'इंग्रजांशीं लढाई' वगैरे प्रकरणें, ज्यांत नानांचा संबंध केवळ परंपरेनें मात्र लागतो, अशा विषयांत फारच पाल्हाळ झाला आहे. एकंदर चरित्रांत बखरींतील उतारे फार असून ग्रंथकर्त्यानें सांधलेला भाग फारच थोडा आहे. त्यामुळें एकंदर चरित्रास जितका सरळपणा यावा तितका आलेला नाहीं. 'बालबोधांत' जशीं सरळ चरित्रें येतात, त्या मासल्याचा ग्रंथ उठला असता, तर त्यांत चित्तवेधकता विशेष आली असती. "नानांनीं जें स्वतःचें चरित्र स्वतः लिहून ठेवलें आहे, तें पाहिलें असतां वाचकांची खात्री होईल." असे कितीएक ठिकाणीं उद्गार आहेत. हा लेख ह्या चरित्रांत दाखल करणें अत्यंत आवश्यकतेची गोष्ट होती. तिचें हवाल्यावर काम भागविलें हेंही ठीक झालें नाहीं.

आतां फक्त शुद्धाशुद्धतेच्या संबंधें एक सूचना करावयाची राहिली. तेवढी करतों. चरित्रकार प्रस्तावनेंत विनंती करतात "पुस्तकाच्या शेवटीं शुद्धिपत्र घातलें आहे त्याप्रमाणें पुस्तक आधीं शुद्ध करून नंतर तें वाचण्यास आरंभ करावा !" आधीं आमच्या मंडळीस पुस्तकें वाचण्याची केवढी उत्सुकता ! त्यांत ही शुद्ध करण्याची खटपट त्यांच्या मागें लावली, ह्मणजे मग आटपलेंच ! बघावयाला नको. "आधीं पुस्तक शुद्ध करा" ही आज्ञा ऐकली कीं फटकळ मंडळी "अशुद्धें

राहूं दिलींत, ही तुमची चूक आहे. करितां प्रत्येक प्रतीवरोवर आपण एक एक कारकून रवाना करण्याची तजवीज करावी." असेंही ह्मणण्यास चुकणार नाहीं.

आतां चरित्रकारांनीं त्यावद्दल आपल्या तिरस्थळी यात्रेची नड सांगितली, ती खरी असेल, आमचें ना ह्मणणें नाहीं. परंतु आमचा असा समज आहे कीं, होतां होईल तों चुक्यांची दुरुस्ती करावी. तितक्यांतूनही कांहीं नजरचुकीचीं अशुद्धें राहिलीं तर तीं तशींच सोडून द्यावींत. वोलूं नये आणि चालूं नये. कारण नजरचुकीचीं अशुद्धें वहुतकरून वाचकांच्या लक्षांत येतात, व त्यावद्दल मोठासा दोष कोणी समजत नाहीं. शुद्धिपत्रक जोडीत वसल्याच्या योगानें, त्या शुद्धिपत्रकास आणखी दुसरें शुद्धिपत्रक जोडण्याचा प्रसंग येतो.

प्रस्तुत चरित्राच्याच शुद्धिपत्राचें उदाहरण घ्या; हें शुद्धिपत्र सुमारें चार पेजांचें आहे. त्यावरहुकूम एखाद्या खटपटी गृहस्थानें सर्व पुस्तक शुद्ध केलेंच अशी कल्पना करूं. तरी तें निखालस शुद्ध होईल काय? नाहीं. पहा. शेवटचें पृष्ट २४८ यांत लिहिलें आहे कीं "माधवराव वल्लाळ हे शके १७११ ह्या वर्षीं मरण पावले, त्यांस संतान नव्हतें ह्मणून यांच्या स्त्रियेनें" 'नानासाहेव' ह्या नांवाचा मुलगा दत्तक घेतला आहे. हा सुमारें १४ वर्षांचा असून पुण्यांतील हायस्कुलांत शिकत असतो. ह्यांतील शकांकाच्या चुकीनें केवढा घोंटाळा झाला तो पहा! चालू शक १८१५ आहे. दत्तक मुलगा १७११ त १२ त घेतला असावा. ह्मणजे १०० वर्षें होऊन गेलीं. तो आतां चौदा वर्षांचा असणार कसा? वरें हा शक चुकीचा ह्मणावा, तर शुद्धिपत्रकांत त्यावद्दल कोठें लेख नाहीं!

असो. चुक्या काढावयाच्या वेळीं सर्वांस काढतां येतात. ग्रंथरचना करितांना किती कष्ट पडतात, तें एक ग्रंथकर्त्यासच माहीत असतें, हें सर्व जाणूनच रा० खरे यांच्या ह्या स्तुत्य प्रयत्नावद्दल आह्मीही मनःपूर्वक तारीफ करतों. ग्रंथकारांच्या कांहीं मुद्यांवर आह्मीं विरुद्ध मजकूर लिहिला, तरी ग्रंथकारावद्दल मनांत यत्किंचित्ही अपूज्यवुद्धि नाहीं. मतें भिन्न भिन्न पडलीं ह्मणून ग्रंथकार कांहीं मोठा दोषी ठरतो अशांतील अर्थ नाहीं. रा० खरे हे मोठे उद्योगी, व लेखनकलेवर परिश्रम करणारे गृहस्थ आहेत. त्यांनीं अनेक पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. कवित्वशक्तींत तर त्यांचा 'नंवर' पुष्कळ वर लागण्यासारखा आहे. ह्यास्तव त्यांची योग्यता विशेष आहे हेंही येथें पुनरपि सांगणें नको. व असें योग्य पात्र पाहिलें, ह्मणूनच दोन शब्द आह्मांस लिहावेसे वाटले. त्यावद्दल आमचे मित्र रा० रा० खरे यांस विषमभाव न वाटो. येवढी आशा करून आमच्या लेखनपटु विद्वान् मित्राची रजा घेतों.

**श्रीसयाजीमाहात्म्य**—आजकाल हिंदुस्थानांत जे पाणीदार राजपुत्र आहेत, त्यांपैकींच बडोद्याचे श्रीमंत सयाजीरावमहाराज हे होत. हे चांगले सुशिक्षित व निर्व्यसनी असून प्रजाहिताविषयीं फार दक्ष असल्याची त्यांची कीर्ति आहे. ह्यांनीं सुधारलेल्या राज्यरीति पाहण्यासाठीं ह्मणून विलायतेच्याही एक दोन सफरी केल्या. शेवटच्या (?) सफरींतून महाराजांची स्वारी जेव्हां सुखरूपपणें आपल्या लव्याजम्यानिशीं वटोदरपुरींत येऊन दाखल झाली, तेव्हां प्रजाजनांनीं आपआपल्यापरी मोठा महोत्सव करून आनंद प्रदर्शित केला होता. त्याच वेळीं 'बडोदावत्सल'कर्त्ते यांनींही वर सांगितलेलें सुंदर जादापत्रक काढून व तें महाराजांस समर्पण करून आपली स्वामिभक्ति प्रदर्शित केली. ह्या पुस्तकाचें अंतर्बाह्य स्वरूप फारच मनोहर आहे. प्रथम भागांत 'आनंददर्शक' निरनिराळ्या छंदांच्या कविता असून त्यांची जडणीही फार चांगली साधली आहे. दुसऱ्या भागांत महाराजांच्या गुणांचें वर्णन आहे. तिसऱ्या भागांत राज्यांतील सांप्रतचा जमाखर्च व महाराजांनीं कोणकोणत्या सुधारणा केल्या, त्यांची त्रोटक माहिती दिली आहे. चवथ्या भागांत महाराजांकडे प्रजाजनांचीं मागणीं कोणकोणतीं, त्याचीं कलमवारी दिली आहे. त्यांतील सर्व मागण्या योग्य, व विचारपूर्वक मागितलेल्या दिसतात. यासाठीं महाराजांनीं त्यांचा योग्य विचार करावा. शेवटच्या भागांत 'मयूरात्मच्छत्रे' कृत 'श्रीमत्स्वागतार्याष्टक' आहे. तेंही चांगलें उतरलें आहे. बडोदावत्सलकर्त्यांनीं राजभक्तीसाठीं व प्रजाजनांसाठीं इतके परिश्रम घेतले, छापखान्याचें कौशल्य प्रदर्शित केलें, व त्याची एक प्रत आह्मांस पाठविली ह्याबद्दल आह्मीही त्यांचे फार आभारी आहोंत.

कै॰ वा॰ **बाळगंगाधरशास्त्री जांभेकर याचें चरित्र**—रा॰ रा॰ बाळकृष्ण नारायण देव ह्यांनीं हेमंतव्याख्यानमालेंत दिलेलें व्याख्यान 'आर्यभूषण' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. जांभेकर हे विद्वान, आणि परम पूज्य गृहस्थ सन १८४६ मध्यें निवर्तले. इंग्लिश राज्याच्या अव्वलीमध्यें जे गृहस्थ विद्वान् झाले, त्यांतील हे प्रमुख होत, चरित्र फार सुरेख आणि वाचण्यासारखें आहे. छपाई वगैरे सुंदर असून किंमतही थोडीच ह्मणजे अडीच आणे आहे.

**सुलभ व्याकरण**—हें लहानसें मराठी भाषेचें व्याकरण रा॰ रा॰ वामन अनंत भिडे ह्यांनीं लिहिलें आहे. प्रयत्न बरा साधला आहे. शब्दांच्या व्याख्यांची व रूपांची फोड चांगली मेहनतीनें केली आहे. वि॰ ज्ञा॰ वि॰ मध्यें व्याकरण

---

१ ह्या पुस्तकावर अभिप्राय त्याच संधीस यावयास पाहिजे होता. परंतु लेखांत व छापांत बहुत अंतर असल्यामुळें, व अभिप्रायाचीं पुस्तकें शिलकींत मनस्वी असल्यामुळें असा दिनावधि होतो. त्यास निरुपाय आहे.

या विषयावर आलेला निबंध नीटपणें ध्यानांत घेऊन रचना केली असती, तर अधिक चांगलें झालें असतें. तथापि हें विद्यार्थ्यांस चांगलें उपयोगी पडेल.

**रंगलूट**—'एक ना धड, आणि भाराभर चिंध्या' अशापैकीं ही लूट आहे! 'विनोद' या सदराखालीं प्रथमच एक ग्राम्य संवाद लिहिला आहे.. पुढें दोन दोन पानांचे पानचट विषय दिले आहेत. आणि ते सारे अपुरे आहेत. "मूर्खांना चार शब्द!" ह्मणून एक सदर घालून 'भूसका लड्डू' मेजवानी दिली आहे. ग्रंथकारांनीं मूर्खांना उपदेश करावयाचा तो सुसंस्कृत मनाच्या प्रसन्नतेनें केला पाहिजे. एकंदरींत आमच्यापाशीं आजपर्यंत जेवढीं कनिष्ठ प्रतीचीं पुस्तकें परीक्षणार्थ आलीं, त्यांत ही "लूट" पहिल्या प्रतीची होय! असो. ह्यांतील प्रस्तावनेची झाकी पहा:—

"(रंगलूट) पुस्तकाचे प्रिय वाचकहो, हा पहिलाच भाग छापून आपणापुढें ठेविला आहे. व दुसरे याचे कित्येक (!) भाग छापावयाचें आमचे मनांत आहे. प्रस्तुत भागांतील विषय आपलें मनोरंजन करतीलच असा भरंवसा आहे. खरोखरच पुस्तकाच्या नांवाप्रमाणें, त्यांतील विषय हाच कोणी एक रंग व त्याची अतोनात लूट करून दाखविण्याचा आमचा हेतु आहे, व हें पुढील भागांत खचित दाखवूं. मात्र कृपा करून सर्वांनीं आश्रय द्यावा हीच सविनय प्रार्थना आहे."

आह्मीही पुस्तककर्त्यास रंगाची लूट कृपा करून आतां पुरे करण्याविषयीं प्रार्थना करतो. नाहीं तर सर्वांच्या अंगांची घाण होऊन दांडग्या प्रवाहांत लोक वाहून देखील जावयाचे! वाचकांसही प्रार्थना आहे कीं, त्यांनींही ह्या लुटीपासून सावध असावें. कारण ही रंगाची लूट नसून पैशाची लूट आहे! इतकें सांगून कलम खालीं ठेवतों!

**सिंधप्रांताचा भूगोल**—हें पुस्तक रा० रा० **विष्णु लक्ष्मण प्रभुणें** ह्यांनीं केलें. मुंबईइलाख्याच्या भूगोलांत सिंधप्रांताची माहिती विस्तारपूर्वक दिली नाहीं. ह्मणून सिंधप्रांतांतील मुलांस अडचण पडते. ती दूर व्हावी यासाठीं हा प्रयत्न आहे. व तो बऱ्या प्रकारें तडीस गेला. छपाई स्वच्छ असून भाषाही शुद्ध आहे. माहिती सुद्धां चांगल्या प्रकारची आहे. एकंदरींत हें पुस्तक शाळाखात्यास उपयोगी होण्यालायक आहे.

---


PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, BOMBAY.

# केरळकोकिळ.



## लोकोत्तर चमत्कार.

### महासागरांतील वृक्षवत्प्राणी.




प्राणिधर्मशास्त्रवेत्त्यांनीं अत्यंत परिश्रमानें, व सूक्ष्मावलोकनानें भिन्नभिन्न प्राण्यांचे जे भिन्नभिन्न व अद्वितीय गुणधर्म वर्णन केले आहेत, ते पाहिले ह्मणजे मनास मोठा चमत्कार वाटतो, व जगन्नियंत्याच्या अतर्क्य शक्तीचें मोठें कौतुक वाटतें. प्राणी आणि वनस्पति ह्यांच्यामध्यें

मुख्य भेद ह्मटला ह्मणजे प्राण्यांस आपल्या इच्छानुसार इतस्ततः भ्रमण करतां येतें; आणि वनस्पतींस आपल्या जाग्यावरून हालतां येत नाहीं. आणखी, प्राण्यांस पक्वाशय असतो, व आपलें भक्ष्य मिळविण्यासाठीं त्यांस, कांहीं तरी खटपट करावी लागते; वनस्पतींस पक्वाशय नसतो, व त्यांस आपलें भक्ष्य मिळविण्यासाठीं, कोणतीही खटपट करावी लागत नाहीं. परंतु महासागराध्यें कितीएक प्राणी असे आढळून आले आहेत कीं, ते वृक्षाप्रमाणें वाढतात, व त्यांस पक्वाशय आणि भक्ष्य धरण्याची इच्छा असते. वर दिलेलें चित्र अशा प्रकारच्या प्राण्याचें आहे. तेव्हां त्यांस प्राणी ह्मणावेत, का वनस्पति ह्मणाव्यात ?

पण त्यांस ज्या अर्थीं प्राण, पक्वाशय, व भक्ष्य धरण्याची इच्छा आहे, त्या अर्थीं त्यांस आपण प्राणी असेंच समजून त्यांच्या ह्या विचित्र रूपांतराची संक्षिप्त हकीगत सादर करूं.

महासागरांत कोठें कोठें, जमिनीच्या, लांकडाच्या, किंवा मोठमोठ्या प्राण्यांच्या आश्रयानें एकप्रकारचीं—जमिनीवर पावसाळ्यांत 'कुत्र्याचें मूत' नामक छत्रीसारखें झाड असतें त्यासारखीं—झाडें उगवून त्यांतून एकजातीचे प्राणी बाहेर पडतात. ते प्राणी खेकड्यांच्या वर्गापैकीं असावेत, असें प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं ठरविलें आहे. पूर्वस्थितींत ह्या प्राण्याचा आकार बहुतेक अंशीं खेकड्यासारखाच असतो. त्यास पाय, पंजे, डोळे वगैरे अवयव असून तो पाण्यांतून उत्तमप्रकारें पोंहतो. हा प्राणी तरुण स्थितींत आला ह्मणजे त्याचें जें रूपांतर होतें, तें अगदीं विलक्षण असतें. ह्मणजे तो प्राणी मोठा झाला कीं, एखादा लांकडाचा ओंडका, किंवा खडक अशा पदार्थाचा आश्रय करून त्यावर बसतो. व मग त्याचें वरच्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें ( सजीव ) झाड बनतें !

ह्या अद्भुत प्राण्यांच्या रूपांतराची नीट समजूत पटण्यासाठीं थोडासा अधिक खुलासा करतों. ज्या खडकावर निरंतर समुद्राच्या भरतीचें पाणी येऊन आदळतें, अशा खडकाचा एक भला मोठा तुकडा काढून तो एका मोठ्याशा समुद्राच्या पाण्यानें भरलेल्या कांचपात्रांत ठेवून, त्याकडे क्षणभर पाहत राहिलें, तर पुष्कळ चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतात. त्यावरील कांहीं भाग शिंपल्यासारखे खडबडीत असतात, व त्यांवर कोठें कोठें, शिंप्यांच्या अंगुस्तानासारखे पांढऱ्या रंगाचे गोल

दृष्टीस पडतात. त्याची नीट परीक्षा केली तर, बाहेरचा निमुळता आकार, कठीण शिंपाचे बारिक बारिक तुकडे, कांहीं विशेष रीतीनें व अतिशय कौशल्यानें एके ठिकाणीं जडून झालेला आहे. व त्याच्यावर असलेलें कवच हें कळीचें दार आहे, असें दिसून येईल. पाणी जेव्हां शांत व निर्मळ असतें, तेव्हां हें दार उघडून त्यांतून एक पंख्याप्रमाणें अवयव बाहेर येऊन, 'बिजाग्रीवर' दार हेलकावल्याप्रमाणें, तो पाण्यांत लुवलुव करित असतो. ह्या पंख्याच्या सभोंवार बारिक लव असते. ती सूक्ष्मदर्शकयंत्रांतून पाहिली तर, ती अतिशय नाजूक व मृदु असून पक्ष्याच्या पिसांप्रमाणें दिसते. ही हालचाल बराच वेळ चालल्यावर त्या पाण्यास आपण थोडासा हेलकावा देऊन भयप्रदर्शन करावें, म्हणजे तत्काल ती हालचाल बंद पडते, व तो पंखा आंत ओढला जाऊन, त्यावरचें दार गच्च बसतें. आणि तो प्राणी एखाद्या साधारण दगडाच्या तुकड्याप्रमाणें दिसूं लागतो.

वर सांगितलेला पंखा, हींच त्या प्राण्याचीं फुप्फुसें. व हात होत. ह्यांच्या योगानें तो, समुद्राच्या प्रवाहाबरोबर वाहत येणारे लहान लहान जीवजंतु धरून, त्या शिंपींत दाराखालीं असलेल्या आपल्या तोंडांत नेऊन टाकतो. ह्या प्राण्यापासून एकप्रकारचीं अंडीं उत्पन्न होतात, तीं तो पाण्याच्या प्रवाहांत सोडतो. व तीं सूक्ष्म रूपानें समुद्रावर तरंगत असतात. नंतर कांहीं नियमित काल गेल्यावर तीं अंडीं फुटतात, व त्यांपासून एका जातीचे बारिक बारिक खेकडे उत्पन्न होतात. त्यांचा आकार वरील चित्रांत अ ह्या अक्षरानें दाखविला आहे.

हा प्राणी लहान असतो तेव्हां झिंग्या माशासारखा दिसतो. त्याचा आकार लांबट असून मस्तकापाशीं दोन लांबलांब मिशा असतात. डोळे पाणीदार असून शेपूट बोथट असतें. हें चित्र ब ह्या अक्षरानें दाखविलें आहे. ह्यापेक्षां अंमळ थोर झाला म्हणजे त्याचा आकार क चित्रांत दाखविल्याप्रमाणें होतो. ह्या स्थितींत तो आपल्याभोंवतीं फार झपाट्यानें पोंहतो. त्याची पोंहण्याची चपलता इतकी असते कीं, पाहणाराची नजर ठरत नाहीं. तो पाण्यांत बऱ्याच लांबपर्यंत पोंहत जातो खरा; तरी भक्ष्य धरण्याविषयीं तो कोणत्याही प्रकारची खटपट करीत नाहीं. ह्याचें कारण ह्या स्थितींत त्यास तोंडही नसतें, व पक्वाशयही नसतो!

हा लहान असतांना पोंहतां पोंहतां दमला ह्मणजे विश्रांतीस्तव एखाद्या खडकावर, लांकडावर किंवा एखाद्या मोठ्या माशाच्या किंवा कासवाच्याही पाठीवर बसतो, तेव्हां फार मौज दिसते.

ह्या स्थितींत हा प्राणी कांहीं काल राहिल्यानंतर त्याच्या दुसऱ्या चमत्कारिक रूपांतराचा समय प्राप्त होतो. हें रूपांतर कांहींसें वनस्पतीसारखें होतें ह्मटलें तरी चालेल. ह्यास तारुण्यावस्था प्राप्त झाली कीं, त्याच्या शेंपटीजवळ दोन मांसपिंड फुटतात. आणि त्यांतून एकप्रकारचा चिकचिकीत रस बाहेर निघूं लागतो. हें रूपांतर बहुतकरून पाण्यांत तरंगत असलेल्या लांकडाच्या ओंडक्यावर होतें. त्याचीं दोन चित्रें वर दाखविलींच आहेत.

प्रथमतः हा प्राणी आपण ओंडक्यावर बसून आपल्या मांसपिंडांतून निघणाऱ्या चिकचिकीत रसानें आपलें शेंपूट व मागील पाय त्या ओंडक्यावर गच्च बसवून खालीं डोकें व वर पाय करून तरंगत राहतो. ह्या चिकानें तो प्राणी त्या लांकडाच्या ओंडक्यास इतका गच्च खिळला जातो कीं, त्या लांकडाचा आणि त्याचा एक जीव होतो, ह्मटलें तरी चालेल. अर्थात् हा प्राणी मग त्या पदार्थास अगदीं खिळलेला राहतो. येवढेंच नव्हे, पण त्याचीं सुंदर झाडें बनतात ह्मटलें तरी चालेल. त्याच्या त्या मांसपिंडांतून निघणारा रस दिवसेंदिवस अधिक अधिक निघून त्याचा त्या झाडास कमळाच्या देंठाप्रमाणें देंठ होतो. हा देंठ वरील चित्रांत प ह्या अक्षरानें दाखविला आहे. ह्या प्रकारचें ह्या प्राण्याचें झाड बनलें ह्मणजे त्या प्राण्याचे डोळे वगैरे सर्व अवयव हळू हळू नाहींसे होऊन जाऊन त्यास एक तोंड व कोठा हीं मात्र उत्पन्न होऊन राहतात. व त्याच्या अंगाभोंवतीं कमळाच्या कळीच्या पाकळ्यांप्रमाणें दोन तीन कवचें फुटतात. तेव्हां ह्या झाडांचा आकार, उमलावयास झालेल्या कमळांच्या कळीप्रमाणें शोभतो. ह्याची कल्पना वरील चित्र ग पाहून सहज होण्यासारखी आहे.

ह्या झाडांच्या कळीसारख्या आच्छादनांत ह्या प्राण्याचा देह असून त्याच्या संरक्षणार्थ त्यास कांहीं हातांसारखे आंकडे असतात. त्यानें तो जवळ येणारे जीवजंतु धरून आपल्या तोंडांत घालून आपला निर्वाह चालवितो. हा प्राणी आपणाला लांकडास डसवून घेतो तें, उलटें डसकून

घेतो ह्मणून वर सांगितलेंच आहे. तेव्हां हीं झाडेंही उलटींच असतात. ह्मणजे ह्या झाडांचे कळे असतात समुद्राच्या तळाकडे, आणि मूळें असतात वर लांकडाच्या ओंडक्यास चिकटलेलीं! महासागरामध्यें लांकड्याच्या ओंडक्यावर अशा प्रकारच्या झाडांचीं वनेंच्या वनें वाढलेलीं दृष्टीस पडतात.

पण ह्या झाडांचा हा लांकडाच्या ओंडक्यावरील चमत्कार कांहींच नव्हे, तर कधीं कधीं ह्यांचा ह्याहूनही विशेष चमत्कार दृष्टीस पडतो. ह्मणजे कोठें कोठें हीं झाडें, देवमाशांच्या प्रचंड देहावर किंवा दुसऱ्या एखाद्या मोठ्या माशावर, किंवा कासवावर वाढलेलीं आढळतात, तेव्हांची जी शोभा दिसते, ती कांहीं अवर्णनीय असते. ह्या सर्व विचित्र रूपांतरांचा विचार केला ह्मणजे विश्वात्म्याच्या चातुर्याची धन्यता वाटते!

---

# कालक्षेप.

## श्लोक.

(द्रुतविलंबित.)

नरतनू अति दुर्लभ यास्तव, हरिहरां त्यज[1] सर्व भया स्तव।
उकलली न बसे न पुन्हा घडी[2], फुकट तूं दवडीं न कधीं घडी[3] ॥ १ ॥
जंव तुला जडली न जरा महा, तंव नरा भज रे भज राम हा।
न कळतां यम घालिल रे उडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २ ॥
बघुनि साधु भवांबु[4] तरे कसा, शरण जाउनि त्या उतरें कसा[5]।
भवनदींतुनि दाविल तो थडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ३ ॥
भरंवसा न धरीं घडिचा पहा, कठिण मृत्यु गळ्यावरि चांप[7] हा।
ह्मणुनि शीघ्र उठें करिं तांतडी[8], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ४ ॥
हित तुझें समजे न कसें तुला, शरण जाइं भवार्णव-सेतुला[9]।
सतत सत्कविवांक्सुमनें[10] खुडीं[11], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ५ ॥

---

१ सर्व भया त्यज, (आणि) हरिहरां स्तव. असा अन्वय. २ कापडाची वगैरे केलेली घडी. ३ घटका. ४ संसारसमुद्र. ५ कोणत्या प्रकारें? ६ कसोटीला. ७ सांपळा. ८ त्वरा. ९ संसाररूप समुद्रांतून उतरून नेण्याविषयीं सेतुरूप जो भगवान् त्याला. १० उत्तम कवींचीं शब्दरूप पुष्पें. ११ तोड.

निशिदिनीं बहु भूतदया वरीं, सुकृतधी[1] ठसवीं हृदया[2]वरी ।
हरिकथामृत पाहुनि दे बुडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ६ ॥
भवनदींत महा कलि भोंवरा, मजशिं उद्धरिं देइं विभो वरा ।
विनविं हेंच करीं हरि सांगडी[3], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ७ ॥
कारं सदा उपकार जनांवर[4], न करि तो मतिमंद जनावर[5] ।
तुज सवें नच येइल ही कुडी[6], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ८ ॥
पथिकँ[7] दीनजना[8] कारं सोयं रे, तरि तुझे जनविश्वहि सोयरे[9] ।
सुगति कीर्ति तुला[10] मग रोकडी[11], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ९ ॥
झटुनि निस्पृह उद्यमें[12] कीं करीं, मग रमा[13] सहजीं तव किंकरी[14] ।
निजयशें जगतीं चढवीं गुढी[15], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १० ॥
नर[16]तती रतती[17] विषयांवरी, अचल वृत्ति धरीं मन आवरीं ।
चढवुनी शुक्र[18]वृत्ति वरी कडी[19], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ११ ॥
धारं मनीं सम कांचन ढेंकळा[20], तरिच साधुपणास चढे कळा ।
न टिकती दुरितें[21] मग बापुडीं, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १२ ॥
गुरुजनासि विरुद्ध नको करूं, स्मरें[22] खुळें अटकेंतिल[23] कोंकरूं ।
सबळ त्वत्समजाहुनि ही रुढी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १३ ॥
फिरुनि काल सरे किति हे[24] मही, नच मिळे क्षण देउनि हेम[25]ही ।
यम तुला वरें[26] दाविल चोपडी[27], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १४ ॥
पडुनि बिंदु सरोवर सांचतें[28], जग ह्मणे दिसतें किति साचें[29] तें ।
जुळुनि सांखळ होत कडी[30] कडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१५॥
सरलता धरुनी कारं चाकरी, झटुनि झोंबुनि मेळविं भाकरी ।
खटपटी विण शालें[31] न घोंगडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १६ ॥

---

१ पुण्य संपादन करण्याची बुद्धि. २ अंतःकरणांत. ३ भोंपळे बांधून तरून जाण्यास केलेली सांगड. ४ लोकांवर. ५ पशु. ६ देह. ७ प्रवाशी. ८ अनाथास. ९ साह्य. १० तुलावश. ११ निश्चयें करून. १२ उद्योग. १३ लक्ष्मी. १४ दासी. १५ बाहुटा. १६ पुष्कळ लोक. १७ रममाण होतात. १८ शुकाचार्यांच्या वृत्तीवर. १९ वरचढपणा. २० मातीच्या ढेंकळाला. २१ पातकें. २२ आठवण कर. २३ प्रतिबंधांत ठेवलेल्या कोंकराची. (इसापनीतींत वेड्या कोंकराची गोष्ट प्रसिद्धच आहे.) २४ हे मही फिरुनी काल किती सरे—असा अन्वय. २५ सुवर्ण देखील. २६ स्वर्गीं. २७ वही. २८ सांठतें. २९ खरें. ३० दुवे दुवे. ३१ शालजोडी.

जन ह्मणे अतिउत्तम ही कृषी[1], ह्मणुनि मानवले तिजला ऋषी।
नृपतिसेवक[2]ता जड रे बिडी[3], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १७ ॥
वश करीं भजनें निगमागमा[4], बहु सुखें करिं साधुसमागमा ।
हरिपदा हरिनामचि ही शिंडी[5], फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१८॥
तुज भुके पुरतीलच नाचणे[6], फुकट कां जगतीं मग नाचणें[7] ।
पुरुन राहिल देहहि झोपडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १९ ॥
अजि कपाळ दुखे अजि ताप हा, समय एक घडी न रिता पहा ।
कितिक सांगशि पोकळ ह्या नडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥२०॥
तुज मनस्सरिता[8] जरि नावरे[9], तरि करीं हरिभक्तिच नांव[10] रे ।
न ढळतां नच होइल वांकडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २१ ॥
प्रथम तूं मन निर्मळ राख रे, मग असो तनुला जरि राख रे ।
हरि बघे नच सुंदर कातडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २२ ॥
परधना लुटुनी नर का तरे, खचित जाइल तो नरकांत रे !
नजर ठेवुं नको कधिं वांकडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २३ ॥
समय सांपडतां तुजला तिळ, पठण[11] तूं कर केरळकोकिळ ।
धरुनि ह्या कवितांवरि आवडी, फुकट तूं दवडी न कधीं घडी ॥ २४ ॥

---

# रसायनशास्त्र.

## हैड्रोजन वायु कसा काढावा

### आणि त्यापासून कोणकोणते चमत्कार होतात?

एक साधारण कुपी घेऊन तीस देवदाराचा वगैरे बूच बसवावा. आणि बुचाच्या मध्यावर एक भोंक पाडून त्यांत एक रबराची किंवा कशाची तरी नळी बसवावी. नंतर तो बूच उघडून त्या कुपींत थोडासा **जस्ताचा चूर** ( Pure zinc) घालावा. कित्येक मुलें हा प्रयोग करतांना बाजारांतील टिनच्या पत्र्याचा चूर आणून बाटलींत घालतात. त्यामुळें **हैड्रोजन** उत्पन्न होत नाहीं, आणि त्यांचा फार विरस होतो.

---

१ शेतकी. २ सेवाधर्म. ३ लोहश्रृंखळा. ४ वेदाला ज्याचा पार लागला नाहीं, असा ( भगवान्. ) ५ निसण. ६ नाचणें नांवाचें धान्य. ७ हिकडे तिकडे फिरणें. ८ मनरूपी नदी. ९ आवरत नाहीं. १० नौका. ११ वाचणें.

ह्यास्तव ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवावी कीं, टिनच्या चुरानें कधींही हा वायु उत्पन्न व्हावयाचा नाहीं. ह्यास पूर्वी सांगितलेला जस्ताचा चुरा—ज्यास इंग्रजींत **प्यूअरझिंक** असें ह्मणतात—तोच पाहिजे. 'प्यूअरझिंक' हें दिसण्यांत कथलासारखेंच असतें. परंतु तें फार कठीण असून त्याच्या जाड वड्या असतात. ह्याचा चूर किंवा थोडेसे तुकडे त्या कुपींत घातल्यावर ती कुपी सुमारें अर्धी भरेल इतकें तींत पाणी ओतावें. व त्यांतच थोडेंसें **सल्फ्यूरिक आसिड** मिश्र करावें. आणि बुचानें त्या कुपीचें तोंड बंद करावें. ह्मणजे तत्काल **हैड्रोजन** वायु उत्पन्न होऊन तो त्या नळीवाटे बाहेर निघूं लागतो. नंतर **आक्सिजन** वायूप्रमाणेंच हा वायुही दुसऱ्या एखाद्या मोठ्या कुपींत जमा करावा. ह्मणजे त्यापासून अनेक चमत्कारिक प्रयोग करतां येतात. नळींतून निघणाऱ्या वायूस पेटविलें तर तो पेट घेऊन दिवटीप्रमाणें जळूं लागतो. परंतुः—

## जपून प्रयोग करा.

नळींतून निघत असलेला **हैड्रोजन** पेटविण्याची इच्छा झाली, तर त्या नळीचें तोंड वर करून नीट सरळ धरावें. आणि त्यास बत्ती लावण्यापूर्वी त्यांतील वायु थोडावेळपर्यंत बाहेर पडूं द्यावा, नंतर त्यास बत्ती लावावी. नाहींतर बाहेरची हवा कुपींतील **हैड्रोजनाशीं** मिश्र होऊन कुपींत असलेला हैड्रोजनही पेटविते, आणि मोठा बार होऊन कुपीचें बूच फट्कर उडून कडीपाटास जाऊन थडकतें; व कधीं कधीं कुपीचेही फुटून तुकडे तुकडे होतात, आणि **सल्फ्यूरिक** आसिड चहूंकडे पसरतें. एके ठिकाणीं अशी गोष्ट घडली आहे कीं, कांहीं मुलें आपल्या निजावयाच्या खोलींत एक दौत घेऊन तींत **हैड्रोजन** वायु तयार करीत होतीं. नळीच्या ऐवजीं त्यांनीं तंबाकूचा चिनईमातीचा चुट्टाच लावला होता. त्या नळींतून **हैड्रोजन** निघूं लागतांच त्यांनीं त्यास बत्ती लावली, त्या सरशीं फाडकर मोठा आवाज होऊन दौतीचे तुकडे उसळले. आणि त्यांतील एक तुकडा एका गरीब मुलाच्या डोळ्यास लागून त्याचा डोळा अगदीं जायबंदी झाला. असलीं उदाहरणें फारच क्वचित् घडतात. तथापि प्रयोग करणारांनीं नीट सावधगिरी ठेवावी हा उत्तम पक्ष.

---

१ आक्सिजन वायु कसा काढावा? त्याची कृति केरळकोकिळ वर्ष ५ पृष्ठ १२६ मध्यें सांगितली आहे. ती पहावी.

## हैड्रोजन वायूपासून होणारे कांहीं प्रयोग.

**पाण्यावर आग**—एक उथळ कांचेची बशी घेऊन तींत पाणी भरावें. नंतर तर्जनीच्या बोटाच्या आकाराच्या कांचेच्या नळया मिळतात, तसली एक नळी घेऊन तींत 'प्युअरझिंक'चा खूप चूर भरावा. आणि त्यावर थोडें पाणी व **'सल्फ्यूरिक'** आसिड ओतावें. ह्मणजे एकाएकीं मोठा जोर उत्पन्न होऊन पाणी कढूं लागतें. आणि त्यास ऊत येऊन काचनळीच्या कांठावरून खालीं पडूं लागतें. तें खालीं पडूं लागलें कीं, ती नळी नेऊन पाणी भरलेल्या बशीवर धरावी. ह्मणजे तो रस त्या पाण्यांत पडून सर्व पाण्याच्या सपाटीभर पसरतो. आणि त्यांतून बुडबुड्याच्या रूपानें **हैड्रोजन** वायु निघूं लागतो. एक आगकाडी ओढून त्या पाण्यास लावावी, ह्मणजे **हैड्रोजन** वायु पेट घेतो, त्यायोगें सर्व पाण्यावर आगीचे लोळ उठतात. ही पाण्यानें भरलेली बशी एखाद्या उपड्या हंडी खालीं ठेवून प्रयोग करावा तो बरा. किंवा एखाद्या खुल्या जाग्यांत करावा. कारण त्या रसापासून निघणारा आसिडाचा धूर फार अपायकारक असतो.

**दुसरा प्रयोग**—बाजारांत मुलांस खेळावयाचें चेंडूच्या आकाराचें वाटोळें 'चिवचिव' शब्द करणारें बावलें मिळतें. ह्याच्या दोहों बाजूंस दोन रंगीत तोंडें असून, तोंडांतून वारा बाहेर पडण्यास भोंकें ठेवलेलीं असतात. व दोन टोपणांच्या मध्यावर तें एका लवचिक रबराच्या पट्टीनें सांधलेलें असतें. हें बावलें हातांत धरून बोटांनीं व आंगठ्यानें दाबलें ह्मणजे त्यांतून 'चिव' 'चिव' असा शब्द निघतो. हें एक बावलें आणावें, नंतर एका टेबलाच्या सपाटीवर एक कांचेची हंडी उपडी ठेवून तींत **हैड्रोजन** वायु भरावा. आणि 'चिवचिव' करणारें तें बावलें घेऊन प्रथमतः नेहेमींप्रमाणें ओरडून मंडळीस दाखवावें. मग हलकेच एका हातानें उपड्या हंडीच्या वरचा कळस धरून ती थोडी उचलावी, आणि दुसऱ्या हातांत तें बावलें घेऊन हलकेच तो हात आंत घालावा, नंतर तें बावलें दाबावें. ह्मणजे आंतील हलक्या हवेनें त्या बावल्याचा शब्द अगदीं किरटा होऊन असा कांहीं चमत्कारिक आवाज निघतो कीं, भोंवतालच्या मंडळीची हांसतां हांसतां अगदीं त्रेधा उडून जाते! एक घंटा घेऊन ती नेहेमींप्रमाणें प्रथमतः मंडळीस वाजवून दाखवावी. नंतर

तीच **हैड्रोजन** वायूमध्यें नेऊन वाजविली, ह्मणजे एक विचित्र तऱ्हेचाच शब्द निघतो आणि वरच्या प्रमाणेंच मोठी गम्मत उडते.

**तिसरा प्रयोग—एका काळया दगडावर निरनिराळ्या लांबी रुंदीच्या कांचेच्या नळया ठेवून हैड्रोजन वायूस पेटविलें असतां, सप्तस्वर उत्पन्न होतात.** हैड्रोजन उत्पन्न केलेली कुपी घेऊन तिच्यावर एक लांबोळा काळा दगड नीट बसता ठेवावा. व त्यास मध्यें एक बारीक भोंक ठेवावें. व त्यांतून वर येणाऱ्या **हैड्रोजनास** बत्ति लावावी. त्या दगडावर निरनिराळ्या व्यासाच्या व निरनिराळ्या लांबीरुंदीच्या कांचेच्या नळया ठेवाव्यात. ह्मणजे मधील ज्योत फडफडूं लागते आणि त्या नळ्यांपासून निरनिराळे चमत्कारिक सूर निघतात.

## आक्सिजन, (प्राणमायु) हैड्रोजन, (जलजवायु) ह्यांचा संयोग आणि पाण्याची उत्पत्ति.

हैड्रोजन जळत असलेला वरचा दगड एखाद्या थंड कुपीच्या बुडास लावला, तर तत्काल वाफ एकत्र होते. आणि हवेंतील आक्सिजनाशीं हैड्रोजन मिश्र होऊन त्याच्याखालीं लगेच पाण्याचे थेंब उत्पन्न होतात. आठ भाग आक्सिजन आणि एक भाग हैड्रोजन मिळून पाणी बनतें हें प्रसिद्धच आहे.

## हैड्रोजन वायु भरून फुगा कसा उडवावा?

बाजारांत मुलांस खेळण्यासाठीं लहान मोठे रबराचे फुगे करून विकावयास ठेवलेले असतात. हे फुगे ह्मणजे एक पातळ रबराची त्वचेसारखी एकसंध सुरकुतलेली पिशवी असते. तिच्या तोंडाशीं एक बारीक पितळेची किंवा जस्ताची नळी बसविलेली असते. ही नळी तोंडास लावून एक दमानें वारा फुंकला ह्मणजे थोड्याच वेळांत त्या नळींत वारा भरून ती तुळतुळीत गोल आकाराची होते. पुन्हा तें तोंड मोकळें सोडलें ह्मणजे 'सूं' असा शब्द करून वारा बाहेर जाऊं लागतो, आणि थोड्याच वेळांत त्या फुग्याची पुन्हा सुरकुतलेली पिशवी होते. ह्या फुग्यांपैकीं एक फुगा घ्यावा; आणि ज्या कुपींत हैड्रोजन तयार केलेला आहे, त्या कुपीच्या बुचास एक बारीक भोंक पाडून त्यांत एक लहानशी जस्ताची किंवा लांकडाची नळी उभी बसवावी आणि

तिचें वरचें तोंड ह्या फुग्याच्या तोंडांत घालून फुग्याचें तोंड दोऱ्यानें बांधून टाकावें. ह्मणजे हळूहळू त्या फुग्यांत हैड्रोजन भरून फुगा तट्ट फुगतो. फुगा फार मोठा असल्यास मग जोर करूं लागतो. फुगा जोर करूं लागल्यास त्याचें तोंड हातानें दाबून धरावें. फुगा चांगला फुगला ह्मणजे त्याचें तोंड बांधलेलें सोडून कुपीपासून मोकळा करावा आणि रबराचें तोंड दोऱ्यानें बांधून एक लांब दोरी त्यास बांधून तो फुगा सोडावा. ह्मणजे जोरानें आकाशांत उंच जाईल. सुमारें दीडफूट व्यासाचा फुगा घरांतील दिवाणखान्याच्या आढ्यापर्यंत जाण्यास पुरे होतो. आकाशांत पुष्कळ उंचीवर जावयास पाहिजे तर फुगा मोठा घ्यावा लागतो. रबरी फुग्याच्या ऐवजीं कितानाचा किंवा रेशमी कपड्याचा चांगला बुधला शिवून त्यावरून बेमालूम वारनीस केलें, व त्यास कोठेंही छिद्र नसलें तरीही काम होईल. अशाच प्रकारचे मोठे फुगे करून आकाशांत सोडतात त्यासच 'बलून' किंवा विमान असें ह्मणतात. हैड्रोजनाच्या ऐवजीं फुग्यांत **'कोलग्यास'** ह्मणजे दगडी कोळशांचा धूर घातला, तरी तो वर जातो; व त्यास खर्चही ह्यापेक्षां कमी पुरतो **'कोलग्यासा'**बद्दलची माहिती आणखी एखाद्या प्रसंगीं सांगूं.

---

# विद्युन्मानसशास्त्र.

## व्याख्यान तिसरें.

**स्त्रीपुरुषहो,**

'नमनालाच धडाभर तेल' ह्या ह्मणीप्रमाणें, कदाचित् माझ्या विषयाची प्रस्तावनाच बेताबाहेर गेली असेल. परंतु त्याचें यथातथ्य स्वरूप आपणांपुढें मांडावें, व मानवी कुटुंबांच्या संबंधानें त्याचें केवढें महत्त्व आहे तें आपल्या निदर्शनास आणावें, ह्मणून मला तसें करावें लागलें. आणि जगाच्या कोणत्याही कालांत अपूर्व शास्त्रें जन्मास आलीं, कीं त्यांच्या बाल्यदशेंत त्यांस कसकसे शत्रु उत्पन्न होतात, ते द्वेषबुद्धीनें व मत्सरानें, हात धुऊन त्यांच्या कसे पाठीस लागतात, आणि तितक्यांशींही टक्कर मारून त्यांतून तीं कशीं पार पडतात, ह्यांचा मासला दाखविण्यासाठीं मला तसें करणें भाग पडलें. तसेंच आपणांस मीं हेंही दाखवून दिलें कीं, ज्यांचीं नांवें सत्कीर्तिपटांत विराजमान होतसातीं, पुढील संततीच्या कल्याणार्थ अजरामर होऊन राहिलीं आहेत, अशा सुबुद्ध मनुष्यांकडून अशा गोष्टी कधीं व्हावयाच्या नाहींत. तर, शिकलेल्या

लोकांपैकींच कांहीं विशेष प्रकारची मंडळी, जी–सत्योदयापूर्वींच मानवीस्मृतींतून नाहींशी होणारी, व अज्ञानांधकारांत लय पावणारी अशा क्षणैक कीर्तीवर लंपट होऊन, चांगला मार्ग किंवा वाईट मार्ग ह्याचा तिळभरही विचार न करितां, आपल्या सभोंवार असणाऱ्या लोकसमुदायांतून त्या कीर्तीची कृपा संपादन करते, तीच अशा कामास प्रवृत्त होते. ह्या शास्त्राच्या विरुद्ध पक्षाचें आपणांस विशेष आश्चर्य वाटूं नये, व त्याच्या शत्रूंची किंमत ओळखण्यास आपण चुकूं नये, येवढ्याकरितांच ह्या मुद्यावर मीं इतका वेळ बिऱ्हाड दिलें.

माझ्या गतीस प्रतिबद्धक होणाऱ्या सर्व हरकती दूर सारून, पुराव्यांचें अफाट मैदान खुलें करून, अत्यंत श्रेष्ठतत्त्वांतील एका महत्तत्वाचा शोध लावण्यास, व त्याचा उद्धार करण्यास, मी आतां सिद्ध झालों आहें. **'विन्द्युमानस'** ह्या गुप्त व अद्भुत शास्त्रावर व्याख्यान देण्यासाठीं मी आपणांपुढें उभा राहिलों आहें. त्याच्या सभोंवार लटकून राहिलेल्या अद्भुत चमत्कारांच्या घोंसांतील कांहींचा प्रत्यक्ष अनुभव दाखविण्यासाठीं, आणि निर्विकार सत्यापर्यंत त्याचा असलेला श्रेष्ठ हक्क, शास्त्रयुक्तीनें सिद्ध करण्यासाठीं मी येथें उभा राहिलों आहें. ह्या अवश्य कर्तव्याचा फलद्रूप झालेला भारच, आह्मांस ब्रह्मांड धुंडाळावयास लावतो, आणि इहलोकींचीं व परलोकींचीं प्रचंड कार्यें, त्यांच्या गुणधर्मांची चौकशी करावी ह्मणून, व त्यांच्याशीं व्यवहार ठेवणाऱ्या **कारणां**च्या मागें लागावें ह्मणून, त्यांस विचारद्वारापुढें आणून उभीं करतों. ह्या गोष्टीचा अनुभव पाहण्यासाठीं, आपण सर्व सभासदांनीं तर प्रतिज्ञाच केली आहे. व **मत्प्रियदेशा**ची एकत्र झालेली **बुद्धिमत्ता** व **सद्गुण**, ह्यांच्यापुढें अशा मनोरंजक विषयावर संभाषण करण्याची संधि प्राप्त झाली, ह्याचा मलाही मोठा संतोष आहे. आतां कोणत्याही नव्या गोष्टीवर संशयित मनुष्यांची सुद्धां भक्ति असूं शकेल; तथापि, त्यांच्या मनांत पूर्ण सत्यता बिंबून तिचा ते स्वीकार करीपर्यंत, आपणापाशीं समाधानाला एक खाशी जागा आहे. ती जागा हीच, कीं असत्यांत सत्य असलें ह्मणून मनुष्यांच्या **अविश्वासा**ची मर्जी कांहीं खप्पा होत नाहीं; किंवा सत्यांत असत्य असलें, ह्मणून मनुष्यांच्या **विश्वासा**ची मर्जी कांहीं प्रसन्न होत नाहीं. ह्मणजे ह्याचा अर्थ इतकाच कीं, परमेश्वरानें सृष्टीमध्यें नियमानियमानुसार जीं सत्तत्वें स्थापन केलीं आहेत, व ज्यांच्या योगानें हीं अनंत ब्रह्मांडें गजबजून राहिलीं आहेत, त्यांच्यामध्यें मनुष्यांच्या विश्वासानें किंवा अविश्वासानें काडीइतका सुद्धां फरक होणार नाहीं.

मनुष्यांच्या हल्ल्यापासून विश्वविद्युत्कल्पनेचें संरक्षण करावें, मूलतत्वांचे भिन्न भिन्न प्रकार दाखवावेत, जीवसौंदर्ययुक्त प्राण्यांच्या रचनेचा विचार करावा, पंचभूतात्मक द्रव्यांचें रसायनरीत्या परीक्षण करावें, आणि शक्य असल्यास भूचक्रावर

सत्याचा प्रकाश पाडावा, ह्मणून मी येथें उभा राहिलों आहें. चला तर, सृष्टीच्या उंबरठ्यांत पाय टाकण्याची हिंमत धरूं या, आणि शून्याकार रात्रीचा पडलेला काळा पडदा वर उचलूं या; व ज्याच्या सत्तेंतील सर्व दृश्य वस्तूंच्या दर्शनानें आह्मांस आश्चर्यचकित करून सोडिलें आहे, व जें पंचतत्वांच्या गर्द संकरामध्यें घोरत पडलें आहे, त्या सनातन मूलतत्त्वास जागृत करूं या. हें सनातन तत्त्व कोणतें ह्मणाल, तर **विद्युत्–विद्युल्लता**–किंवा **वीज** असें आपण ज्यास ह्मणतों तें. सर्व जीवमान पदार्थांच्या घटकावयवांत भरून राहणारें तत्त्व हेंच. ह्मणजे, हीं सर्व ब्रह्मांडें, व त्यांवरील भव्य आणि सुंदर पदार्थ, विद्युच्छक्तीनेंच निर्माण झाले आहेत. व ह्या सर्वशक्त व सर्वव्यापी महत्तत्वाकडून जगदीशानें हें सर्व राहाटगाडगें युगायुगीं चालू ठेवलें आहे. सृष्टींतील यच्चयावत् वस्तुमात्रांना आकार देणारी वीजच; अगणित गोलांस व्यापून व अनंत आकाशांत संचार करून सर्व प्रकारचे अद्भुत चमत्कार दाखविणारीही वीजच. विश्वाच्या साम्राज्यांत, ह्या बलाढ्य आणि सूक्ष्म तत्त्वाची सर्वेश्वरानें प्रधानत्वें योजना करून त्याच्या द्वारें तो सृष्टींतील नानाप्रकारच्या घडामोडी करतो. एका कव्युक्तींत थोडा फेरफार करून पद्यरूपानें त्याच्या स्वरूपाचें दिग्दर्शन करतों:—

## विद्युन्माहात्म्य—श्लोक. (मंदाक्रांता.)

विद्युत्तेजेंकरुनि अवघें विश्व निर्माण झालें, यच्छक्तीनें अगणित युगें सृष्टिचें चक्र चाले।
सर्वांभूतीं अखिल जगतीं हेंच आहे प्रधान, नाहीं नाहीं खचित इतरां शक्ति ह्याच्या समान ॥१॥
सूर्यामाजी प्रखर किरणीं उष्णता हेंच आहे, वायूमाजी सुखकर अशी शीतता हेंच वाहे।
तार्‍यांमाजी सतत चमके तेज ह्याचेंचि फार, वृक्षामाजी मधुसमयिं दे हेंचि कीं पुष्पभार ॥२॥
जीवात्म्याच्या हृदयिं शिरुनी जीव घाली समग्र, वर्षाकालीं सजलजलदीं दावि हें रूप उग्र।
आत्म्यामाजी निशिदिनिं पहा खेळतें हेंच सारें, वस्तुज्ञानें मन रमविण्या कारणीभूत बा रे ॥३॥
कोठें भासे ज्वलनसम तें होय कोणांत थंड, व्यापी सारें स्थिरचर परी नित्य राहे अखंड।
कार्यें सारीं नियमित करी चालवी सर्व सृष्टी, ठावें नाहीं तिळहि झिजणें होइना लेश कष्टी ॥४॥
देहामध्यें भरुनि फिरुनी चालवी हातपाय, त्यावांचोनी रुधिर न चले होय हा शून्य काय।
पूर्णत्वानें हृदयकमलीं तेंवि केशांत राहे, कर्णांगाला नयनयुगुलां ज्ञान हें देत आहे ॥ ५ ॥
भिक्षान्नें जो दिवस ढकली त्यांत लक्ष्मीपतींत, व्यापोनीयां समसम वसे इंद्रियांच्या अतीत।
दुःखी चैनी प्रबळ दुबळे दुष्ट वा साधुसंत, सर्वांमध्यें खचुनि भरुनी राहिलें हें अनंत ॥ ६ ॥
प्रीतिद्वेषा यश मिळविण्या हेंच आहे निमित्त, देहामाजी चपळ दिसतें सूक्ष्म तें हेंचि चित्त।
चिच्छक्तीचें मनन करितां हेंच कीं गुप्त बीज, नामें विद्युद्वदति बुध कीं प्राकृतांमाजि वीज ॥ ७ ॥

भूगोलावरील जो जो भाग आपल्या दृष्टिगोचर होतो अथवा सभोंवार अस-

लेल्या ज्या ज्या मूलतत्त्वांकडे आपलें लक्ष जातें, त्यांत त्यांत हें निराकार विद्युत्तत्त्व आहेच. सृष्टींत जेथें जेथें ह्मणून मोठी घडामोड झालेली दृष्टीस पडते, तेथें तेथें ह्या अदृश्य शक्तीचा जोरच कारणीभूत असतो. निद्रावस्थेंत व शांतस्थितींत, ती जरी थंड व अदृश्य असते तरी, ती जड पदार्थांच्या परमाणूंच्या घर्षणानें, व आपल्या गतीच्या अगम्य वेगानें प्रकाश व उष्णता उत्पन्न करते. पृथ्वीवरील साधारण दलदलीपासून तों तहत महासागरापर्यंत, यच्चयावत् खळखळणाऱ्या नदीनाल्यांचें, तुफान वाहणाऱ्या नद्यांचें, रौप्यवत् - प्रकाशणाऱ्या सरोवरांचें, व अफाट तुडुंबलेल्या समुद्रांतील पाण्याचें वाष्पीभवन करण्यास कारण वीजच. हीच आकाशामध्यें उष्णतावाहक होऊन, पृथ्वीवरून शोषून नेलेल्या विपुल वाष्पीभवन संचयास आर्द्रता देते; आणि पर्जन्य, वर्फ, व गारा ह्यांच्या योगानें वृष्टि करून सर्व भूमंडळास नियमित वेळीं पाण्याचा पुरवठा करते. आपल्या शीतपणानें तुफानास थंड करून शांत स्थितींतील नानाविध चमत्कार दाखविणारी तीच; व त्यांस खवळून भयंकर अनर्थ करणारीही तीच. उष्णोत्पत्तीनें वातावरणांत वैरल्य उत्पन्न करून वायूचा प्रवाह सुरू करणारी, व त्यास मार्ग दाखविणारीही तीच. तप्त झालेल्या मानवी अंतःकरणांस मंद मंद वायूच्या झुळुकीनें, पंख्याप्रमाणें वारा घालून सुखी करणारी हीच; त्याच वाऱ्यास जोर देऊन झंजावात उत्पन्न करणारी हीच; वावटळीच्या रूपानें जमिनीवरील केरकचरा झाडून काढणारी हीच; वाऱ्याच्या सोसाट्यांत 'रोंरों रोंरों' शब्दानें, व मेघपंक्तींत 'कडकड कडकड' शब्दानें प्राणिमात्रांस गर्भगलित करणारी हीच; गर्द काळोखांत आपलें दिव्य स्वरूप प्रगट करून मध्यान्ह सूर्यास लाजविणारी हीच. हे सर्व खेळ यच्चयावत् ब्रह्मांडांत गुप्तरूपानें राहणारें जें **विद्युत्तत्त्व**-याचे होत. ह्याच विजेच्या योगानें सायंकाळच्या समयीं संधिप्रकाशाचे गोड व शीत किरण आपल्या अंगास लागल्यानें जीव तृप्त होतो. पंच पंच उषःकालीं अरुणाचे रातोत्पलासारखे लाल व कोमल किरण, आपणांस मिळून आत्मा प्रसन्न होतो, हेंही विजेचेंच कृत्य होय. अशी ह्या विजेची थोरवी कोठपर्यंत वर्णन करावी?

आपल्या **प्रकाशाच्या** व **उष्णतेच्या** योगानें, वसंतऋतूंतील पुष्पवाटिकेस प्रफुल्लित करणारी तीच; ग्रीष्मऋतूंत नानाप्रकारची उत्तमोत्तम फळफळावळ देऊन सर्व प्राणिमात्रांस तृप्त करणारी तीच; परोपरीचा भाजीपाला, तऱ्हेतऱ्हेचीं पिकें, नानाजातींचे वृक्ष व वल्ली, ह्यांस टवटवी देऊन शरदृतूस अलंकृत करणारीही तीच. तसेंच सर्व वनश्रीची शोभा हिरावून घेऊन अठराभार वनस्पतींस रूक्ष करून सोडण्याविषयीं, हेमंतऋतूस हुकूम फर्मावणारीही तीच. भूकंपाच्या निमित्तानें तोफेच्या गोळ्याप्रमाणें पाताळांतून स्फोट करणारी, भूमीच्या प्रचंड गोलास थरथर कांपविणारी,

पृथ्वीचक्रास गद गद गद हालवून सोडणारी, कृतांतकालाप्रमाणें कडकडून प्राणिमात्रांचीं काळिजें दुभंग करून टाकणारी, शेषाच्या फूत्काराप्रमाणें तप्तपाषाण, अग्निज्वाला, व रक्षाराशी गगनमंडलांत उडवून देणारी, वज्राच्या धक्क्याप्रमाणें भूपृष्ठास दुभंग करून प्रळय मांडणारी, आणि आपल्या भव्य प्रतापानें शेंकडों प्राणांची, अनेक नगरांची, व भूपृष्ठाची नासाडी करून सोडणारी जी अद्भुत शक्ति तिचेंच नांव **वीज**, किंवा **विद्युल्लता.**

आतां आपण जर मनुष्याकडे पाहून त्याच्या रचनेंतील अंतःस्थितीचा विचार केला, तर तोही एक ब्रह्मांडाचाच अंश—परमाणू,—आहे असें आढळून येईल. जीवमान असलेल्या सर्व पदार्थांच्या रासायनिक मूलतत्त्वांचें संशोधनपूर्वक अत्यंत सूक्ष्म प्रमाण साधून केलेल्या संमीलनद्रव्यानें, त्याचा आकार, व जीवात्मा हीं तयार केलेलीं आहेत. आणि सरतेशेवटीं प्राणासहवर्तमान मेंदू तयार करून, आपल्या निर्माणक्रियेच्या कौशल्याची परिमितता व करामतीची सीमा करून दाखविली आहे. हा दुर्बोध आत्मा, एखाद्या सिंहासनस्थ राजाप्रमाणें, सर्वांवर अम्मल चालवून विजेच्या द्वारें सर्व कारभार हाकतो. त्याच्या इच्छानुरूप देहराष्ट्रांतील सकल इंद्रियांच्या क्रिया चालविण्यास वीज हाच मुख्य प्रधान आहे; तसेंच त्याच्या इच्छेविरहित चालणारीं सर्व कार्यें—ह्मणजे जीवाची जीवनक्रिया, त्याची पराधीनता, स्वतःची चलनवलन शक्ति—हीं सर्व ईश्वरी संकल्पाप्रमाणें चालू ठेवणारही तीच. ह्यावरून अखिल मानव जाती आणि सर्व जीवजंतु, विश्वास व्यापून राहणाऱ्या ह्याच महाविद्युन्नियमांच्या ताब्यांत आहेत, आणि तोच नियम, **परमात्म्या**च्या पराधीन शक्तीच्या देखरेखीखालीं, सर्व ब्रह्मांडें चालवितो.

वरील सर्व उपपादनावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते कीं, जो सर्वसाधारण नियम ब्रह्मांडास लागू आहे, तोच जर मनुष्यासही लागू आहे, तर, **मन** आणि **दृश्यवस्तु** ह्यांस सांधणारा **'विद्युत्'** हा एक **दुवा** आहे. आणि ती, ज्या अर्थीं आत्मा किंवा मन, ह्यांच्या बरोबर वांचणारी आहे, त्या अर्थीं, मनास प्रत्यक्ष स्पर्श करतां येण्यासारखें, किंवा जिच्या द्वारानें त्यास आपल्या शक्ति दाखवितां येतात, असें, प्राणिमात्रामध्यें फक्त हेंच एक तत्त्व आहे. मनाचे हुकूम बजावण्यासाठीं, त्याच्या इच्छा शिरसावंद्य करण्यासाठीं, वीज हा एक त्याचा आज्ञाधारक सेवक आहे. मन, आपले नानाप्रकारचे समज व उद्वेग दुसऱ्यास कळविणें तें, विजेच्या द्वारानें कळवितें, आणि बाह्य सृष्टीपासून कोणतेंही ज्ञान मिळविणें, तेंही तिच्याच मार्फत मिळवितें. स्नायूंचें आकुंचन करणें, हात उचलणें, आणि इंद्रिययुक्त देहाच्या ऐच्छिक क्रिया करणें त्या सर्व, मन हें, विजेच्या मार्फत करतें. हीच गोष्ट मी आतां सिद्ध करून दाखविणार.

विद्युच्छास्त्राशीं ज्यांचा परिचय आहे, त्या प्रत्येकास ही गोष्ट सहज समजेल कीं, मीं जर एखादा **ऋणशक्ति**युक्त मनुष्य शोधून काढून आपल्याजवळ उभा केला, अथवा अन्य कोणत्याही कारणानें तशा प्रकारचा मनुष्य माझ्या जवळ आला, तर मी, **धनशक्ती**च्या योगानें माझ्या मनांतील विग्रह त्याच्या मनावर ठसवून, त्यास अनुरूप, त्याच्या स्नायूंची हां हां ह्मणतां हालचाल करूं शकेन. ह्याचें कारण, अगदीं उघड आहे. धनशक्ति आणि ऋणशक्ति ह्या, विजेच्या योगानें आणि चुंबकत्वाच्या योगानें मिश्र होऊन, त्यांचा जोर सारखा होतो. आणि तेणेंकरून दुसरांची शक्ति ढिली पडते, अथवा त्यांस उलटगति प्राप्त होते. ही महत्वाची व मनोरंजकतेची सत्य गोष्ट, ह्या प्रेक्षकांपैकींच स्त्रिया किंवा पुरुष, पूर्णपूर्ण जागृतावस्थेंत असतां, व त्यांची विचारशक्ति कायम असतां, मी त्यांच्यावरच प्रयोग करून त्यांच्याकडूनच सिद्ध करून देईन. परंतु ह्या अद्भुत व मनास थक्क करून सोडणाऱ्या प्रयोगापूर्वीं, **वीज** ही **मन** आणि **जडपदार्थ** ह्यांच्या मधील सांधणारा दुवा आहे; व तीस मनानें, स्नायूंचें आकुंचन व प्रसरण करण्यासाठीं, आणि देहास **ऐच्छिक**, व **अनैच्छिक** चलनवलन उत्पन्न होण्यासाठीं, **मुखत्यार** नेमलें आहे, हें सिद्ध करून देतों.

हें आपणांस नीट रीतीनें समजून देण्यापूर्वीं, ही एक गोष्ट मला प्रथम सांगितली पाहिजे कीं, मेंदू हा ज्ञानतंतूंचा खजिना आहे, व तेथून तो, सर्व शरीराच्या भागाकडे, त्यांच्या लक्षावधि शाखा पाठवून देतो. आणि खरोखर, मेंदू हा, सूक्ष्मज्ञानतंतूंचाच एक गोल असून, प्रत्यक्ष जीवात्म्याचें वसतिस्थान आहे. ह्याच जीव, किंवा मन हेंच चलनवलनास कारण आहे. मग तें चलनवलन इच्छेनें होवो, किंवा गैर इच्छेनें होवो, तें, हात वर उचलावा अशी इच्छा करतें, आणि हातही तत्काल त्याच्या आज्ञेस तत्पर होतो. तसेंच हें मन मेंदूमध्यें स्थिर असलें, किंवा निद्रेच्या बेसावध स्थितींत असलें, तरी सुद्धां, मर्मस्थानांच्या अनिच्छित चलनवलनास उत्पन्न करून जीवाच्या सर्व क्रिया चालवितें.

**वीज** ही, मनाच्या आणि शरीराच्या मध्यें **सांधणारा** खरोखर **दुवा** आहे, ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं, प्रथमच मला एक गोष्ट कळवून ठेवली पाहिजे. ती गोष्ट ही कीं, हें जड पदार्थाचें आकुंचन करण्यास **मन** कांहीं प्रत्यक्ष येऊं शकत नाहीं.

---

१ कांच रेशमानें घांसली असतां, कांचेवर जी विद्युत् उत्पन्न होते, ती **धन विद्युत्** आणि लाखेवर उत्पन्न होते ती **ऋण विद्युत्**. नियम—सजातीय विद्युत् परस्परांस प्रतिसारण करतात; आणि विजातीय विद्युत् एकमेकांस आकर्षण करितात. अधिक खुलासा पाहिजे असल्यास रा० रा० बा० प्र० मोडककृत 'सृष्टिशास्त्र' उत्तरार्ध भाग १—विद्युत् आणि चुंबन—पान १२ । १३ पासून पहावें.

माझ्या मनाला, एखाद्या पर्वतास जितपत स्पर्श करतां येतो, त्याच्यापेक्षां अधिक प्रत्यक्ष रीतीनें, त्याच्यानें माझ्या हातास कांहीं स्पर्श करवत नाहीं. माझ्या मनास माझ्या हातांच्या हाडांला, स्नायूंना, रक्तवाहिन्यांना, किंवा त्यांतून वाहणाऱ्या रक्ताला कांहीं स्पर्श करवत नाहीं. ह्या गोष्टीची साक्ष पाहणें तर, मेंदूचें एक शकल, ज्यास—अर्धांगवायूचा झटका—असें ह्मणतात—तें काढून घेऊं या. हें शकल काढलें कीं, मनुष्यास अर्धांगवायु होऊन देहाचें अर्धें अंग लटकें पडतें, व त्याची हालचाल बंद होते. अशा स्थितींत मन आपल्याकडून हवी तितकी इच्छा करतें—आपली मानसिक शक्ति हवी तितकी खर्च करतें—परंतु हात उचलत नाहीं, कीं पाय हालत नाहीं. इतकें झालें तरी, हाडें, स्नायु, रक्तवाहिन्या वगैरे सर्व तेथें असतात, व रक्तही पण नेहेमींप्रमाणें वाहत असतें. तर मनाला, वर सांगितलेल्या इंद्रियांस स्पर्श करतां येत नाहीं, ह्यास हाच आपणास अगदीं उत्कृष्ट पुरावा सांपडला. कोणत्याही पदार्थास हात लावला असतां, तो जितक्या लौकर हालतो, तितक्या लौकर मन ज्या पदार्थास स्पर्श करील तोही पदार्थ हालूं शकेल. असो. केवळ शास्त्रीय रीतीनेंच आमच्या पुराव्याचा इतका पल्ला आला.

येवढी गोष्ट तर अगदीं खचीत आहे कीं, माझ्या शरीरांतील कोणत्या तरी जड भागास, माझ्या मनाचा स्पर्श झालाच पाहिजे; नाहींतर माझा हात मला मुळीं हालवितांच आला नसता. ह्यावरून असा एक प्रश्न उद्भवतो कीं, तर मग, ज्याच्यायोगानें स्नायु हालतात, व ज्यास प्रत्यक्ष रीतीनें मन स्पर्श करितें, असें त्याचें मुख्य प्रधानासारखें कोणी तरी गुप्त तत्त्व असलें पाहिजे. तर असें तत्त्व कोणतें? ह्याचें उत्तर अतिशय सोपें असून, त्यांतच आमच्या विषयाचा खुलासा होतो. ज्याला **'ज्ञानरस'** असें ह्मणतात, अर्धांगवायूमध्यें ज्यानें आपला पाय काढून घेतला, तेंच हें तत्त्व होय. ह्यास **'जीवविद्युत्'** असें ह्मणतात. व हाच, **मन** आणि **दृश्यपदार्थ**—किंवा **चैतन्य** आणि **जड**—ह्यांचा संबंध जोडणारा **दुवा.** जगामध्यें चलनवलन करण्यास कारणीभूत असे मुख्य पदार्थ दोनच. एक मन आणि एक जीवात्मा. हेच दोघे जगाचे मुख्य ( मूळ ) **कार्यसाधक** होत. हे दोघे विभक्त होण्याचें लक्षण दिसत नाहीं; कारण, त्यांच्यामध्यें चलनवलनशक्तीशिवाय, दुसरा कोणताही भेद दिसून येत नाहीं. ह्यावरून चलनवलनास मुख्य आदिकारण मन होय. जीवमानपदार्थांच्या दिव्य शृंखलेंतील **पहिला दुवा** हाच. हें मन इच्छा करतें. नैसर्गिक शक्तीप्रमाणें मनोविकार उत्पन्न होणें हा **दुसरा दुवा.** त्यासाठीं ज्ञानतंतूंस स्पर्श करणारी वीज, हा **तिसरा दुवा.** ही वीज, ज्ञानतंतूंस कंप देण्यास कारणीभूत होणें, हा **चवथा दुवा.** ज्ञानतंतूंचा कंप, स्नायूंचे तंतु आकुंचन करतो, हा **पांचवा दुवा.** स्नायूंचें आकुंचनत्व, हाड किंवा हात वर उचलतें, हा **साहवा दुवा.** आणि हात

निर्जीव पदार्थास उचलतो, हा **सातवा दुवा**. ह्याप्रमाणें ह्या सात दुव्यांच्या शृंखलेमार्फत मनाची आणि निर्जीव पदार्थांची गांठ पडते. ह्यांत नैसर्गिक शक्ति-**इच्छा**-हाही एक दुवा धरला गेला. परंतु **इच्छा** ही कांहीं निराळी **वस्तु** किंवा तत्त्व नव्हे. तो फक्त एक मनाचा **धर्म** किंवा **विकार** आहे. तेव्हां खरें पाहतां, त्याचा निराळा दुवा मानण्याची आवश्यकता नाहीं. तर ह्याची निखालस सरळ सांखळी लावावयाची ह्मणजे अशी:—

मन विजेला स्पर्श करतें; वीज ज्ञानतंतूंस स्पर्श करते; ज्ञानतंतु स्नायूंस स्पर्श करितात; स्नायु हाडांस स्पर्श करितात; आणि हाडें निर्जीव पदार्थ उचलतात. अशा रीतीनें ह्या सांखळीच्या-मालिकेच्या-द्वारें परंपरेनें मन हें चलन देऊन निर्जीव अथवा सजीव पदार्थ उचलून घेतें. तें स्वतः कोणताही पदार्थ उचलीत नाहीं. ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट सिद्ध झाली कीं, मन हें आपल्या ऐच्छिकसत्तेनें शरीरांतील विजेस स्पर्श करूं शकतें, आणि हें शरीराच्या कोणत्याही भागावर अद्भुत शक्तीचें सूक्ष्म तत्त्व जमा करूं शकतें.

मनाची बैठक नेहेमीं मेंदूंत असते, आणि शरीरांतील कोणत्याही भागावर त्यास पसरतां येत नाहीं, हें उघड आहे. तसें असतें तर आमच्या हातापायांस कांहींतरी विचार करण्याची शक्ति असती, आणि ते जर कापून टाकले, तर त्यांच्यावरोबर मनाचाही कांहीं भाग नाहींसा झाला असता. तसें होत नाहीं, यावरून **मन** हें एखाद्या **सिंहासनस्थराजा**प्रमाणें मेंदूंतच राहून सर्व कारभार हाकतें, हें उघडच आहे. त्यास जाग्यावरून ज्या अर्थी हालतां येत नाहीं, त्या अर्थी त्यास पायास हालण्याविषयीं, हातास वर येण्याविषयीं हुकूम करणें झाला, तर त्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठीं, त्यास तेथून कोणी तरी **मुख्य प्रधाना**सारखा कारभारी पाठविला पाहिजे. हा मुख्य प्रधान कोणता? तर **वीज**. ही वीज मेंदूंतून निघून, तारायंत्राच्या तारांप्रमाणें हजारों पसरलेले जे ज्ञानतंतु, त्यांच्या द्वारें, शेवटांशेवटांस जाऊन चलनवलन उत्पन्न करते. येवढ्याच साधनानें अर्धांगवायुशास्त्र समजण्यास किती सोपें झालें बरें? प्रवर्तक शक्तीचा मुख्य म्होरप्या जो ज्ञानतंतु, त्यास, कांहीं जडतत्त्वांच्या दाबानें मध्यंतरीं आडकाठी होते. आणि ती रस्त्यांत पडलेली आडकाठी, ओलांडून जाण्याचें मुख्य प्रधानाच्या अंगीं कांहीं सामर्थ्य राहत नाहीं. अशा स्थितींत सुद्धां, मनास एखाद्या सिंहासनस्थराजाप्रमाणें, हातांस 'वर या' ह्मणून हुकूम करतां येईल, परंतु हात हालावयाचा मात्र नाहीं. पण तीच आडकाठी एका बाजूस करा, कीं प्रधानास तिकडे जातां येईल. आणि प्रधान तिकडे गेला, कीं हात उचललाच पाहिजे. ह्यावरून हें सहज कळून आलें कीं, सर्व हालचालीचें आणि शक्तीचें मूळ मनांत आहे.

मीं आतां चैतन्य आणि जड, ह्यांच्यामधील सांधणारा दुवा आपल्यापुढें मांडला, आणि मनोविकारद्वारें मानवी चलनवलनशक्तीच्या आकुंचनाचें शास्त्रही त्यांतच दाखवून दिलें. हें एक प्राणिधर्मशास्त्रांतील अत्यंत दुर्बोधतत्वगुप्त आहे असें मानलें गेलें आहे, व अद्यापही तसेंच मानतात. परंतु आतां त्याचा उलगडा झाला किंवा नाहीं, ह्याचा निर्णय मी आपणावरच सोंपवितों. माझ्या मतानें तर, त्यामध्यें कांहीं अंदेशा उरला नाहीं.

खरोखर **वीज** ही, रक्तामध्यें असून, **मन** आणि **अंतःप्रकृति** ह्यांच्यामधील सांधणारा **दुवा** आहे, ही गोष्ट स्पष्टपणें आणि शास्त्रीय रीतीनेंच सिद्ध झाली. तेव्हां आपोआपच प्रश्न उद्भवतो कीं,—जर **मन** हें मेंदूंतून आपल्या मानसिक शक्तीच्या द्वारें, स्नायूंच्या हालचालीनें, विजेस पंकेसारखें बाहेर फेंकीत आहे, तर मेंदूंत तरी तिचा पुरवठा कसा होतो ?—कोणत्या द्वारांतून ती शरीरांत प्रवेश करते, आणि मेंदूपर्यंत कशी पोंचते ?—ह्याचें उत्तर मी सांगतों: **वीज** ही, श्वासोच्छ्वास करणाऱ्या इंद्रियाच्या द्वारें रक्तांतून फुप्फुसांत ओढली जाते. रक्तांतून ती ज्ञानतंतूंत भरते, व ज्ञानतंतूंतून मेंदूपर्यंत जाते. आणि तेथें कांहीं **गुप्त संस्कार** घडून ती मनाच्या **कामीं** लागण्यासारखी **तयार होते**. परंतु रुधिराभिरण शास्त्राविषयीं थोडी बहुत तरी माहिती प्रथम सांगितल्याशिवाय, ही गोष्ट स्पष्टपणें सिद्ध होणें फार कठीण आहे. ह्या बाबतींत मी, प्राणिधर्मशास्त्रवेत्त्यांच्या उलट आहें. आणि रुधिराभिसरण-क्रिया केवळ हृदयाकडूनच चालते, हेंही मत मला मान्य नाहीं—मग तें उदक-स्थितिशास्त्राच्या संबंधानें ह्मणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें ह्मणा.—ह्याकरितां मी त्या विषयाकडे आपलें लक्ष फिरवितों.

रुधिराभिसरणशास्त्र, हा सुंदर विषय, मनुष्यांनीं विचार करण्यास फारच योग्य आहे. तसेंच ह्या विषयाची वाटाघाट करतांना, सभोंवतालच्या तत्त्वांतून वीज कशी जमा होते, ती शरीरांत कशी शिरते, व मनावर निरनिराळे विकार उत्पन्न होण्यासाठीं, त्याचें पोषण करण्यास ती मेंदूंत कशी सांठून राहते, हेंही स्पष्टपणें कळून येईल. मात्र एक गोष्ट आपण नीटपणें ध्यानांत ठेवावी, अशी माझी इच्छा आहे. ती गोष्ट ही कीं, जेव्हां जेव्हां मी **विद्युत्, विद्युच्छास्त्र, मानवदेहाकर्षण**, अथवा **ज्ञान-रस**, असे शब्द वापरीन त्या वेळेस त्यांचा अर्थ एकच समजावा. मी एका अर्थींच त्यांची योजना करीन. हीं सर्व नामें एकाच वस्तूचीं समजावीं. पण रुधिराभिसरण शास्त्र, व ज्ञानरसाचें गौप्य उघडें करण्यापूर्वीं, **ज्ञानतंतु** आणि **रक्तवाहिन्यां**विषयीं थोडासा उल्लेख केला पाहिजे; तो असा कीं, तेणेंकरून पुढील समजूत नीट रीतीनें घालतां येईल.

मीं पूर्वीं कळविलेंच आहे कीं, मेंदू हा ज्ञानतंतूंचा खजिना आहे, आणि त्याचीं दोन्ही शकलें, ज्ञानतंतूंच्याच सूक्ष्म परमाणूंनीं बनलेलीं आहेत. तीं दोन्हीही ज्ञानरज्जूपर्यंत

जातात. ह्या ज्ञानरज्जूच्या शाखेच्या तळापर्यंत पाठीच्या मणक्यांचा मगज भरलेला असतो. हा मगज ह्मणजे मेंदूचाच पुढें आलेला भाग. हा, मेंदूपासून निघणारा, पाठीच्या मणक्यांचा, मगज नांवाचा मोठा भाग, त्यांत शरीराची सर्व मजबुति भरलेली असते. ह्या मगजापासून ज्ञानतंतूंच्या जोडीजोडीनें बत्तीस शाखा फुटलेल्या असतात. व त्यांस चलनवलनतंतु व ज्ञानतंतु लपटलेले असतात. त्या शाखांस आणखी दुसऱ्या शाखा फुटलेल्या असून, त्या प्रतिशाखांस अन्य शाखा फुटलेल्या असतात. अशा प्रकारें त्यांचें जाळें बनून तें मनुष्याच्या अंगावर इतकें दाट पसरलेलें असतें कीं, त्यांना चुकवून आपण एक सुईचें अग्र टोंचूं ह्मटलें तर होणार नाहीं. ह्यांतील एका तरी ज्ञानतंतूस शिवल्याशिवाय आह्मांस स्पर्शज्ञानसुद्धां होणार नाहीं. ह्यावरून ही ज्ञानतंतूंची रचना किती उत्तम व सोयीची आहे, हें आपल्या चांगलें लक्षांत येईल. ह्या लक्षावधी ज्ञानतंतूंत रक्त असत नाहीं; ह्यांच्यांत फक्त ज्ञानरसच भरलेला असतो. शिरांत व धमन्यांत रक्त असतें. हें तर मला पक्कें माहीत आहे कीं, मेंदूच्या घड्याजवळून ज्या रक्तवाहिन्या गेलेल्या असतात त्यांतून, त्या शक्तिमान इंद्रियास पुष्टि देण्यासाठीं, मोकळेपणानें रक्त वाहत असतें. परंतु प्रत्यक्ष ज्ञानतंतूंत मुळींच रक्त असत नाहीं. हे ज्ञानतंतु सजीव मनाचें स्थान होत, आणि विद्युद्रस हा त्यांचा मुख्य प्रधान होय.

मला नेहेमीं सभेंत व्याख्यानें देतांना जेव्हां जेव्हां रुधिराभिसरणशास्त्रावर बोलण्याचा प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां मी ह्याच गोष्टीचें प्रतिपादन करतों. "सन १८४३ मध्यें '**जीवाकर्षक**' शास्त्रावर मीं जीं व्याख्यानें दिलीं," त्यांत चैतन्य आणि जड ह्यांच्यामधील सांधणाऱ्या दुव्याच्या संबंधानें, मीं ह्याच अर्थाचा अभिप्राय प्रदर्शित केला आहे खरा, तथापि हा विषय मीं अगदीं पूर्ण, व तपशिलवार सांगितलेला नाहीं. आजच्या विषयांत ज्ञानरसाच्या गौप्यासंबंधानें मी आतां बोलणें सुरू करतों.

त्यासाठीं प्रथमच मला, हें सांगून ठेवलें पाहिजे कीं, ज्या हवेचा आपण श्वासोच्छ्वास करतों, त्या हवेचें पृथक्करण केलें असतां, तींत एकवीस भाग प्राणवायु (**आक्सिजन**) व एकुणऐंशीं भाग (**नाइट्रोजन**) हे वायु आढळतात. आणि सर्व विश्वाचा **मुख्य** प्रधान **विद्युत्**, हिनें तर हें सर्व वातावरण व्यापलेलें आहे. पृथ्वीवरील कोणत्याही रूक्ष प्रदेशांत तिला एकत्र केल्याशिवाय, आह्मांस कोणतेंही विद्युद्यंत्र फिरवितां येणार नाहीं. **आक्सिजन** हें मनुष्याच्या जीवनास व दाह्यक्रियेस साह्यभूत तत्त्व आहे. ह्याच्याशिवाय कोणत्याही प्राण्यास एक क्षणभर सुद्धां वांचतां येणार नाहीं. **नाइट्रोजना**ची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट आहे. तो दिवा आणि प्राण ह्या दोहोंचाही तत्काल नाश करतो. हें पंचभूतात्मक वातावरण, फुप्फुसांत ओढलें जातें. **विद्युत्** आणि **आक्सिजन** ह्यांची ओलसरपणावर विशेष प्रीति असल्यामुळें, हीं

तेव्हांच रक्तांत मिसळतात. आणि **नाइट्रोजन** बाहेरच राहून नाश पावतो. रक्तामध्यें **आक्सिजन** व **वीज** हीं मिश्र झालीं कीं, तत्काळ त्याचा रंग लालभडक दिसूं लागतो. ह्या विलक्षण क्रियेनें रक्त शुद्ध होऊन रुधिराभिसरणास योग्य होतें. फुप्फुसें, आणि त्यांतील रक्त, हीं दोन्हींही विद्युत्क्रियेनें **धन**स्थितींत असतात. आणि आपणांस विद्युच्छास्त्रांतील ही गोष्ट माहीतच आहे कीं, धनविद्युद्युक्त दोन पदार्थ एकमेकांस दूर ढकलतात. ह्याच नियमाप्रमाणें फुप्फुसें रक्तास दूर सारून त्यास हृदयाच्या डाव्या पुडांत जोरानें लोटून देतात. रक्त वर गेलें कीं, हृदयांतील तोंडाचा पडदा पडून परत येण्याचा मार्ग बंद होतो. ह्यास्तव त्यास धमन्यांतूनच जावें लागतें. तेव्हां अर्थातच धमन्यांतील रक्त लालभडक रंगाचें असतें. विद्युत्कार्यांतील **धन**शक्तीनें तें, धमन्यांच्या भरण्यासारख्या शाखा असतील तेवढ्या भरून टाकतें, आणि त्यांच्या बारीक बारीक शाखांत सुद्धां तें पसरतें. ह्या धमन्या, आणि त्यांच्या हजारों शाखा, ह्यांच्याभोंवतीं अनिच्छित चलनवलनाचे ज्ञानतंतु ठेवलेले आहेत. पण जेथें जेथें शिरा येऊन मिळाल्या आहेत; तेथें मात्र नाहींत. असें कां असावें बरें? तारायंत्राच्या हजारों तारांप्रमाणें, हे **ज्ञानतंतु** सर्व धमन्यांभोंवतीं, व त्यांच्या अति सूक्ष्म शाखांभोंवतीं सुद्धां ठेवलेले आहेत; परंतु शिरांपैकीं एकाही शिरेभोंवतीं ज्ञानतंतु नाहींत, ह्याचें कारण काय? त्यांतच मी आणखी हा एक प्रश्न घुसडून देतों कीं, ज्ञानतंतु धमन्यांजवळच कां असतात? व शिरांजवळ कां असत नाहींत? ह्याचें उत्तर मी असें देतों कीं, धमन्यांच्यासभोंवतीं ज्ञानतंतु ठेवलेले असतात ते, त्यांतून खेळण्याऱ्या **धन**रक्तापासून, फुप्फुसांनीं श्वासोच्छ्वासाबरोबर घेतलेल्या हवेनें रक्तांत मिश्र झालेली **विद्युत्** काढून घेण्यासाठीं ठेवलेले असतात. आणि शिरांतील रक्त **ऋण** असल्यामुळें, बाहेर टाकण्याला त्यांच्यांत **वीज**च नसते. तेव्हां ती घेण्यासाठीं तेथें ज्ञानतंतूंचीही आवश्यकता नाहीं. कारण, फुप्फुसाच्या प्रत्येक श्वासाबरोबर रक्तांत मिळते ती **वीज**, घर्षणाच्या योगानें ज्ञानतंतूंत फेकली जाते. आणि ती ईश्वरी नियमानियमाप्रमाणें आपल्या लाल प्रवाहाच्या नळांतून वाहत राहते. धमन्यांच्या शेवटच्या टोंकांस,—ज्या हजारों सूक्ष्म शाखा असतात, त्यांच्या अगदीं अग्रावर—**विद्युत्**चा शेवटचा अंश धनरक्तांतून निघून, तेथें हजर असलेल्या ज्ञानतंतूंच्या द्वारें तावडतोब जाऊन मेंदूस पोंचतो, आणि मनास पौष्टिकता देण्यासाठीं तेथें जमून राहतो.

वर सांगितल्याप्रमाणें धमन्यांच्या रक्तांतील वीज निघून गेल्यानंतर, त्यास काळा—पिकलेल्या द्राक्षासारखा—रंग प्राप्त होतो. नंतर तें शिरांच्या शाखांत शिरतें. ह्या शिरांच्या शाखाही धमन्यांप्रमाणेंच हजारों पसरलेल्या असतात. हें रक्त आतां **ऋण**स्थितींत असतें. आणि फुप्फुसें, नव्या श्वासोच्छ्वासानें त्यास **धन**स्थितींत ठेवीत असल्यामुळें, **धनशक्ति** व **ऋणशक्ति** परस्परांस आकर्षितात.

ह्याच तत्त्वावर शिरांतील रक्त, हृदयाच्या उजव्या पुडांतून परत फुप्फुसांत जातें. तेथें त्यास पुन्हा **आक्सिजन** आणि **वीज** मिळते, त्यास लालभडक रंग येतो, आणि पुन्हा त्यास **धन**स्थिति प्राप्त होते. ह्याप्रमाणें तें रक्त पुन्हा एकदां शुद्ध होऊन धमन्यांतून जाण्यास तयार होतें. ह्या सर्वांवरून आपणांस स्पष्ट कळतें कीं, वीज हीच रक्ताचें अभिसरण करते. आणि त्यास वीजच हृदयाच्या दोन पुडांवाटे फुप्फुसांतून ती आंत नेते, व पुन्हा त्यास परत आणते. वैद्य लोकांच्या वादाप्रमाणें हृदय हें मुळींच रुधिराभिसरण करीत नाहीं. तर **हृदय** हा, श्रेष्ठ रक्तजीवनसमुद्राला, व त्यांतील नद्यानाले, ह्या सर्वांला नियमित वेळीं भरती ओहोटी आणणारा उत्तम **व्यवस्थापक** आहे. आणि सर्वांनीं जलद व नीट रीतीनें चालावें, ह्याविषयींचा तो नियामक आहे, इतकेंच.

### तिसरें व्याख्यान समाप्त.

---

# पुस्तकपरीक्षा.

**नीतिपाठमाला**—भाग १ ला—हें पुस्तक **चंद्रशेखर विनायक नवलकर** व **मनोहर विठ्ठल तर्खडकर** ह्यांनीं तयार केलेलें त्यांनीं रा० रा० **रामचंद्र केशव नाईक कर्वे** म्यानेजर **आर्यशिशु** यांस नजर पाठविलें होतें. तें त्यांनीं परीक्षणार्थ आमच्याकडे पाठविलें आहे. रा० **कर्वे** ह्मणतात "ह्याच कर्त्यांनें केलेल्या 'अनेक पद्यावली'ची दुर्दशा आपल्या पुस्तकीं झाल्याकारणानें पुस्तककर्ता स्वतः होऊन पाठविण्यास धजत नाहीं." परंतु रा० तर्खडकरांकडून पुस्तकपरीक्षणाकरतां ह्याच पुस्तकाची निराळी प्रत आह्मांकडे आली आहे. त्यांच्या 'अनेक पद्यावली'वर आमच्या ह्याच वर्षाच्या पहिल्या अंकांत जो अभिप्राय आला आहे, त्यांत एकही शब्द अनुकूल लिहिला गेला नव्हता. तत्रापि त्यांनीं सत्यप्रियतेमुळें खासगी रीतीनें मनःपूर्वक आभार मानले आहेत. असो. आज ह्या तर्खडकरांच्या द्वितीय कृतीबद्दल दोन शब्द लिहूं.

"धनुर्धारीं" नीं नीतिपाठमाला सुरू केलेली पाहून रा० तर्खडकरांसही स्फुरण चढलें. व त्यांनीं हें प्रस्तुत छोट्याशा २० पानांचें पुस्तक कसेंबसें भरून काढलें, असें वाटतें. परंतु तिनें घातली सरी, ह्मणून हिनें लावली दोरी! असें झालें आहे. तीही एकट्यानें नव्हे हो! रा० नवलकर ह्यांस भागीदार घेऊन! मग ह्यांनीं कोणता भाग लिहिला, व त्यांनीं कोणता भाग लिहिला, तो परमेश्वर जाणे! हे उभयतां पुस्तककार नीतिपाठमाला गुंफण्यास तयार होऊन त्यांनीं नीतीचीं तत्त्वें

कितपत व्यक्त केलीं आहेत, हें ह्यांत एक लहानशी गोष्ट सांगितली आहे, त्यावरून कळण्यासारखें आहे. राजाराम नांवाचा मुलगा होता, तो दुसऱ्या एकाच्या संगतीनें 'बहकूं' लागला ! एकेदिवशीं दीड वाजण्याच्या सुट्टींत त्यानें मोठा अनर्थ केला ! "सदाचरणाच्या अक्षयी आनंद देणाऱ्या वृक्षांची थंडगार छाया सोडून दुराचरण-रूपी वृक्षांच्या निबिड अंधकारांत तो मोठ्या हौसेनें शिरला."

हा दुराचरणरूपी वृक्ष कोणता ? तर चेंडूफळीचा डाव ! ! इतक्यांत तिकडून गुरुजी आले. तेव्हां आमचे उभय ग्रंथकार जगाचा नियम सांगतात. "मनुष्यांवर जर चोहींकडून त्यांचे शत्रु धांवून आले, तर त्यांना शरण गेल्याशिवाय गत्यंतरच नाहीं." ह्या उत्कृष्ट विश्वनियमास अनुसरून राजाराम गुरुजीस शरण गेला, त्यास आपल्या दुष्ट (!) आचरणाचा पश्चात्ताप झाला. ह्मणून तर्खडकर मुलांस सांगतात "तर बाबांनों ! याकरितां जगांत आपल्या नांवाचा डांगोरा पिटवा !" पुढें एक सदर आहे. त्याचें नांव "मनशुद्धि." हा किती शुद्ध शब्द आहे पहा ! शेवटीं ध्यानांत ठेवण्यासारख्या ह्मणून कित्येक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांतील एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही:—

"कोणतीही गोष्ट करण्याची मनांत बुद्धि धरूं नये" ! !

मग पुस्तककर्त्यांनीं पुस्तक लिहिण्याची तरी बुद्धि कशाला धारण केली ? असो. तर अशा प्रकारें दोघांदोघांनीं पोकळ 'डांगोरा पिटणें' बरें नव्हे, असें वाटतें. अशा प्रकारची 'नीतिपाठमाला' ह्मणजे नीतीची थट्टा ! दुसरें काय ?

**त्राटिकानाटक**—हें अत्यंत हास्यकारक व बोधपर नाटक महाकवि 'शेक्सपीअर' कृत 'टेमिंग आफ धि श्र्यू'च्या आधारें रा० रा० **वासुदेव बाळकृष्ण केळकर, बी. ए.** ह्यांनीं तयार केलें आहे. शेक्सपीअरच्या नाटकांपैकीं हें एक उत्तम नाटक असून, त्याचें संविधानक फारच मनोरम आहे. त्यावर प्रोफेसर केळकरांनीं उठवलेली ही इमारतही अतिशय उत्कृष्ट वठली आहे, हेंही सांगण्यास आह्मांस फार संतोष वाटतो. व्यक्तींचीं नांवेंही फार समर्पक आहेत. प्रतापरावाचीं व त्राटिकेचीं भाषणें इतकीं मनोल्हादक आहेत कीं, तीं पुन्हा पुन्हा कितीही वाचलीं तरी तृप्ति होत नाहीं. राणोजीचें पात्रही फार मजेचें आहे. त्याच्या त्या 'सुंद' व 'संवसकुत्र' भाषेला मूळांत कोठें आधार

१. हें नाटक 'नाट्यकथार्णव' मासिक पुस्तकांतून थोडें थोडें छापून प्रसिद्ध होत होतें. ह्यावरून तें रा. रा. शं. मो. रानडेकृत असावें, असा समज होऊन 'कलमबहाद्दरांस शेलापागोटें' ह्यांत, तसा उल्लेख करण्यांत आला होता. (पु. ७ अं. १ पृ. २३)

नाहीं तरी, तो विचित्र प्रकार जनाच्या चित्तरंजनास विशेष साह्यभूत होतो, यांत शंका नाहीं. पिल्याची कुणबी भाषाही हुबेहूब साधली आहे. त्राटिका तर काय ? ह्या नाटकांतील नायिकाच! तिचें तें भाषण, कृति, उच्छृंखलपणा, अगदीं नांवास तुल्य उतरला आहे. भुमय्याचार्लूचें तें धेडगुजरी भाषण ऐकून हांसणार नाहीं, इतका गंभीर पुरुष क्वचितच आढळेल!

प्रतापरावाची आणि त्राटिकेची पहिली मुलाखत व गमतीचा संवाद, त्यांतील शब्दश्लेष, प्रतापरावाच्या पोषाखाचा थाट, लग्नसोहळ्याचा विधि, त्राटिकेची घरंभरणी, दोघांच्या भोजनाचा मासला, जिनसांची खरेदी, व शेवटीं परत सासुरवाडीस जातांना मार्गांतील थाट हे भाग सर्वोत्कृष्ट साधले आहेत.

जी लग्नापूर्वी केवळ साक्षात् कैकयीला द्राष्टिकपणांत लाजविणारी तीच त्राटिका लोण्याप्रमाणें मऊ, व महासाध्वी बनून सरतेशेवटीं जो तिनें सर्व स्त्रियांस उपदेश केला आहे, तो तर प्रत्येक मनुष्यानें—विशेषेंकरून स्त्रियांनीं—निरंतर आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखा आहे. ज्याच्या अंगांत खरोखर पाणी नाहीं, त्यानें नसती अरेरावी मिरविल्यानें कजाग बायकोपाशीं कसा फज्जा उडतो, तेंही राणोजीच्या व सारजेच्या प्रीतिकलहांत उत्तम व्यक्त होतें.

आतां कमळेच्या लग्नाचा भाग, प्रथमचा कांहीं भाग, पुराणिकबोवांचें चऱ्हाट वगैरे कितीएक गोष्टी बऱ्याच लांबट झाल्या असल्यामुळें प्रथमतः बऱ्याच कंटाळवाण्याशा वाटतात, परंतु ह्या नाटकाच्या पुन्हा पुन्हा दोन चार आवृत्ति केल्या तर, त्याच गोष्टींत पुष्कळ मार्मिकता आहे असें दिसून येईल.

एकंदरींत हें नाटक उत्तम नाटकांपैकीं एक निर्माण झालें, असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं. अशा प्रकारचीं पुस्तकें होतील तरच कांहीं मराठी भाषेंत भर पडली ह्मणावयाचें. ह्या पुस्तकाच्या लेखनचातुर्याबद्दल प्रोफेसर केळकर ह्यांची जितकी तारिफ करावी तितकी खरोखरच फार थोडी आहे. ह्या पुस्तकास गुणज्ञ राजेरजवाड्यांनीं मोठें बक्षीस द्यावें अशा प्रकारची ह्या नाटकाची रचना वठली आहे, असें मोठ्या आनंदानें कबूल करावेंसें वाटतें. ह्या पुस्तकाची एक एक प्रत प्रापंचिकानें अगत्य अगत्य संग्रहीं ठेवावी.

**स्वशरीरसंरक्षण**—रा. रा. **बाळकृष्ण दिनकर वैद्य**, कल्याणकर, ह्यांनीं लिहिलें. उत्कृष्ट साधलें आहे. भाषा अत्यंत मनोहर, व विचारही सुंदर आहेत. अवश्य अवश्य वाचावें.

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS BOMBAY.

## सेंट बर्नर्डजातीचे कुत्रे.



कुत्र्याच्या शहाणपणाबद्दल, इमानीपणाबद्दल, व स्मरणशक्तीबद्दल अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. तथापि युरोपामध्यें 'सेंट बर्नर्ड' ह्या जातीचे जे पाळींव कुत्रे आहेत, ते इतके इमानी, इतके शहाणे, व इतके परोपकारी आहेत, कीं त्यांनीं आजतागाईत हजारों मनुष्यांचे प्राण

१ कोकिळाच्या वाचकांत–इंग्रजी, निव्वळ मराठी भाषा जाणणारे, लहान मोठे असे–भिन्न भिन्न प्रकार आहेत. अर्थात् त्यांची आवडही भिन्न भिन्न आहे. म्हणून व आमच्या बऱ्याच बालवाचक मंडळीकडून आलीकडे विनंतिपत्रें आलीं आहेत कीं, 'आमच्यासाठीं कांहीं सोपे, बोधपर, नव्या माहितीचे विषय यावेत.' ह्यासाठीं त्याप्रमाणें ह्या विषयासारखे सोपे विषय मधून मधून देण्याचें, वर्षारंभीं प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें योजिलें आहे. ही योजना त्या मंडळीस कशी काय पसंत पडते पहावी.

वांचविले आहेत, हजारों मनुष्यें यमाच्या दाढेंतून ओढून काढिलीं आहेत, काढीत आहेत, व पुढेंही काढतील. अशा प्राण्यांच्या पुण्याईचें वर्णन करणें फार अगत्याचें काम आहे, असें समजून आज त्याबद्दल थोडीशी माहिती देतों.

'**सेंट बर्नर्ड**' हा कुत्रा भला उंच, धिप्पाड, व बळकट असून त्याचें मस्तक मोठें, केस लांब, व शेपूट झिप्रें असतें. हा कुत्रा दिसण्यांत फार उमदा आहे. आणि तो जसा देखणा, तसाच बुद्धिमानूही आहे. हे कुत्रे **स्वित्सर्लंडांतील** उंच उंच पर्वत, आणि **आल्प्सचा** पहाड येथें असतात. ह्या पर्वतावरून कित्येक रस्ते **इतालीदेशांत** गेलेले आहेत. त्यांपैकीं कित्येक घाट अतिशय अवघड व मनस्वी चिंचोळे असतात.

ह्या ठिकाणीं भर उन्हाळ्यांत सुद्धां कधीं कधीं भयंकर बर्फाची वृष्टि होते. आणि हिंवाळ्यांत तर तेथें अत्यंत जोराचीं, व महाभयप्रद तुफ़ानें होतात. अशा प्रसंगीं त्या घाटांतून जाणें अगदीं जिवावरचें काम असतें. कधीं कधीं हीं तुफानें अकस्मात् उद्भवतात. सकाळीं पहावें तों आकाश स्वच्छ व दिवस निरभ्र असतो. आणि एकाएकीं बर्फाची भयंकर वृष्टि सुरू होते. हें बर्फ इतकें दाट कोसळतें कीं, थोड्याच तासांत प्रवाशी, बर्फाच्या ढिगाखालीं गडप्प होऊन जातो. ह्या पर्वतावरून प्रवास करतांना शेंकडों लोक प्राणास मुकले आहेत. पण '**सेंट बर्नर्ड**' कुत्र्याच्या उपकारानें आणि विश्वासूपणानें पुष्कळ प्रवाशी लोकांचे प्राण वांचलेही आहेत.

ह्या पर्वताच्या एका उंच शिखरावर पूर्वीं '**सेंट बर्नर्ड**' ह्या नामेंकरून एक महंत राहत असे. त्यानें तेथेंच उत्पन्न होणाऱ्या एका जातीचे कुत्रे पाळून त्यांस मनुष्यसंरक्षणाचें काम फार मेहनतीनें शिक-

---

१ हा साधुपुरुष इ० स० ९६२ मध्यें होऊन गेला. ह्याचें पूर्ण नांव बर्नर्ड डी मेंथान असें होतें. ह्यानें मांट जाक्स येथें एक, व मीशन आल्प्स येथें एक अशीं दोन औषधालयें स्थापन करून तेथें त्यानें ४० वर्षें वास्तव्य केलें. आणि ब्लडहाउंड जातीच्या कुत्र्यांस मनुष्यसंरक्षणाची विद्या शिकविली.

विलें. व त्या कुत्र्यांस हा अप्रतिम गुण साधल्यामुळें, त्यांच्या सर्व जातीस 'सेंट बर्नर्ड' असेंच नांव पडलें आहे. हा सेंट बर्नर्डचा मठ 'सेंट बर्नर्ड' ह्या नांवाचा जो मोठा प्रख्यात घाट आहे, त्याच्या वरच्या बाजूस अति उच्च शिखरावर आहे. ह्या मठांत त्या साधूची परंपरा राहत असून ती आपलें सर्व आयुष्य परोपकारार्थ खर्च करते. हा घाट, आल्प्सपर्वताच्या सर्व घाटांत फार बिकट आहे.

ह्या मठांत वैराग्यदीक्षा घेऊन सर्वसंग परित्याग केलेले बैरागी, प्रवाशांचें संरक्षण व साह्य करण्यांसाठीं बारमहा वस्ती करून असतात. आणि ते ह्या कुत्र्यांच्या साह्यानें पुष्कळ लोकांचे प्राण वांचवितात.

चुकलेले, संकटांत पडलेले, बर्फांत सांपडलेले असे प्रवाशी, शोधून काढण्याचें काम कुत्र्यांस शिकविलेलें असतें. आणि हिंवाळ्या दिवसांत दररोज बहुतकरून जोडीजोडीनें त्यांस ह्या कामगिरीवर पाठविण्यांत येतें. एकाच्या गळ्यास पट्टा बांधून त्यास एक अन्नाची टोपली व लहानसें दारूचें पीप अडकविलें असतें. आणि दुसऱ्याच्या पाठीवर आंगरखे वगैरे उबदार कपडे टाकलेले असतात. ह्यायोगें एखाद्या घायाळ झालेल्या अनाथ मनुष्यास ते तत्काळ अन्नाचा व कपड्यांचा पुरवठा करतात. शिवाय त्यांस लांडग्यांपासून उपद्रव होऊं नये ह्मणून त्यांच्या मस्तकावर लोखंडी पत्र्याची कांटेरी झूल घातलेली असते.

मनुष्याच्या अंगांत चालण्याची शक्ति असली, तर ते कुत्रे त्यास मठापर्यंत घेऊन जातात. आणि सर्व रस्त्यानें मोठमोठ्यानें भुंकून व गुरगुरून आपल्यास मदत करण्यासाठीं, व मठांतील बैराग्यांस आपण संकटांत पडलेल्या मनुष्यास घेऊन परत येत आहों हें समजण्यासाठीं खूण करतात. एखादा मनुष्य अगदीं थकून थंडीनें मनस्वी गारठला असला, व त्यास चालावयाची शक्ति नसली, तर हे बुद्धिमंत आणि विश्वासू प्राणी, धांवत धांवत मठाकडे परत जाऊन, बैराग्यांस घेऊन त्या स्थळीं परत येतात. कधीं कधीं एखादा प्रवाशी बर्फाखालीं गडून जातो. अशा स्थळीं ह्या मठापैकीं एखादा महंत गेला, तरी त्यास तो मनुष्य सांपडण्याचा संभव नसतो. पण हे कुत्रे वासावरून त्यास शोधून

काढून त्या स्थळीं पायानें उकरूं लागतात. व बैरागी तेथें येईपर्यंत तोंडानें सारखे भोंकत व गुरगुरत असतात! केवढें ज्ञान, आणि केवढी बुद्धि ही!!

ह्या मठांत एक कुत्रा फारच नामी होता. त्यानें बेचाळीस मनुष्यांचे प्राण वांचविले असें ह्मणतात. ह्या कुत्र्याचें नांव '**बेरी**' असें होतें. हा जसा शूर तसाच बळकटही होता. एकदां एक बाई आपल्या एका मुलग्यास बरोबर घेऊन ह्या घाटांतून चालली असतां, ती बर्फाखालीं सांपडली. **बेरी**ला तिचा मुलगा आढळला. तो कोठें दुखावला नव्हता खरा, पण थंडीच्या आणि बर्फाच्या कडाक्यानें अगदीं गारठून गेला होता. ह्मणून **बेरी**नें त्यास हळूच आपल्या पाठीवर घेऊन त्यास मठाकडे नेलें. ह्या देखाव्याचें मनोरम चित्र शिरोभागीं दिलें आहे. तें पाहून **बेरी**च्या बुद्धीचा, ज्ञानाचा, आणि परोपकारित्वाचा किती बरें चमत्कार वाटतो! आणि मनांत केवढी पूज्यबुद्धि उत्पन्न होते! **बेरी**नें पाठीवरून केवळ मरणोन्मुख झालेला मुलगा आणलेला पाहून मठांतील बैराग्यांस किती बरें आनंद झाला असेल? आणि त्या मुक्या प्राण्याची केवढी बरें धन्यता वाटली असेल? मठांतील त्या परोपकारव्रत धारण करणाऱ्या बैराग्यांनीं त्या मुलाची उत्तम प्रकारें शुश्रूषा केली, आणि **बेरी**च्या नांवाचा जयघोष केला.

अहाहा! **बेरी**! धन्य आहेस तूं! ज्या तुवां आपला सर्व देह परोपकारांत झिजविला स त्या तुझ्या दिव्य पुण्याईला जोड तरी कोठून आणावी? तूं अन्य जन्मीं कोण बरें असावास? तूं आपल्या सुशीलपणानें मानवजातीस सुद्धां लाजविलेंस! परलोकीं तुला परमेश्वरानें किती उच्चस्थान दिलें असेल? आणि जेवढें दिलें असेल, तेवढें आह्मी थोडेंच ह्मणूं. हे मनुष्यजातीच्या प्राण्यांनो! ह्या मुक्या जनावराकडे पाहून तरी आपलें मन परोपकाराकडे वळवा. हे दुष्ट छळवाद्यांनो! हें वरचें **बेरी**चें चित्र पाहून लज्जेनें खालीं मान घाला, आणि आपल्या कृष्णकृत्यांच्या पश्चात्तापाचीं डोळ्यांतून टिपें टाका. **बेरी**च्या सद्गुणापासून तुमच्या मनास थोडासा तरी द्रव येऊं द्या। अशा तुह्मांला ह्या **बेरी**च्या गुणप्रकाशानें फार नीचता आली आहे.

## ( नास्तिकाभिमान्यास शतपुटी— )

# जोडगोळी.*

### श्लोक. ( भुजंगप्रयात. )

धरोनी मनीं गर्व तूं नास्तिकाचा । हिऱ्यांना कसें बोलशी शुद्ध कांचा ॥
बहू दाविशी आवडी तूं विवादीं । परी सर्प होईल रे कैंवि वादी ॥ १ ॥
सुकें शब्दपांडित्य बापा कशाला । हरेना क्षुधा पाहुनी पाकशाला ॥
खरें सत्य तें सत्य रे आदि अंतीं । घडेनाच मिथ्या युगांतीं दिगांतीं ॥ २ ॥
श्रमें मागशी तूं जरी तीव्रमात्रा । तरी पाहणें उक्त पात्रा अपात्रा ॥
कराया बरें योग्य आहे विधीच । जिवाचा धनी वैद्य नाहीं कधींच ॥ ३ ॥
पुराया तुझा हेत मी सिद्ध आहें । प्रसंगीं अशा कोण बा दूर राहे ॥
अशी वेळ कोणासही रोज नाहीं । ह्मणूनी पुन्हा औषधी योजनाही ॥ ४ ॥
विसर्जी मला तूं करी चित्तशुद्धि । तरी लौकरी स्थीर होईल बुद्धि ॥
बऱ्या ह्या उपायें न माथें फिरेल । यथायोग्य तें भक्ष्य सारें जिरेल ॥ ५ ॥
क्रमानें तुझ्या देतसें उत्तराशी । यथाबुद्धि फेडीन संदेहराशी ॥
पडो नीट लागू तुला "जोडगोळी" । विचारामृतें तीस तूं नित्य घोळीं ॥ ६ ॥
**"नये ईश्वरा लक्षितां सद्विचारें"** । असें बोलशी संपलें यांत सारें ॥
तुला भ्रांति कीं तो असे स्थूल देही । परी सूक्ष्म तो वेदवाणी वदे ही ॥ ७ ॥
जडाकार आहे तया काय आंग । तुला वाटतें काय रे काय सांग ॥
तुझ्या मानसीं सत्यसंकल्प नाहीं । असे घेरलें नित्य दुष्कल्पनांहीं ॥ ८ ॥

---

* केरळकोकिळ वर्ष ६ अंक २ मध्यें "नास्तिकास गोळी" म्हणून कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यावर तारीख ६ एप्रिल १८९२ च्या 'ज्ञानचक्षूंत' 'नास्तिकाभिमानी' ह्या सहीनें एका मार्मिक गृहस्थानें "गोळी उलटली !" ह्या सदराखालीं त्याच छंदानें प्रतिपक्ष केला होता. व त्यावर उत्तरें मागितलीं होतीं. तो वाद वाढविण्याचा आमचा हेतु नव्हता, तथापि त्यांनीं नुकतीच पुन्हा 'ज्ञानप्रकाशांत' त्यावरचीं उत्तरें ऐकण्याची जिज्ञासा प्रगट केली. ह्यास्तव आज शतपुटी 'जोडगोळी'ची, पुन्हा योजना केली आहे. वाचकांनीं एकवार पुन्हा कोकिळांतील मूळ लेख, व ज्ञानचक्षूंतील प्रतिपक्ष पाहावा म्हणजे ह्या 'जोडगोळी' पासून त्यांस विशेष करमणूक होईल. **प्रतिपक्षाचे आक्षेप जाड टाइपांनीं दाखविले आहेत.**

असे काय तो वृक्ष लांकूड धोंडा । भला दांडगा कीं कपी काळतोंडा ॥
असे त्यास का आकृती पांखराची । प्रभूमुर्ति का सांग आहे खराची ॥ ९ ॥
तुझ्या भाषणें सर्व आह्मी भुलूं का । रवी येवढाही दिसेना उलूका ॥
निकामी गड्या कागदी 'ज्ञानचक्षु' । हरीना क्षुधारम्य गोकाक-इक्षु ॥ १० ॥
निराकार तो सांग कोठें असेल । तुझ्या चर्मचक्षूंस कैसा दिसेल ॥
नसे आकृती दृश्य वातामनाही । ह्मणोनी तयां काय अस्तित्व नाहीं ॥ ११ ॥
"**नये तर्किता सद्विचारें**" नरांशीं । तरी जाण तो खास अज्ञानराशी ॥
न ज्या ऐकुनी लक्षणें तर्क चाले । तयाच्या पुढें सर्वही रद्द झालें ॥ १२ ॥
"**कसें मूळ वेली विणें संभवेल**" असें बोलणें सांग कैसें खपेल ॥
समस्तांस आधीं असें मूळ बीज । कशी होय बंधूविणें भाउबीज ॥ १३ ॥
अती सूक्ष्म सर्वत्र बीजांश लोकीं । सदा व्यापुनी राहती हें विलोकीं ॥
तया पासुनी उद्भिजें जीव कोटी । दिसे योजना कोण मानील खोटी ॥ १४ ॥
असो मूळ आधीं असो वेल आधीं । तयाची नको शुष्कवादा उपाधी ॥
करी एक निर्माण जें तत्व लोकां । तयालागिं कोणीच कर्ता नको का ॥ १५ ॥
"**वनापर्वतांवीण का मेघ वर्षे**" । असें बोलशी नास्तिका फार हर्षे ॥
वना पर्वतांना करी कोण बोल । विचारें शिरें अंतरीं फार खोल ॥ १६ ॥
नभामाजि तारे दिशां माजि वारे । "**कसे एकट्या कारणें होति सारे**" ॥
दिसे प्रश्न हा फार मोठ्या मजेचा । न का रक्षिता भूप साऱ्या प्रजेचा ॥ १७ ॥
समुद्रांतरीं आपुली आज राणी । तिला पाहिलें सांग जाऊन कोणी ॥
करी राज्य-हें सूत्र घेवोनि हातीं । सुखानें कसे लोक येथें रहाती ॥ १८ ॥
कुठे बंड झालें कुणा दंड झाला । कुठे शत्रुनें घातला आज घाला ॥
भले कोणते कोणते लांच खाती । कशी रेखुनी पाहते सर्व खातीं ॥ १९ ॥
वरें धुंडुनी पाहतां कीं मिळेना । कुठे राहते अज्ञ लोकां कळेना ॥
परी घातपातादि होतां शिपाई । धरोनी तिचा नेतसे त्याच पाईं ॥ २० ॥
महाज्ञानसंपन्न सामर्थ्यवंत । तयांचा कधीं ना कळे आदि अंत ॥
न साधे तयां कोणतें कामकाज । प्रभू तो असे सर्व राजाधिराज ॥ २१ ॥
"घनामाजि पाणी वनामाजि खाणी"। "**ह्मणा वाचकां निर्मिता ह्यास कोणी**" ॥
असाही तुझा प्रश्न आणीक एक । करी थोडका त्यावरी तूं विवेक ॥ २२ ॥
जिथें योजना होतसे हेतुसिद्ध । असावा तिथें खास कर्ता प्रसिद्ध ॥
जरी कूप दृष्टीं पडे आडरानीं । मनीं ये तरी बांधलासे नरांनीं ॥ २३ ॥

विशेषाकृती मांडिले चार धोंडे । उभारूनियां मस्तकीं लाल झेंडे ॥
स्वयंभू नसे पाहतां आकृती ही । गमे निश्चयें मानवाची कृती ही ॥ २४ ॥
महापर्वतीं वेरुळीं थोर लेणीं । न तीं पाहिलीं ऐकिलीं सांग कोणी ॥
तयाची कृती मानवी कां गणावी । न कर्ता न साक्षी स्वयंभू ह्मणावी ॥ २५ ॥
असा न्याय हा बोलणें व्यर्थ आहे । "विचारी मना तूंचि शोधोनि पाहें" ॥
शरीरीं तुझ्या निर्मिली काय सोय । अपोआप ती कोण बोलेल होय ॥ २६ ॥
"**असे नीच दुष्टांत तद्वस्ति का रे**" । असें मित्रही नास्तिकाचा पुकारे ॥
'अरे होय' मी देतसें उत्तरातें । नसे डाग कोठेंच चामीकँरातें ॥ २७ ॥
जगामाजि पाणी स्वभावेंच शुद्ध । कंशामाजि घाला नव्हे तें निषिद्ध ॥
सवें काजळा टाकितां रंग काळा । दुजा टाकितां होय तों तों निराळा ॥ २८ ॥
पदार्थी सवें पालटे अंबुवर्ण । परी मूळ तें सत्य आहे अवर्ण ॥
तसा तो प्रभू नित्य आहेच शुद्ध । तया दोष दे नेणता अप्रबुद्ध ॥ २९ ॥
तमाच्या गुणें भासतो तूज नीच । परी तो वसे शुद्ध सत्वें जनींच ॥
जयाचें तया कर्म आंगेंच बाधी । प्रभूला नसे कोणताही उपाधी ॥ ३० ॥
दिला पाकसिद्धीस देवें हुताश । घरा लावितां होतसे सत्य नाश ॥
कुबुद्धी सुचे कर्मयोगें नराला । तयाचा अहा! दोष का ईश्वराला ॥ ३१ ॥
"जलामाजि आहे स्थलामाजि राहे" । "**कसें काय तें सांग कीं स्पष्ट बा हें**"॥
ह्मणोनी मला पूससी फार कोपें । परी तें असे फार रे फार सोपें ॥ ३२ ॥
नसे जीव तारेस तीही निजांगें । विदेशीं क्षणीं जाऊनी वृत्त सांगे ॥
पुसे अज्ञ कीं ह्यांतलें काय बीज । तरी तूंच सांगून देशील 'वीज' ॥ ३३ ॥
महा अज्ञ तो त्यास कांहीं कळेना । तया कल्पना नीट कांहीं जुळेना ॥
बिचारा पडे ऐकूनी गोंधळांत । समाधान त्याचें करीं तूं पळांत ॥ ३४ ॥
दिसे वीज मेघांत पर्जन्यकाळीं । क्षणीं फांकते लोपते अंतराळीं ॥
कडाडे प्रकाशे महा तप्त गोळा । न पाहों शके तीस कोणीहि डोळां ॥ ३५ ॥
कशी तीच तारेंत येऊनि बैसे । विचारी पुन्हा अज्ञ तो तूज ऐसें ॥
कशी बोलते तीस का तोंड आहे । महाव्रात्य ती बंधनीं केवि राहे ॥ ३६ ॥
महा मूर्ख तो आफिसामाजि जाय । बंघे कोपरे आपटी हातपाय ॥
तिथें पाहतां मानवी सर्व सेना । तया वीज ती तेथ कोठें दिसेना ॥ ३७ ॥

---

* सुवर्णाला. १ पाण्याचा रंग. २ रंगहीन. ३ अग्नि.

असें बोलुनी चालुनी तो अजाण । तयाच्या पुढें वाचलें त्वां पुराण ॥
कळेंना तया केलिया यत्न कोटी ॥ ह्मणोनी गड्या बीज़ कां सांग खोटी ॥ ३८ ॥
जशी बीज तारेंतुनी गुप्त वाहे । तशी व्यापिली ईशतत्वें धरा हे ॥
नसे ईश्वरावांचुनी एक पान । वदे शास्त्र ये साक्ष त्याच्या समान ॥ ३९ ॥
"**निसर्गाभिधें जाणती प्रज्ञ लोक**"। असा भाषणीं आणिशी तूंहि झोंक ॥
असे प्रश्न माझा नसे फार खोल । '**निसर्गाभिधें**' काय तें तूंच्च बोल ॥ ४० ॥
अविंधांत अल्ला जिनामाजि बुद्ध । युरोपांत येशू असे कीं प्रसिद्ध ॥
ह्मणे ब्रह्म अद्वैत अष्टांग वेद । न नामें पडे ईश्वरामाजि भेद ॥ ४१ ॥
"**जगा तोचि कर्ता तसा चालवीता। जिवां संकटीं घालिता कष्टवीता ॥**"
जगाचा प्रभू पूर्ण राजाधिराज । तयाच्याकडे सर्वही कामकाज ॥ ४२ ॥
वरीं साधुवृत्ती धरीं एकनिष्ठा । तयाची जगीं वाढवावी प्रतिष्ठा ॥
जनां दुःख दे पापकर्मी प्रचंड । तयां शासितो लावितो चंडदंड ॥ ४३ ॥
प्रभू तो धरी नित्य ऐशा व्रतातें । परी तारितो सुप्रसादें नतातें ॥
दया आणि सामर्थ्य हीं त्याजपाशीं । बहू आवडे न्याय नीती तयाशीं ॥ ४४ ॥
"**अहा लागलें जीवजीवांत युद्ध**"। "**बळी भक्षितो निर्बळी हें प्रसिद्ध**" ॥
पशू दांडगे नांदती कैक वन्य । ह्मणोनी धरा जाहली काय शून्य ॥ ४५ ॥
"**जगीं घोर उत्पात लोकां गरीबां**" । कथीं तूजला कोण हें सत्त्व बाबा ॥
जरी हें खरें कां तरी हे गरीब । जगीं नांदती थोर त्यांचें नशीब ॥ ४६ ॥
सशाला पहा दीधले दीर्घ कर्ण । किती कीटका मृत्तिका पर्ण वर्ण ॥
नखें मांजरा साळुला तीव्र कांटे । अशी योजना व्यर्थ का तूज वाटे ॥ ४७ ॥
बळी वा धनी यांस पाहूनि माया । करीतो प्रभू हें तुझें ज्ञान वायां ॥
गरीबास देखोनि कापी न मान । प्रभूला पहा जीव सारे समान ॥ ४८ ॥
घडे घात उत्पात रे पूर्वकर्मे । कळावीं कशीं पामरा ईशमर्मे ॥
तयाची कृती फार आहे अगम्य । ह्मणोनी दिसे विश्व हें सर्व रम्य ॥ ४९ ॥
बळी दीन अंधार आणि प्रकाश । सुखें आणि दुःखें जिवां जन्म नाश ॥
खरे मित्र वैरी कडू आणि गोड । प्रभूनें कशी निर्मिली सर्व जोड ॥ ५० ॥
प्रभावें हिच्या विश्व हें सर्व चाले । हिच्यावांचुनी पान तेंही न हाले ॥
जरी द्वंद्व मोडूनि झालें समान । तरी विश्व गेलेंच अस्तास मान ॥ ५१ ॥
"**तुफानें समुद्रा प्रति क्षोभ येतां**"। "**बुडे नाव घेवोनि लोकां समस्तां ॥**"
"**असे दोष त्यांच्याकडे सांग कांहीं**"।"**ह्मणावीच कां निर्मित्याची दया हो**"

दिसे दर्शनीं प्रश्न हा फार मोठा । विचारें परी पाहतां तोहि खोटा ॥
नसे थांग वा मानवाच्या कृतीचा । कसा सांगवे ईश्वराच्या मतीचा ॥ ५३ ॥
असंख्यात नौका पहा त्याच काळीं । समुद्रामधें मारिती कीं खुशाली ॥
परी एकटी मात्र जाते तळाला । असें होतसे शोध कां तें मुळाला ॥ ५४ ॥
शिडें फाटती तूटती जीर्ण दोर । फळ्या फूटती लाट येऊनि थोर ॥
तिला हेतु कांहीं तरी वा घडेल । अपोआप ती सांग कैशी बुडेल ॥ ५५ ॥
जुन्याशा फळ्यांनीं ढिला होयु मोळा । तयाचा टिका ईश्वराच्या कपाळा ॥
भला न्याय हा काढला फार ठीक । तुझें नास्तिका चित्त मोठें सुपीक ॥ ५६ ॥
बरें ईश्वरानेंच केला अपाय । असें मानितां वांकडें त्यांत काय ॥
दिसे लौकिकीं गोष्ट जी खेदकारी । पुढें तीच होते महा सौख्यकारी ॥ ५७ ॥
झिजावी तनू हाल व्हावे जिवाचे । न बोलों शके शब्दही एक वाचे ॥
सहावे मनीं पुत्रशोकादि कष्ट । असा मृत्यु त्याच्याहुनी फार इष्ट ॥ ५८ ॥
नसे रोग ना यातनाही प्रचंड । क्षणार्धामध्यें होतसे सर्व थंड ॥
असा मृत्यु मागून ही येत नाहीं । चिरंजीव कां वांचल्या चेतना ही ॥ ५९ ॥
जना जाळणें अग्निचें काम आहे । परी तो कधीं सांग कोणास बाहे ॥
चुकोनी बळें जाय जो त्याजपाशीं । स्वभावें करी शीघ्र तो दग्ध त्याशी ॥ ६० ॥
नसे त्यास कावा नसे त्यास दावा । तयाचाच तो दोष कां हो वदावा ॥
धरी दक्षता तो कशानें जळेल । जयाची चुकी त्याजला ती फळेल ॥ ६१ ॥
असे आणखी न्याय ही त्यांत एक । तुला सांगतों तोहि तूं नीट ऐक ॥
प्रभूची महा क्रूरता ही नसेल । पुढें चांगला इष्ट हेतू असेल ॥ ६२ ॥
गुळाचा खडा देउनीयां मुलाला । हिरावूनि घे हातिंच्या सोमलाला ॥
अशी माय ती क्रूर कां हो ह्मणावी । कशी निष्ठुरांमाजि तीतें गणावी ॥ ६३ ॥
मुलाला जडे प्रीति त्या सोमलाची । नसे कल्पना अल्प त्याच्या फलाची ॥
मुलाच्या मतें क्रूर ती माय खास । 'खरें रे' ह्मणे शाहणा कोण त्यास ॥ ६४ ॥
तुझा प्रश्न येईल कीं "काय हेतू" । "पुढें ईश्वरें योजिला सांग हें तूं" ॥
अती दूरदृष्टी जगाच्या पित्याची । अह्मी नेणतीं लेंकरें सर्व त्याचीं ॥ ६५ ॥
जगामाजि कार्यें तशीं कारणें हीं । तयांचा तुला का मला अंत नाहीं ॥
कळेना अम्हां पामरां हेतु सांग । ह्मणोनी प्रभू जाहला काय मांग ॥ ६६ ॥
युरोपामधें औषधी एक शाला । असे बांधिली शास्त्रयुक्ता विशाला ॥
तिथे होतसे घातकी नीच काम । कसें सांगु तें हाय रे राम राम ! ॥ ६७ ॥

पिलें आणुनी कोवळीं सूकराचीं । अहा धन्य रे धन्य त्यांच्या करांची ॥
तयांचे अहा जीव घेती भरारा । सुऱ्यानें गळे कापिती कीं चराारा ॥ ६८ ॥
महा पाप तें पाहतां ऊर फाटे । शरीरावरी ऊठती थोर कांटे ॥
वृथा मारिती दुष्ट चांडाळ लोक । ह्मणोनी करी नेणता फार शोक ॥ ६९ ॥
तशानें परी साधिती वैद्य काम । महा औषधी 'पेपसाईन' नाम ॥
सुखें संग्रहीं लोक घेती सदा ती । असे अग्निमांद्यास ती प्राणदाती ॥ ७० ॥
पिलें शेंकडों घातलीं सूकरांचीं । तरीही सरी येइना ह्या नराची ॥
जनीं मानिती मानवी जीव थोर । तयाकारणें कर्म होतें कठोर ॥ ७१ ॥
भलें कीं बुरें कर्म तें गोष्ट राहो । उगा दाखला ऐकला तो दिला हो ॥
प्रभूचा असा हेतु कांहीं असेल । कुणा सांगवे निश्चयें कीं नसेल ॥ ७२ ॥
दहा रक्षण्या एकट्यानें मरावें । दहा देउनी दोनशें उद्धरावे ॥
तसा मानवार्थें पशूचाहि वेंच । असा न्याय लोकामधेंही असेच ॥ ७३ ॥
सवाई दिढी वाढ आहे जनाला । अशानें मिळे का पुढें भोजनाला ॥
जरी सोडलें मृत्युनें नांव गांव । बसाया पुढें कोण देईल ठाव ॥ ७४ ॥
**"प्रभूचीं"** नसे **"दुष्ट नीचास फूस"** । गुरूक्तीविणें मूर्ख खाती अफूस ॥
प्रभूनें जगीं निर्मिले गोड ऊस । अहा थोडके काय आंबे हपूस ॥ ७५ ॥
**"अशक्तां बरासा न निर्वाह लोकीं"** । महातत्व हें कोण सांगे तुला कीं ।
फुका नास्तिका काय जाशी भुलून । शरीरें पहा दोनिही तूं तुलून ॥ ७६ ॥
मनुष्यास या पाहिजे काय पोटा । फिरावीं घरें कीं भरे सर्व लोटा ॥
भिकारी कसीं सांठवी गुप्त 'नोटा' । हरीच्या घरीं सांग कोणास तोटा ॥ ७७ ॥
न विद्या न शस्त्रें खगाला मृगाला । न कामें न धामें शृगाला नगाला ॥
जरी अल्प सांठा नसे त्याजपाशीं । तरी सांग रे कोण मेले उपाशीं ॥ ७८ ॥
नसे खावया बैसलों मी अडून । किती सांगती तूज ऐसें रडून ॥
किती त्यामध्यें ढोंग येतें कळून । प्रतिशेस जातील सारे पळून ॥ ७९ ॥
गरीबास आरोग्य ही कीर्ति गाजे । पशूपक्षि रानांतही सर्व ताजे ॥
पुरावा मला हाच कीं फार मोठा । तुझा भव्य सिद्धांत अर्थात खोटा ॥८०॥
क्रिमीकीटकाला मृगाला खगाला । प्रभू पोशितो नित्य साऱ्या जगाला ॥
क्षुधेनें अम्हां माणसां ठार मारी । कदर्यु प्रभू सांग का तो भिकारी ॥ ८१ ॥
**"दुकाळामधें मारितो तोच रंका"** । अशी निश्चयें तूज येईल शंका ॥
भुकेनेंच मेलीं अशीं फार थोडीं । असे त्यांत निष्काळजी नित्य जोडी ॥ ८२ ॥

**"मुला पोसते माय"** ही गोष्ट सत्य । परी स्नेह देणें प्रभूचेंचि कृत्य ॥
किती बालकें नेउनी आड रानीं । कशीं पाळिलीं हो खगांनीं मृगांनीं ॥ ८३ ॥
स्तनीं दुग्ध नाहीं करी काय माय । रडे लेंकरूं तें करी हाय हाय ॥
दुधावांचुनी भक्ष्य त्यातें पचेना । तयाच्या जिभे अन्य कांहीं रुचेना ॥ ८४ ॥
जरी पाजिलें गाइचें दूध गोड । तरी मूल तें फार होईल रोड ॥
जगाया मुलां निश्चयें दूध मूल । असे कीं नसे सांग बापा कबूल ॥ ८५ ॥
तुम्ही त्यास कांहीं तरी भक्ष्य द्याल । मुलाचे परी खास होतील हाल ॥
विधीही जरी आळवी वांच वांच । तरी तो दिसे शेवटीं वानवाच ॥ ८६ ॥
प्रभू पाळिता पोशिता अन्नदाता । दयाळू महा थोर त्रैलोक्य माता ॥
महाराज तो केसरी सर्वशक्त । भजावें तया हेंच कीं फार युक्त ॥ ८७ ॥
**"दिसे योजना मानवी सर्व ठाईं"। "खरी ती परी आपुली चातुराई ॥**
तुला नास्तिका लागलें काय खूळ । अफू घेउनी बोलशी हाच गूळ ॥ ८८ ॥
तुला मूल झालें असे तोहि पुत्र । स्वरूपें दिसे रेखिलें जेविं चित्र ॥
बरीं लोचनें रम्य आकार नाका । कला कूसरी त्यांत सारी तुझी का ॥ ८९ ॥
त्वचा मांस नाड्या शिरा दंत अस्ती । तयांमाजि आत्मा करी नित्य वस्ती ॥
असें निर्मिलें चित्र त्याचेंच त्यानें । म्हणे होय रे होय किंवा पित्यानें ॥ ९० ॥
**"असें वा घडे काय जें जें जगीं या । स्वकामीं तया घेतसों योजुनीयां ॥**
**"प्रभूनें अह्मांकारणें एक वस्तु । नसे निर्मिली"** ठीक आहे तथास्तु ॥ ९१ ॥
**"निसर्गे जगीं वायु उत्पन्न झाला । अम्हांकारणें त्यास नाहींच केला ॥**
**"पुका घेति हे श्वासउच्छ्वास लोक"** । तुझ्या भाषणाचा असा सर्व झोंक ॥ ९२ ॥
तरी दाबुनी ठेवि तूं तोंड नाक । मुहूर्तें पहा काय होतो विपाक ॥
अशा गोष्टिला तूंहि आहेस राजी । नको हात काढूं तुला आण माझी ॥ ९३ ॥
गड्या थांबरे थांब तूं अल्पकाळ । पहारे पहा काय होतो निकाल ॥
असे वायु ही एक "मानीव गोष्ट" । तरी होति का नास्तिका तूज कष्ट ॥ ९४ ॥
असो जास्त बोलोनियां अर्थ काय । स्वभावास कोठेंच नाहीं उपाय ॥
दिसेना प्रभू लोचनीं ज्यास धूर । विवादें पळे फार तो दूर दूर ॥ ९५ ॥
प्रकाशास जन्मांध कैसा बघेल । तयाचीं मनीं कल्पना का रिघेल ॥
न पाहों शके सर्वसाक्षी रवीला । ह्मणे रंग काळा जगा सारवीला ॥ ९६ ॥
किती वर्णिले त्यापुढें सर्व रंग । ह्मणोनी तया काय होईल भंग ॥
वृथा सांगतां सांगतां कंठशोष । जळे ज्ञानतंतू तया काय दोष ॥ ९७ ॥

परी तें जगामाजि रे फार थोडें । म्हणोनीच त्यांचें थके नित्य घोडें ॥
विवादीं तया येतसे फार चेव । न ते ऐकती पातल्या ब्रह्मदेव ॥ ९८ ॥
गुरूभक्ति वैराग्य चित्तीं वसेल । तरी तो प्रभु स्वस्वरूपीं दिसेल ॥
खरें ज्ञान ये ईश्वराच्या प्रसादें । मिळेना कधीं ह्या अशा शुष्कवादें ॥ ९९ ॥
कसोंदे मती बोध चित्तीं ठसोंदे । असोंदे तुझा स्नेह शांती वसोंदे ॥
असे **जोडगोळी** तिळाची गुळाची । रुचोंदे पचोंदे तुला **कोकिळाची** १००

---

# इमानी सेवक.

सुशील भार्या, विद्यासंपन्न पुत्र, निर्मत्सर बंधु, अकृतिम स्नेही, हीं पूर्व पुण्याईवांचून प्राप्त व्हावयाचीं नाहींत. तीच गोष्ट इमानी सेवकांसही लागू आहे. सांप्रत सर्वच मन्वंतर फिरल्यामुळें इमानी सेवकांचेंही दुर्भिक्ष आलें आहे. धन्यासाठीं आपला प्राणही खर्चीं घालणारे इमानी सेवक आतां स्वप्नांत सुद्धां दृष्टीस पडण्याची मारामार! ठीकच आहे, चार आण्यांचे पैसे देऊन मंडईत पाठविल्यास तीन आण्यांची भाजी घरीं येण्याची मुष्कील. इतकी जेथें स्वामिभक्ति मोहरली तेथें जिवास जीव देणाऱ्या सेवकांचें बीज राहणार कोठून? परंतु पूर्वीं स्वामिकार्यार्थे प्राण खर्चीं घालणारे एकनिष्ठ सेवक कांहीं थोडे नव्हते. **चाफाजी टिळेकर** हा यःकश्चित् हुजऱ्या होता. पण त्यानें, आपला धनी श्रीमंत **नारायणराव पेशवे** यांस, आपल्या देहाचीं दोन शकलें होईपर्यंत दुष्टांची समशेर लागूं दिली नाहीं! दिल्लीच्या दरबारांतून चौथ व सरदेशमुखीच्या सनदा आणतांना **श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे** यांच्या जीवावर येऊन बेतलें. अशा प्रसंगीं **बाळाजीपंत भानूं**नीं आपला प्राण समर्पण केला, आणि पेशव्यांस वांचविलें! इतिहासच पाहिला, तर अशा गोष्टी आणखीही पुष्कळ आढळतील. त्या ऐकिल्या ह्मणजे सेवाधर्म कसा असावा हें मनांत येतें, आणि तो ज्यानें इमानें इतबारें बजावला, त्याच्याविषयीं अत्यंत पूज्यभाव उत्पन्न होतो. खालीं लिहिलेली गोष्ट एका दूर देशांत घडलेली आहे. तरी ती इतकी हृदयद्रावक आहे कीं, ती ऐकल्यावर कोणाचेंही अंतःकरण सद्गदित झाल्यावांचून राहावयाचें नाहीं.

शिवाय ती गोष्ट एक उत्कृष्ट स्वामिभक्तीचें उदाहरण आहे. ह्मणून तिचा येथें आह्मी समावेश करतों.

हल्लींच्या काळीं 'रशिया' हें नांव ज्यांस माहीत नाहीं, असे मनुष्य विरळाच. एशिया, युरोप हे नकाशे पाहणाऱ्या मुलांस सुद्धां वायव्य दिशेस उत्तरसमुद्रास लागलेला पिवळ्या रंगाचा प्रदेश माहीत असतो. ह्याच प्रदेशाला रशियाचें राज्य किंवा रशिया देश असें ह्मणतात. हा प्रदेश विषुववृत्तापासून फार दूर असल्यामुळें तेथें सूर्याचे किरण फार तिर्कस पडतात. अर्थात् आमच्या देशापेक्षां तेथें थंडी मनस्वी कडक असते. हिवाळ्यांत तर जिकडे तिकडे बर्फ पडून त्यानें जमीन सारी आच्छादून जाते. ह्या देशांतील कितीएक भागांत लोकवस्ती फारच तुरळक असून तेथें अस्वलें, लांडगे, वगैरे हिंसक पशूंचा भारीच उपद्रव असतो. आणि हिंवाळ्यांत जेव्हां त्यांस कांहीं खावयास मिळत नाहीं, तेव्हां तर हे प्राणी फारच अनर्थ करून सोडतात.

कांहीं वर्षांपूर्वी रशियांतील एक श्रीमान् गृहस्थ आपल्या बायकामुलांसहवर्तमान देशपर्यटनास निघाला. एके दिवशीं जातां जातां सूर्यास्ताच्या वेळीं रस्त्यावरच त्यास एक खाणावळ लागली. तेथें उतरून सर्वांनीं फराळबिराळ केला, आणि पुन्हा गाडी जोडली. त्या वेळीं खाणावळवाल्यानें विनंति केली कीं, आपण सर्वांनीं रात्रीच्यारात्र येथें मुक्काम करून सकाळीं पुढें जावें. कारण, आपण जात आहां, त्या मार्गांत पुढें एक मोठें अरण्य आहे; आणि त्यांतून भयंकर लांडग्यांच्या टोळ्या हिंडत असतात. त्या श्रीमान् गृहस्थास पुढें जाण्याची फार निकड असल्यामुळें, त्यानें, त्या विनंतीकडे फारसें लक्ष न देतां पुढें जाण्याचाच निश्चय केला. त्यानें आपल्या गाडीस छानदार चार घोडे जुंपून ते अगदीं भरधांव सोडले.

गाडीच्या पुढील बाजूस गाडीवान आणि त्याच्याच शेजारीं त्या श्रीमान् गृहस्थाचा एक नोकर बसला होता. ह्या नोकराचा जन्म यजमानाच्याच घराण्यांत झालेला. ह्या नोकरावर यजमानाची मर्जी अगदीं बहाल असे. आणि तोही यजमानावर इतकी प्रीति करी कीं, त्याच्यापेक्षां त्यास स्वतःचा प्राणही अधिक वाटत नसे. ही सर्व मंडळी खाणावळीपासून बरीच मैल लांब गेली. जमिनीवर जिकडे तिकडे बर्फ

पडला असल्यामुळें त्यावरून सुरुसुरु गाडी चालली होती. रात्र बरीच झाली असल्यामुळें जिकडे तिकडे सामसूम होऊन फक्त घोड्यांच्या गळ्यांतील घुंगुर मात्र रुणझुण रुणझुण वाजत होते. इतक्यांत त्यांस एक मोठें घोर अरण्य लागलें. तेथें झाडांची दाटी अगदीं कीर्र असून काळोख तर अगदीं किट्ट पडला होता. तशा स्थितींतून कांहीं वेळ चालत असतां 'रों रों रों रों' असा कांहीं भयंकर शब्द ऐकूं येऊं लागला. हें काय असावें ह्याबद्दल यजमानानें बरोबर अटकळ बांधली. तो तेव्हांच ह्मणाला, कीं ही लांडग्यांच्या टोळीची धांव आली. तेव्हां सर्वांच्या मनास धक्का बसला.

यजमान आपल्या चाकराकडे वळून ह्मणाला, "लांडगे आपल्या मागें आहेत. यांकरितां गाडीवानास गाडी जलद हाक ह्मणून सांग. आणि तूं आपलें पिस्तूल गोळीबार भरून तयार ठेव." गाडी सपाट्यानें निघाली. घोडे तर काय अगदीं तुफान होऊन चौखूर उडूं लागले. इतकें झालें तरी सारें व्यर्थ! कारण, तो भयंकर शब्द त्यांच्या अगदीं जवळ जवळच येत चालला. यजमानानें "तूं भिऊं नकोस. परमेश्वरावर भरंवसा ठेव. तोच सर्वांचा संरक्षण कर्ता आहे" असें सांगून आपल्या पत्नीस संकटसमयीं धीर दिला. त्या बिचारीनें आपलें लेंकरूं पोटाशीं घेतलें, आणि आपल्या भर्त्यास, आपणास, व आपल्या लेंकरांस संकटांतून पार पाडावें ह्मणून ती ईश्वराचा धांवा करीत गाडीच्या एका कोंपऱ्यांत बसली.

सरशेवटीं ती लांडग्यांच्या टोळीची धांव इतकी नजीक येऊन ठेपली, कीं त्यांच्या त्या तोंडांतील भयंकर लळलळीत जिव्हा आणि भयप्रद डोळ्यांची पाचेसारखी चमक त्यांस स्पष्ट दिसूं लागली. तेव्हां यजमान आपल्या त्या विश्वासू नोकरास ह्मणाला "तूं एकावर शिस्त धर आणि पिस्तुल झाड; मी दुसऱ्यावर गोळी घालून दुसरा पाडतों. ते दोन, त्यांचे खाऊन होईपर्यंत आपण बरेच पुढें जाऊं." दोहोंकडून दोघांनीं दोन बार झाडले, आणि अघाडीस आलेले दोन लांडगे ठार करून त्या बर्फावर पाडले. लांडग्यांची जात पहिल्या प्रतीची खादाड! आणि त्यांची क्षुधा ही भारी प्रखर. त्यांच्या सपाट्यास कांहींही मिळो, त्याचा ते फडशा पाडतात! ही टोळी ह्मणजे भक्ष्यासाठीं अगदीं वखवखलेली

होती. पुढील लांडग्यांचीं दोन प्रेतें पडतांच टोळधाडीप्रमाणें बाकीचे लांडगे त्यांच्यावर तुटून पडले, आणि एका क्षणांत त्यांनीं त्या आपल्या दोन स्वजातीयांचा फन्ना उडविला! इतकें होईपर्यंत गाडी बरीच दूर गेली. परंतु त्या हिंस्रपशूंच्या जिव्हेस एकदां रक्ताची चटक लागल्यावर मग काय विचारावें? ते अधिक चवताळले. आणि पाठोपाठ धांवून पुन्हा ती गाडी त्यांनीं गांठली. त्या स्वामिसेवकानें पुन्हा दोन बार झाडले, आणि पुन्हा त्यांचींच दोन प्रेतें त्यांस खावयास दिलीं! त्यांचाही त्यांनीं लौकरच चट्टामट्टा करून पुन्हा गाडी गांठली. गाडी अगदीं भरधांव चालली होती खरी, तरी अद्यापि मुक्काम पुष्कळ दूर होता. तेव्हां यजमान गाडीवानास ह्मणाला "आतां अशानें कांहीं निभत नाहीं. याकरितां गाडीच्या चार घोड्यांपैकीं एक घोंडा सोडून दे. ह्मणजे तो त्यांचा खाऊन होईपर्यंत बराच पल्ला येईल." गाडीवानानें हुकुमावरहुकूम एक घोडा सोडून दिला, आणि गाडी चालू केली. बिचारा घोडा भयानें किंचाळत रानोमाळ पळूं लागला, व हें लांडगेमंडळ त्याच्या मागें लागलें. घोडा तो पळणार किती? त्यांत बर्फ, आणि पळून बेदम झालेला! दोन चार पळांतच त्या राक्षसी प्राण्यांनीं त्यास पकडून त्याच्या अंगाचे लचके लचके तोडून खाल्ले. एक हाड सुद्धां जमिनीवर पडूं दिलें नाहीं. एका घोड्याची चटणीकोशिंबीर करून पुन्हा हा यमदूतांचा तांडा त्या गाडीमागें तयारच! यजमानानें दुसरा घोडा सोडून देण्यास हुकूम केला. त्याही बिचाऱ्याचा पहिल्याप्रमाणेंच स्वाहा करून ही लांडग्यांची पलटण पुन्हा त्या गाडीभोंवतीं घेर धरून 'आ' करून उभी राहिली.

निदानींचा समय पाहून तो इमानी सेवक आपल्या धन्यास ह्मणाला "महाराज, मी अगदीं पांच वर्षांचा पोर होतों, तेव्हांपासून तुमची चाकरी करीत आहें. माझ्या प्राणावर जितकी माझी ममता आहे, तितकीच तुह्मांवर आहे. आतां ह्या संकटांतून तुह्मांस पार पाडण्याला एकच उपाय उरला आहे. तो करण्यास मला आज्ञा असावी. फक्त माझ्या पश्चात् माझ्या अनाथ बायकामुलांवर आपण कृपादृष्टि ठेवावी, इतकीच आपल्या चरणांपाशीं शेवटची विनंति आहे." इतकें बोलून यजमानाचा प्रतिबंध होण्यापूर्वींच रक्तमांसासाठीं आस काढीत बसलेल्या लांडग्यांच्या

समुदायामध्यें त्यानें एकदम उडी घातली ! गाडीस राहिलेले दोन जवान् घोडे जीवाची पर्वा न करितां वाऱ्याप्रमाणें दौडत होते. त्यांनीं पुन्हा त्या काळपशूंची धाड येण्यापूर्वींच मुक्कामाचें गांव गांठलें, त्या योगें त्या श्रीमान् गृहस्थाचें कुटुंब संकटांतून मुक्त झालें.

येवढा आपल्या जिवास जीव देणारा जिवलग व इमानी नोकर गेल्यामुळें त्या यजमानास त्या रात्रभर कांहीं झोंप आली नाहीं. खरेंच आहे. जिवापेक्षां प्रिय पदार्थ मनुष्यास दुसरा कांहीं नाहीं. "मी तुमचा जिवश्च कंठश्च" असें तोंडानें ह्मणणारे पुष्कळ आढळतील. परंतु खरोखर प्राणांवर प्रसंग येऊन गुदरला ह्मणजे "मी पुढें होतों" असें ह्मणणारा उदार महात्मा हजारांत—नव्हे लक्षांत—आढळणें कठीण. तेव्हां असा मोहरा काळाच्या तोंडांत गेल्याबद्दल त्याच्या प्रिय धन्यास वाईट वाटावें ह्यांत आश्चर्य तें काय ? तो सकाळींच उठून जेथें आपल्या गाडींतून आपल्या प्राणप्रिय सेवकानें उडी घेतली होती, त्या स्थळीं परत आला. तेथें रक्तानें भरलेली बर्फाची जागा आणि हातांतून गळून पडलेलें पिस्तूल मात्र आढळलें ! त्या एकनिष्ठ सेवकाच्या निर्मल देहाचा एक तुकडाही त्या दुष्ट प्राण्यांनीं राहूं दिला नव्हता. तें स्थान पाहून त्या सहृदय गृहस्थाच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. त्यानें त्याच्या स्मरणार्थ तेथें एक उत्तम थडगें उभारलें, आणि त्याच्या दगडावर "ह्याच्यापेक्षां अधिक स्वामिभक्त सर्व जगांत दुसरा कोणी आढळणार नाहीं; कारण ह्यानें आपल्या धन्यासाठीं आपला स्वतःचा प्राण खर्चीं घातला आहे." अशीं ठळठळीत अक्षरें लिहून ठेवलीं, आणि त्याच्या बायकामुलांस कोणत्याही प्रकारची उणीव न पडूं देतां त्यांचा उत्तम प्रकारें प्रतिपाळ केला. असे इमानी सेवक सांप्रतकाळीं किती आढळतील बरें ?

---

# उल्कापात.

**रोमा कवण पेरी ॥ सिंधू कवण भरी ॥**
**आकाशींच्या करी ॥ तारा कवण ॥**

ज्ञानेश्वरी—

निरभ्र रात्रीं आकाशाकडे पहात राहिलें, तर कधीं कधीं झरकर ए-

खादा तारा तुटून खालीं पडला असें वाटतें. व त्यांपैकीं कांहीं शुक्राप्रमाणें तेजस्वी असून त्यांच्यामागें तेजोमय रेषा दिसते. निमिषमात्रांत तो तारा आणि त्याची ती तेजोमय रेषा दिसेनाशी होऊन त्याचा मागमोसही रहात नाहीं. माघमासाच्या सुमारास तर ताऱ्यांचा पाऊसच पडत आहे असें वाटतें. आपण उघड्या जमिनीवर उभें असलों तर आपल्या आसपास अगदीं चार चार हातांवर येऊन तारे पडत आहेत असें वाटतें. हे जे लहान तेजस्वी तारे वातावरणांतून त्वरेनें खालीं पडलेले दिसतात, व ज्यांच्यां पाठीमागें प्रकाशाची रेषा असून क्षणांत अदृश्य होतात, त्यांस उल्का किंवा तुटून पडणारे तारे असें ह्मणतात. ह्यांपैकीं कितीएक तारे तुटून पडतांना चंद्राप्रमाणें प्रकाश पडल्याचे इतिहासांत दाखले आहेत ! प्रसंगोपात्त एखादा तारा मध्येंच फुटून त्याच्या हजारों ठिणग्या आकाशांत पसरून अदृश्य झाल्याचेंही दिसून येतें.

हे उल्कापात प्रत्येक निरभ्र रात्रीं थोड्या बहुत प्रमाणानें तरी दिसतातच, पण त्यांतून आगष्टच्या दहाव्या तारखेस आणि नोवेंबरच्या तेराव्या तारखेस तर ते मनस्वी दिसून येतात. तसेंच प्रत्येक सव्वा तेहतीस वर्षांनीं उल्कापाताची अतिवृष्टि होते. इ० स० १७९९ त उल्कापातांची अशीच एक अतिवृष्टि झाली होती. त्यानंतर सव्वातेहतीस वर्षांनीं ह्मणजे इ० स० १८३३ मध्यें पुन्हा अमेरिकेंत झाली. तेथील एका शेतकऱ्यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, "त्या रात्रीं माझा एक शिद्दी चाकर शेतांत निजला होता, तो ती अपूर्व तारकावृष्टि पाहून इतका घाबरला, कीं त्यानें एक भयंकर किंकाळी फोडून मला उठविलें, आणि ह्मटलें 'अहो ! उठा उठा ! साऱ्या पृथ्वीला आग लागली.' मीं पाहिलें, तों खरोखरच उल्कांनीं सारें आकाश फुलून गेलें होतें. आणि पर्जन्याच्या थेंबाप्रमाणें पृथ्वीवर उल्कापातांचा सडा चालला होता." लंदनमध्यें इ० स० १८६६ त अशीच उल्कापातांची अतिवृष्टि झाली होती.

ह्या उल्कापाताविषयीं प्राचीनकालचे लोक निरनिराळ्या कल्पना करीत असत. अज्ञ लोकांस हें कांहीं अरिष्टसूचक दुश्चिन्ह आहे असें वाटे. मुसलमानांच्या कुराणांत, दुष्ट जीव, दूतांच्या जवळ जवळ गेले ह्मणजे ते

[1] इ० स० १९०० च्या सुमारास पुन्हा होणार आहे.

त्यांजवर अग्न्यस्त्रें सोडतात, ते हे उल्कापात होत. असें लिहिलें आहे. यूरोपांतील विद्वान् लोक सुद्धां उल्कापाताविषयीं कित्येक वर्षेपर्यंत संशयांतच होते. कित्येकांचें असें मत होतें कीं, उल्कापात हा एक विजेचाच अंश असावा. परंतु आलीकडच्या शोधक लोकांनीं खस्थ पदार्थांविषयीं नानाप्रकारचे वेध घेऊन जी प्रमाणसिद्ध माहिती प्रसिद्ध केली आहे, ती खालीं देतों.

ह्या ब्रह्मांडाचा आपणांस अंत नाहीं. तें अनंत आहे. रात्रौ निरभ्र आकाशामध्यें आपल्या डोळ्यांस जे अनंत तारे दृष्टीस पडतात, ते आपल्या पृथ्वीप्रमाणेंच जड पदार्थांचे मोठमोठाले गोल आहेत. आपल्या नेत्रांस जेवढे दिसतात तेवढ्यांचीच संख्या कोट्यनुकोटि आहे. ह्याशिवाय, अति दूरत्वामुळें व अप्रकाशामुळें आपल्या डोळ्यांस मुळींच दिसत नाहींत, असे गोल किती असतील तें एक परमेश्वरासच माहीत! आपल्या भूलोकावर कोटिशः जीव व वनस्पति आज विद्यमान आहेत; कोटिशः पूर्वकालीं होऊन त्यांचा मागमोस नाहींसा झाला आहे; व कोटिशः जन्मास येऊन त्यांचें अस्तित्व व्हावयाचें आहे. ब्रह्मांडाच्या व गोलाच्या संबंधानेंही तसाच प्रकार आहे. जे आपल्या नजरेस आकाशामध्यें तेजोमय गोल ( तारे ) दृष्टीस पडतात ते व जे अस्तित्वांत असून आपणांस दिसत नाहींत ते सांप्रत विद्यमान स्थितींत आहेत. पूर्वीं अस्तित्वांत असून कांहीं काल विश्रांत राहून आतां ज्यांचा मागमोसही राहिला नाहीं असेही अनंत आहेत. व जे मागें कधींही नव्हते, आजही नाहींत असेही अनंत गोल पुढें जन्मास येऊन लयास जाणार आहेत. त्याची कल्पना आह्मां पामरांस होणार कशी? ह्मणजे एकंदरींत पृथ्वीवर जशी जीवांची घडामोड चाललेली असते, तशीच वरती जड गोलांची चालू असते.

अशा प्रकारें हे हजारों गोल आकाशांत ( निराधार ) राहत असतां ते एकमेकांवर आपटत नाहींत कसे? ह्याचें कारण इतकेंच, कीं त्यांच्या अंगीं आकर्षणशक्ति व गति आहे. त्या त्यांस एकमेकांवर आपटूं न देतां, नियमित गतींत राखून ठेवतात. ही परमेश्वरी योजना मनांत आली ह्मणजे प्रेमाच्या उमाळ्यानें कंठ भरून येतो!

ह्या आकाशांतील प्रत्येक गोलास ग्रह अशी संज्ञा आहे. पृथ्वीव-

रील जीवांप्रमाणेंच आकाशांत नवे नवे ग्रह उत्पन्न व्हावेत, आणि कालांतरानें त्यांचा लय व्हावा अशी ही विश्वाची राहाटी आहे! कित्येक ग्रहांचे कालांतरानें कांहीं लहानमोठे तुकडे होऊन तेही आपल्या गतीनें कक्षेमध्यें फिरत आहेत[1]. कित्येक ग्रह जीर्ण होऊन त्यांच्या देहाचे तुकडे तुकडे होऊन गेले आहेत. आणि ते पाषाणपुंज आकाशांत ठिकठिकाणीं आपल्या कक्षेंत फिरत राहिले आहेत. अशा स्थितींत ते किती काल असावेत, याचाही पत्ता नाहीं! पृथ्वी आपल्या अमर्याद कक्षेंतून सूर्याभोंवतीं फिरत असतां, ती जेव्हां पाषाणपुंजांच्या अगदीं नजीक जाते, तेव्हां तिच्या आकर्षणाचा परिणाम त्या पुंजांतील पाषाणांवर घडून कितीएक पाषाण पृथ्वीवर येऊन आदळतात. तेच उल्कापात होत.

आतां उल्कापात हे जर अशा प्रकारचे वरून येणारे दगड असतील तर ते तेजस्वी दिसण्याचें कारण काय? उल्कापात एका क्षणांत हजारों झालेले डोळ्यांस दिसून येतात, मग पृथ्वीवर तितक्या दगडांचा पेर झालेला कां दिसत नाहीं? उल्कापातांइतकी पृथ्वीवर जर पाषाणांची वृष्टि होईल, तर एकही प्राणी जिवंत राहणार नाहीं, आणि मोठा अनर्थ होईल. इत्यादि शंकांचें समाधान कसें, त्याचा आतां विचार करूं.

पूर्वीं सांगितलेल्या आकाशांतील ठिकठिकाणच्या पाषाणपुंजांजवळून पृथ्वी जाऊं लागली ह्मणजे त्या पुंजांतील पाषाणांवर पृथ्वीच्या अंगच्या आकर्षण शक्तीचा परिणाम घडतो, आणि ते पृथ्वीकडे ओढले जाऊन ते मोठ्या वेगानें पृथ्वीवर येऊन आदळतात. पृथ्वीच्या भोंवतीं वाय्वावरण आहे, तें पृथ्वीच्या अंगाशीं घनदाट आहे. आणि वर वर तें अगदीं विरल होत गेलें आहे. ह्या वाय्वावरणाची उंची पृथ्वीच्या पृष्ठभागापासून सुमारें ४९ मैल आहे. पृथ्वीचा गोल बराच मोठा असल्यामुळें त्याच्या आकर्षणाची व्याप्ति त्याच्याही पेक्षां अधिक आहे.

आकाशांतील पाषाण पृथ्वीच्या आकर्षणाच्या योगानें पृथ्वीकडे येऊं लागले ह्मणजे ते प्रथमतः अत्यंत वेगानें येऊं लागतात. कारण उल्कांचा आकार पृथ्वीपेक्षां फारच लहान असतो. व वाय्वावरणापर्यंत

---

१ वेस्ता, जूनो, प्यालास, आणि सीरिज् हे चार लघु ग्रह पूर्वींच्या एका ग्रहाचे फुटून तुकडे झालेले आहेत, असें ज्योतिषशास्त्रवेत्त्यांचें अनुमान आहे.

ते अगदीं निष्प्रतिबंध गतीनें खालीं उतरतात. त्यांस वातावरणाचें घर्षण घडून ते इतके तप्त होतात, कीं पृथ्वीवर पतन होण्यापूर्वीच त्यांच्या सर्व द्रव्यांची वाफ होऊन मधच्यामध्येंच त्यांचा लय होऊन जातो. प्रसंगोपात्त एखादी उल्का पृथ्वीवरही येऊन पडते..

एखादी कवडी किंवा गजगा घेऊन तो एकाद्या दगडावर खूप जोरानें घांसला, तर उष्णता उत्पन्न होते, ही गोष्ट सर्वांस माहीतच आहे. परंतु केवळ वातावरणाच्या घर्षणानें उष्णता कशी उत्पन्न होते ह्याबद्दल शंका येईल. त्यास बंदुकीच्या गोळीचें उदाहरण पुरे. बंदुकींत गोळी घालतांना अगदीं थंड असते व उडविल्यावर लागलेंच जाऊन पाहिलें तर तीस हातांत घेववत नाहीं, इतकी ती तप्त झालेली असते. दारूनें उष्णता होते खरी, पण त्यामुळें कांहीं गोळी तापत नाहीं. दारूच्या व गोळीच्या मध्यें बराच मोठा कागदाचा गोळा घातला असला, तरी सुद्धां तापतेच ! ह्यावरून पेटलेल्या दारूचा, तिच्याशीं कांहीं संबंध असत नाहीं, हें उघड आहे. दारूच्या जोरानें बंदुकींतून गोळी बाहेर पडतांना, बंदुकीच्या नळीच्या आंतील भागाचें, व जातांना हवेचें घर्षण झाल्यानें, व ती ज्यावर जाते त्या पदार्थाच्या आघातानें, त्या गोळीच्या अंगीं उष्णता उत्पन्न होते. त्याचप्रमाणें उल्कांच्या अंगींही वातावरणाच्या आघातानें व घर्षणानें उष्णता उत्पन्न होते, ह्यांतही कांहीं आश्चर्य नाहीं. शिवाय, गोळीपेक्षां उल्कांचा वेग शेंकडों पटीनें जास्त असतो, हेंही लक्षांत आणलें पाहिजे.

उल्कांचें महत्त्व व तेज, निरनिराळें असतें. कित्येक उल्का इतक्या लहान असतात कीं, त्या आपल्या मुठींत सहज राहतील. त्यांचें वजन फार तर पांच तोळ्यांच्या जवळ जवळ असतें, पण इतक्या क्षुद्र उल्का असतात त्या डोळ्यांस दिसतसुद्धां नाहींत. कित्येक उल्का शुक्राप्रमाणें तेजस्वी असून त्या कांहीं सेकंदपर्यंत डोळ्यांस दिसतात. उल्कांचे पृथ्वीवर पडलेले जे दगड त्यांस प्राचीनकालापासून आपल्या हिकडे ‘दिव्य पाषाण’ असें ह्मणण्याची चाल आहे. दिव्य पाषाण हे साधारणपणें दगडाप्रमाणेंच दिसतात, तरी रोजच्या पाहण्यांतील दगडांत व त्यांत पुष्कळ फरक आहे. दिव्य पाषाणांच्या घटकावयवांत मुख्यत्वेंकरून लोखंड, **सोडियम**, व **कार्बान** हीं द्रव्यें असतात. उल्कांचा

रंग फारकरून पांढरा असतो. तरी कधीं कधीं पिंवळा, नारिंगी, व हिरवा असाही पाहण्यांत आलेला आहे.

अंतरिक्षामध्यें उल्का असंख्य असून त्या अचिंत्य वेगानें सूर्याभोंवतीं फिरत असतात. सांप्रत आगगाडीचा वेग आपणांस फार मोठा वाटतो, पण त्याची उल्कांच्या वेगाशीं तुलना केली, तर जमीनअस्मानाचें अंतर दिसून येईल. थोड्याशा कल्पनेसाठीं एक उदाहरण घेऊं, कीं एक आगगाडी व एक उल्का अशा दोन्हीं मुंबईहून पुण्यास जाण्यासाठीं आपआपल्या वेगानें बरोबर निघाल्या. तर आगगाडी मुंबईच्या स्टेशनाबाहेर पडण्यापूर्वींच उल्का पुण्यास जाऊन परत येईल! साधारण मानानें उल्कांचा वेग तोफेंतून सुटलेल्या गोळ्याच्या सहस्रपटीनें अधिक असावा असें अनुमान काढलें आहे! तरी पण हा वेग सतत सारखाच असतो असा नियम नाहीं. कधीं कमी व कधीं जास्तीही असतो. कनिष्ठ मानानें विद्वान् लोक उल्कांची गति २४ तासांत १०००००० मैल धरतात. असा हा उल्कांचा पतनक्रम आज अनंतकालापासून सुयंत्र चालत आला आहे, व पुढेंही चालणार.

गतिमान पदार्थांच्या आघातानें व घर्षणानें उत्पन्न होणारी उष्णता, त्या पदार्थांच्या कमजास्त वेगावर अवलंबून असते. उष्णता वेगाच्या वर्गानें वाढते. समजा, कीं एकाच ठिकाणाहून एकाचे टप्प्यावर दोन बंदुकींतून दोन गोळ्या सोडल्या आहेत. दोनही गोळ्यांचें आकारमान सारखेंच ठेवलें, मात्र एकींतील गोळीच्या दुप्पट वेग दुसरींत येईल, अशा बेतानें दुसरींत दारू भरली. तर कमी वेगानें जाणाऱ्या गोळीच्या अंगीं जी उष्णता उत्पन्न होते, तिच्या चौपट उष्णता पहिलीच्या दुप्पट वेगानें जाणाऱ्या गोळीच्या अंगीं उत्पन्न होईल. व ह्याच रीतीनें तिप्पट वेगानें जाणाऱ्या गोळीच्या अंगीं पहिलीच्या नऊ पट उष्णता उत्पन्न होईल.

आतां उल्कांच्या अंगीं दर सेकंदांत दहापासून वीस मैल जाण्याचा वेग असल्यामुळें, त्यांच्या आघातानें केवढी अद्भुत उष्णता उत्पन्न होईल ह्याची कल्पनाच केली पाहिजे. उल्का, वातावरणांत शिरतांच तेथें उत्पन्न झालेल्या अत्यंत तीव्र उष्णतेनें निमिषमात्र चमकून, दिसतात न दिसतात तोंच, त्यांत असणाऱ्या सर्व द्रव्यांचा रस होऊन लागलीच

त्यांची वाफ होऊन ती अदृश्य होते. कधीं कधीं त्यांची वाफ न होतां त्या संतप्तच पृथ्वीवर पडलेल्या पाहण्यांत येतात.

अशा प्रकारें प्रसंगोपात्त आकाशांतून पडलेले उल्कांचे दगड, ह्मणजे दिव्य पाषाण ठिकठिकाणांहून महत्प्रयासानें जमवून आणून ते **लंडनं**-सारख्या यूरोपांतील कित्येक पदार्थसंग्रहालयांत फार साक्षेपानें ठेवले आहेत. हिंदुस्थानांतील कित्येक देवालयांमधील देवता दिव्य पाषाणांच्या आहेत. **जहांगीर** बादशहांच्या तरवारीची मूठ दिव्य पाषाणाची केलेली होती. **विजापूरच्या गोलघुमट** नामक मशिदींत सांप्रतही उंचावर टांगलेला एक दगड आहे, त्यास ' बिजलीका फत्तर ' असें ह्मणतात. तोही दिव्य पाषाणच आहे. **सातार** जिल्ह्यांत **वांईं**नजीक **कालंबी** ह्मणून एक गांव आहे. तेथें ता० ४ नोवेंबर सन १८७९ इ० रोजीं सकाळीं नऊ वाजतां अगदीं निरभ्र आकाशांत तोफेसारखा मोठा गडगडाट होऊन उल्कापात झाला. ह्या समयीं आकाशांतून एक पक्के पांच शेर वजनाचा दिव्य पाषाण पडला. तो सातारचे कलेक्टर यांनीं मुंबईच्या **रॉयल एशिआटिक सोसायटी**कडे पाठवून दिला.*

उल्का वातावरणांत जळून वाफ झाल्यावर तिचे परमाणु पृथ्वीच्या आकर्षणानें खालीं येऊन सर्वत्र पसरतात, व आपणांस धुळीच्या रूपानें दिसतात. खिडकींतून सूर्याचे किरण आंत आले असतां, त्यांत फिरणाऱ्या ज्या अणुरेणु ते निःसंशय उल्कांचेच कण होत, असें एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे. किरणांतील अणुरेणु पृथ्वीवरच्याच धुळीनें झाले आहेत, अशी मनाची समजूत असली ह्मणजे, त्याचें मनास विशेष महत्त्व वाटत नाहीं. परंतु त्यांतील पुष्कळ रजःकण खस्थ पदार्थांपासून उत्पन्न होऊन अगम्य ठिकाणांहून व परलोकांहून—दुसऱ्या गोलांवरून—आले आहेत असें समजलें ह्मणजे केवढें आश्चर्य वाटतें ?

अंधाऱ्या रात्रीं केव्हांही निरभ्र आकाशाकडे पाहिलें तर, एका मनुष्यास एका तासांत पांचपासून आठपर्यंत उल्का पडलेल्या दिसाव्यात असें अनुमान आहे. अनेक मनुष्यांनीं एकाच ठिकाणावर निरनिराळीं

---

* ह्या दिव्य पाषाणाची सविस्तर हकीगत वि. ज्ञा. वि. पु. ११ अं. ११।१२ ह्यांत दिली आहे. ती ज्यांच्या अवलोकनांत नसेल त्यांनीं अवश्य पहावी.

तोंडें फिरवून सर्व आकाशाकडे नीट नजर ठेवली तर, एका तासांत तीस उल्कापात झालेले दिसतात असें अनुमान केलेलें आहे. ह्या प्रमाणांवरून हिशोब केला तर एका दिवसांत ७२० उल्का पतन होतात असें होतें. ही फक्त एका ठिकाणची गोष्ट झाली. सर्व जगासंबंधानें विचार केला तर, प्रत्येक दिवशीं सुमारें ७० लक्ष उल्कापात होतात असें अनुमान निघतें. दुर्बिणीनें पाहिलें तर ह्याच्या पेक्षां ६० पटीनें अधिक उल्कापात झालेले दिसतात. ह्मणजे एकंदर पृथ्वीवर प्रतिदिवशीं ४० कोटि उल्कांचें पतन होतें! खरोखर इतक्या उल्का जर पृथ्वीवर येऊन आदळल्या तर, केवढा बरें अनर्थापात ओढवला असता? एका दिवसांतच पृथ्वीची राखरांगोळी होऊन गेली असती. परंतु परम दयाळु भगवंतानें वातावरणांत व जडपदार्थांत घर्षणजन्य उष्णतेचा धर्म ठेवून त्या महत्संकटाच्या परिहारार्थ आधींच तरतूद करून ठेवली आहे. तेंव्हां त्याच्या ज्ञानाची थोरवी किती ह्मणून सांगावी? पृथ्वीवरील वातावरणांतील शीतोष्णाचें मान चढविण्याचें, व उतरण्याचें उल्कापातांकडून मोठेंच कार्य घडतें, तें शिवाय होय.

---

# पुस्तकपरीक्षा.

**मुंबईचा व्यापार**—आमच्या देशांतील मूळची व्यापाराची सबद खमाटलेली काय ती वैश्य लोकांनीं. ते बोलून चालून 'हंबळे'. त्यांना टापटीप नाहीं; स्वच्छता नाहीं; वेळाची किंमत नाहीं. आणि आपल्या रीतींत कांहीं सोयिस्कर फेरबदल करावा हें स्वप्नांत सुद्धां त्यांच्या मनांत यावयाचें नाहीं! बांधीव पुस्तकें कितीही सुयंत्र झालीं तरी त्यांची ती दीर्घ पानें उलटून टाकण्याची, व दुमट सांध्यांत लिहितांना मारामार पडण्याची लिबचिक वही कांहीं सुटावयाची नाहीं! छापखान्याचा आणि त्यांचा तर बारावा बृहस्पति! जाहिराती, नोटिशी, व्यापारी माहीती हीं छापून प्रसिद्ध करण्याची तर त्यांस माहीत नाहींच, पण रोजचे नमुने, जे केवळ रुपया दीड रुपयांत व्यवस्थशीर व सुंदर छापून मिळतात, ते सुद्धां ते छापून घ्यावयाचे नाहींत! त्या क्षुल्लक कामासाठीं दहा वीस रुपयांचा कारकून पाहिजे तर आठ दिवस रखडेल! ह्यांचे मेथें ह्मणजे सांखळीवांचून बांधलेले कैदी! त्यांना रविवार नाहीं, सोमवार नाहीं, सण नाहीं, वार नाहीं, कांहीं नाहीं. सकाळपासून मध्यरात्रपर्यंत त्यांचा देह, घामोळ्याचे थर चढलेल्या व ढेंकणांनीं गजबरलेल्या गादीतक्यांत स्थापन केलेला असावयाचा. जणूं काय लोह आणि लोहचुंबक! उंटाच्या गुडघ्याचे आणि मेथ्याच्या

पाठीचे घट्टे सारखेच. दिव्यांत बत्ती पडली, कीं ह्यांचा वसूल हातघाईवर याव-याचा. असो. सांगावयाचें तात्पर्य ह्मणून एवढेंच कीं, आमच्या व्यापारी लोकांस टापटिपीचें, वेळाचें, लोकप्रसिद्धीचें, आणि शिस्तवारीचें वळण अवश्य लागलें पाहिजे. ह्मणजे त्यांचाच पुष्कळ फायदा होईल.

श्रीमंत **चेनबसाप्पा मल्लाप्पा वारद** हे प्रसिद्ध व्यापारी सोलापूरचे राहणारे असून त्यांच्या ठिकठिकाणीं पेढ्या आहेत. मुंबईस त्यांची फारच मोठी वखार व पेढी आहे. शिवाय अत्यंत संतोषाची गोष्ट ही कीं, त्यांस वेळाचें मोल कळूं लागल्यामुळें टापटिपीची व्यवस्था सुरेख आहे. ते स्वतः जरी सोलापुरीं राहतात तरी सर्व पेढ्यांचीं सूत्रें त्यांच्या हातांत आहेत, आणि प्रत्येक ठिकाणची व्यवस्था अत्यंत शिस्तवारीनें चालते असे त्यांनीं उत्कृष्ट नियम बांधले आहेत. आणि त्या नियमांप्रमाणें सर्व कामें अगदीं बिनचूक चाललेलीं आहेत. आमच्या कोचींतही ठ० **देवजी भीमजी शेट** हे प्रसिद्ध व्यापारीही आपल्या टापटिपीनें फार प्रसिद्ध आहेत. इंग्रजी, मराठी, मलबारी छापखाने; स्टेशनरीचें मोठें दुकान; इंग्रजी औषधांचें दुकान; मलबारी टाईप ओतण्याची फाउंडरी, इत्यादि कारखाने त्यांचे स्वतःचे असून ते इतके दोरीसूद व व्यवस्थशीर चालतात, कीं त्यांच्या त्या नियामक पद्धतीचें फार आश्चर्य वाटतें. आणि ही इतकी सर्व व्यवस्था ते केवळ एका दूर बंगल्यांत राहून चालवितात! ही पद्धत इतर व्यापाऱ्यांनीं खरोखरच कित्ता घेण्यासारखी आहे.

'मुंबईचा व्यापार' हें पुस्तक श्री० वारद यांच्या आज्ञेवरून रा. **भीमराव सीताराम शालिग्राम** ह्यांनीं तयार केलें आहे. ह्यांत मुंबईच्या व्यापारासंबंधीं यथायावत् माहिती सविस्तर दिली आहे. ह्यामुळें त्या बंदराशीं व्यापार करणाऱ्या व्यापारी लोकांस सदरहू पुस्तक ह्मणजे एक आरसाच झाला आहे. ह्या अशा पुस्तकापासून श्री० वारद ह्यांचें व इतर व्यापाऱ्यांचेंही दळणवळण अधिक वाढेल अशी आह्मांस आशा आहे. हें पुस्तक प्रत्येक व्यापाऱ्यानें आपल्या संग्रहीं ठेवणें अत्यंत अगत्याचें काम आहे हें निराळें सांगण्याची गरजच नाहीं.

बहुतेक व्यापारी माल पाठवितांना लिहिण्यांत फार घोटाळा करितात, त्यामुळें त्यांच्या हेतूप्रमाणें अर्थात् खरेदी होण्यास अनेक अडचणी येतात; त्या न याव्या ह्मणून ह्यांत चांगल्या सूचना आहेत. त्या व्यापाऱ्यांनीं लक्षांत ठेवून तशी पद्धत चालविल्यास उभयपक्षीं श्रेयस्कर होईल. ह्यांत कोणता माल कोठें मिळतो ह्याचा स्थलनिर्देश असता तर बरें झालें असतें.

ह्याच धर्तीवर 'कोचीचा व्यापार' किंवा 'मलबारचा व्यापार' असें पुस्तक प्रसिद्ध होणें फार जरूरीचें काम आहे. कोणाच्या हातून पार पडेल तें खरें.

---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, No. 23 Kolbhat Lane, Kalkadevi Road, BOMBAY.

# केरळकोकिळ.

पु० ७] [अं० ९

## सत्पुरुष आणि सत्कवि
## विठोबा अण्णा दफ्तरदार.



बोधलाभजनरंजनो जनिप्रेमगीतरसिकः कवीश्वरः ॥
ब्रह्मपद्धतिसुतोषभागयं विठ्ठलः स इति को न संवदेत् ॥१॥

—रघुवीर विठ्ठल बेद्रे—

कल्पना करूं या; कीं एका श्रीमान् व हौशी गृहस्थानें सुंदर वस्तूंनीं भरलेलें

---

१ अण्णांचे द्वितीय चिरंजीव परलोकवासी **रघुवीरराव** ऊर्फ **भाऊसाहेब**, हे नेहेमीच्या वडिलांच्या सान्निध्यानें चांगले शास्त्रसंपन्न झाले होते. व त्यांची कवित्वशक्तिही उत्तम होती. तीर्थरूप कै०वासी झाले, तेव्हां त्यांनीं शोकाकुल अंतःकरणानें अनेक कविता करून आपली पितृभक्ति व्यक्त केली. त्यांतील हें एक पद्य होय. ह्यांत त्यांनीं

एक सुरेखसें कलमदान आपल्या मुलास दिलें, तर तें पाहून मुलास किती आनंद होईल बरें? त्या मुलानें त्यांतील सुंदर वस्तूंचें सार्थक केलें, तर बापाच्या हौसेचें चीज झालें ह्मणून समजावयाचें. तसें केल्यानें त्या मुलाच्या बुद्धीला ज्ञानाचा संस्कार घडेल, मनास सुख होईल, जगांत कीर्ति गाजेल, आणि पिता त्यावर सदासर्वकाळ प्रसन्न राहून अधिक अधिकच प्रसाद करील. पण एखाद्या अविचारी मुलानें त्या कलमदानांतील उपयुक्त वस्तूंकडे कधीं ढुंकूनही पाहिलें नाहीं, तर दौतींतील शाई बोळेजून जाईल, लेखण्यांस कीड लागेल, चाकूकात्रीस तांब चढेल, आणि उत्तमोत्तम कित्त्यांस कसर लागून त्यांचें भूस पडेल. ह्मणजे अशानें ती देणगी व्यर्थ होणार. ह्यावरून पदार्थांचा सदुपयोग जाणतो, तो ज्ञानी; त्याप्रमाणें करतो, तो चतुर; आणि त्यांत यशस्वी होतो, तो उत्तम पुरुष होय.

ह्याच दृष्टांत आपल्या नरदेहास उत्कृष्ट रीतीनें लागू पडण्यासारखा आहे. कारण, परमेश्वर सर्वांचा पिता आहे. आह्मी मनुष्यजीव त्याचीं जाणतीं लेंकरें आहोंत; आणि 'नरदेह' हें त्यानें हौशीनें आह्मांस दिलेलें कलमदान आहे. आपलें अंतःकरण हीच त्यांतील स्फटिकाची दौत; आपले हस्तपादादि अवयव ह्याच त्यांतील लेखण्या आणि पेनसली. सत्पुरुषांचीं चरित्रें हेच बालबोध व मोडी कित्ते. शास्त्रमार्ग हा त्यां-

---

द्व्यर्थ साधून पंढरपुरनिवासी **श्रीविठ्ठल,** व आपला पिता **विठ्ठल** ह्यांचें मोठ्या मार्मिकतेनें साम्य वर्णन केलें आहे. भाऊसाहेब ह्मणतातः—

पंढरीचा **विठ्ठल** कसा आहे? **"बोधला-भजन-रंजनः"** बोधलानामक भक्ताच्या भजनानें संतोषित होणारा. पक्षीं, माझा पिता कसा आहे?—**"बोध-लाभ-जन-रंजनः"**—उपदेशाचा लाभ देऊन, जनांस तृप्त करणारा. आणखी तो विठ्ठल कसा आहे?—**"जनि-प्रेमगीत-रसिकः"**—**जनि** ह्या नांवाची जी **नामदेवाची** दासी, तिनें प्रेमयुक्त गायिलेल्या गीतांची आवड धरणारा. पक्षीं, माझा पिता?—**"जनि-प्रेमगीत-रसिकः"**—जनामध्यें प्रेमळगीत गायनाविषयीं निपुण. आणखी तो **विठ्ठल** कसा? **"कवीश्वरः"**—सर्व ज्ञानीजनांमध्यें श्रेष्ठ—म्हणजे सर्वज्ञ. पक्षीं, माझा पिता?—**"कवीश्वरः"**—म्हणजे कवींमध्यें श्रेष्ठ. तो **विठ्ठल**?—**"ब्रह्मपद्धति-सुतोषभाक्-"** ब्रह्मज्ञानपद्धतीनें-मार्गानें तृप्त होणारा. पक्षीं, हा **विठ्ठल?**—**"ब्रह्मपद्धति-सुतोष-भाक्"**—म्हणजे ब्राह्मणधर्मांचा आचार विचार, स्नान संध्या, होम हवन, पूजा अर्चा, नेम धर्म—येणेंकरून संतोषित होणारा असा. तेव्हां—**"अयं-सः-विठ्ठलः-इति-कः-न-संवदेत्—"** ह्या माझ्या पित्यासही गुणसादृश्यावरून **'विठ्ठल'** असें कोण म्हणणार नाहीं? सर्वच म्हणतील असा भाव. **विठोबा अण्णा** सोमयाग, गरुडयाग, इत्यादि महायाज्ञिकांतही अत्यंत निष्णात होते, ती गोष्ट पुढें येईलच. व त्यावरून-**ब्रह्म-पद्धति-सुतोषभाक्**-हे **रघुवीररावजींचे** उद्गार किती सार्थ आहेत ह्याबद्दल वाचकासही साक्ष पटेल.

तील रूळ होय. काम आणि क्रोध हे चाकू कात्रीच्या ठिकाणीं उत्तम शोभतील. असें हें उत्कृष्ट सामानानें परिपूर्ण भरलेलें अमूल्य कलमदान आमच्या पित्यानें कृपा करून आमच्या स्वाधीन केलें आहे. त्याचा जर आह्मीं दुरुपयोग केला, तर आह्मांसारखे ज्ञानशून्य, आह्मांसारखे दुर्दैवी, व आह्मांसारखे कृतघ्न दुसरे कोणीच नाहींत. समर्थांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

**" धन्यधन्य हा नरदेहो। याची अपूर्वता पहा हो**
**जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धीतें "**

—दासबोध—

ह्मणजे आपण जो जो सद्धेतु मनांत धरावा, तो तो सिद्धीस नेण्याचें अगाध सामर्थ्य ह्या नरदेहांतच आहे. परंतु विद्येचें खरें मर्म जाणणारे, गुरूच्या श्रमांचें सार्थक करणारे विद्यार्थी विद्यालयांतून जसे फार थोडे असतात, तसेच नरदेहाचें खरें सार्थक करणारेही फार थोडेच निपजतात. विद्यार्थ्यांपेक्षां तर ते फारच थोडे. ठीकच आहे. ' शैले शैले न माणिक्यं ' ह्याप्रमाणें नररत्नेंही फार विरळा पैदा होतात. व जे कोणी तसे असतात, त्यांसच ' सत्पुरुष ' असें ह्मणतात. त्यांचीं चरित्रें, त्यांचें आचरण, त्यांचा बोध हीं सर्व रमणीय असतात. आणि ह्मणूनच तीं सर्वांस फार प्रिय होतात. आद्यश्रीमज्जगद्गुरु **शंकराचार्य** ह्यांनीं अत्यंत बोधपर **" प्रश्नोत्तररत्नमाला "** ह्या नांवाचें काव्य केलें आहे. व तें **मयूर**पंतांनीं प्राकृतांत आर्यारूपानें वर्णिलें आहे. त्यांत शिष्यानें आचार्यांस असा एक प्रश्न केला आहे कीं:—

**" शारदशशिकिरणासम आल्हादक सांग कोण गुरुवर्या ?"**

ह्यावर आचार्यांनीं उत्तर दिलें:—

**" शिष्या ! ऐसे सज्जन ज्यांची हरिती त्रिताप परिचर्या ॥"**

असें हें लक्षण आमचे आजचे चरित्रनायक कै० **विठोबा अण्णा दफ्तरदार** ह्यांचे ठिकाणीं व्यक्त होतें. ते जसे भगवद्भक्त व विरक्त होते, तसेच ते विद्वान् आणि कवि होते. तेव्हां अशा सत्पुरुषाचें चरित्र ' शारदशशिकिरणासम आल्हादक ' असेल हें कांहीं सांगणें नको. त्याचें वळण प्राकृत जनांस कित्ता व्हावा, ह्मणून आह्मी तें सकलजनमनोल्हादक चरित्र यथामत्या आमच्या वाचकांस सादर करतों.

मोंगलाईत **कलबुर्ग्या**च्या शेजारीं, व लढाईमुळें इतिहासांत प्रसिद्ध असलेलें **खर्डें** ह्याच्या नजीक, **बेदर** ह्या नांवाचें एक गांव आहे. तेथें **अण्णांचे** पूर्वज राहत अ-

१ विविध मानववृत्तींचीं यथातथ्य प्रतिबिंबें उठविणारा आंग्लकवि शेक्सपीयर ह्यानें एके ठिकाणीं ' नरदेहा 'च्या उत्कृष्टत्वाविषयीं मोठे उदात्त उद्गार काढले आहेत. ते असे:—

" What a piece of work is man ! how noble in reason ! how infinite in faculty ! in form and moving how express and admirable ! in action how like an angel ! in apprehension how like a God ! the beauty of the world ! the paragon of animals !"—Hamlet—II.

सत. व ह्या बेदर गांवावरूनच त्यांच्या वंशास **बेदरे** हें उपनाम चालत आहे. **बाळाजीपंत** हे अण्णांचे आजे. हे शांडिल्यगोत्री देशस्थ ब्राह्मण. सुमारें सव्वाशें वर्षांपूर्वीं **बाळाजीपंत** ह्यांनीं आपल्या कर्तवगारीवर पेशव्यांकडून कऱ्हाड पेट्यांत दफ्तरदारीची वंशपरंपरेची सनद मिळविली. त्या वेळीं श्रीमंत **माधवराव** ऊर्फ **रावसाहेब** ह्यांची कारकीर्द चालू होती. **बाळाजीपंतां**स दफ्तरदारीची सनद मिळतांच ते कुटुंबसुद्धां श्रीक्षेत्र **कऱ्हाड** येथें येऊन राहिले. **कऱ्हाड** आधींच क्षेत्राचें स्थान; **कृष्णा** आणि **कोयना** ह्यांचा संगम; ब्राह्मणवस्ती मोठी; देवस्थानेंही अनेक आणि रमणीय; तेव्हां अशा ठिकाणीं **बाळाजीपंत** ह्यांचें चित्त सहज रममाण झालें.

**बाळाजीपंतां**स **महादाजी बल्लाळ,** आणि **त्र्यंबक बल्लाळ** असे दोन पुत्र होते. **बाळाजीपंत** वारल्यानंतर वडिलांची दफ्तरदारीची जागा, सनदेप्रमाणें आपणांस मिळावी ह्मणून, **महादाजीपंतां**नीं पेशवेसरकाराकडे बोलणें लावलें. **नानाफडणीसां**नीं त्यांच्या चांगुलपणाविषयीं खात्री घेऊन, वारसाचा हक्क पाहून, हुशारपणा मनांत आणून, कऱ्हाडच्या सुभेदारास त्यांस दफ्तरदारीच्या कामावर रुजू घेण्याविषयीं हुकूम दिला. त्याप्रमाणें **महादाजीपंत** आपल्या वडिलांच्या नोकरीवर रुजू झाले. त्या वेळीं त्यांचें वय अवघें पंधरा वर्षांचें होतें. तरी त्यांनीं थोडक्याच दिवसांत चांगली लोकप्रियता संपादन केली. त्यांस सर्व लोक तात्या असें ह्मणत. तात्या मोठे सत्त्वस्थ, सुशील, आणि स्नानसंध्याशील ब्राह्मण होते. त्यांच्यावर सुभेदारांचा मोठा लोभ असून त्यांचें लोकांत मोठें वजन असे.

**महादाजीपंतां**स **रामचंद्र** ह्या नांवाचा पुत्र झाला. तो चांगला हुषार होता. चवदा पंधराव्या वर्षींच तो वडीलांबरोबर कामकाज पाहूं लागला होता. परंतु परमेश्वरानें त्यास आयुष्य फार कमी केलें. तो आपल्या पंधराव्या वर्षींच अकस्मात् वारला. आणि तात्यांस पुत्रशोकाचें दुःख सहन करावें लागलें. शिवाय, त्या मुलाच्या पाठीमागें अनेक मुलें झालीं, परंतु एकही जगेना. ह्यामुळें तात्यांच्या मनास फार उदासीनता प्राप्त झाली.

शेवटीं परमेश्वरास करुणा येऊन पौषकृष्ण अमावास्या शके १७३५ ह्या दिवशीं **कऱ्हाड**क्षेत्रांत आमचे चरित्रनायक अवतरले. त्यांचें नांव **विठ्ठल** असें ठेविलें. हें मूल नवनवसांचें असल्यामुळें पुत्रोत्सवही मोठ्या थाटाचा झाला. तात्यांच्या इष्टमित्रांसही फार संतोष झाला; परंतु पुष्कळ मुलें अल्पायुषी झालीं असल्यामुळें ह्या पुत्राविषयीं आईबापांस मोठी काळजी वाटे. त्यांत धडधडीत अमावास्या जन्मस्थानीं ह्मणजे मोठेंच अभद्र ! हीही शंका कालमानाप्रमाणें लोकांच्या मनांत आल्यावांचून राहिली नाहीं ! पण चमत्कार पहा ! त्याच अमावास्येवर जन्मलेल्या **विठ्ठलानें** उत्तम प्रकारें संसार केला; बुद्धिप्रभावानें गुरूस लाजवून सोडलें; कीर्तनांतील रंगदेवतेनें

मुमुक्षुजनांच्या नयनांत प्रेमाश्रु आणले; कवित्वशक्तीनें रसिकजनांस आनंदभरांत झुलावयास लावलें; वक्तृत्वशक्तीनें विद्याविलासीजनांस तृप्त करून धन्यधन्य ह्मणवून घेतलें; याज्ञिकीज्ञानानें काशीवासी पंडितांस तोंडांत बोट घालावयास लावलें; आणि शेवटीं एकनिष्ठभक्तीनें भगवंतास वश करून घेतलें. ह्यावरून तुकोबाचें एक वाक्य आठवतें.—**"तुका ह्मणे हरिच्या दासा, शुभकाळ दाही दिशा."** तेथें अमावास्या नाहीं, आणि व्यतिपात नाहीं ! असो.

देवाच्या दयेनें **विठ्ठल** चालता बोलता होऊन बालक्रीडा करूं लागला. तो आंगापिंडानें चांगला सुदृढ झाला. त्यास खेळावयास घरांतील आंगणही पुरेनासें झालें. वय जसजसें मोठें होतें चाललें, तसतसा त्याचा स्वभाव हूड, वृत्ति अल्लड, स्वच्छंदवर्तन हीं वाढतच चाललीं. सारा दिवस पुंडाई. मुलगा लाडका. त्यानें कांहीं केलें तरी कोणी हूं का चूं ह्मणावयाचें नाहीं. शाळेचें नांव काढलें कीं **विठोबाचें** रडणें, ओरडणें, पाय आपटणें सुरू झालेंच ! 'लहान आहे तोंपर्यंत करतो आहे असें, थोर झाल्यावर चट निवळेल' अशाखालींच दिवस चालले. दहा वर्षें झालीं, तरी **विठोबास** अक्षरसंस्कार नाहीं.

अशा स्थितींत एके दिवशीं दसऱ्याचा सण आला. **विठोबास** नीटनेटका पोषाख घालून तात्या आपल्याबरोबर वाड्यांत घेऊन गेले. त्या वेळीं **बाबाजीराव लिमये** ह्या नांवाचे गृहस्थ सुभेदारीच्या जाग्यावर होते. ते चांगले सज्जन असत. त्यांनीं तात्यांच्या **विठोबास** जवळ घेऊन अनेक प्रश्न विचारले. व त्यांचीं **विठोबानें**-ही चांगलीं समर्पक व ठांसून अशीं उत्तरें दिलीं. तीं ऐकून सर्व कचेरींत लोकांस मोठा आनंद वाटला. होतां होतां सुभेदारसाहेब ह्मणाले, "बरें; **विठोबा**! तूं कोणच्या शाळेंत जातोस ? अभ्यास कोठपर्यंत आला आहे ?" ह्यावर. **विठोबा** काय उत्तर देणार ? हे शब्द ऐकतांच त्याच्या हुशारीचें व तरतरीचें अगदीं पाणी होऊन गेलें. विचारा करतो काय ? वर्मीं सांपडला. त्यानें लज्जेनें मुख खालीं केलें. तात्यांनीं व इतर लोकांनीं सांगितलें कीं, **विठोबास** अद्यापि अक्षरसंस्कार सुद्धां झाला नाहीं. हें ऐकून सुभेदारसाहेबांस फार आश्चर्य वाटलें, व ते **विठोबाकडे** वळून ह्मणाले, "कायरे **विठोबा** ? हे काय सांगतात ? अद्यापि तुला अक्षरसंस्कार नाहीं ? छे छे ! फार वाईट. अशानें तात्यांचें नांव तूं पुढें कसें चालविणार ?" हे वर्मीं शब्द त्या कोमल अंतःकरणाच्या मुलास वज्राप्रमाणें लागले. हुषार हुषार ह्मणवून घेतलेलें यश या एका प्रश्नाबरोबर धुळीस मिळालें, यामुळें **विठोबा** फार खजिल झाला.

प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें **विठोबाही** तात्यांबरोबर सोनें वगैरे वांटून घरीं आला. परंतु उल्हासवृत्ति नाहीं. तो रात्रीं नीट जेवला नाहीं, व आईशींही नीट बोलला नाहीं. अंतःकरणास लागलेला चटका, कांहीं केल्या त्याच्या मनांतून जा-

ईना. सापत्न मातेच्या लत्ताप्रहारानें **ध्रुव**बालकास जशी उपरति झाली, तशी सुभेदारांच्या वाग्बाणानें आमच्या चरित्रनायकासही उपरति झाली. मनुष्य कितीही अपराधी असो. त्यास खरी उपरति झाली, तर तो मोठा भाग्यवान् समजला पाहिजे. मग **विठोबा**सारख्या दहा वर्षांच्या मुलास उपरति झाली, तेव्हां त्याच्या बुद्धीचें, धारणाशक्तीचें, व भाग्याचें काय वर्णन करावें ?

दुसऱ्या दिवशीं **विठोबा** सर्वांच्या आधींच उठून मुखमार्जनादि प्रातर्विधि आटपून तात्यांस ह्मणाला, "तात्या ! मी आज शाळेंत जाणार, आणि लिहावयास शिकणार, व सुभेदारसाहेबांस परीक्षा देऊन शाबासकी घेणार." हें **विठ्ठला**चें निश्चयाचें भाषण ऐकून तात्यांच्या अंतःकरणांत किती बरें प्रेम दाटलें असेल ? आजपर्यंत **विठोबा** ह्मणजे उनाड व व्रात्य मुलगा असा सर्वांचा समज. व तात्यांसही तसेंच वाटे. ह्याची गत पुढें कांहीं नीट दिसत नाहीं, असें समजून ते रात्रंदिवस खिन्न असत. एकच मुलगा, आणि तो हा असा. हीच त्यांस काळजी लागून राहिली होती. परंतु **विठोबा**च्या ह्या एका भाषणानें त्यांच्या मनांतील उदासीनता एका क्षणांत नाहींशी होऊन ते आनंदसागरांत पोहूं लागले. त्या कालीं **विठोबा**च्या मुखश्रीवरच निश्चयाची मूर्ति, सौजन्याची मुद्रा, उपरतीचें तेज, आणि सद्बुद्धीचा ठसा स्पष्ट दिसत होता. मग तात्यांच्या नयनांत प्रेमाश्रु भरले ह्यांत नवल तें कोणतें ?

दफ्तरदारांच्या घराशेजारींच देशपांड्यांच्या वाड्यांत एका थोव्या पंतोजीची गांवठी शाळा होती. त्या थोव्यापंतोजीस तात्यांनीं लागलेंच बोलावून आणून सांगितलें कीं, "हा आमचा **विठोबा** आज शाळेंत जातों ह्मणतो, तरी आपण ह्यास आपल्या शाळेंत घेऊन जावें. आणि सोयीनें शिकेल तेवढेंच सांगावें. मारहाण मुळींच करूं नये. येईल तितकें पुरे. परंतु आंगास छडी लावूं नये." पंतोजीबुवांनीं तात्यांची आज्ञा मान्य केली, आणि ते **विठोबा**स आपल्या शाळेंत घेऊन गेले. तेथें **विठोबा**नें इतका झटून अभ्यास केला कीं, सहा महिन्यांच्या आंत थोव्या गुरुजींचें वारदान रितें पडून त्यांसच उलट **विठोबा**चें शिष्यत्व करण्याचा प्रसंग आला ! **विठोबा**ची बुद्धि मनस्वीच तीक्ष्ण होती. धडा दिला कीं पाठ. दोन वेळ सांगण्याची कधीं गरजच नाहीं. मोडी अक्षर सहा महिन्यांत इतकें सफाईदार बनविलें कीं, सर्व शाळेंत **विठोबा**च्या हातचे कित्ते ! इतकी हुषारी पाहिल्यावर तात्यांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला.

एके दिवशीं तात्यांबरोबर **विठोबा**ही कचेरींत गेले. आणि त्यांनीं सुभेदारसाहेबांस पुस्ती वगैरे काढून दाखविली. तेव्हां ते फार खूष होऊन ह्मणाले, "शाबास ! **विठोबा** तात्यांचा मुलगा खरा. सहा महिन्यांत इतकी तयारी केलीस ना ?" सुभेदारांच्या तोंडचे इतके शब्द ऐकले, तेव्हां त्या मुलाचें समाधान झालें. दफ्तरदा-

रांच्या **विठोबा**सारखी ईर्ष्या जर प्रत्येक मुलांत वागेल, तर आणखी काय पाहिजे बरें ?

ह्याप्रमाणें मुलगा वळणास लागतांच तात्यांनीं **विठोबा**च्या लग्नाचा निश्चय केला. करवीरस्थ महाराजांचे गुरु, **भाऊ महाराज,** ह्यांच्या पदरीं **चिमणाजीपंत** विरमाडकर ह्या नांवाचे गृहस्थ होते, ते सदाशिवगडीं राहत असत. त्यांची कन्या **गयाबाई** वधु नेमस्त केली. व मोठ्या थाटानें लग्नसोहळा शेवटास नेला. **विठोबा**च्या कुटुंबाचें माहेरचें नांव **गयाबाई**च सासरीं चालत असे. लग्नांत **विठोबाचें** वय बारा वर्षांचें होतें. असो.

ह्याप्रमाणें **विठोबा** हळूहळू वयांत येत चालले. तेव्हां आपणही त्यांस यापुढें **विठ्ठलपंत** असें ह्मणूं. **पंत,** लेखनीबहाद्दर झाल्यानंतर त्यांस तालमीचा नाद लागला. **राघोपंत आपटे** ह्मणून त्या वेळीं कऱ्हाडांत एक जवान ब्राह्मण होते, त्यांचा **पंतां**नीं स्नेह संपादन केला. आपटे हा जसा तालिमबाज तसाच पोहणाराही मोठा पटाईत होता. **पंतां**नीं ते दोन्हीही गुण संपादन केले. प्रत्यहीं ही जोडी कृष्णा नदीवर स्नानास जावयाची. एके दिवशीं दोघांच्याही मनांत आलें कीं, नदीच्या तीरीं स्वहस्तें एक मारुतीचें देवालय बांधावें. पण नदीच्या तीरीं देवालय बांधावयाचें तें, दगडी बांधलें तरच टिकणार. नाहींतर पुरानें वाहून जावयाचें. ह्मणून उभयतांही दगड शोधूं लागले, तों आलीकडच्या तीरास कोठेंही दगड नाहीं. नदीच्या पलीकडे मात्र मोठी थोरली दरड असून दगडही पुष्कळ होते. तेव्हां तेथूनच सारे दगड आणण्याचा दोघांनीं निश्चय केला. नदीचें पात्र भरलेलें. उतार नाहीं. तरी तशांतून दररोज दोघांनीं पांच चार मोठमोठाले दगड घेऊन पोहत येऊन आलीकडे टाकावयाचे. याप्रमाणें पोहून सारे देवळापुरते दगड आणले. आणि त्यांनीं वाळवंटांत देवालय बांधून मारुतीची स्थापना केली. ह्या मारुतीस आपट्याचा मारुती असें ह्मणतात. पुढें त्या देवालयाभोंवतीं स्मशानाची जागा झाल्यामुळें आतां तो 'मढ्या मारुती' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. सांप्रत आगगाडीच्या स्टेशनावरून कऱ्हाडांत जाते वेळीं, गाडेउतारापाशीं वाळवंटामध्यें, मध्येंच देऊळ दृष्टीस पडतें तें हेंच.

त्या कालीं **कऱ्हाडामध्यें केदारपंत** ह्मणून एक साधु होते. हे कधीं घराबाहेर ह्मणून पडतच नसत ! त्यांस एक मुलगा होता, त्याचें नांव **कृष्णा केदार.** एके दिवशीं **कृष्णा केदार** व **विठ्ठलपंत** ह्यांनीं संस्कृत शिकाण्याचा बेत केला. आणि **रामशास्त्री सोनटक्के** ह्यांच्या घरीं **अप्पापुराणिक** ह्मणून एक शास्त्री रहात असत, त्यांच्याकडे हे उभयतांही संस्कृत शिकण्याच्या हेतूनें गेले. व ह्यांनीं, आह्मांस शास्त्रव्युत्पत्ति सांगावी, ह्मणून प्रार्थना केली. पुराणिक बुवांनीं ठीक आहे ह्मणून रूपावलि व समासचक्राची पोथी आणावयास सांगितलें. हल्लीं रूपावलि, समासचक्र

ह्मणजे आणा अर्धाआणा दिला कीं, खाशी सुंदर पोथी! पण त्या वेळेस त्यांची कोण मारामार! कोणापाशीं तरी विरळा हस्तलिखित प्रत असावयाची, आणि ती एक किंवा दोन दिवसांच्या बोलीनें प्रत करून घ्यावयास मिळावयाची. **पंतां**नाही तसेंच करणें भाग पडलें. त्यांनींही एक प्रत मिळवून तिची प्रत करण्यास सुरवात केली. परंतु **पंतां**चा सराव नेहमीं मोडी अक्षरावर. बालबोधावर तितका हात नसे. ह्यास्तव त्यांनीं मोडी लिपींतच समासचक्राची प्रत केली, व त्याकरितां मोडी लिपींत ऱ्हस्वदीर्घांचे नियम बांधले, व ते दोघेही शिकूं लागले. त्या विषयींतही **पंतां**च्या बुद्धीची तेजस्विता दिसून आली. त्यांनीं रूपावलि व समासचक्र हां हां ह्मणतां तोंडपाठ केलें. रघुसर्गाचे दहावीस श्लोक होतात न होतात, तोंच दुसऱ्यांस सांगण्याची त्यांच्या अंगांत शक्ति आली. **कृष्णा केदार** बिचारा कधींच मागें पडला!

दफ्तरदारांच्या घरीं एक मोठी उत्कृष्ट चाल होती कीं, घरांतील वायकांनीं पुराण ऐकावयास बाहेर ह्मणून कधीं जावयाचें नाहीं. एकादशीसारखीं व्रतेंवैकल्यें आल्यास त्या दिवशीं, अथवा गुरुवारीं, आळीपाळीनें एक एका पुराणिकास घराकडे बोलावून आणून सर्वांनीं घरींच पुराण श्रवण करावयाचें. त्याप्रमाणें **पंतां**चे संस्कृताध्यापक **अप्पापुराणिक**ही कधीं कधीं दफ्तरदारांच्या घरीं पुराण सांगण्यास येत असत. एका एकादशीस तात्यांनीं **अप्पापुराणिकां**स बोलावणें पाठविलें. पुराणिकबुवा येऊन पुराण सांगूं लागले. **तात्या, विठ्ठलपंत,** व घरांतील सर्व वायकामुलें हीं पुराणश्रवणास वसलीं होतीं. पुराण समाप्त करण्यापूर्वीं दहावीस श्लोक बाकी ठेवून पुराणिकबुवा उठले, आणि **तात्यां**स ह्मणाले, आतां बाकीचे श्लोक आपल्या चिरंजिवांच्या मुखांतून ऐकावेत. **तात्यां**स तें फारच आश्चर्य वाटलें! कारण, मुलगा संस्कृत शिकतो ही गोष्ट त्यांस माहितसुद्धां नव्हती. गुर्वाज्ञेप्रमाणें **पंतां**नीं गुरूस व वडिलांस अभिवंदन करून व्यासपीठावर आरोहण केलें, आणि राहिलेला भाग संपविला. **पंतां**ची रसाळ वाणी ऐकून सर्व लोक, विशेषेंकरून **तात्या** फारच प्रसन्न झाले.

आपल्या मुलास इतकें सुशिक्षित केल्याबद्दल, **तात्या,** पुराणिकबुवांचे फारच उपकारी झाले. त्यांनीं पुराणिकबुवांस, आजपासून आपण आमच्याच घरीं रहावें ह्मणून विनंति करून, लागलेंच त्यांचें बिऱ्हाड घरीं आणविलें. व त्यांच्या शाळेस एक स्वतंत्र जागा, त्यांस बसण्यास कांबळा, पांघरावयास लेप, व रात्रभर दिवा इतकी तजवीज करून देऊन **पंतां**च्या आद्य संस्कृतगुरूंची स्वगृहींच स्थापना केली. तेव्हां पंतांसही फार आनंद झाला. ह्या वेळीं **विठ्ठलपंतां**चें वय अदमासें चौदा पंधरा वर्षांचें होतें.

३

आपली घरच्याहूनही अधिक व्यवस्था लागली ही सर्व **विठ्ठलपंता**मुळें लागली, असें **अप्पापुराणिकां**स वाटून, **विठ्ठलपंतां**विषयीं त्यांच्या मनांत अधिकच प्रेमबुद्धि

उत्पन्न झाली. एके दिवशीं त्यांनीं पंतांस जवळ हाक मारून ह्मटलें " **पंत !** तुह्मी आमच्या अन्नास कारण झालां, ह्याकरितां आह्मी तुह्मांस आजपासून " **अण्णा** " ह्मणूनच हाक मारणार" आणि त्याप्रमाणें त्या दिवसापासून त्यांनीं पंतांस '**अण्णा**' ह्मणण्याचा परिपाठ सुरू केला. त्यावरूनच सर्व लोक पुढें पंतांस '**विठोबा अण्णा**' ह्मणूं लागले व अंतकालपर्यंत तेंच नांव प्रसिद्ध होतें.

**अण्णां**च्या गुरूचें कुटुंब पूर्वींच निवर्तलें असल्यामुळें, त्यांच्या मागें संसाराचा मुळींच व्याप नव्हता. ते विरक्तासारखेच असत. अध्ययन आणि अध्यापन हाच सारा दिवस त्यांचा उद्योग. त्यांत **विठोबा अण्णां**सारखा सच्छिष्य त्यांस मिळा-ल्यानंतर काय पाहिजे ? त्यांनीं त्यांस मनापासून काव्य सांगण्यास सुरवात केली. **अप्पापुराणिक** व्युत्पत्तिशास्त्रांत फारच निपुण होते. त्यांच्यासारखा विद्वान् फारच विरळा. **अण्णां**नीं त्यांजपासून पांच काव्यांचे पांच पांच श्लोक प्रत्यहीं समजून घे-ण्याचा परिपाठ ठेवला होता. एकदा सांगितलेला विषय शंकासमाधानासुद्धां पार व्हा-वयाचा, हा तर **अण्णां**चा प्रथमपासूनच बाणा; ह्यामुळें गुरूनीं जन्मभर खपून सां-ठविलेलें अध्ययन **अण्णां**नीं चारपांच वर्षांतच खलास केलें. **रघु, किरात, कुमार, माघ, नैषध** हीं पंचमहाकाव्यें तेव्हांच हस्तगत केलीं. व्युत्पत्तीचें ज्ञान पुरें झालें; गुरूची शाळा **अण्णा** हे स्वतः चालवूं लागले. शिवाय, नवें सांगा हा तगादा गु-रूच्या मागें रोज असे. गुरुमहाराजांनीं किरकोळ किरकोळ होती नव्हती तेवढी चट सारी पुंजी **अण्णां**च्या स्वाधीन केली. तरी 'आणखी सांगा' हा **अण्णां**चा त-गादा असेच. **अण्णां**स सांगावयास गुरूपाशीं कांहीं राहिलें नाहीं. त्याची त्यांस लज्जा वाटूं लागली. त्यांत **अण्णां**च्या शंका दांडग्या. त्यांचें समाधान करणें गुरूस केवळ दुरापस्त होऊन गेलें. **अण्णां**नीं शंका काढिली, कीं मला समजत नाहीं, असें ह्मण-ण्याची पाळी गुरूस येई, दुसरें गत्यंतर उरलें नाहीं. **अण्णां**चा, 'नवा पाठ द्या' ह्या गुरू-मागें लागलेला ध्यास कांहीं सुटेना. तेव्हां **अप्पाशास्त्री** यांस मोठें संकट पडलें. त्यांतून सुटावें ह्मणून एके दिवशीं रात्रीं पहांटेस उठून गुरु, तेथून निघून गेले. गेले ते गेलेच. पुन्हा ठिकाण नाहीं. **तात्यां**नीं व **अण्णां**नीं त्यांच्याविषयीं बहुत शोध केला परंतु व्यर्थ. कोठेंही शोध लागला नाहीं, ह्मणून उभयतांही पितापुत्रांस वाईट वाटलें. पुरा-णिक बुवांचा बंदोबस्त तात्यांनीं घरांतील मनुष्यांपेक्षांही उत्तम ठेवला होता. असें असतां असा प्रकार घडला, ह्मणून त्यांस बहुत खेद झाला. तात्यांच्या मुखांतून " आमच्याकडून कोणताही अपराध घडला नसतां, गुरुजी आह्मांस एका शब्दानेंही न विचारतां निघून गेले, हें कांहीं चांगलें झालें नाहीं" असा उद्गार निघाला. पण उपयोग काय ? झाल्या गोष्टीस कांहीं इलाज राहिला नाहीं. त्यांच्याकडून **अण्णां**स व्युत्पत्तिज्ञान चांगलें झालें, परंतु व्याकरणाचा अभ्यास मात्र तसाच राहिला.

**वामनाचार्य ढोणपे** वगैरे कितीएक **विठोबाअण्णां**चे स्नेही होते. त्यांनीं अ-

**ण्णां**च्या घराशेजारींच एक प्रतिवार्षिक चैत्रमासीं श्रीकृष्णाबाईचा उत्साह सुरू केला. अर्थातच ही सर्व मंडळी समवयाचीच होती. त्यांनीं आपआपसांत थोडी पट्टी जमा करून केलेला उत्साह. त्यामध्यें बाकी सर्व खर्चांचें कसें तरी निभावण्यासारखें होतें, परंतु हरिदास आणून त्यास बिदागी देण्याचा खर्च सोसण्याइतकें त्यांत त्राण नव्हतें. ह्यास्तव **अण्णां**नीं कीर्तन करावें, व **अप्पा परशुराम आपटे**–ह्यांस कंठमाधुर्य चांगलें असे–ह्यांनीं, **गोविंदबुवा कुरवलीकर**–जे पुढें प्रसिद्धीस आले त्यांनीं, व **शंकरअण्णा** या त्रिवर्गांनीं पाठीमागें साथ करावी असें ठरलें. व त्याप्रमाणें पहिला उत्साह साजरा झाला.

पहिल्या वर्षीं कीर्तनाचा रंग साधारणच होता. तथापि त्यापासून आपणांस उत्तम कीर्तन करतां यावें अशी मनांत दृढतर इच्छा उद्भवली. व त्याकरितां, कीर्तनांत रंगदेवतेचा प्रसाद व्हावा ह्मणून त्यांनीं अनुष्ठानास प्रारंभ केला. दररोज प्रातःस्नान करून दोनप्रहरच्या आंत अध्यात्मरामायणाचा पाठ संपवावयाचा. ह्याप्रमाणें चातुर्मास्य व्रत चालविलें.

पुन्हा दुसऱ्या वर्षींचा दुसरा उत्साह आला. त्याची तयारी सुरू झाली. ह्या वर्षीं तरी कीर्तन उत्तम व्हावें, हा **अण्णां**च्या मनाला निदिध्यास. तेही आपल्या कीर्तनाच्या तयारीस लागले. जीं आख्यानें पाठ केलीं होतीं, त्यांत पुष्कळ उणिवा आहेत असें **अण्णां**च्या लक्षांत आलें, ह्यास्तव त्यांत त्यांनीं नवीन पद्यांची यथायोग्य भर घालावी ह्मणून **नवीन कविता** करण्यास प्रारंभ केला. व बऱ्याच कविता तयार केल्या. उत्साहास प्रारंभ होऊन **अण्णां**च्या कीर्तनास सुरवात झाली, ती सर्व लोकांस प्रिय होऊन कीर्तनास श्रोत्यांची गर्दी होऊं लागली. व **अण्णा** फारच उत्तम कीर्तन करतात ही कीर्ति सर्वतोमुखीं पसरली.

तेथें **बाबा जोशी** ह्मणून एक सत्पुरुष हरिदास होते. ह्यांच्या कीर्तनांत एके दिवशीं एका मनुष्यास सर्पदंश झाला. तें विष त्यांनीं कालियामर्दन आख्यान लावून उतरविलें, अशी सर्व लोक त्यांची कीर्ति गात! कांहीं मंडळींनीं ह्या **बाबां**स **अण्णां**चें कीर्तन ऐकावयास येण्याविषयीं फार आग्रह करून घेऊन आले. **बाबां**स ध्रुवाख्यान फार आवडत असे. ह्मणून **अण्णां**नीं त्या दिवशीं तेंच आख्यान लावलें. व **ध्रुवा**स भगवंतांनीं दर्शन दिलें, त्या मनमोहक मूर्तीचें ध्यान **अण्णां**नीं स्वकृत काव्यानें येणेंप्रमाणें वर्णन केलें.—

( कटावाच्या चालीवर. )

**हरि हा आनंदाचा कंद ॥ आनंदाचा कंद ॥ उभा पुढें भक्तसखा गोविंद ॥ हरि हा आ० ॥ ध्रु० ॥ सजलनीरदश्यामतनू नवरत्नखचितसौवर्णमुकुट शिरपेंच तुरा वरि कलगि विराजित कुटिलालक निटिलासि कस्तुरी-तिलक केशरीगंध ॥ हरि० १ ॥ श्रवणिं मनोहर म-**

करकुंडलें फुल्लगल्ल कर्णांतदीर्घ-सुप्रन्नलोचन इंदुवदन तिलपुष्पनासिका कुंदरदन हनु अधरबिंबगंत हास्य मंद मंद॥ हरि० २ ॥ कंबुकंठ कौस्तुभाभरण शुभपटीरपंक नवद्रवरूषितपाविरांस केयूरविभूषित कनककटकसह-रत्नतोडर-प्रभानुभासित शंख-सुदर्शन-गदा-सरोरुह-लसच्चतुर्भुज ललितांगुलिधृतरत्नमुद्रिकावृंद ॥ हरि० ३ ॥ विशालवक्षस्थलीं रमाकुचकुंभकुंकुमालेपलिप्त श्रीवत्सलांछिता सुवर्णयज्ञोपवीत मध्य वलित्रयबंधुर निम्ननाभि तनु रोमराजि लुठदुत्तरीयपट पारिजातनवकुसुमतुलसिकामिश्रहार-पादाग्रचुंबि नभ भरुनि जयाचा मधुर सूटला गंध ॥ हरि० ४ ॥ कटीतटीं जरिकांठि पीतकौशेयवासपट वाससुवासित विचित्रश्रृंखल अगणित-मणि झणझणित मंजुल-क्वणित किंकिणी विपुलतरोरुद्वंद्व विराजित जानुजंघ सुकुमार सरलतर कनकवलययुत रत्नतोडरे मंजुमंजु सिंजान हीर मंजीर परिष्कृत सहज रक्त मृदुवज्र अंकुश ध्वजांबुजांकित वृत्तवृत्त उत्तुंग-रक्तनखचक्रवाल सत्पुण्यचंद्रिका ध्वस्त महद्धृदयांधतमस मंदाकिनी माहेर-चरणयुग धृतरणरणिक जयाच्या क्षणिकध्यानें तुटती झटिति सर्व भवबंध ॥ हरि० ५॥ कोटिकोटिकंदर्परूपलावण्य दर्पहर-ध्यान मनोहर अनंत जन्ममनोमल पटली निर्मूलनकर भक्तिगम्य-तापत्रयभंजन आसेचनक ध्यानिं पहातां वाटे जणु नयनांत भरावें, हुंगावें, दृढ आलिंगावें, कीं चुंबावें, विसरतसे संसार सर्वही, संतत याचा पंतविठ्ठला, सहज लागला छंद ॥ हरि हा आनंदाचा कंद ६ ॥

ही **अण्णांची पहिली कविता** होय. ह्यांतील पदलालित्य, यमकप्राचुर्य, अर्थसौष्ठव, तें ह्मणण्याची शैली, व विवरण हें ऐकून वर सांगितलेले **बाबा जोशी** आनंदानें डोलूं लागले. त्यांच्या नेत्रांस प्रेमाश्रूंच्या धारा लागल्या. कीर्तन समाप्त झाल्यावर **बाबा** ह्मणाले "**अण्णां**वर भगवत्प्रसाद आहे." एरवीं असें कवन व असें वक्तृत्व साध्य व्हावयाचें नाहीं. असो. ह्याप्रमाणें दुसरा उत्साह पार पडला.

कीर्तनाच्या उपांगांत गायन हें एक प्रधानांग असल्यामुळें त्याचा अभ्यास करणें अवश्य वाटल्यावरून **अण्णां**चें मन तिकडे वळलें. बहिरोबाच्या आळीला, पाखाडी खालीं, **केशवेश्वरा**च्या देवालयांत सन्याशांचा एक मोठा मेळा राहत असे. त्यांत **गोविंदस्वामी** ह्मणून प्रमुख असत. त्यांस कऱ्हाड येथें वास्तव्य करणारे **भिकूपाध्ये** हे सभाष्य प्रस्थानत्रय—१ उपनिषद् प्रस्थान, २ शरीर प्रस्थान, ३ गीता प्रस्थान—सांगत असत. व चाळीस पन्नास सन्याशांचा मेळा ऐकावयास बसत असे. ह्या

सन्याशांत हें भाष्य ऐकण्यासाठीं मुद्दाम हिंदुस्थानांतून एक सन्यासी येऊन राहिले होते.

एके दिवशीं **अण्णा** तेथें जावयास, व ते हिंदुस्थानी सन्यासी बाहेर पडावयास एक गांठ पडली. सन्यासी बुवांनीं जातां जातां सहज एक गायनाची लकेर मारली, ती इतकी मधुर होती कीं, तिच्या श्रवणानें **अण्णांचें** चित्त अगदीं वेधून राहिलें. व त्यावरून ते उत्तम गायनकलाभिज्ञ असावेत असा **अण्णांनीं** तर्क केला. ते तसेच त्यांच्या मागोमाग गेले, व त्यांनीं गायनकलेचा अनुग्रह मागितला. परंतु सन्यासी ह्मणाले, मीं तसें केलें असतां आमचे गुरु, **गोविंदस्वामी**, यांचा, आश्रमविपरीताचाराबद्दल दोष येईल. तेव्हां **अण्णांनीं गोविंदस्वामींपाशीं** एकांतीं ती गोष्ट काढली. स्वामी ह्मणाले, गायनाचा थाट येथें उपयोगी नाहीं. सन्यासी गातात असा लोकापवाद येईल. तेव्हां **अण्णांनीं** रात्रीं निजावयास येण्याचें कबूल केलें. हिंदुस्थानी सन्यासी गायनविद्येंत चांगलेच प्रवीण होते. त्यांजपासून **अण्णांनीं** कोमल, तीव्र, वर्ज्यावर्ज्य इत्यादि माहिती करून घेतली. गायनकलेंत चांगले प्रवीण झाले. कविताही तशाच रसभरित होऊं लागल्या. कीर्तनास मोठमोठाले शास्त्री येऊं लागले.

श्रोतृसमूहांतील न्याय, व्याकरणपटु विद्वज्जनांच्या मनोरंजनार्थ तीं तीं शास्त्रें अवलोकन करावींत असाही **अण्णांच्या** मनांत हेतु उत्पन्न झाला. प्रसिद्ध वैयाकरण **गुंडाचार्य घळसाशी**, कऱ्हाडकर यांचे वडील **आबाचार्य** होते. त्यांच्यापाशीं कौमुदी ह्मणण्यास **अण्णांनीं** प्रारंभ केला. पूर्वार्ध संपला, तों आचार्य वारले. तेव्हां उत्तरार्ध कौमुदी **अण्णांनीं** स्वतः बसविली! पूर्वमीमांसेचा अभ्यास कांहीं दिवस **भिकूपाध्ये** यांजपाशीं केला, व कांहीं दिवस प्रसिद्ध **नारायणाचार्य गजेंद्रगडकर** यांचे वडील **राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर**—सातारकर—यांजपाशीं केला. गांवामध्यें नैय्यायिक कोणी नसल्यामुळें, तो अभ्यास मात्र तसाच राहिला.

कोणताही संस्कृत ग्रंथ लावण्यामध्यें **अण्णांचा** अगदीं हातखंडा, अशी सर्वत्र प्रसिद्धि झाली. त्यांत वैद्यकीय ग्रंथ लावणें, ह्मणजे मोठेंच कठीण काम. ह्यामुळें अर्धेमुर्धे वैद्यलोक वैद्यक ग्रंथांसंबंधीं पृच्छा करावयास **अण्णांकडे** येत. **व्यंकटराव जांवळे** ह्मणून एक भिक्षुक, सवाशेजातीचे गृहस्थ **अण्णांचे** परम ऋणानुबंधी होते. त्यांस वैद्यशास्त्राचा फार नाद असे. त्यांनीं **अण्णांपाशीं** वैद्यकग्रंथ वाचण्यास प्रारंभ केला. त्यांच्या शंकासमाधानार्थ **अण्णांस** त्याही शास्त्रांत परिचय करणें जरूर पडलें. ह्यास्तव त्यांनीं स्वतः **भाऊ टोणपे** मालखेडकर प्रसिद्ध वैद्य कऱ्हाडास होते, त्यांजपाशीं अभ्यास करून **जांवळे** यांचा हेतु पूर्ण केला. व आपण तेथपासून धर्मार्थ चिकित्सा व औषधयोजना सुरू करून, तें व्रत आमरण चालविलें.

ह्याप्रमाणें व्युत्पत्ति आणि व्याकरण ह्या शास्त्रांत पारंगत झाल्यावर, गीर्वाण वाणी

ही अर्थाचें व अलंकाराचें केवळ भांडार, ह्यास्तव त्या भाषेंत काव्य करावें. प्राकृत भाषेंत कविता करण्यामध्यें मोठासा उपयोग आहे असें नाहीं. इत्यादि विचार **अ-ण्णां**च्या मनांत घोळूं लागले. व कालवशात् ह्मणा, कीं देवताप्रसादामुळें ह्मणा, त्यांस संस्कृत कविता करण्याची स्फूर्ति झाली. ती इतकी अप्रतिम होती कीं, ती पाहून मोठमोठाले ज्ञातेही अगदीं चकित होऊन जात.

**औंधास** श्रीमंत **पंतप्रतिनिधि** ह्यांच्या पदरीं **विनायक बाबुराव बापट** ह्या नांवाचे पोतनीस होते. हे चांगले जाणते व रसिक असत. ते एके दिवशीं **अण्णां**स सहजीं भेटण्यास आले असतां, कवित्वशक्तीबद्दल गोष्टी निघाल्या. तेव्हां पोतनीस, **अण्णां**स ह्मणाले "आह्मी जो मजकूर देऊं, त्याची कविता, सांगूं त्या वृत्तांत आपण कराल काय?" **अण्णा** ह्मणाले "आपण मजकूर लिहावा. मग विचार पाहूं." **बापटां**नीं एक बरा लांबलचक मजकूर एका कागदावर लिहून दिला. व ह्याची श्लोकवृत्तांत कविता पाहिजे ह्मणून इच्छा दर्शविली. **अण्णां**नीं त्याच कागदावर मी सांगतों हा श्लोक लिहून घ्या ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें **अण्णां**नीं श्लोक सांगितला, व **बापटां**नीं तो लिहून घेतला. त्यांत **बापटां**च्या लेखांतील यत्किंचित्ही मतलब जाऊं न देतां वृत्ताच्या वगैरे सर्व अटींची परिपूर्तता केलेली होती. तें पाहून **बापटां**स **अण्णां**च्या शीघ्रकवित्वशक्तीविषयीं फार अचंबा वाटला. त्या समयीं जे लोक तेथें होते, त्यांतील एकाच्या तोंडून असें ऐकण्यांत आलें आहे कीं, हा श्लोक **बापट** यांस देतेवेळीं **अण्णां**नीं असें बोलून दाखविलें कीं, "अहोरात्र माझ्या मुखांतून ज्या कविता होऊन जातात, त्या सर्वांचा जर कोणीं संग्रह केला असता, तर तो ठेवावयास माझें घर तरी पुरलें असतें कीं नाहीं, ह्याचा वानवाच आहे." हा **बापटां**स दिलेला श्लोक आमच्या हस्तगत झाला नाहीं, याबद्दल वाईट वाटतें!

हा इतका सर्व अभ्यास करावयास **अण्णां**स कितीतरी वर्षें लागलीं असतील असें आपल्या मनांत येतें. परंतु त्यांनीं हें इतकें सर्व एका पांच दहा वर्षांतच आटोपलें. नंतर त्यांनीं संस्कृत कविता करण्यास प्रारंभ केला. विसाव्या वर्षीं **'शिवस्तुति'** नामक संस्कृत आर्यारूपाचें स्तोत्र रचिलें. तें झाल्यावर ( भारतचंपू, भागवतचंपू अशा पद्धतीवर ) **'गजेंद्रचंपू'** ह्मणून गजेंद्राच्या ध्यानावर काव्य केलें. हें काव्य **अण्णां**नीं आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षींच संपूर्ण केलें, ह्यांत शंका नाहीं. कारण त्यांतील शेवटचें पद्य असें आहे:—

**"पंचविंशतिवर्षेण महादेवस्य सूनुना"**
**"ग्रंथोयं कल्पितः संतः पंतविठ्ठलशर्मणा."**

**'गजेंद्रचंपू'** हा ग्रंथ काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या सरसत्वाची रसिक जनांनीं परीक्षा करावी.

**अण्णांचें** उपास्य दैवत श्रीरामचंद्र. त्यास नवविधा भक्तीचें विवेचन, व त्यांची आवश्यकता, सकारण दर्शवून अर्थगांभीर्य, पदलालित्य, भाषासौष्ठव इत्यादि गुणांनीं परिप्लुत असा श्लेषालंकारमुकुटमणि "**सुश्लोकलाघव**"[1] नामक ग्रंथ **अण्णांनीं** रचिला. ह्या ग्रंथाच्या नावांतच किती चमत्कृति साधली आहे ती पहा. उपास्य देवतेची स्तुति, आणि काव्यगुणांचें दिग्दर्शन हीं दोन्हीही व्यक्त होतात. ह्यांतील कितीएक श्लोक प्रस्तुत हरिदासांच्या वगैरे कीर्तनांत संग्रहास घेतलेले आढळतात[2]. व ह्याचा बराच भाग '**काव्येतिहास**'संग्रहामध्येंही छापून प्रसिद्ध झालेला आहे. ह्या ग्रंथावरून **अण्णांची** अप्रतिम बुद्धिमत्ता दिसून येते. खालचा श्लोक किती उत्कृष्ट आहे पहाः–

**सत्तारकं नादि नांतं यस्यांतर्वर्तते स्थितिः।**
**अतो नयन ते सख्यं भवेन्मुख्यं मुरारिणा ॥ १ ॥**

सर्व इंद्रियांची प्रार्थना करण्याच्या हेतूनें **अण्णा** प्रथमतःच नयनांस अनुलक्षून

---

१ 'रलयोरभेदादिति' ह्या न्यायानें 'सुश्लोकलाघव' आणि 'सुश्लोकराघव' हीं दोन्ही एकच होत. २ सरस पद्य असलें कीं, तें दुसऱ्याच्या नांवाखालीं–जाणून म्हणा किंवा नेणून म्हणा–दडपण्याची पूर्वापार चाल आहे. त्याप्रमाणें अण्णांच्याही कितीएक पद्यांची व्यवस्था झाली आहे. एकदां नासिकचे कोणी एक हरिदास अण्णांस भेटावयास आले होते. त्यांनीं एक फार अप्रतिम म्हणून श्लोक म्हटला, व अर्थाचीही फोड केली. त्यांस अण्णांनीं विचारिलें हा कोणत्या कवीचा श्लोक? हरिदासांनीं एका भलत्याच कवीचें नांव सांगितलें. त्यावरून अण्णा हांसले आणि म्हणाले, हा माझ्या सुश्लोकलाघवांतील श्लोक आहे आणि, लागलाच त्यांनीं तो ग्रंथ काढून दाखविला. त्या समयीं सुश्लोकलाघव पुरा झालेला नव्हता. तरी त्यांतील वेंचक वेंचक श्लोक हरिदास घेऊन जात आणि भलत्याचाच म्हणून सांगत! ही गोष्ट अण्णांच्या निदर्शनास येतांच त्यांनीं अशा लपंडावीबद्दल अन्योक्तीसारखा एक श्लोक लागलाच तयार करून तो सुश्लोकलाघवांतच सामिल केला! सदरहू ग्रंथाची समग्र प्रत आम्हांस पहावयास न मिळाल्यामुळें, तो श्लोक कोणता तें वाचकांसही सांगतां येत नाहीं. याबद्दल दिलगिरी वाटते.

अण्णांच्या एका रसभरित पदाचाही असाच घोंटाळा झाल्याचें, त्यांचे चिरंजीव बापूसाहेब ह्यांच्या सांगण्यांत आलें. तें पद प्रऱ्हादानें शाळेंतील मुलांस केलेल्या उपदेशाचें "**गड्यांनो घ्या हरिच्या नामा॥ लिहितां कशास ओनामा॥**" हें होय. हें पद विठोबा अण्णांनीं केलेलें असून नवनीताच्या एका आवृत्तींत तें 'शिवदिन केसरीं'च्या कृतीखालीं घातलें आहे. परंतु ती चूक आहे, असें बापूसाहेब म्हणाले.

त्या नवनीताच्या आवृत्तींत 'शिवदिन केसरीं'चीं एकंदर पांच पदें आहेत. त्यांतील चार पदांच्या शेवटच्या चरणांत 'शिवदिन केसरीं'चें नांव आहे. व ह्या एका पदांत मात्र त्यांचें नांव नाहीं. ह्यावरून बापूसाहेबांच्या सांगण्यास बळकटी येते.

ह्मणतात-" हे नयन हो ! भगवंताशीं तुमचेंच सख्य सर्वांआधीं होईल. कारण तुह्मी उभयतांही-भगवान् व तूं-समानशील पडलां." आतां भगवान् व नयन समानशील कसे तें सांगतात. भगवान् कसा आहे?-**सत्तारकं**-साधूंस तारणारा. **नादि**-आदि नाहीं असा. **नान्तं**-अंत नाहीं असा.-"**यस्यांतर्वर्तते स्थितिः**" ज्याची वस्ति प्राणिमात्राच्या हृदयांत आहे. आतां नयन हो! तुह्मी कसे आहांत? त्याच लक्षणांनीं युक्त आहांत.-**सत्तारकं**-उत्तम बाहुलीनें युक्त.-**नादि**-न आदि 'न' हें अक्षर तुमच्या प्रारंभीं आहे.-**नांतं**-न अंतं. तुमचें अंत्याक्षरही 'न' च आहे. आणखी-**यस्यांतर्वर्तते स्थितिः**-यस्य-स्थिति-अंतर्वर्तते. ह्मणजे 'य' हें अक्षर तुमच्या नेहेमीं मध्यें असतें. ('नयन' ह्या शब्दांत आद्याक्षर व अंत्याक्षर 'न' असून, 'य' हें अक्षर मध्यें असतें; हें उघडच आहे.) ह्या प्रकारें नयन हो! तुमचें व भगवंताचें साम्य असल्यामुळें त्याच्याशीं तुमचें सर्वांआधीं सख्य होईल. 'शितावरून भाताची परीक्षा' ह्या ह्मणीप्रमाणें सुश्लोकलाघवांतील ह्या एका श्लोकावरूनच **अण्णां**चा बुद्धिप्रभाव चांगला व्यक्त होतो. व त्याबद्दल त्यांचें जितकें ह्मणून स्तोत्र गावें, तितकें मनास थोडेंच वाटतें.

ह्याच ग्रंथांतील आणखी एक आर्या दाखल करतों:—

**नगघटितं चलघटितं जडोपरचितं च तत्कलोपचितम् ।**
**मिथ्या सकलजगदिदं सत्यं किंतु प्रतिष्ठितं ब्रह्म ॥ १ ॥**

**अर्थ-नग-घटितं**-वृक्षपर्वतांनींयुक्त-**चल-घटितं**-चरपदार्थांनीं युक्त-**जडोपरचितं**-जड पदार्थांनीं युक्त-**तत्कलोपचितम्**-त्याचप्रमाणें नाना कलाकौशल्यांनीं युक्त असें-**इदं सकल जगत् मिथ्या**-हें सर्व जग मिथ्या आहे.-**सत्यं किंतु**-तर सत्य काय? **प्रतिष्ठितं ब्रह्म**-ह्याशिवाय बाकी राहील तें ब्रह्म. आतां श्लेषार्थ-'**सकलजगदिदं**' येवढाच शब्द घेतला. तर,-न-ग-घटितं-त्यांतील 'ग' अक्षर कमी करून;-च-(तसेंच)-**ल**-घटितं-'ल' हें अक्षर कमी करून;-जडोपरचितं-'**ज**' हें अक्षर कमी करून;-तत्कलोपचितम् तसेंच 'क' या अक्षराचा लोप करून बाकी राहील तेंच सत्य '**ब्रह्म**'-वरील '**सकलजगदिदं**' ह्या वाक्यांतील-**क, ल, ज, ग,** हीं मिथ्या अक्षरें काढून टाकलीं, ह्मणजे '**सत् इदं**' हा शब्द बाकी राहतो. तेंच ब्रह्म. अर्थात् सत्-ह्मणजे सत्य--चांगलें--पुण्य हेंच परब्रह्म होय हा भावार्थ. खालचा श्लोकही सुश्लोकलाघवांतीलच आहे:—

**" कुटिलप्राया लक्ष्मी तत्र प्रभवति सरस्वती यत्र "**
**" प्रायः श्वश्रूस्नुषयोः सौहार्दं नैव दृश्यते क्वापि ॥" ४०० ॥**

ह्यांतील शेवटचा दृष्टांत किती समर्पक आहे, हें सुज्ञ वाचकांस कांहीं निराळें सांगणें नको.

**अण्णां**चा तिसरा ग्रंथ '**हेतुरामायण**' हा होय. प्राणिमात्रांस-निदान आप-

णास तरी–पुनर्जन्म घेणें चुकणें नाहीं, असा **अण्णांच्या** मनाचा निर्धार असल्यामुळें, आपल्या पहिल्या उपास्यदेवतेची व आपली तुटातूट न व्हावी, हा हेतु धारण करून हा ग्रंथ सीतास्वयंवरापर्यंतच रचिला आहे. व त्याचा पुढील भाग पुढच्या जागीं स्वहस्तेंच पुरा व्हावा, असा हेतु धरून हा ग्रंथ मुद्दाम अपुरा ठेवला आहे. आतां पुनर्जन्माच्या संबधानें **अण्णांची** आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट घडलेली, आमच्यानें येथें सांगितल्याशिवाय रहाववत नाहीं.

कोणे एके दिवशीं कानड्या मुलखांतील एक मनुष्य आपल्या पाठुंगळीवर ताडपत्रावरील कोरींव ग्रंथाचे जुडगे विकावयास घेऊन आला. ते ग्रंथ '**विठ्ठल**' या नांवाच्या कवीचे कानडी भाषेंतील होते. "ह्या माझ्या पूर्व जन्मांतील कविता आहेत" असें सांगून **अण्णांनीं** त्या सर्व विकत घेतल्या. ते कधीं कधीं लोकांजवळ ह्मणतही असत कीं, माझा पूर्वजन्म कर्नाटकांत होता. पूर्वींच्या **विठ्ठल** कवींविषयीं **मयूरपंताची** '**सन्मणिमालेंत**' येणेंप्रमाणें आर्या आहे:—

**मान्य पुरंदर विठ्ठल सुकविकुळीं, पद पराज नाक वनीं; ॥**
**ज्याचें प्रेम हरिपदीं, तैसें हरिपदपरा जना कवनीं ॥ २१ ॥**

ह्या आर्येखालीं '**महाराष्ट्रकाव्यसंग्रह**' कर्त्यांची येणेंप्रमाणें टीप आहे:– "हा ( विठ्ठल कवि ) सुमारें १५० वर्षांमागें होऊन गेला. ह्याची कानडी भाषेंत कविता पुष्कळ आहे." ह्या गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

**अण्णांनीं** निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे ग्रंथ केले आहेत. व ते पुष्कळच आहेत. त्या सर्वांचा पत्ता लागणें कठीण. तथापि मुख्यमुख्यांचीं नांवें देतों. **प्रबोधोत्सवलाघव; प्रयोगलाघव, नित्यक्रमलाघव. 'संकल्प'** ह्मणून एक चांगला ग्रंथ आहे. '**रामतापिनी**' या ग्रंथांत राम व शिव ह्यांचा संवाद आहे. पुनर्विवाहाच्या वादाच्या वेळीं '**विवाहतत्त्व**' ह्या नांवाचा सुंदर व विपुल शास्त्रार्थांनीं भरलेला एक ग्रंथ केला आहे. त्याविषयीं अधिक माहिती पुढें येईल. एकवेळ **अण्णा,** कागदपत्रांच्या समजुतीकरतां साताऱ्यास गेले असतां, **केशव भट माटे** ह्या नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण "प्रातिशाख्यावरून[1] ( संधि करून ) वेद कसा ह्मणावा?" हा वाद घेऊन जयपत्रें घेत आलेला साताऱ्यास मिळाला. त्यास **अण्णा** बरोबर घेऊन आले. व तीन वर्षें त्यास आपल्या घरीं ठेवून घेऊन त्याच्या समजुतीकरितां "**साधुपार्षदलाघवम्**" हा ग्रंथ तयार केला. व त्यांनीं त्याची नीट समजूत घालून समाधान करून त्यास पाठवून दिलें. "**एकादशीविचार**" हाही एक **अण्णांचा** सुप्रसिद्ध ग्रंथ आहे. ह्याची रचना अनेक धर्मशास्त्रांतील सार काढून केलेली आहे. ह्यांतील प्रत्येक गोष्ट अगदीं विचारपू-

---

[1] 'अग्निमीळे' हें पद-संधी करून–म्हणजे '**अग्न्नि मीळे**' असें ह्मणावयानें.

र्वक लिहिली आहे असें दिसतें. त्यांत '**एकादशीश्राद्धविचारः**' ह्मणून एक पृथक् प्रकरण आहे. तें **अण्णांनीं** विशेष लक्षपूर्वक लिहिलेलें आहे. एकादशीस पितृतिथि पडली असतां अन्नसंतर्पणादि उपचारांनीं श्राद्धादिसंस्कार करण्याची जी जनरूढी आहे, ती सदोष आहे. निरशनानेंच तिथिसंतर्पण करावें हें उक्त होय. असें त्यांत विवेचन आहे. त्याचें, प्रसिद्ध धर्मशास्त्री **गंगाधर शास्त्री दातार** यांनीं खंडन केलें होतें, परंतु **अण्णांनीं** त्याचें पुन्हा यथास्थित खंडन करून आपल्या पक्षाचें मंडन केलें. ह्याच विषयावर **अण्णांनीं** इतका उहापोह केला, व कारण नसतां तोच विषय काढला, यावरून आपला काळ एकादशीसच होणार, ही गोष्ट **अण्णांस** पूर्वींच कळली असावी, असें जर आह्मीं विधान केलें, तर आमचे वाचक आह्मांस काय ह्मणतील बरें ? संस्कृत भाषा शिकण्यास व बोलण्यास सोपी पडावी ह्मणून '**सत्पदार्थलाघव**' ह्मणून सर्व पदार्थांच्या नांवाचा एक कोश करीत होते. परंतु तो अपुराच राहिला. ईश्वराची इच्छा ! ह्याशिवाय **अण्णांनीं** भजनामध्यें केलेलीं प्रेमळ पदें तर पुष्कळच आहेत. त्यांपैकीं जीं उपलब्ध आहेत त्यांतील वेंचक उतारे देण्याची इच्छा आहे.

**अण्णांनीं** इतक्या अल्पकालांत कसकशी विद्वत्ता संपादन केली, तें वर दाखविलेंच आहे. तरी तिच्यासाठीं त्यांस आपला सगळा वेळ खर्च करावा लागला, असें मुळींच नाहीं. ह्या विद्यार्जनाकडे त्यांच्या वेळाचा अत्यल्प अंश मात्र खर्च होई. त्यांना विसावें वर्ष लागतांच, ते आपल्या वडिलांच्या नोकरीचें, ह्मणजे दफ्तरदारीचें काम आपण स्वतः पाहूं लागले. पुढें वडिलांचा वृद्धापकाळ होऊन ते आपल्या वयाच्या साठाव्या वर्षीं वारले ! तेव्हां **अण्णा** अठ्ठावीस वर्षांचे होते. त्यांजवरच सर्व भार पडला. व पितृवियोगानेंही त्यांस फार दुःख झालें. शिवाय, त्या वेळेस पेशवाईचा अभाव झाला असल्याकारणानें **अण्णांचा** वंशपरंपरागत नोकरीचा हक्क बुडाला. परंतु **सातारच्या महाराजां**कडून त्यांस दुय्यम कारकुनीची जागा मिळाली. व ते त्या कामावर लागलीच रुजू झाले. तरी त्यांच्या वंशास दफ्तरदार असेंच नांव चालत आहे.

**अण्णा** स्वतंत्र काम पाहूं लागल्यावर त्यांनीं मंडळीच्या **श्रीकृष्णाबाई**च्या उत्साहांतून मन काढलें, व कीर्तन करण्याचें सोडून दिलें. **सप्रे** हे दशाहारांत **श्रीकृष्णाबाई**चा उत्साह करीत, त्यांत एक कीर्तन करण्याचा मात्र त्यांनीं परिपाठ ठेवला. कीर्तनास मोठमोठाले लोक येत, व त्यांस रंगदेवताही फार प्रसन्न होती. एका कीर्तनास त्या समयीं असलेले **शेषगिरराव मामलेदार** वगैरे मंडळी बसली होती. त्यांत **हरीबा नाना नेवासकर** हे सावकारही होते. ह्यांची वाणी सदोष ह्मणून प्रसिद्धि असे. ह्मणजे त्यांनीं ज्यास चांगलें ह्मटलें, त्यास हटकून दृष्ट लागावयाची. ह्या गृहस्थांनीं **अण्णांचें** कीर्तन श्रवण करून प्रसन्नमनानें शाबासकी दिली. त्याबरोबर **अण्णा** घेरी येऊन

तेथेंच पडले, त्यांस सावध होण्यास बराच वेळ लागला. तेव्हां **शेषगिररावांनीं** कीर्तन करण्याचें सोडून द्या ह्मणून **अण्णांस** सांगितलें. व त्यांनींही तें मान्य केलें.

**अण्णा** आपल्या तीर्थरूपांच्या दुःखांतून मुक्त होऊन आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी, ह्मणजे आपलें स्वतंत्र काम पाहूं लागून पुरतीं दोन वर्षेही लोटलीं नाहींत तोंच त्यांच्यावर प्रियपत्नीविरहदुःखाचा दुसरा पर्वत कोसळला! त्या समयीं **अण्णांचें** वय अर्थातच तीस वर्षांचें होतें. त्या वेळीं **अण्णांस सीतारामपंत** ऊर्फ **बापूसाहेब** थोरले चिरंजीव, **रघुवीरराव** ऊर्फ **भाऊसाहेब** धाकटे, व **भवानीबाई** ह्या नांवाची कन्या—ही पुढें साताऱ्यास सुभेदार ह्यांच्या घरीं दिली—अशीं तीन अपत्यें होतीं. मातृवियोगसमयीं सर्वांत वडील चिरंजीव **बापूसाहेब** ह्यांचें वय अवघें बारा वर्षांचें होतें. ह्यावरून त्या कालीं बाकीच्या मुलांचीं वयें किती लहान असतील, ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. आधींच पत्नि कुलीन, सुशील, गुणवती अशी असून स्वतः तरुण आणि मुलें लहान लहान. तेव्हां **अण्णांस** तें दुःख किती दुःसह झालें असेल बरें? तरी त्यांतल्यात्यांत, मुलांची आजी, ह्मणजे **अण्णांच्या** मातोश्री हयात होत्या, ही एक मोठीच समाधानाची गोष्ट. असो. होणाऱ्या गोष्टीपुढें कोणाचाच उपाय नाहीं. **अण्णांवर** असा प्रसंग तर येऊन गुदरला. तेव्हां **नागेशराव मामलेदार, गोविंदभाऊ गरुड**प्रभृति ब्रह्मवृंदांनीं **अण्णांस** बहुत आग्रह केला कीं, 'आपण द्वितीय संबंध करावा' परंतु **अण्णांस** तत्काल उपरति झाली, आणि ते भक्तिमार्गाकडे वळले. ते त्या सर्वांस ह्मणाले, "तसा आतां ईश्वरी संकल्प नाहीं. संकल्प असता, तर असा योग आला नसता." इतकें ह्मणून ते स्वस्थ राहिले. पूर्वी **अण्णांच्या** मनांत अग्निहोत्र घेण्याचा फार हेतु होता. परंतु हा अकल्पित प्रसंग गुदरल्यामुळें तो बेत अर्थातच रहित झाला.

**अण्णांचा** हा निश्चय कांहीं सामान्य नव्हे. वयोवृद्ध जख्खड ह्मातारे सुद्धां स्त्रीवियोग झाल्यानें केवळ मनाच्या हौशीकरतां दुसऱ्याची पोर नाडतात, पण अशा समयीं **अण्णा** भरतारुण्यांत असूनही सावध राहिले. यावरून त्यांची दूरदृष्टि, दृढनिश्चय, आत्मसंयमन, सद्भक्ति इत्यादि अनेक गुण दिसून येतात. शिवाय, त्यांस पुढें लौकरच अर्धांगवायूनें गांठलें, तेव्हां ती गोष्ट त्यांस पूर्वीच ज्ञात झाली होती कीं काय, असेंही मनांत येतें. व मागें ज्या अंतर्साक्षित्वाच्या दोन गोष्टी येऊन गेल्या, त्यांतच ह्या तिसऱ्या गोष्टीचा समावेश होतो.

कधीं कधीं दुःखें येऊं लागलीं, ह्मणजे तीं मनुष्याचा अगदीं पाठपुरावाच करून सोडतात. भला असो कीं बुरा असो, त्यांस क्षमा ह्मणून माहितच नाहीं. **अण्णा**, वरच्या प्रसंगास सादर होऊन दोन वर्षें होतात न होतात, तों त्यांच्या मातोश्री निवर्तल्या. तेव्हांपासून त्यांनीं पागोटें घालण्याचें वर्ज केलें. मस्तकास धोतर, शालजोडी वगैरे वस्त्र गुंडाळण्याचें आजन्म व्रत पाळलें. व तेव्हांपासून **अण्णांचा** कल वैराग्या-

कडे वळला. त्यांनीं, राजगुरु **बाबामहाराजांचे** वडील चिरंजीव **आबामहाराज** ह्यांजपाशीं वेदांतशास्त्राचा अभ्यास केला. आणि **अमृतराय** ह्मणून सत्पुरुष होते, त्यांजपासून त्यांनीं मंत्रोपदेश घेतला. नंतर त्यांनीं पुराण सांगण्यास प्रारंभ केला.

**अण्णांस** प्रथमतः स्वतःचें काम कऱ्हाडास मिळालें खरें, तरी त्यांची लौकरच तेथून **मंसुरास** बदली झाली. तेथें त्यांनीं तीन वर्षें काम केलें. तेथून ते **साताऱ्यास** कागदपत्र समजून देण्याकरितां गेले असतां, **केशव भट माटे** भेटले, व त्यांजकरितां **'साधुपार्षद्लाघवम्'** हा ग्रंथ तयार केला वगैरे मजकूर वर येऊन गेलाच आहे. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं **अण्णांस** पक्षघातवायूचा अकस्मात् विकार झाला. आणि अर्धे अंग लटकें पडलें. बोलावयाचेंसुद्धां बंद! फक्त 'राम' मात्र ह्मणत. त्यावर अनेक औषधोपचार केले, तेव्हां बराच गुण आला. हिंडूं फिरूं लागले. पुराण पोथी वाचीत. त्यांचे वडील चिरंजीव **बापूसाहेब** वडिलांच्या बरोबर फारसे राहत नसत. दोन्हीही चिरंजिवांस **अण्णांनीं** शास्त्रव्युत्पत्ति सांगितली. **बापूसाहेबांस** तितकी गति झाली नाहीं. दुसरे चिरंजीव **रघुवीरराव ऊर्फ भाऊसाहेब** हे मात्र रात्रंदिवस **अण्णांपाशीं** असत. व त्यांची बुद्धिही उत्तम होती. त्यामुळें त्यांचा शास्त्रांत उत्तमच परिचय झाला. **अण्णांनीं** **भाऊसाहेबांस** श्रीमद्भागवतांतील रहस्य फारच प्रशस्त सांगितलें होतें.

शरीर परस्वाधीन झाल्यामुळें, नोकरीचा आयताच राजिनामा झाला. व राहिलेलें आयुष्य **अण्णा,** कऱ्हाड क्षेत्रांत, ईश्वरभजनांत, शास्त्रविचारांत, व काव्यरचनेंत घालवूं लागले. शके १७८१ सिद्धार्थी नाम संवत्सरांतील चैत्र मासापासून श्रीरामनवमीचा उत्साह **अण्णांनीं** आपल्या घरींच सुरू केला. त्यांत ते प्रेमानें भजन पूजन करून पुराण सांगत. रामावर दृढ विश्वास. जीव, भाव, विश्रांति, सुख, सर्व काय तें श्रीराम. रात्र असो, दिवस असो, सदासर्वकाळ मुखांत रामनामावलि. खाणें, पिणें, बसणें, उठणें, निजणें रामनामाशिवाय नाहीं.

**अण्णांच्या** विद्वत्तेचें, कवित्वशक्तीचें वगैरे वर्णन वर करण्यांत आलें. परंतु त्यांचा एक अद्वितीय गुण सांगावयाचा राहिला. तो कोणता? तर **श्रौतस्मार्तयज्ञकर्मविधींत** निष्णातता. याज्ञिकी कामांत **अण्णांचें** ज्ञान इतकें अपूर्व होतें कीं, त्या कामांत काशींतील पंडितांकडूनही त्यांस बोलावणीं येत. कोणताही याग झटला, कीं **अण्णांस** आमंत्रण असावयाचेंच. अशी त्यांची योग्यता होती. कऱ्हाडास प्रथमतः **काळ्यांनीं** यज्ञ केला. त्या वेळीं मोठमोठाले विद्वान् ब्राह्मण काशीहून आलेले होते. कण्वशाखीय **चंदावरकर** दीक्षित, **गजेंद्रगडकर** वगैरे विद्वत्समाज जमलेला होता. सर्वांनीं यज्ञाच्या पूर्व दिवशीं होमकुंडें वगैरे यथाशास्त्र तयार केलीं. तीं पहावयास **काळ्यांनीं** **अण्णांस** बोलावून नेलें. **अण्णांनीं** जाऊन सर्व व्यवस्था पाहिली. यज्ञमंडपांतून चालतां चालतां, ह्यांत अमुक अमुक गोष्टी यथाशास्त्र

झाल्या नाहींत, चुकल्या आहेत, असें ते ह्मणाले. तेथें ती सर्व तयारी केलेले कित्येक शास्त्री बसले होते; त्यांस हे **अण्णांचे** शब्द ऐकून फार विषाद वाटला. हे गृहस्थ कोण ह्मणून त्यांनीं चौकशी केली. व दफ्तरदार आहेत असें कळतांच, नवख्या शास्त्र्यांनीं त्यांच्या पश्चात् त्यांचा धिक्कार केला. ते ह्मणाले "सरकारी कामदारास ह्यांत काय समजतें ? त्यांस असें नव्हे असें ह्मणण्यास अधिकार काय ?" परंतु **अण्णांच्या** परिचयाचे जे लोक होते त्यांनीं, व त्यांचें नांव ज्यांनीं ऐकलें होतें त्यांनीं त्यांची खात्री केली कीं, ते फार विद्वान् व ज्ञाते आहेत. रात्रौ पुन्हा सर्व शास्त्री मंडळींची सभा भरली. तेव्हां **अण्णांनीं** शास्त्राधार दाखवून त्यांच्या होमकुंडरचनेंत व मंडपरचनेंत कसकशा चुका झाल्या होत्या, त्या पदरांत घातल्या. त्यावरून **अण्णांच्या** विद्वत्तेबद्दल व शास्त्रपरिज्ञानाबद्दल सर्वांची खात्री झाली. दुसऱ्या दिवशीं **अण्णांनीं** सांगितल्याप्रमाणें सर्व होमकुंडें व मंडपरचना फिरवून यथाशास्त्र केली. व **अण्णांची** फार वाहवा झाली. तो लौकिक काशीपर्यंत जाऊन पोंचला. त्यामुळें पुढें कोणत्याही यागासंबंधीं वाद पडला, तर तो निकालास **अण्णांकडे** यावयाचा, असा नियम झाला. कऱ्हाडामध्यें दुसरा यज्ञ शके १७८५ मध्यें **शिदु भाऊ गरुड** यांनीं केला. त्यांतही **अण्णाच** प्रमुख होते. याज्ञिकीमध्यें व शास्त्रार्थामध्यें **अण्णांचें** वजन अगदीं पहिल्या प्रतीचें होतें. **श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य** हेही तीर्थ प्रसाद देतांना प्रथम **अण्णांस** देऊन त्यांचा बहुमान करीत. **अण्णांसारखी** बुद्धि मोठमोठ्या विद्वानांतही फार विरळा !

**अण्णांचे** द्वितीय चिरंजीव **भाऊसाहेब** नेहमीं **अण्णांजवळ** असत ह्मणून पूर्वीं सांगितलेंच आहे. थोरले चिरंजीव **बापूसाहेब** रिकामे होते. ते औंध येथें श्रीमंत **पंतप्रतिनिधींच्या** आश्रयास राहिले. ह्या गोष्टीस सुमारें तीन वर्षे झालीं, तों (इ. स. १८[illegible]) मुंबईस **विष्णुशास्त्री पंडित** यांनीं स्त्रीपुनर्विवाह सशास्त्र आहे, असा वाद उपस्थित केला. त्यांचा पराजय करणें **श्रीमज्जगद्गुरूंस** भाग पडलें. तेव्हां तो सर्व भार अर्थातच सर्व शास्त्रमंडळावर पडला. सातारकर पंडितांनीं **अण्णांची** प्रार्थना केली कीं, सर्व तयारी आपण करणें. **अण्णांनींही** ती गोष्ट मान्य केली. परंतु ह्या प्रसंगांतून परमेश्वर कसें पार पाडतो, ह्याची त्यांस मोठी चिंता पडली. ते औंध येथें जाऊन मोठ्या विचारांत पडले. तों एके दिवशीं रात्रीं त्यांच्या स्वप्नांत एक स्त्री येऊन तिनें **अण्णांच्या** मस्तकीं वरदहस्त ठेवून 'चिंता करूं नको' ह्मणून आशीर्वाद दिला. तेणेंकरून **अण्णांस** मोठा धीर आला. आणि ते त्या वादाच्या तयारीस लागले. सवालाखी अष्टयास सांप्रत **गोविंद धोंडदेव लिमये** ऊर्फ **रावसाहेब** वकील हे मोठे नामांकित गृहस्थ आहेत. हे संस्कृतांत चांगले निपुण असून त्यांच्या घरीं संस्कृत ग्रंथांचा पूर्वीपासून फार मोठा संग्रह आहे. त्या वेळीं त्यांचे वडीलही तसेच मोठे नामांकित होते. सबब **अण्णा** औंधाहून निघून अष्टयास

गेले. आणि तेथें दोन महिने मुक्काम करून प्रथम ऋग्वेदादि श्रुति चाळून त्यांवरील भाष्यें वगैरे पाहून त्यांत विवाहसंबंधानें काय काय नियम आहेत ते त्यांनीं काढले. नंतर स्मृतींची तपासणी केली. बरोबर लिहिण्यासाठीं कारकून वगैरे होते. याप्रमाणें सर्व टांचणें घेऊन परत औंधास आले. आणि तेथें '**विवाहतत्त्व**' नामक ग्रंथ तयार केला. ह्या इतक्या खटपटींत त्यांस हजार दीड हजार रुपये कर्ज झालें.

पुढें पुणें मुक्कामीं पुनर्विवाहासंबंधानें मोठा वाद होण्याचा निश्चय झाला. तेव्हां **श्रीमज्जगद्गुरु** शंकराचार्य–मठ संकेश्वर–ह्यांच्या स्वारीबरोबर अनेक शास्त्री पुण्यास गेले, त्यांतून **अण्णाही** पुण्यास गेले. व त्यांनीं ह्या पक्षाचे मुख्य वाद करणारे **नारायणाचार्य गजेंद्रगडकर** ह्यांस पुष्कळ साह्य केलें. तुळशीबागेंत व श्रीमान लोकांच्या घरीं **अण्णांचीं** पुराणें चालू झालीं. **अण्णांच्या** रसाळ वाणीनें पुण्य-पत्तनस्थ लोकांचीं मनें अगदीं प्रसन्न झालीं. मुंगीस रीघ नाहीं, अशा प्रकारची **अ-ण्णांच्या** पुराणास दाटी. शालजोडी किंवा धोतरजोडा **अण्णांच्या** अंगावर पडला नाहीं, असा दिवस नाहीं. पुनर्विवाहाचा वाद खलास झाल्यानंतर ते मुंबईस गेले. तेथेंही त्यांची चांगली वाहावा झाली. तेथून ते कुरुंदवाड, जमखिंडीकडे निमंत्रणा-वरून गेले. बहुत आदरसत्कार झाला. व **अण्णांच्या** बुद्धिमत्तेची फार तारीफ झाली. द्रव्यही बरेंच मिळालें. शालजोड्या तर पुष्कळच. सर्व शास्त्री मंडळांत फार वाहवा झाली. ह्या स्वारीमुळें, पुनर्विवाहाच्या वादाच्या तयारीस झालेलें कर्ज फिटलें, ही एक मोठ्या संतोषाची गोष्ट झाली. असो.

**अण्णांस** पूर्वीं अर्धांगवायूची विकृति झाल्याबद्दल सांगितलें आहे. तोच वि-कार मधूनमधून उलट घेत असे. तरी **अण्णा** हे वैद्यशास्त्रांत स्वतःच पारंगत असल्यामुळें, त्यांनीं स्वतःच्याच उपचारावर त्याचें स्तंभन करून पंचवीस वर्षें काढलीं! तरी तो झटका मधून मधून येत असे. **काळ्यांच्या** येथें सप्ताह चालला असतां तो झटका पुन्हा आला. आणि **अण्णा** पुन्हा निपरचित पडले. बोलणें सुद्धां बंद. '**राम**' येवढा शब्द मात्र तोंडांतून काढीत. अशी स्थिति होतांच **बापूसाहेब** औंधास होते, त्यांस बोलावून आणलें. तैलमर्दन वगैरे उपचार सुरू झाले. औंधास यजमानांच्या पदरीं **बाळशास्त्री बापट** या नांवाचे नामांकित वैद्य होते, त्यांस त्यांनीं आणविलें. ब्राह्मीचा पाला औषधास पाहिजे होता, तो **टेंभू** म्हणून कऱ्हाडाशेजारींच कृष्णातीरीं **लाट्यांचें** इनाम गांव आहे, तेथून आणविला. जळवाही लावल्या. त्यामुळें त्यांस गुण आला. ते चालूं लागले, रामायण वाचूं लागले. स्वतः जेवूं लागले. रात्रंदिवस **रामनाम**. रामाचें ध्यान व रामाचें भजन. असें त्यांचें एक वर्ष गेलें.

प्रतिवार्षिक संप्रदायाप्रमाणें चैत्रमासीं श्रीरामनवमीचा उत्साह आला. तो शे-वटचा उत्साह **अण्णांनीं** यथासांग व सप्रेम सिद्धीस नेला. त्याचीं स्थिरस्थावर

झाली. वद्यपक्षांतील दशमी येऊन ठेपली. उत्साहास पुष्कळ वैदिक ब्राह्मण येत, व मग आठ पंधरा दिवस कऱ्हाडासच राहत. त्याप्रमाणें ह्या उत्साहासही सांगलीचे दहा पांच असामी घनपाठी वैदिक आले होते. त्यांच्याशीं त्या दिवशीं शंकाप्रतिशंकांचें समाधान करीत **अण्णा** बराच वेळ बसले होते. **गणेश सीताराम शास्त्री** गोळवलकर, सुभेसाहेब इंदूर, हे कांहीं सरकार कामानिमित्त **विलायतेस गेले** होते, ते शुद्ध होण्याचा शास्त्रार्थ पाहण्यासाठीं एक दोन दिवसांपूर्वीं येऊन गेले होते. त्यांस **शुद्ध होण्यास हरकत नाहीं**, ह्मणून **अण्णां**नीं शास्त्रार्थ काढून देऊन मुहूर्त ही काढून दिला, व त्यांची इंदुरास रवानगी केली. शास्त्रिबुवांनीं **अण्णां**पुढें जातांना शंभर रुपये ठेवले.

नंतर दशमीच्या दिवशीं रात्रीं मध्यान्हीस **अण्णां**च्या पाठींतून एकाएकीं कळ निघाली बहुत घाबरे झाले. सर्वांनीं औषधोपचार सुरू केले. हल्लीं कऱ्हाडास संस्कृतज्ञ व सन्मान्य वकील **रामभाऊ भागवत** आहेत. त्यांचे वडील **विष्णुपंत** ह्यांचा व **अण्णां**चा फार घरोबा. ह्यास्तव त्यांस बोलावून आणून **अण्णां**नीं सांगितलें कीं, माझा आतां भरंवसा नाहीं. माझ्या मागें रामनवमीचा उत्साह चालावा, मुलांनीं चाकरी, नोकरी करूं नये, इत्यादि हेतु होते ते कळविले. नंतर नेहेमींप्रमाणें त्यांचें प्रेमळ भजन[1] चालू झालें. पाठींतील कळ अंमळ कमी झालीशी वाटली. असें करतां उजाडलें. **शके १७९५ चैत्रकृष्ण एकादशीच्या** दिवशीं, प्रातःकालींच **अण्णा** ह्मणाले मला फार तृषा लागली आहे. ह्मणून घरांत नैवेद्याची लौकरच तयारी केली. **अण्णां**नीं प्रातःकाळींच स्नान, संध्या, पूजा इत्यादि नित्यकर्म आटोपून खारकांच्या क्षीरीचा **दाशरथी रामचंद्रास** नैवेद्य समर्पण केला. नंतर अपराधस्तोत्र ह्मणून तीर्थ

---

१. श्रीरंगा ॥ दे मजला सत्संगा ॥ आलों शरण तुला १ रघुनाथा ॥ आवडो तव गुणगाथा ॥ आ० २ गोविंदा ॥ सोडविं विषयच्छंदा ॥ आ० ३ स्वानंदा ॥ विसरविं विषयच्छंदा ॥ आ० ४ श्रीकृष्णा ॥ दूर करीं धनतृष्णा ॥ आ० ५ रघुराया ॥ आवरीं आपुली माया ॥ आ० ६ गोपाळा ॥ उघडीं चिन्मय डोळा ॥ आ० ७ श्रीरामा ॥ दे मज भजनप्रेमा ॥ आ० ८ घनःश्यामा ॥ नेईं मजे निजधामा ॥ आ० ९ भगवंता ॥ तारीं विठ्ठलपंता ॥ आ० १०

२. अहं शैशवे क्रीडा नासक्तचेता, गृहीतं न ते जातुचिन्नाथ नाम ॥ क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं, क्षमस्वापराधं रघूत्तंस राम १ अहं यौवने कामिनीकृष्टचेता, गृहीतं न ते जातुचिन्नाथ नाम ॥ क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं, क्षमस्वापराधं रघूत्तंस राम २ मया नर्तिता लोकनिंदासु जिव्हा, गृहीतं न ते जातुचिन्नाथ नाम ॥ क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं, क्षमस्वापराधं रघूत्तंस राम ३ कृताः कौतुकाद्भूरिशो ग्राम्यगाथाः, श्रुतं नैव ते नीरदश्याम नाम ॥ क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं, क्षमस्वापराधं रघूत्तंस राम ४

घेऊन तुलसीपत्राचा स्वीकार केला. व अतिशय तृषा लागली होती ह्मणून थोडा क्षीरीचा प्रसाद सेवन करून उदक प्राशन करण्याकरितां पाण्याचें पंचपात्र हातीं घे-तलें. नित्य संप्रदायाप्रमाणें प्राशनापूर्वी '**श्रीराम**' असा मोठ्यानें नामघोष करून उदक मुखांत घातलें. झालें! संपलें! त्यांचे **पंचप्राण** रामनामाबरोबरच **चित्स्व-रूपास मिळून** त्यांचा देह मात्र अवशेष राहिला. हातांतील पंचपात्र धाडकर खालीं पडलें! जिवास क्लेश न होतां, एकादशीला, आणि अशा प्रकारें मरण येणें ह्मणजे कांहीं सामान्य पुण्याई नव्हे!

घरांतील मनुष्यें बाहेर येऊन पहातात तों हा विपरीत प्रकार! **बापूसाहेब** व **भाऊसाहेब** उभयतां चिरंजीव औंधास होते. त्यांस ताबडतोब मनुष्य पाठवून आणलें व सर्वांनीं **अण्णांचें** देहसार्थक केलें. **अण्णांच्या** मागें रामनवमीचा उ-त्साह अद्यापि कऱ्हाडास चालू आहे. व वडील चिरंजीव **बापूसाहेब** चाकरी नो-करी न करितां घर सांभाळून आहेत.

**अण्णांचे** द्वितीय चिरंजीव **रघुवीरराव** ऊर्फ **भाऊसाहेब** हे **अण्णांच्या** सान्निध्यास असून चांगले व्युत्पन्न व कवि होते, हेंही वर सांगण्यांत आलेंच आहे. सबब त्यांच्या विषयींही येथें दोन शब्द सांगणें इष्ट आहे. **अण्णांच्या** '**गजेंद्र-चंपू**' या काव्यावर **भाऊ साहेबांनीं** टीका केलेली आहे. आणि ती सर्वोत्कृष्ट आहे. ह्यावरून **अण्णांच्या** बहुतेक काव्यावर **रघुवीररावांचीच** टीका असावी असें वा-टतें. परंतु **अण्णांचे** सर्व ग्रंथ पहावयास न मिळाल्यामुळें निश्चित सांगणें कठीण आहे. **अण्णा** समाधिस्थ झाल्यानंतर त्यांविषयीं स्तुतिपर कांहीं संस्कृत कविता ह्यांनीं केलेल्या आमच्या पहाण्यांत आल्या. त्यांपैकीं एक श्लोक प्रथमारंभीं दिलाच आहे. त्यांत वडिलांच्या '**सत्तारकं०**' ह्या श्लोकांतील श्लेषाची धाटी किंवा प्र-तिबिंब कसें उठविलें आहे तें वाचक जाणतीलच. **गजेंद्रचंपूच्या** टीकेच्या शेवटीं-ही **अण्णांबद्दल** बरेच उद्गार **रघुवीररावांनीं** काढले आहेत. त्यांपैकीं एक श्लोक असा आहे:—

**श्रीरामनाम नवमौक्तिकमालभारी**
**ग्रीवः सदाचरणवर्तनसक्तचित्तः।**
**वाराणसीजठरखम्यविगीतरतं**
**विद्वद्वरो विजयते मम देशिकेशः॥**

ह्या वरून **रघुवीररावजींची** विद्वत्ता व कवित्वशक्तिही कांहीं सामान्य न-व्हती, हेंही वाचकांच्या लक्षांत येईल. **गजेंद्रचंपूवरची** टीका **रघुवीर-**

रावजींनीं १७८६ मध्यें समाप्त केली. तिच्या शेवटीं त्यांनीं कालनिर्देश व नामनिर्देश येणेंप्रमाणें केला आहे:—

**ऋत्वष्टवाजिविधुसंमितवत्सरेस्मिन्**
**रक्ताक्षिनाम्नि सुदि भाद्रपदे दशम्यां।**
**व्याख्यां समापयदिमां रविसूनुवस्त्रे**
**तस्यात्मजो हि रघुवीरपदाभिधेयः ॥**

**अण्णां**च्या पश्चात् **रघुवीररावं**ही फार दिवस राहिले नाहींत. दोन वर्षांच्या आंतच तेही निवर्तले. सांप्रत त्यांचे चिरंजीव आहेत. असो. **अण्णां**सारख्या सत्पुरुषाचें चरित्र यथामत्या वाचकांस सादर केलें आहे. तें श्रीरामचंद्रास व परलोकवासी **अण्णां**च्या आत्मस्वरूपास प्रिय होवो. आणि तें आमच्या वाचकांचें मन संतोषित करो.[१]

**ऐशा उत्तमगुणीं विशेष ॥ तयास ह्मणावें पुरुष ॥**
**जयाच्या भजनें जगदीश ॥ तृप्त होय ॥**
**उत्तम गुणीं शृंगारला ॥ ज्ञानवैराग्यें शोभला ॥**
**तोचि एक जाणावा भला ॥ भूमंडळीं ॥** —दासबोध.

---

१ सदरहू चरित्राचा गोषवारा अण्णांचे वडील चिरंजीव रा. रा. सीताराम पंत ऊर्फ बापुसाहेब ह्यांनीं कृपा करून सांगितला आणि तोही संगतवार. याबद्दल आम्ही त्यांचे फार फार आभारी आहोंत. तसेंच बापूसाहेबांचा व आमचा प्रत्यक्ष परिचय नव्हता म्हणून आमचे विद्वान् मित्र रा. रा. गंगाधर रामकृष्ण ऊर्फ नानासाहेब किराणे हे तसदी घेऊन तेथपर्यंत आले, व त्यांनीं या कामांत मनःपूर्वक मदत केली, याबद्दल त्यांचे जितके उपकार मानावेत तितके थोडेच आहेत. अण्णांचा फोटोग्राफ रा. किराणे ह्यांनींच मिळवून दिला ह्या तसदीबद्दलही आम्ही मनःपूर्वक क्षमा मागतों. आमचे मित्र रा. रा. श्रीरंगराव इन्ग्रेव्हरच्या कामांतील प्रोफेसर ह्यांनीं फोटोबरहुकूम प्रतिमा तयार करून दिली ह्याबद्दल त्या सर्वांचें अत्यंत आभार आहेत.

---

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, No. 23, Kolbhat Lane, Kalkadevi Road, BOMBAY.

# केरळकोकिल.

पु० ७] [अं० १०

## नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग,
## के. सी. एस् आय्. मुंबई हायकोर्टाचे जज्ज,
### ह्यांजवर मृत्यूचा घाला !!!



हाय हाय! हे आमचे नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग! हे तारीख ३१ आगष्ट स. १८९३ रोजीं रात्रीं स्वर्गवासी झाले! आमच्यांतील एक मोहरा गेला! फार मोठा घात झाला. हिंदूंचा कैवारी, समाजाचा धुरीण, प्रभूचा हात, राष्ट्राचा टेंका, विद्येचा मुकुटमणि, सौजन्याचा पुतळा, वाचेचा बृहस्पति, आणि विद्येचा प्रासाद—नव्हे देशाचा प्राण—गेला! पार निघून गेला! मूर्ति जाऊन कीर्ति मात्र शिल्लक राहिली. किती क्षणभंगुर

मृत्युलोकची ही वस्ती? त्यांचें वय अवघें बेचाळीस वर्षांचें होतें. इतक्या अल्पवयांतच त्यांजवर मृत्यूची कुऱ्हाड पडावी, हें त्यांच्या कुटुंबाचेंच नव्हे, तर ह्या सर्व देशाचें मोठें दुर्दैव होय.

ह्यांचे विद्वत्तादि अनेक गुण फार प्रशंसनीय होते. नापास हा शिक्का त्यांस कधीं ठाऊकच नाहीं. हे आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षी म्याट्रिकेशन परीक्षेंत पास झाले. पुढें लवकरच बी. ए. झाले. दोन वर्षें लोटलीं नाहींत तोंच एम्. ए. झाले. आणखी दोन वर्षांत मोठीं महत्वाचीं कामें चालवून एल्. एल्. बी. झाले. त्याच्या पुढील दोन वर्षांत बारिष्टरची परीक्षा उतरली! नंतर के. सी. एस्. आय्. इत्यादि महत्वाच्या पदव्या, कायदे कौंसिलाच्या जागा इत्यादि सन्मान मिळवीत मिळवीत शेवटीं ते मुंबई हायकोर्टाचे जज्ज झाले. आणि त्यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सलरचा मोठा मान मिळविला. हा मान आमच्या लोकांत प्रथम ह्यांसच मिळाला. सरकारी नोकरी पतकरीपर्यंत हे राष्ट्रीय सभेचे मोठे भक्त होते; ह्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेचें इंग्रजी भाषेंत गद्यपद्यमय फार उत्कृष्ट भाषांतर केलें आहे. कित्येक इंग्रजांचें असें ह्मणणें होतें कीं, रामायण हें मूळ **होमर**च्या इंग्लिश काव्यावरून रचलें. त्यावर नामदार **तेलंग** ह्यांनीं फारच सुरेख निबंध लिहून असें सिद्ध केलें कीं रामायणावरूनच **होमर**नें काव्य रचलें आहे. ह्या लेखास मोठमोठ्या इंग्लिश विद्वानांनीं सुद्धां मान डोलविली. ह्यांची वक्तृत्वशैली व इंग्लिश भाषण फारच अप्रतिम असे. त्यांच्या मधुर व विचारशील भाषणावरून इंग्लिश लोक त्यांस प्रसिद्ध वक्ते **डिमास्थिनीस**, व **एडमन्ड बर्क** ह्यांची उपमा देत. शिवाय, त्यांच्या अंगीं विनय, सौजन्य ह्या श्रेष्ठ गुणांचें निरंतर वास्तव्य असे.

असा पुरुषश्रेष्ठ अकस्मात् व अकालीं मृत्युमुखीं पडल्यामुळें आमच्या देशाची फार मोठी हानि झाली. सर्व देश हळहळला. झाडून साऱ्या वर्तमानपत्रांनीं व मासिकपुस्तकांनीं त्यांचें सविस्तर चरित्र व गुणानुवाद गाऊन आपलें महद्दुःख व्यक्त केलें. तसेंच आह्मीही केल्यानें ती हानि कांहीं भरून येते असें नाहीं, तथापि शोकाकुल हृदयाच्या सांत्वनार्थ ह्मणून आह्मीही आमच्या **कोकिळ**चे प्रिय आश्रयदाते नामदार **तेलंग**

साहेब यांच्या **सत्कीर्तिरूप देहावर** थोडीशी **पद्यकुसुमवृष्टि** करून मनाचें किंचित समाधान करून घेतों.

### श्लोक. ( मालिनी. )

शिवशिव यमराया तूज नाहीं विवेक, हरिशि पुरुषरत्नें आमुचीं एक एक।
भरतजननि झाली बापुडी दीन गाय, विविधसुतवियोगें मोकली धाय धाय ॥१॥
सुजन विबुध मंत्री आणि सन्मान्य राजे, वरि वरि हरपोनी घाव होतात ताजे।
कितितरि हतभागी वृद्ध ही आर्यमाता, फिरफिरुनि पहाया वांचली पुत्रघाता ॥२॥
टपुनि सुफल टोंची चंचुनें जेंवि काक, अवचितचि विटाळी श्वान कीं शुद्ध पाक।
नरमणि निपजे जों लोककल्याणकर्ता, त्वरित झडपि त्यातें काळ हा प्राणहर्ता ॥३॥
गुरुजनवर गेला **आपटे** बुद्धिमंत, प्रखर **सरदि राजा माधवा**चाहि अंत।
निजजनहितवादी सुज्ञ **गोपाळराव**, त्यजुनि सकल गेले राहिलें शेष नांव ॥ ४ ॥
विमल सरलवृत्ती **जावजी** साधु शुद्ध, गहन रसिकता त्या **मोडकां**ची प्रसिद्ध।
कवनसुमनगंधद्वार **दुर्गाप्रसाद**, हर हर कितिकांची सांगुं मी आजि याद ॥ ५ ॥
रविसम उदया ये एक **तेलंग** खासा, प्रतिकुल विधि टाकी त्यावरी काळफांसा।
अनुपम झळके तद्बुद्धिकीर्तिप्रकाश, यम करिं निमिषार्धें पाश टाकूनि नाश ॥६॥
विकल सकल झालों देशबंधू-वियोगें, करपुनि तरु जाती अग्निच्या जेंवि योगें।
हळहळ करितांना शीणली लोकवाणी, नयन सुकुनि गेले आटलें सर्व पाणी ॥७॥
विबुधजनशशीचा राहुनें ग्रास केला, विमलतर यशाचा सूर्य अस्तास गेला।
रुचिर सुचिर आशा—पद्म तें दग्ध झालें, अखिल लुटुनि नेलें सौख्यभांडार काळें ८
हिसकुनि यमरायें घेतला कोहिनूर, सदन सुजनतेचें जाहलें आजि चूर।
उमळुनि पडला हा द्वारिंचा कल्पवृक्ष, नृपतिजनपदाचे छेदिले भव्यपक्ष ॥ ९ ॥
अतुल सकल विद्या काय देशाभिमान, सविनय नयशास्त्रीं केवढा थोर मान।
अपजय, चुकुनीही ज्यास नाहींच ठावा, अघटित महिमा हो काय त्याचा वदावा १०
सदय बहु विवेकी पूर्ण सौजन्यखाणी, सुरगुरुसम चाले सारखी गोड वाणी।
वदति जनपदाचा स्वच्छ तारा धनी ते, परजन परठायीं डोलती लेखनीतें ॥११॥
कवन करुनि **गीता** दाविली आंग्लभाषीं, पति विधितनयेचा कोण हो जोड त्याशीं।
मधुर वचनिं झाले लोक पाश्चात्य गर्क, प्रमुदित हृदयानें बोलती हाच **बर्क** ॥१२
रघुपतिचरिताला मूळ त्या **होमरा**चें, अनुचित मत ऐसें ऐकुनी इंग्रजांचें।
ह्मणत भुलुं नका हो स्पष्ट तीं शुष्क थाप, उलट पदरिं त्यांच्या घातलें चोख माप १३

अहह ! फिरुनि ऐसा कां मिळे मोहरा जी, नृपतिजनपदाला फार हो फार राजी ।
त्वरित उणिव त्याची कोण काढी भरून, द्दढतर बसलों कीं थोर आशा धरून १४
शिशुपण सरतें तों उक्त तारुण्य लागे, तरुणपण सरे तों येत वार्धक्य मागें ।
सरलतर असे ही शृंखळा सर्व ठीक, परि तुटक कराया मृत्युला मोकळीक ॥१५॥

---

## विठोबाअण्णा दप्तरदार ह्यांच्या चरित्राचें

# परिशिष्ट.

### अण्णांच्या कवितांतील कांहीं उतारे.

**जयंति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।**
**नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥ १ ॥**

कवींना जरामरणाचें भय नाहीं. कारण, त्यांचा कीर्तिरूप देह, ह्या जगांत कायमच असतो. **अण्णा** परलोकवासी झाले तरी, त्यांच्या दोन प्रतिमा शिल्लक राहिल्या आहेत. एक देहाची प्रतिमा. ही सांप्रतकालच्या कुशल लोकांच्या धर्मानें मिळाली. ती प्रथमारंभीं दिलीच आहे. दुसरी प्रतिमा त्यांच्या सूक्ष्म देहाची–ह्मणजे अंतःकरणवृत्तीची. ही सर्वांत श्रेष्ठ होय. कारण, हिच्यामुळेंच देहप्रतिमेला पूज्यत्व आलें आहे. अंतःकरणवृत्तीची प्रतिमा ह्मणजे, त्यांच्या मुखांतून निघालेले शब्द–अर्थात् कवित्व: तें अत्यंत मधुर, प्रासादिक व उपदेशपर, अतएव ग्राह्य होय. ह्याकरितां त्यांतील कांहीं उतारे देतों.

**'सुश्लोकलाघवां'**तील पद्यांचे एक दोन मासले पूर्वीं दिलेच आहेत. आतां **'गजेंद्रचंपू'**तील कांहीं श्लोक देतों. शब्दलालित्य, प्रासप्राचुर्य, आणि श्लेषालंकार हे **अण्णां**च्या कवित्त्वांतील अपूर्व गुण होत. चंपूच्या आरंभींचा, खालचा श्लोक पहा:—

**ररक्ष यः कुंजरचक्रशक्रं नक्रस्य चक्रेण विपाट्य वक्त्रम् ।**
**सदावनस्थः खरहेतिहस्तो हरिर्विरीवर्ति विलक्षणोऽसौ ॥ १ ॥**

ह्या श्लोकांतील शब्दसौष्ठव, आणि प्रासप्राचुर्य, हीं श्रुतीवरूनच व्यक्त होतात. आतां अर्थलाघव पहा:— अर्थ—

"आपल्या चक्रानें–सुदर्शनानें–नक्राचें मुख विदारण करून गजेंद्राचें संरक्षण करणार्‍या, निरंतर जगताच्या संरक्षणाविषयीं तत्पर, हस्तामध्यें तीक्ष्ण शस्त्र धारण करणारा, एतादृश प्रकारचा विलक्षण–अनिर्वचनीय विशेषशाली–हरि–भगवान्–सर्वोत्कर्षे करून शोभतो."

आतां हरि विलक्षण कसा? तर, लोकांमध्यें हरि ह्याचा अर्थ सिंह असा आहे. तेव्हां सिंहाचा स्वभाव ह्मटला ह्मणजे हत्तीचें गंडस्थळ विदारण्याचा आहे, त्याचें संरक्षण करण्याचा नव्हे. ह्या हरीनें तर गजेंद्राचें संरक्षण केलें. हें हरिस्वभावास विपरीत होय. ह्मणून हा हरि विलक्षण. आणखी, हरि ह्मणजे सिंह हा सदा-वनस्थ-सदा सर्वकाळ वनांत राहणारा. आणि हा हरि, सदा अवनस्थः-जंगलांत राहणारा नव्हे-प्रत्येकाच्या हृदयांत वास करणारा अथवा, निरंतर जगाच्या अवनाविषयीं-रक्षणाविषयीं-तत्पर असा. तो हरि खरहेतिहस्तो ह्मणजे तीक्ष्ण नखांनीं मंडित-आणि हा खरहेतिहस्तो-तीक्ष्ण आयुधानें-सुदर्शनानें-मंडित असा. परंतु कोणास उपद्रव देणारा नव्हे. तर उलट, संरक्षण करणारा असा आहे. (येथें सिंहाच्या पंजाचा आकार आणि सुदर्शनाचा आकार, ह्यांची सादृश्यताही ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.) ह्मणून हा हरि विलक्षण होय. 'विलक्षण' ह्या शब्दांतही एक श्लेष आहे. विः-पक्षी-गरुडः-लक्षणं-ध्वजचिन्हं- गरुड आहे ध्वजाचें चिन्ह ज्याचें, असा हरि, ह्मणून 'विलक्षण' अथवा वि-गरुडं-रक्षतीति विलक्षणः-गरुडाचा प्रतिपाळ केला आहे ज्यानें असा हरि, ह्मणून 'विलक्षण,' 'रलयोरभेदादिति' या न्यायानें संस्कृतांत ल च्या ठिकाणीं र चा आदेश करण्याची चाल असल्याचें प्रसिद्धच आहे.

असा श्लेषार्थ साधणें, हें कांहीं सामान्यबुद्धीचें काम नव्हे. बरें; एक वेळ मोठ्या माराकुटीनें कोणी तरी एखादें पद्य तयार करील. परंतु **अण्णांच्या** बुद्धीस ही गोष्ट ह्मणजे अगदीं सहज होती. कारण पुन्हा दुसरा श्लोक पहाः—

**नगेंद्रमूर्धनिवसन् नागभूषणकीर्तनैः ।**
**दोषाशयभवस्वप्नोऽशुभोपि शममृच्छति ॥ १० ॥**

अर्थ-"नगेंद्र-पर्वतश्रेष्ठ-त्रिकूटाचल-त्याच्या मूर्धनि-शिखरावर-वसन् राहणारा नागभूषण-गजेंद्र-त्याच्या कीर्तनैः-कथाश्रवणानें-दोषाशय-रात्रीं निद्रेमध्यें-भव-पडलेलें-स्वप्न अशुभोपि- अमंगल असलें तरी-शमम् ऋच्छति-कल्याणकारक होतें-"

दुसरा अर्थ-( यास दृष्टांत जसें:- ) नगेंद्र-पर्वतश्रेष्ठ-हिमाचल-त्याच्या मूर्धनि वसन्-शिखरावर राहणारा-नागभूषण-नाग ( सर्प ) आहेत भूषणें ज्याचीं असा-शंकर, त्याच्या कीर्तनैः-कथाश्रवणानें-दोष आशय-अनेक दोषांनीं-पातकांनीं-युक्त असा-भव-संसार-अशुभोपि-हानिकारक आहे तरी-स्वप्नवत् होऊन शुभप्रदच होतो. ( त्याप्रमाणें. )

अथवा नागस्य भूषणभूतः-श्रीनारायणः-असा अर्थ घेतला तर आणखी एक अर्थ निष्पन्न होतो. रघुवीररावजींनीं आपल्या टीकेंत आणखीही एक दोन श्लेषार्थ काढले आहेत, परंतु ते वरच्यांहून फारसे सरस नसल्यामुळें, ते सांगत वसण्याची येथें आवश्यकता नाहीं.

आतां कदाचित् अशी शंका येईल कीं, **अण्णा** हे श्लेषालंकार साधण्यामध्येंच नेहेमीं तत्पर असतील. व असे श्लेषार्थ साधण्यांत जरी एक प्रकारचें वैचित्र्य आहे, तरी मोठीशी मातबरी नाहीं. कालिदासासारखीं सृष्टिसौंदर्याचीं अप्रतिम वर्णनें, हींच खऱ्या कवित्वप्रसादाचीं दर्शक होत. तर खालील दोन तीन श्लोकांकडे पाहिलें ह्मणजे त्यांतही **अण्णांचें** प्रावीण्य कसें होतें तें दिसून येतें.

गजेंद्र आपल्या करिणी व छावे यांसहवर्तमान ज्या सरोवरावर जलक्रीडा करावयास गेला, तें सरोवर कसें होतें?:—

> **शरद्गगननिर्मलं विकचपद्ममालाकुलम्**
> **भ्रमद् भ्रमरसंकुलं बहलहंसकोलाहलम् ।**
> **परागभरपंकिलं रचितसिद्धकौतूहलम्**
> **नृणां नयनमंजुलं मृदुमरुच्चलद्वंजुलम् ॥ १ ॥**

अर्थ—"शरदृतूंतील आकाशासारखें स्वच्छ, प्रफुल्लितकमलपंक्तींनीं विराजमान, गुंजारव करणाऱ्या भ्रमरसमुदायानें युक्त, हंसांच्या कलकलाटानें प्रतिध्वनित झालेलें, कमलपरागांनीं सुगंधित झालेलें, मंद मंद वायूच्या झुलुकीनें ज्याच्या किनाऱ्यावरील वेत हळू हळू हालत आहेत, ज्याच्यामध्यें रमणीयता स्वभावसिद्धच भरून राहिली आहे, कोणत्याही मनुष्यानें त्याच्याकडे पाहिलें तर नयन तृप्त व्हावेत, (अशा प्रकारचें होतें.)"

**अण्णांचा** अगदीं साध्या वृत्तांतील श्लोक घेतला, तरीसुद्धां त्यांत अर्थगौरवाचें शब्दलालित्य असतें. खालचा श्लोक पहा. गजराजाची स्वारी अरण्यांतून चालली आहे:—

> **उद्दंडशुंडो दानार्द्रगंडोऽहिंडत कानने ।**
> **वेतंडमंडलाधीशो वृक्षखंडानि खंडयन् ॥ २ ॥**

अर्थ—"प्रचंड आहे शुंडादंड ज्याचा, ज्याच्या गंडस्थलांवरून मदाचा स्राव चालला आहे, असा तो—वेतंड मंडलाधीश—गजेंद्र, वृक्ष कडाकड मोडीत, अरण्यांतून हिंडत होता."

गजराज गिरिशिखरावर निघाले, तेव्हांचा कल्लोळ:—

> **सत्वान् व्याकुलयंस्तटान् विदलयन् वृक्षान् समुन्मूलयन्**
> **भूभागांश्चलयन् रजः कवलयन् स्वांगं समुद्धूलयन् ॥**
> **भृंगांस्तुंदिलयन् दृशौ चपलयन् कर्णाचले स्फालयन्**
> **नागस्तत्र चचार शैलशिखरे शुंडां समान्दोलयन् ॥ १ ॥**

अर्थ—"प्राणिमात्रास थर थर थर कांपवीत, पर्वतांच्या कड्यांस टकरा देऊन त्यांस फोडीत फोडीत, वृक्षांस उपटून टाकीत, सोंडेमध्यें धूळ भरून ती आपल्या

अंगावर उडवीत, भ्रमरांस आपल्या मदानें पुष्टि देत, गर गर गर डोळे फिरवीत, पंख्याप्रमाणें कानांचे फटकारे मारीत, आपली प्रचंड शुंडा हिकडून तिकडे व तिकडून हिकडे हालवीत हालवीत, तो गजेंद्र त्या पर्वतशिखरावर चालला."

गजसमुदायानें जशी धरणी दणाणून जाते, तसेंच अण्णांच्या शब्दसमुदायानें रसिकजनांचें हृदयही अगदीं दणाणून जातें, यांत कांहीं शंका नाहीं. गजेंद्राची पुढील लीला, किती भयप्रद आहे पहा !

**उद्यद्गंडस्थकंडूविभवभरवशव्याकुलीभूतचित्तो**
**येषां स्कंधेषु नागः सपदि घनघनं गंडपालीं जघर्ष ॥**
**ते भज्यंत द्रुमाग्र्या अधिकतरमथ व्यग्रचित्तस्य तस्या-**
**भूवन् संघर्षलीलारसपरिषहणे गंडयोर्गंडशैलाः ॥ ८ ॥**

अर्थ—" गंडस्थळांत उत्पन्न झालेल्या दुःसह कंडूच्या असह्य वेदनेनें वेडावलेला गजेंद्र, वृक्षांच्या शाखांस आपलें मस्तक घांसूं लागला. त्यामुळें ते वृक्ष मोठमोठाले होते तथापि ते कडाकड मोडून पतन पावले. या योगानें त्याचा कंडू शमन तर झाला नाहींच, पण उलट वाढला मात्र ! ह्यास्तव त्यानें पर्वतांशीं टक्कर मारण्यास प्रारंभ केला. परंतु त्याच्या त्या लीलेनें त्या विचाऱ्या पर्वतांचाही चुराडा होऊन त्यांच्या शिळा दाही दिशांस उडाल्या !"

हें गजेंद्रलीलेचें शाब्दिक वर्णन ऐकूनच मन किती थक्क होतें ! आणखी एक मनास सुप्रसन्न करणारा ह्याच विषयावरील श्लोकः—

**सकलभः कलभेषु चरत्सु यः समदयो मदयोगविघूर्णितः ।**
**चलकरोलकरोचितविग्रहो नगमना गमनार्दितपादपः ॥ १ ॥**

अर्थ—" मदस्रावानें उन्मत्त झालेला, आपल्या भोंवतीं इतस्ततः फिरणारे छावे यांवर समदृष्टि ठेवणारा, वारंवार शुंडादंड हालवून चीत्कार करणारा, अंगावरील केशांनीं शोभिवंत दिसणारा, महान् तेजःपुंज असा गजेंद्र, वृक्षादिकांस तुडवीत पर्वतावर निघाला."

ह्याप्रमाणें गजेंद्राची स्वारी सरोवरावर येऊन थडकली, तेव्हांचा थाटः—

**समं समंताद्विचरत्करेणुर्व्योमांगणोद्धूलितसांद्ररेणुः ।**
**उत्सादितानेकतटस्थवेणुः सरोवरं प्राप महाकरेणुः ॥ १ ॥**

अर्थ—" बरोबर आपल्या स्त्रिया घेऊन, आकाशांत धूळ उडवीत उडवीत, व तीरावरचे वेळू उपटीत उपटीत, गजेंद्राची स्वारी सरोवरावर येऊन थडकली."

वरील वर्णन वाचतांना आपण 'वुड्सची न्याचरल हिस्टरी'च वाचीत आहों, असें कोणास वाटणार नाहीं ? सिलोनांतील किंवा मलबारांतील हत्तींचे कळप पाहून हें लिहिलेलें आहे, असें कोण न ह्मणेल ? खरोखर मलबारस्थ एखाद्या कवीनें हें वर्णन

केलें असतें, तर विशेष आश्चर्य मानण्याचें कारण नव्हतें. कारण त्या देशांत जंगली हत्तींचे कळप, त्यांच्या लीला दृष्टीपुढें असण्याचा संभव. परंतु त्याच रानहत्तीच्या लीला, जेथें जंगली हत्ती स्वप्नांत सुद्धां पाहण्यास मिळणार नाहीं, अशा करहाटस्थ कवीनें इतक्या मनोरम वर्णन केल्या; तेव्हां त्याच्या अचाट कल्पनाशक्तीची किती ह्मणून तारिफ करावी !

चंपूंत कोठें कोठें सरोवराचें व शंकराचें सादृश्य वर्णन केलें आहे, कोठें कोठें गजराजाची व मेघराजाची स्पर्धा श्लेषालंकारांत व्यक्त केली आहे. असे एक आणि दोन ! किती ह्मणून या काव्यांतील चमत्कार सांगावेत ? आणि कोठपर्यंत उतारे घ्यावेत ? कुबेराच्या भांडारांत रत्नपारख्याची जी दशा, तीच येथें आमची. चंपूंतील गद्य तर पद्याहून कांकणभर सरसच आहे असें वाटतें. असो. स्थलसंकोचास्तव आतां दुसऱ्या कवितांकडे वळूं.

दुसऱ्या **अण्णां**च्या कविता ह्मणजे त्यांच्या नित्याच्या भजनांत प्रेमामृतानें भरलेलीं त्यांच्या मुखांतून निघालेलीं रसाळ पदें[1]. **अण्णा** हे प्रत्यहीं श्रीरामाचें मनोभावानें भजन करीत. तें इतकें प्रेमळ, इतकें गोड, व इतकें उपदेशपर असे कीं, तेणेंकरून त्यांच्या स्वतःच्या नयनांत प्रेमाश्रूंच्या धारा लागत, येवढेंच नव्हे, तर श्रोत्यांचेंही अंतःकरण सद्गदित होऊन जात असे. आमच्या बाळपणांत आमचें बिऱ्हाड **अण्णां**च्या घराशेजारींच असल्यामुळें आह्मांस **अण्णां**च्या दर्शनाचा व भजनाचा लाभ अनेक वेळ घडला आहे. व त्या वेळीं भक्तिभावानें तदाकार वृत्तिही कांहीं वेळ बनलेली आहे. परंतु त्या वेळीं वय फार लहान असल्यामुळें अधिक महत्वाचा लाभ घडला नाहीं. असो. **अण्णां**च्या भजनास पुष्कळ लोक जमत, व शिष्यत्वाच्या नात्यानें त्यांच्या पादारविंदीं मिलिंदायमान झालेले लोकही कांहीं कमी नव्हते. त्यांत एक अंबाजीपंत बापू वेडेकर या नांवाचे गृहस्थ आमच्या फार परिचयाचे असत. ते नेहेमीं त्यांच्या सेवेंत सादर असत. मग **अण्णां**च्या ज्ञानभांडारापैकीं, त्यांनीं किती लुटलें असेल, तें परमेश्वरास माहित ! **अण्णां**चीं संस्कृत व प्राकृत पदें अनेक आहेत. तीं त्यांनीं खऱ्या प्रेमानें, खऱ्या भक्तीनें, खऱ्या विश्वासानें श्रीरामचंद्रचरणारविंदीं अर्पण केलीं असल्यामुळें अत्यंत प्रसादयुक्त आहेत, ह्यास्तव त्यांतीलही थोडासा मासला वाचकांपुढें ठेवणें उचित दिसतें.

खालीं लिहिलेलें पद अगदीं साधें दशावतारस्तवाचें आहे. तरी त्याची जडणी किती सुंदर आहे पहाः—

---

१ ह्या पदांचें "विठोबा अण्णाकृत पदसमूह" या नांवाचें एक स्वतंत्र पुस्तक रा. रा. रघुनाथ रामकृष्ण भागवत सावंतवाडीकर यांनीं छापविलें आहे. त्यांत अनेक पदें, आरत्या, ध्यानें, स्तोत्रें, गद्यपद्यसंवाद वगैरे प्रकरणें आहेत. रसिक जनांनीं तो संग्रह पाहण्याची संधि व्यर्थ दवडूं नये.

( इसतनधनकी-ह्या चालीवर. )

शुद्धबुद्ध परिपूर्णपरात्पर ॥ जयपरमेश्वर उरगशयनकर ॥ १ ॥
प्रलयपयोधौ मीनरूपधर ॥ जयवैवस्वत मुनिहिततत्पर ॥ २ ॥
सागरमथने कूर्मरूपधर ॥ जयमंदरधर सुरवरसुखकर ॥ ३ ॥
वराहविग्रह जयभूद्धारक ॥ हिरण्याक्षदितिकुमारमारक ॥ ४ ॥
जयनरसिंह हिरण्यविदारण ॥ प्रऱ्हादपरित्राणपरायण ॥ ५ ॥
जयबटुवामन बलिबंधनकर ॥ शक्रसुखप्रद भुवनमनोहर ॥ ६ ॥
परशुराम जय भृगुकुलदीपक ॥ हैहयघातक क्षत्रकुलांतक ॥ ७ ॥
जयरघुनंदन सीतानायक ॥ रावणकंदन सत्सुखदायक ॥ ८ ॥
जयकृष्ण विभो व्रजपतिनायक ॥ कंसध्वंसक पांडवपालक ॥ ९ ॥
जयबुद्ध विभो असुरविमोहन ॥ योगिकुलेश जिनप्रियनंदन ॥ १० ॥
जयकलकि विभो ब्रह्मकुलोद्भव ॥ कृतदस्युमयक्षितिपपराभव ॥ ११ ॥
जयसर्वोत्तम रामरघूत्तम ॥ पंतविठ्ठलप्राणप्रियतम ॥ १२ ॥

त्याच चालीवर हनुमंताचें पद अत्यंत रसभरित असून त्यांत सात्विकभावाचें मोठें चमत्कारिक वर्णन आहे.

वंदे संतं श्रीहनुमंतम् ॥ रामदासममलं बलवंतम् ॥ धृ० ॥
रामकथामृतमनुनिवसंतम् ॥ परमप्रेमभरेण नटंतम् ॥ १ ॥
प्रेमरुद्धगलमश्रु वहंतम् ॥ पुलकांचित वपुषा विलसंतम् ॥ २ ॥
कदा चिदानंदेन हसंतम् ॥ क्वचित्कदाचिदपि प्ररुदंतम् ॥ ३ ॥
सर्वं राममयं पश्यंतम् ॥ रामराम इति सदा जपंतम् ॥ ४ ॥
सद्भक्तिपथं समुपदिशंतम् ॥ विठ्ठलपंतं प्रति सुखयन्तम् ॥ ५ ॥

अण्णांच्या संस्कृत पदांमध्यें जसें माधुर्य व ईश्वरप्रसाद दिसून येतो त्याहून प्राकृत पदांत कांहीं कमी नाहीं. पश्चात्तापावर केलेलें पद खालीं दिलें आहे यावरून त्यांची विरक्ति किती दृढतर होती तें स्पष्ट होतें.

पश्चात्ताप.

उत्तम जन्मा येउनि रामा गेलों मी वाया ॥ धृ० ॥
आधीं चुकलों मुकलों मी निज वेद स्वाध्याया ॥
कर्मं श्रौत स्मार्त न घडलीं सद्गति साधाया ॥
पुराण परिसुनि सादर झालों यशाहि न तव गाया ॥
स्वस्थपणें कधिं नाहिं फावलें तुजला पूजाया ॥ उत्तम० ॥१॥

अर्जविले बहु लवणभंजनें व्याह्या जावाया ॥
क्षुधित अतिथि कधिं नाहिं घेतला प्रेमें जेवाया ॥
उदार कर कधिं केला नाहीं पैसा एक द्याया ॥
नाम फुकटचें तेंहि न आलें स्वामी वदना या ॥ उत्तम० ॥ २॥
कपट करुनियां निपट भोंदिल्या बहुत आयाबाया ॥
केली धनगृह क्षेत्र स्त्रीपशु शिशुवर बहु माया ॥
नित्य सजविली वसनभूषणें निंद्या ही काया ॥
सिद्ध ठेवली सदाहि रसना सज्जन निंदाया ॥ उत्तम० ॥ ३ ॥
वटवट निशिदिनिं केलि चहुंकडे मन हें रमवाया ॥
केलें स्नान न संध्या जप तप दुष्कृत शमवाया ॥
क्षणहि न केला साधुसमागम भवदव निववाया ॥
सद्यःकामुक झालों पाहुनि परधन परजाया ॥ उत्तम० ॥ ४ ॥
नाहीं विद्या कला कुशलता तुजला रिझवाया ॥
शुद्ध मधुर वाणीहि नाहीं तुजला विनवाया ॥
बुद्धिहि नाहीं न कळे कांहीं शरणागत व्हाया ॥
थकलि मजल सर्वथा दयाळा स्वहित आचराया ॥ ५ ॥
हरि कनवाळू करि दीनावरि करुणेची छाया ॥
निगम नगारा गर्जे ऐसा निखिलां कळवाया ॥
यावरि विश्वासुनियां आलों जवळ तुझ्या पाया ॥
शुद्ध दगड हा पंत विठ्ठल स्वामी रघुराया ॥ ६ ॥

ह्या पदावरून अण्णांच्या मनोवृत्तीचा उत्कृष्ट खुलासा होतो. आणि त्यांच्या मनांत संसाराविषयीं किती विरक्ति बाणली होती तें स्पष्ट कळतें. शिवाय सदाचारवर्तनाविषयीं तर हें पद कित्ताच आहे. प्रत्येक चरणानें आपल्या अंतःकरणास आपल्या निष्काळजीपणाची साक्ष पटून 'सत्य' 'सत्य' असे उद्गार निघाल्यावांचून राहत नाहींत.

पुढें दिलेल्या पदांत नरदेहाची भावी स्थिति किती अप्रतिम दर्शविली आहे बरें? तसेंच त्यांतील पदरचना, छंद हीं इतकीं चित्तवेधक आहेत कीं, त्याच्या तोडीला इतर कवींचें पद सांपडणें परम कठीण!

**पद.** (हरिचें नाम गा—ह्या चालीवर.)

कारं अति त्वरा ॥ घडि घडि घडि पल पल जप ॥ अमृतधाम रामनाम धरुनि आदरा ॥ धृ० ॥ अंतसमय परम घोर ॥ दोषत्रय करिति जोर ॥ घुरु घुरु घुरु कंठ होय ॥ भरिल भ्रम हरिल स्मृति करिल

घाबरा ॥ करि० ॥ १ ॥ अति दुर्धर अपरिहरा येइल जंव तुजसि जरा ॥ लट लट लुट हलल मान ॥ धनु समान तनु पुमान् ॥ होत घाबरा ॥ करि० ॥ २ ॥ जो इंद्रियसंघ दक्ष ॥ तो निजकल्याण दक्ष ॥ त्यज वटवट खटपट उगि ॥ झटपट करि कपटरहित ॥ भज रमावरा ॥ करि० ॥ ३ ॥ विनवि पंत विठ्ठल शम ॥ किमपि धरी विरम विरम ॥ विषयिं न रम अमरमहित ॥ चरम तनू परम लाभ ॥ न करि मातिरा ॥ करि० ॥ ४ ॥

ह्या पुढचें पद फारच हृदयद्रावक आहे. हें अण्णांनीं रचलें तेव्हां आह्मी समक्ष होतों. ते जेव्हां भगवंतास संबोधून आपला उद्धार करण्याविषयीं अत्यंत करुणावाणीनें हाका मारीत तेव्हां सर्व लोकांचा कंठ भरून येत असे. शेवटचें 'भगवंता !' हें संबोधन अण्णांच्या मुखांतून जेव्हां निघालें, तेव्हां तर, आमचें वय बारा वर्षांचें होतें, तरी सुद्धां खळकर प्रेमाश्रु आल्यावांचून राहिले नाहींत !

### पद-प्रार्थनापर.

(ये, बा विठोबा, सुखकंदा ॥ देवकि परमानंदा या-चालीवर.)

श्रीरंगा ॥ दे मजला सत्संगा ॥ आलों शरण तुला ॥ ध्रु० ॥
रघुनाथा ॥ आवडो तव गुणगाथा ॥ आलों० ॥ १ ॥
गोविंदा ॥ सोडिव विषयच्छंदा ॥ आलों० ॥ २ ॥
श्रीकृष्णा ॥ दूर करीं धनतृष्णा ॥ आलों ॥ ३ ॥
रघुराया ॥ आवरिं आपुली माया ॥ आलों० ॥ ४ ॥
गोपाळा ॥ उघडीं चिन्मय डोळा ॥ आलों० ॥ ५ ॥
श्रीरामा ॥ दे मज भजनप्रेमा ॥ आलों० ॥ ६ ॥
घनश्यामा ॥ नेईं मज निजधामा ॥ आलों० ॥ ७ ॥
भगवंता ॥ तारीं विठ्ठलपंता ॥ आलों० ॥ ८ ॥

आतां सरतेशेवटीं अत्यंत मधुर, अत्यंत हृदयभेदक, व आमच्या फार आवडीचें एक पद सांगून निरुपायानें हात आखडतों.

### पद. ईश्वराची प्रार्थना-राग-भूपकल्याण.

(कांहो धरिली अढी०-या चालीवर.)

रामकृष्ण नरहरे ॥ स्वामिन् ॥ राम० ॥ कधिं करशिल वा दया दयाळा गर्भवास हा पुरे ॥ ध्रु० ॥ काय करूं मी बरें ॥ सांगा-काय० ॥ कळों येति मज माझे दोष गुण ॥ चित्त परी नावरे ॥ स्वामिन्

**राम० ॥ १ ॥ विषयीं मन नावरे ॥ सदोदित-विषयीं० ॥ काम क्रोध हे चोर लुटति मज ॥ प्राण होति घाबरे ॥ स्वामिन् राम० ॥ २ ॥ धांव धांव धांवरे ॥ सत्वर-धांव० ॥ बुडतों भवसागरीं दीन हा ॥ उद्धरिं आपुल्या करें ॥ स्वामिन् राम० ॥ ३ ॥ विचार मज न स्फुरे ॥ कांहीं विचार० ॥ केवि गति होइल ह्मणुनिया जिव हा अंतरिं झुरे ॥ स्वामिन्० ४ प्रार्थितसें आदरें ॥ आतां एक प्रार्थि० ॥ असें करीं तंव नाम निरंतर ॥ पंत विठ्ठल स्मरे ॥ स्वामिन्० ॥ ६ ॥**

हें पद ऐकून एखाद्या पाषाणहृदयास सुद्धां द्रव येईल. रक्षा करुणेचा सागर जो भगवान् तो **अण्णांच्या** प्रेमळ वाणीनें द्रवला असेल, सुप्रसन्न झाला असेल, व त्यानें **अण्णांचा** उद्धार केला असेल, यांत शंका कशाची? असो. **अण्णाच्या** कवितेचा सागर भरलेला आहे, त्यांतून ह्या लहान पात्रांत सामावलीं तेवढीं वेंचक रत्नें निवडलीं आहेत. तीं आमच्या वाचकांसही भूषणभूत होवोत. एवढी श्रीरामचंद्रचरणीं प्रार्थना करून हें पुरें करतों.

---

# विद्युन्मानसशास्त्र.

## व्याख्यान चवथें.

**स्त्रीपुरुषहो,**

माझ्या गेल्या व्याख्यानांत मी रुधिराभिसरणशास्त्र, रक्तवाहिन्यांचा क्रम, मेंदूपासून विजेचा वेगळेपणा,–ज्यास मीं '**ज्ञानरस**' असें नांव दिलें आहे–ये-थपर्यंत येऊन पोंचलों. माझ्या विषयाचा हा भाग–त्याच्या महत्त्वामुळें–आपणां सर्वांस फार मनोरंजक झाला आहे. ह्यास्तव त्याच्यावर आणखीही थोडा वेळ खर्च करावा अशी माझी इच्छा आहे.

पूर्वींच्या प्रतिपादनांवरून प्रत्येक संस्कृत मनाला ही गोष्ट स्पष्टपणें कळून चु-कलीच असेल कीं, रुधिराभिसरणामध्यें भिन्न भिन्न असे दोन प्रवाह आहेत. प-हिला प्रवाह **धमन्यांतला.** हा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, **लाल रंगाचें धनरक्त** हृदयांतून घेऊन, तें शरीराच्या भागाभागावर नेऊन पोंचवितो. दुसरा प्रवाह **शिरांतला.** हा शरीराच्या सर्व भागांतील **जांभळ्या रंगाचें ऋणरक्त,** जमवून आणून तें हृदयांत सोडतो. ह्या दोन्ही क्रिया, हृदय हें, आपलीं दोन पुडें, दोन कोश, व दोन पडदे ह्यांच्या साह्यानें अगदीं बिनचूक चालवितें. व **धन-**

**रक्त** आणि **ऋणरक्त** वेगवेगळें राखून दोहोंच्या गतींत अगदीं नियमितपणा ठेवतें. आणि हेंही दिसून येईल कीं, मीं सांगितलेल्या रुधिराभिसरणक्रियेला, रक्तवाहिन्यांची व ज्ञानतंतूंची रचना अगदीं जुळून आहे. मीं सांगितलेंच आहे कीं, अनिच्छितक्रिया करणारे ज्ञानतंतु, धमन्यांतून वाहणारी, **धनरक्तां**तील **वीज** काढून घेण्यासाठीं त्यांच्या सभोंवार ठेवलेले असतात. रुधिराभिसरणाच्या ह्या क्रियेला, एका गोष्टीनें फारच मजबुती येते. ती गोष्ट हीच कीं, रक्तामध्यें लोखंडाचा बराच भाग असतो.[1] आणि ही गोष्ट तर प्रसिद्धच आहे कीं, लोखंडामध्यें विजेचा प्रवाह सोडला तर, त्याच्या अंगीं **लोहचुंबकत्त्व** प्राप्त होतें, आणि तो प्रवाह त्याच्यांतून निघाला, कीं तत्क्षणीं त्यांतील लोहचुंबकत्त्व नाहींसें होतें.[2] ह्याच कारणानें रक्त, त्यांत असलेल्या लोखंडाच्या द्वारें, सहज **धन**स्थितीप्रत पोंचून, तें तत्काल हवेंत असलेली **वीज**, फुप्फुसांत आकर्षण करून घेतें. आणि मग, धमन्यांत शिरण्यास तें समर्थ होऊन, घर्षणाच्या योगानें आपल्यांतील **विद्युत्** ज्ञानतंतूंत फेंकून, आपण पुन्हा **ऋण**स्थितीप्रत पोंचतें, आणि शिरांत प्रवेश करतें.

ह्यावरून रुधिराभिसरणक्रिया विद्युत्प्रयोगानें किंवा लोहचुंबकत्त्वानेंच होते ही गोष्ट शास्त्रीय रीतीनें निर्विवाद सिद्ध झाली, असें मी समजतों. पुष्कळ लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, हृदय हें, जलस्थितिनियमानुसार किंवा निर्वातस्थलनियमानुसार, रक्ताचें अभिसरण करतें. पण त्यांत मुळींच तथ्यांश दिसून येत नाहीं. आणि ह्या कामांत ज्याअर्थी हृदयास आपली एक लक्ष पौंडांहूनही अधिक शक्ति खर्च करावी लागते, त्याअर्थी ह्या ह्मणण्यावर मुळींच विश्वास ठेवतां येत नाहीं. आतां ही गोष्ट मी कबूल करतों कीं, मनुष्यदेहांत हृदय हा स्नायु अत्यंत मजबूत व बळकट आहे; पण त्याची शक्ति पन्नास **टनां**बरोबर आहे ह्मटलें, तर क्षणभर तरी कोण विश्वास ठेवणार ? तर, पूर्वी मीं सांगितल्याप्रमाणें

---

१. एका मनुष्याच्या अंगांतील रक्ताचें सर्व लोखंड काढलें तर, एक मोठा खीळा होईल; व बेचाळीस मनुष्यांचें लोखंड एकत्र केलें तर, २४ पौंड वजनाचा एक नांगराचा फाळ होईल. (पहा. के. को. पु. ६ अं. १२)

२. ह्याच धर्मानें तारायंत्र चालतें. तेथें एका लोखंडाच्या तारेच्या गुंडाळ्यांत विद्युत्प्रवाह सोडतां येईल, असें केलें असतें, आणि तो सोडतांच त्यावर अडकविलेली लोखंडाची लब लोहचुंबकत्वानें ओढली जाऊन दुसऱ्या दांड्यावर आपटते, त्यायोगें इच्छिलेले ऱ्हस्व दीर्घ शब्द उत्पन्न होतात.

हृदय हें, मुळींच रक्ताभिसरण करीत नाहीं; किंवा उलटपक्षीं रक्तही हृदय उडविण्यास कारण होत नाहीं. तर हृदय आणि फुप्फुसें ह्या दोघांसही, **अनिच्छित** व्यापाराचें आणि इंद्रियचेतनेचें मूलस्थान जो **धाकटा मेंदू**, त्यापासून गति प्राप्त होते. ह्यावरून **धाकट्या मेंदूतून** निघालेले **ज्ञानतंतु** हृदयास उडवितात, आणि फुप्फुसांस खालवर करून व हवेंत असलेली **वीज**, श्वासोच्छ्वासानें आंत घेऊन रक्ताचें अभिसरण करतात, व मेंदूस **ज्ञानरसाचा** पुरवठा देतात, हें उघड आहे. व ह्याचा खुलासा मीं पूर्वींच केलेला आहे.

आतां, कदाचित् अशी एक शंका मात्र येण्याचा संभव आहे कीं, **धाकट्या मेंदूतून** निघालेल्या **ज्ञानतंतूंच्या** योगानें हृदय उडूं शकतें, फुप्फुसें खालवर होतात, आणि रुधिराभिसरण मात्र होत नाहीं, ह्या ह्मणण्याला पुरावा काय ?

ह्या दोन्ही शंकांचें निराकरण फार सोपें आहे. वरील ह्मणण्याची साक्ष पटण्यासाठीं एक वैद्यकीय शस्त्र घेऊन तें पाठीच्या मणक्याच्या मध्यें खुपसावें, आणि हृदयाच्या व फुप्फुसाच्या खालच्या पाठीच्या कण्यांतील मगज कापून काढावा, ह्मणजे त्याच्या खालचा शरीराचा सर्व भाग, तत्काल इतका निर्जीव होईल आणि त्याचे इच्छित व्यापार व ज्ञान इतकें लयास जाईल कीं, त्यांतील कोणताही अवयव आह्मांस स्वेच्छेनें हालवितां येणार नाहीं. अथवा त्यास भाजलें, जाळलें, किंवा हातोड्यानें ठेंचलें, तरी त्या निर्जीव अंगास तिळभरसुद्धां कळणार नाहीं. इतकें झालें तरी, ह्या शरीराच्या अचेतन व निर्जीव भागांमध्यें नेहमींप्रमाणें धमन्यांतून व शिरांतून रुधिराभिसरण चालूच असतें. ह्यावरूनच ही गोष्ट पक्की सिद्ध झाली कीं, रक्ताचा प्रवाह, **धाकट्या मेंदूंतील** कोणत्याही गुप्तशक्तीनें चालत नाहीं, तर तो फक्त पूर्वीं सिद्ध केल्याप्रमाणें, फुप्फुसांनीं हवेंतून शोषून घेतलेल्या **विजेच्या धन** व **ऋण** शक्तीच्या योगानें चालतो. आतां तेंच शस्त्र घेऊन हृदयाच्या व फुप्फुसाच्या वरच्या पाठीच्या मणक्यांतील मगज छेदन करा कीं, तत्काल खालचें व वरचें अशीं दोन्हीही अंगें लटकीं पडतील, त्यांचें चलनवलन बंद होऊन जाईल. तथापि फुप्फुसांनीं शेवटचा श्वास आंत ओढून घेतलेला असतो, तेवढ्याच्याच बळावर, शिरांतून आलेल्या रक्तानें, हृदयाचें उजवें पूड भरेपर्यंत रक्ताचें अभिसरण चालू राहून धमन्यांच्या रक्ताचें डावें पूड रिकामें पडतें. ह्यावरून पक्का सिद्धांत होतो कीं, हृदय आणि फुप्फुसें ह्यांची हालचाल, **धाकट्या मेंदूंतील**–मूलभूत असलेल्या **अनिच्छितज्ञानतंतूंच्या** शक्तीच्या द्वारें होते. आणि श्वासोच्छ्वासाबरोबर हवेशीं मिश्र होऊन फुप्फुसांत जाणारी जी **वीज**,

तिच्या **धन व ऋण** शक्तीच्या योगानें रक्ताचें अभिसरण होतें. फुप्पुसांकडे फक्त, दुजोरी पंपाप्रमाणें भोंवतालची हवा आंत ओढून घेणें, प्राणाची तेजस्वी आणि धगधगणारी ज्वाला टिकण्यासाठीं, **जीवतत्वा**चा पाहिजे तेवढा अंश त्यांतून काढून घेणें, व आंतील अपायकारक खळमळ काढून टाकणें, येवढेंच काम आहे. रुधिराभिसरणक्रियेच्या संबंधानें, आणि धमन्यांतील रक्तापासून मेंदूपर्यंत **ज्ञानरसा**च्या निरंतरच्या प्रवाहासंबंधानें इतकें सांगणें अगदीं अवश्य होतें. आतां मी **रोगशास्त्रा**कडे वळतों, आणि होईल तितकें थोडक्यांत आटपतों.

वैद्यलोक बहुतकरून असें ह्मणतात कीं, नाना प्रकारचे रोग उत्पन्न होण्याला, कारणेंही नानाप्रकारचीं असतात. येवढेंच नव्हे, तर एक रोग उत्पन्न होण्याला सुद्धां अनेक कारणें घडतात. पण मी ह्याच्या अगदीं उलट आहें. मी असें ह्मणतों कीं, एकून एक रोग उत्पन्न होण्याला एकच महत्कारण आहे. तें हेंच कीं, शरीरांतील **जीवशक्तीची बिघडाबिघड.** प्रत्येक मनुष्यप्राण्यामध्यें कांहीं एका नियमित प्रमाणानें **वीज** भरलेली असते. शरीरामध्यें हेंच तत्त्व–द्रव्य–अत्यंत नाजूक, सूक्ष्म, आणि सुंदर आहे, असें मीं सांगितलेंच आहे. हीच शक्ति, मीं पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें रक्ताची हालचाल करते; आणि ह्याचे प्रधानाच्या द्वारें, मन हें, स्नायूंचें आकुंचन करवून चलनवलन उत्पन्न करतें. सृष्टींतील व मनुष्यदेहांतील सर्व व्यापारांचा व कार्यांचा प्रारंभ अतिशय सूक्ष्म, अदृश्य, व सर्वोत्कृष्ट द्रव्यापासून होतो, व त्याचा शेवट अत्यंत स्थूल व जड पदार्थांत होतो, त्या अर्थीं, मनुष्यदेहांत कोणताही फेरबदल करण्यास कारण, **वीज**च होय; मग तो बदल हितकर असो, किंवा कसाही असो. ही **वीज ज्ञानतंतूं**त जेव्हां सारखी भरलेली असते, तेव्हां रक्ताचा प्रवाहही सारखा वाहत असतो. आणि ह्या दोहोंचा नैसर्गिक परिणाम–जो **आरोग्यपणा**–तो प्राप्त होतो. परंतु तीच **वीज** जेव्हां प्रमाणाबाहेर फेंकली जाते–खर्च होते–तेव्हां रक्तामध्यें सहजींच फेरफार होतो, आणि त्यापासून अर्थातच रोगोत्पत्ति होते; आणि **जीवशक्तीं**त जितक्या प्रमाणानें अधिक किंवा उणा फेरबदल झाला असेल, त्या मानानें तो रोग दु:साध्य किंवा सुसाध्य होतो.

मला पक्कें माहित आहे कीं, वैद्यलोकांचें धोरण, रोग्याची नाडी पहाण्याकडे विशेष असतें. आणि रक्ताच्या अदलाबदलीकडे तर ते मनस्वीच लक्ष पुरवितात. त्यांचीं समजूत अशी असावी असें वाटतें कीं, बहुतकरून दरोबस्त रोगांचें मूळ

रक्तांत आहे. आणि ह्याच समजुतीमुळें शेंकडों औषधी व उपचार—जरी त्यांत रक्त अशुद्ध करणारीं अपरिचित द्रव्यें असतात, आणि तीं कांहीं विशेष वैद्यकीय उपचारानें देहांतून काढावीं, किंवा नाहींशीं करावीं लागतात तरी—रक्तशुद्धीकरतां तयार केलेले आहेत. पण हें सर्व थोतांड आहे. कारण, रक्तामध्यें त्यास बिघडविणारें असें कोणतेंही द्रव्य नाहीं. फक्त प्रवाहांत फेरफार झाल्यानेंच रक्त बिघडतें. दुसऱ्या कशानेंही तें बिघडत नाहीं. तसेंच तें, फुप्पुसांतून येणाऱ्या तत्त्वांनीं मात्र शुद्ध होतें, दुसऱ्या कशानेंही शुद्ध होणार नाहीं. हीं तत्त्वें ह्मणजे **आक्सिजन** व **विद्युत्** हीं होत. शरीरांतील सर्व रक्त प्रतिक्षणीं, तें नासूं नये ह्मणून, व नासलेलें शुद्ध व्हावें ह्मणून, फुप्फुसांत गेलें पाहिजे. शरीराच्या कोणत्याही भागांतील रक्ताच्या प्रवाहास अडथळा होईल, अथवा तें वाजवीपेक्षां अधिक वेळ बाहेर राहील, तर तें फुप्पुसाकडे नियमित वेळेवर येऊन पोंचणार नाहीं, हें उघड आहे. तसें झाल्यास तें अशुद्ध होऊन नासलेंच पाहिजे. अथवा एखाद्या शरीराच्या भागांत पूर्णपणें अडथळा होऊन रक्त निखालस थांबून राहिलें, तर त्याच्या मागून दाह, व्रण, नासणें, इत्यादि आलींच पाहिजेत.

मी आतां थेट त्याच विषयाकडे वळतों, आणि तुमचें सर्व लक्ष **रोगशास्त्रा**कडे वळवितों. वैद्यलोक रक्ताकडे आणि शरीराच्या स्थूल व जड भागांकडे जितकें लक्ष पुरवितात, त्यापेक्षां **मनाचे व्यापार** आणि **ज्ञानतंतूंची स्थिति,** ह्यांकडे त्यांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. ह्याचें कारण उघडच आहे कीं, रोगांची उत्पत्ति ज्ञानतंतूंतील विजेपासून होते, रक्तापासून होत नाहीं. **विद्युत्** हें रोगाचें उगमस्थान आहे. तेथून तो रक्तांत शिरतो; रक्तांतून मांसांत शिरतो; आणि मांसांतून हाडांत शिरतो. हेंच त्याचें पक्कदशेचें स्थान. अत्यंत सूक्ष्म तत्त्वांत त्याचें जनन होतें; आणि शरीराच्या अत्यंत स्थूल पदार्थांत त्याचा लय होतो. अद्भुत शक्ति मात्र अदृश्य असतात.

मीं पूर्वीं कळविलेंच आहे कीं, **मेंदू** हा ज्ञानतंतूंचा खजिना आहे. आणि तो, त्यांच्या लक्षावधि शाखा, पाठविण्यासारख्या असतील त्या शरीराच्या प्रत्येक भागाकडे आणि शेवटाकडे पाठवून देतो. ह्या ज्ञानतंतूंत व त्यांच्या शाखांत **वीज** भरलेली असते. ही **वीज,** मेंदूमध्यें आपली गादी ठोकून, एखाद्या राजाप्रमाणें सिंहासनावर विराजमान होणारें जें **मन,** त्याची आज्ञाधारक **सेवक**—दासी—होय. तेथून तें, आपल्या इच्छेप्रमाणें, शरीरांतील अर्ध्या **विजे**वर आपला अधिकार चालवितें. **इच्छित** ज्ञानतंतूंमध्यें जेवढी **वीज** भरलेली असते, तेवढी-

वर तिचा अंमल चालतो, परंतु **अनिच्छित** ज्ञानतंतूंमध्यें जें विजेचें दुसरें अर्धें भरून राहिलेलें असतें, त्याच्यावर मात्र तिचा तसा अंमल चालत नाहीं.

'शरीरांतील **वीज** प्रमाणाबाहेर खर्च होणें' हें एकच जरी रोगोत्पत्तीला कारण आहे, तरी तें घडण्यांत दोन प्रकार आहेत. मनोविकारांपासून रोगोत्पत्ति होणें हा एक प्रकार; आणि बाह्यसृष्टींतील शारीरिक विकारानें रोगोत्पत्ति होणें हा दुसरा प्रकार. मनोविकारांपासून रोगोत्पत्ति कशी होते, तें प्रथम सांगतों.

आपल्यांपैकीं लक्षावधि लोकांस, मनोविकारांच्या रोगांनीं जन्मप्रकाशांतून हुसकून लावून मृत्युरूप अंधकारांत दडपून टाकलें आहे! कैक पित्यांवर, मातांवर, व बालकांवर दुर्दैवाचे घाले कोसळले आहेत. त्यांनीं आपलीं मानसिक दुःखें आपल्या हृदयांत कोंडून ठेवलीं, व तीं त्यांच्या काळजांस झळंबलीं; त्यांच्यावर आलेल्या घोर प्रसंगाचा त्यांनीं निजध्यास घेतला; आपल्या चिंताग्नीची ज्वाळा त्यांनीं बाहेर पडूं दिली नाहीं; औदास्यानें त्यांच्या हृदयांत ठाणें दिलें; त्यांच्या **जीवतत्त्वां**ची बिघडाबिघड झाली; त्यांच्या शरीरांतील **वीज** प्रमाणाबाहेर निघून गेली; तेणेंकरून रोगाचें ठाणें बसलें, आणि तीं सर्व मृत्युमुखीं पडलीं!

हीच गोष्ट मी आतां आपणां सर्वांस स्पष्ट करून सांगतों. माझ्या मनाची चलबिचल झाली कीं, तें **विजेला**, शरीराच्या शेवटां शेवटांपासून मेंदूंत बोलावून आणतें. तिच्या पाठोपाठ रक्त जातें. त्यामुळें माझ्या पायांतील **जीवतत्त्व** तितक्याच प्रमाणानें कमी होऊन माझे पाय गारठतात. आणि एस्य गारठणें हाच रोग होय. हें दुःख मीं कांहींच बोलून दाखविलें नाहीं, आंतल्या आंतच दाबून ठेवलें, तर तें मला लौकरच स्मशानाची वाट दाखवील!

एखाद्यानें मोठी यातायात करून दोन लक्षांची पुंजी केली, आणि तिचा अर्धा भाग अकस्मात् गमावला, तर तो दुःखांत पडतो. आपल्यावर आलेल्या संकटावस्थेची तो धास्ती घेऊन बसतो. त्याच्या मनाला त्रास होतो; तें आपल्यांतच झुरूं लागतें. **शारीरिक वीज** ही मनाची हुकुमबंदी पडली; ती शरीराच्या टोंकांतून निघून आपल्या प्रभूच्या (मनाच्या) सिंहासनापाशीं–मेंदूंत–जाऊन पोंचते. तिच्या पाठोपाठ रक्त जातें; आणि तेणेंकरून त्याची अधिकच धांदल उडते; आपणांस आतां एखाद्या धर्मशाळेंत किंवा पडक्या देवळांत पडून भिकार स्थितींतच मेलें पाहिजे, असें खास वाटून त्यास दहशत पडते. तो भ्रांतिष्ट होतो. आणखी समजा; तशा स्थितींतच त्याच्या द्रव्याचा राहिलेला अर्धा भागही नाहींसा झाला. तर त्याचें तें दुःख सहजच दुणावेल. अशा मनाच्या चलबिचलीनें

विजेचें, किंवा **ज्ञानरसाचें** प्रमाण मेंदूजवळ अधिक होतें, आणि तितक्याच प्रमाणानें रक्तही त्याच्या मागून जातें. त्यामुळें तो अगदींच वेडा होऊन जातो, आणि त्याचे पाय सतत गार पडूं लागतात. कारण, पायांत असणारा जो नियमित **जीवतत्त्वाचा** भाग, तो मेंदू हरण करून नेतो. ह्यावरून हें नाहीं का आपणास दिसून येत कीं, ह्या शक्ति मेंदूपासून खर्च होऊन जातात; आणि त्याच पद्धतीनें रुधिराचें अभिसरण होतें. आणि हें असेंच चालू आहे तोंपर्यंत, त्याची बुद्धि पूर्वस्थितीवर येईल काय? शरीराच्या कोणत्याही एका भागाला पुरून उरे, इतकी **वीज** व रक्त त्यांत असूं शकेल. पण वरच्यासारखी दोन्ही द्रव्यांची जर सारखी उधळपट्टी चालू राहिली, तर तितक्यास पुरवठा करण्याइतकी शरीरांत **वीजही** नाहीं, व रक्तही नाहीं. त्याची तीच काळजी विकोपास जाण्यापुरती आणखी आपण कांहीं कल्पना काढूं या. तशा स्थितींतच त्यास आणखी कोणी जाऊन कळवावें कीं, "तुझें तें आवडतें मूल, भिंतीखालीं चिरडून मेलें!" मग काय विचारतां? त्याच्या दुःखास पारावार नाहींसा होईल. त्याचें मन अधिकच गोंधळून जाईल. व लागलेंच एखाद्या जिव्हाळ्याच्या नोकराप्रमाणें **विद्युत्ज्ञानरस,** आपल्या धन्यास काय झालें तें पहाण्यासाठीं मेंदूंत धांव घेईल. ह्या सेवकामागून रक्तही तेथें जाऊन पोंचेल. इतकें होत आहे तोंच त्यास ह्याहीपेक्षां विशेष दुःखकारक बातमी कळवावी, अशी कीं तेणेंकरून मेंदूमध्यें आणखी वीज ओढली जावी. ह्मणजे संपलें. तो तत्काल प्रेत होऊन पडेल!

ह्या सर्व उदाहरणांवरून आपणांस दिसून आलें कीं, सर्व रोगांस कारण एकच आहे. त्यांत भेद ह्मणून जो काय आपणास दिसून येतो, तो ते उत्पन्न होण्याच्या निरनिराळ्या परिणामाच्या संबंधानें दिसून येतो. वरच्या उदाहरणांत मनाची चलबिचल हळू हळू वाढत गेली. मनाच्या लहानशा विकारापासून तों उत्तरोत्तर तो भयंकर स्थितीप्रत पोंचून एका क्षणांत त्याची मृत्यूपर्यंत जरी मजल येऊन ठेपली तरी, त्या सर्वांचें कारण एकच होतें. अशा तऱ्हेचें एक प्रत्यक्ष उदाहरण आपल्यामध्येंच घडलेलें आहे. तें प्रसिद्ध राजकार्यधुरंधर **जॉन क्विन्सी आदाम्स** ह्यांचें होय. कदाचित् त्याच्या पूर्ववयांतच त्यास स्वदेशोन्नतीची अघोर चिंता व गहन विचार लागून सर्व **जीवविद्युच्छक्ति** मेंदूंत आकर्षिली जाऊन, बुद्धीचा व प्राणाचा दीप विझून गेला असेल! आणि सांप्रत तो दुसऱ्याच कुडींत शिरला असेल!

अनेक प्रकारच्या मनोविकारांनीं, नानाप्रकारच्या वेदनांनीं, व निरनिराळ्या

हालचालींनीं, **विद्युज्ज्ञानरस** व **रक्त** हीं मेंदूकडे आकर्षिलीं जाऊन काय काय परिणाम घडतात, त्याचें येवढा वेळपर्यंत मीं विवेचन केलें. परंतु ह्या शक्तींनीं मेंदूच्या संस्थानावर जप्ति बसविणें, किंवा अशा प्रकारचा दुःखदायक परिणाम करणें, हें जसें मेंदूच्या स्थितीवर अवलंबून आहे, तसेंच शरीराच्या इतर भागांशीं शारीरिक मजबुतीच्या शक्तीवरही अवलंबून आहे. ह्याच उदाहरणांत कां पहाना. वर सांगितलेल्या मनुष्याचा, शरीराच्या इतर सर्व भागांपेक्षां मेंदू जर मजबूत असेल, आणि त्यावर पूर्वीं सांगितलेल्या विपत्तीचा प्रसंग गुदरेल, तर त्यामुळें त्यास वेगळाच रोग उत्पन्न होईल. समजा, कीं शरीरघटनेप्रमाणें त्याचा मेंदू अगदीं मजबूत व पक्का असून त्याचीं फुप्पुसें लेचींपेचीं आहेत. आणि त्याजवर तो दुःखकारक प्रसंग येऊन गुदरला, तर त्याचें मन दुःखांत गढून जाईल, आणि **विद्युज्ज्ञानरस** पूर्वींप्रमाणेंच मेंदूकडे जाऊं लागतील. परंतु हा दुःखानें होरपळलेला राजा, त्यांस आपल्या खासगी मंदिरांत येण्यास परवानगी देणार नाहीं. ह्मणून त्यांस अतिशय जवळचें व अत्यंत लेचेंपेचें स्थान जीं फुप्पुसें, तेथेंच राहणें भाग पडेल. ह्या सेवकांच्या मागें रक्त धांवून येईल, आणि तेंही तेथेंच आपलें बिऱ्हाड देऊन बसेल. असें झालें ह्मणजे तेथें दाह सुरू होईल. आणि राजाचा संताप तसाच चालू राहिला तर, आंत फोड उठतील, व्रण पडतील, आणि थोड्याच कालांत मृत्यूची स्वारी दत्त करून पुढें उभी राहील. हाच **क्षयरोग.**

पुन्हां कल्पना करूं कीं, फुप्पुसें चांगलीं मजबूत आहेत, आणि कांहीं क्षुल्लक कारणानें पक्काशयाचा भाग अतिशय अशक्त झालेला आहे. असें असलें तर त्यांत **विद्युज्ज्ञानरस** व रक्त जाईल, आणि तें स्थान बळकावून बसेल. व तेणेंकरून दाह, कंडू इत्यादि रोग उत्पन्न होऊन कदाचित् क्षतें सुद्धां पडतील. पचनेंद्रियें अतिशय अशक्त होऊन, नाहीं नाहीं त्या अनर्थासह **अग्निमांद्य** व **अजीर्ण** हाच त्याचा परिणाम होईल. काळीज जर अधिक दुर्बळ—अशक्त—असेल, तर त्याच मनोविकारांनीं त्याच शक्ति तेथें जाऊन पोंचतील, आणि **काळजाचा रोग** उत्पन्न होईल. पक्काशय आणि काळीज, हीं दोन्हीही मजबूत असून पाठीचा कणा अशक्त असेल, तर **पाठीचा कणा** दुखूं लागेल. हे सर्व अवयव शारीरिक रचनेप्रमाणें मजबूत असले, व मूत्रपिंड अशक्त असला, तर त्याच शक्तीच्या योगानें **मूत्ररोग** उत्पन्न होईल. अथवा मेंदूचे सर्व भाग व नलिकारज्जु हीं सर्व बळकट असून कमर किंवा गुडघा इत्यादि खालच्या अवय-

वांत अशक्तता असेल तर, **विद्युज्ज्ञानरस** तेथें जाईल, रक्त तेथें शिरेल, आणि सूज, फोड, किंवा दुसरा कांहीं विकार-**गुडघी** इत्यादि-उत्पन्न होऊन वेदना व दुःख सुरू होईल. ह्यावरून आपणांस दिसून येतें कीं, मनोविकाराच्या एकाच कार्यानें अनेक रोग उत्पन्न होतात. मात्र ते भिन्न भिन्न अवयवांपासून होत अ-सल्यामुळें, त्या त्या अवयवांचीं भिन्न भिन्न नांवें पडतात इतकेंच. ह्यावरून रोग, परस्परांपासून भिन्नत्व पावतात ते, नानाप्रकारचीं रोगजनक इंद्रियें, त्यांचे व्या-पार, वेगळेपणा, आणि निरनिराळीं कार्यें ह्यामुळेंच पावतात. अथवा ज्या निर-निराळ्या भागांपासून त्यांचा उद्भव होतो, त्या भागांवरून त्यांत भेद दिसतो, किंवा त्यांस भिन्न नांव मिळतें इतकेंच. परंतु रोगोत्पत्तीचें खरें कारण पाहूं गेलें तर सर्व रोगांचें एकच आहे. तें कोणतें? तर शरीरांतील **विद्युज्ज्ञानरस.**

इतका वेळपर्यंत मानसिक विकारानें ज्ञानशक्तींत कसकसे फेरफार होतात, व त्यापासून काय काय परिणाम घडतात, त्याचें आवश्यक तेवढें विवेचन केलें. आतां शारीरिक विकारानें तींत कसकशी हालचाल होते ह्याकडे वळतों.

ज्याप्रमाणें दुःसह मनस्तापांत-गुप्त औदास्यामध्यें आणि दुःखामध्यें-ज्ञानश-क्तीची बिघडाबिघड करून मन हें, शरीरांतील रक्तास आणि दुसऱ्या रसांस आ-पल्या पुढें बोलावून रोग उत्पन्न करतें, आणि लक्षावधि लोकांस मातीस मिळवितें, त्याचप्रमाणें मीं वर सांगितलेले सर्व रोग, आणि त्याहून शेंकडों अधिक, बाह्य जगापासून शारीरिक विकारानें ज्ञानतंतूंची बिघडाबिघड होऊन उत्पन्न होतात.

मला पक्कें माहित आहे कीं, मानसिक विकार आणि शारिरीक विकार ह्यांस रोगांचीं कारणें ह्मटलें तरी चालेल. परंतु वैद्यलोक असें प्रतिपादन करतात कीं, रोगास **परोक्ष** व **अपरोक्ष** अशीं दोन्ही कारणें असतात. पहिली गोष्ट मी कबूल करतों. त्यांत तरी, तीं कारणें हजारों आहेत हें मी कधीं ऐकावयाचा नाहीं. माझ्या मतानें रोगाला एकच मोठें परोक्ष कारण घडतें. तें हेंच कीं, ज्ञानरसांत बिघडाबिघड, किंवा शरीरांतील **वीज** प्रमाणाबाहेर खर्च होणें. रो-गाचा प्रारंभ ज्ञानतंतूंतील विद्युच्छक्तींत होतो, रक्तांत होत नाहीं. ते शरीरां-तील अतिशय उत्कृष्ट व सूक्ष्म तत्वांत जन्मतात, आणि जड तत्वांत त्यांचा शेवट होतो. ज्या कारणानें मनुष्य भ्रमिष्ट होतें, त्याच कारणानें वेड, फेंपरें, मूर्च्छा, व कपाळशूळ हीं उद्भवतात. प्रसिद्ध वक्त्याचा मेंदू तापण्याचें कारणही तेंच. ह्याच कारणानें क्षय, अग्निमांद्य, काळीज, पाठीची कळ, रक्तपिती, महामारी, हगवण, दाह, ताप इत्यादि अनेक रोग उत्पन्न होतात. रोगाचें मुख्य वीज

जें हें सूक्ष्मतत्त्व, त्याचेंच नांव **विद्युज्ज्ञानरस.** हेंच तत्त्व शरीरांत समप्रमाणानें राहिलें ह्मणजे आरोग्यास कारण होतें. रक्त व इतर रस, ह्यांचें नीट रीतीनें अभिसरण होण्याला कारण तेंच आहे. आणि हेंच प्रमाणाबाहेर खर्च होऊं लागलें ह्मणजे रोगोद्भवास कारण होतें. ह्यावरून आरोग्याचा व रोगाचा—जगण्याचा व मरण्याचा—**सूत्रधार** आमच्या मध्येंच आहे. आणि तो एकच असून प्रमुख आहे. पृथ्वींतील शांतता, तुफान इत्यादि घडामोडी; हवेंत व समुद्रांत होणारे नानाविध, रमणीय व भयप्रद चमत्कार; वनस्पतींतील व खनिज पदार्थांतील अगणित आश्चर्यें; हीं उत्पन्न करण्यास जशी **वीज** कारणीभूत आहे, तशीच, मनुष्य हा ब्रह्मांडांतीलच एक परमाणु असल्यामुळें, त्याच्याही शरीरांतील **वीज,** ज्ञानरसाच्या द्वारें, त्याच्याही शरीरांत शांतता, तुफान वगैरे घडामोडी करण्यास कारणीभूत आहे.

मनोविकारामुळें मनुष्यांच्या ज्ञानतंतूंतील विजेंत, नानातऱ्हेचे गुप्त फेरफार होऊन बुद्धिभ्रंश, मूर्च्छा, क्षयरोग वगैरे उत्पन्न झाल्याचें जसें आह्मी पाहतों, तसेंच शारीरिक विकारानेंही त्या सूक्ष्मशक्तींत बिघडाबिघड होऊन वरच्यासारखाच दुःखदायक परिणाम झाल्याचें आपण पाहतों. ह्याची प्रचीत पाहण्यास कांहीं लांब जावयास नको. भिजलेले पायच कां घ्याना ? तेसुद्धां विद्युज्ज्ञानरस प्रमाणाबाहेर फेंकतात. आणि ती सूक्ष्मशक्ति तत्काल अन्नरसाला किंवा दुसऱ्या एकाद्या पदार्थाला दडपून बुद्धिभ्रंश, मूर्च्छा, इत्यादि विकार उत्पन्न करते. अथवा आपण स्वतः फुप्पुसांवर बसून तीक्ष्ण रोगादिकांस उत्पन्न करते. ह्याचें कारण, **विद्युज्ज्ञानरस,** शरीराच्या वरच्या भागाची बिघडाबिघड करतें, आणि तेणेंकरून आंतील विद्युत् कमी होते. आणि ती सर्व एखाद्या नाजूक अवयवावर अथवा जीवतत्वांतील दुर्बल भागावर आपला भार घालते. तिच्यामागून रक्त जातें, आणि रोग उत्पन्न होतो. ह्या सर्व गोष्टींची, मनोविकार व्यक्त करतांना, मीं बरीच फोड केलेली आहे. तेव्हां त्याविषयीं पुनरपि वाटाघाट करण्याचा हा प्रसंग नव्हे. मी फक्त इतकेंच ह्मणतों कीं, एकदम थंड हवा घेणें, गार खडकावर निजणें, जमिनीवर लोळणें, एकाएकीं झोंप लागणें, किंवा घामानें अंग डबडबलें असतां वाऱ्याच्या झुळकीशीं पाठ देऊन बसणें, ह्या सर्व गोष्टी, अथवा ह्यांपैकीं एकही गोष्ट, **विद्युज्ज्ञानशक्तीची** बिघडाबिघड करण्यास कारण होईल. आणि त्यांमुळें, येणाऱ्या झोंपेपासूनही रोगोद्भवशक्ति उत्पन्न होईल. ती प्रमाणाबाहेर रक्त फेंकील, आणि अतिशय अशक्त अवयवावर, किंवा अतिशय

दुर्बळ अशा शरीराच्या भागावर भार घालून रोग उत्पन्न करूं शकेल. किंवा हितकर पदार्थ प्रमाणाहून मनस्वी अधिक, किंवा अतिशय कमी, खाल्ल्यानें किंवा प्याल्यानें अथवा अहितकर पदार्थ किंवा विषारी पदार्थ खाल्ल्यानें किंवा प्याल्यानें-ही ज्ञानतंतूंची बिघडाबिघड होऊन वर सांगितलेले रोग उत्पन्न होतील.

ह्यावरून मानसिक आणि शारीरिक विकार शरीरांतील **विजेची** कशी बिघडाबिघड करतात, तें स्पष्टपणें कळून आलें. ती प्रथमतः नाजूक अवयवांवर आपलें ठाणें बसविते, रक्तास आपल्याजवळ बोलावते, आणि रोग, वेदना, व मृत्यु ह्यांस घेऊन येते. ह्यावरून हें उघड होतें कीं, जो **ज्ञानरस** प्रमाणानें असल्यास शरीराच्या आरोग्यास कारण होतो, तोच रस प्रमाणाबाहेर फेंकला गेल्यास रोगास कारण होतो. ज्ञानतंतूंतील एकंदर **वीज,** शेंकडा **शंभर** प्रमाणें असली पाहिजे. ह्यापैकीं शेंकडा पन्नास भाग, मनाच्या इच्छेच्या हुकमांत, आणि **इच्छितज्ञानतंतूंच्या** ताब्यांत असतात. बाकी शेंकडा पन्नास राहिली ती, मनाच्या अनिच्छितशक्तीकडे, ह्मणजे **अनिच्छितज्ञानतंतूंच्या** स्वाधीन असते. आतां ह्या शक्तीपैकीं एकीचे पन्नास भाग—सगळेच्यासगळे—जे आरोग्यांत सम असावयाचे—ते जर एका अवयवावरच एकदम जमा होतील, तर त्या अवयवाचा नाश होऊन जाईल हें उघड आहे. मनानें जर एकादें दुःखदायक वर्तमान ऐकिलें, किंवा त्यावर एखादें महत्संकट येऊन गुदरलें, आणि त्यानें विजेचे पन्नासही भाग एकदम मेंदूंत जमा केले, तर मनुष्य लागलींच बेशुद्ध होऊन त्यास मृत्यु येईल. हें सर्व, मन हें दुःखांत बुडून निर्व्यापार झाल्यामुळें, इच्छितज्ञानतंतूंवर मनोविकाराचा दाब पडून घडून आलें. परंतु असाच दुःखकारक परिणाम, खाणें, पिणें, अथवा दुसरे कोणतेही शारीरिक विकार अनिच्छित शक्तीवर घडून, मनास कोणताही संस्कार नसतां घडूं शकेल. ह्यावरून येवढी गोष्ट समजून चुकली कीं, मनोविकारापासून उत्पन्न होणारे सर्व रोग, इच्छितज्ञानशक्तीच्या पन्नास भागांनीं उत्पन्न होतात. आणि तेच रोग शारीरिक विकारांतून निघाले ह्मणजे अनिच्छितज्ञानशक्तीच्या पन्नास भागांनीं उत्पन्न होतात; आणि त्यांत मनाची कोणत्याही प्रकारची चलविचल नसते.

ह्या **विद्युज्ज्ञानशक्तीं**पैकीं कोणत्याही शक्तीचा थोडासा भाग जरी स्नायूमध्यें बोलावला गेला, तरी तेथें वेदना सुरू होतील. त्यापेक्षां अंमळ अधिक भाग बोलावला गेला, तर, तेथें आग होऊन मनस्वी दुःख होईल. आणि सारे पन्नासही भाग जर तेथें बोलावले गेले, तर तेथची चेतना नष्ट होऊन जाईल,

किंवा तो भाग अगदीं सडून जाऊन, त्या स्नायूचा अगदीं नाश होईल. शरीरांतील कोणत्याही अवयवावर ह्या शक्तींपैकीं कोणत्याही शक्ति बोलावल्या गेल्या तर, त्याचाही परिणाम असाच होणार. ह्मणजे त्या अवयवाचा नाश होऊन जाईल.

वेदना तीन प्रकारच्या आहेत. **पहिल्या**—ऋणविद्युत्पासून उत्पन्न होणाऱ्या. ह्या रक्तास ओढून आपल्याकडे आणतात, आणि दुःखाशीं नेहेमीं खिळलेल्या असतात. **दुसऱ्या**—धनविद्युत्पासून उत्पन्न होणाऱ्या. ह्या रक्तास लोटून देतात. ह्या पहिल्याप्रमाणेंच असह्य असतात तरी, त्या दुःखाबरोबर कधींही असत नाहींत. **तिसऱ्या**—दोन शक्तींच्या मिश्रणाच्या गोंधळानें उत्पन्न होणाऱ्या. ह्यापासून दाह, कंडू, ठणका, इत्यादि विकार उत्पन्न होतात. आणि ते अत्यंत दुःसह असतात.

येवढा वेळपर्यंत मीं आपणांस **रोगशास्त्रा**विषयीं बऱ्याच सूचना केल्या. त्या आपणां सर्वांस खचित कल्पित कादंबरीप्रमाणें भासतील. पण त्या जितक्या अद्भुत व नव्या आहेत, तितक्याच त्या आह्मां मानवजातीच्या कल्याणास महत्वाच्या आणि मनोरंजक आहेत. मनोविकारानें शरीरावर मोठमोठाले हितकारक किंवा अहितकारक परिणाम घडूं शकतात असें वैद्यलोकही नेहेमीं सांगत असतात. आणि ह्मणूनच ते आपल्या रोग्यास बरें होण्यासाठीं, भली मोठी आशा दाखवीत असतात; व नाउमेदीचे शब्द, त्याच्यापाशीं कोणी काढील सबरील ह्मणून, मोठी दक्षता ठेवीत असतात. ह्या सर्व गोष्टी त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या आहेत; परंतु जड आणि चैतन्य ह्यांस जोडणारा दुवा त्यांस न समजल्यामुळें, रोगशास्त्रांतील खरी सत्यता त्यांस कळत नाहीं, ह्मणूनच ते ह्या शास्त्राच्या संबंधानें सर्वांपुढें येऊन "**ढोंग**" ह्मणून ओरड घालतात. पण तिच्यापासून त्यांस काडीचाही उपयोग नाहीं. कारण हें **सत्य** सर्वांच्या पुढें दंड थोपटून उभें राहील, आणि पुढील पिढ्या—ह्याचे प्रतिपक्षी जेव्हां स्मशानांत गडप होऊन, त्यांची वर डोकीं काढण्याची आशा संपेल तेव्हां—त्यांची खरी किंमत जाणतील. आमच्या विषयाचें तात्पर्य ह्मणून येवढेंच कीं, मनोविकाराविषयीं फार जपलें पाहिजे. मनाची स्थिति सम ठेवण्याविषयीं निरंतर दक्ष असणें, ही अत्यंत महत्वाची गोष्ट होय. मनाची शांतता ही, आरोग्य, समाधान, सौख्य आणि सत्यधर्माची अभिरुची ह्यांची माता आहे. आज काय थंडीच आहे, आज काय उष्णताच आहे; आज काय ओलेंच आहे; आज काय सुकेंच आहे; मला अमुकच नाहीं, मला तमुकच नाहीं; तो असाच आहे, तो तसाच आहे; परमेश्वराच्या घरीं न्यायच नाहीं, परमेश्वर मला पहातच नाहीं; इत्यादि कुरकुर करतांना व रात्रंदिवस रडगाणीं गा-

तांना हजारों लोकांस आपण पाहतों, परंतु त्यांच्याविषयीं आपणांस विशेष आश्चर्य मानावयास नको. कारण, रोग आणि असमाधान ह्मटलें कीं, त्यांना हीं रडगाणीं व कुरकुरी असायच्याच. मनाची ही स्थितिच त्यांना उत्पन्न करते. ह्मणून सावध असावें.

## सुसरीचें घरटें.

सुसरीचें घरटें आणि पानकोंबड्याचें घरटें सारखेंच असतें. ह्या घरट्याची उंची चार फूट असून बुंधाशीं त्याचा व्यास सुमारें पांच फुटांचा असतो. हें घरटें शेवाळ, गवत, व लव्हाळा ह्यांचें केलेलें असतें. प्रथमतः तळाशीं खडकसा पाहून त्यावर सुसर एक अंड्यांचा थर ठेवते. नंतर त्यावर चिखलाचा व मातीचा सुमारें आठ इंच जाडीचा थर घालते. आणि पुन्हा त्यावर दुसरा अंड्यांचा थर ठेवते. ह्याप्रमाणें एका घरट्यांत एकपासून २०० पर्यंत अंडीं घालते ! नंतर कोणा शत्रूस वगैरे तें दिसूं नये ह्मणून ती आपल्या शेपटीच्या तडाक्यानें सभोंवतालचें गवत मोडून त्याच्यावर पाडून तें घरटें झांकून टाकते. आणि जवळपास राहून त्यावर पाहरा करते. उन्हानें तीं अंडीं फुटलीं, आणि पिलें बाहेर पडलीं, ह्मणजे ती त्यांस आपल्या शुश्रुषेखालीं घेते. त्यांस नित्य आपल्या अंगाची ऊब देऊन खाण्यापिण्यास आणून घालते.

**न्यू ओरलिन** येथील डाक्टर **लुकेनबर्ग**, हा, एक सुसरीचे अंड्यासहवर्तमान घरटें प्रदर्शनांत दाखविण्यासाठीं, **सेंटपिटर्सबर्ग** येथें घेऊन चालला होता. सदरहू घरटें एका पेटींत नीट बांधून मजबूत रीतीनें घेतलें होतें. हा डाक्टर जहाजावर असतांना तेथील कितीएक गृहस्थांनीं त्यांतील सुसरीचें एक अंडें फोडण्याविषयीं अत्याग्रह केला. व त्यापासून कांहीं भीति नाहीं, ह्मणून सांगितलें. डाक्टर **लुकेनबर्ग**, ह्यानेंही मित्रमंडळीच्या करमणुकीकरतां ह्मणून त्या घरट्यांतून एक अंडें काढून तें फोडलें. तों त्यांतून एक सुसरीचें पिलुं बाहेर आलें. त्याचें मंडळी आश्चर्य करीत आहेत तोंच दुसरें, तिसरें, चौथें, अशीं एकामागून एक बाहेर येण्यास सुरवात झाली ! जसें काय बीळ उघडलें ! एकंदर सुमारें शंभर पिल्लें बाहेर पडलीं ! तीं त्या डाक्टरानें आपल्या घरांतच बाळगलीं होतीं. तीं माडीवर चढत, जिन्यावरून खालीं जात आणि कुत्र्याच्या लहान पोराप्रमाणें भोंकत आणि केंकटत !

---

Printed and published by Janardan Mahadeo Gurjar at Javaji Dadaji's "Nirnaya-sagara" Press, No. 23, Kolbhat Lane, Kalkadevi Road, Bombay.

# केरळकोकिळ.

पु० ७] [अं० ११

## पूमा.



दक्षिण अमेरिकेंत, सिंह व वाघ ह्या दोहोंशीं अंशतः साम्यता पावणारें एक जनावर आहे, त्यास **'पूमा'** असें ह्मणतात. हा प्राणी तिकडील पुष्कळ प्रदेशांत आढळून येतो. त्याची वस्ति नेहेमीं गर्द झाडींत असते. **पूमा** झाडावर चढण्याच्या कामांत मोठा पटाईत आहे, इतकेंच

नव्हे, तर तो बहुतकरून झाडांच्या फांदीवरच निजलेला असतो. व त्याचा रंग झाडाच्या सालीसारखाच असल्यामुळें, तो एकाएकीं कोणाच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ह्यामुळें त्या झाडाखालून हरणें, डुकरें, सांबरें इत्यादि पशु निर्भय चित्तानें जात असतात. त्यांजवर तो एकदम झडप घालतो, आणि आपलें उपजीवन करतो. झाडांवरचीं माकडें व पक्षी ह्यांच्यावरही ताव मारण्यास तो चुकत नाहीं. कधीं कधीं गांवांत शिरून डुकरें, मेंढरें, कोंबडीं, कुत्रीं ह्यांजवरही हल्ला करतो. एका रात्रींत पन्नास पन्नास मेंढरांचा सुप्पा उडवितो!

शेपटीपासून नाकापर्यंत **पूमाची** लांबी साडेचार फूट भरते. त्याचा रंग पिंगट, ह्मणजे कोल्ह्यासारखा असून पोटाकडे पांढरा होत गेलेला असतो. ह्याचा आकार दिसण्यांत फार सुंदर आणि डौलदार असतो. ज्या मानानें तो शक्तिमान आहे, त्या मानानें त्याच्या अंगांत धैर्य नाहीं. ह्यास्तव शिकारी लोक कुत्र्याकडून त्यास पिटाळून बाहेर आणतात, आणि मग त्यावर गोळी घालतात. शिकारी लोक सिंह, वाघ इत्यादि हिंसक पशूंचें मांस कधीं खात नाहींत. परंतु **पूमाचें** मांस खातात. कित्येक प्राणीशास्त्रवेत्त्यांनीं **पूमाचें** मांस गोवत्साच्या मांसासारखें लागतें, असें लिहिलेलें आहे. **पूमाच्या** अंगावरील केस फारसे उपयोगी नसतात. परंतु त्याचें चर्म पुष्कळ कामास उपयोगी पडतें. त्याचे बूट, हातमोजे, कमरपट्टे वगैरे कितीएक वस्तु फार उत्तम होतात. **पूमा** मोठा खेळाडू आणि गोजिरवाणा प्राणी आहे. आणि त्यास माणसाळण्यास फार उशीर लागत नाहीं.

**कीन** ह्मणून एक प्रसिद्ध नाटकवाला होता. त्याच्याजवळ एक **पूमा** असे. तो कुत्र्याप्रमाणें त्याच्या पाठीमागून मोकळाच हिंडे. एकदां हा गुणी मनुष्य लंदनमध्यें असतांना, त्याचा **पूमा** मोकळा सुटून सर्व रस्त्यानें भटकत फिरत होता. ह्मणून एका पोलिसच्या शिपायानें त्यास धरून बांधून ठेवलें. इतकें झालें तरी, तो कोणाच्याही वाटेस गेला नाहीं. **पूमा** हें इंग्रजी भाषेंतील नांव आहे. अमेरिकेंत ह्यास **लायन**, **पांथर**, किंवा **पेंटर** असें ह्मणतात. कांहीं प्रांतांत ह्यास **'कॉगर'** अशीही एक संज्ञा आहे.

आपण चालत असतांना **पूमा** दृष्टीस पडला, तर भिऊन उभें राहूं नये. तसेंच न थांबतां चालत पुढें जावें. ह्मणजे त्यापासून कोणत्याही

प्रकारची इजा पोंचावयाची नाहीं. कारण, कोणताही प्राणी चालतांना थांबल्याशिवाय, त्यावर त्यास झेंप घालतां येत नाहीं, हा एक त्याच्या अंगीं विशेष धर्म आहे.

---

# प्रमाण.

## श्लोक ( भुजंगप्रयात. )

अती कोपतां कार्य जातें लयाला ॥ अती नम्रता पात्र होते भयाला ॥
अती काम तें कोणतेंही नसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १ ॥
अती लोभ आणी जना नित्य लाज ॥ अती त्याग तो रोकडा मृत्यु आज ॥
सदा तृप्त नेमस्त सर्वा दिसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ २ ॥
अती मोह हा दुःखशोकासि मूळ ॥ अती काळजी टाकणें हें हि खूळ ॥
सदा चित्त हें सद्विचारें कसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ३ ॥
अति ज्ञान अभ्यासिल्या क्षीण काया ॥ अती खेळणें हा भिकेचाचि पाया ॥
न कष्टाविणें त्वां रिकामें बसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ४ ॥
अती दान तेंही प्रपंचांत छिद्र ॥ अती हीन कार्पण्य मोठें दरिद्र ॥
बरें कोणतें तें मनाला पुसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ५ ॥
अती भोजनें रोग येतो घराला ॥ उपासें अती कष्ट होती नराला ॥
फुका सांग देवावरी कां रुसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ६ ॥
अतिस्नेह तेथें अवज्ञा उदंड ॥ अतिद्वेष भूलोकिंचें पंककुंड ॥
अती मत्सरें त्वां कशाला कुसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ७ ॥
अती आळशी वांचुनी प्रेतरूप ॥ अती झोंप घे तोहि त्याचाचि भूप ॥
सदा सत्कृतीमाजि आत्मा विसावे ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ८ ॥
अती द्रव्यही जोडितें पापरास ॥ अती घोर दारिद्र्य तो पंकवास ॥
धनें वैभवें त्वां न केव्हां फसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ९ ॥
अती भाषणें वीटती बुद्धिवंत ॥ अती मौन मूर्खत्व तें मूर्तिमंत ॥
खरें तत्व तें अल्पशब्दें ठसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १० ॥
अती वाद घेतां दुरावेल सत्य ॥ अती 'होसहो' बोलणें नीचकृत्य ॥
विचारें तुवां ज्ञानमार्गीं घुसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ ११ ॥
अती औषधें वाढवीतात रोग ॥ उपेक्षा अती आणिते सर्व भोग ॥
हिताच्या उपायास कां आळसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १२ ॥

अती दाट वस्तींत नाना उपाधी ॥ अती शून्य रानांत औदास्य बाधी ॥
लघुग्राम पाहोनि तेथें वसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १३ ॥
अती शोक तो देतसे दुःखबुद्धि ॥ अती मानितो हर्ष तो क्षुद्रबुद्धि ॥
ललाटाक्षरां सांग कोणीं पुसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १४ ॥
अती भूषणें मार्ग तो संकटाचा ॥ अती थाट तो वेष होतो नटाचा ॥
रहावें असें कीं न कोणीं हसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १५ ॥
स्तुतीला अती बोलती श्वानवृत्ति ॥ अती लोकनिंदा करी दुष्टचित्ती ॥
न कोणा उगें शब्दसर्पें डसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १६ ॥
अती भांडणें नाश तो यादवांचा ॥ हटानें अती वंश ना कौरवांचा ॥
कराया अती हें न कोणीं धसावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १७ ॥
अती गोड खाणें नसे रोज इष्ट ॥ कदान्नें अती सेवणें हें कनिष्ठ ॥
असोनी गहूं व्यर्थ खावे न सावे ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १८ ॥
जुन्याचे अती भक्त ते हट्टवादी ॥ नव्याचे अती लाडके शुद्ध नादी ॥
खरें सार शोधोनियां नित्य ध्यावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ १९ ॥
सदा पद्य घोकोनियां शीण येतो ॥ सदा गद्य वाचोनियां त्रास होतो ॥
कधीं तें कधीं हेंहि वाचीत जावें ॥ प्रमाणामधें सर्व कांहीं असावें ॥ २० ॥

---

# विद्युन्मानसशास्त्र.

## व्याख्यान पांचवें.

विषय—रोगपरिहारोपाय आणि पंचभूतानुभवशास्त्र.

स्त्रीपुरुष हो,

रोगशास्त्राचें क्षेत्र, स्वभावतःच केवढी अफाट जागा व्यापून राहतें, आणि त्याच्या भिन्न भिन्न भागांतून थोडा थोडा अंश घेतला तरी, त्याचा विस्तार केवढा मोठा होईल, ह्याचा आपण विचार करूं लागलों तर, गेल्या व्याख्यानांत मीं प्रदर्शित केलेलीं मतें, त्या विषयाच्या विशालत्वाच्या मानानें पाहिलें तर, फारच संक्षिप्त झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल. तथापि तेवढ्यानेंच माझे हेतु सफल झाले, असें मी माझ्याठायीं मानतों. कारण रोगाच्या बाबतींत, मानसिक आणि शारीरिक व्याधींच्या स्थित्यंतराचें महत्व आपणांस पूर्णपणें समजलें, आणि त्याची खरी योग्यताही आपणां सर्वांच्या लक्षांत येऊन चुकली. माझी बालंबाल

खात्री आहे कीं, त्यांत एक अक्षर सुद्धां खोटें नाहीं. अथपासून तों इतिपर्यंत सत्यच भरलेलें आहे. ह्यास्तव कितीही राज्यक्रांति झाल्या, कितीही जलप्रलय झाले; तरी त्याचा विजयध्वज यावच्चंद्रदिवाकरौ फडकतच राहील.

पूर्वीच्या व्याख्यानांत रोगशास्त्राचें विवेचन केलें. प्रस्तुतच्या व्याख्यानांत मी रोगपरिहारोपायाकडे वळतों.

मनस्तापाच्या परिणामाचें उद्घाटन करतांना, मीं अगदीं स्पष्ट आणि निर्विवाद सिद्ध करून दिलें आहे कीं, भीति, औदास्य व दुःख ह्यांमध्यें, किंवा विपत्ति, संकट, अगर हालअपेष्टा, ह्यांमध्यें, मन हें, संकोच पावून आपल्याच ठिकाणीं घोंटाळून राहतें, आणि विद्युज्ज्ञानतंतूंतील रसास अवरोध करून, त्यास शरीरांतील कोणत्याही एका अवयवावर एकत्र होऊं देतें, व तेणेंकरून रोगाची उत्पत्ति होते. ह्याप्रमाणें मनाला जर ज्ञानतंतूंतील विद्युच्छक्तीची समतोलता

---

१ 'विद्युच्छक्ति' ह्मणजे शरीरांतील एक प्रकारचें ईश्वरी तेज. ही गोष्ट मागील तिसऱ्या व चवथ्या व्याख्यानावरून वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. ह्या तेजाबद्दल—ओजाबद्दल—वाग्भटांनीं आपल्या अष्टांगहृदयांत येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे.

ओजस्तु तेजो धातूनां शुक्रांतानां परं स्मृतम् ।
हृदयस्थमपि व्यापि देहस्थितिनिबंधनम् ॥ १ ॥
स्निग्धं सोमात्मकं शुद्धमीषल्लोहितपीतकम् ।
यन्नाशे नियतं नाशो यस्मिंस्तिष्ठति तिष्ठति ॥ २ ॥
निष्पद्यंते यतो भावा विविधा देहसंश्रयाः ।
ओजः क्षीयेत कोपक्षुधा-यानशोकश्रमादिभिः ॥ ३ ॥
बिभेति दुर्बलोऽभीक्ष्णं ध्यायति व्यथितेंद्रियः ।
विच्छायो दुर्मना रूक्षो भवेत् क्षामश्च तत्क्षये ॥ ४ ॥

वाग्भट. सू० अ० ११—

अर्थ—"शुक्रांत सप्तधातूंचें जें उत्तम सत्त्व किंवा तेज त्याला 'ओज' असें ह्मणतात. त्याचें मुख्य स्थान जरी हृदय आहे, तरी तें सर्व शरीर व्यापितें. तें जीविताला आधारभूत आहे. देहस्थिति त्याजवरच अवलंबून आहे. त्याचा नाश झाला असतां जीवाचा अवश्य नाश होतो. तें जोंपर्यंत आहे, तोंपर्यंतच जीव आहे. शरीरांत घडणाऱ्या निरनिराळ्या व्यापारांना तेंच कारणीभूत आहे. क्रोध, क्षुधा, चिंता, शोक, इत्यादि कारणांनीं ओजाचा क्षय होतो. त्याचा क्षय झाला असतां मनुष्य फार भित्रा, व दुर्बळ होतो. वरचेवर चिंतेंत निमग्न असतो. इंद्रियांना व्यथा होते; अंगाला विवर्णता येते; उत्साह नाहींसा होतो; व शरीर रूक्ष व कृश होतें."

बिघडतां येते, आणि तीस कोणत्याही अवयवांवर जमवून रोग उत्पन्न करतां येतो, तर त्याच मनाला ती शक्ति हवी तिकडे ओढून घेऊन अथवा पसरून देऊन, पुनरपि अभिसरणाची समतोलता करून, प्रकृति सुधारतां आली पाहिजे हें उघड आहे. ही गोष्ट, मनालाच दुसरा एखादा मनोविकार जोडून करतां येते. मात्र त्या विकाराच्या अंगीं पुरेशी आक्रम्यशक्ति असली ह्मणजे झालें. उदाहरणार्थः—समजा; कीं एक मनुष्य पांच हजार रुपये मिळवून, ती थैली आपल्या पुढें घोड्यावर घेऊन सायंकाळच्या सुमारास आपल्या घराकडे जावयास निघाला आहे. त्याचें घर एक मैलाच्या टप्प्यांत आलें. पण तो गृहस्थ मनस्वी थकलेला असून त्याचें कपाळ इतकें दुखूं लागलें कीं, त्यामुळें घोड्याचा लगाम खोगरावर टाकून त्यानें घोड्यास मोकळें सोडलें. त्याचे हातपाय इतके गळून गेले आहेत कीं, तो जेमतेम खोगीर सांभाळून बसला आहे इतकेंच. अशा स्थितींत रस्त्याच्या एका बाजूच्या ओसाड रानांतून अकस्मात् एक चोर बाहेर पडला, आणि पटकन् घोड्याच्या लगामास हात घालून, भरलेलें पिस्तुल त्याच्या पुढें करून ह्मणाला, "हं ! चल टाक; पैसा नाहीं तर जीव." घोड्यावर बसणारानें झपकर हात उगारून चोराच्या हातावर फाडकर एक चाबकाचा तडाका लगावला. त्याबरोबर त्या चोराच्या हातचें पिस्तुल खालीं पडलें, आणि त्याचा घोंटाळा झाला. घोड्यावर बसणाराला आपल्या भोंवतीं कोण आहे, ह्याचें कांहींच भान राहिलें नाहीं. त्यानें घोड्यास टांच मात्र दिली. घोडा भरधांव निघाला आणि तो शुद्धीवर येण्यापूर्वींच त्यानें घराचा दरवाजा गांठला. ह्या एवढ्या कृत्यांत, जीवतत्त्व जें एवढा वेळ मस्तकांतच शिरून बसलें होतें तें, शरीराच्या शाखाशाखांत ओढलें जाऊन हातापायांत ऊब आली. आतां त्याचें कपाळ दुखणें कोठें राहिलें ! तें गेलें. पार झालें ! ह्या जबरदस्त मनोविकारानें त्याच्या मेंदूमध्यें घोंटाळत असलेला **विद्युज्ज्ञानरस** झट ओढून घेतला—त्याच्या मागून रक्त आलें—नवीन हालचाल सुरू झाली, आणि त्याची प्रकृति ताळ्यावर आली.

---

१ असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येणच गृह्यते ॥

श्री॰ गीता॰ अ॰ ६—

"हे अर्जुना ! मन हें चंचल आणि आकलन करण्यास कठीण यांत संदेह नाहीं. परंतु हे कौंतेया ! तें अभ्यासानें आणि वैराग्यानें स्वाधीन ठेवतां येतें."

२ मनोविकारांनींच व्याधि बऱ्या होतात, ह्याला अनेक उदाहरणें आहेत. त्यांपैकीं एक गोष्ट फारच उत्कृष्ट असल्यावरून खालीं दिली आहेः—

एका श्रीमानास हिंवज्वर आला होता. तो वैद्यास ह्मणाला, औषध दिल्यावांचून

ह्यांत असंभाव्य असें काय आहे ? कांहीं नाहीं. झालें तर. ह्यावरून ह्या शास्त्रांत-ही अद्भुत असें कांहीं नाहीं. कारण, **हें शास्त्र ह्मणजे मनोविकाराच्या स्थित्यंतरानें रोग बरे करण्याची विद्या.**

आतां ही शक्ति कशी उत्पन्न करतां येते, हेंही आपणांस समजून द्यावें, अशी माझी इच्छा आहे. हें ध्यानांत असूं द्या कीं, मन, **विद्युज्ज्ञानरसास** स्पर्श करून त्यास प्रेरणा करतें. आणि तो रस रक्तास प्रेरणा करतो. **'विद्युन्मानस'** ही एक **चित्ताकर्षक** विद्येची पद्धत आहे. जे रोग उद्भवण्यास मानसिक अथवा शारीरिक विकारच कारणीभूत झालेले असतात, ते रोग, रोगी मानसिक स्थितींत असेल तर मनासच बरे करतां येतात. आणि आपण त्यावर पाहिजे त्या प्रमाणानें नवे मनोविकार सहज उत्पन्न करूं शकतों. ह्मणून रोगोत्पत्तीचें मूळ कोणतेंही असो, किंवा त्याची जात कोणतीही असो, मन हें आपल्या आकर्षणाच्या योगानें, किंवा स्थित्यंतराच्या योगानें **ज्ञानरसाच्या** अंगीं बरें करण्याची शक्ति आणतें, किंवा निदान गुणावह परिणाम तरी करतें. उष्णता किंवा थंडी; सर्दी किंवा उष्ण ह्यांचें प्रमाण अधिक झालें असें वाटलें, किंवा हवेंत कांहीं फेरफार झाल्याचें दिसून आलें तर, **ज्ञानरस** फुप्फुसांत जमूं देऊन **उद्दीपकशक्ति** उत्पन्न होईल, अशी रुधिराभिसरणाची हालचाल होऊं द्यावी. ह्मणजे मन, त्यास चहूंकडे पसरून समतोल करतें, आणि प्रकृति तेव्हांच ताळ्यावर येते. मग ती फुप्फुसाची प्रदीपकता उदासीनपणानें, दुःखानें, कीं दुसऱ्या कोणत्याही मनस्तापानें प्राप्त झालेली असो. अथवा तेच विकार—व्याधि—कोणत्याही एखाद्या रोगानें अगर वेदनेनें शरिरांत उद्भवले असतील, तर मनस्तापानें उद्भवलेल्या विकाराप्रमाणेंच, त्यांस ताळ्यावर आणण्याची शक्ति मनामध्येंच आहे. खाण्यापिण्यानें, किंवा एक ठिकाणीं बसून राहण्याच्या संवयीनें अग्निमांद्य जडलें असलें तरी, मनोविकारानें उद्भवलेल्या व्याधीसारखाच त्यास गुण पाड-

---

ज्वर वंद करशील तरच तूं वैद्य खरा. वैद्यानें त्यास एकदम 'मूर्ख' ह्मटलें. होतां होतां शिवीगाळ होऊन रोग्यानें वैद्यास घराबाहेर ढकलून दिलें. त्या दिवशीं ज्वर आला नाहीं. तेव्हां वैद्यानें त्यास बजावलें व तितकी उष्णता औषध न देतां आणण्यासाठीं आपण असें केलें असेंही मुद्दाम कळविलें. ह्या चातुर्यानें तो श्रीमान गृहस्थ सुप्रसन्न झाला.

आकस्मिक मनास धक्का बसण्यासारखें वर्तमान सांगून उचकी हटकून वंद करतां येते, हें तर प्रसिद्ध आणि अनुभवशीर आहे.

ण्याचा, किंवा निखालस बरें करून टाकण्याचा धर्मही मनाच्या अंगीं आहे. मी असें ह्मणत नाहीं कीं, मानसिक विकाराच्या व्याधिग्रस्त भागांतील एखाद्या अवयवाचा नाश झाला असल्यास विद्युज्ज्ञानशक्तीनें तो बरा होईल. समजा; कीं क्षयरोगानें फुप्फुसांत क्षतें पडलीं असतील तर तीं बरीं होणें अशक्य आहे. डोळ्यांतील ज्ञानतंतुच जळून गेले असतील, तर ती दृष्टि पुन्हा येणें अशक्य आहे. श्रवणज्ञानतंतुच लयास गेले असतील, तर बहिऱ्या मनुष्यास गुण पडावयाचा नाहीं. पण असल्या ठिकाणीं औषधोपचारांस सुद्धां ह्मतच टेंकावे लागणार. कारण, पायाच जर मुळीं नाहीं, तर इमारत बांधावयाची कशावर? बरें करण्याच्या संबंधानें येवढा वेळ मी जें कांहीं बोललों, किंवा पुढें बोलणार, तें फक्त बरें होण्यास जे रोग योग्य आहेत, त्या संबंधानें असें समजावें. माझ्या ह्मणण्याचा हेतु इतकाच कीं, विद्युज्ज्ञानशक्तीचे जे पन्नास भाग मनाच्या सत्तेखालीं असतात, त्यांच्या अंगीं, अवयवांचा नाश झालेला नसेल तर, ते रोग बरे करण्याचें सामर्थ्य आहे. मी असेंही पण ह्मणत नाहीं कीं, सर्वच प्रसंगीं रोगपरिहारार्थ हें एक शास्त्रच बस्स आहे. तर, त्याच्या बरोबर औषधोपचारही करावे लागतील. कारण, रोगांची उत्पत्तिच जर मुळीं शारीरिक आणि मानसिक ह्या दोहों व्यथांनीं होते, तर ते बरे होण्यास जसे मानसिक तसेच शारीरिक औषधोपचारही असले पाहिजेत हें उघड आहे.

औषधापासून शरीरावर शारीरिक परिणाम घडेल, परंतु रोग कधीं बरा व्हावयाचा नाहीं. एखादा रोग औषधानेंच बरा झालासा वाटला, तरी तो विद्युन्मानसशास्त्राच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें चित्ताकर्षणानेंच आरोग्यशक्ति उत्पन्न होऊन झाला असें समजलें पाहिजे. ह्याचें कारण उघड आहे. तें हें कीं, आरोग्य आणण्याची शक्ति व्यक्तिमात्रांत आहे, औषधांत नाहीं. औषधोपचार आणि मनोधर्म हे शरीरांतील आरोग्यतत्त्वाला एका योग्य ठिकाणीं जमा करून तें उपयोगी पडण्यास समर्थ होईल असें करतात. ह्या मुद्यावरील माझ्या ह्मणण्याचा खुलासा पुढील उदाहरणावरून चांगला होईल.

आपण एका बागेंत गेलों, आणि तेथें एक फणसाचें झाड पाहिलें. त्या झाडाच्या एका फांदीस एक फणस लागलेलें आहे, पण तें कच्चें आहे. त्याला पक्वदशेस यावयाला बराच अवकाश आहे. ह्या फळाचा आकार फार मोठा असल्यामुळें, ज्या ढाळीस तें लागलें आहे, ती ढाळी त्या भारानें इतकी वांकलेली आहे कीं, त्या झाडाच्या खोडापासून तिचें मूळ हळू हळू चिरत जाऊन, बरीच

मोठी भेग पडलेली दिसत आहे. इतक्यांत तेथें त्या बागेचा माळी आला, आणि त्यानें तें पाहिलें. तेव्हां तत्काळ त्याच्या लक्षांत आलें कीं, आतां हें फळ पिकेपर्यंत जर आपण वाट पाहिली, तर त्या फळाच्या भारानें ती ढाळी थोड्याच दिवसांत तुटून खालीं पडेल. ह्मणून त्यानें ती चिरलेली ढाळी, पडलेली भेग बुजेपर्यंत हलकेच वर उचलून, ती नीट रहावी ह्मणून खालीं एका काठीच्या तुकड्याचा टेंका दिला. नंतर एक चिंधी आणून त्या सांध्यावर गुंडाळली, आणि त्यावर डांबर लावलें. आतां ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, तीस बरें करण्याची शक्ति जशी त्या टेकूंत नाहीं, तशीच ती त्या चिंधींतही नाहीं, व डांबरांतही नाहीं. टेकूनें फक्त ढाळीवर पडलेलें वजन तोलून धरलें, व चिरलेला भाग एकत्र ठेवला; त्याच्या भोंवतीं चिंधी गुंडाळली होती तिनें, डांबरास त्या चिरीमध्यें शिरूं दिलें नाहीं; आणि डांबर लावलें होतें तें, वारा, पाऊस, इत्यादि बाह्योपद्रवांची त्यास बाधा होऊं नये ह्मणून. हे सर्व बाह्योपचार—औषधोपचार—झाले. परंतु खरोखर **आरोग्योद्भव** शक्ति ह्मणून जी काय, ती त्या झाडांतच आहे. **आरोग्यजनक शक्ति**, किंवा **रोगपरिहारक तत्त्वें**, मूळ झाडांतच असतात, आणि तीं स्वतःच त्यास आरोग्य देतात. हीं **रोगपरिहारक तत्त्वें**, जशीं व जितकीं झाडांत आहेत, तशीं व तितकीं मनुष्यांतही आहेत. झाडांतील रोगपरिहारक तत्त्वांला **'गुप्त विद्युद्वनस्पतिरस'** असें ह्मणतात. हा रस, आपल्या अभिसरणानें चिकास समतोल करतो, आणि चीक लांकूड तयार करतो. **'वृक्षविद्युत्'** ह्मणून जी ह्मणतात, तिचेंच हें सर्व कृत्य होय. ही वीज वनस्पतिजीवाच्या हुकुमांत असते. त्याच प्रमाणें मनुष्यामध्यें जें एक रोगपरिहारक तत्त्व आहे, त्याचें नांव **'गुप्तविद्युज्ज्ञानरस.'** हा रस आपल्या अभिसरणानें रक्ताला समप्रमाणांत ठेवतो, आणि त्या रक्तापासून मांस उत्पन्न होतें. ह्या रसाला **'शारीरविद्युत्'** असें ह्मणतात, व तो मनाच्या हुकुमांत असतो.

---

१ दश मूलशिरा हृत्स्थास्ताः सर्वं सर्वतो वपुः ।
रसात्मकं वहंत्योजस्तन्निबद्धं हि चेष्टितम् ॥

वाग्भट. शा १ अ० ३—

अर्थ—हृदयांत मुख्य १० शिरा आहेत. त्या, रसात्मक ओज सर्व शरीरांत नेतात. व ह्मणूनच मनुष्याच्या चलनवलनादि क्रिया त्यांच्या स्वाधीन असतात."

व्याख्यात्याचें तिसऱ्या व्याख्यानांतील ज्ञानरसाचें लक्षण (के. को. पा. १६४) व हें आमच्या भिषग्वर्याचें लक्षण किती तंतोतंत जुळतें बरें ?

ए. के. कोकील.

रोगपरिहारक तत्त्व मनुष्यामध्येंच आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद सिद्ध आहे. त्यांत, मीं जिला शरीरांतील **विद्युज्ज्ञानरस** असें ह्मटलें त्या–क्विुर्त्-च्या समावेश केला तर, औषधांत रोगपरिहारक तत्त्व मुळींच नाहीं, ही गोष्ट सहज दिसून येईल. आणि हेंही कळेल कीं, औषधोपचाराचा देहावर परिणाम ह्मटला तर रोगपरिहारक तत्त्वाला साह्य करणें इतकाच काय तो. तो परिणाम कोणता ह्मणाल तर, मीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें **वीज** ही आपलें कार्य चालविण्यास समर्थ होईल अशा प्रकारें तीस समतोल राखून, योग्य स्थळीं जमा करणें हा. ह्यावरून आवश्यकता असेल त्या मानानें **विद्युज्ज्ञानरसाचें** प्रमाण सम करण्यासाठीं, मन हें, त्याच्या सत्तेखालीं असलेले त्याचे शेकडा पन्नास भागही एकत्र करील तर, औषधापासून घडून आलेला परिणाम जो रोगपरिहार, तो घडून येईल." वर दिलेल्या दोन्ही उदाहरणांतील रोगपरिहारक शक्तीमध्यें कांहीं भेद नाहीं. दोन्ही उदाहरणांत ती शक्ति एकच आहे. फरक इतकाच कीं, एका उदाहरणांत रोगपरिहारक शक्ति मनोविकाराच्या स्थित्यंतरानें उत्पन्न केलेली आहे, आणि दुसऱ्या उदाहरणांतील औषधोपचारानें–शारीरिक विकारानें–उत्पन्न केलेली आहे.

आतां असा एक प्रश्न येतो कीं, औषधांत जर रोगपरिहारक द्रव्य मुळींच नाहीं, तर उलटीचें औषध देऊन रोग्याच्या कोठ्यांतील अशुद्ध पदार्थ ओकून कसे पाडतां येतात ? ह्याचें उत्तर मी असें देतों कीं, तशी गोष्ट मुळीं घडतच नाहीं. तो प्रभाव औषधाचा मुळींच नव्हे, अशी मी तुमची खात्री करून देतों. माझें ह्मणणें असें आहे कीं, उलटीचें औषध हें, ओकारीचें मुळींच कारण नव्हे. उलटीचें कारण मनुष्यामध्येंच आहे. तें कोणतें ? तर शरीरांतील **वीज.** मेंदूंतील **विद्युज्ज्ञानरस** हें उलटीचें कारण. आतां त्यानें तें कसें घडतें, याचा विचार करूं या. उलटीच्या औषधांत–मग तें रसायनजन्य असो, कीं वनस्पतिजन्य असो–पृथक्करण करणाऱ्या धर्माचीं द्रव्यें मनस्वी मिश्र असतात. ओकून पडण्याचें जें काय बीज तें हेंच. उलटीचें औषध पोटांत घेतलें कीं, त्यांतील द्रव्यें कोठ्यांतील ग्रंथीपासून, फुप्फुसांच्या अंतरत्वचेपासून, अन्नमार्गाच्या नलिकाग्रंथीपासून, तोंडांतील व जिभेंतील ग्रंथीपासून उत्पन्न होणाऱ्या चिकट रसांतील आर्द्रता शोषण करून घेऊन, त्यास निःसत्व करून सोडतात. **वीज** ही, ह्या कृत्रिम उपायामुळें ज्ञानतंतूंतून निघून, आर्द्रपणा हरण केलेल्या भागांत शिरते. कारण, विजेचें आर्द्रपणाशीं विशेष सख्य आहे. **विद्युच्छक्ति** मेंदू-

तून ओढली गेली, आणि तितक्याच प्रमाणानें रक्त तिच्या मागोमाग गेलें, कीं चेहरा फिका पडतो—पक्वाशय खालवर हालूं लागतो—आणि त्यामुळें उलटी होते. हीच कायती त्यांतील गुरुकिल्ली. सर्द हवेमध्यें वीज जमा करतां येत नाहीं, हीच ह्या गोष्टीच्या खरेपणाची साक्ष होय. आर्द्रता ही विशेष विद्युदाकर्षक असल्यामुळें ती विजेस धरून ठेवते.

औषधें आणि त्यांच्या क्रिया, ह्याविषयीं मला जें काय सांगावयाचें होतें, तें मीं सांगितलेंच आहे. आतां त्यांच्या अंगीं कांहीं थोडी बरें करण्याची शक्ति आहे; आणि उलटीच्याचें औषधानें रोग्यास ओकून पडतें, असें धरून चालूं या. पण तसें असलें तर, मेलेल्या मनुष्याला उलटी कां होऊं नये ? त्याचें उत्तर हेंच कीं, जीवनशक्तीचा लय झाल्यामुळें, उलटीचें औषध निःसत्व पडतें. असो. मृत मनुष्याच्या संबंधानें ही एक सबब सांगितली, तर चालण्यासारखें आहे. पण एखादा मनुष्य रोगानें अत्यावस्थस्थितींत असून मरणोन्मुख झाला असेल, तर त्याला तरी उलटी व्हावी कीं नाहीं ? ती कां होत नाहीं ? त्याचें कारणही मी सांगून देतों. ज्या जीवनशक्तीवर उलटी अवलंबून असते, ती जीवनशक्ति त्या मनुष्यांतून निघून गेली; आणि ती औषधांत मुळींच नसल्यामुळें, उलटीचें औषध केवळ रसायनजन्य जडद्रव्यांच्या बळावर लागू होण्यास असमर्थ होतें.

येवढ्यावरूनही वरील प्रश्नांचा उलगडा झाला नसल्यास, उलटीचें कारण औषधांत आहे का रोग्यांत आहे, या विषयाचा ऊहापोह मी पुढें चालवितों. कल्पना करा; कीं कांहीं बायका जेवीत बसलेल्या आहेत. त्यांतील एक नाजूकशी स्त्री पाहून तिला अकस्मात् सांगावें कीं "अहो अहो बाई ! त्या तुमच्या करवंदाच्या लोणच्यांत आळी होती—किंवा माशी होती—ती तुमच्या पोटांत गेली." इतकें सांगितलें कीं पुरे, तिचा हात आखडलाच. आणि एक मिनिट जातें न जातें, तों तिला भडाभड ओकून पडलेंच. वस्तुतः तिच्या पोटांत आळी गेली नाहीं, आणि माशीही गेली नाहीं, मग असें कां व्हावें ?

---

१ आमाशयोत्क्लेशभवाः प्रायश्छर्द्यो हितं ततः ।

वाग्भट. चिकि० अ० ५—

अर्थ—"आमाशयांत उत्क्लेश (क्षोभ, दोष, चलित होणें) झाल्यामुळें बहुधा वांत्या होतात." २ पंढरपुरास केशवराव कौलगी ह्मणून सावकाराचा मुलगा प्रसिद्ध होता. त्याला करकंब गांवांत कुत्रें चावलें. परंतु त्याविषयीं त्याच्या मनांत कल्पनाच नव्हती. चार महिन्यांनीं करकंब गांवचा एक गृहस्थ कोर्टांत भेटला व "तुह्मी मोठे दैववान, त्या

ह्याचें उत्तर इतकेंच कीं, उलटीचें कारण मेंदूंत असतें. तोंडानें उच्चारलेला पदार्थ आपल्या पोटांत गेला असें तिच्या मनानें घेतलें. तिचें मन एकाग्र हो-ऊन त्याच गोष्टीवर वेधून राहिलें. आणि त्यानें पक्काशयाला खालवर दबण्याचें सामर्थ्य येऊन उलटी होईपर्यंत लागेल तेवढी **विद्युज्ज्ञानशक्ति** मेंदूंतून काढून पक्काशयांत फेंकून देण्यांत आली. ह्या उदाहरणांतील उलटी करणारें तत्त्व, व उलटीच्या औषधांत उलटी करणारें तत्त्व एकच. तें कोणतें ? तर **विद्युज्ज्ञान-रस.** ह्या दोन्ही उदाहरणांत फ़रक ह्मणून इतकाच कीं, उलटीच्या औषधानें त्या रसास मेंदूंतून खालीं आणलें तें औषधोपचारानें आणलें, आणि मनानें त्यास खालीं आणलें तें मनोविकारानें आणलें.

उलटीचें तत्त्व आमच्या देहांतच जर नसतें, तर एखादें जनावर अतिशय घाणेरा पदार्थ खातांना पाहिल्यानें, किंवा कुत्र्यानें आपलीच ओक खातांना पाहि-ल्यानें आपल्या पोटांतून उमळून कां येतें ? आमच्यांत जर तें तत्त्व नाहीं, तर

---

कुत्र्याच्या दंशानें चाळीस माणसें मेलीं, तें पिसाळलेलें होतें," असें तो त्यास ह्मणाला. इतकें ऐकतांच त्याच्या कपाळांत दुखूं लागलें; नंतर तो घरीं आला. त्याच्या तोंडास लाळ सुटली, व तो भोंकूं लागला. तो दुसऱ्या पहांटेसच तो मेला. भावनेनें विषार चढून भोंकणें वगैरे सर्व क्रिया खरोखरीचें फल येऊन झाल्या. तस्मात् भावनेंत अर्थ नाहीं असें कसें ह्मणावें ? भावनेप्रमाणें औषधाचें फल येतें असें वैद्य व डाक्टर यांचेंही मत आहे.

फ्रान्सांत फांशीची शिक्षा झालेला कैदी डाक्टर लोकांनीं मागून घेतला, व त्याला टेबलावर बांधला, व तुझें रक्त काढून घेतों व तुला विनइजेनें मारतों असें सांगितलें. त्याचे डोळे बांधिले व उगीच कोठें कोठें टोंचलें. आणि ऊन पाणी सांडून त्याच्या आंगाखालीं जाई असें केलें व तसेंच खालच्या पाण्याच्या भांड्यांत धार वाजे असेंही केलें. व रक्तपाताविषयीं आश्चर्य दर्शवून आपआ-पसांत भाषणें केलीं. होतां होतां आपलें सर्व रक्त गेलें असें वाटून तो जागच्या जागीं थंड झाला व त्याचा जीव गेला. तात्पर्य, खरें वाटण्याच्या भावनेनें मन तसें होतां होतां जीव जाणें असा देहावर परिणाम घडला.

ब्रह्मविद्या प्रबोधरत्न. भा० १.

कोचीमध्यें थोड्या वर्षांपूर्वीं एक घर शाकारीत असतां एका कुणब्यास एक साप चावला. त्यास वाटलें पांजरणच टोंचलें. ह्मणून तो निघून गेला. दुसऱ्या वर्षी तेंच घर शाकारतांना त्या सापाचें बांधणींत अडकून राहिलेलें प्रेत सांपडलें. तें पाहून 'हाच साप मला गत वर्षीं चावला होता' असें बोलून तत्काल झेंडू फुटून तो मेला.

ए. के. को.—

पोटामध्यें मळमळ कां उत्पन्न व्हावी ? मेंदूंतील ज्ञानशक्तींत तें नसतें तर, गलबतींच्या झोक्यानें व गाडीच्या हदऱ्यानें ओकून कां पडतें ? झोंपाळ्यावर बसल्यानें कपाळ कां फिरतें ? आणि ठणका कां लागता ?

रेचकाच्या बाबतींतही हीच गोष्ट लागू आहे. त्यांतही असेंच ग्रंथींच्या पृथक्करणास उत्तेजन मिळतें. अंतर ह्मणून इतकेंच कीं, उलटींतील ग्रंथीहून रेचकांतील ग्रंथी भिन्न असतात. रेचक हें भक्ष्यमार्गाच्या चिकट ग्रंथीच्या पृथक्करणास ढवळून देतें. तेणेंकरून मेंदूंतील विद्युच्छक्ति आकर्षिली जाते; पण बहुतकरून त्यांत शरीराच्या सपाटीच्या ज्ञानतंतूंपासून आलेली फार असते, ह्मणून उलटीहून थोडी भिन्न अशी क्रिया घडते. उलटीची क्रिया व परिणाम ह्यांवर ज्या अर्थीं मीं इतका विस्तार केला, त्या अर्थीं मनुष्यदेहाला औषधोपचाराचा उपयोग कोणात्या प्रकारचा होतो, ह्या बाबतींतही एक सूचना करून ठेवली, तर कोणाच्याही मनाला अधिक विचार करण्यास तें एक साधन होईल. औषध हें एक फक्त, अशक्त भागाला आरोग्य आणि पुष्टि येण्यासाठीं, स्वतःसिद्ध बरें होण्याच्या कामीं मदत करण्यास आधार आणि टेंका आहे. अतिशय नाजुक मनुष्यानें पोटांत जर रेचकाचें औषध घेतलें, तर त्यास त्याच औषधानें उलटी होईल; आणि उलटीचें औषध पक्काशयांत फार वेळ आपला गुण करीत राहिलें, तर दुसऱ्या पडद्यांतून जातांना, दुसऱ्या पक्काशयांत रेचकाचे गुण उत्पन्न करील.

इतका वेळपर्यंत मी विद्युज्ज्ञानशक्तीनें रोगांचा परिहार कसा करावा, ह्या संबंधानें आवश्यक वाटलें तेवढें बोललों. आणि ती शक्ति औषधानें कशी उत्पन्न करतां येते, व मनोविकारानें कशी उत्पन्न करतां येते, हेंही स्पष्ट दाखवून दिलें. आतां आरोग्यता राखणें, आणि रोगोत्पत्ति होऊं न देणें, ह्याविषयीं काय काय तजविजी कराव्यात याबद्दल विवेचन करतों. ह्मणजे त्या योगें, जे कोणी शरीरसंपत्तीचें अखंड सुख भोगूं इच्छित असतील त्यांस मोठें साह्य होईल. कारण जीव हा सर्वांसच प्यारा आहे. हें औषध अमुक आहे, किंवा ह्यापासून अमुक एक गुण येण्याचें लक्षण आहे, हें न सांगतां, निखालस गुपचुप रीतीनें, जे वैद्य लोक आपल्या रोग्यास औषध सुरू करतात, ते वेडे आहेत, असें जर मी धडधडीत ह्मणत आहें, तर त्याबद्दल मला त्यांची क्षमा मागणें उचित होय. रोग्यानें ज्या वैद्यावर पूर्ण भरंवसा ठेवला आहे, त्यानें रोग्यास जर वर

दर्शविलेली सर्व माहिती सांगितली, तर त्याच्या मनांत लौकर बरें होण्याची आशा बलवत्तर होईल, आणि त्याचें मन, त्याच मनोविकारांसहवर्तमान औषधोपचार गुणांत सामील होऊन त्याच्या गुणधर्मांची वृद्धि करील; आणि त्याचा परिणाम फार सुखावह आणि समाधानकारक असा होईल. आतां अशा प्रकारचा उल्लेख लहान मुलांपाशीं किंवा भ्रमिष्ट मनुष्यांपाशीं करतां यावयाचा नाहीं, हें मी कबूल करतों. पण ज्या ठिकाणीं तो करतां येण्यासारखा आहे, त्या ठिकाणीं तो करावा हें उक्त होय.

शरीरसंपत्ति नीट राखण्याच्या कामांत मुख्य गोष्ट ही कीं, शरीर स्वच्छ आणि आच्छादित ठेवावें; मन पवित्र आणि शांत राखावें. प्रत्येक गोष्टीला सीमा आहेच; तिचें होतां होईल तों उल्लंघन न होण्याविषयीं अवश्य जपावें. सोमळ पाण्यानें सर्व शरीर नीट रीतीनें धुऊन काढावें, किंवा गळ्याखालून स्नान करावें. दोहींमध्येंही साबणाचा उपयोग करूं नये. आणि त्या कृत्याला तीन चार मिनिटांपेक्षां अधिक वेळ लावूं नये. जाड्या हातरुमालानें झपकर अंग पुसावें. वरून खालीं अंग पुशीत जाणें बरें. अंग पुसतांना ही एक गोष्ट लक्षांत बाळगली पाहिजे कीं, त्यामुळें रोमरंध्रांवर असलेली पातळ त्वचा खरडूं नये. हवा थंड असेल तर, आपण नेहेमींच्या हवेंत जें पाणी घेतों, त्यापेक्षां अंमळ अधिक थंड पाणी उपयोगांत आणावें. ह्मणजे पाणी हें हवेशीं साधारणपणें समप्रमाणांत असावें. पण थंडी फार कडाक्याची पडली असेल तर, चटकर जाऊन पाण्यांत बुडी मारावी, न लागलेंच बाहेर निघावें. स्नानाला फार वेळ लावूं नये. क्षणांत आटपावें. थंड हवेंत आठवड्यांतून दोन वेळ स्नान पुरे आहे; आणि उष्ण हवेंत नेहेमींच्या प्रकृतीला एक दिवसाआड पुष्कळ झालें. वारंवार आंग धुणें, घटके घटकेला स्नान करणें, आणि पुष्कळ वेळपर्यंत पाण्यांत डुंबत बसणें, हें चांगल्या प्रकृतीला फार घातक आहे. तसें केल्याच्या योगानें कातडीस तुळतुळीतपणा व मृदुलता येण्यासाठीं, तिच्यामध्यें परमेश्वरानें ठेवलेलें तेल नाहींसें होतें. पाणी शुद्ध करण्याची जी पद्धत आहे, ती नीट व्यवस्थित असेल तर उत्तम आणि गुणावह आहे. उष्णता झाली असेल, किंवा शरीर तापलें असेल तर, ऊन पाण्याचा उपयोग करावा ह्मणजे गारवा येईल. पाय गारठतात असें वाटलें, तर प्रत्येक दिवशीं रात्रीं निजावयाच्या वेळीं, ते पूर्ववत् उष्ण होईपर्यंत, थंड पाण्यानें धुण्याचा परिपाठ ठेवावा. थंडीनें हातास बधिरता आली असेल तर, ती गार पाण्यानेंच

नाहींशीं होईल[1]. तो हात जर आधण आलेल्या पाण्यांत बुचकळला, तर जायबंद होईल, किंवा झडून जाऊन कापून काढण्यापर्यंत मजल येऊन पोंचेल. पण तोच हात भाजला असेल, किंवा त्यास ऊन पाण्याचा चटका बसला असेल तर,–जो आधण आलेल्या पाण्यांत बुचकळल्यास जायबंदा होतो तो–आधण आलेल्या पाण्यांत तर काय, पण विस्तवावर धरला तर त्यापासून गुण पडतो. हा उपाय दिसण्यांत जरी दांडगा आहे, तरी तो रामबाण आहे. वरील सर्व प्रतिपादनावरून तापामध्यें गार पाण्याचा उपयोग करणें, कपाळावर बर्फ ठेवणें, मेंदू तापला असतां किंवा कपाळास ठणका लागला असतां, तसलेंच उपचार करणें, हा प्रकार किती विसंगत आहे हें आपल्या ध्यानांत येईलच.

आतां मी आपणां सर्वांचें लक्ष खाणें, पिणें, आणि वस्त्रपात्र ह्यांजकडे वळवितों. आणि मनुष्याची प्रकृति नीट राहण्यासाठीं, त्या गोष्टी कसकशा असाव्यांत हें होईल तितकें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करतों.

मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, आमचें शरीर पंचमहाभूतात्मक असून तें ब्रह्मांडाचाच एक परमाणु आहे. ह्यास्तव आपली प्रकृति अगदीं निकोप ठेवणें अ-

---

१ ही विपरीत योजना प्रथमदर्शनीं मोठी चमत्कारिक वाटते. परंतु ती आर्यवैद्यक शास्त्रसंमत आहे:—

एवमन्यानपि व्याधीन् स्वनिदानविपर्ययात् ।

वाग्भट सू० अ० ८

"याचप्रमाणें इतर रोगांची चिकित्सा देखील त्यांच्या हेतूविरुद्ध करावी. व्याधिविपराताचें उदाहरण—वांतीवर वांती देणें—सार्थवाग्भट टीप—

बलिनो बहुदोषस्य वमतः प्रततं बहु ।

वा० चि० अ० ५,

"मनुष्य सशक्त असून दोष फार वाढलेले असतील, व एकसारखा फार वेळ अतिशयित ओकत असेल तर, वमन द्यावें."

प्राणदा प्राणदा दोषे विबद्धे संप्रवर्तिनी ।

वा० चि० अ० ९

"रेचकावर हिरडेच प्राणदाते होतात." इत्यादि.

अनुभव–चांगल्या मनुष्यानें कोयनेल घेतलें, तर त्यास हिंवताप जडतो. पण तेंच हिंवताप येणारास दिलें तर हिंवताप तत्काळ नाहींसा होतो. 'होमिओपाथिक' ह्मणून जी एक नवीन प्रकारची औषधयोजना निघाली आहे, ती सर्व ह्याच पायावर आहे. ए. को. को.

सेल तर, पृथ्वीच्या ज्या भागावर आपण जन्मलों, ज्या भागावर आपण वाढलों, ज्या पृथ्वीच्या भागावर आपण आपले दिवस घालविण्याचा निश्चय केला, त्या भूभागांत जे प्राणी किंवा ज्या वनस्पति उत्पन्न होत असतील, किंवा इतर निर्वाहाचीं साधनें पैदा होत असतील, त्यांवरच आपला चरितार्थ चालविला पाहिजे. तसेंच आपलीं वस्त्रेंप्रावर्णें वापरावयाचीं तींसुद्धां आपण राहतों त्याच प्रांतांतील असावींत. जेथची जमीन बर्फानें आच्छादून जाते, किंवा पृथ्वीच्या ज्या कटिबंधावर कापूस पिकत नाहीं, अशा ठिकाणीं कापसाचीं वस्त्रें कधींही वापरतां कामा नये. ताग, वाख, कापूस, लोकर, रेशीम ह्यांपैकीं ज्या ज्या भागावर जें जें होत असेल, तेथें तेथें त्याचा त्याचाच उपयोग करणें फार सुखावह आहे. **जगन्नियंत्या**ची योजना अगदीं परिपूर्ण आहे. त्यानें सर्व झाडपाला, फळफळावळ, ह्यांच्यामध्यें, व तीं ज्या जमिनींत उत्पन्न होतात त्या जमिनीमध्यें, आणि ज्या हवेमध्यें तीं वाढतात त्या हवेमध्यें उत्कृष्ट तऱ्हेचा मेळ घालून दिला आहे. ह्मणून जो कोणी आपल्याच प्रदेशांतील अन्न सेवन करतो, आपल्याच झऱ्यांतून वाहणारें पाणी पितो, आपल्याच हवेमध्यें पैदा झालेलीं वस्त्रेंप्रावर्णें वापरतो, त्याच्या शरीरामध्यें, आणि भोंवतालच्या हवेमध्यें नेहेमीं उत्तम मेळ व सख्यत्व राहतें. मी असें ह्मणतों कीं, हीं सर्व जो कोणी प्रमाणांत सेवन करतो, तो शरीरसंपत्तीच्या सुखास पात्र होतो. आणि तसें करण्यांत त्यांचा असद्विनियोग झाला असेंही होत नाहीं.

ज्या हवेचा आपण कधींच अनुभव घेतलेला नाहीं, अशा अगदीं निखालस भिन्न हवेंत आपण स्थलांतर करावें, ह्मणजे वरील गोष्टींची सत्यता स्पष्टपणें समजून येईल. ह्याकरितां मी आतां आपलें लक्ष हवेच्या **अनुभवशास्त्रा**कडे, ह्मणजे **पंचभूतानुभवशास्त्रा**कडे वळवितों.

वनस्पतींचें जीवन खनिज पदार्थ; आणि प्राण्यांचें जीवन वनस्पति. ह्यावरून हें उघड होतें कीं, जेथें वनस्पति नाहींत, तेथें प्राणीही असावयाचे नाहींत. कारण, प्राणी ह्मणजे वनस्पतींचीच वरची प्रत. भूगोलाच्या प्रत्येक कटिबंधांत एका विशेष प्रकारच्या वनस्पति असतात, आणि त्यामुळेंच पृथ्वीवर निरनिराळे भेद उपन्न होतात. भिन्न भिन्न कटिबंधांतील हवा, पाणी, व जमीन, जशी भिन्न भिन्न प्रकारची असते, त्याप्रमाणेंच एकाच वनस्पतीचे नमुने निरनिराळ्या कटिबंधांत निरनिराळ्या प्रकारचे आढळतात. पपनसें, डाळिंबें, व संत्रें, उत्तरेच्या चाळीस अक्षांशांवर ज्या प्रकारचीं असतात, त्याहून, उत्तरेच्या तीस अंशांवर उत्पन्न होणारीं तींच फळें निराळीं असतात. त्यांच्या सभोंवतालची त्यांस पौष्टिकता देणारी हवाच

जर भिन्न पडली, तर तसें होणें साहजिकच आहे. निरनिराळ्या कटिबंधांतील गहूं, तांदूळ, जव इत्यादि धान्यें घेतलीं तरी, त्यांसही हाच नियम लागू पडेल. तसेंच जनावरें हीं जर वनस्पतींचीच वरची प्रत आहे, तर त्यांतही भिन्न कटिबंधाप्रमाणें भिन्न भिन्न प्रकार असला पाहिजे. बकऱ्याचें मांस, डुकराचें मांस हे पदार्थ, उत्तरेच्या तीसपासून चाळीस अक्षांशपर्यंत चांगले मानवतात. पण इतर ठिकाणीं ते फार अयोग्य होत. कारण, प्रत्येक प्राणिमात्राला स्वदेशाची हवा व स्वदेशाच्या वनस्पति फार हितावह होतात.

मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, हवा, पाणी, व वनस्पति, ज्यांवर आह्मी आपली उपजीविका करतों, त्याच पदार्थांनीं आमचें शरीर बनलेलें आहे; आणि ज्या प्रदेशांत आह्मी जन्मलों, वाढलों, तेथची हवा, व तेथचे पदार्थच आह्मांस फार हितावह होतात. आमच्या शरीरांतील परमाणु नेहेमीं झिजून नाहींसे होत असतात. आणि आमच्या खाण्यापिण्यानें ते पुन्हा नवे उत्पन्न होऊन त्यांत भर पडत असते. आमच्या शरीरांत जेवढें मांस आहे, तेवढें सर्व झिजून नाहींसें होण्याला सुमारें एक वर्ष लागतें, आणि सारीं हाडें नाहींशीं होण्यास सुमारें सात वर्षें लागतात. ह्मणजे प्रत्येक सात वर्षांत आह्मांला सात शरीरांइतकें मांस व रक्त तयार करावें लागतें, आणि एक देहाइतका अस्थिपंजर मिळवावा लागतो. ह्यावरून सात वर्षांपूर्वीं आमच्या देहांत जें मांस व जीं हाडें होतीं, त्यांपैकीं एक रजःकणही आज आमच्या देहांत शिल्लक नाहीं, असें झालें. आपल्या शरीरांतील जेवढे रजःकण झिजून नाहींसे होतात, तेवढे, आपण जें अन्न खातों, व जें पाणी पितों, त्यापासून नवे तयार होतात. आणि ज्या द्रव्यांच्या योगानें आमचें शरीर बनलें आहे, तींच द्रव्यें आमची उंची, लांबी, व घेर वृद्धिंगत करण्यास कारणीभूत होतात. शरीरांतील झीज भरून काढण्यासाठीं, आपल्या शरीरांतील हितकर द्रव्यें हितकर द्रव्यांसच जमा करतात. हा नित्य क्रम.

कल्पना करूं या कीं, आपण एकाएकीं हवा पालटण्यासाठीं उत्तर अक्षांश तीस चाळीसपर्यंत गेलों. तर हवापाणी, फळफळावळ, मासमासकण, सर्व कांहीं भिन्न असणार. आमचें जुन्या परमाणूंनीं बनलेलें शरीर, आपण उत्तरेस चाळीस अक्षांशावर आणलेलें आहे. त्यांतील परमाणु नेहेमींप्रमाणें झिजून नाहींसे होत असतात, त्यामुळें क्षुधा आणि तृषा लागते. ती आह्मी उत्तर अक्षांश चाळीसांवर उत्पन्न झालेल्या अन्नानें आणि पाण्यानें भागवितों. हाच आमचा क्रम आठवडेच्या आठवडे चालू राहिला तर, रक्ताचे व मांसाचे नवे नवे होणारे रजःकण, आणि

आमच्या देहांतील जुने रजःकण ह्यांची लढालढी सुरू होते, त्यामुळें **विद्युज्ज्ञानरस** प्रमाणाबाहेर खर्च होतो, आणि त्यापासून रोगोत्पत्ति होते. त्यांतून आह्मी वांचलों, आणि त्याच्याशीं सात वर्षेंपर्यंत टक्कर मारीत राहिलों, तर मात्र आह्मी पार पडलों खरे. ह्मणजे तीच हवा आमच्या पचनीं पडली. कारण, इतक्या कालांत एका कटिबंधांतील द्रव्यानें बनलेलें आमचें मांस व आमचीं हाडें नाहींशीं झालीं, आणि आमचा सर्व देहच दुसऱ्या कटिबंधांतील द्रव्यांचा बनला. ह्यावरून आह्मांस एक गोष्ट समजून येते, ती ही कीं भूगोलावरच्या अति दूर प्रदेशांत जाऊन थारेपालट करणें– प्रसंगोपात्त फायदेशीर होत असलें तरी–तें मोठें जोखमाचें काम आहे. **पंचभूतानुभवशास्त्र** तें हेंच.[1]

स्त्री पुरुष हो, मीं जे जे मुद्दे आपणांपुढें मांडले, ह्यावरून आपणासही एक आवश्यकता दिसून आली असेल कीं, आपण आपल्या ठायीं एक नेम करून टाकला पाहिजे. तो हा कीं, आपण जेथें राहतों, तेथील हवेंत उत्पन्न होणारें पाणी, फळफळावळ, धान्यें, हींच आपण सेवन करावींत, आणि दूर देशाची हवा व त्यांत होणारे जिन्नस वर्ज करावेत. पण ही गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं. आपण चहा, काफी, पितों; नारिंगें, साखरलिंबें, संत्रीं, चकोत्रीं खातों, किंवा दुसऱ्या पृथ्वीच्या अन्य प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या जिनसांचा उपयोग करतों, ही एक प्रकारची बदलच आहे. तसेंच कधीं कधीं आपण हवेचा प्रत्यक्षही पालट करतों, किंवा दुसऱ्याही कित्येक फेरफाराच्या गोष्टी करतों. त्यामुळें आमच्या शरीरांत तयार होणारे नेहमीचे परमाणु आणि हे नवे नवे आंत येणारे परमाणु ह्यांचा नेहेमीं झगडा चालू राहतो. आपण राहतों त्या हवेचें, व दुसऱ्या प्रदेशांतील पदार्थांचें, व आपल्या देहांतील सिद्धपदार्थांचें सारखें युद्ध चालू असतें. आणखी ह्या सगळयामध्यें, आह्मी जीं दूरच्या प्रदेशांतील वस्त्रप्रावर्णें वापरतों, तींही सामील केलीं, तर सदा कदा आमच्यांतील पुरुष, बायका, व मुलें, जीं प्रकृतीच्या संबंधानें कुरकुरतांना किंवा दुखण्यानें कुथतांना व विव्हळतांना आपण पाहतों, त्याचें कोणास नवल वाटणार आहे ?

भलत्याच लागलेल्या ऐषआरामाच्या संवयी, चट साऱ्या सोडून द्याव्यात; दुराचरणांत पडूं नये; आपलें शरीर स्वच्छ आणि आच्छादित ठेवावें; मन शांत

१ शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं सयुक्तः स सुखी नरः ॥

भ० गी० अ० ५—

आणि पवित्र राखावें; आपल्याच हवेंत उत्पन्न होणारे पदार्थ खावेत; आपल्याच प्रदेशांतील नद्यांचें निवळ शंख पाणी प्यावें; ताग, कापूस, किंवा लोकर, ह्यांपैकीं **जे जे जिन्नस आपल्या कटिबंधांत पिकत असतील त्यांचींच वस्त्रें वापरावींत**; आपल्या प्रकृतीस व स्वास्थ्यास पुरेशी झोंप घ्यावी; आपल्या अभ्यासाच्या, धंद्याच्या, व्यायामाच्या, आणि विचार करण्याच्या वेळा बांधून ठेवाव्यात; आणि **प्रत्येक गोष्टींत प्रमाण असावें.**[1] ह्या रीतीनें वागणूक ठेवली, तर वैद्याची आपल्या घरांत पाऊल टाकण्याची मगदूर नाहीं. चहावांचून चालतच नसेल तर **सेज, पेनिरायल,** आणि **हेमलॉक**[2] ह्यांचा तरी उपयोग करीत जावा. **ज्ञानतंतूं**चा विध्वंस करून टाकणाऱ्या त्या **चिनी** वनस्पतींपेक्षां हे पदार्थ पुष्कळ हितकर आहेत, आणि त्यांच्या सेवनानें शुष्क चैनीचा अभ्यासही पुष्कळ कमी होईल.

पृथ्वीच्या प्रत्येक पृष्ठभागावर फळफळावळ, धान्यें, आणि इतर वनस्पति तयार करतांना यथायोग्यपणा राखण्यांत **सर्वेश्वरा**ची चुकी झाली असेल, ही गोष्ट असंभवनीय आहे. कारण जेथचे तेथचे प्राणी, तेथच्या तेथच्या पदार्थांवर उपजीवन करून चैनींत, सुखांत, व शांततेंत असलेले आपण पाहतों. जनावरें

---

"जो मनुष्य या लोकीं असतांनाच, शरीर पडण्यापूर्वीं कामक्रोधांचा वेग सोसूं शकतो, ह्मणजे त्यापासून विकार पावत नाहीं, तोच योगी आणि तोच सुखी."

१ युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १ ॥

भ० गी० अ० ६

"जो योग्य आहारविहार करतो, जो कर्मांच्या ठाईं योग्य रीतीनें वर्ततो, जो योग्य काळीं निजतो, जागतो, त्याचा योग त्याच्या दुःखाचा नाश करतो."

२ Sage ( सेज ), Pennyroyal ( पेनिरायल ), आणि Hemlock ( हेमलॉक ), ह्या तिन्ही वनस्पतींच्या पाल्याचा काढा घेतला तर झोंप येते. पेनिरायल हें झाड लव्ह्यांडरच्या झाडाच्या वर्गांतील आहे. हेमलॉक ही विषारी वनस्पति आहे. महातत्त्ववेत्ता साक्रेटिस ह्या हेमलॉकचें जाज्वल्य विष देऊन मारल्याचें प्रसिद्धच आहे. परंतु त्यांत आणखी कांहीं तीव्र विषारी पदार्थ मिश्र केले असावेत. एरवीं हेमलॉकच्या आंगीं इतकी जाज्वल्यता नाहीं. मनुष्याचा प्राण जाण्यास तें पुष्कळच द्यावें लागतें. ह्मणजे ह्या वनस्पतीपेक्षांही चहा वाईट असा व्याख्यात्याचा ध्वनितार्थ आहे. राजा सर टी माधवरावांचें चहाच्या ऐवजीं तुळशीचा व वेलाचा कषाय घ्यावा, हें मत वरील सिद्धांतास फारच अनुकूल होय.

ए. के. को.

आपल्या भोंवतालचें भक्ष्य खाऊन, आपल्याच प्रदेशांतील पाणी पिऊन तृप्त असतात. एवढेंच नव्हे, तर त्यांस औषधपाला लागला तर तीं त्यासाठीं बाह्य प्रदेशीं न जातां त्यांतल्या त्यांतच हुडकून काढतात. मग तेंच सुख व समाधान मिळविण्याला, किंवा वर्धन करण्याला, मनुष्यमात्रालाच दुसऱ्या हवेंतील—परदेशांतील—पदार्थांची गरज कां लागावी ? लागूं नये, आणि लागतही नाहीं.

ह्या माझ्या अघटित कल्पना ऐकून आपण कदाचित् हांसाल सुद्धां. पण त्या शुद्ध सत्याच्या पायावर उभारलेल्या आहेत, आणि सृष्टिरचनेचे भव्य आणि सुंदर स्तंभ ज्या सच्चिदानंदानें उभारले आहेत, त्यानेंच खुद्द त्या स्थापिन केल्या आहेत, त्यानेंच त्या उदयास आणिल्या आहेत, आणि त्यानेंच त्या संरक्षण केल्या आहेत. ह्यास्तव ते खांब ढासळून पडेपर्यंत त्या कायमच्या कायम उभ्याच असावयाच्या.

पांचवें व्याख्यान समाप्त.

---

# पुस्तकपरीक्षा.

**निबंधलेखन**—हें पुस्तक मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस जाणाऱ्या मुलांकरितां रा० रा० **त्र्यंबक रामचंद्र लुकतुके** ह्यांनीं लिहिलें आहे. ह्यांत प्रथमतः निबंधलेखनाविषयीं बरेच नियम व सूचना केलेल्या आहेत. त्यांतील पुष्कळ माहिती उपयोगाची आहे. त्यानंतर निबंधाचे, 'वर्णनपर' 'कथनपर' आणि 'चिंतनपर' असे तीन विभाग करून उदाहरणाकरितां सुमारें ३० लहान लहानसे निबंध लिहून दाखविले आहेत. प्रथम विषय, त्यानंतर त्यांतील मुद्दे, असा क्रम धरलेला आहे. दुसऱ्या भागांत पत्रव्यवहाराचे नमुने वगैरे उपयुक्त माहिती देऊन पुस्तक पुरें केलें आहे. शेवटीं हिंदुस्थानचा नकाशा काढण्याविषयीं माहिती दिली आहे, पण ती फार अपुरी आहे. ती अधिक विस्तारानें दिली पाहिजे होती. असो. एकंदरींत हें पुस्तक सहाव्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांस पुष्कळ साहाय्यभूत होईल, ह्यांत शंका नाहीं. भाषा शुद्ध, चांगली व सरळ असून विषयप्रतिपादनाचा क्रमही सुरेख व सुलभ आहे. दौलताबादचा किल्ला, नूरजहानची गोष्ट, शेतकी, वर्तमानपत्रें, व स्वदेशाभिमान इत्यादि विषय ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. त्यांत शेवटच्या निबंधांतील पान १४९ मधील १८ पासून २२ ओळी प्रत्येक मनुष्यानें हृत्पटलावर अवश्य रेखून ठेवाव्यात. एकोणिसाव्या निबं-

धांतील कोल्ह्याच्या गोष्टीचा जो कार्यकारण संबंध दाखविला आहे, तो विशेष मार्मिकतेचा आहे.

आतां कित्येक मुद्यांवर रा० **लुकतुके** ह्यांचे विचार फार चमत्कारिक दिसतात. आणि त्यावरून असें एक अनुमान निघतें कीं, त्यांच्या कडून मराठी ग्रंथचालनव्यासंगाचा अनादर होत असावा एक, किंवा स्वभाषेविषयीं त्यांस दुरभिमान तरी असावा एक. पण शेवटचें कांहीं खरें दिसत नाहीं. कारण किती एक ठिकाणीं आपल्या स्वभाषेविषयीं त्यांचे विचार फार गंभीरतेचे आहेत. मग हें कसें झालें असेल तें असो. पण पुस्तकलेखनाच्या मदतीला 'मराठी पुस्तकें कांहीं' व 'इंग्रजी पुस्तकें पुष्कळ' घेतलीं ह्मणजे तसें व्हावयाचेंच.

"मराठी भाषा इतर कांहीं भाषांप्रमाणें पूर्ण देशेस आलेली नाहीं." हा रा० **लुकतुके** ह्यांचा 'श्रीगणेशा!' ह्या सिद्धांतास त्यांनीं काय पुरावे मिळविले असतील ते परमेश्वर जाणे. आपलें पुस्तक लिहितांना 'इंग्रजी' पुस्तकें 'पुष्कळ' जवळ ठेविलीं, ह्मणजे ती भाषा पूर्ण होते काय? द्रोणास—'Butter-boat, लोण्याची होडी—तुपास 'घी,' खोबऱ्यास copra कोप्रा, पडवळास Snake-vegetable सापाची भाजी—ह्मटल्यानेंच भाषेस पूर्णत्व येतें काय? तर अशा प्रकारें स्वभाषेविषयीं कितीएकांच्या मनांत जी अपूज्यता उत्पन्न झाली आहे ती फार वाईट आहे. नव्या, शास्त्रीय, व विशिष्ट शब्दांची नड, ही सर्व भाषेंत केव्हांही यावयाचीच. ह्या मुद्यावर आमचें मत अगदीं उलट आहे. असो.

पुढें मराठी ग्रंथसमूहाविषयीं लिहितांना— "वाचनाजोगीं पुस्तकें, गहन विषयांवरील पुस्तकें, नवीन पद्धतीचे इतिहास, शास्त्रीय ग्रंथ, मनोरंजक पण बीभत्स नव्हेत, अशीं पुस्तकें, अशीं पुस्तकें मराठींत नाहींत." हें जें विधान केलें आहे, तेंही मोठ्या धाडसाचेंच होय. निदान 'असावींत तितकीं नाहींत' असें तरी पाहिजे होतें. उभयतां **चिपळूणकरशास्त्री, जांभेकर, ओक**, ही दूरची मंडळी तर राहो, पण आज तपेंच्या तपें ज्यांनीं शास्त्रीय,—विद्युच्छास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, सृष्टिशास्त्र अशा—विषयांत खर्च केलीं, व अद्यापही रात्रंदिवस सारखी सेवा चालू आहे, ते रा० **लुकतुक्यांचे** व्यवसायबंधू व ग्रामबंधू **प्रोफेसर मोडक** ह्यांस 'शास्त्रीयग्रंथ' 'मराठींत नाहींत' हें वाचून काय वाटलें असेल बरें? त्यांच्या श्रमाबद्दल पुस्तकांस आश्रय देणें वगैरे एका बाजूस ठेवून, शास्त्रीय ग्रंथांत त्यांची स्मृति ही न काढणें, ह्मणजे आमच्या देशबंधूंची 'गुणग्राहकता' विशेष तारीफ करण्यासारखीच समजली पाहिजे. तसेंचः—

"मराठी भाषेचा नांव घेण्याजोगा एक देखील कोश नसताना मुलांना कोश पाहण्याची संवय लावा, असें लिहिणें हेंही व्यर्थच आहे." हें वाक्यही वरच्याच वर्गांतलें आहे. पुस्तककर्त्यांनीं कोल्हापुरच्याच लायब्ररींत शोध केला असता तरी, **गोडबोल्यांचा** व **क्यांडी**साहेबांचा एक हे प्रसिद्ध दोन मराठी भाषेचे कोश त्यांस मिळाले असते. क्यांडी साहेबांच्या कोशाचे दोन भाग एवढे मोठे आहेत कीं, ते घरीं न्यावयास एक गाडीसुद्धां पुरे होणार नाहीं. हाही कोश नांव घेण्यासारखा नव्हेच का?

पान २१ मध्यें जीं विरामचिन्हें दाखल केलीं आहेत तींच चिन्हें पुनः पान २६ वर दिलीं आहेत. तसेंच पान २९ वरील ३ऱ्या परिच्छेदांतील मतलब पुन्हा पान १७७ तील १३ व्या परिच्छेदांत आला आहे. ह्यावरून "एकच विचार पुनः पुनः लिहून उत्तम लेखनपद्धतीला शोभत नाहीं." ह्या त्यांच्याच नियमाला हरताळ लागतो. इत्यादि गोष्टी पुनरावृत्तीच्या वेळीं तरी रा० **लुकतुके** हे सुधारतील अशी आह्मी आशा करतों. हें निबंधलेखनाचें पुस्तक सहाव्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांनीं अवश्य जवळ बाळगावें, ह्मणजे पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे.

---

# पत्रव्यवहार व त्यास उत्तर.

**एक स्नेहेच्छु बी. ए.** उपपदधारी–( नांव प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा नाहीं. ) यांजकडून–

सा० वि० वि० सप्तंबरचा केरळ कोकिळचा अंक वाचला. त्यावरून जे कांहीं विचार सुचले ते येथें लिहितों :–

(१) पान २०९ यांत आपण लिहितां कीं, उपलब्ध पदांतील वेंचक पदें आपण पुढें देणार. मला असें वाटतें कीं, उपलब्ध पदें थोड्या किमतींत मिळतात. त्यापेक्षां अनुपलब्ध अशीं आपणास सांपडतील तेवढीं दिल्यास सर्वांवर उपकार होतील. उपलब्ध पदें देऊन जागा अडविण्यांत अर्थ नाहीं. (२) करवीरस्थ महिलेच्या पत्रास सवडीनुसार जागा मिळेल असें मागें आपण लिहिल्याचें स्मरतें. अझून त्यास प्रसिद्धि कां मिळूं नये कळत नाहीं. (३) तसेंच मागील वर्षी मासिक पुस्तकांचें परीक्षण संपल्यावर वर्तमानपत्रांचें परीक्षण होईल असें लिहिलेंत. तें परीक्षण केव्हां वाचावयास मिळणार? (४) सप्तंबरचा अंक नामदार तेलंग यांचा मृत्यु–अत्यंत शोचनीय–घडल्यानंतर निघाला असें दिसतें. असें असेल तर, त्या महात्म्याच्या मृत्यूबद्दल एक ओळही नसणें जरा चमत्कारिकच. असो. विषयांतर केल्याबद्दल क्षमा करा हो. (५) गजेंद्रचंपूबद्दल लिहितांना पुढील मधुर तीन श्लोकांस अवश्य

स्थळ मिळावयास पाहिजे होतें. पुढील श्लोक किती सुंदर व कोमल वर्णानुप्रास-युक्त आहेत तें ते श्लोक एकदां आपल्याशींच ह्मणून पाहणारास समजणार आहे. मला वाटतें कीं, अण्णांच्या कवितेचा मुख्य गुण ह्मणजे प्रसाद. कोमल वर्णानुप्रास व स्वाभाविक अप्रतिम माधुर्य हे होत. ते तीन श्लोक हे :-ह्यांनीं गजेंद्र विष्णूचा धांवा करीत आहे:—

**हतदुर्मदकंसाय मांसलांसाय वेधसे। मुनिमानसहंसाय यदूत्तंसाय ते नमः ॥ १ ॥ मंदसुंदरहासाय नंदमंदिरवासिने । वृंदावनविलासाय श्रीनिवासाय ते नमः ॥ २ ॥ पालितामरवृंदाय मुकुंदाय खलद्विषे अमंदानंदकंदाय गोविंदाय नमोनमः ॥ ३ ॥**

प्रसाद–( श्रुतमात्रा वाक्यार्थं करतलबदरमिव निवेदयंतीघटनाप्रसादस्य.—ही जगन्नाथरायाची प्रसादाची व्याख्या. ) हा गुण यांत किती ओतप्रोत भरला आहे बरें? दुसरें उदाहरण अशाच तऱ्हेचें हवें असल्यास, अण्णांचा पदसमूह पहा—त्यांत सर्वशास्त्रसमन्वयध्यान ह्मणून एक कटाव आहे तो वाचा–अशीं एक का दोन मधुर काव्यांचीं उदाहरणें सांगावीं? आतां कित्येक श्लिष्ट श्लोक आहेत, त्यांची गोष्ट निराळी.

'कुटिलप्राया लक्ष्मी तत्र प्रभवति सरस्वती यत्र।'

(६) हें आर्यार्ध माझ्या मतें शुद्ध नाहीं. छापील सुश्लोकलाघवामध्यें "लक्ष्मी"-च्या पुढें एक विसर्ग ( संधिनियमाप्रमाणें त्यास सत्व प्राप्त होतें ) आहे तो आपण गाळला. तथापि विसर्ग देऊन मूळाप्रमाणें जरी श्लोक झाला, तथापि अर्थ बरोबर लागत नाहीं. "प्रभवति"च्या पुढें एक "न" पाहिजे. ह्मणजे सर्व अर्थ बरोबर जुळतो. आतां "न" नसलाच तर अर्थ अगदींच लागत नाहीं असें नाहीं. यत्र सरस्वती प्रभवति तत्र लक्ष्मीः कुटिलप्राया या रीतीनें अन्वय करून कुटिलप्राया हें विधेय विशेषण करून कसा तरी ओढून ताणून अर्थ आणतां येतो. तथापि अर्थ-स्वारस्याला "न" पाहिजे असें वाटतें. आपलें मत कसें तें कळवावें.

वर लिहिलेल्या गोष्टींबद्दल योग्य विचार होईल अशी आशा करितों. कळावें.

आपला स्नेहेच्छु. G

* आमचे विद्वान् "**स्नेहेच्छु**" आह्मांस अशा वारंवार उपयुक्त सूचना करून आपली रसिकता व्यक्त करतात, ह्याबद्दल आह्मी त्यांचे खरोखरच फार ऋणी आ-हों‍त. वरच्या पत्रांतील मुद्यांवर आमचीं उत्तरें अशीं आहेत:—

(१)—अनुपलब्ध पदें आह्मांस उपलब्ध झालीं नाहींत त्यास निरुपाय आहे. चरित्रनायकाचें चरित्र वर्णन करतांना त्याची कृति—तद्गुणविकसनार्थ सर्वतोमुखी

असली तरी—थोडी तरी गौरवानें पुढें करणें बरें वाटून त्याप्रमाणें केलें. (२)—करवीरस्थमहिलेचा लेख प्रसिद्ध करण्यास विषयवैपुल्यामुळें आजपर्यंत सवड झाली नाहीं. तथापि लौकरच स्थळ देण्याचा मनोदय आहे. (३)—"आ-ल्यावर अभिप्राय येणें तो अनुकूळच आला पाहिजे; आपल्या दोषाबद्दल कोणी च-कार शब्द काढील तो महत्पातकी" असा आमच्या व्यवसायबंधूचा कल आहे असा दिसतो. वास्तविक आपले दोष ऐकण्यांत आपणांस आनंद असावा, त्याबद्दल ऊहापोह करावा, आणि तसें कांहीं न्यून असल्यास तें भरून काढण्याविषयीं प्रयत्न करावा. पण तसें घडण्याचें चिन्ह दिसत नाहीं. खरोखर द्वेषाचा वगैरे कोणताही संबंध नसतां सरळ अंतःकरणाच्या अभिप्रायाबद्दल मन कलुषित कां व्हावें? परंतु होतें असें अनेक सूचनांवरून, 'डोळे उघडल्याच्या' प्रार्थनेवरून 'आपणच आपले सारे दोष निवेदन करून' लोकांस देऊं केलेल्या फुका बक्षिसाच्या डौलावरून, आपण स्वतः खर्च भागत नाहीं, वर्गणीदार फार कमी असें दैन्य स्वीकारून 'कोकिळाच्या तिप्पट वर्गणीदारांबद्दल थाट मारल्यावरून स्पष्ट दिसतें. आशास कोणी मीठ घालतो आहे अशांतील कांहीं अर्थ नाहीं. तथापि खासगी, परंपरया, अन्योक्तिरूप केलेल्या आमच्या बंधूंच्या सुचनेचा अगदींच अव्हेर करणें बरें न वाटल्यामुळें तो क्रम तूर्त बंद ठेवणेंच आदरातिथ्याचें वाटतें. व तो पुन्हा हातीं घ्यावा किंवा नाहीं हाही प्रश्न अंमळ वादग्रस्त आहे. त्यांत अनेक संबंध उत्पन्न होतात (४)—मुंबई व कोची ह्यामध्यें वर्तमान पोंचून परत जाण्याची किमान पक्ष दहा दिवसांची अवधि. ह्यामुळें व अंक बराच पूर्वी तयार होऊन छापून पार होतो, ह्मणूनच नामदार तेलंगांविषयीं सप्टेंबरमध्यें कांहीं उल्लेख नाहीं. पुढील अंकांत दुःखमय चार शब्द यथामत्या लिहि-लेच आहेत. (५)—गजेंद्रचंपूतील रसभरित श्लोक आह्मांस दिसले नाहींत असें नाहीं. परंतु अरेबियन् नाइटस मधल्या अल्लाउद्दीनाचा खिसा पडला लहान, आणि बागेंतील फळें सारींच रत्नांची! तशी आमची अवस्था होणें साहजिक आहे. सर्वच जेथें प्रसादमय तेथें निवडानिवड तरी कशी करावी? पात्रांत राहतील तेवढीं निवडावयाचीं. तथापि वरील पद्यांबद्दल आह्मी 'स्नेहेच्छू'चे फार आभारी आहोंत. (६)—आर्यार्धाबद्दल 'स्नेहेच्छू'चें ह्मणणें अगदीं कबूल. 'सुभाषितरत्नभांडा-गारांत' त्या आर्येचा पाठ 'स्नेहेच्छू'च्या ह्मणण्यास अनुकूल सांपडतो. तो असा:—

"कुटिला लक्ष्मीर्यत्र प्रभवति न सरस्वती वसति तत्र।"

हा अर्थ 'स्नेहेच्छू'च्या ह्मणण्यास अनुकूल आहे. अतएव तोच प्रशस्त होय.

—ए० के० को०—

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, No. 23, Kolbhat Lane, Kalkadevi Road, BOMBAY.


# केरळकोकिळ.

पु० ७०] [अं० १२

## लोकोत्तर चमत्कार.

### खालीं डोकें, आणि वर पाय असें चालणारें जनावर!

### स्लोथ.



आजपर्यंत जितक्या पशूंचीं वर्णनें केरळकोकिळांत येऊन गेलीं, त्या सर्वांत वर दर्शविलेल्या 'स्लोथ' नामक जनावराचें वर्णन फारच आश्चर्यकारक आहे. स्लोथ हा दक्षिण अमेरिकेच्या घोर जंगलांतील झाडांवर वस्ती करून असतो. ह्याची शरीररचना इतर पशूंहून फारच भिन्न आहे. त्यामुळें त्यास जमिनीवर चालणें भारी जड जातें. त्याचे पुढील पाय, मागील पायांपेक्षां इतके लांब असतात कीं, जमिनीवर पुढील गुडघे टेंकून फरपटण्याशिवाय त्याला दुसरें गत्यंतरच नसतें. अशा स्थितींत त्या बापड्यास जमिनीवर कितपत व कसें चालतां येणार ? ह्मणून तो फारकरून जमिनीवर उतरतच नाहीं. रात्रंदिवस झाडावरच असतो. आणि तो उलटा ओळकंबलेला वरील चित्रांत दाखविलें आहे त्याप्रमाणें. झोंप घेणें ती सुद्धां तो तशीच उलटें राहून घेतो ! आपणास ही गोष्ट मोठ्या अडचणीची व अवघड वाटते; पण त्यास तसें वाटण्याचा मुळींच संभव नाहीं. कारण, त्याच्या बोटाचा शेवटचा सांधा पाहिजे तसा

वळवितां येण्याजोगा असतो. त्यामुळें त्यास आपलीं बोटें एखाद्या आंकडीप्रमाणें वळवितां येतात. आणि त्यांच्या साह्यानें तो झाडावर सहज लोंबकळत राहतो. शिवाय, त्याचे ते भक्कम पाय, ज्या डाहाळीवर तो लोंबकळलेला असतो, ती डाहाळी गच्च धरतात. तो आपला एक पुढील पाय झाडावरचीं फळें वगैरे तोडून तोंडांत घालण्यासाठीं रिकामा ठेवतो. कोंवळा कोंवळा पाला, पानें, बारिक बारिक डाहळ्या, व फळें ह्यांजवर तो आपला निर्वाह चालवितो.

दिवसा पाहिलें तर, हा प्राणी एखाद्या झाडावर उलटा लोंबकळून खुशाल झोंप घेत असलेला दृष्टीस पडतो. व त्याच्या मुद्रेवरून तो अगदीं सुस्त असावा असें वाटतें. ह्याचें कारण, त्याच्या नेत्रांस सूर्याचे किरण मुळींच सहन होत नाहींत. तथापि रात्रीं तो झाडावर फिरूं लागला ह्मणजे मोठा चलाख दिसतो.

ह्या प्राण्याचा आकार साधारणपणें मोठ्याशा कुत्र्यायेवढा असून, अस्वलाप्रमाणें त्याच्या आंगावर दाट झिप्रे केंस असतात. शेंपूट, व कान असल्याचें मुळींच दिसून येत नाहीं. त्याच्या पक्वाशयामध्यें चार निरनिराळीं पुडें असतात. परंतु रवंथ केलेला चारा कोणत्या पुडांत असतो, ह्याचा अद्याप शोध लागलेला नाहीं. ह्याची जमिनीवरची गति अतिशय थंड असल्यावरून, व बुद्धीनें तो मंद असल्यावरून तद्देशीयांनीं त्यास **'स्लोथ'** असें नांव दिलें आहे. **'स्लोथ'** ह्याचा अर्थ आळशी, सुस्त, मतिमंद असा आहे. तथापि भयंकर शत्रूपासून आपला बचाव कसा करावा, ही विद्या तो पूर्णपणें जाणतो. मोठमोठाले विषारी सर्प, व प्रचंड अजगर हे त्याचे नेहमींचे शत्रु आहेत. ते कधीं कधीं मोठ्या आवेशानें व हिकमतीनें त्याच्या अंगावर चाल करून जातात. परंतु **'स्लोथ'** आपल्या तीव्र नखांनीं व कणखर पायांनीं त्यांचा अगदीं फडशा पाडून टाकतो. त्याच्या पायांस तीनच बोटें असून तीं मणगटासच लागलेलीं असतात. ह्मणजे त्यास पंजाचा आकार मुळींच नसतो ह्मटलें तरी चालेल. कांहीं जातींस तर दोनच बोटें असतात! ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

सामान्य पशुपक्ष्यादि प्राण्यांतील गुरुत्वमध्याची रचना, आणि **'स्लोथ'** मध्यें ठेवलेल्या गुरुत्वमध्याची रचना, ह्या दोहोंमधील भिन्नत्व मनांत

आणलें ह्मणजे, जगन्नियंत्यानें असे किती प्राणी निर्माण केले आहेत, त्यांत असें वैलक्षिण्य ठेवण्याचें कारण कोणतें, ह्यांतील हेतु काय? ह्याचा विचार मनांत येऊन बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. व त्या जगदीशाचें अगाध सामर्थ्य, व अपार चातुर्य मनांत बिंबून मानवी ज्ञानाचा संकुचितपणा व्यक्त होतो.

---

## स्थलनिर्देश.

# लंका

### अथवा

## सिंहलद्वीप.

**हिंदुस्थान**चा नकाशा समोर धरला, तर त्याच्या खालच्या टोंकास थोडेंसें उजव्या बाजूस-ह्मणजे अग्नेयीस-**हिंदी**महागरांत एक मोठें बेट दिसतें. त्यासच **लंका**[1] असें ह्मणतात. ह्याच्या उत्तरेस आणि पूर्वेस **बंगाल**चा

---

१ श्रीरामचंद्रांनीं लंकेचा राजा रावण ह्याचा पराभव करून सीतादेवीस मुक्त केलें, व तेथें बिभीषणाची स्थापना केली. तीच ही लंका असावी किंवा नाहीं ह्याचा संशयच आहे असें ह्मणतात. कारण, रामेश्वरापासून लंकेपर्यंत समुद्राचें हल्लींचें जें अंतर आहे, त्याचा रामायणांतील लेखांशीं मुळींच मेळ बसत नाहीं. 'शतयोजन विस्तीर्णं समुद्रमकरालयम्' असें अध्यात्मरामायणांत वाक्य आहे. व हल्लींच्या नकाशावर अंतर पाहिलें, तर पुरतें शंभर मैल तरी भरेल किंवा नाहीं, ह्याचा वानवाच! रामावतार ह्मणजे कांहीं आजकालचा नव्हे. त्या गोष्टीस अनंतकाल लोटून गेला आहे. प्रसिद्ध कौरवांचें भारतीयुद्ध कृष्णावतारांतलें. त्यासच ७००० वर वर्षें होऊन गेलीं असें गणितशास्त्रवेत्ते ह्मणतात. तेव्हां त्याच्याही पूर्वीं होऊन गेलेलें जें रामरावणांचें युद्ध त्याच्या कालाचें अनुमान करून तेव्हांपासून आजतागाईत जलप्रलयानें, धरणीकंपानें, व ज्वलत्पर्वताच्या स्फोटानें जमिनीमध्यें व समुद्रांत जे फेरफार झाले असतील, त्याचा विचार केला तर रामेश्वरापासून शंभर योजनांवर असणारी प्राचीनकालची प्रसिद्ध लंका कदाचित् जलाशयांत बुडून जाण्याचा सुद्धां संभव आहे. कारण असलेलीं बेटें कालांतरानें बुडालेलीं व जेथें केवळ समुद्र असतो तेथें नवींच बेटें उत्पन्न झालेलीं इतिहासावरून दिसून येतात. इंग्लिश ग्रंथकारांनीं तर ह्या लंकेविषयीं आणि रामायणाविषयीं जे लेख लिहिले आहेत, ते फार गमतीचे आहेत. सिलोन (सिंहलद्वीप) ही लंका नसावी, व तेथें पूर्वीं रामही कधीं आला नव्हता. ह्याविषयीं त्यांचें पहिलें

उपसागर आहे; दक्षिणेस **हिंदी**महासागर आहे; आणि पश्चिमेस **मा-नार**चें अखात आहे. ह्याचा आकार कांहींसा पेरूसारखा आहे. ह्मणजे उत्तरेचें टोंक निमुळतें आहे, आणि दक्षिणेकडचें टोंक रुंद आहे. ह्या बेटाची सर्वांत अधिक लांबी दक्षिणोत्तर असून ती २७० मैल भरते. आणि सर्वांत अधिक रुंदी ह्मटली ह्मणजे १४० मैल आहे. ह्या बेटाचें क्षेत्रफळ सुमारें २५००० चौरस मैल आहे. आपल्या सर्व **हिंदुस्थान** देशाचे साठ विभाग केले, तर प्रत्येक विभाग **सिलोना** (सिंहलद्वीप) येवढा होईल.

**हिंदुस्थान**च्या दक्षिण टोंकापासून **लंका** अवघी ६० मैल आहे. आणि त्यामध्येंही **मानार, रामेश्वर** हीं बेटें, कांहीं खडक व कांहीं वाळूचे ढीग ह्यांनीं तीस तुटक तुटक सांधलेलें आहे. पूर्वी **हिंदुस्थानांतून लंकेस** जाण्यास चांगला उतार होता असेंही कोणी कोणी सांगतात. जमिनीपासून **रामेश्वर** बेटापर्यंत जी खाडी आहे, तीस **'पाम्बेन'**ची

---

प्रमाणः—("The inhabitants of Lanka say that Râma never come to their island.") 'राम आपल्या बेटांत कधींकालीं आला होता, अशाबद्दल तेथील लोक मुळींच दाखला सांगत नाहींत.' अनंतकालच्या गोष्टींविषयीं हल्लींच्या लोकांची साक्ष! येवढी अपूर्वताही ज्यापेक्षां ग्रंथकारांच्या लक्षांत आली नाहीं, त्यापेक्षां अधिक आश्चर्याची गोष्ट कोणती? आतां 'त्यांच्याजवळ अशाबद्दल प्राचीन लेख नाहींत,' असें ह्मटलें असतें तर शोभण्यासारखें होतें. पण त्यावरही कालांतराचा व अनेक राज्यक्रांतीचा आक्षेप आहेच. परंतु ही कल्पना कांहींच नव्हे. इंग्लिश ग्रंथकारांचें ह्याहीपेक्षां एक जाडें अनुमान आहे. तें हें:—("The story of the Râmâyaṇa is a fable to amuse people.") ह्मणजे "रामायणाची कथा निखालस खोटसाळ असून केवळ लोकरंजनार्थ केली आहे!" ह्या अजब कोटीचें मात्र कोणासही हासूं आल्यावांचून राहणार नाहीं. कारण तसें मानल्यास नाशिक येथील पंचवटीचें स्थान; हास्पेट स्टेशनाजवळची किष्किंधा व पंपा सरोवर; श्रीरामचंद्रांनीं बांधलेलें रामेश्वराचें देवालय; सेतुबंधाची तुटक तुटक राहिलेली शेष रचना; इत्यादि प्रस्तुत कालांतही विद्यमान असणारीं स्मारकें केवळ मिथ्या मानावीं लागतील. पाश्चात्य लोकांनीं आमच्या सेतुबंधास "Adam's bridge"—अदामचा पूल—असें नांव दिलें आहे. आणि अदाम हा सर्व मनुष्यजातीचा मूळपुरुष असा त्यांचा समज. मग आमच्या रामासच त्यांनीं 'अदाम' असें ह्मटलें नाहीं कशावरून? राम आणि 'अदाम' ह्या शब्दांतील वर्णसाम्यही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. परंतु जग निर्माण झाल्यासच सहा हजार वर्षे झालीं अशी ज्यांची दृढ कल्पना, त्यांनीं आमच्या रामायणाविषयीं असे कुतर्क काढले, तर त्यांत विशेष नवल वाटावयास नको!

खाडी असें ह्मणतात. **मलबारी** भाषेंत **'पांब'** याचा अर्थ सर्प असा आहे. त्यावरून हें नांव पडण्यास कारण झालें. ह्या खाडीचा आकार सर्पासारखा वांकडा आहे. **रामेश्वरा**पासून **सिलोन**पर्यंत मधून मधून निरनिराळ्या वाऱ्याच्या जोरानें वाळूच्या कटारी पडतात. त्यामुळें तो तुटलेल्या सेतूप्रमाणें दिसतो. परंतु येथें पाण्यास खळाळ फार असल्यामुळें, आणि पाण्याच्या खोलीचा धरबंद नसल्यामुळें गलबतांची सुद्धां गति चालत नाहीं. **सिलोना**स जाणाऱ्या गलबतास फार लांबून जावें लागतें.

## बाह्य देखावा.

**सिंहलद्वीप,** पाहणाऱ्याच्या दृष्टिकक्षमर्यादेंत आलें ह्मणजे नेत्रांस फार आल्हाद होतो. इतकें सुंदर बेट पृथ्वीच्या पृष्ठभागावर अन्य ठिकाणीं क्वचितच पहावयास मिळेल. त्याच्या सभोंवार निळ्या गोकर्णीच्या पुष्पाप्रमाणें अपरंपार महासागर पसरलेला दिसतो. मध्यंतरीं नारळीच्या वृक्षांनीं गजबरलेलें बेट असून त्याच्या किनाऱ्यासभोंवार पांढरी सफेत वाळू पडलेली असते. व कोठें कोठें पोंवळयांच्या खडकावर महासागराच्या धाडधाड लाटा आपटून त्याचे विखरलेले तुषार चांदीच्या पऱ्याप्रमाणें लखलखत असतात. ह्यामुळें **सिलोन** बेटाच्या मर्यादेला जणों काय चांदीचाच पत्रा बसविला आहे असा भास होतो. कित्येक ठिकाणच्या किनाऱ्यावर उंच उंच खडक दिसतात ते दुरून मनोऱ्याप्रमाणें शोभतात. ह्या द्वीपाच्या दोहों बाजूंस कित्येक ठिकाणीं मोठी चिखली असून तेथील समुद्र दुभागलेला दिसतो. चिखलींतील पाणी काळसर रंगाचें असल्यामुळें ठिकठिकाणीं मोठे सुंदर तलावच आहेत असें पहाणारास वाटतें.

**सिंहलद्वीपा**च्या सभोंवार कित्येक लहान लहान बेटें आहेत. उत्तरेस **जाफना** नांवाचें बेट आहे, तें सर्वांत मोठें आहे. तेथें पाण्याचा मोठा खळाळ असतो. द्वीपकल्पाजवळ मात्र पाणी शांत असतें. **रामेश्वराच्या** समोरच **मानार** बेट आहे. **डेफ्ट** नांवाचें बेट आहे त्यांत पूर्वी थोडे उत्पन्न करीत असत. **सिंहलद्वीपा**चा उत्तरेकडील सुमारें अर्धा भाग सखल असून सपाट आहे. व तेथचा किनारा बहुतकरून वालुकामय असून ओसाड आहे. नैर्ऋत्येकडे पर्जन्य अधिक असल्यामुळें, त्या बाजूस नारळींच्या झाडांचा थवा दाटलेला असतो. व झालरीप्रमाणें त्यांच्या पाती अगदीं भूमीपर्यंत लवलेल्या असतात.

थोडेंसें दूर उभें राहून त्यांकडे पाहिलें, ह्मणजे मनास फार आल्हाद होतो. बेटापैकीं चार हिस्से उंच सखल मैदानांनीं भरलेले आहेत, व बाकी राहिलेला पांचवा हिस्सा पर्वतमय आहे. व हीं बहुतेक गोळीमोळीच्या टप्प्यावरच आहेत. व प्रत्येक भाग खोल दरीपासून तों तहत पर्वताच्या शिखरापर्यंत बाराही मास हिरवा चार असतो. वालुकामय प्रदेशाचा समुद्र किनारासुद्धां तहत समुद्राच्या लाटांपर्यंत एखादा गालीचा पसरल्याप्रमाणें हिरवा गार लागलेला दिसतो. व त्यावर नारळींच्या झाडांची इतकी दाटी असते कीं, ती जमिनीस सूर्याचे किरण पोंचूं देत नाहीं. दक्षिणेकडील अर्ध्या भागांत उंच उंच पर्वत आणि मोठमोठालीं पठारें आहेत.

सखल प्रदेशांत **अदामचें** शिखर आहे. **सिलोनांतील** सर्वांत उंच शिखर हेंच असा पुष्कळ दिवस समज होता. ह्या पर्वताची समुद्राच्या सपाटीपासून उंची अवघी ७३५२ मैल आहे. आणि **पिदुरुतलागला** नांवाचा दुसरा पर्वत आहे, त्याची उंची समुद्रसपाटीपासून ८२९६ मैल आहे. परंतु दिसण्यांत हें शिखर फार उंच दिसत नाहीं. ह्याचें कारण ह्या पर्वताखालची जमीनच मुळीं समुद्रसपाटीपेक्षां ६००० फूट उंच आहे. ह्मणून हा पर्वत येवढा उंच आहे, तरी दिसण्यांत अगदीं ठेंगणा दिसतो. ह्या ठिकाणीं **अदामच्या** शिखरापेक्षां उंच असे अनेक पर्वत आहेत. **सिलोनांतील** पर्वताची सरासरी उंची **हिंदुस्थानांतील** पश्चिम-घाटाइतकी आहे. **अदामच्या** शिखराला तद्देशीय लोक (सिंगली) **'श्रीपद'** असें ह्मणतात. ह्या पर्वताच्या शिखरावर एक खोलगट जागा आहे. तिचा आकार कांहींसा पावलासारखा आहे. तें **बुद्धाचें** पाऊल आहे असें ह्मणतात. ह्या पावलाची लांबी साडेपांच फूट आहे. व तितक्याच मानानें त्याची रुंदी आहे.

शिखराजवळचा पर्वताचा सुळका अतिशय उंच आणि अगदीं उभा आहे. ह्यास्तव त्यावर चढण्याउतरण्यास व खडकामध्यें पाऊल ठेवण्यास खोंबण्या केल्या आहेत. व हातांत धरण्यासाठीं जागोजाग सांखळदंड सो-डलेले आहेत. **श्रीपदाचें** स्थळ २१ फूट लांब, १९ फूट रुंद असून त्याच्या सभोंवार पांच फूट उंचीचा तट आहे. व उमटलेली पदमुद्रा सुमारें नऊ फूट उंचीच्या खडकावर आहे. त्यावर एक लहानसें लांकडी देवालय बांधलेलें आहे. आणि त्यास मजबुती येण्यासाठीं कित्येक सांख-

ळदंड लावून ते खालील खडकांत गच्च बसवून टाकलेले आहेत. मुख्य **श्रीपदा**वर पितळेचें झांकण केलेलें आहे. येथें **श्रीपदा**च्या दर्शनाकरितां **चीन, जपान** इत्यादि दूरदूरच्या देशांतून यात्रेकरू येतात. व पुष्पें, धूप, दीप, नैवेद्य त्यास समर्पण करतात. साधूंस दानधर्म करतात, व भजनाचा मोठा तडाका चालतो. तेथेंच एक दुसरें **सामदे**वाचें लहानसें लांकडी देवालय व घर आहे. त्या घरांत तेथील पुजारी राहतो. **सिलोनां**त राहणाऱ्या लोकांस **सिंगली** लोक असें ह्मणतात. ते असें सांगतात कीं, पूर्वीं येथें दैत्य रहात होते. तेव्हां आकाशमार्गानें **बुद्ध** येथें आला. आणि साक्षीसाठीं त्यानें ही पदमुद्रा ठेवली. **सयामी** लोक ह्मणतात, **बुद्धा**नें एक पाऊल **लंकेंत** ठेवलें, आणि दुसरें **बंगाल**च्या उपसागराच्या पलीकडे ह्मणजे आमच्या देशांत **ब्यांकोक** शहरानजीक ठेवलें. त्याप्रमाणें तेथेंही दुसरें पाऊल दाखविण्यांत येतें. मुसलमान लोक असें ह्मणतात कीं, **अदाम** ह्या मूळपुरुषास जेव्हां दिव्योद्यानांतून काढून लावलें, तेव्हां तो ह्या टेंकडीवर आला. आणि त्याची स्त्री **ईव** हीस **मक्के**जवळच्या डोंगरावर पाठवून दिलें. ह्मणून **अदाम**ची पदमुद्रा **सिलोनां**त आहे, व **ईव**ची पदमुद्रा **मक्के**जवळच्या डोंगरावर आहे.

तात्पर्य काय, कीं हें देवस्थान **चिनी, जपानी, मुसलमान** व **हिंदु** इत्यादि सर्व जातींच्या लोकांस पूज्य असें आहे. हा चमत्कार पृथ्वीवर दुसऱ्या ठिकाणीं कोठेंही आढळणार नाहीं.

## नद्या.

**सिलोनां**तील प्रदेश डोंगराळ असल्यामुळें, व पर्जन्याचीही विपुलता असल्यामुळें तेथें अनेक नद्या उत्पन्न झालेल्या आहेत. विशेषेंकरून दक्षिणार्धांत फार आहेत. **माहुलीगंगा** ही सर्वांत मोठी नदी होय. ही **श्रीपद** पर्वतानजीकच्या डोंगरांतून निघते, आणि सुमारें १५० मैल वाहून जाऊन समुद्रास मिळते. पूर्व किनाऱ्यास **त्रिकोमाली**जवळ तिला अनेक फांटे फुटलेले आहेत. ह्याच नदीच्या खालोखाल **कल्याणी** आणि **कालगंगा** अशा दोन नद्या आहेत. ह्या पश्चिमवाहिन्या असून प्रत्येकीची लांबी सुमारें ७५ मैल आहे. गलबतें जाण्यायेण्यासारख्या नद्या **सिलोन**मध्यें फारच थोड्या आहेत. आणि आहेत त्यांतसुद्धां उथळ बुडाच्या बोटी मात्र जातात. त्याही मुखापासून थोड्याच अंतरावर-

विशेष वर जाण्यास त्यांस पाणीच मिळत नाहीं. किंवा लौकरच मोठी केसतुटी धार व खडक लागून त्यांस अडथळा होतो.

## हवा.

**सिलोन**च्या चारही बाजूनें समुद्र असल्यामुळें **हिंदुस्थाना**इतकी तेथें उष्णता नाहीं. उन्हाळ्यांतील अंगाची काहिली, व थंडीच्या दिवसांतील थंडीचा कडाका हीं दोन्हीही तेथें नाहींत. सरसालांत बहुतकरून सारखीच हवा असते. एकदम फरक असा कधींच होत नाहीं. नैर्ऋत्येच्या किनाऱ्यावर नैर्ऋत्येचा वारा थडकत असल्यामुळें तेथील हवा मात्र कोचीसारखी दमट आहे. ईशान्य किनाऱ्यावरची हवा मद्रासेसारखी रुक्ष आहे. मध्यभागीं असणाऱ्या पठारावर किनाऱ्यापेक्षां पुष्कळ थंड हवा असते. मृग लागल्याबरोबर मात्र हवेंत बराच मोठा फरक होतो. ज्या पर्वताची एक बाजू नैर्ऋत्येकडे असते, व दुसरी ईशान्येकडे असते, त्याच्या पायथ्याशीं निरनिराळा प्रकार होतो. नैर्ऋत्येकडील त्याचें अंग उघडें असल्यामुळें वारा समोर येऊन त्यावर थडकतो, व आपल्याबरोबर ढगही घेऊन येतो. त्या ढगास पर्वताचा अटकाव होऊन ते त्याच बाजूस कोसळतात. ह्यामुळें पर्वताच्या नैर्ऋत्येकडील प्रदेशावर मनस्वी पर्जन्य होऊन तो अगदीं भिजून चिंब होतो. आणि ईशान्येकडील प्रदेश पावसाच्या अभावानें होरपळत असतो!

नैर्ऋत्येच्या वाऱ्यास सुरवात झाली कीं, पश्चिमसमुद्रावरून हजारों घनपंक्ति निघून त्या जमिनीकडे धांव घेत असतात. संध्याकाळीं आणि रात्रीं वारंवार तुफान असतें. रात्रौ मेघांनीं सर्व आकाश आच्छादित असल्यामुळें इतका गर्द काळोख पडतो कीं, डोळ्यांत बोट घालीन ह्मटलें तर दिसत नाहीं! मध्येंच विद्युल्लतेची डोळे दिपविणारी लख्ख चमक येऊन निमेषमात्र यच्चयावत् वस्तु दिवसाप्रमाणें स्पष्ट दाखविते. पुन्हा एकाएकीं काळोख होऊन मेघगर्जनेचा असा कडकडाट होतो कीं, त्या-


१. कोचीस कधीं थंडी पडत नाहीं, ह्यावरून तेथील हवा उष्ण अशी वाटते. बाहेर पर्जन्याची धार सुरू असते, व घरांत अंगांतून घामाच्या धारा चालू असतात. असें आहे तथापि पर्जन्यकाळांत बुकांचे सुंदर सुंदर पुठ्ठे बुरा येऊन अगदीं खराब होऊन त्यांचें मातेरें होऊन जातें. त्यांच्या संरक्षणार्थ कोणताही उपाय चालत नाहीं. फक्त चामड्याच्या बाइंडिंगाचीं बुकें मात्र चांगलीं राहतात. बाकी सर्वांची दशा पाहून जीव तिळतिळ तुटतो. ही किती दुःखाची गोष्ट आहे!

सरशी सर्व पृथ्वी हदरून जाते. पर्जन्य तर अशा मुसळधारेनें पडतो कीं बहुत दिवस तापलेल्या जमिनींत सुद्धां पाणी राहीनासें होऊन सर्व रानोमाळ पाणीच पाणी पसरून राहतें. लहान लहान नद्यासुद्धां तुफान होऊन तीरास असणारीं झाडेंझुडपें वाहून नेतात. पर्जन्य इतका धो धो पडतो कीं, कित्येक तासपर्यंत बोललेला बोल ऐकावयाला येत नाहीं. तापून पावसासाठीं 'आ' करून बसलेलीं शेतें एका दिवसांतच बहुतकरून हिरवीं चार होऊन जातात.

तेथील पावसाचें प्रमाण फार ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. **मुंबईच्या** पावसाची सरासरी जेव्हां ७० इंच असते, तेव्हां **कोलंबो**( सिलोनांतील मुख्य शहर )च्या पावसाची सरासरी ८८ इंचांची असते. उत्तरेच्या बाजूस **जाफना** बेट आहे, तेथील पर्जन्याची सरासरी **मद्रासे**पेक्षां कांहींशी कमी ह्मणजे ४७ इंचांची असते. **त्रिंकोमाली** येथील ६० इंचांची असते. कित्येक डोंगराळ प्रदेशांतील पावसाची सरासरी १५० इंचांपर्यंत भरते. एके स्थळीं तर २१२ इंच पावसाची सरासरी आहे.

---

# मर्कटीन्याय.




प्रसिद्ध भविष्यवाद्यांचे—कोणी असतील तर—कितीही ठोकताळे उत-

रूंद्यात; तरी प्राचीनकालचे आमचे तत्त्वज्ञानी, साधु, महापुरुष, व भगवद्भक्त ह्यांनीं पुढील मन्वंतराबद्दल वर्तविलेलीं भविष्यें,—ह्मणजे आजकालची स्थिति—त्याहूनही खरी अशीं अनुभवास येतात, आणि ह्मणून त्यांच्या बुद्धिसामर्थ्याचें फार कौतुक वाटतें. फार तर काय ?. पण '**कलियुग**' हें ह्या मन्वंतरास दिलेलें कालस्थितिदर्शक नांवच किती सयुक्तिक आहे पहा ! सांप्रतकालीं युद्ध, चोऱ्या, दरवडे असली शौर्यदर्शक पुंडाई नाहीं, ह्मणून लोक एकदिलानें वागत असतील, अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती निखालस चुकीची होय. पूर्वकालाच्या शतांशही हल्लीं आमच्यांत एकोपा राहिला नाहीं, ही गोष्ट सहजीं लक्षांत येण्यासारखी आहे. ह्याचा पुरावा मिळविण्यास फार लांब जावयास नको. कोर्टांतील कामाची खेच, वकिलांचा सुळसुळाट आणि त्यांची चलती, ह्याकडे लक्ष पुरविलें ह्मणजे पुरे. आपलें कितीही नुकसान होवो, तरी कोर्टाची पायरी ह्मणून चढावयाची नाहीं, असा निश्चय करणारे उदार माहात्मे अद्यापही कोठें कोठें दृष्टीस पडतात, नाहीं असें नाहीं. परंतु असे लोक किती ? खंडीमध्यें पावरतीच ह्मटलें तरी चालेल. किंबहुना असे पुरुष कोणते ह्मणून बराच शोध करावा लागेल. पण सख्खे भाऊ वादी प्रतिवादी बनून भ्रामक ईर्षेनें धुळीस मिळाळेले अगदीं आपल्या शेजारीं सुद्धां सांपडतील.

आपल्या एका भावानें थोडा अधिक हिस्सा खाल्ला, तर तें मनुष्यास पतकरत नाहीं, पण वकिलांच्या जोडीनें दोघांचेही हिस्से गिळंकृत केले तरी तें पतकरतें! तेव्हां ह्यास कलीचें माहात्म्य ह्मणूं नये तर काय ह्मणावें ? अशा लोकवृत्तीस यत्किंचित् तरी उपरति व्हावी ह्मणून खालीं लिहिलेली मनोरंजक व सचित्र गोष्ट देत आहों. आतां ही गोष्ट जरी अनेक पुस्तकांतून अनेक वेळ प्रसिद्ध झालेली आहे, तरी ती पुन्हा पुन्हा निदान बालवाचकांच्या तरी कानांवर येणें कांहीं वावगें नाहीं. उलट हितकरच आहे. एवढ्याशा लहान गोष्टीनेंही कधीं कधीं मोठ्या महत्वाचीं कामें होत असतात. आमच्याच कोकिळांतील 'कात्रीच्या पात्यांचें भांडण'[१] ह्या चार ओळींच्या लेखानें गोमांतकांतील एका घराण्यांत केवढा

१ हा विषय के० को० पु० ४-अंक १० मध्यें आहे. व ११ ह्या अंकांतील रंगी पेजावर पाठीमागें त्याच्या सत्परिणामाचें पत्र आलेलें छापलें आहे.

सत्परिणाम घडून आला, हेंही आमच्या नित्यवाचकांस स्मरत असेलच. तेव्हां अशाच प्रकारच्या आशेवर पुढील जुनी गोष्ट अंमळ नव्या शब्दांनीं व आगेंमागें तीस थोडी प्रस्तावना जोडून वाचकांस सादर करीत आहों.

पहा वरचें चित्र. किती मनोरंजक व सद्यस्थितीचें दर्शक आहे? हे मध्यस्थानीं उच्च स्थानावर विराजमान झालेले 'मर्कटाचार्य' ही न्यायमूर्ति! ह्या चित्रांत रंग भरलेला नाहीं, नाहींतर ह्यांच्या ताम्रमुखाची आणि मार्जारनेत्रांची शोभा अधिक कळून आली असती! तरी, वरील चित्रकाराची कुशलताही कांहीं कमी नाहीं. आयतें 'घबाड' घरीं चालून येऊन पदरांत पडल्याबद्दल त्याच्या त्या संक्षिप्त आणि विद्रूप श्रीमुखावर आनंदसागराच्या लहरींचे कल्लोळ उठलेले कसे दाखविले आहेत ते पहा! न्यायाची तराजू धरण्याचा झोंक व ऐट कशी मजेची आहे पाहिलीत ना? जणों काय, ह्यांच्या आजापणजांच्या घरांत न्यायदेवता पाणी भरून सडापोतेरेंच घालीत होती! तोंडाची ठेवण पहा! 'घबूकेळ' पहातांच कसें पाणी सुटलें आहे? खालच्या ओंठाकडे नजर दिली ह्मणजे जणों काय, जिभल्याच चाटतो आहे असें वाटतें!! न्यायशास्त्राचीं आणि कायद्यांचीं पुस्तकें ह्या राजश्रींनीं आपल्या बुडाखालीं घालून त्यांवर आपलें आसन ठोकलें आहे! त्याच्या दोहों बाजूंस बसलेलीं दोन मांजरें—वादी प्रतिवादी—बिचारीं दीन मुखानें खालवर पहात तटस्थ व साशंक बसलीं आहेत. अशा ह्या अन्योक्ति चित्राकडे पाहून कोणाचें चित्त आकर्षण होणार नाहीं?

हीं दोन मांजरें एके दिवशीं संधि साधून एका हलवायाच्या घरांत शिरलीं. आणि शिंक्यावर ठेवलेलें खव्याचें गाडगें त्यांनीं महत्प्रयासानें खालीं पाडिलें. व आंतील खवा दोघांनीं तोंडांत धरून तीं आपल्या ठिकाणीं आलीं. तेव्हां त्यांचा आपआपसांत वाद पडला. एक ह्मणे, तुझा खवा अधिक आहे; दुसरें ह्मणे, माझा नाहीं, तुझा अधिक आहे. खरें पाहतां त्या दोन्ही मांजरांचा मोठा स्नेह होता. तेव्हां त्यांपैकीं एखाद्यास थोडासा खवा अधिक गेला असता, तरी फारशी हरकत नव्हती. पण एवढा उदारमनाचा विचार त्या बिचाऱ्या जनावरांस कळावा कोठून? त्यांची कांहीं केल्या आपआपसांत समजूत होईना. तेव्हां

एखाद्या सभ्य गृहस्थाकडे जाऊन ह्याचा न्याय करावा असा त्यांनीं निश्चय केला.

बिचारीं मांजरें आपणास योग्य न्याय मिळावा ह्मणून दारोदार हिंडलीं; पण त्यांस न्यायाधीश कोणी मिळाला नाहीं. अखेर लांब पुच्छड्याचे मर्कटराज त्यांस भेटले. त्यांचें तें भव्य तोंड, अहिर रत्नासारखे हिरवे चार डोळे, मस्तकावर केशांचा स्वयंभू मुकुट, अंगावर नितळ कुंतलांचें जन्मकवच, हस्तपादादि अवयवांची मनुष्याकृति ठेवण, हीं पाहून त्यांस वाटलें कीं, हा मोठा सत्पुरुष असावा! येथें आपणास खचित चोख न्याय मिळेल. मुक्या जनावरांची कल्पना! त्यांस वाटलें कीं, ताम्रमुखांत आणि लोंकरी कवचांतच न्याय, व सत्य हीं गुर्फटलेलीं असतील!

त्यांस पाहून ह्या आमच्या मार्जार वादीप्रतिवादींनीं आपण कमावलेले खव्याचे गोळे ह्या न्यायमूर्तीपुढें ठेवले, त्यास नम्रत्वानें मुजरे केले, आणि मोठ्या अदबीनें त्यांच्या बाजूस ते वादीप्रतिवादी जाऊन बसले. ही खाऊची रास घरीं चालत आलेली पाहून कपिराजास परम आनंद झाला. आणि प्रसन्नमुद्रेनें त्या उभय मार्जारांकडे पाहून त्यानें प्रश्न केला कीं, काय हकीगत आहे? मांजरांनीं आपली कच्ची हकीगत सांगून विनंती केली कीं, हा आह्मीं मिळवून आणलेला खवा आपणापुढें ठेवला आहे, ह्याची आपण समसमान वांटणी करून आह्मांस द्यावी आणि आमचा आपआपसांतील कलह मिटवावा.

माकड फार गंभीर मुद्रेनें ह्मणाला "फार उत्तम आहे." तुमचा कलह नाहींसा करणें हें माझें कर्तव्यकर्मच आहे. तुमचा कलह मी जर न मिटवीन, तर मी जातीचा माकडच नव्हे! अशी प्रतिज्ञा करून त्यानें एक तागडी हातांत घेतली. व त्यांतील एका पारड्यांत त्या खव्यांतील एक लहान भाग होता तो टाकला; व दुसरा बराच थोर होता, तो दुसऱ्या पारड्यांत घातला. तेव्हां तें पारडें जमिनीस लागलें! तें पाहून 'जज्ज'साहेब ह्मणाले "ओ होः! ह्यांत अधिक झाला खवा. ह्याकरितां कमी केला पाहिजे." आणि लागलीच त्यांतील एक बराच मोठा लपका काढून त्यांनीं आपल्या तोंडांत टाकला. ह्या पारड्यांतील वजन कमी होतांच दुसरें पारडें जमिनीस लागलें. तेव्हां ह्या न्यायाधीशांनीं पूर्वीचेच उद्गार

काढून त्यांतीलही एक लपका काढून तोही घशांत उतरविला. ह्याप्रमाणें आळीपाळीनें पांच चार खेपा झाल्या! मांजरें बिचारीं कावरींबावरीं झालीं. पारड्यांत मूळच्या खव्याचा चौथा हिस्सासुद्धां उरला नाहीं. प्रथमच्या चार पांच खेपा होईपर्यंत न्यायदेवतेच्या इभ्रतीसाठीं, त्या मांजरांच्यानें कांहीं भीड तोडवली नाहीं. परंतु सर्व खव्याचा खग्रास होण्याची वेळा जसजशी जवळ येत चालली, तसतसा त्यांच्या काळजानें अगदीं ठाव सोडला. मग त्यांस दम निघेना. निदानींच्या समयीं त्यांनीं 'कोर्टा'ची अदब वगैरे चटसारी गुंडाळून ठेवली. आणि न्यायाधीशास हात जोडून विनंति केली कीं, "न्यायाधीश साहेब! पुरे पुरे आपला आतां न्याय. आह्मी आपआपसांत समजलों. पुनरपि आमचा कलह व्हावयाचा नाहीं. राहिलेला खवा तेवढा आमच्या पदरांत टाका, ह्मणजे आह्मीच वांटून घेतों. आपणास तखलिफ दिली एवढी पुरे. पुढें खाविंदांनीं तसदी घेऊं नये." हें ऐकून मोठ्या समाधानवृत्तीनें 'जज्ज'साहेबांनीं व्याख्यानास सुरवात केली. ते ह्मणाले "मित्रांनो! माझें न्यायाचें काम खलास होण्यापूर्वींच तुमचा दोघांचा कलह मिटला, व आपआपसांत समजूत झाली, ही फार आनंदाची गोष्ट होय. ह्यावरून माझें न्याय करण्याचें चातुर्य कसें आहे तें आपल्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल. न्याय करण्याचें काम फार कठीण आहे. त्यास फार चतुराई आणि मोठा शहाणपणा लागतो. मी तुमच्या कामासाठीं बराच वेळ आणि बरीच अक्कल खर्च केली. तिचा तुह्मांकडून मला—फीदाखल ह्मणा—बक्षीसादाखल ह्मणा—मोबदला हा मिळालाच पाहिजे. तो तुह्मीं दिला काय, आणि मीं घेतला काय एकच." इतकें बोलून त्या माकडानें तो उरलेला खवा दोन्ही हातांनीं गोळा करून पटकन् आपल्या तोंडांत टाकला, आणि उड्डाण करून तो झाडावर चालता झाला!

हतभागी बिचारीं मांजरें! हताश होऊन केविलवाण्या तोंडानें म्यांव म्यांव करीत उपाशीपोटीं आपआपल्या घरीं चालतीं झालीं.

पहा! गोष्ट पाहूं गेलें तर नेहमींच्या प्रचारांतीलच आहे. परंतु तिच्यापासून केवढा बरें बोध घेण्यासारखा आहे? एका उदरांतून पाठीस पाठ लावून उत्पन्न झालेले भाईभाईसुद्धां बंधुप्रेम वगैरे चटसारें गुंडाळून

ठेवून लोणकढ्या सल्लामसलती देणाऱ्या वकिलांची भर करतात, त्यांनीं ही गोष्ट किती वेळ बरें वाचण्यासारखी आहे?

सांप्रतकालीं न्याय ह्मणजे अति मौल्यवान वस्तु. **श्रीरामचंद्र, भोज, विक्रम,** यांच्या कारकीर्दीप्रमाणें ती कांहीं हवी त्यास पैशापांसरी मिळावयाची नाहीं. पूर्वींचे राजे, न्यायाधीश रात्रौ वेषांतर करून गुप्तरूपानें सत्य गोष्टी उदयास आणीत. त्यांच्याजवळ पाहिजे त्या गोरगरीबानें जाऊन फ़िर्याद करावी. त्याची तत्काळ दाद लागे. सांप्रतच्या काळाची राहाणी अगदीं निराळी. राजा सप्तद्वीपांतरावर. न्यायाधीश गांवाबाहेरच्या बंगल्यांत. सत्य पुराव्यांत निष्पन्न होईल तें. फिर्यादीनें बोलावयाला तोंड उसनें आणावें 'बारिष्टरा'कडून! वक्तृत्वांत ज्याची कोटि वर चढेल तो विजयी. आपलें सर्वस्व बुडविलें, आपण कफल्लक झालों, ह्मणून ओरडावयाचें तर तोंड बंद! आणि रुपया आठ आणे खर्च करून ष्टांप आणावा, रुपया दोन रुपये वकीलास फी भरावी, तेव्हां ती आरड गुपचुपपणें साहेबांच्या टेबलावर जावयाची! एखाद्या गरीब ह्मातारीचें कोणीं एखाद्या धटिंगणानें डोकें फोडलें, तर तिनें कोर्टांत रडतांसुद्धां कामा नये. आधीं पैशाची तजवीज करून अर्जी लिहिणारा पाहिला पाहिजे. त्यावर जी स्थिति डोळ्यांपुढें दिसेल ती खरी; गोरगरीबाच्या खऱ्या स्थितीकडे साहेबांस कसें पाहातां येणार? खरोखर रोख पैसे दिले असून तीन वर्षें भरून गेलीं, तर ते पैसे दिलेच नाहींत असे होतात! पण ठरींव दराप्रमाणें घडलेल्या व्यवहाराच्या रकमेबद्दल सरकारचा साक्षीभूत कर आधीं वसूल होतो, त्यास मात्र बूड नाहीं! व त्याचा साक्षीभूतपणा उपयोगीही नाहीं—दाद लागण्याची जलदी तर कांहीं पुसूंच नये. आज्याचा न्याय नातवास मिळेल कीं नाहीं याचा वानवा!

तेव्हां इतके धक्के खात खात, न्यायकोर्टांत घुसावें, ह्यापेक्षां आपल्या स्वबंधूकरितां, ग्रामबंधूकरितां, किंवा स्वदेशबंधूकरितां थोडीशी झीज आपणास सोसावी लागली तरी ती सोसावी, परंतु होतां होईल तों कोर्टाची पायरी चढूं नये हाच मार्ग विहित नव्हे काय? ह्या 'कोर्टा'च्या पायीं आमच्या देशांतील किती बरें श्रीमंत घराणीं धुळीस मिळालीं आहेत? ह्या सर्वांचा थोडासा तरी विचार करून आमचे लोक अद्याप

जरी सावध होतील, आणि कलहाचा प्रसंग न आणतील तर त्यांची महत्कीर्ति होऊन देशाचेंही कोटकल्याण होईल. यापेक्षां अधिक काय सांगावें ?

# डोळे.

परमेश्वरानें 'डोळे' ही अपूर्व देणगी प्राण्यांस जन्मतःच दिलेली आहे. तरी कितीएक प्राण्यांस मुळीं डोळेच नाहींत ! उदाहरणार्थ **'तारमत्स्य.'** ह्या हतभागी प्राण्याला नांवाला मात्र डोळे आहेत. ते त्याचे डोळे ह्मणण्यापेक्षां, नेत्रांच्या ठिकाणीं खुणा आहेत ह्मटलें तरी चालेल. कारण, ते इतके अंधक असतात कीं, त्यांच्या योगानें त्यास उजेड व आंधार हे ओळखत नाहींत; रंग, रूप ओळखत नाहीं; एवढेंच नव्हे, पण पदार्थांच्या आकारांतील भेदाभेद जाणण्याची सुद्धां त्यांत शक्ति नाहीं. मक्षिकांचे डोळे त्यांच्या मस्तकावर असून ते शिंगाळ अशा पारदर्शक कंदिलांत बसविलेले असतात. शिवाय ते अचल असतात; ह्मणजे हिकडे तिकडे फिरवितां येत नाहींत. कोळ्याच्या पाठीमागें व्यवधानें फार. जाळ्यावर नजर ठेवावयाची; भक्ष्य गुंतला असेल तिकडे लक्ष ठेवावयाचें; घराकडे लक्ष ठेवावयाचें; ह्यास्तव त्यास डोळ्यांची एक जोडी पुरी व्हावयाची नाहीं, ह्मणून देवेंद्राप्रमाणें सर्व मस्तकभर त्याला डोळेच दिलेले असतात!! आह्मांस जरी दोनच डोळे आहेत तरी त्यांची तरतूद, ईश्वरानें इतर प्राण्यांपेक्षां किती उत्कृष्ट राखली आहे बरें ? आणि मनुष्याचे डोळे इतर प्राण्यांपेक्षां दिसण्यांत तरी किती सुंदर आणि पाणीदार आहेत बरें ?

असें आहे तरी, कित्येक हलक्या जातीच्या प्राण्यांमध्यें सुद्धां, फार सुंदर नेत्र असतात. गरुडाचे ते भयंकर, उग्र, आणि तेजस्वी नेत्र; मोठे, पिंगट, परंतु सौम्य, असे बैलाचे डोळे; चंद्राप्रमाणेंच सूर्यकिरणांनीं क्षय व वृद्धि पावणारे मांजराचे हिरवे गार डोळे; कोल्ह्याची धूर्त आणि कावेबाज नजर; चिमणीच्या डोळ्यांतलें पाणी; उंदराच्या मस्तकावरचे मित्याच्या मण्याप्रमाणें दुरून हेरणारे डोळे; सुप्रभ माणकाप्रमाणें दिव्य आणि नाजुक सशाचीं नेत्रेंद्रियें; सर्व कुरूपतेचा विध्वंस करणारे हिऱ्यासारखे भव्य आणि तेजस्वी बेडकाचे डोळे; चंचळ, क्षुद्र, आणि वांकडी अशी कावळ्याची नजर; बुद्धि, ममता, कृतज्ञता, ह्यांचे अंकुर दाखवि-

णारी घोड्याची आणि कुत्र्याची नजर, हीं पाहून कोणास बरें आश्चर्य वाटत नाहीं ?

वर सांगितलेल्या प्राण्यांचे, आणि दुसऱ्याही कितीएक प्राण्यांचे डोळे फार सुंदर असतात. ज्यांत मनोहरता नाहीं, असे कोणत्याही प्राण्याचे डोळे नाहींत. आपण एखाद्या प्राण्यावर प्रीति केली, तर त्याची उपकारबुद्धि, किंवा इतर प्राण्यांची आपल्यावरील ममता, त्याच्या डोळ्यांवरून जाणतां येते. आपण त्याच्या सान्निध्यास असतों, तेव्हां आपण त्याचे डोळे पहातों, आणि दूर गेलों, ह्मणजे त्याची आम्हास स्मृति होते. नेत्ररहित मुख केवळ शून्यवत् होय.

हा सौंदर्याचा भाग एका बाजूस ठेवला, तरी मनुष्यांच्या नेत्रांची रचना किती आश्चर्यकारक आहे ? ह्याकरितां तिच्याविषयींच थोडासा विचार करूं या. डोळा हा एक पोकळ गोल, किंवा वाटोळी खिडकी आहे. रथाची किंवा देव्हाऱ्याची मेघडंबरी, किंवा ताजमहालाचा घुमट अशा प्रकारचा त्याचा आकार असतो.

डोळ्याचा सर्वांत मोठा भाग ह्मटला ह्मणजे पांढऱ्या रंगाचें कवच असतें तें. ह्याच्या योगानें आपणास कांहीं दिसत नाहीं. हें कवच मजबूत, जाड, चिवट त्वचेचें, कांहीं चामडीसारखें, परंतु अधिक मृदु असें असतें. डोळ्याच्या कोठडीच्या बाहेरची भिंत हीच. हिलासुद्धां सहसा दुखापत होऊं नये इतकी ती मजबूत असते. तसेच तिच्यांतून प्रकाश आंत जाऊं नये इतकी ती जाड केलेली असते. शिवाय तिला असा कांहीं गोलाकार दिलेला असतो, कीं, तेणेंकरून तीस पाहिजे त्या दिशेकडे फिरतां येतें. अशी अपूर्व योजना केली आहे, ह्मणूनच शेंकडों डोळ्यांनीं कोळी जितकें पाहतों, तितकें आह्मी दोनच डोळ्यांनीं पहातों !

डोळ्याच्या समोर पुढील बाजूस खिशांतील घड्याळ्यावरील कांचे प्रमाणें स्वच्छ व पारदर्शक पडदा असतो. ह्याला घड्याळावरील कांचेप्रमाणेंच किंचित् बांक असतो. एखाद्याच्या तोंडाच्या बाजूकडून आपण पाहिलें, तर तो धनुष्याकृति बाह्य गोल स्पष्ट दिसतो. पापण्या ह्या खिडकीच्या कांचेच्या बाहेरील लांकडी झडपाप्रमाणें होत. घराच्या खिडकीचीं झडपें निजतांना आपणांस बंद करून घ्यावीं लागतात, व उजाडल्यावर पुन्हा उघडावीं लागतात. डोळ्यांच्या झडपांची गोष्ट तशी नाहीं.

तुम्ही निजलां, कीं तीं आपोआप बंद होतात; व तुम्ही उठलां कीं, तीं आपोआप उघडतात! जागृतावस्थेमध्यें प्रतिक्षणीं त्यांची उघडझांप चालू असते. त्यां अवकाशाला आपण 'निमिष' असें ह्मणतों. हीं निमिषें दर-एक घटकेस इतकीं होतात कीं, त्याचें आपणास स्मरण सुद्धां राहत नाहीं. तथापि ह्या उघडझांपीचा उद्देश फार महत्वाचा आहे.

घराच्या खिडकीचीं झडपें लौकरच मळतात, आणि घाण होतात. एखादा मोठ्या टापटीपीचाच घरधनी असला, तर दिवसांतून फार तर एक वेळ धुवून साफ करील. पण आमचीं डोळ्याचीं झडपें—ह्मणजे पापण्या—त्यांच्यावर एक रजःकण सुद्धां बसूं देत नाहींत. त्या दिवसांतून एकच वेळ डोळे साफ करून राहत नाहींत, तर त्या सर्वदिवसभर ह्या सजीव काचरूपी खिडक्या धुऊन साफ करीत असतात. सर्वदिवस-रात्र पाण्यांत डोळे धुणाऱ्या माशापेक्षां आमचे डोळे स्वच्छतेंत लवमात्र सुद्धां कमी भरणार नाहींत!

ह्या निरंतर स्वच्छ असणाऱ्या वर्तुळ खिडकीच्या पलीकडे, थोड्याच अंतरावर सुंदर वर्तुळ पडदा सोडलेला असतो. डोळ्यास रंग प्राप्त होतो तो ह्याच पडद्याच्या योगानें होतो. ह्या पडद्याच्या मध्यावर बाहुली असते. बोलतांना डोळ्याचे रंग काळे, घारे, व निळे इतकेच आपण पाहतों. परंतु सूक्ष्म रीतीनें डोळ्याकडे लक्ष पुरविलें, तर आंतील बाहुलीचे व पडद्याच्या किनारीचे रंग इंद्रधनुष्याप्रमाणें अनेक प्रकारें पालटतात असें दिसून येईल. आणि ह्यावरूनच इंग्रजी भाषेंत बाहुलीस 'इंद्रधनुष्य' अशा अर्थाचें नांव आहे. गर्द अंधारांत डोळ्याची बाहुली विस्तृत होते, आणि तिच्यावर सूर्याचा प्रकाश पडला तर ती संकुचित होऊन बिंदुवत् दिसूं लागते. ही गोष्ट विशेषेंकरून मांजराच्या डोळ्यांत विशेष स्पष्ट दिसते. तसेंच शांतपणानें पाहिलें तर संधिप्रकाशांत सुद्धां बाहुली विस्तार पावलेली दिसेल. मांजरास उन्हांत बसण्याची फार आवड असते. त्या वेळीं त्याच्या डोळ्यांतील बाहुली इतकी संकुचित होते कीं, तेथें फक्त एक उभी काळी रेषा मात्र दिसते.

प्रकाश नेमस्तपणानेंच आंत यावा ह्मणून ह्या सजीव पडद्याची गति निरंतर खवळलेल्या समुद्राप्रमाणें सारखी चालू असते. ह्या बाहुलीच्या

पाहऱ्यांतून किरणसमुदाय नेमस्तपणानें आंत शिरला, कीं तेथून तो पलीकडे असणाऱ्या स्फटिकासारख्या अवयवांतून बाहेर जातो.

बाहुलीच्या पलीकडे एक "लेन्स"—अंतर्बाह्यगोल असा स्फटिकाकार अवयव असतो. ह्या "गोला"ला एका पारदर्शक पडद्याचें आच्छादन असतें. तें डोळ्याच्या शेवटच्या कवचाला असें जोडलेलें असतें, कीं त्या दोहोंमध्यें तो एकादा बिलोर असल्याप्रमाणें शोभतो. ह्यापासून घड्याळाच्या वरच्या कांचेच्या आच्छादनासारखी पडद्यापर्यंतची जागा, स्वच्छ पारदर्शक पाण्यासारख्या रसानें भरलेली असून, त्यांत बाहुली तरंगत असतें.

"लेन्स" ह्मणजे अंतरबाह्यगोल आंगठीवर रत्न बसविल्याप्रमाणें एका मृदु अशा पातळ पदार्थांत बसविलेला असतो. हा पातळ पदार्थ ह्मणजे एका प्रकारचा रस असून तो तितक्याच पातळ व निर्मल त्वचेंत भरलेला असतो. आणि तेणेंकरून डोळ्याचा बहुतेक भाग व्यापला जातो. डोळ्यांतील सर्वांत शेवटचें पूड पाण्यानें भरलेल्या बुडण्याच्या घंटेप्रमाणें दिसतें.

सर्वांत शेवटच्या भागावर एक सुंदर, पांढरी सफेत, व नरम त्वचा पसरलेली असते. तिच्यापलीकडे काळा पडदा असतो. आणि त्यावर पुन्हा एक पांढरी मलमल सोडल्याप्रमाणें पदर असतो. ह्या पडद्याचा आकार कमळाच्या पेल्याप्रमाणें असून त्यास एक कमळाच्या देंटाप्रमाणें तंतूचा बुडखा असतो. त्यासच दर्शनज्ञानतंतु ह्मणतात. काळ्या पदार्थावर पदार्थांची प्रतिमा पडली, ह्मणजे हे तंतु मेंदूस जाणवितात आणि मग आपणास त्या पदार्थांचें ज्ञान होतें.

ह्यावरून एकंदरींत आपला डोळा ही एक वर्तुळ खिडकी आहे. व तिला बाहेरून झांकण्यास स्वयंभू झडपे आहेत. आणि आंतल्या बाजूस उघडझांप करणारा एक पडदा असून तो पारदर्शक रसानें भरलेला आहे. व त्याच्या भिंतीस दोन जातीचे रंगीत कागद—त्वचेचे पडदे—लावलेले आहेत. एक पांढरा आणि एक काळा! ज्या सर्वोत्तम कारागिरानें येवढी करामत खर्चून आपणास नेत्रेंद्रियाची देणगी दिली आहे, त्याचें आपण काय बरें उतराई व्हावें? त्याचे गुणानुवाद गाणें येवढेंच आमच्या हातीं आहे तें करावें हाच आमचा धर्म.

# सृष्टिवैचित्र्य.

## ५० झरे.

जमिनीच्या अथवा पर्वताच्या पोटांत असणारें पाणी हळू हळू छिद्रांवाटे बाहेर पडतें, त्यास झरा असें ह्मणतात. पाऊस पडला ह्मणजे त्यापैकीं बरेंच पाणी खडकाळ जमिनींत किंवा पर्वताच्या पोटीं मुरून राहतें. आणि बाकीचें नदीनाल्यांस मिळून समुद्रास मिळतें. जें पाणी जमिनींत किंवा पर्वतांत मुरून राहिलेलें असतें त्याचें झरें होतात. झरे पावसावर किती अवलंबून असतात, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. उन्हाळ्या दिवसांत विहिरीचें आणि झऱ्याचें पाणी पुष्कळ कमी होतें, किंवा अगदीं आटूनही जातें. तसेंच वांबाळ पडली ह्मणजे त्यांस पुन्हा पाणी वाढतें. ह्यावरूनच उघड होतें कीं झऱ्यास पावसाच्या पाण्याकडून पुरवठा होतो. कितीएक झरे फार लांबून आलेले असतात.

पाण्याला वाळूंतून पार जाण्याला कठीण पडत नाहीं; परंतु चिखलासारखा घन पदार्थ पाण्याच्या रस्त्यास आड आला, ह्मणजे त्यास आपला रस्ता दुसरीकडून काढावा लागतो. खडकाच्या भेगांतून बहुतकरून पाणी खालीं उतरतें. प्रत्येक खोल खाणीमध्यें पाणी असतें. पृथ्वीच्या कितीएक प्रदेशांमध्यें भूपृष्ठाजवळ जरी कोठें पाणी मिळत नाहीं, तरी अतिशय खोल विहिरी खणल्यास तेथें विपुल पाणी सांपडतें. अशा प्रकारच्या अत्यंत खोल विहिरीस "**आर्टिशियन वेल्स**" असें ह्मणतात. कारण ह्या विहिरी प्रथमतः **फ्रान्स** देशांतील **अर्टोइस** नामक शहरांत काढल्या. त्यावरून त्या विहिरीस वरील नांव पडलें आहे. ह्यांपैकीं कांहीं विहिरी २००० फूट खोल आहेत. ह्या विहिरी काढण्यास मोठें कौशल्य आणि वाकबगारी पाहिजे. एक प्रकारचा पोकळ स्क्रू करून तो यंत्राच्या साह्यानें पाण्यापर्यंत पोंचवितात. ह्मणजे पृथ्वीच्या पोटांत खोल असलेलें पाणी वर उचंबळून अक्षयी कारंजा उडत राहतो. अशा प्रकारच्या सतत उडत्या कारंजाच्या विहिरी हिंदुस्थानांत **मद्रासे**जवळ **पांडिचरी** येथें पुष्कळ दृष्टीस पडतात. त्या विहिरी खोदण्याची कला आपल्यांतील कोणास साधेल तर अगणित फायदा होईल. कारण ह्या विहिरीला अमुकच स्थळाची अपेक्षा आहे असें नाहीं. तर त्या पाहिजे तेथें निघूं शकतात.

झऱ्याचें पाणी ज्या खडकांतून येतें, त्या खडकाची त्यास कधीं कधीं रुची व वास प्राप्त होतो. कांहीं खडकाच्या योगानें पाण्यास जडपणा येतो, इतका कीं त्यांत साबणसुद्धां लौकर विरघळत नाहीं. कित्येक पाण्यांत लोह आणि गंधक मिश्र झालेलें आढळतें. अशा पाण्याचे झरे व्याधिग्रस्तास औषधाप्रमाणें गुणावह होतात. साताऱ्याजवळच्या यौवतेश्वरनामक पर्वतावर जें उत्तम पाणी आहे, त्यांत लोह आहे. आणि तेथें कोणी क्षयरोगी जाऊन राहिला तर तो हटकून बरा होतो अशी प्रसिद्धी आहे. कोचीशेजारीं अलवे गांवांत पूर्णा नदीचें पाणी मनुष्यदेहास अत्यंत गुणावह आहे. ह्या पाण्यांतही लोहाचें मिश्रण आहे. प्रत्येक वर्षी उन्हाळ्या दिवसांत हजारों लोक ह्या नदीच्या कांठीं तळ देऊन कित्येक दिवस राहतात. व ते रात्रंदिवस त्या पाण्यांत डुंबत असतात, तरी त्यांस कांहींएक होत नाहीं, येवढेंच नव्हे, पण तापाचा रोगी त्या थंड पाण्यांत डुंबत राहिल्यास उलट बरा मात्र होतो हा अनुभव आहे.

---

# खुशामतीचा बीमोड.

मनुष्याच्यां योग्यतेपेक्षां फाजील स्तुति करणें याचें नांव खुशामत. खुशामत करणें हें नीच काम आहे. परंतु कित्येक लोक स्वार्थासाठीं तें सुद्धां पतकरतात. बहुतकरून राजे लोक आणि श्रीमंत लोक ह्यांच्यापाशीं खुशामति लोक फार असतात. अशा लोकांस, इंग्लंदचा राजा **क्यानूट** ह्यानें एकदां अगदीं फजित करून सोडलें. ती गोष्ट फार ध्यानांत ठेवण्यासारखी असल्यामुळें येथें दाखल करतों.

**क्यानूट**—गड्यांनो, तुह्मी जें मला नेहेमीं ह्मणतां कीं, मी सर्व राजांचा मुकुटमणी आहें, ती गोष्ट खरी काय ?

**पहिला सरदार**—सत्य आहे महाराज; आपल्यासारखा बलाढ्य राजा, भूमंडलावर दुसरा कोणी नाहीं.

**दु० सरदार**—आह्मी सर्व आपले ताबेदार–गुलामबंदे–आहोंत; आपल्या चरणांची धूळ आह्मी शिरसावंद्य करतों.

**प० सरदार**—महाराज, आह्मीचसे काय ? पण पंचमहाभूतें सुद्धां आपलीं हुकुमबंदी आहेत. ह्या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत असलेली भूमी, आ-

पली आज्ञा पाळते. आणि समुद्राची तरी काय मगदूर आहे कीं, तो आपली आज्ञा उल्लंघन करील ?

**क्यानूट**—काय ह्मणतां ? मेघगर्जनेसारख्या लाटांचा समुद्र सुद्धां माझी आज्ञा पाळतो ? हा भयंकर सागर सुद्धां माझ्या आज्ञेनें शांत होईल काय ?

**प० सरदार**—हो, ह्यांत काय संशय ? समुद्र सुद्धां आपलाच आहे. आपलीं तारवें आपल्या पाठीवरून नेऊन, पृथ्वींतील झाडून सारी संपत्ति आपल्या चरणीं अर्पण करावी; ह्मणूनच त्यास निर्माण केलें आहे. तो भयंकर कोणाला ? आपल्या शत्रूला. आपण त्याचे प्रभु हें तो पक्कें जाणून आहे.

**क्यानूट**—आतां भरती येण्यास सुरवात झाली नव्हे काय ?

**दु० सरदार**—होय महाराज. ह्या पहा लाटा वरवर उसळूं लागल्या.

**क्यानूट**—ठीक आहे तर मग; एक खुर्ची आणवा हिकडे. ठेवा ती ह्या वाळूवर.

**प० सरदार**—कोठें ठेवावयाची सरकार ? येथें भरतीच्या लाटा येऊं लागल्या.

**क्यानूट**—ठीक आहे. येथेंच असूं द्या.

**दु० सरदार**—( एका बाजूस तोंड फिरवून ) महाराज हें असें काय करीत आहेत, कांहीं समजत नाहीं !

**प० सरदार**—( बाजूस ) खरोखर, ते आमच्या बोलण्यावर भरंवसा ठेवण्याइतके कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहींत !

**क्यानूट**—हे सर्वशक्तिमान् रत्नाकरा ! माझ्या पदरचे सरदार मला सांगत आहेत कीं, तूं माझ्या रयतेपैकीं आहेस. तेव्हां माझी आज्ञा शिरसावंद्य करणें हा तुझा धर्म होय. त्याप्रमाणें हा मी आपल्या राजदंडाचा तुजवर प्रयोग करतों, आणि हुकूम फर्मावतों कीं तूं मागें हट. ह्या तुझ्या मोठमोठाल्या लाटा शांत कर; मी तुझा पालनकर्ता प्रभु आहें. ह्याकरितां खबरदार, पुन्हा आपल्या लाटांच्या पाण्यानें माझे पाय ओले करशील तर !

**दु० सरदार**—( बाजूस ) मला वाटतें, आतां हे सागरजी आपल्या महाराजांची आज्ञा धाब्यावर बसविण्याच्याच बेतांत दिसतात !

**प० सरदार**—हाः ! ही पहा केवढी लाट आली ती. भरती काय झपाट्यानें चढत चालली आहे !

**दु० सरदार**—आतां दुसरी लाट आली, कीं बहुतेक खुर्चीला सचैल स्नान पडण्याचें लक्षण दिसतें. आतां येथें बसणें हा मूर्खपणा; खाऱ्यापाण्यानें सारें भिजून जाईल.

**कयानूट**—कां, कशी काय समुद्रानें माझी आज्ञा पाळिली पाहिलीत ना? तो जर माझा ताबेदार असला, तर तो मोठा राजद्रोही किंवा उद्दट आहे असें समजलें पाहिजे. हा पहा कसा तुफान होऊन वरवरच येत आहे, आणि माझ्या पवित्र देहाला खाऱ्यापाण्याचें शिंपणें करतो आहे! मूर्ख तोंडपुजांनो! तुमच्या ह्या असल्या खोटसाळ स्तुतीनें मी भुलेन असें तुह्मांस वाटलें काय? तुमच्या ह्या अशा लोणकढ्या थापांवर मी विश्वास ठेवीन होय? समुद्राला आशेंत ठेवणारा फक्त एक **परमेश्वरच** आहे, ध्यानांत ठेवा. इहलोकींचा आणि परलोकींचा स्वामी तोच; राजांचा राजा तोच; आणि बलाढ्यांतील बलाढ्य तोच. "तूं येथपर्यंतच रहा; पुढें जाऊं नको. आणि ह्या तुझ्या जगडवाळ लाटा आतां पुरे कर. बस्स." असा समुद्रास फक्त त्यानेंच एक हुकूम करावा. राजा ह्मणजे काय? एक मनुष्य. आणि मनुष्य ह्मणजे एक कृमि. ह्या कृमीला—केवळ किड्याला—परमेश्वराचें सामर्थ्य येईल काय? आणि त्याची आज्ञा पंचमहाभूतें मान्य करतील काय? छे! कधीं होणार नाहीं. घ्या हा माझा मुकुट; मी तो पुन्हा कधीं घालणार नाहीं. ह्या माझ्या उदाहरणावरून राजांनीं नम्र होण्यास शिकावें, आणि सरदार लोकांनीं तुमची फजिती झालेली पाहून, सत्य काय आहे तें ध्यानांत आणावें.

---

# पुस्तकपरीक्षा.

**रामचंद्रोत्सवचंद्रिका**—ह्यांत संस्थान बावडा येथील **श्री॰पंत अमात्य साहेब** ह्यांच्या येथें होत असलेल्या श्रीरामजन्मोत्सवाचें पद्यरूपानें रा. रा. **बापूजी लक्ष्मण कुळकर्णी** ह्यांनीं वर्णन केलें आहे. निरनिराळ्या वृत्तांतील श्लोक, संगीताच्या चालीवरचीं पदें वगैरे मिळून सुमारें पाउणशें पद्यें आहेत. कवीची कविताशक्ति बरी आहे. वर्णन चांगलें उतरलें आहे. ह्या पुस्तकाच्या वाचनानें सरदारघराण्याविषयीं मोठी पूज्यता उत्पन्न होते. प्रस्तावनेंत रा. कुळकर्णी ह्मणतातः—"काव्यास ज्या गुणांची अपेक्षा आहे, त्या गुणांचा माझे ठिकाणीं अभाव असल्यामुळें, हें पुस्तक व्हावें तसें झालें नसेल." ह्या त्यांच्या उक्तींत जितकी शालीनता आहे, तितकीच सत्यताही पण आहे.

कृतीचा शुष्क गौरव कर्त्यास निरुपयोगी होतो, आणि करणाराच्या अंगीं असमंजसपणा येतो. ह्यास्तव जसें गुणांचें तसेंच दोषांचें दिग्दर्शन करणें उभयपक्षांसही बरें.

प्रस्तुत कवीचा रसिक जनांच्या मनास प्रसन्न करणारा मुख्य गुण ह्मटला ह्मणजे उपमाचातुर्य हा होय. उदाहरणः—

**अंतर्बाह्य सुरेख रंगवुनियां प्रासाद केला निका।**
**वाटे तो रघुनाथयुक्त सतिच्या गर्भाशयासारखा॥**

हें उपमासादृश्य ऐकून मनास मोठा आल्हाद वाटतो. व रामपादांबुज भक्तमिलिंदास तर तो क्षणभर तल्लीन करून सोडील यांत शंका नाहीं. आणखीः—

**वर्णे स्वर्ण समान जें मखर तें पाहूनि ऐसें गमे।**
**लंका त्रासुनि रावणा रघुकुलालंकारपादीं रमे॥**

ह्यांत जसें उपमाचातुर्य साधलें आहे, तसेंच यमकसौंदर्यही साधलें आहे. कितीएक ठिकाणीं वर्णनाचा साधेपणाही सुरेख उतरला आहे.

परंतु कवीचा हा 'प्रथम प्रसंग' असल्यामुळें ह्मणा, किंवा कवितेवर त्यांचा विशेष व्यासंग नसल्यामुळें ह्मणा, किंवा पूर्णतेच्या त्वरेमुळें ह्मणा, पुष्कळ ठिकाणीं रसभंग, अयोग्य शब्दरचना, व यतिभंगादि दोषांचें बरेंच प्राबल्य असल्यामुळें, वाचकांचा— शर्करायुक्त दुग्धपात्रांत सैंधवपतनवत्—विरस होतो. त्याचींही कांहीं उदाहरणें, आमच्या रामभक्त कवीस दर्शविणें इष्ट दिसतें.

**नाजूकता ना दृढही विशेष॥ शोभे असा माधव देह वेष॥**

येथें 'वेष' ह्मणजे काय? प्रचारांतील अर्थ घेतला ह्मणजे विशेष हास्यास्पद मात्र होणार! अशी वायफळ शब्दरचना ह्मणजे एक प्रकारचें कवीचें पंगुत्व होय.

**"पाणी जयाचें अवलोकनीय।"**

ह्यांत पाणी ह्मणजे तेज हा अर्थ ओढून ताणूनच आणावयाचा.

**"शुद्धि प्रगल्भत्वहि तेंवि होय."**

येथें 'शुद्धि' ह्मणजे काय? कवीचा मनोदय पवित्रता, व व्यसनपराङ्मुखता ह्या गुणांचा समावेश करण्याचा दिसतो. पण तत्प्रीत्यर्थ ही योजना पुरे नाहीं.

**रामदास असोनि मी मज मान कां नच संप्रतीं।**
**त्यास वाजत गाजत प्रथम स्थलाप्रति आणती॥**

इत्यादि विबुधप्रिया वृत्तांतील कितीएक चरणांत यतिभंगाची अगदीं रेलचेल उडून गेली आहे. छंदामध्यें ऱ्हस्व दीर्घ अक्षरें कशीं तरी एकदांचीं खचलीं, ह्मणजेच कवीचें काम संपलें असें नाहीं, तर ती कविता सरळ रीतीनें ह्मणतां येईल अशी यतीची रचना करणें हेंही मोठ्या महत्त्वाचें काम आहे. परंतु त्या कामीं प्रस्तुत कवीनें अगदींच दुर्लक्ष केल्याचें दिसून येतें.

**त्रिकाळ पूजा तेंवि आरती॥ त्रिकाळ वाद्यें सर्व गर्जती॥**
**सर्वकाळ सुखदायक घडती॥ प्रकार अवलोका॥ १॥**

हें अंजनी गीत नीट ह्मणण्यास, थोडी अडचण येते.

असो. दोष दाखविणें काम सोपें आहे. एकंदरींत प्रस्तुत कवीच्या अंगीं कविशक्ति बरीच आहे. व कितीएक पद्यें साधीं व गोड झालीं आहेत तरी, आपली

कृति विद्वज्जनमान्य व्हावी एतदर्थ जी काळजी घ्यावयास पाहिजे होती तिची पुष्कळ अंशानें उपेक्षा झाल्याची उघड दिसते. असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. तथापि पुढील प्रसंगीं यथायोग्य काळजी घेतल्यास प्रस्तुत कवीची कृति रसिक जनांच्या आदरास विशेष पात्र होईल, असें अनुमान करण्यास यत्किंचितही प्रत्यवाय दिसत नाहीं, इतकें सांगणें पुरे.

**वृक्षवर्णन**—हा ग्रंथ कै० **गो. ना. माडगांवकर** ह्यांनीं केलेला आहे. ह्यांत सुमारें १५० वृक्षांची संक्षिप्त माहिती दिलेली आहे. ग्रंथकर्त्याची भाषा साधी व शुद्ध असल्याबद्दल आह्मीं अनेक वेळां कळविलेलेंच आहे. त्याप्रमाणेंच हाही ग्रंथ उतरलेला आहे. व द. प्र. कमेटीनेंही तो पसंत केलेला आहे. ह्यांतील कित्येक वृक्षांचीं वर्णनें मराठी क्रमिक पुस्तकांतूनही आलेलीं आहेत. उपोद्घातामध्यें वृक्षांच्या उपयोगाच्या संबंधानें फार चांगली माहिती दिलेली आहे. ह्या पुस्तकाची किंमत दहा आणे आहे. आणि लायब्ररीस आठ आण्यांत हें पुस्तक देण्याचें प्रसिद्धकर्त्यांनीं ठरविलें आहे. ज्ञानवृद्धीला हें चांगलें साधन आहे.

( Complete Alphabet in mono-grams )=निरनिराळ्या धातूंवर व लांकडांवर अनेक प्रकारच्या आकृति व चित्रें कोरण्याची कला—जीस इंग्रजींत एन्ग्रेव्हिंग ह्मणतात—ती कला प्रस्तुतकालीं आपल्या देशांत वृद्धि होणें ही फार अवश्यकतेची गोष्ट आहे. आणि त्याप्रमाणें कित्येक लोकांचे प्रयत्नही पण चालू आहेत. सदरहू पुस्तक मिस्तर **पी. पी. रेळे** यांजकडून आलें आहे. ह्यांत उत्तम प्रकारें सुशोभित केलेलीं, मुद्रेस उपयोगी पडतील अशीं इंग्रजी तऱ्हेचीं एकूनएक अक्षरें आहेत. ह्यांत कोणतींही दोन अक्षरें एकांतएक गुंफलेलीं सांपडतात. व त्यांचे आकारही फार चमत्कारिक तयार केलेले आहेत. ह्यामुळें कोरींव काम करणारास हें पुस्तक फार उपयोगी आहे. मुंबई शहरांत कोरींव काम करणारे बरेच लोक आहेत. परंतु रा. रेळ्यांची एक उदारबुद्धि विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, त्यांजकडे जे कोणी शिक्षण घेण्यास जातील त्यांस ते सोनें, रुपें इत्यादि धातूंवरील किंवा लांकडावरील कोरींव काम मुफत शिकवितात. ह्यास्तव होतकरू लोकांनीं ही संधि वायां जाऊं देऊं नये. सदर पुस्तकाची किंमत दीड आणा आहे. ( यांचा पत्ता—*P. P. Rele*–105–Lohar chal, Bombay. )

---

Printed and published by Janardan Mahadeo Gurjar at Javaji Dadaji's "Nirnaya-sagara" Press, No. 23, Kolbhat Lane, Kalkadevi Road, Bombay.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — केरळकोकिळ

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १८९३

अंक — १ ते १२

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)